

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १०३०
१९६१

# उमटलेलीं पावलें

— श्री. राधाबाई आपटे

REFBK-0011609

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२०८६ वि:
क्रमांक ७०२० नों: दि:



# उमटलेलीं पावलें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क. ११६०८

REFBK-0011609

लेखिका
राधाबाई आपटे


प्रमुख विक्रेते
साधना प्रकाशन

मुद्रक :
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०–३१ शनिवार, पुणें २

प्रकाशक :
श्री. राधाबाई आपटे
लक्ष्मीसदन
जंगली महाराज रोड, पुणें ४

© श्री. राधाबाई आपटे

प्रथमावृत्ति १९ डिसेंबर १९६१



कै. पां. श्री. आपटे

( आपटे गुरुजी )

यांच्या चरणीं

— राधा

मूल्य ५ रुपये

# निवेदन • •

'**उमटलेलीं पावलें**' हें पुस्तक लिहिण्याची स्फूर्ति मला माझ्या कांहींभगिनींकडून मिळाली. '**ढळला रे ढळला दिन सखया**' हें माझें पुस्तक वाचल्यानंतर माझ्या कांहीं मैत्रिणींकडून पत्रें आलीं. "आपटे गुरुजीं"चें समग्र जीवन आम्हांला वाचावयास मिळालें तर फार समाधान होणार आहे," अशा तऱ्हेचा त्यांत मजकूर होता. त्याचप्रमाणें कविवर्य बा. भ. बोरकर व साहित्यिक सौ. कमलाबाई फडके या दोन मंडळींनीं तर मला हें पुस्तक लिहिण्यास भागच पाडलें असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. सौ. कमलाबाई लिहितात, "गुरुजींचें चरित्र आपण लिहिण्यास घेतल्यास आपल्याला त्यांच्या सान्निध्यांत असल्यासारखें समाधान मिळेल आणि एक सत्‌चरित्र आम्हांस वाचण्यास सांपडेल."

सौ. कमलाबाईंचें म्हणणें अगदीं खरें आहे. कमी अधिक प्रमाणांत हें पुस्तक लिहून पुरें करण्यास एक वर्षाचा काळ मला लागला. ज्या दिवशीं पुस्तकाचा शेवटचा भाग लिहून पुरा झाला, त्या दिवशीं माझे दोन्ही डोळे भरभरून येत होते. एक डोळा—पुस्तक पुरें झाल्याचें अश्रु ढाळून समाधान व्यक्त करीत होता, तर 'आतां पुढें काय?' असा प्रश्न दुसरा डोळा पाणी ढाळूनच विचारीत होता.

'आपटे गुरुजीं'चें समग्र जीवन जरी मला पूर्णांशानें या पुस्तकांत दाखवितां आलें नसलें, तरी त्यांच्या जीवनाची कल्पना व त्याचप्रमाणें स्वभावाची धरत वाचकांना येण्याइतकी सामग्री माझ्या मतें मी या पुस्तकांत देत आहें. चरित्र लिहावयाचें म्हटलें म्हणजे ती सोपी

गोष्ट नसते. ती कठीण गोष्ट टाळण्याकरितां '**उमटलेलीं पावलें**' या शीर्षकाखालीं लिहिणें मला सोपें व सहज वाटलें, म्हणून मीं लिहिण्यास सुरुवात केली. जीवनाचीं पानें मागें उलटून पाहतां माझ्या आयुष्यांतील आणखी कांहीं व्यक्ति डोळ्यांपुढें दिसूं लागल्या, त्यांना डावलतां येईना. ज्या ज्या व्यक्तींनीं आपलीं पावलें माझ्या हृदयावर उमटवलीं आहेत त्यांनाहि बरोबर घेऊन आपलें इच्छित पुरें करावें या विचारानें '**उमटलेलीं पावलें**' हें पुस्तक मी लिहीत आहें.

या पुस्तकांत वाचकांस हवा असलेला रेखीव आखीवपणा कदाचित् सांपडणार नाहीं. त्याचप्रमाणें माझ्या लिखाणांतील उणिवा जाणवत असूनहि हें पुस्तक छापण्याचें धाडस मी करीत आहें. कारण यापुढें ह्यांच्यासाठीं मला कांहींच करतां येणार नाहीं. छे, छे, मी चुकलें, ह्यांच्याकरितां मीं हें लिहिलेलें लिखाण नसून माझ्या स्वतःच्या समाधानासाठीं लिहिलेलें आहे. यापेक्षां मनांतील संवेदना मी व्यक्त करूं शकत नाहीं.

छपाईस लागणारी कागदाची टंचाई व महर्गता ध्यानीं घेतां हें पुस्तक पुढें सवडीनें छापावें असा एक विचार होता. पण '१२ जुलै' – पानशेत धरण फुटल्यामुळें माझी झालेली तारांबळ आठवतां हें पुस्तक शक्य तेवढ्या लवकर छापून मोकळें व्हावें असें वाटूं लागलें. माझ्या या लिखाणाचें हस्तलिखित बाड हृदयाशीं बाळगून मी त्या प्रलयकाळीं सांभाळलें होतें. आतां हें लिखाण स्वतः न सांभाळतां वाचकांच्या स्वाधीन करून एकदाचें मोकळें व्हावें असें ठरवून हें मी वाचकांना सादर करीत आहें.

**— राधाबाई आपटे**

या पुस्तकासाठीं खालील मंडळींची जी मदत झाली त्याबद्दल.........

● आभार —

श्री. निळकंठ विनायक भिडे : व क्त शी र ले ख न

श्री. मधुकर यशवंत घारपुरे : पुस्तकासाठीं कागद

श्री. भय्यासाहेब ओंका र : मु ख पृ ष्ठ

साधना प्रेस, पुणें : छपाई

## १

प्रत्येक माणसाच्या हृदयावर पहिलं पाऊल जर कुणाचं उमटत असेल तर तें स्वतःच्या मातेचं. माझी आई मला बाल्यवयांत सोडून स्वर्गवासी झाली. मला त्या वेळीं पांचवें वर्ष लागलेलें असावें.

आईच्या मृत्यूचें कारण माझ्या ऐकिवांत जें आहे तें असें–डॉ. वानलेस यांनीं मिरजेस आईच्या पोटाचें ऑपरेशन केलें तेव्हांपासूनच मृत्यूचे पाश तिच्याभोंवतीं पडलेले असावेत. तज्ज्ञ डॉक्टरांनीं तिला वांचवली, पण पांच-सहा महिन्यांतच मृत्यूनें आपला घांस उचलला असं म्हणण्यास हरकत नाहीं.

रोग बरा झाला तरी भोग संपला नाहीं. शारीरिक अशक्तता दिवसानु-दिवस वाढत जाऊन त्यांतच तिचा शेवट झाला.

माझे वडील कोत्या मनोवृत्तीचे नसल्यामुळें प्रयत्नांची शिकस्त करून, डॉक्टर, वैद्य यांना दाखवून हजारों रुपये खर्चीं घालून माझ्या आईची प्रकृति सुधारण्यासाठीं रात्रंदिवस झटले. पण व्हायचें तेंच झालें. माझ्या आईचा मृत्यु सासवड मुक्कामीं माझ्या आजोळीं रा. पाटणकर यांच्या घरीं रंगपंचमीच्या दिवशीं झाला.

मृत्यूच्या आधीं एक दोन महिने तिची क्षीणता पाहून माझे आजोबा व आजी हवालदिल झालेले होते. निराश झालेला माणूस भ्रामक कल्पनेला

चट्टदिशीं चिकटतो. त्याप्रमाणेंच कीं काय आमच्याहि घरीं देवऋषि, अंगारे, धुपारे वगैरे प्रयत्न औषधयोजनेबरोबर माझ्या आईकरतां सुरू होते.

खेड्यांमध्यें अशा भ्रामक कल्पनेला पाहतां पाहतां मूळ धरलें जातें, व अज्ञानी चाळे मनुष्य सुरू करतो. पण माझी आई अशा गोष्टीला अपवाद ठरली व तिनें तसें आपलें मत स्पष्ट बोलूनहि दाखविलें. तसं पाहिलं तर माझ्या आईचं पुस्तकी शिक्षण शाळेंत जाऊन झालंच नव्हतं. थोडं फार लिहितां वाचतां तिला येत होतं एवढंच. आईला 'भूत भुताटकी' हें खेड्यांतल्या लोकांचें अज्ञान आहे आणि प्रसंगांत सांपडलेला मनुष्य असल्या कल्पनेंत सहज गुरफटला जातो ही कल्पना असल्यामुळें आजीला निक्षून सांगून हे चाळे तिनें बंद केले.

अखेर अखेर ती फारशी कोणाशीं बोलत नसे. कदाचित् तिला बोलवतहि नसेल. पण तिच्या चर्येवरुन कसला तरी खोल विचार ती करीत असावी असं आजोळचीं माणसं सांगतात. तो विचार—आपण आतां जगत नाहीं, तेव्हां एक प्रकारची निरवानिरव करावी हाच असावा. म्हणून तिनें थकलेल्या हातांनीं माझ्या वडिलांना एक पत्र लिहिलं होतं, त्यांत मुख्यतः उल्लेख तिच्याजवळ असलेल्या दागिन्यांचा व उंची कपड्यांचा केलेला होता. 'पुण्याहून आणलेली ट्रंक जशीच्या तशीच मीं ठेवली आहे. बयाबरोबरच ही ट्रंक आपण पुण्यास न्यावी. आई गेली कीं, बाप परका होतो ही कल्पना मला जाचक वाटत आहे. पण मी काय करूं? बया माझी व तुमची आहे येवढंच मी सांगूं शकतें. यांत सर्व आलें. तुम्ही आलांत तर बरें वाटेल. मोकळ्या मनानं मला पुष्कळच बोलतां येईल. दुसऱ्या लग्नाची परवानगी मीं माझ्या जिवंतपणींच आपणांस दिलेली असतांना मी गेल्यावर तो प्रश्नच सुटतो. नाहीं कां?'.

मला जें काय थोडें फार आठवत आहे तें म्हणजे मुख्य दोनच गोष्टी. एकदा काय झालं, मी आईच्या अंथरुणावर बसून मुळूमुळूं रडत होते. आईनें रडण्याचें कारण विचारतां 'मला मांडीवर घे.' हें वाक्य उच्चारून मी मोठ्यानं रडूं लागलें. माझ्या मोठ्या आवाजांनीं बिचारी आई चटकन् उठून बसली, व मला तिनं मांडीवर घेतलें. मी गप्पच झालें. किरकोळ पायाची क्षीण मांडी त्यावर पांच वर्षांची मुलगी मी कशी निजूं शकणार? 'अग!

नको ग बाई, माझी मांडी मोडली. मी बरी झालें म्हणजे माझ्या बयाला मी मांडीवर घेईन हं.' केविलवाण्या स्वरांत आई म्हणाली व मला प्रेमानें कुरवाळलें, पण त्याच वेळीं आपली मांडी सोडवून घेऊन पटादिशीं अंथरुणावर निजून गेली. मला मांडीवर घेणें तिच्या अशक्त देहाला कठिण झालें असावें.

दुसरी आठवण म्हणजे रंगपंचमीच्याच दिवसाची. आम्ही घरांतील लहान मुलांनीं ( मामा-मावशी ) एकमेकांत रंग खेळतांना आई ज्या माजघरांत निजली होती तेथून धावत जातांना एक रंगाची पिचकारी आईच्या अंथरुणाकडे उडवायचीच. पाहतां पाहतां आईचं अंथरुण ओलं झालं असावं. या आमच्या पराक्रमाबद्दल माझ्या आजीनें चांगलीच शिक्षा करण्यास सुरुवात केली होती, पण आईच्या मध्यस्थीनें आजीला गप्प बसावें लागलें. आम्हां मुलांना विजयाचा आनंद वाटत असावा, तोंच माझ्या आईला जोरदार थंडी वाजूं लागली व त्या थंडी वाजून येण्याचें पर्यवसान तापाचें प्रमाण कल्पनेबाहेर वाढून रात्रीं बाराच्या सुमाराला माझ्या आईनें नश्वर देहाचा त्याग केला. अशा रीतीनें पाहतां पाहतां त्या रात्रीं मृत्यूचा विजय झाला.

माझे आजोबा घरींसुद्धां नव्हते. रंगपंचमीच्या गाण्याकरितां मित्रमंडळींत बसलेले असतांना ' कुशी गेली ' ही बातमी अकल्पितच त्यांना समजली.

माझी आई ही आजोबांची पहिली मुलगी होती. तिच्यावर त्यांचें अधिक प्रेम होतें असं सांगण्यांत येतें. त्या प्रेमाच्या भरांत आईच्या अंगावर असलेले दागिने काढून घेण्यास त्यांनीं तीव्र विरोध केला. 'माझ्या पोटच्या गोळ्यापुढें मला सोन्याची किंमत नाहीं '....वगैरे ते बडबडत होते.

माझ्या आईच्या मृत्यूनंतर दोन,तीन मुलींचीं लग्नें आजोबांनीं केलीं, पण स्थळांची विशेष चवकशी न करतांच कन्यादानें उरकलीं असंहि सांगतात.

आम्हां सर्व मुलांना एका खोलींत कोंडून माझ्या आईला उचलली व पाहतां पाहतां मंडळी दृष्टीआड झाली. आम्ही हें सगळं दाराच्या मोठ्यां फटींतून बालस्वभावाप्रमाणें उत्सुकतेनं बघत होतों, पण आज तें औत्सुक्य आठवलं म्हणजे अंगावर शहारेच येतात व मन विषण्ण होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ............ दि: ............

# २

मी माझ्या वडिलांचेकडे—दादांकडे मामाबरोबर लगेचच पुण्यांस आलें. दादा मला पोटाशीं घेऊन खूप खूप रडले. दादा मुळूमुळू रडणाऱ्या व्यक्तींपैकीं खास नव्हते. पण ते रडले, हेंहि खरेंच. मामाहि पंधरा सोळा वर्षांचा लहानच मुलगा होता. तोहि घरांत पाऊल ठेवतांच दादांसारखाच रडूं लागला. मी मात्र मुळींच रडलें नाहीं. मी माझ्या घरीं आल्यामुळें माझा खेळ, व माझे दादा भेटल्यामुळें आनंदांतच होतें. पण तो माझा आनंद फार वेळ टिकला नाहीं. मामा व दादा यांच्या शोकविव्हल मुद्रेचा परिणाम माझ्यावर झाला असावा. मग मात्र कांहींतरी उणीव घरांत भासूं लागली. ती उणीव म्हणजे माझी आईच होय.

मामा दादांचा निरोप घेऊन कुठं तरी दुसरीकडे गेला असावा. त्या रात्रीं मी व दादा दोघेच एकमेकांच्या सोबतीनें झोपीं गेलों.

दादांना त्या वेळीं पुणें म्युनिसिपालिटींत नोकरी होती. दादांचें जेवण नेहमींचें खाणावळींतच होत असे. कधीं मी त्यांच्याबरोबर खाणावळींत जेवणास जाई, तर कधीं माझे चुलते कै. बाबुराव ओंकार यांचेकडे जेवीत असें. माझ्या चुलत्यांना आम्ही बाबा म्हणत असूं. एकाच वाड्यांत दादांची व बाबांचीं बिऱ्हाडें दोन होतीं. परंतु माझा लळा माझ्या चुलत्यांना असल्यामुळें माझी जेवणाची व्यवस्था माझ्याकडे कायम असूं दे असें बाबांनीं सांगितलें होतें.

आमच्या वाड्यांत काम करणाऱ्या सखू मोलकरणीची मुलगी माझ्याच बरोबरीची असल्यामुळें माझा पुष्कळसा वेळ तिच्याशीं खेळण्यांत जात असे.

एकदा काय झालं, दादा ऑफिसमध्यें गेल्यावर मी सखूचे मुलीबरोबर बराच वेळ खेळत होतें. तेथेंच तिच्या मुलीबरोबर मीं भाकरी खाल्ली. मग

मी बाबांकडे जेवणास मुळीं गेलेच नाहीं. दादा घरीं यावयाच्या वेळेस संध्याकाळीं पांचाच्या सुमारास आमच्या वाड्यापुढल्या दगडास धरून दादांची वाट पाहत उभी होतें. शनिवारवाड्याच्या समोर आमचा वाडा होता ( हल्लीं म्युनिसिपल दवाखाना आहे ). बाबा, माझे चुलते गाडींतून घरीं आले. आईवेगळी मुलगी वडलांची वाट पाहत रस्त्यांत दगडापाशीं उभी पाहून त्यांनीं मला चट्दिशीं खांद्यावर उचलून घेतली व ते आपल्या घरांत आले.

एकदम घाबऱ्या घाबऱ्या दादा बाबांकडे आले. मला बाबांजवळ बसलेली पाहून सुटकेचा दीर्घ श्वास सोडून म्हणाले, " बया, आज कां माझी वाट पाहात उभी नव्हतीस. मी घाबरलों कीं ! " म्हणून मला जवळ ओढून माझे विसकटलेले केस दादा स्वतःच्या हातानें सावरूं लागले.

सर्व हकीगत बाबांकडून दादांना समजली. माझं जेवण अद्याप झालं नाहीं यावर बाबा पत्नीस पुन्हां पुन्हां दोष देत होते. तोंच सखू मोलकरीण आली आणि म्हणाली, " जेवली कीं बया माझ्या मुलीसंगं. वहिनीबाई काय करणार मग ? " मग तर बाबा वहिनींना अधिकच रागावले. " मला बरें वाटत नव्हतें म्हणून मी माडीवर निजलें होतें. बया जेवली असेल, बाळबरोबर रोजच्यासारखी असं मला वाटलं. मीं स्वतः पाहिलं नाहीं एवढं माझं चुकलं आज. " वहिनींनीं चुकीची कबुली देऊन सांगितलं. दादा मला घेऊन आमच्या घरीं माडीवर आले. संध्याकाळीं मी दादांचे बरोबर फिरून यावयाची व दादांच्या जवळच झोपावयाची.

त्या दिवशीं मीं वणवण वाड्यांत हिंडून सखू मोलकरणीकडे दिवस घालविला. माझ्या जेवणाची आबाळ झाली, अशी ही आपली परिस्थिति योग्य नाहीं ' बयाचें पुढें कसं होईल, आपण नोकरीकरितां बाहेर गेल्यावर तिला वळण कोण लावणार ? तिची जेवणाखाण्याची व्यवस्था काय होणार ? ' या विचारानें दादांनीं आयुष्याला एकदम कलाटणी दिली.

दादांनीं पुन्हां लग्न करण्याचं ठरविलं. मला सांगून टाकलं. तसच घरां-दारांत बोलूं लागले. माझी आई गेली त्याच्या पंधराव्याच दिवशीं मुला सांगून

येत होत्या म्हणतात. एक मुलगी पसंत करून वैशाखांत म्हणजे माझ्या आईच्या मृत्यूनंतर दोनच महिन्यांनीं दादांचें दुसरें लग्न झालें. मला दुसरी आई घरांत आणली. बाबांनीं, माझ्या चुलत्यांनीं, या दुसऱ्या आईस "आईच म्हण हो, तर ती तुला जेवावयास वाढील" असें समजून सांगितलें. बालबुद्धीला तें लगेंच पटलें व या नव्या आईस 'आई' या गोड नांवानेंच मी हांका मारूं लागलें.

माझ्यांत व माझ्या आईंत बरोबर सातआठच वर्षें अंतर होतें. पण ती माझी एकदम आई झाली होती, त्यामुळें तिचें वय अवघें बारा तेरा वर्षांचें असलें तरी घरांत कोणी अन्य स्त्री नसल्यामुळें माझी जबाबदारी तिचेवर सर्वस्वीं पडली. त्याचप्रमाणें घराचीहि मालकीण–गृहिणी या नात्यानें सर्व जबाबदाऱ्या तिच्यावर सहजच आल्या होत्या. या नव्या आईला मी 'आई'च म्हणूं लागलें, त्यामुळें म्हणा अगर तिच्या सुस्वभावामुळें म्हणा दोघींचा सांधा अगदीं एकरूप झाला. लोकांना या आईची ही लेक नाहीं हें सत्यच वाटणार नाहीं.

लग्न झाल्यावर दादांचें पहिलें दोन तीन वर्षांचें वागणें म्हणजे मोठ्या मुत्सद्देगिरीचें होतें यांत शंका नाहीं. दुसरी पत्नी आली कीं, बाप नव्या पत्नीच्या ताब्यांत पुरा जात असे, व पहिल्या मुलांचे हालहाल होत. असे किती तरी प्रकार त्या वेळीं आढळत असत. आतां स्त्री अधिक सज्ञान झाली आहे. ती बिजवराशीं लग्न करतांनाच विचार करते. सावत्र मुलांना फारसा त्रास देत नाहीं. पण माझ्या लहानपणचा काळ म्हणजे 'सावत्र' आईविषयीं गाजलेला होता. मुख्य गोष्ट दादांनीं केली असेल तर नव्या पत्नीस कोणाच्या हाताखालीं वळण लागण्याकरितां ठेवली नाहीं. कोणाच्या घरांत आत्या, आज्या, चुलत्या असतात व त्यांचाच उपद्रव होतो, आणि 'सावत्र' ही भावना फोंफावण्यास त्या मदत करतात. त्या घरांतील वडीलधारी स्त्रिया पहिल्या मुलांची विशेष काळजी वाहतात, व मुलांचा कैवारहि पदोपदीं घेतात. अशा वागणुकीमुळें मुलांस त्या स्त्रियांबद्दल आपुलकी व प्रेम वाटतें आणि मग साहाजिकच सावत्र आईचा ओढा व लळा मुलाला लागत नाहीं. दादांनीं घराच्या पटांगणांत मला व आईला मोकळ्या मनानें सोडून दिलें. आमच्या दोघींत सावत्रपणाचें विषारोपण स्वभावतः नव्हतें व सर्व वाता-

वरण आमच्या दोघींचें ऐक्य नांदावें, टिकावें असें होतें. आईची माहेरची मंडळी प्रेमळ व विशाल भावनेची असल्यामुळें आईला मजविषयीं कोणीं दुजाभाव शिकविला नाहीं. त्यामुळें हेवादावा दोघींत कधींहि झाला नाहीं. मी पुष्कळ वेळां नव्या आजोळीं समवयस्क मुलांत रमून जावयाची, इतकेंच नाहीं, तर मला तेथें राहण्यांस आईशिवायसुद्धां आवडत असे.

दादांनीं नव्या आईस प्रथम जर कांहीं समजून सांगितलें असेल तर 'मी माझ्या बयासाठींच दुसरें लग्न केलें आहे. तिचा सांभाळ करणं सर्वस्वीं तुझं कर्तव्य आहे. तिचें तुझें जमलें कीं मी निर्धास्त झालों.' हें आईच्या मनावर वारंवार सांगून बिंबविलें असावें. दादांच्या लग्नाची त्यावेळीं अटच म्हणे अशी होती कीं, जिला सावत्र आई असेल—जिची पहिली आई वारली असेल—अशीच मुलगी मी बायको म्हणून पसंत करीन. ती अट दादांची पूर्ण झाली. आईला पण सावत्र आई होती. त्यामुळें आम्ही मायलेकी एकाच नावेंत प्रवास करीत होतों.

दादांचा स्वभाव रागीट व प्रेमळ, यामुळें आईचें व माझें मेतकूट जमण्यास वेळ लागला नाहीं. दादांनीं मोहवश होऊन एकीचें पारडें कधींहि वर खालीं जाऊं दिलें नाहीं. नाहींतर एकीनें दुसरीस त्रास देण्यास कमी केलें नसतें. दोघींनाहि—पत्नी आणि मुलगी यांना—संतुष्ट ठेवणें हें सहसा न साधणारें कौशल्य दादांना साधलें होतें. दादांचा संतापी स्वभाव हा देखील आमच्या दोघींच्या ऐक्यास चांगलाच उपयोगी पडला म्हणण्यास हरकत नाहीं. स्वयंपाक बिघडूं नव्हे म्हणून प्रत्येक पदार्थ आई मला खाण्यास देई. तिचें वय तरी तेराच वर्षांचें होतें. मला दादांची आवड-नावड माहीत असे. चांगला पदार्थ म्हटला कीं, आईला सुटलेसें वाटे. देवाचा नैवद्य मलाच प्रथम होई, मग दादांच्या जेवणाची आईला काळजी नसे.

घरांतील अगर संस्थेंतील चालक संतापी स्वभावाचा असला कीं, घरांतील अथवा संस्थेंतील मंडळींची आपोआप गट्टी होते व एकमेकांच्या सहकार्यानें कामें सहज सुलभ होतात. याच तत्त्वाप्रमाणें आईचें व माझें नातें अधिक दृढ होऊं लागलें.

एकदा किनई मी न्हायलें होतें. आईनें न्हाऊं घातलें, परकर पोलकें नेसवलें, पण केस मात्र चांगले पुसले नव्हते. माझे केस मोठ्यापैकीं होते. ते चांगले घासून घासून कोरडे करावे लागत. मला त्याची फार चीड होती. मानेला केस ओले ओले लागलेले मला अगदीं खपत नसत. या माझ्या संवयीमुळें मला न्हाणें नकोच वाटे. याकरतां मी पुष्कळ वेळां हट्ट करून न्हाणें लांबवीत असें. कित्येक स्त्रियांना न्हाणें हा सुखाचा व उपभोगाचा सोहळा वाटतो, पण मला अद्यापदेखील न्हाण्याचा कंटाळा आहे. माझे केस ओले ओले मानेवर वाटत होते. आईनेंहि चांगलें मन लावून पुसलेले नव्हते. मी रडत रडत दिवाणखान्यांत दादांच्याजवळ गेले. दादा कोणाशीं तरी बोलत होते. माझे मोकळे केस पाहतांच माझी काय भानगड झाली हें दादा जाणूं शकले. लगेच मला जवळ बोलावून खुंटीवरचें जरीचें उपरणें घेऊन माझे केस पुसूं लागले. दादाची मांडी मिळाली व आपुलकीची वागणूक मिळाली; मग मीं लवकर रडणें बंद केलें असावें. कोण गृहस्थ आले होते ते गेल्यावर दादा आईला खास रागावले असावेत. मी खेळून माडीवर आलें तेव्हां आईचें तोंड गोरेंमोरें व रडलेलें दिसत होतें. दुपारीं दादा बाहेर गेल्यावर आईनें रडत रडत म्हटलेलें मला आठवतें, " मला 'केस नीट पूस' कां नाहीं म्हणालीस, बया ? मला ते किती रागावले ! माझ्याशीं ते एक शब्द धड बोलले नाहींत सकाळपासून. "

मला एक प्रकारचा आनंद वाटला. पण आईच्या सात्त्विक मूर्तीमुळें व सरळ स्वभावामुळें हें झालें हें बरें झालें नाहीं, हेंहि मला पटलें. मी आईशीं अधिक मोकळी वागूं लागलें. दादांकडे तक्रारी या पुढें मीं केल्या नसाव्यात. दादांनीं माझ्यावर प्रेम त्या काळीं माझ्या बालवयांत फारच केलें व त्याचा सुपरिणामच माझ्यावर झाला. आई गेल्यावर बापाच्या तुटक वागणुकीमुळें पोरकेपणा मुलांना जाणवतो व त्यामुळें अनंत दोष मुलांत निर्माण होतात. तशी परिस्थिति माझी झाली नाहीं. त्याचबरोबर बापाच्या अतिरिक्त लाडामुळें लाडवलेलीं बाळें घरांत किती त्रासदायक होतात हें सर्वांना माहीतच आहे. पण दादांचें असें वागणें असे, कीं माझे लाड जरी त्यांनीं फार केले तरी त्याचा मद मला कधींहि येऊं दिला नाहीं. अशा रीतीनें मुलांना तयार

करणें फार अवघड आहे. त्याकरितां दादा नेहमीं जागरूक असत. नाहींतर माझें तारूं भडकलें असतें हें तितकेंच खरें आहे.

आईकडे दुपारीं कोणी स्त्रिया बसावयास आल्या व त्यांच्या गप्पा रंगांत आल्या कीं, मी नेमकी त्या वेळीं 'भूक लागली' म्हणावयाची. मला करमलें नाहीं कीं आई दुसऱ्या बायकांशीं गप्पा मारतांना मला बघवत नसावें. फार वाईट खोड होती माझी अशी. आईनें बऱ्याच वेळां माझा हा त्रास सहन करून दादांच्या कानांवर एक दिवस घातलें. मग काय विचारतां ? टेबलाच्या पुडांतील वादी बाहेर निघाली व मला चांगलाच चोप बसला. माझी खोडच त्यापासून गेली. आईचा मान, आईचा मोठेपणा, चार लोकांत त्या दिवसापासून मी जास्त सांभाळूं लागलें. एकदा असं घडलं—आई 'केर काढ' मला म्हणाली. मीं 'हो' म्हटलं. पण काढला नाहीं; धावत धावत खेळण्यास बागेंत गेलें. परत वर आल्यावर दादांनीं मला केरसुणी हातांत देऊन स्वतः उभे राहून त्या जागेचा केर काढून घेतला. इतकेंच नव्हे, तर त्या केर काढलेल्या जागेचा केर तीनदा काढून घेतला. आयुष्यभर केर काढण्याची वेळ आली कीं, हाच प्रसंग माझ्या डोळ्यापुढें येई.

दादा रोज बागेंत संध्याकाळीं काम करीत. झाडांना पाणी घालत. उन्हाळ्यांत गच्चीवर पाणी शिंपडीत. गुरांचा शेणगोठासुद्धां करीत. गुरांची धार स्वतः काढीत. अशा तऱ्हेनें रिकामा वेळ घरांतील काम करून उद्योगांत घालवीत. याचा परिणाम आम्ही घरांतील सर्व मुलं कामसू झालों म्हणण्यास हरकत नाहीं. कोणतेंहि काम कमी दर्जाचें असतें ही कल्पना आम्हां मुलांना कधीं शिवली नाहीं. त्या काळीं घरोघर सर्वच मुलं थोडींफार कामं करीत असत. पण दादांचा तर यावर कटाक्षच होता. मी बारातेरा वर्षांची झाल्यावर शनिवार संध्याकाळ व रविवार दुपार मला घरांतील स्वयंपाक करावा लागे. दादा स्वतः मजबरोबर भाकरी करावयास बसत, त्या वेळीं " इश्श बाई, पुरे, बयाला येईल हलकें हलकें सर्व. स्वतः काय हीं कामं करावयाचीं ? " असें आई म्हणावयाची. पण दादांनीं त्या तिच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून रोज कांहीं दिवस भाकरी चुलीपुढें बसून कराव्यात. लाडक्या बयास वळण लावण्याकरितां दादांना अशा तऱ्हेची शिकवण फार

ठिकाणीं द्यावी लागली होती; ती बयास तिच्या संसारांत खास उपयोगी पडली असेल.

दादा निडर छातीचे, प्रसंगाला न डगमगणारे असे होते. आग लागली, दादा विझविण्यास धावावयाचे. कुठें साप निघाला, काठी घेऊन धावून त्याला मारणारच. बरं! कुठं कुणी आजारी, कुणी मेलं तरी सुद्धां दादा सर्वांच्या पुढें धावत असत, हें पाहिल्यामुळें उपजत धैर्य माझ्यामध्यें निर्माण झालं असावं व तेंच मला माझ्या सर्व संसारांत उपयोगी पडलं असावं. हे नेहमीं म्हणत, " मला इतर पुरुषांसारखी तुरुंगांत जातांना कसलीच काळजी वाटत नाहीं. संकट एखादें वेळेसच असह्य असं येतं, पण संकटाची कल्पना करूनच साऱ्या दिवसभर भीत बसावयाचें हा तुझा त्रास जन्मांत मला झाला नाहीं." संकटाला धैर्यानें तोंड देण्याची कवाईत लहान वयांत निरनिराळ्या प्रसंगीं आम्हां मुलांस मिळाली होती. त्या काळीं प्रेत दारावरून मोठमोठ्यानें ओरडत ओरडत नेलें जाई. अशा वेळीं त्या वेळचे पालक मुलांना प्रेत कधींहि न दाखवतां मुलांना दडपून घरांत बसवीत. अशा तऱ्हेची विचारसरणी दादांची नसल्यामुळें " जा पालखी पाहा जा, पळ. " म्हणून प्रेत दारावरून जात असल्यास कटाक्षानें मला दाखवीत. इतकेंच नाहीं, तर सर्वांना असेंच चार माणसांच्या खांद्यावर 'देवाघरीं' जावयाचें आहे असें सांगून प्रेताविषयींचें भय माझ्या डोक्यांत कधींच त्यांनीं येऊं दिलें नाहीं. लग्नाची मिरवणूक जशी लहान मुलं जेवतांना उठूनहि बघतात, त्याप्रमाणें " राम बोलो भाई राम " आम्हीं मुलं आनंदानं व उत्सुकतेनं पाहात असूं.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ३२०४६ वि: ५२/७
क्रमांक १०३० नों: दि: ५४५५

## ३

दादा ठाण्याला म्युनिसिपालिटींत नोकरीस होते त्या वेळचा हा प्रसंग आहे. तेथें राहण्यासारखी बरी जागा मिळतांच आई, शंकरकाका आणि मी ठाण्यास आलों. शंकरकाका हे आईचे चुलते होते. त्यांचें वय पन्नास-पंचावन्नच्या घरांत असेल. एकंदरींत त्या वेळीं ते वृद्ध गृहस्थ होते, हें ध्यानीं घ्यावयाचें. आईचें वय लहान आणि मीहि लहान, तेव्हां परक्या गांवांत बिऱ्हाड करतांना घरचें पोक्त माणूस कोणी तरी असावें या धोरणानें दादांनीं शंकरकाकांना आमच्याबरोबर येण्याचा आग्रह केला असावा. आईला तर शंकरकाका माहेरचें माणूस म्हणून बरंच वाटत होतें. मींहि आग्रह धरलेला मला आठवतें. शंकरकाकाहि त्या वेळीं रिकामेच होते. तेव्हां आमचें आग्रहाचें बोलावणें त्यांनीं कबूल केलें असावें. हा प्रसंग मला चांगला आठवतो. देवाचें एक विशिष्ट स्थान माणसाच्या आयुष्यांत असतें हें स्वानुभवावरून पटलें. तो प्रसंग असा—तो दिवस रविवार असावा. दादा त्यांच्या खोलींत दुपारचे झोपले होते. आई मधल्या खोलींत पडलेली होती. शंकरकाका बाहेरच्या व्हरांड्यांत कसली तरी पोथी वाचत होते. मी चाळींतील मुलींशीं बराच वेळ खेळत होतें, पण एकदम आठवण झाली. आईनें "भांडीं विसळ व जागेवर ठेव आणि मग खेळण्यास जा" सांगितलें होतें. मी आधींच बाहेर खेळण्यास आलें होतें. घराचें स्मरण होतांच भांडीं आठवलीं. मी लगबग स्वयंपाकघरांत गेलें. मोलकरणीचीं भांडीं नीट विसळून घेतलीं व फळीवर लावीत होतें. वाट्यांच्या फळीवर एक शेंगाचा भिजलेला टप्पोरा दाणा पडला होता. दुपारीं आळवाची भाजी केलेली होती. त्या भिजलेल्या दाण्यांपैकीं एक दाणा भिजलेला फळीवर पडलेला असावा. मीं तो सहज तोंडांत टाकला व खात खात भांडीं जागेवर लावत

होतें. भांड्यांचा आवाज सारखा होत होता वाटतें. आई " हळू हळू ". मला बजावीत होती, तोंच दादा जागे झाले व " बया " म्हणून त्यांनीं जोरांत हांक मारली. मी हातांतली पळी तशीच टाकून धावत गेलें. मला पाहतांच दादा म्हणाले, " काय करते आहेस स्वयंपाकघरांत खुडबुड अन् काय खाती आहेस ! "

" मी भांडीं जागेवर ठेवतें आहें " सांगितलं आणि पाठ फिरवली. दादा दरडावून म्हणाले, " मी विचारतों आहें खात काय आहेस ? " मीं " कांहीं नाहीं " म्हटलें व सुटून घरांत जाण्याचा प्रयत्न करीत होतें, पण तें जमलें नाहीं. ' बया ' अधिक जोराचा आवाज कानीं आला. तोपर्यंत खाल्लेला दाणा माझ्या घशाखालीं जाऊन पोटांत जाण्याच्या तयारींत असेल म्हणून मीं " काय ? " जोरांत विचारलें. " तूं काय खाल्लंस ? " जोरांतच दादांनीं विचारलें. " कांहीं नाहीं " हेंच उत्तर मीं ठासून दिलें. तोंच आई हलकेंच म्हणाली, " तिथं काय खाण्यास असणार ? कांहीं नाहीं म्हणते आहे ना ती. " दादांनीं मला जवळ बोलाविली व पुन्हा तोच प्रश्न माझा हात पकडून मला विचारूं लागले. मीं मानेनेंच " कांहीं नाहीं " असें उत्तर पुन्हां दिलें. एक प्रकारें तें उत्तर खोटें होतें, व एक प्रकारें तें खरेंहि होतें. बरं, दाणा घशाखालीं आतांपर्यंत गेला होताच म्हणून नाहीं म्हणण्याचें धैर्य मला झालें असावें. पण दादा—तसे गय करणारांपैकीं नव्हते. त्यांनीं मला जवळ बसवून घेऊन डाव्या हातानें जीभ धरली व उजव्या हाताच्या अंगठ्याच्या नखानें जीभेवरचें खरवडलें व ते माझ्या नाकापुढें धरून पुन्हा पुन्हा वास देऊं लागले. भिजलेल्या दाण्याचा वास दादांना आलेला असावा. मला खरं पाहिलं तर वास घेण्याचं कारण नव्हतं. दाणा भिजलेला होता हें मला पक्केंच माहीत होतें. पण एकदा ' नाहीं ' म्हटलें ' तें ' हो कसें म्हणावें कळत नव्हतें. म्हणून " खाल्लें नाहीं " हें असत्य पुन्हा पुन्हा सांगून सत्य भासवीत होतें. आमचे दादा भयंकर संतापी. त्यांना माझा हा अपराध फार मोठा वाटला, व त्या दिवशीं वादीनें त्यांनीं मला भयंकर मारलें. या मारण्यानें त्याचें काम झालें होतें. मीं पडलेला दाणा तोंडांत टाकल्याचें कबूल केलं होतं, पण मग "खोटं कां बोललीस ? " म्हणून पुन्हां पुन्हां विचारून मला मारीत होते. आईच्या मध्यस्थीनें माझी सुटका झाली. " हें काय मारणं आसुरी

वेड्यासारखं ! " आई दादांना चहा देतांना धीर करून म्हणाली व दादांचा चहा ठेवून चटपट घरांत गेली. त्याचप्रमाणें शंकरकाकांनीं मला बाहेर बोलावून घेतलं. पाठीवरून हात फिरवला. माझे डोळे व तसेच त्यांनींहि आपले डोळे पुसले. कदाचित् दादांना असें असुरी मारणें चूक वाटलें असेल, पण पाठीमागून वाटून त्याचा काय उपयोग ? आमच्या घरचें वातावरण त्या दिवशीं अगदीं सुन्न असेंच होतें. चाळींतील माझ्या मैत्रिणी मला भेटून गेल्या. पण माझं मन त्यांत रमलं नाहीं. मीं थोडा भात आईच्या आग्रहानें खाल्ला व व्हरांड्यांत मच्छरदाणींत रात्रीं येऊन निजलें.

दादांनीं मला केलेली आजची शिक्षा फार झाली होती व माझ्या मनाला ती लागलेली होती. या अतिरिक्त धाकामुळें असत्य बोलणें माझ्या डोक्यांतून अजिबात पळालें असावें. आमच्या दादांची शिस्त वाखाणण्यासारखी होती यांत शंका नाहीं. पण इतक्या कडक धाकाच्या पालकाच्या वागणुकीमुळें बालकाच्या मनावर विपरीत परिणाम होण्याचा संभव असतो. अशा भयंकर धाकाच्या भीतीमुळें मुलं पुष्कळ वेळां खोटं बोलून, नाहीं ते गुन्हे केल्याची कबुली देतात. कांहींहि असलें तरी इतक्या अशा धाकानें घराचें मंगल वातावरण बिघडून जातें व त्या धाकामुळें नेहमींच सुपरिणाम होतात असें नाहीं. त्या दिवशींची मुख्य घटना लक्षांत आहे ती अशी—मला आज जगांत त्राता नाहीं हें जाणवूं लागलें. माझे दादा हेच जर असें वागूं लागले, तर या उभ्या जगांत मला कोण ? ही जाणीव माझ्या डोक्यांत त्या रात्रीं थैमान घालीत होती. त्यामुळें झोप येईना. शंकरकाकांनीं माझे पाय चेपले, हळूंवार हातानें पाठीला खोबरेल तेल लावलें व म्हटले, 'राग आलेला माणूस बेभान होऊन मांगाच्या ताब्यांत गेलेला असतो. तो त्या वेळीं निष्ठुर बनतो. आज तुला मारणारा तुझा बाप त्या वेळीं बाप नव्हता. नीज बाळ " असें म्हणून शंकरकाका लहान मुलासारखं मला मायेनें थोपटूं लागले, पण झोप म्हणून येईना. या कुशीची ती कुशी बदलत होतें, पण जीवाला स्वास्थ्य नव्हतें. शेवटीं शंकरकाका भजन करूं लागले. " सीताराम सीताराम भज रे मना । अशी काय नरतनु येईल पुन्हा ।" अशा तऱ्हेनें भजन म्हणूं लागले. असं भजन करतां करतां जगाची आई सर्वांची साऊली 'सीताराम' तिला हात जोडून मी शंकरकाकांच्या कुशींत गाढ झोपीं गेलें. " जगांत ज्या वेळीं

आपलं कोणी नाहीं, आपण निराधार आहों तेव्हां तो देवच आपला आधार असतो " हें मनावर त्या वेळीं बिंबलें. निजतांना नमस्कार करण्याची संवय या घटनेंतूनच मला लागली असावी.

दुसरा दिवस उजाडतांच दादा व मी सर्व कालचें विसरलों व सहज खेळीमेळीनें अगदीं रोजच्यासारखें एकमेकांशीं वागूं लागलों. दोघांच्याहि मनांत कांहीं खटकलें नाहीं. प्रेमळ जीवाचा राग भयंकर असतो, त्यानें अंग भाजतें, पण जखम लवकर भरून येऊन कातडीहि लवकर त्यावर धरते, हेंहि तितकेंच खरें.

आमचे दादा कोणत्याहि प्रसंगास न डगमगणारे गृहस्थ होते. संकट केवढेंहि डोळ्यांपुढें दिसत असलें तरी ठरलेल्या गोष्टी या वेळच्या वेळीं झाल्याच पाहिजेत, अशी त्यांची शिस्त असे. त्याकरितां तीं संकटें एका क्षणांत बाजूस टाकून देण्याची हातोटी त्यांना साधलेली होती.

माझ्या लग्नाच्या वेळची एक गोष्ट सहजच ध्यानीं आली. दादांच्या राज्यांत ठरविलेली गोष्ट ठरविलेल्या वेळीं हातून झालीच पाहिजे. माणसानें ती केलीच पाहिजे. हा त्यांचा दंडक होता. नियमाला अपवाद हा शब्द त्यांच्या कोषांत नव्हताच. ठरलेल्या वेळीं पंक्ति भेटीगाठी, पत्रें पाठविणें त्यांचे स्वतःचे सर्व कारभार सुरू असत. त्याचप्रमाणें सर्वांनीं वागावें, असें त्यांचें म्हणणें असे. अशा नियमित वागण्याच्या संवयीमध्यें सर्वांचीच सोय होते, यांत शंका नाहीं. पण—सर्वांत येवढा कांटेकोरपणा कसा मिळावा ?

माझ्या लग्नाच्या आदल्या दिवसाची गोष्ट. मी व नुकतेंच लग्न झालेली माझी चुलत बहीण व एक-दोन परिचित स्त्रिया मागच्या माडींत झोपलों होतों. मला व बहिणीला—ठकूताईला—झोप नव्हतीच. उद्यांपासून ती व मी एकमेकींचा सहवास दुरावणार या विचारानें अस्वस्थच होतों. पहाटें पहाटें झोप लागली असावी. तोंच कोणी तरी हांका मारतांच आपणांस उठण्यास उशीर झाला या जाणिवेनें आम्ही दोघी घाबऱ्या घाबऱ्या खालीं गेलों. तों सकाळचा सहाचा सुमार असेल. लग्नघरची गडबड, मुलांचें रडणें, बायकांची बोलणीं, पुरुषांची धावपळ सुरू होती. वाजंत्र्यांचीं वाजंत्रीं मंगल वाद्यें वाजवून

सर्वांना उत्साही करीत होतीं. आमच्या घरची उष्टी हळद माझे सासरीं बरोबर सकाळीं सातला जावयाची ठरली होती. पण इतक्यांत ठकूताई मला घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, " अग ताई, माझ्या हातांतील एक गोठ दिसत नाहीं. " मीं व तिनें पुन्हा पुन्हां तिचे हात तपासले. पाटल्या, सोन्याच्या बांगड्या व दोन्ही हातांत मिळून फक्त तीनच गोठ. चवथा गोठ कुठें गेला कळेना. मीं आईला हलकेंच जाऊन हांक मारली. आई व तिच्याजवळ वावरणाऱ्या इतर स्त्रिया ठकूताईच्या भोंवतीं गोळा झाल्या. नुकतेंच लग्न झालेलें असल्यामुळें ठकुताई सासरच्या भीतीनें रडूं लागली. आई व मीहि घाबरलों. ही गडबड दादांना कळतांच दादा आंत आले व ठकूताईची समजूत करूं लागले. ते म्हणाले, " ठकू, घाबरूं नको. एकाच्या जागीं मी दोन गोठ देईन, पण आतां सर्वजणी शांत राहा व उष्टी हळद ठरल्याप्रमाणें आतांच्या आतां व्याह्यांच्याकडे जाऊं द्या ! " आईला दादांचा स्वभाव माहिती म्हणून उष्टी हळदीची तयारी आई करूं लागली, पण इतर स्त्रिया स्त्रीस्वभावाप्रमाणें तेंच तेंच बोलत होत्या. " खोलींत असा कोण बाई चोर आला असेल " हीच चर्चा रंगांत आली होती. तीच चर्चा सारखी ऐकून ठकूताईला रडूं येत होतें. घराबाहेर या बायका उष्ट्या हळदीसाठीं लवकर जातील असा रंग दिसेना. या गोठाच्या चर्चेमध्यें बराचसा वेळ गेला होता. उष्ट्या हळदीची वेळ चुकेल या विचारानें दादा एकदम आंत आले व आईला जोरांत म्हणाले, " तूं आधीं घराच्या बाहेर पड. गप्पा मारूं नको. नुकसान कितीहि झालें असलें तरी मी तें भरून देण्यांस समर्थ आहें. वाजंत्री केव्हांची वाजत आहेत. कोणी तुझ्याबरोबर येत नसेल तर तूं एकटी जा, पण मीं दिलेली साताची वेळ चुकतां कामा नये ! " हें दादांचें फर्मान ऐकतांच आई व तीन-चार स्त्रिया उष्टी हळद घेऊन घराच्या बाहेर एकदाच्या पडल्या व दादांच्या इच्छेप्रमाणें साताची वेळ साधली.

दादांच्या घरांत वावरणारी लहान थोर मंडळी बहुतेक ठरलेली वेळ अद्यापहि चुकूं देत नाहींत.

दादांच्या स्वभावाचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे जवळच्या माणसाच्या हातून मोठी चूक झाली अगर मोठें नुकसान झालें तरी ते कधींच कोणावरहि

रागावत नसत. अशा वेळीं आमची भीति व्यर्थ ठरलेली आहे. माझ्या हातून एकदा औषधाची बाटली कपाटांतून काढतां काढतां तें लहानसें कांचेचें कपाटच एकदम माझ्या अंगावर आलें. औषधाच्या बाटल्या खालीं धडाधड पडल्या व कांहीं फुटल्याहि. कपाटाचीं दोन्हीं कांचेचीं दारें फुटलीं. आवाजहि फार मोठा झाला. मी तर अगदीं घाबरून गेलें होतें. माझें वयहि त्या वेळीं लहानच असल्यामुळें मी रडूं लागलें. काय झालें तेंच मला समजेना. आतां दादा रागावतील व मारतीलहि याची भीति वाटूं लागली. पण दादा अगदीं शांतपणें मला म्हणाले, “ बाळ, तुला नाहीं ना लागलं ? पडूं दे पडलं तर, फुटूं दे कपाट. तूं दूर हो बघूं. ” येवढ्या नुकसानीनंतर दादांनीं न रागावणें ही घटना त्या वेळीं तरी मला अनपेक्षित वाटली.

ओघानींच आठवलं म्हणून आणखी एक उदाहरण त्यांच्या स्वभावाचें देतें. मी हुजूरपागेंत इंग्रजी दुसरी-तिसरींत असेन. माझं वय बारा किंवा तेराच असेल. बोर्डिंगमध्यें राहणारी एक मुलगी माझी दाट मैत्रीण होती. बोर्डिंगमधून जाणारीं पत्रें मेट्रननें वाचूनच रवाना होत असत व त्याच-प्रमाणें आलेलीं पत्रेंहि मुलींना मेट्रननें वाचूनच मिळत. माझ्या मैत्रिणीनें एक पत्र बंद करून पोस्टांत मला टाकण्यास दिलें. मींहि बोर्डिंगच्या शिस्तीचा विचार न करतां घरीं जातांना पोस्टाच्या पेटींत तें पत्र टाकलें. माझी मैत्रीणहि त्या वेळीं माझ्याच वयाची होती. त्या पत्राचें उत्तर मैत्रिणीच्या नांवावर ७।८ दिवसांनीं आलें. त्यांत पत्र पोचल्याचा उल्लेख होता. त्यामुळें आमच्या त्या वेळच्या लेडी सुपरिंटेंडेंट मिस् बर्न, शिस्त मोडली गेल्यामुळें फार संतापल्या. त्यांनीं माझ्या मैत्रिणीस वर बोलावून ( त्यांचे घरीं ) त्या खूप रागावल्या. “ हें पत्र पोस्टांत कोणीं टाकलें ? ” जोरांत विचारतां माझें नांव मैत्रिणीनें चट्‌दिशीं सांगून टाकलें. त्या दिवशीं संध्याकाळीं ही सर्व हकीगत मैत्रिणीनें माझ्या कानांवर घातली. मींहि मग फार घाबरलें. उद्यां आपल्याला मिस् बर्न वर बोलावणार व पुढें काय होणार याची काळजी सारखी वाटत होती.

मीं घरीं येतांच दादांना घडलेला माझा गुन्हा सांगितला. मैत्रिणीच्या प्रेमा-मुळेंच हें पत्र टाकण्यास मी धजलें हें जरी खरें, तरी दादांच्या स्वभावाचा

तापट माणूस स्वस्थ बसता ना. पण दादा मला एक शब्ददेखील बोलले नाहींत. उलट त्यांनीं मिस् बर्नना एक पत्र लिहून दिलें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें : "दोन्ही मुली अजाण आहेत. अजाणतेपणामुळें दोघींनीं हा गुन्हा केला आहे. त्याचा पश्चात्ताप त्यांना आतां होत आहे. मींहि त्यांना चांगली शिक्षा केली आहे, तेव्हां आपण हा त्यांचा गुन्हा प्रेमळपणानें पोटांत घालावा ही विनंती."

दुसरे दिवशीं अंदाज केल्याप्रमाणें मिस् बर्ननें मला वर ऑफिसांत बोलावलेंच. पण दादांचें पत्र वाचतांच प्रेमळपणानें हसतमुखानें "खालीं जा" म्हणाल्या. त्याहि रात्रीं दादा मला एकहि शब्द रागाचा असा बोलले नाहींत.

दादाच्या बाबतींत आमचा सर्वांचा अनुभव अशाच प्रकारचा होता, पण एखाद्या लहान अपराधाकरितांहि आम्हीं मोठाल्या शिक्षा भोगल्या आहेत. दादांचें म्हणणें असें असें : "लहान चुका या तुमच्या निष्काळजीपणांतून होतात. त्या मला बिलकूल आवडत नाहींत. मी त्यांची गय करणार नाहीं. मोठ्या चुकीच्या मागें तुम्ही एकटे जबाबदार नसतां, दुसऱ्या घटनेचा त्यांत संबंध असतो. म्हणून अशा वेळीं मी तुमच्यावर केव्हांहि रागावत नाहीं."



## ४

मागेंच मीं लिहिलें आहे कीं, दुसऱ्या आईच्या माहेरीं (आजोळीं) मी आईविनाहि आनंदानें राहात असें. त्यांच्या घरीं माझ्या बरोबरीचीं मुलें मला खेळण्यास मिळत, त्यामुळें माझें मन तेथें अधिक रमे. हें माझें आजोळ शुक्रवार

पेठेंत होतें. त्या आळींतील आम्ही बरोबरीच्या मुली सचिवांचे वाड्यांत अगर कुठेंतरी एकत्र खेळत असूं. सचिवांचे पिछाडीस एक पार गणपतीच्या देवळांसह अद्यापहि आहे. त्या देवळाच्या नजीकच्या घरांत—लहानशा घरांत—एक कुटुंब राहात असे. या कुटुंबांतील एक मुलगी माझ्या बरोबरीची असल्यामुळें खेळण्याची जागा तिची व आमची एकच असे. या घराण्याचा व माझे आजोबा बाळाभाऊ यांच्या घराण्याचा फार लोभ होता. या मुलीच्या आत्याबाई बाळंतपणाचें काम फार कुशलतेनें करीत असत. इतकेंच नव्हे, तर आडवेंतिडवें मूल आलें असलें तरीहि सुखरूप प्रसूति करीत. पण हें सर्व काम परोपकाराच्या भावनेनेंच त्या करावयाच्या. कधींहि बाळंतिणीच्या सुटके-बद्दल एकहि पैसा घेतला नाहीं त्यांनीं. इतकेंच नव्हे तर बाळंतपणानंतर स्नान करायलासुद्धां त्या स्वतःच्या घरीं येत. हातावर साखरेची पुडी मात्र लोकांच्या आग्रहास्तव त्या आणीत असत. या बाईंना मूलबाळ स्वतःचें असें नव्हतेंच. वेळ घालविण्याचें साधन म्हणून बाळंतिणी सोडविण्याचें काम त्या करूं लागल्या व परमेश्वर त्यांना यशहि देऊं लागला. भावाचा संसार जमेल तेवढा बघावा व सुईणीचें काम तत्परतेनें करावें हाच त्यांचा नित्यक्रम झाला होता. कितीक अडलेल्या बायांचा दुवा या आत्याबाईंनीं घेतलेला होता. मी आजोळीं गेलें म्हणजे कसें ना कसें या आत्याबाईंचें नांव कानावर पडेच. माझ्या आयुष्यांत न कळत पण अचूक असें स्थान या आत्याबाईंनीं मिळविलें यांत शंका नाहीं. माझ्या आंतल्या मनावर न कळत एक चाकोरी त्या काळीं उठली, त्यामुळें योग्य वेळीं याच्यांतूनच मला मार्गदर्शन झालें.

अक्का—आणखी एका स्त्रीचा उल्लेख मला करावयास हवा. ती म्हणजे माझी मावशी ( दुसऱ्या आईची बहीण ). आम्ही तिला अक्का म्हणतों. ती त्या वेळीं सतरा अठरा वर्षांची असेल. तीहि बालविधवाच होती. अक्काला वाटे, पारावरच्या आत्याबाईसारखें आपण कांहींतरी परोपकारी जीवन कंठावें व आपलें आयुष्य सार्थकीं लावावें. या आत्याबाईंनीं केलेली सुटका अक्कांनीं ऐकिली कीं, अक्का घरांत वारंवार चर्चा करी. या निमित्तानें ती आपल्या वडिलांपाशीं नर्सिंग कोर्स शिकण्याची इच्छा प्रदर्शित करी, पण तिची इच्छा त्या वेळीं पूर्ण झाली नाहीं. पुढें कांहीं दिवसांनीं अक्का पण नर्सिंगचा कोर्स पुरा करून नर्स झाली. या आत्याबाईंच्या जीवनामधून अक्काला व न कळत

मला नर्सिंग कोर्सची आवड निर्माण झाली. मींहि माझ्या वयाच्या विसाव्या वर्षीं या आवडीप्रमाणें मिडवाइफरीचा कोर्स ससून हॉस्पिटलमध्यें पुरा केला. या आत्याबाई बाळंतिणीची सुटका करून पैसे मुळींच घेत नाहींत याचा माझ्या बालबुद्धीवर विलक्षण परिणाम झाला, हेंहि तितकेंच खरें. आम्ही मुली खेळत असतांना या आत्याबाईची कहाणी विस्तृत रूपानें जवळच्या स्त्रिया एकमेकींत बोलत असत. ती हकीगत आम्ही लक्षपूर्वक ऐकत असूं. आजूबाजूच्या स्त्रिया ' काय ऐकता ग ! जा खेळा. चहाटळ मुली........ ' म्हणत असत त्या वेळीं. आत्याबाईची निष्काम सेवा मी माझ्या हृदयांत सांठवीत असावी. खरोखर त्या बाई मला धड आठवत पण नाहींत, कारण त्यांना पाहण्याचा योग मला फार थोडाच आला; पण माझ्या मनाचा ठाव मात्र त्यांनीं घेतला.

मीं माझे आयुष्यांत येवल्यास बाळंतपणाचा व्यवसाय पैसे घेऊनच केला, पण पैसे घेतांना आत्याबाईची निष्काम सेवा माझ्या डोक्यांत डोकावे. मी गरिबांना पिळून–भांडून–आडवून पैसे घेऊन कोणाचेहि श्राप घेतले नाहींत. कबिरानें एके जागीं म्हटलें आहे, " सहज मिळतें तें दूध, मागून मिळतें तें पाणी व भांडून मिळतें तें रक्त." मला लोकांनीं सहज दिलें––मीं घेतलें तें दूधच माझ्या लेकरांस पौष्टिक ठरलें असें म्हणावयास हरकत नाहीं.

एका पणतीवर अनेक दिवे लागतात हें कांहीं खोटें नाहीं. मीं मिडवॉइफरीचें शिक्षण घेतलें त्याचा यथामति उपयोग केला तें पाहून माझ्या जवळपासच्या दहा बारा भगिनींनीं तरी हा सुईणीचा व्यवसाय माझ्या ओळखींत घेतला. हें शिक्षण घेण्यांत जरी स्वार्थ असला तरी त्या व्यवसायांत परमार्थाचा पाया होता, ही गोष्ट निश्चित. आतां समाजाची आर्थिक जरूर वाढली, त्यामुळें कदाचित् परोपकार दृष्टीचा पाया आतांच्या नर्सेसचा डळमळीत असेल. स्वार्थासाठीं–पोट भरण्यासाठीं कित्येक स्त्रिया हा नर्सचा धंदा करीत असतील तरी देखील " विकितसे उदरार्थ फुलें जरी। मधुसुगंध न चुके कल्पांतरीं ". त्याप्रमाणें या उद्योगांत संक्षेप कितीहि दिला तरी बाकी शिल्लक कांहींतरी राहतेंच. तें मनुष्याचें समाधान करण्यास समर्थ होतें असा माझा स्वतःचा अनुभव आहे.

# ५

वर वर्णन केलेल्या 'अक्का' या व्यक्तीचा परिणाम माझ्या जीवनावर त्या लहान वयांतहि झाला यांत शंका नाहीं. त्या काळीं विधवेचें दुःख समाजांत जें होतें त्याची कल्पनासुद्धां आज आपणास असह्य वाटते. वैधव्याचें दुःख चारी बाजूंनीं उफळून येऊन स्त्रीस नको जिणें करीत असे. असून अडगळ नसून खोळंबा हें तिचें वर्णन होय. घरादारांत त्या विधवेचा उन्हाळाच व्हावयाचा. परंतु आमच्या या अक्कांच्या बाबतींत तसें नव्हतें. तिला घरांतील वडील माणसांचें प्रेम व सहानुभूति मिळत असे. तिला चांगल्या तऱ्हेनें घरांत वागवलें जाई. हें जरी खरें, तरी ज्याप्रमाणें भारी वस्त्र असलें तरी त्याचा तोटकेपणा भासतोच, त्याप्रमाणें तिला जीवन अपूर्ण वाटत असावें व पाहणारासहि ती असंतुष्ट अशीच वाटे. अशा विचित्र मनाच्या स्थितींत मनुष्य कोणाचें ऐकत नाहीं, आपला हट्टीपणा चालवतो. जगाच्या दृष्टीनें तें वागणें चुकीचें होईल, पण माणसांत त्याच काळांत नेट निर्माण होतो. तपश्चर्या कांहीं तरी ज्याच्या त्याच्या सामर्थ्याप्रमाणें या एककल्ली स्वभावांतून घडते. आमची अक्का मनाला वाटेल तितके उपवास त्या काळांत करावयाची. कार्तिकस्नानें, माघस्नानें इत्यादि गोष्टी पहाटे चारपासून सुरू असत. घरांतील कामधंदा संपवून सारख्या पोथ्या वाचण्याचा उपक्रम तिचा सुरू असे. या वाचनाचा संस्कार तिच्या मनावर स्पष्ट दिसे. कोणत्याहि विषयावर घरांत चर्चा सुरू झाल्यास तिची व्यापक विचारसरणी स्पष्टपणें उमटून पडे. माझ्या लहान वयांतहि तिची विचारसरणी मला आवडे हें मला आजहि आठवतें. तिचें तें सर्व बोलणें मला कळे किंवा नाहीं हें सांगतां येत नाहीं, पण तिचें म्हणणें, तिचें वागणें बरोबरच असणार असा माझाहि समज झाला होता. ती कविता करते, तशा आपणहि कविता कराव्यात अशी आवड लहान वयांत

माझ्यामध्यें निर्माण झाली. कधीं कधीं अद्यापहि काव्य वाचणें, अगर रचना करणें हा माझा स्वतःचा छंद होऊन बसला आहे. ज्या वेळीं माणसास सर्व प्रकारें निराशा प्राप्त होते तेव्हां सर्व गोष्टींचा साहजिकच वीट येतो. तरी पण 'आत्मप्रकाश' म्हणून कांहीं तरी एक चीज चित्तांत भासते, तेथेंच काव्यनिर्मिति होते. जगांतील गोष्टींमुळें मन रमेनासें झालें म्हणजे एखादें काव्य वाचणें अगर रचणें हा निरागस आनंदचा विषय होऊं शकतो, हा माझा स्वानुभव आहे.

पारावरच्या आत्याबाईनीं माझ्या बाल्यांतील मनांत ध्येयवाद निर्माण केला म्हणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें मन विकसित होण्यास आक्कांचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष उपयोग मला खास झाला आहे. माझ्या जीवनाची घडण अशा तऱ्हेनें तयार होत होती. त्यांत सकसपणा आणण्याचें काम मातेनें केलें म्हणण्यास हरकत नाहीं.

"माता नित्यक्रमांत हो शिकविते साऱ्या गुरूंचेवरी"

यांत शंका नाहीं.

## ६

माता पाटी-पेन्सिल घेऊन मुलाला धडे देत नाहीं, पण न पुसणारे धडे मातेच्या जीवनांतून बालमन वेंचून घेतें हें अगदीं खरें आहे. बालमन निर्विकल्प वळण घेणारी ओली माती असतें. त्यामुळें आईची जबाबदारी बाल-संगोपनांत फार मोठी ठरते. ती जबाबदारी माझ्या आईनें फार चांगल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

तऱ्हेनें पार पाडली यांत शंका नाहीं. माझ्या जन्मदात्रीची उणीव भरून काढून बोलून चालून ठिगळ लावून वस्त्र एकसंधी बनवणें हें सोपें काम नव्हतें. तें कुशल कारागिराचें काम होतें, तें माझ्या आईस साधलें. खरं पाहिलं तर आईच्या व माझ्या वयांत अंतर सातच वर्षांचें. पण ती माझी आई झाल्यामुळें निरलस, समयसूचक, विचारी व कर्तव्यदक्ष असें तिला व्हावें लागलें. तिच्या या गुणांमुळें माझा व तिचा सांधा अकृत्रिम ठरला. त्याचप्रमाणें दादांच्यासारख्या कुशल कारागिराची तत्परताहि हा सांधा एकजीव होण्यास कारणीभूत झाली, हें मला विसरतां कामा नये. आईचें वय माझ्या लहानपणीं आतांच्या काळच्या अल्लड मुलींचेंच होतें, पण तिनें आपलें बाल्य टाकून मंगलाक्षता पडतांच जें मोठेंपण स्वीकारलें त्याच थाटांत अद्याप ती मजविषयीं कर्तव्य करीत आहे.

दादा नोकरीच्या निमित्तानें बाहेरगांवीं गेले अगर कांहीं निमित्तानें दुसऱ्या गांवीं गेले म्हणजे आईला व मला दादांचें पत्र यावयाचें. माझें पत्र मी वाची, आई मात्र अगदीं अंधारांत कुठंतरी लांब जाऊन एकान्तांत तिला आलेलं पत्र वाची. मला तें पसंत नसे. मला वाटे हीं कोण मोठी ! माझ्या दादांचें पत्र बाजूला नेऊन वाचते आणि मला दाखवीत नाहीं. मी हट्ट करून हक्कानें तें पत्र वाचण्यास आईजवळ मागत असें. आईनें "तुला एकटीला मी तें पत्र दाखवीन, पण चार माणसांत पत्र वाचण्यास मागूं नको," असें आर्जवून सांगितलें. कबूल केल्याप्रमाणें आईनें मला एक दोन पत्रें वाचण्यास दिलीं होतीं. मीं तीं पत्रें हक्कानें घेऊन वाचलीं असतील. त्या पक्वान्नाची गोडी मला त्या वयांत काय कळणार ? अशीं पत्रें वाचण्याची माझी उत्सुकता हळूहळू नष्ट झाली, पण माझ्या आईच्या व माझ्या वयांतील अंतर यामुळेंच नष्ट झालें म्हणण्यास हरकत नाहीं.

योग्य वेळीं योग्य वळण लावण्यास आई कधीं मागें सरली नाहीं. घरांतील कांहीं कामें माझीं ठराविक असत. आई तीं माझेकडून सक्तीनें करून घेई. दादांना जेवणांत पोळी लागते; व कांहीं तरी पोळीशीं गोड आवडतें. मलाहि तसेंच आवडे. दादा पाठीमागून सायभात खात; मीहि तसाच सायभात खात असें. अगदीं लहान वयांत अशातऱ्हेचे माझे लाड आईनें पुरविले, पण माझें

आडवय होतांच ही एकुलती एक व बापाची लाडकी मुलगी म्हणून तिनें माझी कधींहि गय केली नाहीं. घरांमध्यें जोंधळ्याची भाकरी दुपारीं इतर मंडळींकरतां होत असे. तीच भाकरी मला सर्वांसारखी खावी लागे. सर्व तऱ्हेच्या भाज्या पानांत वाढलेल्या खाल्ल्या पाहिजेत असा तिचा दंडक असे. या सर्व सक्तीचें कारण तुला सासरीं कांहीं जड जातां कामा नये, हें पालुपद पूर्वीच्या काळानुरूप मला ती ऐकवीत असे. आमचे येथें गाय किंवा म्हैस नेहमीं असे, त्यामुळें दुपारीं जेवणांत एक दिवस ताजें फोडणीचें ताक आमटीच्या वाटींत असावयाचें. दुसरे दिवशीं जरा आंबट ताक झालें म्हणजे कढी व्हावयाची. तेंच ताक तिसरे दिवशीं जास्त आंबट झाल्यावर चाकवताची भाजी ताक घालून हटकून असावयाची. पुन्हा चवथे दिवशीं ताजें ताक. या वेळीं आमचे घरीं माझा मामा, चुलतभाऊ, चुलतबहिणी अशीं आम्हीं बरोबरीचीं तीनचार मुलें शाळेंत जाणारीं अशीं होतों. सर्वांना हा ताक प्रकार आवडे. मला मात्र नको वाटे हें रहाटगाडगें. एक दिवस मीं आईस सरळच विचारलें, " आई, या ताकाच्या प्रकारांतून कधीं सुटका होणार ? दोन दिवस आंबट ताकाचे प्रकार झाल्यावर तिसरे दिवशीं पुन्हा ताजें ताक वाढतेसच. यांतून कधीं सुटका माझी होईल का ? " तेव्हां आई मनापासून हसली व होत असलेली घटना तिच्या लक्षांत आली. त्यानंतर मात्र कढी, भाजी खाण्याची सक्ती माझ्यावर तिनें केली नाहीं.

दादांची मिळकत माझ्या लहानपणीं बेताचीच होती, पण आईची वागणूक काटकसरी व समतोल असल्यामुळें ते दिवस निभावले. बिचारीनें स्वतःच्या हातांत, पैसे खर्च करण्याची सत्ता आहे म्हणून चैन कधींहि केली नाहीं. आमचे दादा फार खर्चीक. त्यांना आईची ही काटकसर पसंत नव्हती. त्यांचे दोघांचे खर्चाबाबतचे संवाद आमची मुलांची चांगली करमणूक करीत. कांहीं माणसें स्वतः मार्गदर्शन करतात तर कांहीं नुसता रेड सिग्नल दाखवितात, पण तेंहि एक प्रकारें मार्गदर्शनच ठरतें. तसें मार्गदर्शन माझ्या आईच्या जीवनांतून मला आयुष्यभर मिळालें आहे.

## — ७ —

मी त्यावेळीं १२-१३ वर्षांची असेन. माझी दूरची नातलग म्हणजे माझ्या सख्ख्या आईची मामी पुण्यांतच राहात होती. मला शाळेला सुट्टी असली म्हणजे महिना-पंधरा दिवसांनीं मी मामीकडे जात असें. या मामींना कर्तृत्वशक्ति दांडगी होती आणि जिव्हाळाहि माझ्याबद्दल वाटत होता. त्यामुळें मला आग्रहाचें निमंत्रण त्या अगत्यानें देत असत.

या मामींनीं गरिबींतून दिवस काढून तिन्ही मुलांचें शिक्षण पुरें केलें होतें. नुकतीच तिच्या वडील मुलाला चांगल्यापैकीं नोकरी लागली होती. त्यामुळें आमच्या मामीसाहेब सुखांत व खुषींत असत. खटकत जें काय त्यांना होतं तें म्हणजे घरामध्यें खेळतं नातवंड नव्हतं. तिच्या सुनेला दोन मुलगे झाले, पण तीन महिन्यांतच त्यांचा कारभार आटपला. आतां जी हकीगत मी लिहिणार आहें ती म्हणजे त्यांच्या ( राजा ) नातवाची. राजा हा दहा महिन्यांचा झाला होता. त्याला मामी जीव कीं प्राण करीत. राजाच्या ठिकाणीं मामी इतक्या गुरफटल्या होत्या कीं, त्यांची सून उमा ( राजाची आई ) त्यांना परकी वाटे. शेजाऱ्यावर तरी एखादी बाई विश्वास टाकील तितकासुद्धां विश्वास मामी ' उमावर ' टाकीत नसत.

सासवासुनांचं बिघडण्यासारखं दुसरं कांहीं घरांत नव्हतंच, पण ' राजा '-प्रकरणीं सासवासुनांचा पूर्ण बेबनाव होता. त्यामुळें उमामामी माझ्यासारखी-जवळसुद्धां कळवळून आमच्या मामीबद्दल तक्रार करायची. त्यांत बापू ( उमाचा नवरा ) परगांवीं असल्यामुळें उमामामी एकाकी पडे. स्वतःचा पोटचा मुलगा त्याला घेण्याची, कडेवर घेऊन देवाला जाण्याचीसुद्धां तिची प्राज्ञा नव्हती. अशी त्या वेळीं सासूची हुकूमशाही घरांत असे.

त्यांतच काय झालं कीं, या राजाला नवज्वराचा ताप आला. मग काय विचारतां? भोळ्या मामी राजाची शुश्रूषा करतां करतां कांहीं तरी करमणूक म्हणून उमामामीला घालून पाडून बोलत असावयाची. एकंदर बोलण्याचा रोख उमामामीच्या निष्काळजीपणामुळें राजा आजारी पडला, असें येणाऱ्या-जाणाऱ्याजवळ ती बोलत असे.

या राजाच्या दुखण्यांत एक दोन दिवसा तरी मी मामींच्याकडे जात असें. एक दिवस सकाळीं मी नवाला मामींकडे गेलें तों राजाची तब्येत अत्यवस्थ झालेली दिसली. राजाला म्हणे न्युमोनिया झालेला होता. बापूहि राजाच्या उशागतीं पायगतीं राजाची शुश्रूषा करतांना दिसत होता. उमामामी मात्र तिथं मला कुठेंच दिसेना. मी धावतच स्वयंपाकघरांत गेलें व उमामामीला म्हटलें, 'अग, भाकरी कसल्या करती आहेस? राजा कसं तरी करतो आहे. त्याच्या जवळ तरी जाऊन बैस–' इतक्यांत मामींनीं मला बाहेरनं हाक मारली व कसलीशी मात्रा माझ्या हातांत देऊन, 'दुधांत उगाळून आण' म्हणाली. माझ्या हातांतली मात्रा चटपट घेऊन दुधांत उगाळून माझ्या हातांत उमामामींनीं वाटी दिली. मात्रा घेऊन तरी तूंच बाहेर जा व राजाला एकदा तरी घे असं मीं म्हणतांच उमामामींचा कंठ दाटून आला व मला जोरांत म्हणाली, 'अग, तुला काय सांगू? या आठ दिवसांत राजापासून मला ह्यांनीं दूर ठेवली आहे' असं म्हणून ती देवघरांत गेली व मुळूमुळू रडत बसली. मी मात्रा घेऊन बाहेर जातें तों आमच्या मामींचा 'राजा रे, कसा गेलास?' मोठा रडण्याचा आवाज कानीं आला. मी धावतच उमामामीकडे देवघरांत गेलें. जवळ जवळ मीं ओढीतच तिला बाहेर आणलें. उमामामी भावनेसरशीं काय बोलत होती! 'या आठ दिवसांत चमचाभर पाणीदेखील माझ्या राजाला मीं पाजलें नाहीं ग? या आजारांत एक तासभरदेखील मीं माझ्या राजाला मांडीवर घेतलें नाहीं. दिलाच नाहीं माझ्याजवळ मुळीं. मी वैरीण होतें त्याची. डोळे भरून मला बघूं तरी द्या हो,' असें म्हणून राजाला उमामामी मांडीवर घेण्याकरितां उभी होती. मामीहि त्याच वेळीं राजाला रडत रडत हृदयाशीं कवळीत होती. मामींचा शोक राजा गेल्याचा होता. दुःखाच्या वेगांत त्या स्वतःला वाटेल-तशा बोलून घेत होत्या. 'मी दुर्दैवी, माझ्या हाताला यश नाहीं,' असं

म्हणून दुःखानें स्वतःचें तोंड बडवून घेत होती. तर उमामामी ‘ राजाला मला धड पाहूंसुद्धां दिला नाहीं. अरे जन्माला आलास आणि आईला सोडून गेलास. तुला मीं पाजलंसुद्धां नाहीं रे पोटभर ’ असें म्हणून वेड्यासारखी पदराआड राजास घेऊं लागली. मग मात्र मामीनें आपलें दुःख आंवरून संयमानें पुढील कारभार आटोपला. तशाहि परिस्थितींत उमामामीचें बोलणें हृदयाला अधिक पीळ पाडीत होतें. मायलेकरांची ताटातूट अखेरच्या क्षणापर्यंत मामींनीं कां केली हें कोडें मला उलगडलेंच नाहीं.

आमच्या मामी इतक्या चांगल्या कर्तबगार पण सुनेच्या मातृहृदयाची कदर त्यांनीं केली नाहीं. आपल्यासारखींच प्रेमाचीं व जिव्हाळ्याचीं नातीं दुसऱ्याहि माणसाचीं असतात व त्या माणसांना आजाऱ्याचा त्रास व दगदग काढण्यांतहि एक प्रकारचें सात्त्विक समाधान असतें हें अनुभवी मामींच्या लक्षांत येऊं नये, याचें नवल वाटतें. मी आणि माझं, यापलीकडे जग आहे व त्या जगावर आपण अन्याय करतों, याची जाणीव माणूस स्वतःभोंवतींच फिरत असल्यामुळें नसते, याचें आश्चर्य वाटतें. हा हृदयद्रावक प्रसंग अक्षय्य मला आठवतो. अशा तऱ्हेची दुसरी एक घटना मला माझ्या पुढच्या आयुष्यांत येवल्यांत पाहावयास सांपडली. ती ओघानेंच आठवली म्हणून येथें नमूद करतें.

आमच्या राष्ट्रीय शाळेंतील एक मास्तर दोन तीन महिने आजारी होते. क्षयासारखें ‘निदान’ बोललें जात होतें. रोज ताप घाम सुरू होता. खोकला येणें, छाती दुखणें वगैरे प्रकारहि आढळत होते. डॉक्टरचें औषध सुरू होतें. त्यांच्या आईच्या जागीं असलेली त्यांची वडील भावजय दुखण्याचें हें निदान ऐकल्यावरून आलेली होती. त्याचप्रमाणें मास्तरांचे वडील बंधु आणि त्यांची बायको व मास्तरांचे धाकटे बंधु अशी मंडळी घरांत रोग्याच्या शुश्रूषेकरतां तत्पर होती. मास्तरांच्या लग्नाला दोन तीन वर्षेंच झालीं होतीं. सर्वच मायेचीं माणसं असल्यामुळें शुश्रूषा आस्तेवाईकपणानें होत होती. मी दोन चार दिवसांनीं मास्तरांच्या समाचारास जावयाची. मास्तरांची वडील भावजय राधाबाई व धाकट्या वहिनी जवळ दिसत. त्यांच्या जवळ मास्तरांच्या प्रकृतीची चवकशी करून मी परत येई. प्रकृतीबद्दल एखादा प्रश्न मी

मास्तरांना करी, त्याचें उत्तर मास्तर आस्थेनें देत. त्या काळांत आम्हीं समवयस्क मंडळी एकमेकांशीं कमीच बोलत असूं. स्वतःच्या वागणुकींतून दुसऱ्याविषयीं आदर दाखविणें व त्या आदराची पोंच मिळणें या गोष्टी वागण्याच्या पद्धतींतून दृष्टिगोचर होत असत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मला रमाबाई–मास्तरांची पत्नी–तिथं कधीं दिसावयाची नाहीं. मधलें दार बंद असावयाचें. मीच घरांत जाऊन रमाबाईंची चवकशी करून धीराचे दोन शब्द बोलून घरीं परत जात असें.

एक दिवस मास्तरांची प्रकृति अधिक झाली वाटतं. त्यांचे घरीं डॉक्टर आल्याचें कळतांच शाळेंतील बहुतेक मास्तर मंडळी धावतच त्यांच्या घरीं आली. त्यांची धावपळ पाहून आम्ही बायकाहि पुराणिकांच्या ओसरीवर जमा झालों. मास्तरांना तपासून " कांहीं काळजीचें कारण नाहीं," असें डॉक्टर सांगत होते. " आतां इंजेक्शन देतों म्हणजे जीव घाबरणें कमी होईल " तें म्हणाले. एकेकजण आंत मास्तरांना बघून धीराचे दोन गोड शब्द बोलून बाहेर येत होते. मी खोलींत गेलें. मास्तरांची उलघाल सुरू होती. राधावहिनी मास्तरांच्या उशाशीं बसल्या होत्या, त्यांच्या धाकट्या वहिनीहि पतीसह आजाऱ्याच्या शुश्रूषेंत गढलेल्या दिसत होत्या. हे देखील मास्तरांच्या पाठीवरून हळूहळू हात फिरवीत होते व 'आतां बरें वाटेल हं' असें आस्थेनें सांगत होते. मी आंत जातांच यांचेजवळ बसलें व हळूच मास्तरांच्या डोक्यांस हात लावला. डोकें बरेंच तापलेलें वाटलें. लगेच मीं यांचेकडे बघितलें. मास्तरांनीं वहिनी असें म्हणून कुशी पालटली. त्यांच्या चेहऱ्यावर स्वस्थता दिसत नव्हती. येवढ्या सगळ्या जमावांत त्यांची पत्नी रमाबाई दिसत नव्हती. त्याचें मला नवल वाटलें. पतीच्या अस्वस्थ प्रकृतीमुळें बायकोची मनःस्थिति आंत-बाहेर कशी होत असेल याची मला जाणीव झाली. प्रिय पतीची सेवा करण्याची संधिसुद्धां पत्नीला अनुभवी नातलगांनीं मिळूं देऊं नये याची मला खरंच चीड आली व मीं एकदम रमाबाईंना जोरांत हांक मारली व थोडें गार पाणी आणा हो म्हटलें. यांनीं मला गप्प बसण्याबद्दल खूण केली. तूं आतां घरीं जा. रोग्याजवळ गर्दी करणें चांगलें नाहीं म्हणाले. मी लगेच उठलेंच. हे घरीं आल्यावर मला म्हणाले, "अग, रमाबाई केव्हांहि पुराणिकांच्या

जवळ दिसत नाहींत. आजच काय रोजचीच ही गोष्ट आहे. क्षयरोग्यापासून बायको लांब ठेवावी म्हणतात ना ?"

" म्हणजे तीच नवऱ्याआधीं मरेल हेंच खरें." मी ताडकन बोललें. हे म्हणाले, " रमाबाई साधी आहे. तुझ्यासारखी बंडखोर नाहीं. ती बिचारी वडील मंडळींचें ऐकून घरांत बसते."

एकंदर काय आपण स्वतःचा जितका विचार करतों तितका दुसऱ्याचा करीत नाहीं. तो करावययास हवा नाहीं का ? घरांतील वडीलधारी मंडळी आपल्याचभोंवतीं गिरक्या मारून लहान मंडळींच्या प्रेमळ भावनांचा बळी घेतात व ही गोष्ट त्यांच्या ध्यानींहि नसते.

## ८

१९१४ सालच्या २६ डिसेंबरला दुपारीं. मला बघावयास माझे मामंजी व त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गांत असलेले माझे धाकटे दीर आले होते. दुपारची चारची वेळ असेल. माझ्या शाळेला त्या वेळीं नाताळची सुट्टी होती. माझी मैत्रीण दुर्गाबाई हेर्लेकर मजकडे २-३ दिवस सुटींत राहण्यास आली होती. ती, मी, माझे मामा, बंधु आम्ही बरोबरची सर्व मंडळी सकाळीं बरीच सहल करून तेथेंच पोटभर फराळ करून घरीं येतांच कसेंतरी दुपारीं पडलों होतों. सर्वांना दमल्यामुळें गाढ झोप लागली असावी. आईनें " ऊठ, ऊठ, तुला पाहण्यास मंडळी आली, " म्हणतांच पटदिशीं धडकत्या हृदयानें मी उभीच राहिलें. तसें पाहिलें तर मला फार ठिकाणीं

दाखविलें देखील नव्हतें. पण झोपेंतून उठून एकदम अगदीं निराळ्या दालनांत मला प्रवेश करावयाचा होता.

वधूपरीक्षेच्या वेळेला मुलीला भारींतलें भारी वस्त्र नेसवलें जात असे. दाग-दागिनेहि मोठ्या गृहिणीसारखेच नथ-बुगड्या-वगैरेदेखील तिला घातल्या जात असत. मुलीला बघायला मंडळी आली म्हणजे तिनें बिचकत बिचकत विनयशीलपणें बघायला आलेल्या मंडळींत सामील व्हायचं. म्हणजे खालीं मान घालून उभं राह्यचं. 'बैस मुली, घाबरूं नकोस,' असे धीराचे शब्द कुणाचे तरी कानीं येतांच सर्वांना वाकून नमस्कार करून मान खालीं घालून, उकिडवेंच बसायचं. मांडीबिंडी नाहीं हो घालायची. पाह्यला आलेल्या मंडळींच्याकडून कांहीं तरी प्रश्न विचारले जात. त्या लोकांचा हेतु असा असे—मुलगी बहिरी मुकी आंधळी पांगळी नाहीं ना ? मुलगी अव्यंग आहे ना ? येवढाच भावार्थ विचारलेल्या प्रश्नांतून काढतां येत असे. 'भावंडें किती—तूं शिकेतस काय—केरपोतेरं झाल्यावर काय करशील,' असे मार्मिक प्रश्नसुद्धां केव्हां केव्हां असत.

बघायला आलेल्या मंडळीच्या पुढें वर सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें मीं प्रवेश केला. 'बस मुली,' हे शब्द कानीं येतांच मी खालीं मान घालून पद्धतशीर 'बघायला आलेल्या मुलीची भूमिका' घेतली. तीं. मामंजी व भाऊजी परत गेले. मुलगी पाहण्याचा एक हप्ता झाला.

"आठ वाजून गेले, आपण दिलेली वेळ चुकली नाहीं का ?" असं म्हणून दादांनीं घड्याळाकडे पाहिलें. त्यामुळें दोघेहि जरा वरमले, पण भाऊजींनीं समयसूचक उत्तर दिलें, "घड्याळं मागं पुढं थोडींफार सर्वांचीं असूं शकतात. नाहीं का ?" सर्वांनींच हसण्यावारी हें घालविलें. मी जरी खालीं मान घालून बसलेली होतें तरी माझी दृष्टि दोघांच्याकडे थोडी फार वळतच होती. मला पाहण्यासाठीं हे जे त्या दिवशीं आले होते, ते अगदीं कॉलेज-युवकाच्या 'अप-टु-डेट' पोषाखांतच आलेले होते. या सगळ्या पेहरावाचा आग्रह धाकट्या भाऊजींचाच होता, हें मला पुढं कळलं. कारण, ह्यांना तशा पोषाखाची आवड जात्याच नव्हती. साध्या राहणीचाच परिणाम त्यांच्या विचारा-

आचारांत, कायमचा दिसे. योगायोगानें त्या दिवशीं सगळंच निराळं असं घडत आलं. हे कधीं चहा पीत नसत, कुणीं चहा प्यायला तर त्यांना ती गोष्ट आवडत नसे, पण आमच्या घरीं त्या दिवशीं कॉफी दिल्यामुळें चहाचा विरोध आम्हांला कळण्यांत आला नाहीं. बी. ए. होऊन एल्‌एल्‌. बी. चा अभ्यास नागपूरकडे करीत आहेत या गोष्टीला पोषक असा पेहरावहि पाहून आमच्या घरांतली बहुतेक मंडळी त्या दिवशीं खुषींत दिसली. अशा रीतीनें मला बघण्याचा समारंभ संपला. भाऊजींनीं शाळेंतल्या कांहीं विषयांवर माझ्याशीं बोलण्याचा प्रयत्न केला. मीं योग्य तीं उत्तरें दिलीं. दादांना हा मोकळेपणा फारसा आवडला नाहीं, पण करणार काय ? हे व भाऊजी दोघेहि जिना उतरले. जातांना त्यांनीं मागें वळून दिवाणखान्याचें व त्याच बरोबर आंतील मंडळींचें निरीक्षण केलें. आम्हांस एकदांचें हायसें वाटलें. हायसें वाटण्याचें कारण पेपर बरा गेला हें निश्चित अनुमान आम्हीं बोलाचालीवरून काढलें होतें. हा दुसरा हप्ता झाला.

या घरीं मला दाखविण्याची आतां ही तिसरी वेळ. मोठ्या वन्सं व वडील दीर मला बघण्यास आलेले होते. दोनचार दिवसांच्या नंतरच ही गोष्ट घडली. दादांना आतां पुन्हा पुन्हा मुलगी दाखवणें पसंत नव्हतें. तसें पत्र मामंजींना पाठविण्यास दादांचा हात सरसरत होता, पण आईनें त्यांच्या वृत्तीला ब्रेक लावला व सांगितलें कीं, तसं कांहीं करूं नका. ‘ बया ’ आपट्यांच्या मंडळींना पसंत आहे. नवऱ्या मुलाला आई नाहीं तेव्हां वडील बहीणच घरांत कर्ती असणार. घरांतल्या मुख्य बाईला मुलगी दाखविल्याशिवाय कशी पसंत करतील ? आपट्यांचें कांहीं चूक नाहीं. पाहूं देत कीं पुन्हा ! ‘ ज्याचे तीळ तांदूळ खाल्ले असतील तेथें सर्व पसंत होतेंच.’ त्याप्रमाणेंच झालें. आपटे मंडळींची पसंती मिळतांच दादा मामंजींकडे नाशिकला पुढील व्यावहारिक बोलणीं करण्यास गेले व निश्चित करूनच परत आले. ४ फेब्रुवारी १९१५ गोरज मुहूर्त लग्नाचा धरला गेला, माघ वद्य पंचमी ही तिथि होती.

आमचे दादा तसे ‘ पुढारलेले ’ असले तरी ‘ सनातनी ’ म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांचें एक मन म्हणे ‘ शिकूं दे की बया शिकते आहे तर ! ’

त्या मनाशीं सहकार करून माझ्यापेक्षां वयानें लहान असलेल्या चुलतबहिणीचें लग्न माझ्या आधीं उरकून घेतलें, नंतर माझें केलें. मुलगी मोठी झाली हा विचार मनांत आला कीं, त्या वेळच्या समाजाकडे पाहून बयाचें लग्न आतां केलेंच पाहिजे, या वृत्तीनें भारावून जात व मग कोठें कोठें स्थळें शोधत. चुकूनमाकून तसा शब्दहि टाकीत. आवतींभोंवतींच्या वातावरणाचाहि दादांच्या मनांवर नकळत परिणाम होत असावा. माझे सख्खे आजोबा पुण्यास आले कीं म्हणत, " काय स्थळं पाहतांना बयाला ? कां लक्षच नाहीं तुमचें तिकडे ? नाहीं तर मला पाहिलें पाहिजे. करतां काय ? " अशा बोलण्याचा परिणाम हलकें हलकें माझ्या लग्नासंबंधीं दादांचें मन तर होत असावें. पत्नीच्या मागें मुलीला नीट वाढविली—सर्व तऱ्हेची जोपासना केली, आतां योग्य वेळीं तिच्यासंबंधीं लग्नाचें कर्तव्य पूर्ण करावें, असेंहि दादांच्या मनांत येत असावें. मला दादांनीं एकदोनदा लग्नाचा प्रश्न टाकलाहि. मीं गप्प राहून मूकसंमति दिली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

माझ्यासारखी दादांची लाडकी मुलगी सरळ रीतीनें शिक्षण घेत असतांना लग्नाचा विचार मला मान्य कां व्हावा ? त्याचें मुख्य कारण म्हणजे या आईच्या पहिल्या दोन मुली तान्हेपणींच गेल्या होत्या. तिसरी मुलगी शांता तीन चार वर्षांची त्या वेळीं होती. वडीलधाऱ्या स्त्रिया आईकडे बसावयास आल्या म्हणजे म्हणत, " बयाचें लग्न कर बाई लवकर, म्हणजे पाठीला पाठ लागेल. एखाद्याची पाठच मोठी वाईट असते. " अशा बोलण्याचा परिणाम माझ्या कोवळ्या मनोवृत्तीवर झाला असावा. माझं लग्न झाल्यावर माझीं भावंडें जगतील. पाठीला पाठ लागेल ही कल्पना फार गोड गोड वाटली असावी. हा एक लग्नाच्या संमतीचा भाग झाला.

दुसरा भाग असा. लग्न करावयाचेंच असेल तर वाढतें वय कशाकरितां करावयाचें ? वडील माणसांची जबाबदारी माझ्या लग्नामुळें एक प्रकारें कमी होईल, हाहि विचार मधून मधून माझ्या मनांत डोकावीत असे.

निश्चित स्वरूपाचा ध्येयवाद असा कोणताच माझ्यापुढें नव्हता. मात्र थोडेंफार झालेलें वाचन व आवतींभोंवतींची परिस्थिति पाहून आपला

पति विद्वान् असावा हें माझ्या मनानें घेतलें होतें. विद्वान याची व्याख्या त्या वेळीं तरी 'बी. ए. एल्एल्. बी.' पास अशी मीं केलेली होती. लो. टिळक, त्यांचे सहकारी, त्या वेळची कार्यकर्ती मंडळी बहुतेक बी. ए. एल्एल्. बी होतीच. त्यामुळें हे एल्एल्. बी.चा अभ्यास करतात यांवरच मी खूष झालें होतें. बाकीच्या सर्व व्यावहारिक गोष्टी दादा बघतीलच हा विश्वास होता. त्यामुळें कोणताहि अधिक उणा विचार न करतां मीं लग्नास संमति दिली.

वडिलांना पटणारा या स्थळाचा भाग म्हणजे मामंजींना तीनशें रुपये पेन्शन सुरू आहे. गव्हर्नमेंट रेल्वे ऑफिसर.अशा हुद्यावर मामंजी होते. हा एक मुद्दा खास होता. त्याचप्रमाणें हे एल्एल्. बी. झाल्यावर पुढें वऱ्हाडांत वकिली करणार ही कल्पना गोड वाटली असावी. घरांतील सर्व मंडळी सुशिक्षित व कुलशीलवान् आहेत, याचा संतोष माझ्या आईवडिलांना हें स्थळ पसंत करतांना वाटला. वराच्या रूपाचा विचार कांहीं मंडळी बोलतांना करीत होती, पण त्याचें उत्तर त्याचें त्यांनींच देऊन घेतलें. "आपली मुलगी-देखील दहाजणीसारखीच आहे. तर आपण जांवई रूपवान् कसा इच्छावा." अशा चर्चेला आमच्या आईनें एका वाक्यांत सांगितलें, "मनुष्य एकदा रूप पाहतो, पण गुणाशींच जन्मभर संसार करावा लागतो."

हें आईचें वाक्य खरें होतें. आम्हीं दोघांनीं एकमेकांना पसंत केलें तें का केलें तें समजतच नाहीं. 'रूप' हा मुद्दा आम्हीं डोळ्यांपुढें ठेवलेलाच नव्हता. एकमेकांच्या गुणांची ओळख पूर्व सहवास नसल्यामुळें झालीच नव्हती, पण लग्न ठरलें आणि त्याप्रमाणें झालेंहि.

आपल्यांच्या मंडळींनीं आमचें स्थळ कां पसंत केलें, तर मुख्य मामंजींचें कारण म्हणजे मुलगी प्रसिद्ध घराण्यांतील कुलशीलवानाची आहे व ती आपल्या घराण्याला साजेशीच आहे हें. यांनीं मला जें पसंत केलें त्याचा धागा फार दूरवर आहे.

पेन्शन घेतल्यावर मामंजी नाशकास कायमचे राहात असत. तेथेंच सुट्टींत ही शिकणारी सर्व मंडळी येत असत. मुख्य घर हें नाशिकाचें सर्वांना होतें. एकदा यांचा दांत दुखत होता तो दाखवण्याकरितां सरकारी डॉक्टर सोहोनी

यांच्याकडे हे गेले. औषधांनीं गुण येतांच दोन्ही घराण्यांच येणें-जाणें साहजिकच वाढलें.

डॉ. सोहोनी हे माझ्या आईचे मामा होत. दादा माझ्या लग्नाचा विचार करीत आहेत—वरसंशोधन सुरू आहे हें मामांना माहीत होतें. मामांनीं जेव्हां हें आमचें स्थळ ह्यांना सांगितलें तेव्हां हे म्हणाले, " सोहोनी, मी दिसतों तसा नाहीं. माझ्या डोक्यांत पुष्कळ विचार थैमान घालीत आहेत. एखाद्या मुलीची ओढाताण माझ्याबरोबर नको असं माझं प्रांजल मत आहे. " तेव्हां मामांनीं सांगितलें, " अहो, मुलगी फार सरळ व कोणत्याहि परिस्थितींत सामावून जाणारी आहे. ती कोणास खुपणारी नाहीं. ती तिचे आईबरोबर माझे घरीं चार महिने होती. ही मुलगी सावत्र हें कुणाला कळायचं देखील नाहीं. श्रीमंताची एकुलती एक लेक, पण माझ्या पोराबाळांत दहाच्या खटल्यांत सामावली गेली. कधीं तिचा त्रास आम्हांस वाटला नाहीं. अहो, तिला बापाच्या घरीं किती चहाची संवय होती. माझे घरीं माझ्या मुलांप्रमाणेंच मीं वागविली. एकदम तिचा चहा मीं बंद केला. सगळ्या मुलांबरोबर सकाळीं भात खायची. तिनं त्याबद्दल कधीं कुरकुर केली नाहीं. इतकेंच नाहीं तर सदा आनंदी. मुलांत रमून गेलेली असे. तिनें आपल्या बापापाशीं पुढें मागेंसुद्धां याचा उच्चार कधीं केला नाहीं. म्हणून म्हणतों नाहीं म्हणूं नका आपटे. "

दोन दिवस विचार करून ह्यांनीं माझ्या सांगोवांगी गुणांवर विश्वास ठेवून माझी पसंती केली. माझे धाकटे दीर, त्यांच्या मतानें मी हुषार व चुणचुणीत, म्हणून खूष होते. त्यांनीं सांगितलें, " आबा मुलगी 'नाहीं' म्हणून गमावूं नकोस." माझ्या मोठ्या वन्सं व वडील भाऊजी यशवंतराव हे मला पाहण्यास आले होते. त्यांना अगदीं शेवटीं दाखविल्यामुळें आवडनावड दाखविण्यास या दोघांना संधिच नव्हती. 'हो' ला 'हो' म्हणून त्यांना दुजोरा द्यावा लागला. माझ्या वन्सं या रूपाच्या फार चिकित्सक होत्या. मी अगर आम्ही कोणीच जावा त्यांना रूपानें पसंत नव्हतों. त्या रूपानें सुंदर अशाच होत्या. त्या म्हणत कुरूप मुली घरांत आल्या कीं पुढचीं मुलं तशींच होणार. पण ईश्वरी,



... ग्रंथालय, ठाणें, स्थळप्रत.

कृपेनें आम्हां जावांचीं मुलें दिसण्यांत बऱ्यापैकीं, सद्वर्तनी व गुणी अशींच आहेत. कदाचित् मायेमुळें सर्व मुलं चांगलीं वाटत असतील

माझ्या लग्नाचं आमंत्रण माझ्या वर्गातील मैत्रिणींना व सर्व शिक्षक-शिक्षिकांना दिलें होतें. त्याप्रमाणें बहुतेक मंडळी लग्नास आली होती. त्यांत माझ्या आवडत्या शिक्षिका मिस् दस्तूरहि आल्या होत्या. लग्न लागल्यावर आम्ही दोघं वधूवर पाटांवर शेजारीं शेजारीं बसलों होतों. पुढचं धर्मकृत्य सुरू व्हावयाचं होतं. थोडा अवसर होता. त्या वेळांत माझ्या वर्गातील मुली व शिक्षक-शिक्षिका आम्हां दोघांस भेटून जात होतीं. मिस् दस्तूर मात्र माझ्याजवळ आल्या.पाठीवरून हात फिरवून माझ्या गोंधळलेल्या चेहऱ्याकडे पाहून म्हणाल्या, "Yamu, your life will be happy, do not be serious" आणि ह्यांच्याजवळ जाऊन हसत हसत म्हणाल्या, "Apte, you are very fortunate to get such a good wife. Our Yamu is sweet and clever girl." ह्यांनीं मिस् दस्तूरशीं हस्तांदोलन केलें व "कांहीं काळजी करूं नका" असें हास्यवदनानें सांगितलें.

मिस् दस्तूर व माझ्या वर्गातील भगिनी माझा निरोप घेऊन हलके हलके जात होत्या. आमच्या मिस् दस्तूर शिक्षिका वर्गात कडक, पण वर्गाबाहेर आम्हां मुलींशीं अतिशय प्रेमळ व मनमिळाऊ अशा वागत असत. त्यामुळें त्यांचा जिव्हाळा आम्हांस सहजच वाटे.

ह्यांनीं दिलेला दिलासा मला त्या वेळीं फार आवडला. माझी मान जरा उंचावली हें खास.

डॉ. सोहोनींनीं ह्यांचेजवळ केलेलें माझें स्वभाववर्णन व मिस् दस्तूरनें माझेविषयीं काढलेले उद्गार माझ्या डोळ्यापुढें जन्मभर उभे होते. संसारांत कधीं द्विधा मनोवृत्ति झाली तर मी दोघांचीं वाक्यें पुन्हा मनाशीं गुणगुणत असें व त्यांच्या कार्यात समरस होऊन जात असे. हेहि नेहमीं म्हणत, "तुझ्या दस्तूरनें सांगितलेलें खरें आहे. शहाणपणानेंच आपण संसार करीत आहोंत. त्यामुळें कोणतीच उणीव वाटत नाहीं."

लग्न झाल्यावर तीन चार दिवसांतच हे नागपूरला लॉ कॉलेजमध्यें गेले, व माझी रवानगी वन्संबरोबर अक्कलकोटला झाली. लग्नानंतरच्या या दिवसांत

पूर्वीच्या रिवाजाप्रमाणें आम्ही एकहि शब्द एकमेकांशीं बोललों नाहीं. आजारांतून उठलेल्या माणसाला साध्या तूपभातांत ज्याप्रमाणें अमृताची गोडी लागते त्याप्रमाणें आम्हां दोघांस तो दोघांचा तोटका सहवास अमृतमय वाटत होता.

वडील मंडळींनीं देखील आमची चेष्टा करावी, बरोबरच्या मंडळींनीं सुखसंवाद करावे, ओझरती दृष्टभेट वारंवार व्हावी—त्यांनीं वन्संपाशीं, "अक्का जरा पाणी दे ना पिण्यास—" असें कांहीं तरी निमित्त करून म्हणावें—मीं तत्परतेनें पाणी नेऊन द्यावें. एक ना दोन—एकमेकांत प्रेम, एकमेकाचा अभिमान, एकमेकाची काळजी, इतक्या अल्पावधींत आपोआप कशी निर्माण झाली याचें नवल वाटतें, पण झालें हें मात्र खरें.

हे थेट नागपूरला गेले. माझ्या वन्सं अक्कलकोटला नर्स होत्या. तेथें मी त्यांचेबरोबरच पहिल्यांदा गेलें. त्या वेळीं आमच्या घरांतील मंडळी म्हणजे माझे मामंजी, वडील दीर व जाऊ, धाकटे दीर व वन्सं एवढीच होती. परक्या जीवनांत मी प्रवेश करीत असतांनाहि कोणत्याहि तऱ्हेचा त्रास असा मला वाटला नाहीं, याचें मुख्य कारण सासर-माहेरची बैठक म्हणजे राहणी समानच होती. त्यामुळें माझी पहिली खेप अत्यंत सुखांत झाली जीवनाचे धागे आपटे कुटुंबाशीं एक होऊं लागले.

मुनष्य जन्माला येतांना पूर्वदत्त कांहीं गुणसंग्रह घेऊन येतो. त्यालाच आपण मूळ स्वभावधर्म म्हणतो. त्यानंतर आंवतींभोंवतींची परिस्थिति, घरांतील वडील मंडळी, गुरुजन व समवयस्क मित्र यांच्या सहवासांतून जीवनानें घेतलेला घाट म्हणजेच पूर्ण मनुष्य होय.

मनुष्य जन्मतःच विरक्त प्रकृतीचा कधीं कधीं असूं शकतो. शुक, वामदेव, रामदास वगैरे माणसें जन्मापासूनच विरक्त मनोवृत्तीचीं होतीं. पण कांहीं माणसें निमित्तानें कारणपरत्वें ध्रुवासारखीं विरक्त होतात व तीं दृढनिश्चयी असल्यामुळें परिस्थितीवर मात करतात. सामान्य माणसेंदेखील कांहीं वेळा सामान्यांतून असामान्याकडे जातात.

ह्यांचें लहानपण, ह्यांचा लहानपणचा स्वभाव व घरादारांत वागण्याची पद्धति कोणत्या प्रकारची होती हें पाहिल्याशिवाय पुढच्या आयुष्यांतील

कृतींचा बोध होणार नाहीं; त्यासाठीं ह्यांचें बालपण, ह्यांच्या आयुष्याचीं मागील पानें एकदा पाहिल्याशिवाय पुढच्या ह्यांच्या वागण्याचा अर्थ बरोबर लक्षांत येणार नाहीं. ह्यांच्या स्वभावाची बैठकच कांहीं निराळी होती.

सामान्यतः लहान मुलांचा स्वभाव स्वार्थी व आप्पलपोटा असा असतो. स्वतःपलीकडे लहान मुलांची नजर जाऊं शकत नाहीं. असें असतांना हे सांगत असत कीं, मी माझा खाऊ सगळ्या भावंडांना देऊन टाकी. त्यामुळें घरांतील मुलांमध्यें मला एक स्थान निर्माण झालें होतें. खाऊच्या लालचीनें माझीं भावंडें व घरांतील लहान मुलें माझ्याजवळचा खाऊ पटकावीपर्यंत माझ्या आवतींभोंवतीं जमत. खाऊ पदरांत पडतांच आनंदानें सर्व दूर जात, मला कांहीं वेळ दूर ठेवीत हें निश्चित. पण त्या बाळमंडळींचा तो आनंद पाहून दुप्पट खाऊ खाल्ल्याचें समाधान मात्र मला होई. त्याच वेळीं माझी वडील बहीण ताई, “ बावळट आहेस झालं. तुझा खाऊ त्या मुलांनीं कसा नेला ? ” असें विचारी. ‘ मीं दिला ’ हें उत्तर सांगतांना मला कांहींतरी आगळेंच बरें वाटे. अशा तऱ्हेचीं उत्तरें मला व माझ्या चिरंजीवांना, पहिली हकीगत सांगतांना हे सांगत असत.

‘ घरामध्येंहि माझें आठव्या मुलाचें स्थान असल्यामुळें व लहानपणचे बरेचसे दिवस अशक्तपणांत गेल्यामुळें घरांतील माझ्या वडील बहिणी व इतरहि मंडळी कोणीहि माझें कौतुक असें करीत नसत. मात्र माझी आई म्हणे, “ माझा एक मुलगा पांडुरंग.” आई मात्र माझ्यावर मनापासून प्रेम करी. बाकी यथातथाच. आमचे तात्या कर्तबगार व धोरणी असे गृहस्थ होते. त्यांचे गुण मला जेव्हां समजूं लागले व मीच आपण होऊन जेव्हां वडिलांच्याजवळ बिलगूं लागलों तेव्हां माझ्यामध्यें कांहींतरी आहे असें तात्यांना वाटूं लागलें. तेव्हां कुठं घरांत मला अस्तित्व प्राप्त झालें. माझीं सगळीं भावंडें आईवडिलांसारखीं गोरीं व रूपवान्. मीच एकटा काळा. ताई व अक्का लहानपणीं मला मी काळा म्हणून सांभाळण्याचा कंटाळाच करीत. घरामध्यें विशेष प्रेम आईशिवाय कुणी करत नव्हतें हें खरें. ’

त्या वेळची राजकीय परिस्थिति फार भयंकर होती. लो. टिळक यांचें कर्तृत्व व स्वदेशसेवा सर्वांना राष्ट्रसेवेकडे ओढीत होती. पण त्यांतल्या त्यांत

तरुणांचें आराध्य दैवत लो. टिळक हे झाले होते. लोकमान्यांविषयीं पूज्यता व प्रेम उघड दाखविण्याची सोय त्या काळीं नव्हती. सरकारची करडी नजर जनतेवर असे. गव्हर्मेंट सर्व्हंटना त्या वेळीं सरकारची भीति वाटे. लोकमान्यांना उघड मदत करणें तर अगदीं अशक्य होतें; पण आमचे मामंजी लो. टिळकांच्या कार्याला आर्थिक मदत भक्तिपूर्वक पण गुप्तपणें करीत असत. घरांत 'केसरी' कायम असे. त्याचें शब्दन् शब्द वाचन हे अगदीं लहानपणापासून करीत. आपला देश गुलामगिरींत अपमानित जिणें कंठीत आहे, त्याला स्वतंत्र केलेंच पाहिजे हें त्या वेळच्या तरुणांना खरोखरीच वेड लागलें होतें. हे सांगत, लो. टिळकांचें व्याख्यान असलें कीं, आम्हां मुलांना कांहीं सुचत नसे. शाळेंतून आल्यावर दप्तर घरांत फेकलें कीं, लो. टिळकांच्या व्याख्यानाकरितां धूम ठोकावयाची. आम्ही सर्व मित्र-मंडळी एकवटून व्याख्यान ऐकल्यावरच घराकडे परतत असूं. घरीं येण्यास वेळेची अवेळ झाल्याबद्दल घरांतील मंडळींचीं बोलणीं खाणें हा आमचा त्या वेळीं नेहमींचाच रिवाज झाला होता.

व्याख्यानाहून आल्यावर त्या दिवशीं तरी चित्त बेचैन व्हावयाचें व कांहींतरी जें करतां येईल तें आयुष्यांत करावयाचें—स्वराज्य मिळविण्याच्या कामींच जीवन लावावयाचें असा मनाशीं संकल्प ठरे. डोकें विचारानें तापलें कीं, गादी सोडून नुसत्या जमिनीवर मी निजावयाचा. कांहीं करतां येत नाहीं म्हणून हट्टानें रोज गार पाण्याची आंघोळ करावयाची. मन बेचैनच असे.

आमच्या घरांतील सर्व मंडळी चहा घेत असत. हे त्याला अपवाद होते. इतकेंच नव्हे, तर घरांतील मंडळींनीं पुन्हा पुन्हा चहा घेणें त्यांना बिलकूल आवडत नसे. एक तर चहा हें पेय तरुणांना तरी अपायकारकच आहे. त्यांत एकदा सवय लागली कीं, तो चहा डोक्यावर बसतो. आपण व्यसनाधीन होतों आणि हा चहा निर्माण होणाऱ्या मळ्यांमध्यें मजुरांचे काय हाल होतात याची कल्पना पिणाराला असत नाहीं, म्हणूनच चहा तुम्ही घेतां अशीं संभाषणें घरांत वारंवार चालत. इतकेंच नव्हे तर आईपाशीं हे हट्ट घेऊन महिना महिना सासूबाईंना चहा सोडावयास लावीत.

मामंजी बहुतेक परदेशी कपडा घरांत आणीत नसत. पण क्वचित् आलाच तर हे लहान तोंडीं मोठा घास घेऊन असमाधान व्यक्त करीत असत. घरांतील सर्व भावंडें वेगळीं पडत. ह्यांच्याशीं याबद्दल भांडत देखील असत.

मराठी पांचवीत हे होते वाटतं. परदेशी साबण जाहिरात म्हणून फुकट शाळेंत सर्वजणांना दिला गेला. यांनीं तो साबण साफ नाकारला. तो परदेशी आहे म्हणूनच मला नको असें स्पष्ट सांगितलें. अशी लहानपणीं घडलेली हकीगत त्यांचे एक मित्रच स्वतः मला सांगत असत. त्याचप्रमाणें टिळक तुरुंगांत ज्या वेळीं असत, तितके दिवस हे साखर खात नसत म्हणजे गुळाचीं पक्कान्नें हे खात असें नव्हे. तें पथ्य नव्हतें, तो भोगाचा त्याग होता. एक प्रकारची तपस्या होती. लो. टिळक सहा वर्षं मंडाल्यास होते तेव्हां कोणत्याहि सणास घरांत पक्वान्न झालें, सर्वांनीं खाल्लें तरी हे पक्वान्नास शिवतसुद्धां नसत. आईचें हृदय ह्यांच्या या न खाण्यानें कळवळे व डोळ्यांतून कांहीं वेळेला त्या पाणीहि काढीत. शेवटीं आईला सुख देण्याकरितां—आईच्या इच्छेचा आदर करण्याकरितां–केळ्यांत दूध घालून पानांतच शिकरण तयार होई. त्यावरच आईला समजूत करून घ्यावी लागे.

जीवनाची माती उच्च राष्ट्रप्रीतीच्या भावनेमध्यें चांगली मळली जात होती. त्यामुळें पुढचा आकार सहज तें घेऊं शकलें.

यावरून लो. टिळकांच्या लोकप्रीतीची कल्पना येते. घरोघरीं मनानें सकस तरुण तयार होत होते. लो. टिळक हे मनास पटलेलें तत्त्व प्रतिपादित तितकाच त्याचा प्रचारहि हिरीरीनें करीत. लोकमान्यांच्या जिव्हाळ्याच्या व्याख्यानामधून त्या वेळचा तरुण इंचाइंचानें भारला जात होता. असंतोषाचे हे कण जागोजागीं पसरले व पेरले गेले होते.

आणखी हे नेहमीं सांगत—माझ्यावर कोणाचा विशेष परिणाम झाला असेल तर माझ्या चुलत्यांचा—अण्णांचा होय. माझे चुलत मामंजी शिंदखेडे येथें एका प्राथमिक शाळेचे हेडमास्तर होते. मामंजींची बदली विजगापट्टम् येथें झाल्यामुळें ह्यांना शिक्षणाकरितां अण्णांच्याकडे ( चुलत मामंजी ) मामंजींनीं पाठविलें होतें. ह्यांना अण्णांकडे बरें वाटे. अण्णा हे जातिवंत शिक्षक होते. शिक्षकाची बैठक विचाराची व ठाम अशी असते. त्याचा परिणाम ह्यांचे मनावर फार झाला होता. साधी राहणी, पण विचाराची उच्च पातळी ही शिक्षकांतच विशेषतः आढळते. अण्णा बाहेरून सभेंतून अगर कुठूनहि जाऊन आले तरी बाहेरील सर्व

हकीगत अगत्यानें ह्यांना सांगत. त्यामुळें ज्ञानप्राप्तीचें दालन ह्यांना हवें तसें अण्णांकडे उघडे मिळे. मामंजींकडे सुखसोय—राहणी श्रीमंतीची असली तरी ह्यांच्या अभ्यासाची चौकशी तेथें कोणीहि करीत नसे. अभ्यास केल्याचें कौतुक नव्हतें, न केल्यास दूषणहि कोणी लावीत नसे, त्यामुळें मामंजीपेक्षां अण्णांच्याकडचें राहणें ह्यांना अधिक पसंत पडे.

त्याचप्रमाणें मुंबईच्या भरडा हायस्कूलमध्यें ह्यांचें माध्यमिक शिक्षण पुरें झालें. तेथील शिक्षकांची आठवण ह्यांना वारंवार आयुष्यभर होई. तेथील शिक्षकांच्या तोंडचे पाठ जसेच्या तसे मुखोद्गत हे म्हणून दाखवीत व अभिमानानें सांगत, गुरुजींनीं दिलेलें ज्ञान सव्याज परत करावयाची जबाबदारी शिरावर आहे.

ही सगळी तयारी मनामध्यें ध्येय ठरवून लहानपणापासून ह्यांनीं सुरू केली होती. प्रत्येक गोष्ट पाहिली, वाचली अगर अनुभवली तरी त्याचा उपयोग आपल्या ध्येयास म्हणजे स्वराज्य-प्राप्तीस कसा होईल हें चिंतन सदोदित ह्यांच्या मनामध्यें सुरू असे. आपला ध्येयवाद पूर्ण होण्यास अगर नुसती वाटचाल करण्यासहि चौफेर ज्ञानाची जरुरी आहे याची जाणीव ह्यांना लहानपणापासून झालेली होती. त्यामुळें परीक्षेच्या अभ्यासापेक्षां आवतींभोंवतीच्या सार्वजनिक ज्ञानाकडेच ( General knowledge ) त्यांच्या मनाची ओढ अधिक होती. परीक्षेमध्यें पास होण्याकरितां विद्यार्थ्याला जें सांभाळावें लागतें त्याकडे ह्यांचें पूर्ण दुर्लक्षच असें. मात्र घेतलेलें ज्ञान मग तें वर्गांतील असो अगर कोणापासूनहि मिळालेलें असो, त्याची पकड ह्यांच्या चित्तांतून कायम असे, आणि यामुळेंच ते शिक्षक झाले.

१९१४ सालीं बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर कलकत्त्याला पोस्टामध्यें बड्या अधिकाराची सरकारी नोकरी मिळवून देतों असें माझ्या मामंजींनीं ह्यांना एक दिवस अचानक सांगितलें. 'सरकारी नोकरी' हे शब्द एकतांच ह्यांनीं मामंजींना निक्षून पण सौम्य शब्दांत उत्तर दिलें, " आजच मला सरकारी नोकरीच्या दाव्याला कशाकरितां बांधतां ? मला अद्याप पुढें शिकण्याची इच्छा आहे." येथूनच सुखाचे व वैभवाचे पाश तोडण्यास ह्यांची सुरुवात झाली असें म्हटलें तरी चालेल. पिता-पुत्राच्या विचारें कायद्याचा

अभ्यास ह्यापुढें दोन तीन वर्षें करावा व नंतर वऱ्हाडमध्यें वाकिलीच्या धंद्यास सुरुवात करावी असें तात्पुतें तरी ठरलें.

ह्यांनीं कुठूनहि ज्ञानाचा कण मिळाला तरी संग्रह केला होता. हे गमतीनें सांगत, " मी मुंबईस असतांना शनवारीं दुपारीं शाळेंतून आल्यावर जेवण करून आमच्या घरच्या लायब्ररींत (तात्यांच्याकडे) बसावयाचा तो संध्याकाळीं ६ पर्यंत पुस्तकांचें वाचन माझें सुरु असे. फिरावयास जाण्यासाठीं मित्राची हांक ऐकली कीं दाराची कडी काढून मी बाहेर येई. "

माझ्या मामंजींना पुस्तकें विकत घेऊन त्यांचा संग्रह करण्याची मोठी हौस. त्यामुळें कोणतेंहि नवीन पुस्तक छापलें गेलें, मग तें शास्त्रीय का असेना, मामंजी विकत घेतल्यावांचून कधींच राहात नसत. त्या सर्व पुस्तकांचा परामर्श सर्वांमध्यें जास्त ह्यांनींच घेतला असेल. विद्याव्यासंगी होण्याचें जणू व्यसनच ह्यांना लागलें. ह्याचें कारण ह्यांची स्वतःची प्रकृति फारशी सुदृढ नव्हती हेंहि असावें. व्यायामाची ह्यांना विशेष आवड कधींच नव्हती व एक तऱ्हेचा व्यायाम सतत ह्यांच्या आयुष्याला भावला नाहीं आणि झेपलाहि नाहीं.

१९१५ सालीं फेब्रुवारींत लग्न झाल्यानंतर हे वकिलीच्या अभ्यासासाठीं नागपूरला गेले व माझी पहिली खेप सासरची झाल्यावर पुण्यास मी आलें व माझ्या रीतसर अभ्यासास सुरुवात झाली. हे वकिलीची परीक्षा पास होईपर्यंत माझें शिक्षण पुढें सुरू राहावें अशी योजना मामंजींनीं आंखली होती. म्हणून माझा अभ्यासक्रम माझे वडिलांकडे राहून पुढें सुरू झाला होता.

आमची दोघांची प्रत्यक्ष भेट होण्याच्या आधीं पांच-सहा महिने तरी पत्ररूपानेंच आमच्या भेटी-गांठी होत असत. त्यांच्या पुढें त्यांनीं एक ध्येय मनामध्यें धरलेलें होतें. त्या ध्येयाप्रत पोचण्यास कठीण जाऊं नये, झाल्यास थोडी मदतच व्हावी या हेतूनेंच त्यांनीं लग्न केलें होतें. मी मात्र कोणताच ध्येयवाद नसलेली मुलगी लग्न करीत होतें. माझ्या ध्येयाचा पूर्णविराम इथंच झालेला होता. या ध्येयाभोंवतींच म्हणजेच यांच्याभोंवतीं मी आतां प्रदक्षिणा घालणार होतें. थोडेंफार माझ्याबद्दल मला जी अंधुक कल्पना आवडत

होती, ती म्हणजे आपण एका विद्वान् गृहस्थाची बायको म्हणून समाजात वावरावें व पतीपासून घेतलेल्या ज्ञानाकरवीं कांहींतरी घडल्यास जनसेवा करावी. विशेष स्वतंत्र असा मला ध्येयवादहि नव्हता व माझी वाटचालहि स्वतंत्र अशी असण्याचें कारण नव्हतें. मात्र एकच ध्येयवाद मीं हृदयाशीं घट्ट धरलेला होता, तो म्हणजे माझ्यामुळें पति अगर कोणीहि आप्तइष्ट यांची कोणत्याहि प्रकारें अडचण (कुचंबणा) होता कामा नये. पत्नीच्या पाशामुळें 'मला अमकी गोष्ट करतां आली नाहीं' अशी म्हणण्याची वेळ आयुष्यांत येऊं द्यावयाची नाहीं, अशी माझी खंबीर वृत्ति लग्नापासूनच असल्यामुळें सहसा ह्यांना मजपासून त्रास झाला नाहीं, असं मला तरी वाटतें.

हे मात्र मला पाठविलेल्या पहिल्या पत्रापासून हलकें हलकें पण निश्चयानें माझ्या मनोवृत्तीच्या अंदाज घेत होते, व कुशल कारागिराप्रमाणें माझ्या ओल्या मातीला ठळक असा आकार देत होते, हें निश्चित.

पहिलें पत्र मला लग्नानंतर दोन महिन्यांनीं आलें असेल. त्यांतला महत्त्वाचा मजकूर त्यांच्याच शब्दांत मी खालीं देत आहें. "ती. अक्काचे पत्रांत व तात्यांच्या पत्रांत जे तुझ्याबद्दल चार शब्द होते ते वाचून आनंद झाला. डॉ. सोहोनी यांनीं केलेलें तुझें स्वभाववर्णन जर खरोखर तसेंच असेल तर आपलें भावी आयुष्य आनंदांत जाईल असें वाटतें. आपल्या एकमेकांविषयींच्या मनोवृत्ति औत्सुक्यांतून आदरांत, आदरांतून स्नेहांत क्रमाक्रमानें वाढत जाऊन शेवटीं प्रेमांत विराम पावोत असें इच्छितों व दोघांचेंहि आयुष्य सत्कारणीं खर्ची पडो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतों."

हें पहिलें पत्र माझ्या हातीं पडतांच मला आनंद तर झालाच, पण हें पत्र वाचल्यावर त्यांतील गोड आणि भरीव मथितार्थ माझ्या अल्प मतीस समजला नाहीं. त्यामुळें माझें मन कोणत्या स्थितींत त्या वेळीं होतें हें मला अजूनहि सांगतां येत नाहीं. कांहींसं बरं, पण तितकसं बरं नाहीं; अशी गोंधळाची मनोवृत्ति त्या वेळीं झाली, पण माझ्या मनानें मीं विचार केला, कांहीं दिवसांनीं आपण ह्यांचा स्वभावधर्म जाणूं शकूं व स्वभावाची मोड हलके हलके उलगडूं.

पत्राला मीं उत्तर टाकलें.

आठ एक दिवसांत मला त्यांच्याकडून दुसरेंहि पत्र आलें. त्यांत कांहीं प्रश्न त्यांनीं मला विचारले होते. ते जसेच्या तसे मी खालीं देत आहें.

१ तूं कोणत्या परिस्थितींत वाढली आहेस ?

२ तुझ्या महत्त्वाकांक्षा कोणत्या प्रकारच्या आहेत ?

३ तुझ्या मनाजोगतं स्थळं मिळालं तर तुला विशेष काय शिकण्याची हौस होती ? त्याप्रमाणें आयुष्यांत काय करण्याचें ठरविलें आहेस ?

४ तुला जमलं तर—संधि मिळाली तर काय व किती शिकण्याची तुझी इच्छा आहे.

५ आयुष्यांत तुला काय करावेसें वाटतें. तुझा संसार कोणत्या स्वरूपाचा असावा अशी तुझी इच्छा आहे ?

६ कोणत्या गुणाची तुला आवड आहे व तो किती प्रमाणांत अंगीं आणण्याचा तूं प्रयत्न केला आहेस ?

'आपली इच्छा तीच माझी इच्छा' असें ढोबळ उत्तर मला मिळूं नये अशी माझी अपेक्षा आहे. मोकळेपणानें उत्तरें लिहिलींस तर मला बरें वाटेल. माझी महत्त्वाकांक्षा अशी आहे कीं, तुझा माझा संसार हा दुसऱ्यांना नमुनेदार व्हावा. आपलें प्रेम, परस्परांवरचा भरवंसा, एकमेकांविषयींचा आदर या गोष्टींमध्यें तरी पौराणिक काळच्या राम-सीतेला, सावित्री-सत्यवानाला, तारामती-हरिश्चंद्राला आपण हार जातां कामा नये.

तुझे विचार, इच्छा व महत्त्वाकांक्षा कळल्यावर मीहि माझे विचार तुला कळवीन. नंतर दोघांच्या विचारानें आपण आपलें ध्येय ठरवूं. अशा अर्थाचें हें पत्र मला मिळतांच मी अगदीं दिङ्मूढ झालें. यांपैकीं एकाहि प्रश्नाचा विचार निश्चित स्वरूपांत मीं कधींच केलेला नव्हता. कांहीं कल्पना त्या लहान वयांत डोक्यांत आल्या असतील व उडूनहि गेल्या असतील, त्यांची निश्चितता माझ्या डोक्यांत चिकटलेली नव्हती. त्यामुळें उत्तर काय लिहावें ? याचा विचार पक्के दोन दिवस करूनहि मला सुचेना. पण मनाची ओढ उत्तर टाकण्याकडे असल्यामुळें हातांत टाक घेऊन पत्राचें उत्तर लिहिण्यास बसलें.

"मी कोणत्या परिस्थितींत वाढलें, याचें उत्तर तुलनात्मक असल्यामुळें मला देणें जरा कठीण जात आहे. दुसऱ्याच्या परिस्थितीशीं आपली परिस्थिति

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३२०६९ क्रं: ४२
क्रमांक 9030 नों: दिं: २५४६२

ताडून पाहण्याची संधि मला मिळाली नाहीं. तरी पण माझ्या वडिलांनीं सुस्थितींत मला वाढवलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. दादांनीं माझी कोणतीहि मागणी पुरविली आहे, पण दादा म्हणतात, ' तूं माझ्या परीस्थितीचा विचार करूनच सदा वागत असतेस. ' माझे वडील करारी व रागीट असल्यामुळें मनोविकारांचें संयमन करण्याची संवय आम्हां सर्वांना आहे. त्यामुळें मलाहि मनाचें संयमन करून आपला हेका असा कोणताच चालविण्याची संवय नाहीं असें मला वाटत आहे. पण याचाहि पडताळा दुसऱ्या व्यक्तीकडूनच अजमावला तरच तो खरा असणार. माझी मनाची धरत अशी आहे कीं, कोणत्याहि परिस्थितींत मी ( लग्नानंतर ) पडलें तरी पति हेंच संसारांतील दैवत होय व पतीचें समाधान हाच माझा आनंद व ध्येय होय.

माझी महत्त्वाकांक्षा श्रीमंतीपेक्षां शिक्षणाकडे जास्त होती व ती पुरली असें मी समजतें. पति सुशिक्षित मिळाल्यामुळें माझें मॅट्रिकपर्यंत चालू असलेलें शिक्षण तरी व्हावें असें मला वाटतें. कारण त्याचा उपयोग पतीच्या कार्यांत सहभागी होण्यास सुलभता आणून देईल.

माझ्या सासरच्या मंडळींना माझ्यापासून सुख व आनंद मिळावा व मला त्यांच्याकडून भलेपणा यावा ही इच्छा जवळ जवळ माझें ध्येय म्हटली तरी चालेल.

माझा संसार फार जुन्या चालीचाहि नसावा व फार सुधारकीहि नसावा; म्हणजे दोन्हींहि माणसांना माझें घर आवडावें. त्याकरितांच गृहस्थाश्रम आहे नाहीं का ?

पतीचें शिक्षण व माझें शिक्षण याचा कांहीं तरी लोकांना उपयोग झाला पाहिजे, पण त्याबद्दल ठाम अशा तऱ्हेची कल्पना अद्याप मला नाहीं. "

हें पत्र ह्यांच्या हातीं पडतांच त्यांनीं ताबडतोबच त्याचें उत्तर टाकलें. त्यांतील थोडासा गोषवारा खालीं देत आहें. या पत्रांत ह्यांना मला खास म्हणून सांगावयाचें सांगून टाकलें आहे—

" कोणत्याहि जमिनींत नवीन झाडाची लागवड करावयाच्या अगोदर त्या जमिनीची तपासणी करून त्या झाडाच्या लागवडीस ती योग्य आहे कीं नाहीं

हें पाहावें लागतें, नाहींतर चीं फुकट जाऊन श्रम व्यर्थ होतात. जी गोष्ट साध्या जमिनीची तीच मनोभूमिकेची.

तुझे विचार कळून न घेतां मीं माझे विचार कळविले असते, तर ते लादल्याप्रमाणें झाले असते. तसें करण्याची माझी इच्छा नव्हती.

तुझे माझे विचार इतके तंतोतंत जुळतात कीं, माझ्या आयुष्याची मला आतां कसलीच काळजी वाटत नाहीं.

तुझ्यामध्यें असलेल्या गुणांची जोपासना केलीस म्हणजे मला दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीची तुजकडून अपेक्षा नाहीं.

माझे विचार मीं आतां स्पष्ट रीतीनें कळविण्याचें ठरविलें आहे. मी माझे स्वतःकरतां नसून कुटुंबाकरितां व देशाकरितां आहे, असें मी समजतों. कुटुंबाची फारशी आर्थिक जबाबदारी माझ्यावर नाहीं. त्यामुळें तसा मी मोकळा आहें. तात्या व माझीं भावंडें यांना सुख देणें हें माझ्या ध्येयांत आहेच, पण त्याहीपेक्षां देशाकरितां कांहींतरी करावें, असा माझा संकल्प आहे. रोजचा पुष्कळसा काळ देशाकरितां मला काय करतां येईल असा विचार मी करीत असतों. त्यामध्यें मला जमेल असा आणि आवडीचा उद्योग शिक्षणमार्गें देशसेवा हाच दिसतो. मला नेहमीं असें वाटतें कीं, न्यू इंग्लिश स्कूल किंवा अशाच प्रकारच्या शाळेंत लाईफ मेंबर होऊन शिक्षकाचें काम आजन्म करावें. पुढील मुलांना जें शिक्षण द्यावयाचें तें नुसतें पुस्तकी नसून त्यांपासून मुलें कर्तृत्ववान् निघालीं पाहिजेत. ‘ देशाची गुलामगिरी व त्यावर उपाय ’ मुलांच्या विचारांत या विचारें क्रांति अवश्य करावयास पाहिजे.

हें सगळें, शिक्षक या नात्यानें करावयाचें म्हणजे अशा शाळांतून मिळणारें वेतन जेमतेम संसारापुरतेंच असणार, पण त्याबरोबर देशसेवेचें पुण्य व त्यापासून होणारें समाधान हें प्राप्त होणार व तें अमूल्य आहे नाहीं का ? मी बी. ए. झाल्याबरोबरच शिक्षकाच्या व्यवसायांत पडणार होतों, पण मी सरकारी नोकरी करणार नाहीं हें पाहून तात्यांनीं एल्एल्. बी. होण्याची तीव्र इच्छा माझ्यापुढें मांडली. तात्यांना दुखवणें योग्य नव्हतें

म्हणून मी वकिलीचा अभ्यास करीत आहें. यांत यश आल्यास पुढें पाहूं काय करतां येईल तें! पण वकिलींत जर अपयश आलें तर मात्र दुसरीकडे कोठें नोकरी न करतां एखाद्या शाळेलाच वाहून घेण्याचा माझा मानस आहे. हे सगळे नुसते बेत आहेत. कृति होईल तेव्हां खरी. संकल्पांची वाच्यता कोठेंहि करूं नये. पण सहधर्मचारिणीस मनांतील विचार कळविणें हें माझें कर्तव्यच ठरतें. माझें ध्येय साध्य करण्याकरितां मी प्रयत्न करीनच. पण मी जर कधीं कर्तव्यपराङ्मुख झालों तर तूं मला कर्तव्याची जाणीव अवश्य करून देत जा.

तुला मॅट्रिक करावें अशी माझीहि इच्छा आहे. आपल्या संसारांत तूं आपल्या शिक्षणाचा उपयोग स्त्री-शिक्षणाच्या कामीं करावा अशी माझी फार इच्छा आहे.

एकदा ध्येयनिष्ठ आयुष्य म्हटलें कीं, जगांतून त्या माणसास उठावेंच लागतें व जगापासून दुरून दुरून चालावें लागतें. असा ध्येयनिष्ठ मनुष्य म्हणजे आगगाडीचें एंजीनच होय. कोळसा व पाणी हेच त्याचे खरे मित्र होत. अशाहि परिस्थितींत स्वतःची पत्नी आपणांबरोबर सहभागी असेल तर आयुष्याची गाडी सहज रितीनें नेतां येईल."

अशा रीतीनें पत्राचा शेवट करून त्यांनीं आपलें पत्र संपविलें होतें.

या पत्रानंतर ताबडतोब 'हो ला हो' या न्यायानें मीं उत्तरहि रवाना केलें, पण या पत्रानें माझ्या मनांत निराळी खळबळ करून माझ्या आयुष्याचा मार्ग माझ्या डोळ्यापुढें स्पष्ट झाला.

१९१५ सालच्या एप्रिलमध्यें फर्स्ट एल्एल्. बी. ची ह्यांनीं परीक्षा दिली. जून-जुलैमध्यें रिझल्ट लागला. या परीक्षेमध्यें हे अयशस्वी झाल्यामुळें यांचें मन बरेंच खट्टू झालें होतें; आणि मनाच्या ठरलेल्या ध्येयाप्रमाणें एल्एल्. बी. ची आशा सोडून शिक्षकाचा पेशा पत्करावा अशा तऱ्हेची विचारसरणी मामंजींच्यापुढें ह्यांनीं मांडली. मामंजींनीं ह्यांच्या विचारास संमति दिली नाहीं. 'पुढल्या वर्षीं परीक्षेला बसावें अशी माझी तीव्र इच्छा आहे. अर्थात् पुन्हा परीक्षा म्हणजे एक वर्ष तुला थांबावयास लागतें,

पण त्याला इलाज नाहीं. हें एक वर्ष अक्कापाशीं अक्कलकोटला राहून अभ्यास पुरा करावा असं मला वाटतें' असे विचार मामंजींनीं पत्रांतून व्यक्त केले. वऱ्हाडमधील परीक्षा त्या वेळीं मुंबईसारख्या सहा सहा महिन्यांनीं नव्हत्या. त्यामुळें एक वर्ष असेंच कुठें तरी काढून अभ्यास करणें ह्यांना प्राप्त होतें.

कर्मधर्मसंयोगानें अक्कलकोटच्या ए. व्ही. स्कूलचे हेडमास्तर एल्‌एल्. बी. चीच परीक्षा पास होऊन आपल्या स्वतःच्या गांवीं जाणार होते. त्यामुळें ती जागा वाढून ठेवल्यासारखी ह्यांना मिळाली व कुठल्यातरी मुलांचे हे रीतसर शिक्षक झाले. हेडमास्तरची ती जागा असल्यामुळें बऱ्याचशा गोष्टी शाळे-मध्यें आपल्या मनाप्रमाणें करतां येतील म्हणून ह्यांना समाधान झालें.

लग्न केलेल्या माणसांनीं कांहींहि न करतां रिकामें राहणें व आपल्या आर्थिक जबाबदाऱ्या दुसऱ्यांवर टाकणें ही गोष्ट मला व ह्यांना त्रासदायकच झाली असती, पण ईश्वरानेंच तें गाऱ्हाणें ऐकलें. त्या गाऱ्हाण्यांतूनच नवीन गाणें यांच्या पत्रांत सुरू झालें तें म्हणजे " माझे जेवणाचे हाल होतात, मला करमतहि नाहीं, तरी तूं अक्कलकोटास यावें असें मला वाटतें." तब्येत बरोबर राहात नाहीं वगैरे मजकुराचीं पत्रें माझ्या हातीं वारंवार आल्यामुळें मी माझ्या शिक्षणास पूर्णविराम करून अक्कलकोटला गेलें.

सोनं मोजण्याचा कांटा त्याचा मधला लंबक अगदीं बरोबर राहतो व आपलें काम बरोबर करीत असतो. वजन करावयास घातलेली वस्तु सोनं आहे का कापूर आहे त्याची पर्वा तो काटा करीत नाहीं व त्याची दृष्टि स्वतःचा बॅलन्स न जाऊं देण्याकडे असते त्याचप्रमाणें ह्यांची वृत्ति होती.

अक्कलकोटच्या एक वर्षाच्या नूतन मांडलेल्या संसारांत आम्ही दोघें रुळूं लागलों. ह्यांच्या बोलण्यांतून वारंवार मला प्रतीत होऊं लागलें कीं, ह्यांची देशप्रीति जाज्वल्य अशी आहे. ही कोंडलेली वाफ केव्हां तरी आपला पराक्रम दाखवून ह्यांच्या इच्छित ठिकाणीं म्हणजे शिक्षकाच्या पेशांत विलीन होणार.

अक्कलकोटच्या शाळेंत अतिशय मन घालून ते काम करीत असल्यामुळें ए. व्ही. स्कूलचें हायस्कूल यांच्याच कारकीर्दींत झालें आणि इतकेंच नव्हें

तर त्या वेळचे अक्कलकोटचे राजेसाहेब हे पगारांत भरपूर वाढ करून ह्यांना हेडमास्तरच्या जागेवर कायम करीत होते, परंतु त्या सालीं नागपूर युनिव्हर्सिटीची फर्स्ट एल्‌एल्. बी.ची परीक्षा ते पास झाले व नागपूरला पुढील अभ्यासाकरितां जाणें त्यांना प्राप्तच झालें. हे फर्स्ट एल्‌एल्. बी. पास झाल्यामुळें घरांतील सर्व मंडळी अतिशय आनंदांत होती. त्या आनंदाच्या भरांत "काय वकिलीणबाई, नागपूरला कधीं बिऱ्हाड होणार" असे प्रश्न मला विचारले जात. मलाहि उत्तर देतांना त्या वेळेला आनंद होत असे. मनांत मात्र मी म्हणें, हे जरी वकिलीची परीक्षा पास झाले तरीहि ह्यांच्या मनांतील शिक्षणाचा हेतु शिक्षक होऊनच पुरा करणार. त्याच वेळेला अमळनेरसारख्या त्यागाच्या भूमींतून चालविलेल्या शाळा ह्यांच्या डोळ्यापुढें होत्या. अशा शाळांचीं रसभरीत वर्णनें मी पुष्कळ वेळां ह्यांच्या तोंडून ऐकत होतें.

ह्यांचें आवडतें पुस्तक नित्य उशागती पायगती पडलेलें असें तें म्हणजे खाडिलकरांचें 'कीचक वध' नाटक. विद्याहरण, सत्त्वपरीक्षा, त्यांतीलहि उतारे ह्यांचे तोंडपाठ असत व त्यांतील मर्मस्थानें, संधि येईल तेव्हां हे मला समजावून सांगत.

हरिश्चंद्राची भूमिका, स्वप्नांत दिलेलें दान, स्वप्नांत दिलेला शब्द पुरा करण्याकरितां भोगलेल्या अनन्वित यातना मला वारंवार सांगत. स्वप्नांत दिलेला शब्द कांहीं माणसं जेव्हां पाळतात व भारताचा आदर्श म्हणून जेव्हां आपण त्याकडे पाहतों त्या वेळेला जागेपणीं दिलेला शब्द सचोटीनें पाळण्याची माणसास इच्छा होते. अशा तऱ्हेचे दाखले वेळ येईल तेव्हां त्यांच्याकडून मला सांगितले जात असत.

"मी कायद्याचा अभ्यास करीन. कायदा व इतिहास हे माझे आवडते विषय आहेत, पण वकिलीचा धंदा करण्यास कृपा करून मला लावूं नका" असें हे बहीणभावंडांना व माझ्यापुढें नेहमीं म्हणत. मामंजीच्यापुढें या बाबतींत बोलावयाचें नाहीं असें ठरविलें असल्यामुळें हे सेकंड एल्‌एल्. बी.चा अभ्यास करण्याकरितां नागपूरला निघून गेले. पुढें सेकंड एल्‌एल्. बी.चा

अभ्यास झाल्यावर अमळनेरच्या शाळेंत—ह्यांना हव्या असलेल्या शाळेंत–सहा महिन्यांकरितां नोकरी मिळाली.

स्वराज्यप्रातीकरितां शिक्षकाचा धंदा ह्यांनीं पसंत केला होता, पण त्यांतहि त्यांना खटके कीं, मी सरकारी नोकरीचे लोकच तयार करीत आहें. किती झालें तरी या निमसरकारी शाळेंतून मोकळें वातावरण शिक्षकाला कोठून मिळणार ? व स्वराज्यप्रातीला हवे तसे उपयोगीं पडणारे विद्यार्थी आपण कसे तयार करणार ? पण ह्यांना हवा तसा योगायोग अचूक चालून आला. १९२१ सालीं महात्मा गांधींच्या असहयोगाच्या चळवळीनें ह्यांना पाहिजे तसें राष्ट्रीय शाळेचें क्षेत्र मिळालें.

सेकंड एल्एल्. बी.चा अभ्यास करण्याकरितां हे नागपूरला गेले त्या वेळीं माझ्या राहण्याचा एक मोठाच प्रश्न आमच्या घरांतील मंडळींपुढें निर्माण झाला. त्यांच्याबरोबर मला नागपुरला जाणें शक्यच नव्हतें, कारण ते रेसिडेन्सींत राहात होते. मला सासूबाई नसल्यामुळें स्थिर असें राहण्याचें ठिकाण नव्हतें. कारण आमचे मामंजी नाशकास एक ब्राह्मण ठेवून राहात असत. आम्हां सुनांना एकट्या अशा स्वतःजवळ फार दिवस ठेवून घेण्याच्या ते विरुद्ध असल्यामुळें पुन्हा शिक्षण घेण्याकरितां हुजुरपागेंत जावें असाहि विचार घरामध्यें प्रकट केला गेला. मीं हुजुरपागेंत जाण्यास त्यांच्याजवळ साफ नकार दिला व सुखवस्तु एक वर्ष माहेरीं राहणेंहि मला प्रशस्त वाटेना. तेव्हां लहानपणापासून डोक्यांत बसलेल्या एका विषयानें उचल खाल्ली व मी बाळंतपणाचें काम शिकतें असें ह्यांना आर्जवून सांगितलें.

नर्सिंगच्या कोर्सबद्दल तितकीशी आपुलकी त्या काळच्या लोकांत नव्हती, पण ह्यांनीं मामंजींना समजावून सांगून त्यांची संमति माझ्या मिडवाइफरीच्या कोर्सला मिळविली व त्यांनींहि आनंदानें दिली. त्या वेळच्या त्या शिक्षणाचा खर्च म्हटला तर किती थोडा होता. त्याची कल्पनाच करतां येणार नाहीं. त्या वेळीं अवघे दरमहा बारा रुपये सेवासदनला द्यावे लागत असत.

मीं सेवासदनमार्फत मिडवाइफरीच्या कोर्सकरितां ससून हॉस्पिटलमध्यें जाऊं लागलें. कै. वहिनीसाहेब रानडे व असिस्टंट सिव्हिल सर्जन कै. तात्या-

साहेब शिखरे ह्यांच्या आपुलकीच्या वागणुकीनें मला तो कोर्स पुरा करतां आला.

माझें माहेर पुण्यासच असल्यामुळें व दादांचें विशेष तऱ्हेनें माझ्या शिक्षणावर लक्ष असल्यामुळें कोणत्याहि तऱ्हेची उणीव न पडतां १९१८ सालीं मिडवाइफरीची परीक्षा मी पास झालें

या दोन वर्षांच्या केलेल्या संसारांतून आम्ही दोघं खरीं कशीं कशीं आहों ( गुणदोषांनीं ), हें एकमेकांस समजून चुकलों होतों. माझें चाललें असतें तर मीं त्यांना त्यांच्या ध्येयापासून दूर करण्याचा प्रयत्न केला असता, नव्हे थोडा फार केलाहि असेल; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आमच्या दोघांच्या संभाषणांत एकच मुद्दा असे कीं, या ध्येयाच्या मागें आपण लागलांत म्हणजे सर्व तऱ्हेचा त्रासच आपल्याला जन्मभर भोगावा लागणार. मग तुम्ही सुखी आयुष्यक्रम कधीं भोगणार याचें मला वाईट वाटतें. येवढेंच मी त्यांना पुन्हा पुन्हा सांगें.

माझ्या या प्रेमळ विचाराचें स्वागत करून हे म्हणत, "अग, सुख हें आधीं मानीव असतें व मिळायचें तरच तें मिळतें. माणसाच्या समाधानी वृत्तींत खरें सुख आहे, असं मी तरी समजतों; आणि मी तुला विचारतों, तूं म्हणतेस त्याप्रमाणें सर्व लोक सुखाच्या नी स्वास्थ्याच्या पाठीमागें लागले तर कसें होईल ? देशाची गुलामगिरी कधीं संपणार आहे का ? मी संपवीन असें मी म्हणत नाहीं, पण तसें ध्येय ठेवण्यास काय हरकत आहे ! मी इतरांसारखाच वागलों तर माझे आजवरचे विचार गेले कोठें ? ते विचार माझ्या हाडीमांसीं भिनले आहेत. ते कोटासारखे काढून खुंटीवर मला कसे ठेवतां येतील सांग बरें ? अग, तुम्ही बायका त्रिरात्रीचें व्रत करतां, त्यांत काय कष्ट कमी असतात ! आवतींभोंवतीं पोटभर जेवणारीं खूप माणसं दिसतात, म्हणून तुमचं मन फिरतं कां ? नाहीं. त्यांतहि एक प्रकारचा आनंद असतो व तो माणसास मिळतोच." अशा अर्थाचें कांहींतरी बोलून मला गप्प करीत व मृदु आवाजांत म्हणत, "तुझ्या हातीं सर्व आहे. तुला विचारल्यावांचून मी कोणताच निर्णय आयुष्यांत घेणार नाहीं, मग तर झालें; आणि तुला गाणें

म्हण म्हणतांच सर्वांच्या देखत कोणतें पहिलें गाणें म्हटलेंस त्याची आठवण कर. तें मी तुला वारंवार म्हणायला सांगतों तें त्याच्या अर्थाकरितांच, स्वर-नादाकरितां नाहीं."

असें घडलें खरें. मीं प्रथम जें गाणें म्हटलें तें अगदीं नाटकांत घडवून आणावें तसेंच झालें. मला त्यांचे विचार त्या वेळीं कांहीं ठाऊक देखील नव्हते.

" महिवरी पुढें मिळवूं गडे नामा
अभंग सेवा तीची करूं ग। अभंग सेवा तिची करूं ॥ ध्रु० ॥
नय पथ वरोनी। दृढ मन करोनि। प्रभु पद धरोनी। क्रमूं चला।
स्वार्थ सोडूं पुढती सगळ्या देशकार्यासि लागूं या।
वैभवाला तुच्छ मानूं 'चकित' सर्वांतें करूं या।
म्हणूनि, झटुनि, श्रमुनि, महीवरी पुढें।"

हें गाणं ऐकल्यावर लगेच हे हसत म्हणाले, " बाकी सगळं ठीक आहे. पण 'चकीत' करण्याकरितां हा शब्द बदललास तर हें गाणं अधिक गोड वाटेल."

या एक दोन वर्षांत माझा कविता करण्याचा नाद वाढीस लागला होता. कविता कसली? शब्दपंक्ति जुळविणें सुरू होतं म्हटलं तरी चालेल. गंमत म्हणून सांगते. एक चातुर्मास—नित्य एक नवी कविता लहान का होईना कोणत्याहि विषयावरची त्यांना रोज करून द्यायची हा नियम मीं केला होता. नियम म्हटला कीं, किती तरी अडथळे येतात. नाहीं नाहीं त्या अडचणी उत्पन्न होतात. पण माझा तो नियम पुरा झाला. तो नियम पुरा व्हायलासुद्धां त्यांची मला पूर्ण मदत होती. रोजच्या जुळविलेल्या पंक्तींचें कौतुक करून मला वेळोवेळीं हे प्रोत्साहन देत असत.

त्या वेळच्या दसऱ्याच्या दिवशीं सासुरवासिणीचा सर्व दिवस कामांतच गेला होता. पण हे बाहेरून फिरून यायच्या आधीं, वन्संनींसुद्धां मला आठवण केली आणि म्हटलें, " राधा, कर कीं कांहीं तरी चार ओळी म्हणजे आजची कविताहि होईल." मींहि चार ओळी जुळविल्या व तो लिहिलेल्या कागद त्यांना बाहेरून आल्याबरोबर ओवळतांना त्यांच्या

हातांत दिला. त्यांनीं दोन रुपये माझ्या तबकांत टाकले. माझे धाकटे दीर हेहि बाहेरून फिरून आले होते; त्यांनीं लगबग करून घरांत प्रवेश मिळविला व म्हणाले तुझा दीर मिळविता झाला म्हणजे ओवाळ. घरांत आल्यावर कविता मनाशीं वाचली, व तूं चालीवर म्हणून दाखव असा आग्रह धरला. बन्संनींहि दुजोरा दिल्यामुळें त्या वेळीं मीं ती कविता म्हणून दाखविली. त्या ह्या चार ओळी—

दसरा-पानें घाला दोन ॥ ध्रु० ॥
सोनें नलगे मोतीं नलगे
पानें मजला होन ॥ १ ॥
सहवासांतुनि आपण कळलों
आपण आहों कोण ॥ २ ॥
आपस्याचीं तीं भिन्नहि पानें
जुळतीं डेखीं दोन ॥ ३ ॥
दोन विचारीं संगम जरिही
संस्कृति एकाचि खूण ॥ ४ ॥

दा. क्र.

हें गाणें मीं म्हणून दाखविल्यावर त्यांचा चेहरा सहजच विशेष प्रफुल्लित झाला. लवकर ओळी रचल्याबद्दल बन्संनीं माझ्या पाठीवरून हात फिरवला, पण माझे विचारी वंगमती भावजी एकदम उद्गारले, "वहिनी, तूं भावनेच्या आहारीं जाऊन आबाला शेफारून ठेवूं नकोस. तो तुझ्या हातचा जाईल व तो हवा तसा तुला वळवील."

रेशमाचा किडा आपल्या अंगापासून धागा काढून आपल्या शरीराभोंवतीं एक प्रकारचें कवच तयार करतो. त्याला अखेर कळतहि नाहीं कीं, आपण श्वास घेण्याससुद्धां जागा ठेवली नाहीं. चहूकडून रेशमाच्या तंतूंत बांधून घेतों. पण एक प्रकारचें सुरू केलेलें काम आपण पुरें केलें, याचा आनंद त्यास मिळत असावा.

जर कांहीं ह्यांची सेवा राष्ट्राच्या महत्कार्यांत एक थेंब जरी असेल तर तीच माझी शांति होय.

# १

पहिलीं दोन वर्षें ज्या वन्संचा सहवास मला घडला त्या वन्संचें लग्न वयाच्या आठव्या वर्षी झालें होतें. त्यांच्या सासऱ्यानें मुलगी चुटचुटीत पाहून मामंजींच्या जवळ आपणहून सून म्हणून मागणी केली होती. ते गृहस्थहि म्हणजे वन्संचे सांसरे प्रतिष्ठित सरकारी अधिकारी होते. वन्संचे पति हे त्या वेळचे एल्. सी. ई. झालेले इंजिनियर होते.

आवडीनें मागून केलेली सून तिच्या जन्माची राळ त्यांच्या सासूनें केली. स्त्री ही जितकी प्रेमळ तितकीच दुष्टहि असूं शकते, याचा पडताळा वन्संच्या चरित्रावरून मिळतो. वन्सं व त्यांचे पति लहानपणीं मोकळ्या मनानें एकमेकांशीं खेळलेलीं होतीं म्हणे. वन्संच्या सासूनीं व सासऱ्यानीं वन्संचे लाड प्रथम अतिशय केले व मोठ्या थाटांत ७ । ८ वर्षें वन्संना वागविलें, असें त्या सांगत असत. पण वन्सं वयांत आल्यावर मात्र सगळें पारडें उलटें झालें. त्यांचा सासरा सरळ मनुष्य होता—सासू मात्र भयंकर जहांबाज व नवऱ्याला आणि सर्व मुलांना मुठींत ठेवणारी होती. तिच्या पुढें घरांत कोणाचेंच चालत नसे म्हणे.

एक दिवस एकाएकीं वन्संना त्यांच्या माहेरीं पाठवून दिलें व पुनश्च आमच्याकडे पाठविण्याचा प्रयत्न करूं नये असेंहि कळविलें. माहेरीं पाठविण्याचें कारण वन्संच्या तोंडून कित्येक दिवस समजलें नव्हतें. अशा रीतीनें ४ ते ५ वर्षें गेल्यावर मामंजी स्वतः रदबदली करण्याकरितां वन्संच्या सासूसासऱ्यांकडे गेले. त्या वेळीं आम्ही मुलाचें दुसरें लग्न करणार आहोंत अशीं किरकोळ स्वरूपाचीं बोलणीं सासूकडून झालीं. अखेर दोन हजार रुपये देऊन मुलगी पाठवीत असाल तर वागवण्याचा प्रयत्न करतें, असें सासूनें स्पष्ट सांगितलें. सासऱ्यांनीं पैशांकरितां सासूच्या सुरांत सूर मिळविला.

पोटच्या गोळ्याचें प्रेम, अब्रूची कदर, यामुळें दोन हजार रुपये वन्संच्या बरोबर देऊन वन्संची पाठवणी मामंजींनीं त्या वेळीं केली.

पण दोन महिने पुरे झाले नाहींत तोंच वन्संबाई मामंजींच्याकडे परत आल्या. त्यांची आई घरांत असल्यामुळें त्यांचे त्या वेळचे दिवस सुखांत गेले. पुढें या मुलीचें कसें होणार ? या विचारानें मामंजींनीं त्यांना नर्सिंग कोर्स दिला व माझ्या सासूबाईंच्या देखतच त्या पासहि झाल्या. पुढें दोन एक वर्षांनीं सासूबाई गेल्या असाव्यात.

लहान भावंडांची, वडील बहीण या नात्यानीं वन्संना पुष्कळ काळजी वाहावी लागली.

स्वतःचं नर्सिंगचं काम सांभाळून साक्षी रूपानींच आमचे सगळ्यांचे संसार त्यांनीं मांडून दिले.

मला विशेष अशी जी गोष्ट वन्संच्याबद्दल नमूद करावयाची आहे ती म्हणजे कसल्याहि सांसारिक सुखाचा–आनंदाचा स्वतःला अनुभव मिळाला नसतांना भावांच्या संसारांत त्या आनंद मानीत व आम्हां भावजयांना कधीं ' अडचण ' अशा वाटल्या नाहींत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वतःच्या पतीबद्दल कधींहि अपशब्द आम्हां कोणापाशीं त्यांनीं काढला नाहीं. आम्ही कुणी त्यांचे भाऊ-भावजया त्यांच्या पतीला दोष देऊं लागलों तर त्यांनीं म्हणावें, " जाऊं दे ग. आपल्या नशिबीं नाहीं, दुसऱ्याला दोष कशाकरितां द्यावयाचा ? "

त्यांचे पति सुशिक्षित, प्रतिष्ठित सरकारी इंजिनियरच्या कामावर होते. वन्सं दरसाल संक्रातीला हलवा व तिळाच्या वड्या पाठवीत. पार्सल पोंचल्याचें सरळ पत्र येई. ती. सौ. वन्संना त्यांनीं कोणत्याहि प्रकारें दोष लावलाहि नाहीं व दिलाहि नाहीं. ' तुझ्याबद्दल मला उच्च प्रतीचा आदर आहे ' असें निर्लज्जासारखें पत्रांत लिहीत, ' पण मी तुझ्याबरोबर संसार करूं शकत नाहीं, ' हें तितकेंच स्पष्ट कळवीत. कारण माझी आई. मीं तसें आईला वचन दिलें आहे. वन्संची सासू वारल्यावर आम्हीं सर्व मंडळींनीं पुन्हा एकदा वन्संना तिकडे पाठविण्याचा प्रयत्न केला, पण कांहींहि डाळ

शिजली नाहीं. त्यांनीं दुसरें लग्न आई असतांनाच केलेलें होतें. त्या दुसऱ्या पत्नीला घेऊन सरकारी कामाकरतां अक्कलकोटास ते उभयतां आले होते. ते येणार हें कळतांच आमच्या वन्संची काय धांदल उडाली ! ह्यांना व मला वन्संनीं मुद्दाम पाठवून त्या दोघांनाहि जेवणाचें आमंत्रण देवविलें. तीं दोघेंहि पतिपत्नी जेवणास आमचेकडे आलीं होतीं. लहानपणच्या आठवणी काढून ह्यांना हें आवडतें, तें आवडतें, म्हणून कांहीं पदार्थ स्वतः वन्संनीं तयार केले होते. जेवणें झाल्यानंतर हे व वन्संचे यजमान बाहेरच्या हॉलमध्यें इकडच्या तिकडच्या गप्पा मारीत बसले. वन्संची सवत, मी व वन्सं घरांत बोलत असतांना मीं धारिष्ट करून प्रश्न टाकला, " आपणाला ही परिस्थिति ठीक वाटते का ? एका स्त्रीचा प्रपंच, संसाराचा नाश करणें हें वाईट नाहीं का ? हा दोष आपण कां घेतां ? दोघीहि संसार करा कीं ?" तेव्हां त्या बाईनें वन्संना समजावून सांगितलें, " मीं पहिलीं दोन वर्षें पुष्कळ प्रयत्न करून पाहिला, पण मी काय करूं ? माझें कांहीं चालत नाहीं." आमच्या तिघींच्याहि डोक्यांत निरनिराळे विचार थैमान घालीत होते, डोळे पाणावले होते, पण अश्रु खालीं पडूं देणें कोणत्याच दृष्टीनें युक्त नसल्यामुळें वरच्यावर कसे तरी जिरवले गेले.

जातांना त्या बाईनीं वन्संना नमस्कार करून निरोप घेतला. त्या गृहस्थानें मात्र 'येतो म्हणून सुद्धां' पत्नीच्या सच्छीलाचा आदर केला नाहीं.

एकंदरींत असंच जन्मभर चालून वन्सं सौभाग्यपणींच पतित्यक्ता म्हणूनच पतीच्या आधींच स्वर्गलोकीं गेल्या. मधल्या काळामध्यें माझ्या धाकट्या दिरानें रागारागानें एक पत्र त्यांच्या नवऱ्याला फिर्याद करतो म्हणून धाकाचें टाकलें होतें. त्या पत्राचें उत्तर म्हणजे पंचवीस रुपये दरमहा त्यांच्याकडून वन्संना अव्याहत मरेपर्यंत येत होते. या सर्व प्रकरणीं ती. सौ. वन्संनीं आपली वाणी अगर आपलं मन विकाराच्या स्वाधीन होऊं दिलं नाहीं. वयाच्या ६८ वर्षांपर्यंत स्वतःच्या पतीबद्दल एकहि वावगा शब्द त्यांनीं कधींहि व्यक्त केला नाहीं. तोंडांतून काढला नाहीं. त्यांनीं आपलें आयुष्य तपस्विनीसारखेंच घालविलें.

बाळंतपणाच्या निमित्तानें अक्कलकोटसारख्या संस्थानामध्यें पुष्कळ सद्गृहस्थांच्या घरीं वन्संना जावें लागलें असेल व या धंद्यानिमित्त डॉक्टर

लोकांशीं त्यांना बोलावेंहि लागलें असेल, पण जेवढ्यास तेवढें त्यांचें संभाषण पुरुष–वर्गाशीं होत असे. त्यांच्या तुसडेपणाबद्दल मीं त्यांना दोष दिला म्हणजे त्या सरळ सांगायच्या, "मला या लोकांशीं काय करावयाचें आहे. मी माझ्या पेशंटशीं मनमोकळी वागतेंच."

पुढें एकदा माझ्या मध्यमवयामध्यें एक दिवस त्यांना एकदा गाठून एक प्रश्न विचारण्याचें धाडस मीं केलें. तो प्रश्न म्हणजे तुमच्या "तारुण्यामध्यें कोणत्याहि पुरुषवर्गाकडून तुम्हांस कधीं त्रास पोचला नाहीं का?"

त्यांनीं एक मोठा श्वास सोडून उत्तर दिलें : "रामदासांच्या कृपाप्रसादानें माझ्यावर अशा तऱ्हेचे प्रसंग आलेहि नाहींत आणि त्यांतून मला थोडा जरी तशा तऱ्हेचा वास आला तरी मी अशा माणसांच्या वाऱ्यालासुद्धां पुन्हा गेलें नसेन, आणि त्यांनीं मला निश्चयी वाणीनें सांगितलें, 'अग राधा, स्त्री ही जितकी आपण अबला समजतों तितकी ती नसते. स्त्री ही आपलें रक्षण बहुतेक वेळां स्वतः करूं शकते. पण खरं बोलायचं म्हणजे स्त्रीचा स्वतःचाच निश्चय पाहिजे तितका दृढ व कडक तऱ्हेचा नसतो. लहानशा वाऱ्यांनीं तिचें मन हलूं शकतें, व त्याचा फायदा कोणीहि घेऊं शकतो. विस्तव ओलांडून जातांना जितकी तत्परता आपले ओचे पदर सांवरण्याची आपण घेतों तितकी तत्परता पुरुषांशीं वागतांना कोणत्याहि परिस्थितींत स्त्रीनें सांभाळली पाहिजे.'"

माझा मिडवाइफरीचा शॉर्ट कोर्स पुरा झाला त्याच संधानाला हे देखील नागपूरची टर्म संपवून पुण्यास आले होते. माझ्या मामंजींनींहि त्याच वेळीं नाशिकचें बिऱ्हाड मोडून पुण्यामध्यें एक वर्षभर बिऱ्हाड केलें होतें. आम्ही सगळी मंडळी वन्सं, भावजी, जावा, मुलें एकत्र अशीं महिना, दीड महिना पुण्यासच होतों. आमच्या सगळ्यांचे दिवस अगदीं मजेंत गेले.

मीं जसा मिडवाइफरीचा कोर्स घ्यायचं ठरवलं, पुण्यास अक्कलकोटहून शिक्षणासाठीं आलें तेव्हांपासून माझ्या वन्सं, माझ्या वडील जाऊबाई, दीर जरा माझ्याशीं तुटकपणानें वागूं लागल्याचें माझ्या लक्षांत आलें. मी पुण्यास शिकत असतांना या लोकांचीं पत्रंसुद्धां मला जशीं यावींत असं वाटत होतं तशीं येत नव्हतीं. जरा तुटक व वरपांगी वाटत.

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.

कदाचित् मीं हा कोर्स घेतला व याला मामंजींनीं व ह्यांनीं मनापासून लगेच परवानगी दिली ही गोष्ट आमच्या घरांतील इतर मंडळींना पसंत पडली नसावी. खरं पाहिलं तर माझं शिक्षण हें घरांतल्या माणसांना बोचणारं अगर न रुचणारं असं नव्हतंहि. पण कांहीं तरी निराळाच परिणाम या मंडळींच्यावर मला दिसत होता.

फर्ग्युसन कॉलेजमध्यें असलेले माझे धाकटे दीर हे मला कधीं कधीं हॉस्पिटलमध्यें भेटावयास येत. तेव्हां मीं मोकळेपणानें हा प्रश्न त्यांना विचारलाहि असेल. तेव्हां त्यांनीं मला थोडक्यांत सांगितलं, " आमचे तात्या, शिक्षण-वैभव-असं कांहीं दिसलं कीं, चटकन हो म्हणतात, पण आबानें तुला शिकायला घालतांना आमची कोणाची संमति तर घेतली नाहींच, पण आम्हांला माहिती म्हणून त्यांनीं एका कार्डांत फक्त लिहून कळवलं. ती. सौ. अक्का व सौ. वहिनी ह्यांनाहि घडलेली घटना, चटदिशीं घेतलेला निर्णय, पसंत झाला नाहीं. त्यामुळें तुला दिसतो तो तुटकपणा असावा. " हें ऐकल्यानंतर त्या दिवशीं मला अतिशय वाईट वाटलं व त्याच बरोबर मी घेत असलेल्या शिक्षणामुळें अशीच घरांतल्यांना दुरावत जाणार का अशी मनामध्यें भीति वाटूं लागली.

ही सर्व हकीकत मीं एका पत्रानें नागपूरला ह्यांना कळवली व पत्रांत काळजीहि व्यक्त केली. तेव्हां या विषयावर त्यांनीं माझें समाधान केलें. " घरामध्यें अप्रिय घडत असलेली घटना माझ्याहि नजरेंतून चुकली नाहीं. मलाहि पत्रं अशींच जरा त्रोटकच असतात.

आजपर्यंत मीं स्वतःकरितां कोणतीहि गोष्ट आग्रहानें अमलांत आणली नाहीं. या माझ्या भावंडांच्याकरतांच जें जें मला चांगलें करतां येईल, तें तें मी त्यांच्याशीं एकजीव होऊन करीत होतों. आतां मीं माझ्याकरितां आज स्वतंत्र अशी पहिल्यांदाच तुझ्या शिक्षणाची तात्यांजवळ मागणी केली. त्यांनींहि होय म्हटलं. त्यामुळें जरा न आवडणारा प्रकार माझ्या भावंडांना वाटला असावा.

मी खरं म्हणजे ती. सौ. अक्का व दादा ( माझे वडील दीर ) व सौ. वहिनी ह्यांना तुझ्या शिक्षणाबद्दल विचारायला पाहिजे होतें, पण मीं विचारलें नाहीं.

कारण मला पूर्ण माहीत होतें कसान् कसा तरी तुझ्या शिक्षणांत मोडता घातला गेला असता व आज जी वागणूक तुला मला मिळत आहे, त्यांत कांहीं फरक झाला नसता. विचारुन न ऐकणें हें मला पसंत नव्हतें, म्हणून फारसा विचार न करतां तात्यांच्या परवानगीनें तुझ्या शिक्षणास सुरुवात केली.

काळेकुट्ट ढग जरी आकाशांत सांचले व त्या काळोखी वातावरणामुळें जरी माणसास भीति वाटली तरी तो काळोख आणि तो ढग कायम स्वरूपाचा नसतो. निसर्गांत कांहीं तरी एकदम फरक होऊन आलेलें काहूर नाहींसें होतें. त्याचप्रमाणें आपल्या घरांतील तंग वातावरण यथाकालीं योग्य असें खेळीमेळीचें होईल, अशी माझी खात्री आहे.

तुझें शिक्षण पुरें झालें म्हणजे तुझ्या मनाप्रमाणें तेवढी तरी गोष्ट केल्याचें समाधान मला प्राप्त होईल."

पत्र माझ्या हातांत पडेल्यावर मला जरा समाधान वाटलें तरी पण एक प्रकारची भीति सारखी माझ्या मनास वाटत असे.

वर उल्लेखिल्याप्रमाणें आम्ही सगळी मंडळी पुण्यास एकत्र जमल्यावर मला प्रथम प्रथम सगळ्यांचीच भीति वाटे. मी मात्र मागच्याप्रमाणें सर्वांशीं मिळून मिसळून वागत होतें.

पहिल्या पहिल्यांदा वर वर्णन केलेली मंडळी माझ्याशीं जरा तुटक वागून पाहात होती, परंतु मूळच्या चांगल्या वृत्तीच्या माणसांना निष्कारण माझ्यावर राग धरणं साधलं नसावं व पटलंहि नसावं म्हणून मी शिकत असतांना त्यांच्या व माझ्यामध्यें पडलेला मातीचा बांध हलके हलके विरघळून गेला व माझ्या सुदैवानें एकजिनसी पाण्याचा प्रवाह पूर्वीप्रमाणें वाहूं लागला.

हा महिना दीड महिन्याचा मुक्काम पुण्यास मजेशीर रीतीनें पार पडला. कर्मधर्मसंयोगानें अमळनेरच्या हायस्कूलमध्यें एक शिक्षक पाहिजे अशी जाहिरात ह्यांच्या पाहण्यांत आल्यावरून ह्यांनीं तांबडतोब अमळनेरला नोकरीसाठीं अर्ज केला. अमळनेरच्या मंडळींनीं लगेच 'दिवाळीची सुटी संपतांच रुजूं व्हा' अशा तऱ्हेची तार पाठविली. ती मिळतांच ह्यांना अतिशय आनंद झाला. या संस्थेचा आदर्श थोडाफार ह्यांच्या डोळ्यापुढें

होताच. ती संस्था आपल्याला जवळून पाहावयास सांपडेल व आपल्याजवळ असलेलें तांब्याभर पाणी त्या शिक्षण संस्थेला घालूं, या इच्छेनें हे अधिकच उत्साही बनले. ही अमळनेरची नोकरी अंदाजें चार पांच महिन्यांचीच होती. तरी पण विद्वान् व त्यागी अशा शिक्षक मंडळींत आपल्याला पुष्कळसें त्यांच्या जवळून घेतां येईल या विचारांनीं ह्यांना अतिशय समाधान वाटत होतें व पुढचीं सुखस्वप्नें हे माझ्याजवळ वारंवार वर्णन करीत असत.

ठरल्याप्रमाणें आम्ही दोघंच नवा संसार मांडण्याकरितां अमळनेरास रवाना झालों. आमचा छोटासा संसार अल्पकाळचाच जो तेथें झाला त्याच्या आठवणी सुखसंवेदना अजूनहि निर्माण करतात.

शाळेंतील शिक्षक मंडळी श्री. भावे, कै. गोखले, श्री. गुणे (कुवलयानंद), मोहोनी, जांभेकर, नवाथे ह्या सर्वांच्या सहवासांत आमच्या दोघांचे दिवस अतिशय आनंदांत आणि कांहीं तरी निराळ्याच वातावरणांत गेले, असं अजूनहि वाटतं. ह्यांचा स्वभाव कोणत्याहि परिस्थितींत जुळतं मिळतं घेण्याचा असल्यामुळें ह्या सगळ्या लोकांचें मित्राचेंच नातें ह्यांच्याशीं अखेरपर्यंत राहिलें.

हे जरी पुढें सेकंड एल्‌एल्. बी. च्या परीक्षेस बसणार होते तरी त्या शिक्षण संस्थेनें आपणाला आजीव सभासद म्हणून जर घेतलें तर ते स्वतःला फार भाग्यवंत समजले असते, परंतु तो योग आमचा नव्हता. असलेल्या आजीव सभासदांशिवाय आणखी कोणासहि नवीन सभासद म्हणून आम्ही समाविष्ट करून घेऊं शकत नाहीं, असें उत्तर एक दिवस यांना स्पष्ट शब्दांत मिळालें. तसें पाहिलें तर ह्यांचे व त्यांचे शिक्षणाबद्दल विचार अगदीं एकच स्वरूपाचे होते असें म्हणण्यास हरकत नाहीं, पण तसा योग आला नाहीं. त्यांच्या स्पष्ट नकारामुळें ह्यांची पूर्ण निराशा झाली, पण ह्यांनीं तशा तऱ्हेचा भाव कोणाहि सहकाऱ्याजवळ बोलून दाखविला नाहीं, इतकेंच नाहीं तर ह्यांच्या मित्रप्रेमांत मला काडीचाहि फरक कधीं दिसला नाहीं. अशा निराशेच्या वेळीं त्यांचें ठरलेलें अवतरण असावयाचें.

" अवघाची काळ सजे । तरी अवघेच होती राजे ।
कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे । "

मी मात्र या विषयावर कधींहि कांहीं बोलूं लागलें तर त्यांनीं मला सांगावें, "अग, देव करतो तें बऱ्याकरितां, यावर माझा विश्वास आहे. कदाचित् मी ह्यांच्यापासून लांब जाण्यानेंच यांचें प्रेम, यांचें कर्तृत्व, यांची विद्वत्ता माझ्या कार्यास उपयोगी पडणार असेल. खरोखर पुढच्या आयुष्यांत ह्याचाहि प्रत्यय मला पदोपदीं आला. या सर्व मंडळींचें मित्राचें नातें आम्हांस मानसिक उन्नतीस उपयोगी पडलें यांत शंका नाहीं.

अमळनेरचें वास्तव्य ठरलेल्या मुदतीचें संपलें व आमचें अमळनेरचें बिऱ्हाड मोडलें व मी बाळंतपणासाठीं पुण्यास माझ्या माहेरीं गेलें व हे नाशकास सेकन्ड एल्एल्. बी.चा अभ्यास करूं लागले.

अमळनेर सोडल्यानंतर दोन-तीन महिन्यांनींच माझें पहिलें बाळंतपण माझ्या माहेरीं पुण्यास होऊन कन्या झाली. माझें पहिलेंच बाळंतपण असल्यामुळें जरासे माझे बाळंपतणांचे हालच झाले. डॉक्टरच्या मदतीनें का होईना मुलगी सुखरूपपणें आमच्या पदरांत पडली.

मुलगी—नवीन जन्माला आलेली मुलगी—माझ्यापासून दूर अशी सुरक्षित शेजारच्या खोलींत उबेमध्यें गुंडाळून ठेवून दिली होती. माझी भूल संपली व मी जागी झालें. पहिला विचार माझ्या डोक्यांत जर कांहीं आला असला तर 'माझं बाळ व तें कुठं आहे.' मी इकडे तिकडे कावऱ्या-बावऱ्या नजरेनें बघत होतें. मला हवी असलेली वस्तु कोठेंच दिसेना. मी एक दीर्घ श्वास सोडून डोळे मिटून स्वस्थ पडलें. खरें पाहिलें तर मुलाची विचारपूस करणें यांत कांहीं बिघडलें असतें असें नाहीं, पण त्या काळच्या संकोचाच्या कल्पना—त्यामुळें माझ्या तोंडांतून शब्द फुटेना. स्त्रीचें हृदय स्त्रीलाच समजतें. माझी कावरीबावरी नजर पाहून माझी आई माझ्याजवळ आली, एक हात प्रेमानें माझ्या कपाळावर ठेवून हलक्या आवाजांत मला म्हणाली, "तुला मुलगी झाली व ती सुखरूप आहे. कांहीं काळजी करूं नकोस. तूं स्वस्थ झोप घे." त्या क्षणीं माझी झोप तर उडालींच होती, पण हृदय आनंदानें भरून गेले होतें. काय झालं कुणाला ठाऊक त्या क्षणीं ह्यांच्याचबद्दल—ह्यांच्या येण्याचा विचार मी करीत होतें. तोंच माझे वडील

खोलींत येऊन मला प्रेमळपणानें म्हणाले, “ कांहीं काळजी करूं नकोस. मीं आज आबासाहेबांना तार केली आहे. ते उद्यांपर्यंत खास येतील ”

ठरल्याप्रमाणें हे दुसऱ्या दिवशीं येऊन दोन दिवस राहून परत नाशकास गेले.

अशातऱ्हेनें पांच सहा महिने माझें माहेरींच राहणें झालें. नंतर माझी रवानगी वडिलांनीं रीतसर नाशकास मुलीसह केली. तिथं २ ते ३ महिने माझे व ह्यांचे आणि घरांतील सर्व माणसांचे दिवस लहान मुलीच्या बाल-लीलेमुळें मजेंत व आनंदांत गेले. त्या मुलीचें निजणें—बसणें अगर कोणताहि हावभाव करणें मोठें आकर्षक होतें. या मुलीचा जन्म मोठ्या संकटांतून सुखरूपपणें झाला म्हणून ह्यांनीं सांगितल्यावरून मुलीचें नांव ‘ लीला ’ असेंच ठेवलें होतें.

इन्फ्ल्यूएंझाची साथ नाशकास बरीच जोराची सुरू होती. मला साधारण तऱ्हेचाच ताप येऊन मी लवकरच बरी झालें. ह्यांना मात्र इन्फ्ल्यूएंझाचा ताप फार जोरांत आला होता. ५ ते ६ दिवस सारखा ताप होता, व अशक्तता फारच भासत होती. ह्यांच्या दुखण्यामध्यें मुलीची थोडीशी आबाळच झाली म्हणण्यास हरकत नाहीं. तिचें पोट भरेना, म्हणून बाहेरचें वरचें दूध कोणत्या मुहूर्तानें मीं तिला घालावयास सुरुवात केली तें मला कळलें नाहीं. दूध प्यायली कीं, ती भडाभड ओकूं लागे. त्यानंतर अंगावर जरी पाजली तरी तिला उलटी होऊं लागली. पाणीदेखील पाजलें तरी उलटून पडूं लागलें. पाहतां पाहतां आठ दिवसांत ती अतिशय कृश दिसूं लागली.

## १०

माझे जे धाकटे दीर मेडिकल कॉलेजांत मुंबईस होते ते सुदैवानें नाशकास माझ्या मुलीच्या आजारपणाच्या वेळीं असल्यामुळें मला वेळोवेळीं धीर देत होते. अखेर त्यांच्या विचारें तेथील मिशनरी डॉक्टरीण मिस् लॅनडन हिला मुलगी नेऊन दाखवावी असें घरांतील सर्वांचेंच मत पडलें विचार मनांत आल्याबरोबर सकाळीं दहाच्या सुमारास मिस् लॅनडनकडे मी व धाकटे भावजी मुलीला घेऊन गेलों. वाटेंत जातांना मीं भावजींना म्हटलें, " मुलीला हॉस्पिटलमध्यें आतांच ठेवलें पाहिजे असं डॉक्टरिणीनं सांगितलं तर मी तिला हॉस्पिटलमध्यें ठेवणार नाहीं. मी तिला घेऊन परत येणार. " भावजींनीं 'होय, होय' म्हणून सांगितलें व मी दवाखान्यांत लीलाला घेऊन डॉक्टरीणबाईंना दाखविण्यास तयार झालें. एक तासपर्यंत डॉक्टरिणीनें तिची परीक्षा करून मला व भावजींना सांगितलें, "दोन दिवस इथं ठेवल्याशिवाय मुलीच्या दुखण्याची परीक्षा होणार नाहीं." नको असलेलाच प्रसंग माझ्यावर आला. लीलाला घेऊन भावजींच्या सांगण्यावरून एका स्पेशल रूममध्यें मला राहावें लागलें. माझे कपडे व लागणारें जरुरीचें सामान घरीं जातांच पाठवून देतों असें सांगून ते खोलीच्या बाहेर जाणार होते तों एका नर्सनें येऊन मला सांगितलें कीं, " मुलीच्या अंगावरचे दागिने कृपा करून तुमच्या माणसाबरोबर घरीं पाठवून द्या. " मी मंत्रमुग्धाप्रमाणें मुलीच्या हातांतल्या मनगट्या व बिंदल्या आणि पायांतील वाळे काढून भावजींच्या जवळ दिले. लीलीच्या गळ्यांतील पांचव्या दिवसांपासून असलेला लहानगा सोन्याचा ताईत मला भावजींच्या जवळ कात्रीनें दोरी तोडूनच द्यावा लागला. लीला गाढ झोपलेलीच होती. भावजी खोलीच्या बाहेर पडतांना मला हुंदका आवरेना. मीं त्यांना हांक मारून सांगितलें, " हे लीलाच्या अंगावरचे दागिने ह्यांना न दाखवतां कुठंतरी नीट ठेवा. "

त्या वेळेला खरोखर मुलीच्या अंगावरचे दागिने काढतांना कांहीं तरी अशुभ मी करीत आहें. पुढं होणाऱ्या दुःखदायक घटनेचा तर हा इषारा नसेल ना ? असेंहि, येऊं नये तें माझ्या मनांत येऊन गेलें. माझ्या भावजींचेहि डोळे त्या वेळीं पाणावलेले होते. ते तसेच पुढें सटकले. लवकरच सामान घेऊन मी स्वतःच येतों असें म्हणून तेहि दृष्टीआड झाले.

दुपारीं भावजींनीं सामान आणून दिलें व जातांना सांगितलें, " आबा, संध्याकाळीं चारच्या सुमाराला भेटीच्या वेळांत तुला भेटावयास येतील. " पांचच्या सुमारास हे येऊन लीलाला बघून मला धीराचे दोन शब्द सांगून परत घरीं गेले. येतांना मला वाचण्याकरितां कसलींशीं दोन पुस्तकेंहि आणून दिलीं होतीं.

मुलगी सतत झोपल्यासारखीच होती. तोंडापाशीं पाण्याचा चमचा नेला तर आ करून पाणी व दूध थोड्या थोड्या वेळानें चमच्यानें घेत होती. तेवढीच तिच्या अस्तित्वाची खूण माझ्यापुढें होती. बाकी सर्व स्तब्धताच होती.

अशा तऱ्हेनें दीड दिवसाचा कार्यक्रम पार पडला. मिस् लॅन्डन डॉक्टरीणबाई दोन तीनदा तिला या दीड दिवसांत बघून गेल्या. रोगाच्या परीक्षेचें निदान दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं ८ वाजतां तिनें माझ्या हातीं दिलें.

निदान झालें, पण डॉक्टरिणीचा चेहरा मला अगदीं पडलेला दिसला. जातां जातां घाईनें तिनें मला सांगितलें, " उद्यां सकाळीं कलकत्ता मेलनें तूं व डॉ. आपटे मुंबईस जाऊन मुलीच्या पोटाचें ऑपरेशन करून घ्या. तरच कांहीं आशा आहे " असं सांगून ती निघून गेली.

माझ्या डोळ्यापुढें एकदम अंधारीच आली, व मी मट्‌दिशी खालींच बसलें.

मी खालीं बसलें काय आणि उठलें काय त्याची कदर करणारें तिथं कुणीहि नव्हतें. मीं लिलीला पाळण्यांतून काढून घेतली व मांडीवर घेऊन मनसोक्त रडलें. तोंच हे व भावजी दोघेहि भेटण्याकरितां म्हणून व डॉक्टरिणीचा रिपोर्ट पाहण्याकरतां दुपारीं न येतां आठच्या सुमारासच आले. मला रडतांना पाहून ते दोघेहि घाबरले. भावजींनीं घाईघाईनें माझ्या मांडीवरून

लिलीला उचलून पाळण्यांत ठेविली व " अग ती चांगली आहे, वेड्यासारखी रडतेस काय ? " म्हणाले. आदल्या रात्रीची भयंकर झालेली माझी अवस्था मीं निवेदन केली. मला एकटीला आजची रात्र येथें काढणें मोठें कठीण आहे, असंहि मीं निक्षून सांगितलें.

तें जनाना हॉस्पिटल होतें. पुरुषांना माझ्या खोलींत राहणें शक्यच नव्हतें. डॉक्टरिणीचा रिपोर्ट घेऊन दोघांना घरीं जाणं प्राप्तच होतं. मीं भावजींना गयावया करून म्हटलं, " लिलीला घेऊन आपण सर्वचजण आतां घरीं जाऊं " " हॉस्पिटलचे कांहीं नियम असतात, त्यांचं उल्लंघन आपल्याला कसं करतां येईल ? मुख्य डॉक्टरीण निघून गेलेली आहे. आपल्याला उद्यां सकाळीं लिलाला पद्धतशीर घेऊन जातां येईल ? " असं ह्यांनीं परोपरीनें समजून सांगितल्यावर मी गप्पच बसलें. ते दोघे निघून गेले. जाण्यापूर्वीं हे एकदा लिलीच्या पाळण्यापाशीं आले. तिच्याकडे दोन तीन मिनिटें एकाग्रतेनें बघत होते, व माझ्याकडे पाहून मला म्हणाले, " कांहीं गोष्टी माणसाच्या शक्तीबाहेरच्या असतात, त्या प्रसंगांत आपण सर्व सांपडलों आहोंत. आजची रात्र लिलीपाशीं तुला राहणं फार कठीण आहे हें मी समजूं शकतों. आम्ही घरीं जाऊन लवकरच तुला सोबत करायला येतों " असं म्हणून चटदिशी भावजी व हे खोलीच्याबाहेर पडले.

दहा साडेदहाच्या सुमारास त्या खोलीच्या खिडकीच्या खालीं " वहिनी, बहिनी," म्हणून मला आवाज ऐकूं आला. मला कोणीच खालीं दिसेना, पण आवाज भावजींचाच होता. माझ्या सोबतीकरतां हॉस्पिटलच्या कांपाऊंड-मध्यें माझ्या खोलीच्या खिडकीच्या खालीं हे व भावजी दोघेहि बसून राहिले होते. ह्यांनीं जरा मोठ्यानें मला सांगितलें, " तुला कबूल केल्याप्रमाणें तुझ्या सोबतीकरतां मी व पिल्या ( भावजी ) या खिडकीखालीं बसलों आहोंत. तसं कांहीं वाटलं तर आम्हांला जोरानें बोलून सांग, म्हणजे आम्ही कशीहि परवानगी काढून आंत येऊं."

हे नुकतेच इन्फ्ल्युएंझांतून उठलेले होते. अतिशय अशक्त झालेले होते. तेव्हां सबंध रात्र त्यांनीं त्या आवारांत कुडकुडत राहावें, हेंहि मला बरं वाटेना. त्या दोघांच्या अस्तित्वामुळें मला खरोखर एक प्रकारचा धीर

वाटला यांत कांहीं शंका नाहीं. पण माझ्याकरतां इतका त्रास सोसावा हेंहि बरं वाटेना. दोनच्या सुमाराला मी ह्यांना आर्जवून सांगितलें, " तुम्ही आतां दोघेंहि घरीं जा, मात्र उजाडतांच भावजींना पाठवा म्हणजे आम्ही लिलीला घेऊन घरीं येऊं. " त्याला एकच उत्तर त्या दोघांनीं दिलं तें म्हणजे "आम्ही आतां घरीं जाणार नाहीं, पण थंडीचा कडाका जरा अधिक वाटत आहे, म्हणून तुझा रग खिडकींतून टाकून दिल्यास बरं होईल. " माझ्या जवळची एक चादर व रग मीं ताबडतोब खिडकीच्या गजांतून खालीं टाकून दिला व सारखी कांहींना कांहीं त्यांच्याशीं मी बोलत होतें. त्यांचें बोलणें खालून मला वर बरें ऐकूं येई, पण माझें त्यांना ऐकूं जात नसावें.

दार, लिलीचा पाळणा व खिडकीचे गज या तीन वस्तूंपाशीं माझ्या सारख्या येरझारा सुरू होत्या. लिलीची तब्येत होती तशीच होती. त्यांत कोणत्याहि तऱ्हेचा फरक मला तरी जाणवत नव्हता. पहाटे चाराच्या सुमाराला नाइट सुपर आली. लिलीला काळजीपूर्वक बघून कांहीं तरी चमचाभर औषधहि पाजलें. औषध पितांना लिलीनें डोळे उघडले, ते पाहतांच मला व त्या नाइट सुपरला खरोखर आनंद झाला. नाइट सुपर जातां जातां मला म्हणाली; "Now she is much better" असा दिलासा देऊन आपलं कर्तव्य बजावून ती बाहेर पडली. पांचाचे ठोके पडतांच भावजींनीं पुन्हा एकदा खिडकीच्या खालून मला हांका मारली व म्हणाले, " वहिनी, आतां काळजी करूं नकोस. मी डॉक्टरिणीच्या बंगल्यावर जाऊन लिलीला घरीं नेण्याची परवानगी काढूनच येतों. " अर्धा तासामध्यें भावजी टांगा घेऊनच हॉस्पिटलच्या दाराशीं आले. डॉक्टरिणीचा हुकूम दाखवून भावजी थेट माझ्या खोलींत आले होते. लिलीला नीट गुंडाळून घेऊन आम्ही दोघे हॉस्पिटलच्या बाहेर एकदाचे पडलों. हे कुठं आहेत असा मीं भावजींना प्रश्न करतांच भावजींनीं सांगितलं, "आबाला फार थंडी वाजायला लागली त्यामुळें त्याला मी घरीं पोचवून डॉक्टरिणीच्या बंगल्याकडे वळलों."

मोठ्या संकटांतून माझी सुटका झाल्यासारखीच, एकदाची माझ्या बाळीला घेऊन मी माझ्या घरीं आलें. ह्यांना बरीच थंडी वाजून आलेली होती. त्यामुळें लिंलीला घेऊन मुंबईस जाण्याचा बेत मीं कटाक्षानें टाळला.

मामंजी व भावजी आणि हे देखील अखेरचा उपाय म्हणून मुंबईस जा असें आग्रहानें सांगत होते. मीं भावजींना विचारलें, " वाटेमध्यें मुलीचं बरं वाईट झालं तर मला मनसोक्त रडूंसुद्धां द्यावयाचं नाहीं असं का तुम्हीं सर्वांनीं ठरविलं आहे ? भावजी, तुम्हीं डॉक्टरीचा कोर्स घेतलेला आहे. मींहि माझ्या नर्सिंगाच्या शिक्षणांत कांहीं तरी अनुभव घेतला आहे. तेव्हां मला वेडी आशा दाखवूं नका. " अखेर मुंबईस जाण्याचा बेत रद्द झाला.

घरीं आल्यानंतर भावजींनीं सर्वस्वीं लिलीचा ताबा घेतला, त्यामुळें मला पुष्कळच मोकळें वाटलें.

काळ घरामध्यें घिरट्या घालीत होता. फक्त वेळ आलेली नव्हती, इतकेंच खरें ! मुलीच्या बिछान्याजवळ मामंजी, हे, भावजी व मी सारखी ऊठबस करीत होतो. आशेला कुठंच जागा नव्हती. रात्रीं अकराच्या सुमाराला हे मला म्हणाले, " बाहेर जाऊन जरा तूं पड. मी व पिल्या लिलीच्याजवळ सतत पहारा करतों. माझी तब्येत आतां बरी आहे. तूं आतां विसांवा घे. " मीं भावजींना एकदा निक्षून बजावलं, " तसं कांहीं वाटल्यास हाका मारल्यावांचून राहूं नका अं ". भावजींनीं होकार दिल्यावरच मीं बाहेरच्या खोलींत झोपण्याचं कबूल केलं.

काळझोपच ती व दोन दिवसांचं जागरण असल्यामुळें मला गाढ झोप लागली. सकाळीं एकदम मीं जागी झालें. घरामध्यें उजेड पाहतांच " अग बाई, मला इतका वेळ कशी झोप लागली " असं म्हणतच मीं लिलीच्या खोलींत प्रवेश केला. तेथें मला काय दृश्य दिसलें. मुलीला मध्यें घेऊन एका बाजूला हे व एका बाजूला भावजी गाढ झोपीं गेलेले. दोघांचा एक एक हात लिलीच्या अंगावर होता. मी लिलीच्या जवळ जाऊन पाहतें तों तिचें गार शरीर माझ्या हाताला चटका देऊं लागलें. मी ' अग आईग ' म्हणून ओरडतांच दोघेहि खाड्दिशी उठून बसले. माझ्या नजरेला नजर दोघेहि देईनात.

मीं त्या वेळेला त्या दुःखाच्या भरांत काय शोक केला, काय बडबडलें तें माझ्या ध्यानांतसुद्धां कांहीं आलं नाहीं, पण एक निश्चित गोष्ट मला

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अद्यापिहि स्मरत आहे, ती म्हणजे ह्यांना कांहीं एक मुलीची माया नाहीं. स्वतःच्या गेलेल्या मुलीला कुशींत घेऊन कसे गाढ झोपीं गेलांत ? म्हणून मी त्या दुःखाच्या भरांत कांहीं तरी असेंच बोलत असावी. त्यांनाच काय पण मीं भावजींना देखील त्यांच्या या कृतीबद्दल फार दोष दिला. मीं भावजींना म्हटलें, " लिली गेली, त्या वेळीं तुम्हीं मला कां उठवलं नाहींत. " भावजींनीं कांहीं एक उत्तर न देतां ह्यांच्याकडे बोट केलें. मी त्या बोटाचा अर्थ समजलें. ह्यांनीं मला उठवूं दिलें नसेल दुसरें काय ? जाऊं द्या.

यथाविधि मुलीची व्यवस्था करण्यांत आली. एक दोन दिवस गेल्यावर मीं ह्यांना पुन्हा एकदा प्रश्न टाकला कीं, माझ्याकरितां मला सोबत करण्याकरितां हॉस्पिटलमध्यें रात्रभर कुडकुडत बसलांत, आणि स्वतःची मुलगी गेली तेव्हां तिच्या सन्निध कसे हो गाढ झोपीं गेलांत, ही शंका मला चैन पडूं देत नाहीं म्हणून विचारतें. ह्यांनीं मला शांत चित्तानें उत्तर दिलें, " तूं स्थिर डोक्यानें ऐकून घेणार असलीस तर दोन्हीहि गोष्टी कशा घडल्या तें मी तुला समजावून सांगतों. "

ते म्हणाले, " तूं मला नित्य हवी हवी वाटणं व तुझ्या सहवासांत मी सतत आनंद मानणं हेंच एक प्रेमाचें लक्षण असं मी समजत नाहीं. भोगांत स्वतःचा स्वार्थ असतो, पण खरें प्रेम आपणांस कोणावर करावयाचें असेल तर त्यागांतच खरें प्रेम लाभूं शकतें. या माझ्या विचाराप्रमाणें तुला त्या रात्रीं हॉस्पिटलमध्यें सोबत करणें व त्यासाठीं मला जरी त्रास झाला तरी प्रेमाच्या व्याख्येला मी जागलों असें मला मोठें समाधान त्या वेळीं लाभलें. हा एक मुद्दा झाला. लिलीला कुशींत घेऊन कसा गाढ झोपीं गेलों ह्याचें उत्तर सत्य तेंच मी तुला देत आहें. मुंबईचा माझा एक मित्र चौबळ नांवाचा ज्या वेळेला विलायतेला गेला व तिकडेच कालवश झाला त्या वेळेला मीं कितीतरी दुःख काढलें. त्याचप्रमाणें माझी आई गेली तें माझं दुसरं दुःख होय. तुला वाटतो तितका मी दुष्ट नाहीं. कठीण हृदयाचाहि नाहीं. पण त्या दोन दुःखांचा चटका जो मला बसला तो आतां घट्ट बनून गेला आहे. तुझी जी आज दुःखाची अवस्था आहे, ती कमी अधिक प्रमाणांत मीं मागं भोगली आहे. त्यामुळें कांहीं एक गडबड न करतां मी

स्वस्थ पडलों होतों. आम्ही झोपलों म्हणण्यापेक्षां कोणत्या तरी दुःखाच्या अतिरेकानें निरुपायानें गुंगलों होतों; आणि हें पाहा, अगदीं शेवटच्या क्षणाला लिली जाणार असं समजतांच तुला उठविण्याकरितां पिल्या जात होता, पण मींच त्याला हात धरून खालीं बसविलें; कारण पिल्याचें बाहेर जाणें व तुझें येणें इतका वेळहि लिलीचा जीव मला जपून ठेवतां आला नसता. त्याचप्रमाणें तात्यांचें वय झालेलें आहे. आमच्या घरांत पंचवीस वर्षांत लहान मुलाचा मृत्यु झालेला नाहीं. तेव्हां तात्यांनीं रात्रीच दुःखानें गोंधळ घातला असता. तुला तर मीं कसं गप्प केलं असतं आणि शेवटची व्यवस्था दिवस उजाडल्यावांचून होणं शक्य नव्हतं. तेव्हां अशा विचारांनींच आम्ही दोघं लिलीच्या अंगावर हात टाकून स्वस्थ पडलों होतों."

त्यांचें भाषण चालू असतांना मला तें समजत होतं पण उमजत नव्हतं, म्हणून माझ्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहत होते. त्यांनीं त्याच बोलण्याच्या वेगांत मला सांगितलं, "कोणत्याहि प्रसंगीं आपल्यापेक्षां दुसऱ्याचा विचार आपण आधीं करावा म्हणजे पश्चात्तापास जागा न राहतां योग्य मार्ग आपणास सुचतो. नेहमीं आपल्या विचाराची घडणच अशी ठेवावी."

अशा तऱ्हेनें कांहीं निरनिराळे त्यांच्या आयुष्यांतील प्रसंग मला सांगून मला वाटणारें लिलीचें दुःख कमी करीत होते, पण खरं सांगायचं म्हणजे तें दुःख शंभूच्या जन्मानंतरच जरा हलकें झालें म्हणण्यास हरकत नाहीं.

परमेश्वरानें स्त्रीच्या मनोवृत्तीची घडणच अशी कांहीं बनवली आहे. तिला कोठें तरी प्रेमाचें स्थान असल्याशिवाय ती जगूं शकत नाहीं अगर ती जगली तर तिच्या जगण्यांत स्वारस्य नसतें. एक एक काळांतील स्त्रीचीं प्रेमाचीं स्थानं ठरलेलीं आहेत. लग्न झाल्यावर चार पांच वर्षांत जर मुलाचें सौख्य तिला मिळालें नाहीं तर तिचा मनोविकास अजिबात खुरटून जातो. शंभूच्या जन्मानंतर हे मला एक दिवस म्हणाले, "मी तुझ्या ऋणांतून मोकळा झालों. तुला हवी असलेली वस्तु तुला मिळाली" अन् त्यांचं म्हणणं अगदीं खरेंहि होतें.

मला पाहिजे असलेली वस्तु मिळाली त्याचप्रमाणें जीवनाला हवें असलेलें क्षेत्र त्यांनासुद्धां एकदाचें मिळालें. त्याच संधानाला हे अलाहाबादला

सेकंड एल्एल्. बी. च्या परीक्षेला बसले, पण त्यांनीं ती परीक्षा पास व्हावी असा ईश्वरी संकेत नव्हता. त्यांना असलेल्या सात पेपरांपैकीं पांच पेपर चांगले लिहिले गेले. सहावा पेपर लिहीत असतांनाच भयंकर ताप त्यांच्या अंगांत भरला. तो सनस्ट्रोकच होता. सातवा पेपर लिहिण्याचा प्रश्नच उरला नाहीं.

अलाहाबादहून ह्यांच्या प्रकृतीबद्दल तार येतांच मामंजींनीं नाशकाहून दोन माणसें ताबडतोब रवाना केलीं. ह्यांना जरा बरें वाटल्यावर हे नाशिकला आले. त्यानंतरच मला माझ्या माहेरीं ह्यांच्या दुखण्याची हकीगत समजली. मी चि. शंभूच्या वेळेला माहेरीं बाळंतीण असल्यामुळें ताबडतोब नाशकास गेलें नाहीं. तीन महिन्यांचा मुलगा होतांच मी नाशकास आलें व आमच्या दोघांच्या पुढें, पुढें काय ? हा प्रश्न उभा राहिला. त्याच सुमारास सन १९२० सालीं नागपुरास कॉंग्रेस झाली. महात्माजींच्या इच्छेनुसार असहकारितेची चळवळ सुरू होऊन कोर्ट व कॉलेजें यांवर बहिष्कार घालण्याचें सत्रहि सुरू झालें. तेव्हां हा मोका ह्यांच्या राष्ट्रभक्तीच्या अंकुरास पोषक व एल्एल्. बी. चा नाद सोडण्यास योग्य संधि त्यांना मिळाली. त्याच वेळेला जिकडे तिकडे सरकारशीं असहकार करण्याच्या तत्त्वांतून राष्ट्रीय शाळा निर्माण झाल्या. ह्यांचें मन चुळबूळ चुळबूळ करूं लागलें. मला ह्यांनीं स्पष्ट विचारलें, " मीं पुन्हा एकदा वकिलीच्या परीक्षेला बसावें असं तुला वाटतं का ? लो. टिळकांनीं राष्ट्राला जिवंत करण्यामध्यें आपलं आयुष्य सर्व खर्ची घातलें. महात्मा गांधी त्या जीवंतपणाचा फायदा घेऊन आम्हां तरुणांकडून राष्ट्राकरतां कांहींतरी करूं इच्छितात. तेव्हां अशा वेळीं मी वकील होऊन कोर्टांत वकिली कशी करूं ? "

ह्यांची स्वभावप्रवृत्ति मीं जाणलेली होती. मी जरी ' वकील व्हा ' म्हटलं असतं तरी ती गोष्ट ह्यांच्या हातून पार पडली असती असं मला वाटेना. ज्यामध्यें ह्यांना सुख नाहीं ती वकिलीची परीक्षा देऊन तरी काय उपयोग ? असाहि मीं विचार केला व त्याचप्रमाणें मलाहि भिरभिर हिंडण्याचा आतां कंटाळा आला होता. मूल झाल्यानंतर अद्यापहि माझा संसार फिरता असावा त्याचाहि मला उबग आला होता. तेव्हां आमच्या दोघांचा आयुष्य-

क्रम स्थिर करण्याकरितां कांहींतरी निश्चित धोरण ठरविणें क्रमप्राप्त होतें. मी ह्यांना निक्षून सांगितलें, आपणांस आपल्या ध्येयाप्रमाणें जो मार्ग घ्यावयाचा असेल तो घ्या व सुखी व्हा पण स्थिर एका जागीं बसा. त्या सुखांत मी भागीदार आहेंच.

मामंजींना त्यांचा ध्येयवाद कसा पटेल ? हा प्रश्न ह्यांच्या व माझ्या डोळ्यापुढें होता. मामंजींना एक दिवस ह्यांनीं राष्ट्राची परिस्थिति समजून सांगतां सांगतां "आपण अशा वेळीं कांहींतरी देशाचें कार्य करावयास नको का ?" असें सांगितलें तेव्हां मामंजी म्हणाले, "तूं सेकंड एल्एल्. बी. तर पास हो, मग पुढें काय करावयाचें तें आपण ठरवूं."

"तात्या, ही परीक्षा मी जरी पुढच्या वर्षीं पास झालों तरी मी कोर्टांत जाऊन वकिली कधींच करणार नाहीं, हें मी तुम्हाला आधींच सांगून ठेवतों. राष्ट्राच्या आणीबाणीच्या वेळेला मी काय वकिली करून पैसे मिळवीत बसूं ?"

ह्यांनीं सौम्य पण निक्षून अशा शब्दांत आपले विचार मामंजींच्या पुढें एकदाचे ठेवले. त्यांनीं लगेच ह्यांना उत्तर दिलें, "परीक्षा पास होऊन तूं जर वकिली करणार नाहींस तर जें कांहीं तुम्हीं मनांत ठरवलें असाल त्याप्रमाणें वागा. माझी हरकत नाहीं. तुझ्या बायकोचा मात्र विचार घेतल्यावांचून कोणतीहि गोष्ट करणें तुझ्या हिताचें होणार नाहीं येवढें लक्षांत ठेव म्हणजे झालें."

१९१९ सालीं अवघे ४ महिने येवल्यास ए. व्ही. स्कूलमध्यें यांनीं हेड-मास्तर या नात्यानें नोकरी केली होती. ए. व्ही. स्कूलचें हायस्कूल या काळांतच झालें. त्यामुळें लोकांनीं ह्यांना ओढून येवल्यामधील राष्ट्रीय शाळेच्या मुख्याध्यापकाची जागा १९२१ ऑगस्टमध्यें स्वीकारण्यास लावली. ही शाळा दोन तीन महिने आम्हीं जाण्यापूर्वीं निघाली होती. ह्यांच्या हाताशीं पांच शिक्षक व हे सहावे शिक्षक असें राष्ट्रीय विद्यालय तयार झालें. राष्ट्रीय शाळेच्या विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणाबरोबर देशाभिमान व स्वावलंबन यांचे धडे हलके हलके ही मंडळी देऊं लागली.

पहिल्या प्रथम येवल्यास हे जे गेले ते तेथील सुप्रसिद्ध थत्ते वकील यांच्याकडे. ह्यांनीं आपली ट्रंक व वळकटी त्यांच्या घरांत ठेवून पाहुणे म्हणून नव्हे तर त्यांच्या घरांतीलच एक व्यक्ति या नात्यानें आपला समावेश करुन घेतला. खरं पाहिलं तर हे इतक्या मोकळ्या स्वभावाचे त्या वेळीं तरी खास नव्हते, पण नोकरी पत्करतांनाच ह्यांनीं ट्रस्टींमधल्या वर उल्लेखिलेल्या थत्ते वकिलांना स्पष्ट सांगितलें होतें, " मी नुकताच दुखण्यांतून उठलेला आहें. मला खाणावळीचें अन्न पचणार नाहीं व बायको बाळंतीण झालेली असल्यामुळें मला बिऱ्हाड करणेंहि इतक्या लवकर शक्य नाहीं. "

सर्व ट्रस्टी मंडळींनीं व त्यांतल्या त्यांत थत्ते वकिलांनीं निक्षून सांगितलें, " आमच्या शाळेला ग्रॅज्युएट मुख्याध्यापक व तो देशाभिमानी आणि राष्ट्रीय शिक्षणाचा आपुलकीनें विचार करणारा असा हवा आहे."

## ११

जागा चांगली मिळून बिऱ्हाड करीपर्यंत ह्यांनीं थत्ते वकील यांचेकडे राहावें, असें ठरलें. काका थत्ते वकील यांनीं मोठ्या आपुलकीनें यांना सांगितलें, " अहो, माझा लहान भाऊ जर असता तर त्याचें स्थान माझ्या घरांत हक्काचें होतेंना ? तसेंच तुम्ही समजा व माझे घरीं माझ्या मुलामाणसांत तुमचें बिऱ्हाड होईपर्यंत मोकळेपणानें राहा. माझ्या दहा माणसांच्या कुटुंबांत मला एक मनुष्य जड होतो काय ? माझे घरीं तुम्ही राहिलांत तरी कोणतीहि हरकत नाहीं, पण राष्ट्रीय शाळेची आजची नड पाहून तावडतोब होकार द्या व आपल्या शाळेची मांडणी, अभ्यासक्रम आखूं लागा. "

इतकें बोलणें झाल्यावरच ह्यांनीं वकिलांच्या येथें राहण्याचें कबूल केलें. या रीतीनें राहण्याची सोय झाली, पण शाळेची मांडणी व्हावयाची होती.

राष्ट्रीय शिक्षणाचें ध्येय ठरविणें व त्याप्रमाणें पावलें टाकणें ही मात्र महाकठीण गोष्ट होती. स्वतः ठरविलेली गोष्ट स्वतः कष्ट करून पुरी करणें व नंतर तो पाठ विद्यार्थ्यांपुढें ठेवणें हें काम प्रथम वाटलें तितकें सोपें नव्हतें, असें ह्यांनींसुद्धां पुष्कळ वेळां प्रसंगानुरूप कबूल केलें आहे.

शरीरश्रमाची संवय राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला असली पाहिजे. कोणत्याहि गोष्टीकरितां अडून बसतां कामा नये, हें शिक्षण मुलांना देतांना ‘ स्वतः केलें मग सांगितलें ’ तरच मुलांच्या मनावर पटेल. याशिवाय पटणार नाहीं, म्हणून त्याचे धडे प्रत्येक राष्ट्रीय शाळेंतील शिक्षकाला नवीन चाकोरींतून वाटचाल करून स्वतः घ्यावे लागले. शाळा झाडणें, शाळा सारवणें, शाळेची रंगरंगोटी करणें त्याचप्रमाणें मुलांना पिण्यास लागणारें पाणी स्वतः शिक्षकांनीं भरून ठेवणें, पाणी सांठविण्याचीं भांडीं स्वच्छ करणें वगैरे पासून तों बोद्धिक शिक्षण हीं यच्चयावत् सर्व कामें राष्ट्रीय शाळेंतील शिक्षकांना स्वतः करावीं लागत.

ह्यांचें वजन १२० पौंडाच्यावर कधींहि गेलेलें मला आठवत नाहीं. शरीरयष्टि किरकोळ व नाजूकच. थोडेसें ऊनसुद्धां ह्यांना कधींहि सोसत नसे. हे नेहमीं म्हणत, “त्यागी व कष्टाळू जीवन आम्हां शिक्षकांचें नसेल तर देशाच्या स्वातंत्र्याकरितां करावा लागणारा त्याग व उपसावे लागणारे कष्ट आम्हांस इतरांस सांगण्याचा अधिकार कसा पोंचतो ? आम्हाला नुसती शाळा झाडून भागणार नाहीं तर आम्हाला गांवाचा कोपरान् कोपरा स्वच्छ करावा लागेल. ”

हे शाळेंतून संध्याकाळीं घरीं आले व दमलेले दिसले म्हणजे माझें मन फार खट्टू होई. एखादे वेळीं तोल जाऊन मी भरा भरा दोन चार वाक्यें कडक अशीं बोलतहि असें. मी म्हणावयाची, “ आपला देश गुलामगिरींतून सोडविण्यासाठीं देशप्रीतीच्या गोष्टी, वीरांचीं चरित्रें, स्वतंत्र देशांचा इतिहास शिकवा, पण शाळेमध्यें स्वतः मजुराचीं कामें करून आपला देह कां शिणवतां हें समजत नाहीं. तुमची शाळा गरीब असेल तर मी मजुरांसाठीं थोडे थोडे

पैसे माझ्या संसारांतून वांचवून देईन, पण मला तुमच्यासारख्यांनीं इतक्या कष्टाचीं कामें केलेलीं बघवत नाहींत."

अशा वेळेला माझ्या मेंदूची तापलेली तार थंड करणें हें त्यांना साधून गेलेलें काम होतें. ते म्हणावयाचे, "मी समजूं शकतों. मी कितीतरी प्रकारच्या तुला न बघवणाऱ्या गोष्टी रोज करीत असतों. पण त्याचें कारण तूं जर शोधलेंस आणि विचार केलास तर मला क्षमाच करशील. अग, राष्ट्राला ज्या शिक्षणाची सध्यां जरूर आहे, त्याचा समावेश राष्ट्रीय शिक्षणांत होतो, असं महात्माजी वारंवार सांगतात. नुसते गुलामगिरीचे पाश तोडून स्वराज्य मिळेल असें नाहीं. स्वराज्याचा पाया भक्कम असाच प्रथमपासून भरला गेला पाहिजे. हें पाहा, कृष्णाबरोबर रुक्मिणीला महारीण होऊन चोखामेळ्याच्या घरीं बाळंतपण करावें लागलें, ही कथा कीर्तन करतांना तूं गाऊन गाऊन सांगतेस ना ? त्याचा खरा अर्थ ध्यानांत आला पाहिजे ना ? "

आम्ही येवल्यास जाण्यापूर्वींच दोन तीन महिने राष्ट्रीय शाळेची स्थापना झालेली होती. टिळकांच्या निधनानंतर टिळकांचें स्मारक कोणत्या ना कोणत्या रूपांत आपल्या गांवांत उभारलें गेलें पाहिजे अशा तऱ्हेची अहमहमिका लहान तालुक्याच्या गांवापासून तों मोठ्या शहरापर्यंत निर्माण झाली होती. कांहींनीं पुतळे, कांहींनीं शाळा, कांहींनीं तलाव, कांहींनीं उद्यानं वगैरे गोष्टी निर्माण करून आपापली सहानुभूति टिळकांच्या स्मारकांत दाखविली होती. पैशाचें भरपूर बळ ज्या गांवाजवळ नसेल त्यांनीं टिळक चौक, टिळक रस्ता, टिळक मैदान वगैरे नांवें देऊन लो. टिळकांची स्मृति आपापल्या परीनें अजरामर करून ठेवली आहे. त्याच अवाढव्य लाटेमध्यें येवल्यासहि टिळक विद्यालय नांवाची राष्ट्रीय शाळा गांवांतील नागरिकांनीं इ. स. १९२१ मध्यें स्थापन केली होती.

हें विद्यालय स्थापन होतांनाच एक कांहींतरी विपरीत प्रकार घडला होता. तो म्हणजे येवल्यांतील नगरशेट वल्लभदास ( गंगाराम छबीलदास पेढी ) यांच्याकडे वर्गणीच्या यादीचा कागद कांहीं आंकडे यादींत पडल्यावर नंतर आला. अर्थातच त्यांना ही गोष्ट अपमानकारक वाटली. 'टिळक स्मारका'-बद्दल त्यांची कल्पना अगदीं भिन्न होती. टिळकांच्या नांवानें विद्यालय काढणें

यापेक्षां टिळकांच्या नांवानें गुरांना चरण्याकरितां 'कुरण' ही कल्पना शेटजींना अधिक पसंत होती. पण लोकमतामुळें टिळक विद्यालय हेंच टिळकांचें स्मारक करावें असें ठरल्यानें लोकमतापुढें शेटजींना कांहीं करतां येईना. तेव्हां आपली या स्मारकाला पूर्ण नापसंती दाखवून कोणताहि आंकडा यादींत त्यांनीं टाकला नाहीं, व शेवटपर्यंत विद्यालयाला आर्थिक मदत त्यांनीं कोणतीच केली नाहीं.

येवलें गांवांतील नागरिकांनीं गांवामधून विद्यालयाकरतां पैसे गोळा करून विद्यालयाची स्थापना वर उल्लेखिल्याप्रमाणें केली. या विद्यालयाचे मुख्य संस्थापक म्हणून भागचंद शेट पटणी हेच ठरले. भागचंद शेटजींनीं यादीवर पहिलाच आंकडा वीस हजार रुपये सढळ हातानें घातला होता!

चांगल्या परिस्थितींत दानधर्म करणारे, व आपला शब्द पाळणारे पुष्कळ लोक आढळतील, परंतु आपल्या विपन्नावस्थेंत देखील आपली नेकी न सोडणें त्यांत विशेष पुरुषार्थ आहे नाहीं का?

## १२

भागचंद शेटजींची पेढी ही दीडशें वर्षांपूर्वीची जुनी व्यापारी पेढी होती. ही असामी अंदाजें पन्नास लाख रुपयांची तरी खास होती. महाराष्ट्रामध्यें एकदा मोठा दुष्काळ पडला असतांना धान्य कमालीचें महाग झालें होतें. येवलें हें वीणकरांचेंच गांव. त्यांना धान्याची महागाई फार जाणवूं लागली. त्या वेळीं या शेटजींनीं पंजाबमधून धान्य मागवून वीणकरांना परवडेल, रुपयास पायली इतक्या स्वस्त भावानें त्यांना धान्य देऊन भाजीभाकरी पुरावेली.

लो. टिळकांच्या स्वदेशीची लाट याहि शेटजींनीं आत्मसात् केलेली होती; इतकेंच नव्हे तर महात्माजी येवल्यांत आल्यावर वीस हजार रुपये राष्ट्रीय शाळेकरतां रोख त्यांच्या हातांत देऊन शेटजी त्या दिवशीं मोकळे झाले. त्या दिवसापासून खादीचें नवें व्रत त्यांनीं घेतलें. ते स्वतः संपूर्ण खादीधारी झाले व अखेरपर्यंत खादीचें व्रत त्यांनीं पाळलें.

प्रपंचांत अस्मानी सुलतानी अशी एखादे वेळीं निर्माण होते कीं, आपण कोठें आहोंत व आपण काय करीत आहोंत याचा मागमूसहि माणसास राहूं शकत नाहीं. अशाच तऱ्हेचा प्रसंग दानशूर भागचंद शेटजींचेवर येऊन ठेपला. उतरत्या वयांत त्यांना पुत्ररत्न झालें व पाठोपाठ ५–६ मुलें झालीं, तरी तीं अज्ञ वयाचींच होतीं. त्यांचीं तीं मुलें बालक या संज्ञेतच मोडत होतीं. अशा वेळीं भागचंद शेटजींच्या पुतण्यानें सट्टयाचा खेळ मुंबईमध्यें सुरू केला. वाढत्या लक्ष्मीच्या मोहानें सट्टे खेळणें वाढत चाललें. पेढीच्या नांवानें लाखों रुपयांचे सट्टे मुंबईत खेळले गेले. एकदम अकरा लाखाची ठोकर पेढीस बसली. अशा नुकसानीच्या वेळेला भागचंद शेटच्या पुष्कळ मित्रांनीं कर्ज नाकारण्याचा अगर दिवाळें काढण्याचा सल्ला दिला, पण भाग-चंद शेटनीं एकच उत्तर सर्वांना दिलें तें म्हणजे “ हे आलेले हलाखीचे दिवस जातील, पण पेढीचें गमावलेलें नांव पुन्हा येणार नाहीं ” असं सांगून हातीं असलेली रोकड रक्कम देऊन टाकून गांवांतील स्वतःची स्थावर व जंगम इस्टेट विकण्यास त्यांनीं सुरुवात केली. इतकेंच नव्हे तर सर्व कर्जाची फेड होईपर्यंत मी गहूं कदापिहि खाणार नाहीं अशी शपथ मनाशीं त्यांनीं घेतली, व अखेरपर्यंत भाजीभाकरीचा साधा जीवनाला लागणारा आहार ते घेऊं लागले.

ज्या घरीं सोन्याचा धूर निघत होता त्या घरीं पायली-पायली धान्य विकत घेऊन कुटुंबाचा चरितार्थ शेटजींना अखेरीस चालवावा लागला होता, पण त्यांच्या मुखावरील आनंद व समाधान केव्हांहि मावळलें नव्हतें. सन १९३६ सालीं त्यांचा अंत झाला. त्यांना मांड नांवाचा रोग झालेला होता. त्यांतच त्यांचा अंत झाला. अखेरपर्यंत विलायती कपडा तर नव्हेच पण गिरणीचा कपडाहि त्यांनीं अंगाला लावूं दिला नाहीं. माझ्या निधना-

नंतर खादीच्या कपड्यांतच माझा देह लपेटा अशी इच्छा राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांना त्यांनीं बजावून सांगितली होती. त्याचप्रमाणें आयुर्वेदापलीकडे कोणतेंहि परदेशी औषध घशाखालीं त्यांनीं जन्मांत घातलें नव्हतें. शेवटच्या दुखण्यांत डॉक्टर लोकांनीं समजावून विनवून पुष्कळ प्रकारें सांगितलें, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांनीं आपला देशीच औषधांचा आग्रह शेवटपर्यंत चालवला. असे निष्ठावंत भागचंदशेटजी आमच्या राष्ट्रीय शाळेचे जनक होते.

थत्ते कुटुंबामध्यें ह्यांचे दोन महिने केव्हांच हां हां म्हणतां निघून गेले. काका व त्यांची पत्नी आणि त्यांच्या कुटुंबांतील इतर मंडळी यांनीं खरोखरच ह्यांना अगदीं आपुलकीनें वागविलें. त्यामुळें ह्यांचें अगत्याचें पत्र मिळतांच मी चि. शंभूसह थत्त्यांचेकडे निःसंकोचपणें आलें. थत्त्यांच्या घराच्या जवळच अगदीं दोन घरावर आम्हाला जागा मिळणार होती. लवकरच मी जी आलें ती थत्ते कुटुंबांत न कळत एकरूप होऊन गेलें.

आम्हांला राहावयास मिळावयाच्या जागेची मुदत दहा पंधरा दिवसांनीं लांबली. त्यामुळें साहजिकच जवळ जवळ महिनाभर थत्त्यांच्या घरीं शंभूसह आमचा दोघांचा मुक्काम झाला. त्या महिन्यामध्यें मिळालेली थत्ते कुटुंबाची आपुलकीची वागणूक आम्ही केव्हांहि विसरूं शकणार नाहीं. आतां तर राहूं द्याच, पण त्या काळींसुद्धां थत्त्यांच्या कुटुंबासारखें कुटुंब फारच विरळा यांत शंका नाहीं. बोलण्यामध्यें समानता व साधेपणा सहज आणतां येतो, पण स्वतःच्या वर्तनांत हीं तत्त्वें पाळलेलीं पाहण्यास मिळणें फार दुरापास्त गोष्ट आहे. घरामध्यें खरोखरीं त्या वेळीं वीस माणसें थत्ते कुटुंबांत होतीं. नुकतीच लढाई होऊन गेलेली होती. महागाई माणसाला भेडसावीत होती. अशा परिस्थितींत साधें राहणें व साधें खाणें आणि सर्वांना सारखें वागवणें हा धडा मला थत्ते कुटुंबापासून मिळाला.

मी एका श्रीमंती थाटाच्या घरांतून माझ्या माहेराहून निघून या गोकुळांत येऊन पडलें होतें. मला पोंचविण्यास आलेले माझे बंधु एक दिवस राहून पुण्यास गेले. जातांना त्यांनीं मला एका बाजूला गांठून शंका प्रदर्शित केली, " तुमचें बिऱ्हाड लवकर वेगळें होईल असं मला दिसत नाहीं. तूं नुकतीच

उठलेली बाळंतीण. या घरांत तुझा कसा निभाव लागेल? रंगूनचे तांदूळ, पोळी व चटणी आमटी यांत तुला सात्त्विक आहार कसा मिळणार?" माझ्या भावाची शंका चुकीची नव्हती. मी गोड शब्दांत भावाची समजूत काढली. "तूं आपला सुखानें परत जा. माझी काळजी कोठवर करणार? लवकरच मी माझी घडी बसवून घेईन व तसं लवकरच पत्रानें तुम्हांस कळवीन"

या थत्ते कुटुंबाच्या गोकुळांत खेळीमेळीच्या वातावरणांत माझें वजन त्या महिनाअखेर दोन पौंडानें वाढल्याचेंच दृष्टोत्पत्तीस आलें.



## १३

घरची गृहिणी सुस्वभावी असली म्हणजे पुष्कळ चांगल्या गोष्टी सहजच घरांत घडून येतात. पुरुष काय पायाचा पारवा असतो. मैत्री जर टिकावयाची असेल तर कुटुंबांतील स्त्रियांच्याच हातीं तें सर्व असतें.

माझी नवी मैत्री थत्ते काकूंशीं इतकी झाली कीं, त्या वेळीं मैत्रीचें प्रतीक म्हणून एकमेकींना भेट काय द्यावी हेंच मुळीं आम्हांस कळेना. त्या काळच्या राहणीप्रमाणें आम्ही दोघीहि इतक्या स्वतंत्र नव्हतों. तरी पण आम्ही आमची मनीषा पुरी केलीच. आम्हीं आमचीं नेसतीं लुगडीं एकमेकींना बदललीं. माझी इरकली काळी चंद्रकळा काकूंना मीं दिली व काकूंनीं चौकटीचें चाकोलेट इरकली लुगडें मला दिलें.

एक गम्मत त्या वेळची ओघानं आठवली म्हणून सांगतें. मी व काकू उंचीला व अंगलटीला जवळ जवळ सारख्याच होतों. आम्ही त्या दिवशीं

एकमेकींचीं बदललेलीं लुगडीं नेसलों होतों. आम्हांला त्या दिवशीं देवाला अगर बाहेर कुठंच जातां आलें नव्हतें, म्हणून मी त्यांच्या गच्चीवर येरझारा घालीत होतें. काकू, घाई असल्यामुळं खालच्या घरांत लवकरच, स्वयंपाकास लागल्या होत्या.

शाळा सुटून जे हे घरीं आले ते नेहमींच्या रिवाजाप्रमाणें गच्चीवरच येत होते वाटतें. मला पाठमोरी पाहतांच काकूच वर आहेत अशा समजुतीनें चपापले व धडधड जिना उतरीत खालीं आले. स्वयंपाकघरांत मी आहें (लुगड्याच्या अदलाबदलीमुळें) असं समजून ते खालीं जातां जातां जोरांत म्हणाले, "स्वयंपाक चांगला होऊं द्या हं बाईसाहेब. काका साधे आहेत, पण स्वयंपाकांत सारख्या खोडी काढीत असतात."

मी गच्चीवरून खालीं येतांच काकूंनीं ही घडलेली हकीगत सांगितली.

ज्या वेळेला मी झोपण्याकरतां आमच्या खोलींत गेलें तेव्हां ह्यांना पुन्हा एक धक्का बसला आणि म्हणाले, "तुमची लुगड्यांची आदलाबदली मला चांगलीच भोवली. संध्याकाळीं स्वयंपाक चांगला होऊं दे असं मीं काकूंनाच बजावलं. त्यांना काय वाटलं असेल बरं ? उद्यां माझ्या वतीनं तू त्यांची क्षमा माग हं."

तसं पाहिलं तर काकू मुलांच्या सावत्र आई होत्या, पण आई म्हणून घरांत आल्यापासून मुलांना स्वतःच्या पोटच्या पोराप्रमाणें त्या वागवीत असत. त्या दिवशीं घडलेला प्रसंग माझ्या मनांत कायमच राहिला आहे.

खेड्यामध्यें मुलं रस्त्यांतच पुष्कळ वेळां खेळत असतात. खेळतां खेळतां थत्त्यांचा धाकटा मुलगा बापू व गल्लींतील मुलं यांची भांडाभांडी झाली वाटतं. काका कोर्टांतून घरीं येतांच गल्लींतील मुलांनीं बापूची कागाळी काकांच्या कानावर घातली असावी. काका जे वर आले ते ओरडतच. "बाप्या, काय चालवलं आहेस" असं म्हणून हातांत असलेली काठी उगारून बापूवर धावून गेले. बापूसाहेब बसले होते मधल्या वेळचं खाणं खात. काठीचा मार चुकावा म्हणून पळूं लागले. त्या वेळेला काकूंनीं काकांची उगारलेली काठी वरच्यावर पकडून धरली. बापूला डाव्या हातानें पाठीशीं

... ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.

घालून म्हणाल्या, "माराल तर बघा हं. रस्त्यांतल्या पोरांचीं भांडणं मनावर घेऊन पोराला काय मारतां!" तेवढ्यानें काकांचं समाधान होईना. बापूचा सदरा धरून ते आपल्याकडे ओढूं लागले, "पुरे कैवार मुलाचा. माझ्यावर मात करती आहेस?" हे खोचक शब्द ऐकून काकू वाघिणीसारख्या खवळून म्हणाल्या, "मी त्याची आई आहें. मी या वेळेला तुम्हांला बापूला मारूं देणार नाहीं." काकूंची त्या वेळची चर्या व सडसडीत उत्तर ऐकून आम्ही तर अगदीं सर्दच झालों. काका बिचारे माघारेच फिरले. आचार्य अत्र्यांनीं म्हटल्याप्रमाणें 'स्त्री ही एक जन्माची पत्नी असते, पण अनंत काळची माता असते' हें अगदीं यथार्थ आहे.

थत्ते वकिलांच्या घराशेजारीं आम्हांला मिळावयाचें घर एकदाचें रिकामें झालें व आम्ही एका मुहूर्तावर आमचें बिऱ्हाड त्या नव्या घरांत थाटलें. घराची रंगरंगोटी व थोडीफार सजावटहि थत्ते कुटुंबांतील मुलांनीं हौसे-हौसेनें करून दिली.

आमची जागा येवल्यांतील घरांमध्यें बऱ्यापैकीं होती. माडीवरची जागा दहा पंधरा खण व खालीं तीन चार खण अशी जागा आम्ही वापरीत होतों.

आम्ही जेव्हां येवल्यांत आलों त्या वेळीं ह्यांचा पगार शाळेच्या चालकांनीं ७० रु. ठरविला होता. आतांच्या महागाईच्या मानानें त्या वेळच्या पदार्थांचे भाव कुठल्या कुठें होते. हे, मी व शंभू या तिघांचा निर्वाह चांगल्या प्रकारें ७० रुपयांत होत असे. चांगलें घर राहावयास, उत्तम तऱ्हेचें अन्न, व चांगली हवी, तसेंच तेथील बहुतेक मंडळींची स्नेहवर्धक वागणूक, यामुळें मी अगदीं खुषीत होतें. एक वर्षभर जेमतेम अशा तऱ्हेचा कार्यक्रम आमचा पार पडला.

पुढच्या वर्षीं जमेची बाजू बघतां राष्ट्रीय शाळेच्या खर्चाचा आंकडा परवडेल असं राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांना व चालकांना वाटेना. शाळेंतील पुढें दिलेले चार शिक्षक १ श्री. पां. श्री. आपटे (मुख्याध्यापक), २ श्री. का. र. वैशंपायन, ३ श्री. द. धों. पुराणिक व ४ श्री. उद्धव वामन भाटवडेकर

व गांवांतील ५।६ चालक मंडळी संस्थेचा कारभार चालवीत असत. श्रीमंत भागचंद शेट ह्यांनीं दिलेले वीस हजार रुपये त्यांच्याच पेढीवर व्याजी ठेवलेले होते. त्या वीस हजारांचें व्याज ९०० रुपये अव्याहत दरसाल राष्ट्रीय शाळा बंद होईपर्यंत मिळत होतें. हें शेटजींकडून येणारें व्याज व शाळा सुरू होतांना मिळालेल्या देणग्या यावर संस्थेचा एक वर्षाचा खर्च भागला असावा. खर्चाचा आढावा कार्यकारी मंडळानें घेतां तुटीचें बजेट पुढील वर्षाचें होऊं लागलें. ह्यांना प्रथमपासूनच एक गोष्ट खटकत होती, ती म्हणजे इतर शिक्षकांचा पगार ३० ते ४० व ह्यांचा पगार मात्र ७० रु. यांतील अंतर हें होय. हे संस्थेचे मुख्याध्यापक व पदवीधर असल्यामुळें चालकांनीं ७० रुपये पगार ह्यांचा असावा असें कायम स्वरूपाचें ठरविलेलें होतें.

घराची मालकीण कोण तर सर्वांच्या आधीं जी उठते व सर्वांचे पाठीमागून सर्व घराची देखरेख करून झोपते ती.तीच खरी मालकीण——खरी गृहिणी होय, अशी पूर्वींच्या लोकांची समजूत होती. त्याप्रमाणें ह्यांनीं कार्यकारी मंडळास आनंदानें सांगितलें कीं, सर्वच शिक्षकांनीं या वर्षापुरते थोडे थोडे पगार कमी घ्यावे व मलाहि त्यांच्याच पगाराचें स्केल लावावें, त्यांतच मला मोठें समाधान वाटेल. पुढच्या वर्षापर्यंत कांहींतरी पैसा जमविण्याचे प्रयत्न आम्ही शिक्षकवर्ग करूं व पुढल्या वर्षीं याविषयीं विचार करूं.

खर्चाची अडचण सर्वांना पटली होती व नवीन पैसा मिळविण्याचीं क्षेत्रें डोळ्यापुढें त्या घटकेला नसल्यामुळें सर्वांनाच ती मुख्याध्यापकांची सूचना मान्य झाली, व पुढच्या वर्षाचा पगार दरमहा तीस रुपयांच्यावर कोणासहि नव्हता. कांहीं शिक्षकांना तर वीस रुपये पगार घ्यावा लागला.

आम्हीं आमच्या जागेचें भाडें ९ रु. दरमहा देत होतों. ९ रु. घरभाडें वजा जातां एकवीस रुपयेच फक्त आमच्या हातांत राहूं लागले. अडचण आली म्हणजे कांहींतरी मार्ग मनुष्य काढतो, या न्यायानें उद्धव वामन भाटवडेकर हे शिक्षक आपल्या नूतन पत्नीसह आमच्या घरांतच राहूं लागले. त्या दोघांचे पंचवीस रुपये व आमचे २१ रुपये, एकंदर ४६ रुपयांत आम्ही पांच माणसें निर्वाह करीत होतों. लढाई नुकतीच झालेली असल्यामुळें त्या

वेळचे पदार्थांचे भाव हे महागाईंतच गणले जात होते. आम्हाला फार काटकसरीनें व हिशोबीपणानें वागून ते दिवस कंठावे लागले. कुठल्याहि कामाला नोकर आम्हीं त्या काळांत ठेवला नाहीं. मी व सौ. सगुणाबाई ( भाटवडेकरांच्या पत्नी ) भांडीं, धुणींपाणीं वगैरे स्वतःच करीत असूं. पाणी भरणें हें कष्टाचें काम नसून हौसेचा खेळच आम्हां चौघांस वाटत असे. त्या वर्षांत एक बोटभर चिंधी आम्हीं नवीन विकत घेतली नाहीं. शंभूसारखा गोड मुलगा घरांत असतांना कोणत्याहि तऱ्हेचा खेळ किंवा खाऊ घरांत आणण्याचा मोह आम्ही कटाक्षानें टाळत असूं. इतकेंच नव्हे तर भात एक वेळ करूनच आम्हीं आमचा चरितार्थ कसा तरी चालवीत होतों.

हे नेहमीं त्या वेळीं म्हणत, “ आपण जें जीवन आज कंठीत आहोंत त्याच्यापेक्षांहि कठीण दिवस कित्येक राष्ट्रीय शाळेचे शिक्षक काढीत आहेत. असहकारितेच्या तत्त्वामुळें अर्धवट शिक्षण सोडून तरुण मंडळी बाहेर पडली. कांहींचीं लग्नं झालेलीं आहेत तर कांहीं अविवाहित आहेत. देशाचा संसार सुखी करण्याकरितां आप्तेष्टांचा राग पत्करूनहि एकाकी जीवन व तेंहि पोट बांधून ती मंडळी कंठीत आहेत. त्या मानानें आपण कितीतरी सुखी आहोंत.” अशा तऱ्हेचीं उदाहरणें ह्यांनीं मला सांगितलीं म्हणजे कोणत्याहि तऱ्हेनें माझें संसारी सौख्य मला कमी वाटत नसे.

सर्वांचे पगार कमी केल्यामुळें एका वर्षाचा संस्थेचा खर्चवेंच भागण्याची शाश्वती चालकांना आली होती. पण पुढें काय ? या प्रश्नाचा विचार करितां दुसरे गांवीं जाऊन एकेका शिक्षकानें आळीपाळीनें कांहीं देणग्या मिळाल्यास मिळवून आणाव्या, त्याचप्रमाणें गांवांतील व परक्या गांवचे पाहुणे राष्ट्रीय शाळा पाहण्यास आल्यास त्यांच्या हातांत ‘ राष्ट्रीय शाळेच्या गरजा ’ हा कागद देऊन, मिळेल तो अल्पस्वल्प पैसा गोळा करावा असें ठरलें.

वर निर्दिष्ट केलेल्या विचाराप्रमाणें सर्व शिक्षक संस्थेकरतां जिथून पैसा मिळविणें शक्य होतें, तिथून तिथून पैसा आणण्याची पराकाष्ठा करीत असत. ह्यांचें व माझें तर लक्ष अशा तऱ्हेचे पैसे मिळविण्याकडे सारखेंच लागून राहिलें होतें. आमच्या घराण्यांत कोणाचें लग्न झालें, कोणाचें शुभ कार्य झालें तरी अल्पस्वल्प देणग्यांसुद्धां या राष्ट्रीय शाळेच्या मदतीकरतां

एकत्र होऊं लागल्या. येवल्यामध्यें लग्नांत अगर कोणत्याहि पंगतींत दक्षणा ठेवली गेल्यास ती सर्व दक्षणा एकत्र करून राष्ट्रीय शाळेला देण्याची प्रथा गांवांत पडून गेली होती. चातुर्मासाच्या नियमांचीसुद्धां मी व माझ्या परिचित भगिनी शाळेला उद्यापनार्थ देणग्या देऊनच सांगता करीत होतों.

एकदम माझ्या मनांत विचार स्फुरला कीं आपण कीर्तनें करून कांहींतरी पैसा राष्ट्रीय शाळेला मिळवून द्यावा. कीर्तन करण्याची थोडी-फार संवय मला या ५-६ वर्षांत झालेली होती. त्याचा उपयोग या कामीं करावा असें माझ्या मनानें घेतलें व ह्यांच्या संमतीनें येवल्यांतच तीन दिवस तीन कीर्तनें राष्ट्रीय शाळेच्या मदतीकरतां स्त्रियांमध्यें मीं केलीं. त्या तीन कीर्तनांचे २२॥ रुपये मला त्या वेळीं मिळाले व ते मला बऱ्यापैकीं वाटले. ते जसेच्या तसेच मीं ह्यांच्या स्वाधीन केले. २२॥ रुपये ह्यांच्या हातांत पडतांच ह्यांना एक प्रकारचा निराळाच आनंद झाला व हे एकदम म्हणाले, " बाळपणीं माझे लाड कोणीं पुरवले नाहींत, पण तूं आज माझे लाड पुरवीत आहेस. "

मला ह्यांच्या वाक्याचा अर्थ प्रथम लक्षांत आला नाहीं. परंतु दोन-तीन दिवसांपूर्वींच झालेली कार्यकारिणीची मीटिंग ह्यांनीं मला सांगितली. ह्यांना शिक्षणाकरितां हव्या असलेल्या दोन पुस्तकांची मागणी सभेमध्यें उचलून धरली गेली नव्हती व सध्यां या पुस्तकाची काय जरुर ! अशीहि चर्चा झाली होती. त्यामुळें हे जरासे हिरमुसलेच झालेले होते. त्यामुळें ही कीर्तनाची देणगी मिळतांच विशेष तऱ्हेचें समाधान ह्यांना मिळालें. ही देणगी ईयरमार्क करूनच ह्यांना हव्या असलेल्या दोन पुस्तकांसाठींच मीं चिटणिसांकडे पाठवून दिली. पुस्तकेंहि मिळालीं व मला पावतीहि मिळाली. पावतीमध्यें मोकळ्या मनानें देणगीबद्दल कौतुक करून चिटणिसांनीं आभार मानलेले होते, त्यामुळें अशा तऱ्हेची राष्ट्रीय शाळेला मदत करण्याची उभारी मला अधिक अधिक वाटूं लागली.

ह्यांना हवीं असलेलीं शिक्षणाचीं दोन पुस्तकें नामंजूर झाल्यापासून ह्यांनीं शिक्षणाच्या पुस्तकांकरितांच आमच्या आप्तइष्टांपासून कधीं पन्नास-साठ रुपये,

शंभर रुपये अशा तऱ्हेच्या देणग्या मिळवल्या. शिक्षणाच्या पुस्तकांमध्यें हे अहर्निश गुंग असत. विद्वान् मित्रांच्या परिचयांतूनच शैक्षणिक फायदा हे करून घेत. विविध विषयांची माहिती घेऊन त्या त्या विषयांचीं उत्तम पुस्तकें आपल्या शाळेंत असावीं, आपल्या सहकारी बंधूंना व बालगोपालांना सर्व तऱ्हेच्या ज्ञानाचा फायदा व्हावा म्हणून अहर्निश ह्यांची खटपट चालू असे.

राष्ट्रीय शाळेविषयीं ते सद्भावनेनें जे जे बेत करीत असत व चालकांपुढें, समाजापुढें व बालवृंदापुढें मांडीत असत त्या त्या वेळेला त्यांच्या सद्भावनेचें गम्य न समजून अगर विरोध करावयाचा म्हणून विरोध, केव्हांहि कोणीं केला तर लोकांना अद्वातद्वा न बोलतां घरीं आल्यानंतर एकदम ह्यांच्या संतापाचा अतिरेक होऊन पुष्कळ वेळा दारावर थडाथड लाथा मारण्यास हे सुरुवात करीत. पाणी पिण्यास मागितल्यावर पाणी प्याल्यानंतर पिण्याचें भांडें कोणत्या तरी कोपऱ्यांत लहरीसरसें भिरकावून देत असत. असा प्रकार माझ्या दृष्टोत्पत्तीस आला म्हणजे कांहींतरी बाहेर यांचें तंत्र बिघडलें आहे हें समजून घेऊन मी स्वस्थ उभी राहात असे. त्या वेळीं बोलण्याचें धारिष्ट्य मला होतच नसे. घरामध्यें कोणी आणखी नातलग मंडळी असली तर ती सुद्धां हा अनपेक्षित प्रकार पाहून जागच्या जागीं स्तब्ध होत. ५–७ मिनिटें अशा परिस्थितींत घालविल्यानंतर जरा ह्यांच्या रागाचा पारा खालीं उतरे व स्वतःशींच कधीं आम्हांला सांगत आहेत अशा कल्पनेनें त्यांचे तापलेले विचार —राष्ट्रप्रेमानें ओतप्रोत भरलेले —आम्हांस अशाच वेळीं ऐकण्यास मिळत.

ते त्या वेळेला घाईघाईनें सांगत, "राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय या लोकांना खेळ वाटतो ? पुढच्या इमारतीचा हा पाया आहे. हा भरतांना आम्हीं जर कुचराई केली तर पुढचें टोलेजंग ध्येय कसें पेलतां येईल ! नुसतं वंदे मातरम् म्हटलं व सूर्याला नमस्कार घातले म्हणजे राष्ट्रीय शिक्षण होत नाहीं. त्याकरितां आम्हीं घेतलेलें शिक्षण कधींच पुरें पडणार नाहीं. आमची झुंज बुद्धिवान् व शिस्तशीर ब्रिटिश सरकारशीं आहे. याचा विचार या लोकांना कसा समजत नाहीं ? आमच्याजवळ बरीच तयारी कोणत्याहि विषयाची असेल तरच थोडेंतरी आम्ही दुसऱ्यास शिकवूं शकूं. आम्ही आहों इथंच राहिलों तर आमची ही प्रगति होणार नाहीं, व मग आम्ही मुलांची प्रगति काय करणार ?"

असा एखादा दिवस ह्यांचा निराशेंत गेला म्हणजे मी ह्यांना सहजच म्हणे, " तुमच्या डोक्याला जर इतक्या तऱ्हेचा त्रास सोसत नसेल, तर आपण इथं राहिलंच पाहिजे असं कोणत्या देवानं सांगितलं आहे ? तुम्ही ग्रॅज्युएट आहांत—कोठेंहि पोटापुरतें मिळवूं व सुखानें राहूं !" आणि त्याचप्रमाणें मी शंका म्हणून त्यांना विचारी, " हीं तुमच्या शाळेंतील लहान मुलें—त्यांतल्या त्यांत मोठीं म्हटलीं तरी १४-१५ वर्षांचीं हीं मुलें राष्ट्राकरितां काय करणार तरी ?" अशा तऱ्हेचे प्रश्न मीं विचारले असतांना झटपट माझा नूर पालटून टाकण्याकरितां त्यांचा प्रयत्न चाले. ते म्हणत, " अग, इथं सुरू असलेली राष्ट्रीय शाळेची संस्था ही सर्चलाईटप्रमाणें आहे. जवळच्यापेक्षां दुसऱ्या प्रदेशावर प्रकाश केव्हां केव्हां अधिक पडतो त्याप्रमाणें आम्ही चिमुकल्या मुलांना आस्थेनें दिलेलें शिक्षण बाहेर कुठं तरी प्रभावी झाल्यावांचून राहणार नाहीं. सर्व राष्ट्रीय शाळा जें शिक्षण आपल्या गांवाकरितां म्हणून देत आहेत तें आणीबाणीच्या वेळीं देशाकरितां ठरण्याचा संभव आहे. रेडिओ स्टेशनमध्यें वक्त्याचा आवाज शेजारच्या खोलींत ऐकूं जात नाहीं, पण रिसीव्हिंगवर तर हजारों मैलांवर, तें भाषण आपण स्पष्ट ऐकूं शकतों. संस्था सुरू असली की, कुणीतरी स्फूर्ति घेईल हा मला भरवसा आहे पण—"

" या ' पण 'नींच तर माझ्या व तुमच्या डोक्याला नवा उद्योग होतो, व स्थैर्य असें वाटतच नाहीं."

अशा वेळीं त्यांनीं मला सहज पटण्यासारखा मातेचा दृष्टान्त द्यावा. " अग, नवीन अपत्याच्या जन्माच्या अगोदर व मग मातेच्या देहांत केवढी गडबड व तज्जन्य दुःखें उत्पन्न होतात. तशीच राष्ट्रीय शाळेची नवीन कल्पना—नवीन शिक्षण पद्धति जन्मास येण्याच्या वेळीं राष्ट्रमातेच्या शरीरांत—पर्यायानें संस्थेच्या शरीरांत खळबळ झाली तर नवल काय !" पुढें हसून म्हणत, " अशी संस्थेंत गडबड झाली तरी मी न डगमगतां तुमची घरांतील मंडळींची गडबड करतां कामा नाहीं हें मला समजतें, परंतु माझ्या मनांतील सर्व तऱ्हेची खळबळ मी कोणाजवळ सांगूं ? व तुझ्यावांचून माझें कोण ऐकून घेणार, सांग बरं ?"

महात्मा गांधींच्या असहकार चळवळीला सहकार करण्याच्या मुख्य हेतूनें चहूंकडे एकाच काळांत एकाच ध्येयानें बहुतेक एकाच साच्याच्या शाळा निर्माण झाल्या. आमच्या राष्ट्रीय शाळेमध्यें अंदाजें शंभर ते दीडशें मुलें नेहमीं असावयाचीं. या राष्ट्रीय शाळेचें स्वरूप शैक्षणिक आणि राजकीय मुख्यतः होतें. व्यापक अर्थानें त्या धर्म-संस्थाहि होत्या. त्या त्यागवृत्तीनें चालविल्या जात असल्यानें त्यांना एक प्रकारचें पावित्र्य प्राप्त झालें होतें.

येवल्यासारख्या तालुक्याच्या गांवांत सुशिक्षित व सुबुद्ध लोक किती बरे असणार ? राष्ट्रीय शाळेंत मुलें पाठविणाऱ्या पालकांचा पहिला विचार म्हणजे धर्मशिक्षण. हें सरकारी शाळेंत मिळत नाहीं, तें येथें मिळावें म्हणून आपलीं मुलें राष्ट्रीय शाळेंत ते पाठवीत असत.

बुद्धिजीवी वर्गापेक्षां श्रमजीवी मुलेंच राष्ट्रीय शाळेचा गाभा झाला होता. बुद्धिजीवी वर्गांतील मुलें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं, नव्हे त्याहिपेक्षां कमी प्रत्येक वर्गात होतीं. त्याचें कारण सरकारनें मान्य केलेली ही शाळा नव्हती, इतकेंच नव्हे तर सरकारच्या विरुद्ध, म्हणूनच या राष्ट्रीय शाळेचा जन्म झालेला होता, त्यामुळें गांवांतील सरकारी नोकरांचीं मुलें आमच्या शाळेंत येणें शक्यच नव्हतें. वकीलवर्गाचीं भावनेसरशीं राष्ट्रीय शाळेंत घातलेलीं मुलें सरकारी डिग्रीची उपाधी या शाळेंतून घेतलेल्या शिक्षणांतून मिळणार नाहीं, इतकेंच नव्हे तर कदाचित् भलत्याच उपाधींत आपलीं मुलें राष्ट्रीय शाळेमुळें पडतील अशा तऱ्हेची भीति पालकांना वाटत असावी.

त्याचप्रमाणें राष्ट्रीय शाळेचें स्वरूप गांवांतील कित्येक अज्ञ लोक खाजगी शाळा येवढेंच समजत असत, त्यामुळें सवडीनेंच मुलें शाळेंत पाठविणें, वर्गास लागणारीं पुस्तकें सवडीनें घेणें, इतकेंच नव्हे तर महिन्याची फी-सुद्धां सवडीनें भरल्यास हरकत नाहीं, अशा तऱ्हेची कल्पना गांवांतील कित्येक लोकांची प्रथम प्रथम होती. अशा तऱ्हेचा शाळेचा व्याप ह्यांच्यामागें लागला व माझा घरसंसार माझ्यामागें लागला.

तालुक्याच्या गांवामध्यें माझ्याइतपत पुस्तकी शिक्षण शिकलेल्या स्त्रिया त्या वेळीं फारच थोडया होत्या.

लहानशा गांवांत मी व माझ्या बरोबरीच्या कांहीं मैत्रिणी याच काय त्या शहाण्या ठरत होतों. शहाण्या ठरल्यानंतर शहाण्या होण्याची जबाबदारी आपोआपच माझ्यावर पडली. त्यामुळें बुद्धीला वाव व कार्याला क्षेत्र आणि विकासाला भरपूर संधि अशी परिस्थिति असल्यामुळें माझी थोडी फार प्रगति होऊं शकली.

## १४

खेड्यांतील जनता सर्वसाधारणपणें मोकळ्या मनानें वागते. हे व मी कोणाच्याहि घरीं कारणपरत्वें गेलों म्हणजे अत्यंत प्रेमळ व खेळीमेळीची वागणूक आम्हांस मिळत असे. थोड्याशा केलेल्या कामाचें चीज दामदुप्पट आमच्या पदरांत ही जनता टाकीत असे. राष्ट्रीय शाळेंतून मुलें काढून जरी दुसऱ्या गांवीं सरकारी शाळेंत कांहीं लोकांनीं घातलीं तरी राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांबद्दल नितांत आदर त्या लोकांत दिसून येई. वाटेंतून जात असतांना लोकांनीं केलेला नमस्कार लौकिकी नसून अंतःप्रेरणेंतून निर्माण झालेला असे. मुलाच्या पाठीवर आईनें दिलेली शाबासकी मुलाला जशी आनंदी व उत्साही करते, त्याचप्रमाणें गांवांतील लोकांची राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांशीं असलेली आदरणीय वागणूक शिक्षकांना अधिक उत्साही करीत असे यांत शंका नाहीं.

शेजारधर्माच्या दृष्टीनेंहि आवतींभोंवतीं असलेल्या बिऱ्हाडांची वागणूक खेड्याच्या स्वभावधर्माप्रमाणें खेळीमेळीची असावयाची. कोणत्याहि कामाला

महात्मा गांधींच्या असहकार चळवळीला सहकार करण्याच्या मुख्य हेतूनें चहूंकडे एकाच काळांत एकाच ध्येयानें बहुतेक एकाच साच्याच्या शाळा निर्माण झाल्या. आमच्या राष्ट्रीय शाळेमध्यें अंदाजें शंभर ते दीडशें मुलें नेहमीं असावयाचीं. या राष्ट्रीय शाळेचें स्वरूप शैक्षणिक आणि राजकीय मुख्यतः होतें. व्यापक अर्थानें त्या धर्म-संस्थाहि होत्या. त्या त्यागवृत्तीनें चालविल्या जात असल्यानें त्यांना एक प्रकारचें पावित्र्य प्राप्त झालें होतें.

येवल्यासारख्या तालुक्याच्या गांवांत सुशिक्षित व सुबुद्ध लोक किती बरे असणार ? राष्ट्रीय शाळेंत मुलें पाठविणाऱ्या पालकांचा पहिला विचार म्हणजे धर्मशिक्षण. हें सरकारी शाळेंत मिळत नाहीं, तें येथें मिळावें म्हणून आपलीं मुलें राष्ट्रीय शाळेंत ते पाठवीत असत.

बुद्धिजीवी वर्गापेक्षां श्रमजीवी मुलेंच राष्ट्रीय शाळेचा गाभा झाला होता. बुद्धिजीवी वर्गांतील मुलें हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं, नव्हे त्याहिपेक्षां कमी प्रत्येक वर्गात होतीं. त्याचें कारण सरकारनें मान्य केलेली ही शाळा नव्हती, इतकेंच नव्हे तर सरकारच्या विरुद्ध, म्हणूनच या राष्ट्रीय शाळेचा जन्म झालेला होता, त्यामुळें गांवांतील सरकारी नोकरांचीं मुलें आमच्या शाळेंत येणें शक्यच नव्हतें. वकीलवर्गाचीं भावनेसरशीं राष्ट्रीय शाळेंत घातलेलीं मुलें सरकारी डिग्रीची उपाधी या शाळेंतून घेतलेल्या शिक्षणांतून मिळणार नाहीं, इतकेंच नव्हे तर कदाचित् भलत्याच उपाधींत आपलीं मुलें राष्ट्रीय शाळेमुळें पडतील अशा तऱ्हेची भीति पालकांना वाटत असावी.

त्याचप्रमाणें राष्ट्रीय शाळेचें स्वरूप गांवांतील कित्येक अज्ञ लोक खाजगी शाळा येवढेंच समजत असत, त्यामुळें सवडीनेंच मुलें शाळेंत पाठविणें, वर्गास लागणारीं पुस्तकें सवडीनें घेणें, इतकेंच नव्हे तर महिन्याची फी-सुद्धां सवडीनें भरल्यास हरकत नाहीं, अशा तऱ्हेची कल्पना गांवांतील कित्येक लोकांची प्रथम प्रथम होती. अशा तऱ्हेचा शाळेचा व्याप ह्यांच्या-मागें लागला व माझा घरसंसार माझ्यामागें लागला.

तालुक्याच्या गांवामध्यें माझ्याइतपत पुस्तकी शिक्षण शिकलेल्या स्त्रिया त्या वेळीं फारच थोड्या होत्या.

लहानशा गांवांत मी व माझ्या बरोबरीच्या कांहीं मैत्रिणी याच काय त्या शहाण्या ठरत होतों. शहाण्या ठरल्यानंतर शहाण्या होण्याची जबाबदारी आपोआपच माझ्यावर पडली. त्यामुळें बुद्धीला वाव व कार्याला क्षेत्र आणि विकासाला भरपूर संधि अशी परिस्थिति असल्यामुळें माझी थोडी फार प्रगति होऊं शकली.

## १४

खेड्यांतील जनता सर्वसाधारणपणें मोकळ्या मनानें वागते. हे व मी कोणाच्याहि घरीं कारणपरत्वें गेलों म्हणजे अत्यंत प्रेमळ व खेळीमेळीची वागणूक आम्हांस मिळत असें. थोड्याशा केलेल्या कामाचें चीज दामदुप्पट आमच्या पदरांत ही जनता टाकीत असे. राष्ट्रीय शाळेंतून मुलें काढून जरी दुसऱ्या गांवीं सरकारी शाळेंत कांहीं लोकांनीं घातलीं तरी राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांबद्दल नितांत आदर त्या लोकांत दिसून येई. वाटेंतून जात असतांना लोकांनीं केलेला नमस्कार लौकिकी नसून अंत:प्रेरणेंतून निर्माण झालेला असे. मुलाच्या पाठीवर आईनें दिलेली शाबासकी मुलाला जशी आनंदी व उत्साही करते, त्याचप्रमाणें गांवांतील लोकांची राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांशीं असलेली आदरणीय वागणूक शिक्षकांना अधिक उत्साही करीत असे यांत शंका नाहीं.

शेजारधर्माच्या दृष्टीनेंहि आवतींभोंवतीं असलेल्या बिऱ्हाडांची वागणूक खेड्याच्या स्वभावधर्माप्रमाणें खेळीमेळीची असावयाची. कोणत्याहि कामाला

सतत तयारी, परोपकारबुद्धि, गोड बोलणें, व गोड वागणें हे शेजारधर्माला आवश्यक असणारे गुण तेथें मला अमूप मिळाले.

आई जशी मुलाकरितां काढलेल्या कष्टाची किंवा केलेल्या कामाची मनामध्येंदेखील कधींहि नोंद करीत नाहीं त्याप्रमाणेंच कोणाबद्दल केलेल्या कामाचा पाढा खेड्यांतील मंडळी कधींच वाचीत नाहींत. इतकेंच नाहीं तर आपण त्यांच्या केलेल्या कामाबद्दल आभार मानूं लागलों तर तो त्यांना परकेपणा वाटूं लागतो. एकंदरींत चांगले शेजारीं सहवासांत आल्यामुळें मला माझ्या स्वभावाची बैठकहि तशाच तऱ्हेची ठेवावी लागली. त्याकरितां मला स्वतंत्र असे कांहीं प्रयत्न करावेच लागले नाहींत.

मुख्यतः राष्ट्रीय शाळा ज्या निघाल्या त्यांचें धोरण " आम्ही आमचे मालक आहोंत, आम्हांला हवें तें शिक्षण घेऊं व देऊं, " हेंच मुख्यत्वें असे. ब्रिटिश सरकारची मदत घेतल्यावांचून संपूर्ण स्वावलंबनानें शाळा चालवितां येते हाहि एक राष्ट्रीय शाळा काढण्याच्या पाठीमागचा हेतु होता. त्यामुळें राष्ट्रीय शाळेचे शिक्षक कमी पगारावर उत्साहानें व नेटानें सतत काम करीत असत.

त्याचप्रमाणें सरकारी शाळेमध्यें सर्व विषय इंग्रजींतून शिकविले जातात, त्यामुळें परक्या भाषेच्या दडपणाखालीं आमची भाषा व आमच्या मुलांची बुद्धि दडपली जाते. याकरितां राष्ट्रीय शाळेंत मातृभाषा म्हणजे मराठी हें राष्ट्रीय शाळेचें माध्यम ठरलें. या भाषेंतूनच सर्व विषय राष्ट्रीय शाळेंत शिकविले जात. इंग्रजी भाषादेखील चांगल्या तऱ्हेनें शिकविली जात असे. तिचें गुणवर्णन मुलांना शिक्षकवर्ग पटवून देत असे. पण त्याच वेळीं त्या भाषेची लुडबुड सारखी आपल्या घरांत नसावी, अशा तऱ्हेचा राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांचा कटाक्ष होता. हिंदी भाषेलाहि प्रमुख स्थान हलकें हलकें प्राप्त होत होतें. इतिहास हा विषय फार खोल बुद्धीनें राष्ट्रीय शाळेंत त्या वेळीं शिकविला जात असे. इतिहास हा पुन्हा पुन्हा घडत असल्यामुळें साधनें वेगळीं असलीं तरी मनुष्याच्या मनांत स्थायी भावाचे असलेले गुण, धैर्य, चिकाटी, प्रसंगावधान, स्वाभिमान वगैरे गुण माणसांत नसतील तर राजकीय

क्रांति कधींच होऊं शकणार नाहीं. त्यामुळें इतिहासाचीं मर्मस्थानें बोट दाखवून मुलांना समजावून सांगणें हें राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांचें आवडीचें काम होतें.

सरकारी शाळेमध्यें त्या वेळीं तरी मुलांच्या शारीरिक शिक्षणाची आबाळच होती म्हटलं तरी चालेल. लोकांनीं आपलीं मुलें तालमींत पाठवून मलखांब, कुस्त्या, जोडजोडी, बैठका वगैरे शिक्षण दिलें तर त्या वेळचें सरकार बादरायण संबंध लावून त्या मुलांना व त्यांच्या पालकांना त्रास दिल्यावांचून राहात नसे. कांहीं सरकारी हायस्कुलांतून खेळ खेळण्याची सक्ती असे, पण ते सगळे खेळ इंग्रजी धर्तीचे व महागाईचे असल्यामुळें जरा जडच वाटत. त्यामुळें राष्ट्रीय शाळेमध्यें प्रार्थना झाल्यानंतर बारा नमस्कार घालण्याचीहि प्रथा पडलेली होती. राष्ट्रीय शाळेची वेळ सकाळीं ७ ते ११ व दुपारीं २ ते ५ नेहमीं असल्यामुळें त्याच रीतीनें अभ्यासाची व व्यायामाची आणि हस्ताव्यवसायाची मांडणी केलेली असे. संध्याकाळीं शाळा सुटल्यावर मुलें व शिक्षक गांवाच्या बाहेर असलेल्या क्रीडांगणांत सात वाजेपर्यंत रोज जावयाचींच. हुतुतू, आट्यापाट्या, खोखो हे खेळ मुख्यतः खेळले जात. त्यामुळें शारीरिक शिक्षणाची जोपासना या शाळेंत चांगल्या प्रकारची होई.

कोणत्याच उद्योगाचे प्रयोग राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांच्या व चालकांच्या मनांत असूनहि येवल्यांत करतां आले नाहींत आणि त्यांतल्या त्यांत आमच्या येवल्याची परिस्थिति शहरी नसल्यामुळें बहुतेक मुलांचे पालक कांहींतरी एक उद्योगधंदा म्हणून विशेष स्वरूपांत करीतच असत. विणकर, तेली, कोष्टी, साळी, तांबोळी, रंगारी, सुतार, कुंभार वगैरे उद्योग सुरूच असत.

त्यामुळें या राष्ट्रीय शाळेनें महात्मा गांधींचा आवडता उद्योग सूत कातणें व तें विणणें असे दोन्ही उद्योग मुलांकरतां प्रयोग म्हणून का होईना निष्ठेनें उचलले होते.

आमच्या शाळेंतील पांच सहा शिक्षकांची जी जोड शाळेला लाभली होती ती अपूर्व होती. संस्कृत भाषा राष्ट्रीय शाळेंत नसली तर पदार्थांचें मीठच तोडल्यासारखें झालें असतें. संस्कृत भाषा आमच्या शाळेंत शिकविण्याकरितां रा. वैशंपायन गुरुजी सतत तत्परतेनें मेहनत घेत असत.

सूतकताई व विणाई हे श्री. ल. ब. कुलकर्णी यांचें आवडचिंच काम होतें. अशा रीतीनें राष्ट्रीय शाळेनें आखलेले विषय मुलांच्याकडून पुरे करून घेण्यास शिक्षकांची संघटना पुरेपूर होती.

एखादा विशेष विषय—फर्स्ट एड, शारीरिक शिक्षण वगैरे—शिकविण्याची जरूर पडल्यास गांवांतील तज्ज्ञांची मदत मिळविणें, त्यांच्याशीं गोड बोलून प्रेमानें काम करून घेणें हें विशेष काम मुख्याध्यापकांकडेच पर्यायानें येत असे. ह्यांचा गोड व हुकमी प्रेमळपणा अशा कामीं सदोदित उपयोगीं पडे.

एकंदरींत राष्ट्रीय शाळेच्या शिक्षणाचा आढावा घेतल्यास स्वदेश, स्वभाषा, स्वसंस्कृति व स्वधर्म यांबद्दल योग्य तो मुलांत अभिमान शिक्षकांकडून उत्पन्न केला जात असे. नैतिक आणि धार्मिक भावना यांना वळण लावण्याचें महत्त्वाचें कामहि शिक्षकवर्गास करावें लागे. स्नानसंध्या करणें ही जरी धर्मांत मोडणारी गोष्ट असली, तरी ती आचारधर्मास पुष्टी देणारी आहे, त्यांतच आनंद मानून धार्मिक हें नांव घेतां येत नाहीं. मानवी धर्म व नैतिक मूल्यें ही माणसाची परमोच्च पायरी आहे, तरी पण सामाजिक उन्नतीची पहिलीच पायरी आहे, हें ह्यांचें नेहमींचेंच विधान असे. कोणतीहि धार्मिक गोष्ट माणसानें आचरतांना स्वतःचें समाधान, पण त्याच वेळीं समाजाचें कोणतेंहि नुकसान होत नाहीं ना ? हें पाहूनच पावलें टाकावींत. अशा तऱ्हेची भाषणें खाजगी बैठकींत संधि मिळेल तेव्हां विद्यार्थ्यांच्या मनावर सतत बिंबविण्याचा हे प्रयत्न करीत असत.

ती. दादांना—माझ्या वडिलांना—बरें नाहीं अशा तऱ्हेचें पत्र आल्यावरून मीं पुण्यास जाऊन येण्याची इच्छा ह्यांच्याजवळ प्रदर्शित केली व ह्यांनींहि आढेवेढे न घेतां ताबडतोब मला परवानगी दिली. तसं पाहिलं तर मला माहेरीं पाठविण्याला केव्हांहि ह्यांची आडकाठी नसे. साधकबाधक गोष्टींचा विचार करण्यास तूं समर्थ आहेस असं सांगून माहेरीं जाणें अगर परत येणें याची बहुतांशानें जबाबदारी हे माझ्यावरच टाकीत असत.

माझें या वेळचें पुण्यास राहणें नाहीं म्हटलें तरी दहाबारा दिवस झालें होतें. मे महिन्यांच्या सुट्टीमध्यें मी बहुतेक पुण्यास येत असें. कांहीं कारणांनीं

मध्यंतरीं मी माहेरीं गेल्यास दोन दिवसांच्यावर पुण्यास मुक्काम करीत नसें. या वेळेला आठ दिवस राहून मी येवल्यास गेल्यावर कांहींतरी निराळाच प्रकार ह्यांच्या डोक्यांत घोळत असावा असें माझ्या लगेच दृष्टीस आलें.

या ८।१० दिवसांत थत्ते वकिलांनीं दोन्ही वेळ जेवणाचें आमंत्रण अगत्यानें दिलें असतांनाहि ह्यांनीं तें नाकारलें होतें. 'माणसामध्यें थोडें तरी स्वावलंबन नको का? तुमची मैत्रीण माहेरीं गेली कीं, मी तुमच्या घरीं जेवण्यास यावें हें मला बरं वाटत नाहीं.' अशा तऱ्हेची समजूत माझ्या मैत्रिणीची ( थत्तेकाकूंची ) ह्यांनीं काढली. मी पुण्याहून परत आल्याबरोबर दुसरी एक महत्त्वाची गोष्ट माझ्या लक्षांत आली. तीं म्हणजे पंधरा दिवसांकरितां धुणंभांड्याच्या मोलकरणीसहि ह्यांनीं रजा दिली होती. विहिरीचें पाणी काढणें, स्वतःचें धोतर, सदरा व टॉवेल हे कपडे धुणें, त्याचप्रमाणें जळकीं खरकटीं भांडीं घरांतील मोरींत कोणाला न कळावें म्हणून रात्रीं घासणें हा क्रम ठेवला होता म्हणे. त्याचप्रमाणें घरीं शिकण्यास येणारीं मुलं ह्यांच्याविरुद्ध तक्रार म्हणून मी परत आल्यावर मला सांगूं लागलीं, "काकू, गुरुजी दुपारीं नुसते ३ गाकर करून मिठाशीं खात असत व संध्याकाळीं मुगाच्या डाळीची खिचडी फक्त मीठ घातलेली खात. इतकेंच नाहीं तर सकाळचें दूधसुद्धां गुरुजींनीं कधीं घेतलेलें आम्हीं पाहिलें नाहीं." अशा तऱ्हेची मुलांनीं दिलेली कळकळीची माहिती ऐकून मला जरी वाईट वाटलें तरी मी घरांत आल्याबरोबर रोजच्यासारखा आमचा कार्यक्रम सुरू झाल्यामुळें मला ती बोंच फारशी बोंचत राहिली नाहीं.

मला पुण्याहून येऊन २-३ दिवस झाल्यावर ह्यांच्या बोलण्यामध्यें कांहीं तरी निराळाच वास येऊं लागला. कोणत्या तरी गोष्टीचा हे खोल विचार करीत आहेत असें मला कळून आलें.

ह्यांनीं मला एक दिवस एकदमच विचारलें, "मी जर तुरुंगांत गेलों तर तूं त्या काळामध्यें काय करशील?" मला या प्रश्नाचा भावार्थ बिलकुल समजला नाहीं, व मीं एकदम उत्तर दिलें, "आपण ज्या कारणाकरितां तुरुंगांत जाल तें कारण सतत डोळ्यांपुढें ठेवून वागेन."

मराठी ग्रंथ सं... ठाणें. स्थळप्रत.

" मला आपल्या प्रश्नाचें कोडेंच उलगडत नाहीं. आपणावर तुरुंगांत जाण्याची वेळ कशाकरितां प्राप्त झाली आहे, हें माझ्या कांहींच लक्षांत येत नाहीं, " असेंहि मीं ह्यांना विचारिलें.

त्या रात्रीं मुळशी सत्याग्रहाची साद्यंत हकीगत मला ह्यांनीं समजावून सांगितली. ते तावातावानें मला सांगत होते, " ब्रिटिश सरकारनें चारी बाजूंनीं मुस्कटदाबी करण्याचा विडाच उचललेला दिसतो. हें पाहा मुळशीचें धरण. कदाचित् त्या धरणापासून जनतेचा पुढें फायदाहि असेल, पण आज पुण्याजवळील मुळशी पेठ्यामध्यें टाटा मावळ्यांच्या जमिनी त्यांना विचारास योग्य मुदत देखील न देतां काबीज करीत आहे. इतकेंच नाहीं तर सरकार 'टाटा'ला पाठबळ देऊन गरीब मावळ्यांवर अन्याय करीत आहे. येवढेंच नव्हे तर जमिनीच्या मोबदल्याच्या रूपांत अतिशय थोडी रक्कम टाटा देत आहे. सिद्ध आणि साधकाचा हा खेळच सुरू आहे. अशा वेळीं सरकारी अन्यायाची चीड महाराष्ट्रीयांस येणार नाहीं तर व कांहीं तरी हात-पाय आम्ही हलवणार नाहीं तर मेलेल्या आईचें दूध प्यायल्यासारखेंच आम्ही सारे होऊं, नाहीं का ? "

इतक्या तऱ्हेची मुळशीच्या धरणाची हकीगत मला सांगून सेनापति बापटांनीं अन्यायाच्या प्रतिकारार्थ सत्याग्रह शिबिरहि पुण्यास स्थापन केल्याची हकीगत हळूहळू सांगितली.

" कांहीं कांहीं सत्याग्रही युवक ठराविक काळानें पाठविण्याची आंखणी-सुद्धां पुण्याच्या लोकांनीं केलेली आहे. त्यांत आपलें नांव द्यावें व योग्य वेळीं सत्याग्रह करावा असा माझा विचार सारखा सुरू आहे, पण तुझ्या संमतीवांचून मला कोणतीच गोष्ट करावयाची नसल्यामुळें मी एकदम कोणताच निर्णय घेणार नाहीं. राष्ट्राची अडचणीची वेळ समजण्याची तुला पात्रता आहे, व माझ्या कार्यावर तुझी निष्ठा आहे, हें माझ्या लक्षांत आल्या-मुळेंच आज मी मन मोकळें करीत आहें. "

" मी आतां कांहींच सांगूं शकत नाहीं. मी याचें उत्तर उद्यां देईन " असें सांगून तो संवाद तेथेंच थांबविला. त्यांना गाढ झोप लागली. मलाहि कांहीं काळानें झोप लागली, पण त्या झोपेंतहि लोकांनीं केलेला सत्याग्रह व पोलिसांची दंडेली डोळ्यांपुढें येऊन मी सारखी दचकत होतें.

दुसऱ्या दिवसाचा सबंध दिवस मीं याच विचारांत काढला. आदल्या दिवसाच्या रात्रीं झोपेंत दिसलेल्या दृश्यामुळें मी जर सारखी दचकत होतें तर प्रत्यक्ष प्रसंगांत माझी काय अवस्था होईल हा विचार मला भेडसावीत होता.

माझी खात्री होती ह्यांनीं मनांत घेतलेली गोष्ट कधींहि केल्यावांचून राहणार नाहींत व त्यांची विचारसरणी राष्ट्राच्या दृष्टीनें काय चुकीची आहे ? पण—

ह्यांची नाजूक शरीरयष्टि व आतांपर्यंतचे सुखांत काढलेले दिवस याची मुख्यतः काळजी वाटत होती. पण हे सत्याग्रहास गेल्यास माझे सासर-माहेरचे सर्व नातलग ह्यांना कसी लेखतील व ह्यांनीं केलेल्या कार्याची हेटाळणी करतील. हाच विचार मला सारखा त्रास देत होता. तिसरी गोष्ट म्हणजे मुलांना शिक्षण देण्याकरितां पत्करलेला पेशा जर वेळोवेळीं खंड पावूं लागला तर आपलं येवल्यांतलं स्थान—आपली राष्ट्रीय शाळा शिल्लक राहील का ? व गांवकरीहि या राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांना हसल्यावांचून राहणार नाहींत का ? हा मुख्य विषय मला चैन पडूं देईना.

त्याचप्रमाणें ह्यांनीं सत्याग्रह केल्यावर ह्यांचे तुरुंगांत होणारे हाल मला जरी माहीत नव्हते, तरीं तुरुंग म्हणजे कांहीं सुखाचें स्थान नव्हें एवढें तरी मी समजूं शकत होतें. त्याच वेळीं मी व माझ्या छोट्या मुलांनीं कोठें राहावें व काय करावें ? असे अनंत प्रश्न मला योग्य असें उत्तर काढूंच देईनात. कुठल्याहि बाजूनें कुठल्याहि प्रश्नाचा मी विचार करूं लागलें तरी मला नको–नको–हींच उत्तरें माझ्या मनाचीं सारखीं मिळत होतीं. दुसऱ्या दिवशीं रात्रींच ह्यांनीं पुन्हा कालचाच संवाद सुरू केला. मी त्याचें उत्तर त्या दिवशीं शब्दानें देऊं शकलें नाहीं. माझा गळा दाटून येत होता. डोळ्यांतून अश्रु वाहत होते, पण तोंडांतून एकहि शब्द उत्तरादाखल मी देऊं शकलें नाहीं.

मीं २।३ दिवस या प्रश्नाचें उत्तर देण्याचें चुकवीत होतें, पण एक दिवस आम्ही फिरावयास गेलों असतांना संध्याकाळीं ह्यांनीं मुळशी सत्याग्रहाच्या प्रश्नास पुन्हा सुरुवात केली.

माझ्या डोक्यांत घोळत असलेले विचार मीं ह्यांना सविस्तर सांगितले. ह्यांनीं मला मुख्यतः एका मुद्द्यावर उत्तर दिलें. "एकदा ध्येय ठरल्यानंतर ध्येयावर नजर ठेवून साधन मार्गानें साध्याप्रत जावयाचें असतें. साधनालाच ध्येयापेक्षां महत्त्व देऊन मनुष्य गुरफटला तर त्याचें ध्येय कधींच जवळ येणार नाहीं का ? तुरुंगांत गेल्याचे परिणाम होणारच त्याला उपाय नाहीं.

तूं म्हणतेस त्या सर्व अडचणी खऱ्या आहेत. त्यांचा मींहि विचार केलेला आहे. तुझा आणि माझा याविषयीं विचार पुरा झाल्यावर तूं व्यक्त केलेल्या अडचणी केव्हांच नाहींशा होतील.

देशाची गुलामागिरी दूर करावयाची असेल तर कांहींतरी राष्ट्रांत चळवळ झाल्यावांचून, कुठून तरी भोंक पाडल्यावांचून राज्ययंत्र ढिलें कसें होणार ? राज्ययंत्राला हा लहानसा धक्का आहे व मुळशी सत्याग्रह हा स्वतःचा स्वाभिमान आहे असं माझं मत आहे.

राष्ट्रीय शाळेच्या मुलांच्या पुढें इतिहास-वर्गात तावातानानें सांगून प्रत्यक्षांत वेळ आली असतांना आम्ही राष्ट्रीय शाळेच्या मंडळींनीं जर कांहींच केलें नाहीं तर वर्गात शिकविलेला इतिहास फक्त नाटकरूपांत जमा झाल्यासारखा होईल.

स्वतःच्या कृतींनीं आम्हीं शिक्षकांनीं विद्यार्थ्यांना योग्य वेळीं धडा घालून देणें हेंच खरें शिक्षण नाहीं का ? मुळशी सत्याग्रहाकरितां फक्त एक वेळ जाण्याचा आम्हीं शिक्षकांनीं विचार केलेला आहे. पुन्हा पुन्हा जाण्याचा आम्ही मोह टाळणार आहों. म्हणजे कोणत्याहि तऱ्हेनें राष्ट्रीय शाळेंतील मुलांचें नुकसान होणार नाहीं.

तुझी व माझी नातलग मंडळी मला दोष देणार हें खरें आहे, पण त्याची आंच मी व तूं केव्हांहि लावून घेतां उपयोगी नाहीं.

कोणीतरी मुळशी सत्याग्रहासारखीं कामें करण्यास तयार झालें पाहिजे हें सर्व नातलगांना पटेल, परंतु ही देशभक्तीची झळ स्वतःला लागूं नये हा अपमतलबी हेतु नव्हे का ? तेव्हा कोणासहि प्रतिउत्तर न देतां नम्रत्वानें आपला मार्ग आक्रमल्यास हेहि लोक कांहीं दिवसांनीं आपल्या बाजूस वळतील.

माझी काळजी तूं करतेस ती चुकीची आहे, असं मला म्हणतांच येत नाहीं. कारण ' अतिप्रेमा पाप शंकी ' अशी तुझी भूमिका असणें स्वाभाविक आहे. मला वाटत असलेली हिंमत ही खरी आहे का वरवरची आहे याचा पडताळा केव्हांतरी घेण्यास नको का ?

चवथा जो तुझा मुद्दा आहे–' तूं व शंभू ' यांचें कसें होईल. जी स्त्री मला सत्याग्रहास जाण्यास विचार करून संमति देईल ती विचार करूनच आपले दिवस माझ्या येथल्या गैरहजेरींत व्यवस्थित पार पाडील. हीहि माझी खात्री आहे.

आणि हें पाहा, तूं पुण्यास असतांना दहा बारा दिवस निराळाच जीवन-क्रम आचरून तुरुंगाच्या वातावरणाची कल्पना करून त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न मीं केला आहे. अग, तूं पूण्याहून आल्यावर मी गादीवर निजूं लागलों, नाहींतर आठ दहा दिवस नुसते तीन पाट मांडून त्याच्यावर मी निजत होतों. तुरुंग झाला तरी निजण्यास एक घोंगडी व पांघरण्यास एक घोंगडी असणारच ! "

हे बोलण्याच्या नादांत तुरुंगाचें वातावरण कसें असेल ह्याची कल्पना देण्याच्या प्रयत्नांत होते. तेव्हां मीं लगेच म्हटलें, " आतां हा विषय पुरे झाला नाहीं का ? मेंदूला पडणारा ताण मला आतां सहन होत नाहीं. "

ते मोठ्यानें हसले आणि म्हणाले, " आपण पान उलटून टाकूं, मग तर झालें ? "

अशा रीतीनें मुळशी सत्याग्रहाकरितां जाण्याचा विचार कायम ठरून त्याची आंखणी आम्ही दोघें करूं लागलों.

ह्यांची विचारसरणी मला जरी सर्वस्वी मान्य झाली होती तरी मान्यता देण्याला मन तयार होईना. परंतु माझ्या हो नाहीं म्हणण्याचा कांहीं उपयोग नाहीं हें मला तितकेंच माहीत होतें. कारण येवल्यांत आल्याबरोबर दोन चार महिन्यांत हे जेव्हां पूर्ण खादीधारी झाले ( व्रत घेतलें ) त्या दिवशीं बराच मोठा तंटा मीं केला होता. तंटा हा शब्द मी वापरतें आहे म्हणजे मी

विशेष असें कांहीं बोललें होतें असें नाहीं. त्यांच्या माझ्या संभाषणांत खादीच्या धोतराला मी पूर्ण नापसंती दर्शविली होती.

जी गोष्ट डोळ्यांना पाहण्याची सवंय नसते ती गोष्ट केलेली पाहण्यास मनुष्यास जात्याच आवडत नाहीं. त्या वेळची खादी आतां इतकी तलम व सफाईदार निघत नसे. पासोडीवजा धोतर ह्यांनीं नेसण्याचा संकल्प केलेला मला पसंत कसा व्हावा ? खरोखर त्या वेळच्या खादीच्या धोतरांनीं प्रथम अंगाची कातडीसुद्धां जात असे.

तिसरी गोष्ट म्हणजे तें जाडी खादीचें धोतर मलाच स्वतःला रोज धुवावें लागणार होतें. ते स्वतः धुवावयास तयार झाले असते, तर मला तें मान्य नव्हतें, म्हणजे मग पर्यायानें तें खादीचें धोतर धुणें हें माझेंच काम ठरत होतं, म्हणून एक दिवस संध्याकाळीं हे शाळेंतून घरीं आल्यावर मी माझ्या विचाराच्या भरांत त्यांचें धोतर वीतभर फाडून ठेवून मीं माझी नापसंती व्यक्त केली. नंतर एक दोन तास आम्ही कोणीच कोणाशीं कांहीं बोललों नाहीं. रात्रीं जेवण झाल्यावर मी बैठकींत येऊन पाहतें तों सुई दोरा घेऊन शांतपणें मीं फाडलेलें धोतर हे शिवीत होते.

मला माझ्या कृत्याची लाज वाटून तें फाडलेलें धोतर ह्यांच्या हातांतून मीं काढून घेतलें व व्यवस्थेशीर शिवून, मी ह्यांच्या पुढें धरलें, तेव्हां हे हसून म्हणाले, " माझ्या ओबडधोबड जीवनाला असा नीटनेटकेपणा तूं आणून दिलास तर किती बरं चांगलं होईल ! "

ह्यांचा स्वभाव ह्यांच्या तत्त्वामध्यें मागें पाऊल घेण्याचा नव्हता, व माझें ध्येय कोणाच्याहि मार्गांत आड यावयाचें नाहीं येवढें निश्चित असल्यामुळें ह्यांचा मुळशी सत्याग्रह यशस्वी झाला.

आम्ही दोघंहि एक विचारें मुळशी सत्याग्रहाला ह्यांनीं जाण्यापूर्वीची तयारी करूं लागलों. शाळेमधून रजा काढणें व त्या जागीं म्हणजे ह्यांच्या जागीं दुसऱ्या मुख्याध्यापकाची निवड करणें वगैरे कामें केल्यावांचून ह्यांना शाळा सोडून पुण्याला सत्याग्रहाकरितां जाणें शक्यच नव्हतें. ह्यांची शाळेंतील तयारी होईपर्यंत मीहि माझ्या तयारीला लागलें. माझी तयारी म्हणजे मला

व चि. शंभूला अलीकडे जरा बरें नसतें अशा तऱ्हेचीं पत्रें माझ्या माहेरी व सासरच्या नातलगांतहि पाठविण्यास सुरुवात केली. कुणाचें तरी हक्काचें बोलावणें यावयास हवें होतें. त्याकरितां अशा तऱ्हेचा पत्रव्यवहार एक दोन आठवडे मला करावा लागला.

आमची घेतलेल्या मालाची उधारी अशी कधींच नसे; परंतु किरकोळ देणेंघेणेंसुद्धां मला चुकतें करणें प्राप्त होतें. त्याचप्रमाणें घरामध्यें फारसें धान्य वगैरे भरलेलें नव्हतेंच, पण असलेलें धान्य खपविण्याकरितां तेंच धान्य अधिक संपवून घरांतील डबे रिकामे करावे लागले.

ह्यांना तीन महिन्यांची रजा मिळाली. दुसरे एक ग्रॅज्युएट शिक्षक श्री. जोशी नांवाचे कामावर रुजूं होण्याची तारीखहि ठरली. सर्व सामानसुमान आवरून एका खोलींत आम्ही टाकून घराच्या कुलुपाची किल्ली थत्ते वकिलांकडे दिली गेली. शेवटचे आठ दिवस जाण्यापूर्वींचे आम्ही थत्ते वकिलांकडेच राहात होतों. आमची इतकी सर्व तयारी होईपर्यंत मला हवीं असलेलीं बोलावण्याचीं एक दोन पत्रें येऊन थडकलीं. वडिलांचें पत्र आलें, " तुला बरें वाटत नाहीं तर ये कीं आठ-दहा दिवस विसाव्याला. आबासाहेब थत्ते वकिलांचेकडे जेवतील, म्हणजे तूं शांतचित्तानें पुण्यास राहाशील. वगैरे "

कुर्डुवाडीस बी. एल. रेल्वेमध्यें कॅशिअरचे जागेवर असलेले माझे वडाल दीर ह्यांचेंहि पत्र चार दिवस हवा पालटायला राघाला व शंभूला पाठवा अशा अर्थाचें आलें.

या दोन्ही पत्रांनीं आम्हाला त्या वेळीं किती आनंद झाला याची कल्पना तशा अडचणींवांचून कोणास येणें अशक्यच आहे.

मीं दादांचें बोलावणें प्रथम स्वीकारलें व लवकरच मी पुण्यास येतें असें कार्ड टाकलें.

शाळेमध्यें ह्यांना निरोप देण्याचा समारंभ चालक, मुलें व शिक्षक ह्यांनीं चांगल्या तऱ्हेनें घडवून आणला.

येवलें सोडण्याच्या आधीं ह्यांनीं जी मुख्य गोष्ट केली ती म्हणजे थत्ते वकिलांची पूर्ण सहानुभूति मिळवून मुळशीस जाण्याची परवानगी काढली.

नाना तऱ्हेनें थत्ते वकिलांना परिस्थिति समजावून सांगून स्वतःची भूमिका स्पष्ट केली. शेवटीं ह्यांचे मुद्दे काकांना ( थत्ते वकील ) पटून मुळशी सत्याग्रहास जाण्याची परवानगी मनापासून त्यांनीं दिली, म्हणूनच पुढचीं दोन महत्त्वाचीं पत्रें ह्यांनीं लिहून ठेवलेलीं योग्य वेळीं पोस्टांत टाकलीं गेलीं.

एक पत्र होतें तें तात्यांना म्हणजे ह्यांच्या वडिलांना व दुसरें पत्र होतें दादांना म्हणजे माझ्या वडिलांना. दोन्हीं पत्रें अत्यंत नम्रतेनें मुद्देसूद व अखेर क्षमेची याचना करून संपूर्ण केलेलीं होतीं. ज्या दिवशीं ह्यांच्या सत्याग्रही तुकडीला शिक्षा झाल्याची बातमी वर्तमानपत्रांत येईल त्या दिवशीं तीं पत्रें थत्ते वकिलांनीं पोस्टांत टाकावीं अशी व्यवस्था ह्यांनीं करून ठेवलेली होती.

येवल्याच्या मंडळींचा निरोप घेऊन हे, मी व शंभू पुण्यास दादांकडे आलों. माझी तब्येत बिघडली होती असं सोंग करण्याचें कांहीं कारणच पडलें नाहीं. हे मुळशी सत्याग्रहाचं प्रकरणं पुरं कसं होईल ! ह्यांना शिक्षा होण्यापूर्वीं या गोष्टीचा स्फोट होणार नाहीं ना ? मामंजी व दादा काय म्हणतील, काय करतील याच्या काळजीमुळें माझी चर्या आजाऱ्यासारखी होण्यास प्रयत्न करावे लागलेच नाहींत. वडिलांनीं मला पाहतांच ह्यांना सांगितलें कीं, " बया बरीच खराब झालेली आहे तेव्हां येवल्याला लवकर बोलवण्याचं पत्र पाठवूं नका. " ह्यांनीं हो ला हो म्हणून आपली सुटका करून घेतली व मी कुर्डुवाडीस जाऊन येवल्यास जात आहें असं सांगून माझा निरोप घेऊन घराबाहेर पडलें.

स्त्रीस्वभावच असा आहे कीं, सुख आणि दुःख कोणाजवळ निवेदन केल्याशिवाय बरें वाटत नाहीं, पण बोलूं कोणाजवळ ? ह्यांना ज्या दिवशीं शिक्षा झाली त्या दिवशीं माझ्या मानसिक वेदना संपल्या. आनंद व सुख हें मानीव आहे हें त्या घडीला पटलें.

माझा निरोप घेऊन हे जे निघाले ते थेट सदाशिव पेठेंत सत्याग्रही लोकांकरितां जें ऑफिस उघडलेलें होतें तेथें तत्परतेनें गेले.

तेथें ऑफिसमध्यें गेल्यावर तेथील लोकांशीं ह्यांनीं मुळशी सत्याग्रहाची विचारपूस केली. आमची मूळ कल्पना अशी होती कीं, एक दोन दिवसांत

नवी सत्याग्रही तुकडी जाणार असेल, पण ऑफिसमध्यें कळलेली माहिती ह्यांना निराश करण्याजोगतीच होती. ती माहिती म्हणजे सेनापति बापट यांचा येरवड्याहून ( कैदेंतून ) हातोहातीं कळलेला निरोप होय. तो म्हणजे आणखी पंधरा दिवस सत्याग्रहींची तुकडी पाठवूं नका. एक जानेवारी १९२३ ला सत्याग्रही तुकडी मुळशीस पाठवून द्यावी.

इकडच्या तिकडच्या सत्याग्रहीसंबंधींच्या बातम्या व माहिती ह्यांनीं ऑफिस-मधून काढून घेतली. कांहीं झालें तरी ह्यांना ऑफिसमधून बाहेर पडणें प्राप्तच होतें. ऑफिसमध्यें कितीहि वेळ बसलें अगर आपला झालेला सर्व घोटाळा जरी ऑफिसच्या लोकांना निवेदन केला, तरी त्याचा उपयोग तेथें काय होणार होता ? शेवटीं निघतांना प्रथम पाठवल्या जाणाऱ्या सत्याग्रहींच्या तुकडीमध्यें माझें नांव अवश्य ठेवा असें सांगून हे ऑफिसच्या बाहेर पडले.

ऑफिसच्या बाहेर पडल्यावर कोणीकडच्या दिशेला वाट सुधारावी हें ह्यांना अगदींच उमजेना. माझ्या माहेरीं त्या दिवशीं तरी परत येणें ह्यांना पसंत होईना. शेवटीं विचार करून चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेमध्यें एक रात्र व एक दिवस राहून तुरुंगांतून सुटून आलेल्या कांहीं शिक्षकांना मुळशी सत्याग्रहाची माहिती विचारून हे पुण्यास म्हणजे माझ्या माहेरीं परत आले. ह्यांना परत आलेले पाहून मला तर धक्काच बसला व नानातऱ्हेचे तर्ककुतर्क माझ्या मनांत त्या थोड्या वेळांत येऊन गेले. क्षणभर असेंहि माझ्या मनांत आलें कीं, सत्याग्रहाचा तिथला देखावा बघून ह्यांच्या मनानें कच खाल्ली कीं काय ? व म्हणूनच हे घरीं परत आले किंवा कसे ? याचा उलगडा मला होईना.

माझ्या वडिलांनींहि जरा बोंचक असाच प्रश्न ह्यांना टाकला तो म्हणजे " कुर्डुवाडीस तुमच्या बंधूंकडे तुम्ही गेलां नाहींत ? " ह्यांनीं ताबडतोब उत्तर दिलें, " चिंचवडला माझें कांहीं राष्ट्रीय शाळेचें काम होतें तें पुण्यास आलों होतों म्हणून करून घेतलें व जातांना हिला भेटून, प्रकृतिमान पाहून पुढें जावें असा विचार करून आजचा मुक्काम येथें केला आहे. "

हे अकल्पित आले असतांना मला स्वाभाविक आनंद होण्याऐवजीं काय झालें तें सांगतांच येत नाही. मीं कितीहि छपविण्याचा प्रयत्न केला तरी

मी छपवूं शकलें नाहीं. घरांतील सर्व मंडळींना माझ्या तोंडावरचा फरक जाणवला.

त्या रात्रीं ह्यांनीं घडलेली सर्व हकीगत जेव्हां मला सांगितली तेव्हां मी तर दिङ्मूढच होऊन गेलें. सत्याग्रहीच्या पुढच्या तुकडींत तरी निश्चित तुम्हास जागा देतील किंवा नाहीं हें मी पुन्हा पुन्हा उतावळेपणानें विचारीत होतें.

ह्यांनीं माझी परोपरीनें समजूत करून एक जानेवारीला मला सत्याग्रहा-करतां जातां येईल असें सांगितलें. त्यावर माझा प्रश्न ठरल्यासारखाच होता. तो म्हणजे 'ऑफिसच्या लोकांनीं तुमचें नांव एक जानेवारीच्या तुकडींत घातलें नाहीं तर आपण काय करणार ?' नातलगांपासून हें गौप्य यापुढें कसें लपवितां येईल, ह्याची काळजी मला पडली.

मला वाटतं, ह्यांचा दोष नसतांना मी कांहीं तरी अधिक उणं त्या दिवशीं ह्यांना बोललें असावें. होणारा सत्याग्रह पुढें टाकल्यामुळें झालेला घोटाळा मला भेडसावीत होता. अशा वेळीं कोणावर तरी कांहीं तरी दोष दिला म्हणजे माणसास जरा बरें वाटतें. त्याप्रमाणें मीं ह्यांना दोष लावून माझें तात्पुरतें समाधान करून घेत होतें.

ह्यांनीं तशाहि परिस्थितींत माझ्या भावना ओळखून माझें कौतुकच केलें. ते म्हणाले, "सत्याग्रहाला मी जाणार आहेंच, त्याची तुला काळजी नको, पण युद्धांतून पळ काढलेल्या वीराला त्याची स्वाभिमानी स्त्री कशा तऱ्हेनें टोचत असेल याची पूर्ण कल्पना मला आज येत आहे. पुरुषापेक्षां स्त्री ही अधिक भावनाशील असल्यामुळें घडलेली परिस्थिति तुला माझ्यापेक्षां अधिक त्रास देत आहे. घोटाळा झाला हें खरें आहे, पण चिडून घोटाळा कधींच उलगडत नाहीं. शांत चित्तानें तो उलगडावा लागतो. तूं आधीं योग्य विचार करण्याच्या पातळीवर ये म्हणजे सर्व सुरळीत होईल."

माझ्या अधीर वृत्तीची मला लाज वाटून शांतपणानें पुढें काय करावयाचें हें आम्हीं दोघांनीं निश्चित असें ठरवून टाकलें.

घोटाळे म्हणजे इतके झाले होते—मुळशी सत्यग्रहाची तारीख पुढें गेल्यामुळें हे पंधरावीस दिवस ह्यांना व मला कुठें तरी राहण्यास हवें होतें.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3204८ विः चरीत्र
क्रमांक 9030 नों: दि: ...

बेत तडीस जाईपर्यंत कोणत्याहि नातलगापाशीं ह्यांना राहावयास नको होतें. येवल्यास परत जावें तर तीन चार महिन्यांकरितां शाळेचे मुख्याध्यापक संस्थेनें नेमलेले होते. घरांतील सामान एका खोलींत टाकून सर्व आवराआवर करून गांवांतील मंडळींचा निरोप घेऊन आम्ही येवल्याहून निघालों होतों. आतां तेथें परत जाणें ह्यांना—पण त्यांच्याहिपेक्षां मला—अपमानकारक असें वाटत होतें. ह्यांची जेवणाखाण्याची सर्व अव्यवस्था होणार होती, आपण होऊन मी तुमच्या येथें उगीच पंधरावीस दिवस राहतों असें म्हणण्याची वेळ ह्यांच्यावर आलेली होती. माझ्यावरहि कुठं राहावें हा प्रश्न होताच? दहाबारा दिवसांनीं येवल्यास जाणें क्रमप्राप्तच ठरलेलें होतें, पण मी आणि शंभूनें जाऊन ह्यांना अडचणींत अडचण करणं मला गैरसोईचं वाटूं लागलं.

अशा परिस्थितींत बहुतेक रात्र विचारविनिमय करण्यांत आम्हीं दोघांनीं घालविली. ह्यांनीं मला एकच निर्वाळा दिला, तो म्हणजे तूं माझी कोणतीहि काळजी करूं नकोस. मी आलों तसा थेट येवल्यास जातों. तूं मात्र निश्चितपणें दहा-बारा दिवस माहेरपण भोग व मग दादाकडे कुर्डुवाडीस जा. मी दादासाहेबांना जातांना कुर्डुवाडीस पाठविण्यास सांगून ठेवतों म्हणजे तुझी कुचंबणा कोणत्याहि प्रकारें होणार नाहीं. तूं कुर्डुवाडीस असतांनाच माझा सत्याग्रह होईल. मला योग्य वेळीं शिक्षा होईल. मग तुला व शंभूला जेथें सोईचें वाटेल तेथें तूं शांत चित्तानें राहा.

ह्यांनीं माझ्या मनाची समजूत करून व जातांना ठरल्याप्रमाणें दादांना मला कुर्डुवाडीस पाठवावयास सांगून येवल्याचा रस्ता सुधारला.

येवल्याला गेल्यावर ७।८ दिवसांनीं एक पत्र सविस्तर असें मला आलें. त्यानंतर मी ह्यांच्या बाबतींत निश्चिंत झालें. हे ठरल्याप्रमाणें थत्ते वकिलांचेकडे राहूं लागले व शाळेमध्यें नेहमींप्रमाणें शिकवूं लागले.

त्याच वेळेला माझा कुर्डुवाडीला जाण्याचा प्रश्न आमच्या घरांत निघाला. माझे वडील मला म्हणाले, “ कुर्डुवाडीस जाण्यापेक्षां येथेंच अधिक विसावा घेईनास का ? ” तें मला मान्य होईना, त्याचें कारण माझें मन मला खात होतें. कोणतीहि गोष्ट ह्यांच्यापासून चोरून ठेवून गप्प बसणें हें असह्य वाटूं लागलें. त्यापेक्षां आलेल्या संधीप्रमाणें कुर्डुवाडीस जावें असें मीं ठरविलें, पण

तीहि गोष्ट सुव्यवस्थित माझी पार पडूं शकली नाहीं. मी कुर्डुवाडीस जाण्याची तयारी करीत असतांनाच भावजींचें पत्र दादांना आलें कीं, " सध्यां राधाला पाठवूं नका. येथें प्लेगचा प्रादुर्भाव झाल्यामुळें परक्या गांवच्या माणसास येथें आल्यावर क्वारनटाईनमध्यें राहावें लागतें. तेव्हां सध्यां राधानें इकडे येण्याचा बेत रहित करावा. "

ती. भावजींचें पत्र वाचून माझ्या डोळ्याला पाणीच आलें, पण तें लपवून मला वरपांगीं सर्वांशीं बोलावें लागत होतें.

दोन तीन दिवसांनीं ह्यांचें मला पत्र आलें कीं, एक जानेवारीच्या सत्याग्रही तुकडीमध्यें माझं नांव निश्चित आहे, तेव्हां आठ दहा दिवसांकरितां इकडे येण्याचा विचार केव्हांहि करूं नकोस. ठरल्याप्रमाणें कुर्डुवाडीस दादाकडे जा. त्याच दिवशीं वडिलांनीं मला प्रश्न टाकला कीं, तुझ्या जाण्याचें काय ठरलें ? मी जरा गोंधळल्यासारखी होऊन पण ठाम असें उत्तर दिलें कीं, मी दोन तीन दिवसांत येवल्यास जाणार आहें. माझी गाडी तुमच्या व आईच्या विचारें ठरवूं या. माझी खात्री होती कीं, कुर्डुवाडीचे माझे दिवस येथें राहून काढ कीं असा, कुणी तरीं विचार सांगेल, परंतु कुणीच तसें बोललें नाहीं.

पुण्यांतून हालण्याची तयारी मीं वरवर चालविली होती, पण मनामध्यें काय करावें हें उलगडत नव्हतें. अशा परिस्थितींत नेहमीं राहा म्हणणारे दादा आज राहा कां म्हणत नाहींत याचें मला नवल वाटत होतें. तोंच आईनें ती बाजू सांवरली व मला निश्चित केलें म्हणण्यास हरकत नाहीं. " आतांच तुझी तब्येत चांगली दिसत आहे तों जाण्याची घाई कां करतेस ? कुर्डुवाडीस तुझ्या दिराकडे आठ दहा दिवस तूं राहणार होतीसच ना ? मग आमच्याकडेच राहा."

तोच विचार आईनें दादांपुढें मांडला. दादा म्हणाले, " बया, कितीहि दिवस राहिली तर मला आनंदच आहे, पण तिनं एकदा मनानें जाण्याचें घेतलें म्हणजे तिचा व माझा तंटाच होतो, म्हणून मी या वेळेला तिच्या जाण्या-राहण्याबद्दल कांहींच बोललों नाहीं."

दा. क्र. ११५००

एकंदरींत आठ दहा दिवसांचें माझें पुण्याचें राहणें निश्चित झालें, त्यामुळें मीहि निश्चिंत झाले.

एक जानेवारी १९२३ ची वाट मी व हे सारख्याच आतुरतेनें पाहूं लागलों. एक जानेवारीला या गौप्य रहस्याचा पडदा दूर होणार होता.

३१ डिसेंबरला रात्रभर मला झोप कशी ती आली नाहीं. ते आतां मुळशीला गेले असतील व उजडत मुळशीच्या धरणावर सत्याग्रहींची तुकडी जाईल व तेथील मजुरांना कामाला अडचण करतील व मग सरकारी पोलीस शिपाई त्यांना पकडतील व हाताला दोरी बांधून जेलकडे नेतील वगैरे गोष्टी सारख्या माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागल्या. अनंत तऱ्हेचे विचार माझ्या मनांत येऊन ह्यांची मूर्ति सारखी डोळ्यांपुढें दिसत होती. तुरुंगामध्यें कैद्याचे वाटेल तसे हाल करतात या विचारें मन सारखें अस्वस्थ होत होतें. त्या वेळीं माझें वय अवघें तेवीस वर्षांचें होतें व अशा तऱ्हेचा सरकारशीं सामना ही कल्पनाहि माझ्या माहेरीं मला कधीं ऐकावयास मिळाली नव्हती. त्यामुळें ह्यांचें कसें होईल, याची सारखी भीति वाटत होती, पण त्याच बरोबर ह्यांची राष्ट्रभक्ति व राष्ट्रधर्म पाळण्याची तत्परता माझी मान उंच करीत होती.

अशा विचारांच्या काहुरांतून दिवस उजडेपर्यंत मला नको ती रात्र असें झालें असतें, पण न कळत माझी काव्यस्फूर्ति जागी झाली व मीं एक कविता तयार केली. ‘मुळशी सत्याग्रहाला आव्हान’ हा त्या कवितेचा मथितार्थ होता. कविता तयार झाली, पण वाचनमात्र त्या कवितेचें सकाळ होईपर्यंत माझ्या स्वतःशींच सुरू होतें, कारण त्या कवितेची गुंगी मला सुखकारक वाटत होती. आपलं दुःखच आपल्या मनाचें अखेर समाधान करतें याचा अनुभव मला त्या रात्रीं आला.

माझा दोन वर्षांचा मुलगा शंभू जवळच गाढ निजलेला होता. त्याला उठवून कविता वाचून दाखविण्यांत कांहींच अर्थ नव्हता. कुणाला तरी ही कविता वाचून दाखविलीच पाहिजे अशी मला तीव्र इच्छा झाली. माझ्याच खोलींत माझ्या पाठीकडे माझी दहा वर्षांची लहान बहीण शांता निजलेली

होती. ती या कुशीवरुन त्या कुशीवर होत असतांना मीं तिला हलकेंच हांका मारली आणि विचारलें, " झाली का झोप शांताबाई, ती बघ सकाळहि झाली, उठतेस का ? " असं मी म्हणतांच ती चटकन् अंथरुणावर उठून बसली व घाईघाईनें म्हणाली, " ताई, येवढा मोठा दिवा ठेवून तूं काय करत आहेस ? तूं निजली नाहींस का ? " असं तिनं विचारतांच माझा कंठ दाटून आला. तिला पोटाशीं धरून मनसोक्त मी रडलें. माझ्या रडण्याचा अर्थ माझ्य ा बहिणीला कसा कळणार ? " ताई, तूं कां रडतेस " असं तिनं विचारतांच जणू मी शुद्धीवर आलें व माझे डोळे पुसून मीं हसत तिला म्हटलें, " मीं रात्रभर बसून एक कविता केली आहे. तूं ऐकतेस का ? " तिचें होय म्हणून उत्तर मिळतांच मीं ती कविता समग्र तिला वाचून दाखविली. ती ऐकल्यावर शांता एकदम म्हणाली, " ताई, कविता फार छान आहे, पण आपण जर तसं कांहीं करीत नाहीं, तोंपर्यंत अशी कविता करण्यांत काय अ थ ? "

तिच्या बालवयाच्या समंजसपणाचें कौतुक वाटून मीं तिला प्रेमानें पोटाशीं धरलें, व हलकेंच तिला सांगितलें, " आपण कांहीं मुळशीकरतां केलं असलं तर–" या वाक्यानें ती डोळे फाडून माझ्याकडे बघूं लागली. तिच्या बघण्याचा अर्थ समजून मी तिला ह्यांच्या मुळशी सत्याग्रहाची सविस्तर हकीगत सांगितली. तिला कविता पटली, पण ती कविता आवडणें शक्य नव्हतें.

" शेजाऱ्याच्या घरा लागली आग जरी हो कधीं । बंधूंनो ।
स्वस्थ मनानें काय रहावें अपुल्या दारामधीं ।
जरी विझविली नाहीं आपण चेत घेऊनी पुढें । बंधूंनो ।
जाळिल अपुलें घरहि सारें क्षमा नसे तिजपुढें ॥

तोच न्याय हा येथ पहाना जाइल मुळशी जरी । आज ही ।
जाइल अपुला देशहि सारा कांहीं न राही करीं ॥
कराग्रह हा वास ठेविला येतां मुळशीकडे । तुम्हाला ।
सहन कराया वदा नको का दृष्टि ठेवुनी पुढें ॥ "

अशा तऱ्हेची समग्र कविता वाचून दाखविली आहे.

सकाळ झाली. चक्क उजेड पडला. तेव्हां आम्ही शंभूला घेऊन माडीवरून खालीं आलों. "मुळशी सत्याग्रहाची बातमी वर्तमानपत्रांत येईपर्यंत घरामध्यें कोणालाहि ही गोष्ट कळवूं नकोस असं मी शांताला निक्षून बजावलं असल्यामुळं तिनें गोप्यस्फोट लगेच केला नाहीं."

दहा साडे दहाच्या सुमाराला 'स्वराज्य' वर्तमानपत्राचा अंक घेऊन माझे वडील घाईघाईनें आंत आले व वर्तमानपत्र माझ्या आणि आईच्या पुढें टाकून मोठ्या जोरांत म्हणाले, "तुमचे जांवई दिवे लावायला मुळशीस गेले आहेत!" असं बोलून दादा दिवाणखान्यांत निघून गेले. 'स्वराज्या'चा तो अंक म्हणजे सत्याग्रही तुकडी आज सकाळीं सत्याग्रह करणार अशी बातमी त्यांत होती व त्याचप्रमाणें जनतेनें सत्याग्रह करून गव्हर्नमेंटला आपली वागणूक बदलायला लावली पाहिजे अशा तऱ्हेचा ह्यांनीं स्वतः लिहिलेला एक लेखहि त्या अंकांत होता.

त्या अंकाचें आम्हीं घरांतील शांतीसकट सर्व स्त्रियांनीं प्रत्येकीनें वेगळें वेगळें मनामध्यें वाचन केलें, व कोणीच कोणाशीं कांहीं बोललों नाहीं. मी विचारांत मग्न आहें, व माझे डोळे पाण्यानें भरून आले आहेत, हें पाहतांच शांता आईला घाईघाईनें म्हणाली, "आई, ताईनें एक कवितासुद्धां छान केली आहे. ती ऐक एकदा म्हणजे तुला आबासाहेबांचें करणें पटेल." आईनें तिला लगेच उत्तर दिलें, "त्यांचं ठीक आहे, पण बयाचा व शंभूचा विचार त्यांनीं काय केला!" मीं चटदिशीं माझे डोळे पुसले व माझी मुळशीची रात्रीं केलेली कविता आईला वाचून दाखविली. ती कविता मी वाचत असतांनाच दादा घरांत आले. त्यांनींहि ती कविता ऐकिली. ह्यांनीं लिहिलेला स्वराज्यांतील लेख व मीं केलेली कविता यामधून सत्याग्रहाची कारणमीमांसा पटलेली होती, पण—हे असे जर देशभक्तीच्या लाटेबरोबर वाहूं लागले तर आपल्या बयाचें जीवन आपणांस हवें तसें होणार नाहीं हा एक मुद्दा व आम्हांस कांहीं न विचारतां जांवयांनीं सत्याग्रह केला हा दुसरा मुद्दा दादांना बेचैन करीत होता. त्यामुळें कांहींतरी अद्वातद्वा स्वतःच्या मनाच्या समाधानाकरितां ते बोलत होते. त्याचा परिणाम म्हणजे माझ्या त्याचप्रमाणें आई, शांता या सर्वांच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहत होत्या.

काय झालं कोणास ठाऊक ? दादा एकदम त्या विषयावर बोलायचे थांबले व मला म्हणाले, " बया, यापुढें मी तुला एकहि शब्द वावगा, तुला न आवडणारा, बोलणार नाहीं, मग तर झालें ? " असें म्हणून दादा बाहेर दिवाणखान्यांत गेले. आई आपल्या कामाला लागली. मी मात्र माझ्या विचारांत किती वेळ गुंग होतें हें मला आठवत नाहीं; पण आमचे सगळ्यांचे कावरेबावरे चेहरे पाहून लहानगा शंभू घाबरून गेला, व त्यानेंच मला शुद्धीवर आणलें.

त्या वेळच्या सत्याग्रही तुकडीस रीतसर शिक्षा होऊन सर्वांची रवानगी येरवड्यास झाली. ठरल्याप्रमाणें ह्यांचीं दोन्हीं पत्रें मामंजींना व दादांना योग्य वेळीं मिळालीं. पत्राच्या वाचनानंतर रागाला जागाहि नव्हती व रागावण्याचा कांहीं उपयोगहि नव्हता म्हणून का होईना आमच्या दोघांचे वडील स्वस्थ बसले. ह्यांना चार महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. मीं ते चार महिने पुण्यासच शंभूसह माझ्या माहेरीं काढले. सासरच्या व माहेरच्या मंडळींनीं त्या चार महिन्यांत गोड वागणुकीनें व गोड पत्रांनीं माझ्याशीं चांगल्या तऱ्हेचा सहकार केला.

या चार महिन्यांतील एक गोष्ट मला सांगितल्यावांचून राहवत नाहीं, ती म्हणजे ह्यांची येरवडा तुरुंगामध्यें तीन महिन्यांनीं घेतलेली भेट होय.

तीन महिन्यांनंतर आम्ही—मी, शंभू, माझे वडील व माझी लहान बहीण शांता येवढी मंडळी ह्यांना भेटण्याकरितां येरवडा जेलच्या दाराशीं बगींतून म्हणजे घोड्याच्या गाडींतून आलों. ते उन्हाळ्याचे दिवस होते. येरवडा जेल पुण्यापासून ५ मैल लांब आहे. तेव्हां दोन्ही मुलांना प्रवासी तांब्यांत पिण्याकरितां पाणी घेऊन व दोन मोसंबीं घाईघाईनें गाडींत टाकून आम्ही येरवड्यास आलों.

भेटीचा अर्ज सकाळीं दहा वाजतां येरवड्याच्या टपालाच्या पेटींत नेऊन टाकावा लागे. आम्हांला येऊन अर्धापाऊण तास झाला असेल तों मोठ्यांदा पुकारले गेले, " आपटे भेट है ". आम्ही लगबग जेलच्या दाराशीं सर्व मंडळी घाईघाईनें गेलों. कैद्याची भेट जेलच्या आंतल्या बाजूस उभा राहून

व त्या दरवाजाच्या बाहेर भेटीस आलेली मंडळी उभी राहून भेट होण्याचा प्रघात होता.

त्या वेळेला माझे वडील इनामदार या सदरांत मोडत असल्यामुळें आमची भेट मात्र—आम्हांस ह्यांची भेट येरवडा जेलचा मोठा दरवाजा उघडूनच दिली गेली; इतकेंच नाहीं तर आम्हांस बसण्याकरितां त्या खोलींत असलेल्या खुर्च्याहि देण्यांत आल्या होत्या. ह्यांना जेव्हां भेटीकरतां आणलें त्या वेळीं ते कैदी होते. तेव्हां दोन शिपाई त्यांच्या बरोबर आलेले पाहून आम्हां सर्वांना तें दृश्य अगदीं नवीन असल्यामुळें जरा गोंधळल्यासारखें झालें. ह्यांचे कपडे एक चड्डी व एक कोपरी व डोक्यावर टोपी येवढे होतें. सर्व कैद्यांना चौकटीचा विविक्षित तऱ्हेचा जाडाभरडा कपडा जेलमध्यें वापरायला दिला जातो. हे जे आले ते हसतच म्हणजे प्रसन्न मुद्रेनें आमच्याशीं बोलूं लागले. आम्ही सर्व बसलेले असल्यामुळें, "बसा आबासाहेब, असा शब्द दादांच्या तोंडून बाहेर पडला." मी तर चटदिशी उभीच राहिलें, पण क्षणार्धांत मी मला सांवरून माझ्या जागेवर स्वस्थ बसलें. चि. शंभू व शांता या दोघांना अशा तऱ्हेची भेट पसंत वाटली नसावी. शंभूनें ह्यांना ओळखलें, पण बुचकळ्यांत पडल्यासारख्या ह्यांच्या पोषाखाकडे पुन्हा पुन्हा बघून पटलेली ओळख तपासून घेत होता. पूर्ण तपासणी होतांच अज्ञान दोन वर्षांचें बालक पित्याकडे झाप टाकून जाऊं लागलें. तेव्हां ह्यांनीं, "नको, शंभू, आतां मजपाशीं येऊं नकोस. मी बाहेर आलों कीं तुला घेईन" असें सांगितलें. ह्यांनीं सर्वांची खुशाली विचारली. ह्यांच्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें माझे वडीलच देत होते. अखेर वेळ संपत आला अशी सूचना जेलर-साहेबांनीं देतांच ह्यांनीं उतावीळपणानें मला विचारलें, "तूं बोलत कां नाहींस. एक एक मिनिट येथील मोलाचें असतें." मीं तेव्हां हलकेंच म्हटलें, "आपली प्रकृति बरी आहे ना?" तेव्हां ह्यांनीं उत्तर दिलें, "आम्ही सर्व मंडळी आनंदांत आहोंत" माझा धीर चेपून मी जरा बोलती होत आहें तोंच टाइम संपल्याची सूचना पुन्हा एकवार आली. ह्यांनीं दादांना नमस्कार केला. माझ्याकडे नुसतें बघितलें. शंभूला व शांताला 'या हं' म्हणून प्रेमानें खुणावलें व पाठमोरे झाले. आम्हीहि मुख्य दरवाजाच्या बाहेर पडण्यास दरवाजापाशीं आलों. तों हलकेंच शांती म्हणाली, "आपल्याजवळचीं मोसंबीं

आबासाहेबांना आपण देऊं या ना ? " त्याच वेळेला आंतल्या दरवाजाच्या आंत शिपाई ह्यांना घेऊन गेले व धाडदिशी दरवाजा लागला गेला. त्याच वेळीं शंभू थोडासा रडूं लागला व त्यानें मला विचारलें, " आबांना तिकडे कां नेलें ? व आपण इकडे कां ? "

शांती व शंभू ह्या दोघांच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याच्या मनःस्थितींत मी खासच त्या वेळीं नव्हतें. घरीं येईपर्यंत आम्ही कोणाशींच कोणी बोललों नाहीं. भेट झाल्याचा आनंद पण त्याच वेळीं आपल्या देशांत आपण गुलाम याची चीड आली.

ह्यांची चार महिन्यांची मुळशी सत्याग्रहाबद्दलची शिक्षा संपून ता. २२ एप्रिलला हे सुटून घरीं आले. या चार महिन्यांमध्यें मी एक तऱ्हेचा माझा जीवनक्रम आंखला होता व त्याप्रमाणेंच तो मीं घालविला. ती. दादांची इच्छा मी या काळांत पुण्यासच राहावें अशी होती, व मला नाहीं म्हणणेंहि शक्य नव्हतें व तसें नाहीं म्हणण्यासारखें मोठें कारणहि नव्हतें. माझ्या मामंजींनींहि मला पुण्यास राहण्याबद्दल संमति दिली होती; आणि त्यांतल्या त्यांत येरवडा जेल पुण्याजवळ असल्यामुळें एक प्रकारची तीहि मनाला ओढ होती. त्याचप्रमाणें मुळशी सत्याग्रहास येणारे लोक व जाणारे लोक ह्यांचें ऑफिसहि पुण्यांतच असल्यामुळें ह्यांची खुशाली हातोहातीं कळण्याचा संभव असल्यामुळें या काळांत मीं पुण्यास राहण्याचें नक्की केलें होतें.

संकटाच्या काळांत धर्मग्रंथ माणसास तो काळ पार करण्यास मदत करतात याची कल्पना मला त्या वेळपर्यंत खास नव्हती. ह्यांचें नेहमीं सांगणें असें कीं, ज्याप्रमाणें राग आला म्हणजे दहा अंक मोजल्यानें रागाचा पारा कमी होतो, त्याचप्रमाणें कठीण काळीं धर्मग्रंथांचें वाचन मनुष्याला समाधान देऊन त्याचें धैर्य वाढवितें.

याच वेळीं रामदासांचा दासबोध हा ग्रंथ मीं वाचून पुरा केला. हा दासबोध मीं पहिल्यांदाच समग्र असा वाचला.

हे सुटून ज्या दिवशीं घरीं आले त्या दिवशीं माझ्या मनाला काय वाटलें त्याचें वर्णन करणें अतिशय कठीण आहे, म्हणून मी तें टाळतेंच. माझे

वडील भावजी व वन्सं हीं दोघें ह्यांना भेटण्याकरितां मुद्दाम आलेलीं होतीं. दादा स्वतः जेलपाशीं जाऊन ह्यांना घेऊन आले. ह्यांच्या सुटकेबरोबरच मुळशी सत्याग्रहांतील आणखी कांहीं मंडळी सुटली असल्यामुळें त्या लोकांच्या बरोबरच ह्यांना सत्याग्रहींच्या ऑफिसमध्यें प्रथम जाणें प्राप्त होतें. त्या वेळची नामवंत मंडळी प्रो. शि. म. परांजपे, बाळूकाका कानिटकर व सेनापति बापट वगैरे मंडळींनीं या लोकांचें स्वागत करून नंतरच सत्याग्रहींना आप्तेष्टांकडे जाण्याची परवानगी दिली होती.

'शिजस तंवर दम निघतो, पण निवस तंवर निघत नाहीं' या म्हणीची प्रचिति अनुभवांतूनच मिळाली. चार महिने ह्यांच्या सुटकेच्या दिवसाची वाट पाहात मीं बराच काळ काढला होता, पण पुण्यांत आल्यावरहि ताबडतोब ते घरीं येऊं शकत नाहींत तेवढ्या काळांत माझ्या मनाची अधिरता वाढली होती. परंतु 'आंत बाहेर' करण्यापलीकडे मी कांहींच करूं शकत नव्हतें. चि. शंभू मात्र बालस्वभावाप्रमाणें हट्टाचा अवलंब करून त्याच्या काकाबरोबर सत्याग्रह ऑफिसमध्यें जाऊन ह्यांचे कडेवरूनच घरीं आला. शंभू ह्यांच्याजवळ इतका चटपट जाईल अशी माझी कल्पना नव्हती. दोघांना घरीं आलेले पाहतांच शंभू माझ्याकडे ये अशा आशयानें मी हात पुढें करतांच माझे हात झिडकारून ह्यांच्या खांद्याला तो अधिकच बिलगला. घरांतील सर्वच मंडळींचे डोळे कमी अधिक प्रमाणानें भरून आले होते. माझे मात्र अश्रु या वेळचे फार निराळ्या तऱ्हेचे होते असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. स्वाभिमान, आदर, प्रेम या सर्व भावना त्या अश्रूंतून जणू झिरपत होत्या. त्याच वेळीं शंभू ह्यांना अधिक बिलगतांच त्या माझ्या पराजयांत अधिकच आनंद एकवटला होता. या पराजयाचा आनंद फक्त स्त्रीहृदयच जाणूं शकेल.

हे तुरुंगांतून सुटल्यावर २-४ दिवस आम्ही पुण्यांत होतों व नंतर आम्ही नाशकास मामंजींच्याकडे गेलों. भावजी व वन्सं एक दिवस राहून नाशकास गेलीं. त्या दोन दिवसांमध्यें ह्यांचें बाहेर जाणें अगर कोणी तरी ह्यांना भेटावयास येणें असा कार्यक्रम सुरू होता.

दुसऱ्या दिवशीं रात्रीं इकडच्या तिकडच्या गप्पा चालू असतांना शांतानें ह्यांना एकदम प्रश्न टाकला, "तुम्ही लोक तुरुंगांत गेल्यामुळें कांहीं फायदा

झाला का?" या प्रश्नाचें उत्तर आमच्या आईनेंच तावडतोब दिलें, "फायदा कुठला? धरण काय सरकार बांधायचं राहणार आहे? ह्यांची आपली एकदा जेल पाहण्याची हौस झाली!" हें आईचें उत्तर घरांतील आम्हा कुणालाच पसंत पडलें नाहीं. ह्यांनीं पटदिशी शांतीस उत्तर दिलें, "आई म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं झुंज घेणें खासच सोपी गोष्ट नाहीं, म्हणून प्रयत्न करूं नयेत असं थोडंच आहे? हें एका दिवसाचें काम नाहीं. कोणी तरी केलें पाहिजे हें पटल्यामुळें मी गेलों. मी या सत्याग्रहांत पडलों व त्यामुळें माझी कोणतीहि शक्ति कमी न पडतां वाढलीच आहे."

दुसऱ्या दिवशीं आम्ही गांवांतल्या मंडळींच्या गांठीभेटी घेऊन मामंजीं-कडे नाशकास येण्यास शंभूसह निघालों.

गाडीमध्यें पुष्कळशा गप्पा तुरुंगवासाबद्दलच व सत्याग्रहाबद्दलच बोलत होतों. ह्यांनीं गहिंवरून मला सांगितलं, "तुझ्यावांचून माझ्या या राष्ट्रीय गोष्टींचें कौतुक कोणासहि नाहीं, कारण आम्हां तरुणांना ही वाट अगदीं नवीन पाडा-वयाची आहे. तुझ्या माहेरची व माझी मंडळी निरुपाय म्हणून माझी हकीगत ऐकतात, पण त्यांत जिव्हाळा कुठंच सांपडत नाहीं. मी काय बोलतों—मी काय करतों हें समजण्याची तुझी इच्छा आहे, म्हणूनच मला या राष्ट्रीय कामांत पुढें जाण्याची उमेद आहे." ह्यांचे हे शब्द ऐकल्यावर मीं मनाशीं निश्चय केला कीं, सध्या तरी पूर्ण सहानुभूतीचें वातावरण ह्यांना मिळालें पाहिजे. शक्य तेवढा प्रयत्न करून ह्यांना निराशा कधींहि उत्पन्न न होईल असें करा-वयाचें, कारण आतां नाशकास मामंजींची गांठभेट प्रथमच व्हावयाची होती.

आम्हीं नाशकास आल्यावर, आम्ही सर्वच मंडळींनीं ७/८ दिवस मोठ्या मजेंत घालविले. मला वाटला होता तेवढा विरोध ह्यांच्या कार्याला विशेष कोणीं केला नाहीं. मात्र तो विषय टाळूनच सर्वांना गप्पा मारण्यास बरें वाटे. यामुळें पांच-सहा दिवसांनंतर आम्ही लवकरच येवल्यास जाऊं असं ह्यांनीं मामंजींना सांगितलें.

शाळा सुरू होण्यापूर्वीं घरबीर स्वच्छ करणें वगैरे गोष्टी आम्हीं पुढें केल्या व त्या सर्वांना पटल्याहि.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३२०६८ वि: १०१
क्रमांक १०३० नों: दि: २४५८

आम्ही दोघं शंभूसह येवल्याच्या गाडींत बसलों त्या वेळेला हे म्हणाले, "'येथूनीच आपुले पथ दुभंगले.'" मीं आश्चर्यानें विचारलें, "कुणाचे ?" तेव्हां ह्यांनीं हसून उत्तर दिलें, "तुझे माझे नव्हेत. आपल्या सर्व नातलगांचे व आपले. वैभव, सुख, चैन या गोष्टींची अपेक्षित मंडळी माझ्या कर्तव्यकर्मांत कसा आनंद मानणार ! मी त्यांना अपेक्षित कांहीं देऊं शकत नाहीं–मी जें देऊं शकेन त्याची नातलगांना गरज नाहीं. चालायचेंच." आम्ही येवल्यास रात्रीं ९ चे सुमारास आलों. टांग्यानें थेट घरीं आलों.

घर लावणें, इकडचें सामान तिकडे मांडणें, आल्यागेल्यांच्या भेटी घेणें ह्यामध्यें सात-आठ दिवस केव्हांच निघून गेले. शाळा रीतसर सुरू व्हायची तेव्हां झाली. पहिल्या दिवशीं शाळेंतील मुलें व शिक्षक ह्यांनीं ह्यांचें थाटांत स्वागत केलें. गांवांतील प्रतिष्ठित मंडळीहि ह्या स्वागतास उपस्थित होती.

ह्यांच्या धैर्याचें, देशप्रेमाचें, स्वार्थत्यागाचें, कांहीं वक्त्यांनीं आपल्या भाषणांत कौतुक केलें. पण त्यांत एका नागरिकानें, असा शेरा मारला कीं, "आपटे गुरुजी हे राष्ट्रीय शाळा सोडून चालू राजकारणांत पडल्यामुळं पुष्कळच मुलें शाळेंतून दुसऱ्या गांवीं अगर दुसऱ्या शाळेंत गेलीं आहेत. शाळेच्या शिक्षकांची अशी धरसोड वृत्ति असल्यास मुलांचें किती नुकसान होतें ह्याचा विचार शाळेच्या चालकांनीं व शिक्षकांनीं करावयास नको का ?"

त्या वेळेला ह्यांनीं विनयशीलतेनें पण थोडेसें स्पष्ट असें त्या सभेंत उत्तर दिलें तें पेटणारें आहे. ह्यांनीं सांगितलें, "मी मुळशी सत्याग्रहास गेलों ही माझ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या मतें चूक असेल, थोडाफार विद्यार्थ्यांचा तोटाहि झाला असेल, परंतु आमच्या शाळेंतील मुलें ह्याच मुदतींत कमी व्हायला जीं अनेक कारणें आहेत, त्यांचा बोध मी मुळशीहून आल्यावर ह्या सात-आठ दिवसांत विचार करून काढला आहे. तो माझ्या मतें असा आहे.—

राष्ट्रीय चळवळीचें महत्त्व लोकांच्या मनांतून जरा कमी होत आहे. ह्या शाळेंतून पास झालेल्या विद्यार्थ्यांना सरकारी कोर्स अगर कॉलेजमध्यें प्रवेश मिळणार नाहीं, त्यामुळें पालकांच्या पदरीं निराशा येत आहे. ह्यामुळें आमच्या शाळेंतील मुलांची संख्या कमी झाली असावी. कमी कीं अधिक

ह्या संख्येला मी फारसें महत्त्व देत नाहीं. मुलांची संख्या वाढवली पाहिजे, हें गृहित धरूनच मी सर्वांना सांगतों कीं, मी अगर आमचे दुसरे शिक्षक वैशंपायन देशाच्या हांकेला ' ओ ' देऊन थोडीफार जी सेवा केली ती करणें आमचें राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांचें कर्तव्यच होय. माता ज्याप्रमाणें नित्यशः वागण्यांतून आपल्या मुलांना ज्ञान देते, त्याचप्रमाणें आम्ही शिक्षकांनीं आमच्या मुलांच्या पुढें योग्य तो आदर्श ठेवला पाहिजे. नुसतें गणित, भूगोल शिकण्याची ही शाळा नव्हे, तर राष्ट्राचा सांगोपांग विचार करून मायभूची कांहींतरी सेवा करण्याचा पाठ ह्या शाळेंत मिळाला पाहिजे असें मला तरी वाटतें. राष्ट्रीय बाण्यानें राष्ट्र जिवंत राहिलें, तरच ह्या पुस्तकी शिक्षणाचा विद्यार्थ्यांस उपयोग आहे. "

ही सभा झाल्यावर दोनचार दिवसांत मुलांचें शाळेंत कमी झालेलें प्रमाण वाढविण्याच्या मागें हे कटाक्षानें लागले. ह्यांच्या गैरहजेरींत इतर शिक्षकांनीं आपापलीं शिक्षण देण्याचीं कामें योग्य तऱ्हेनें बजावलीं. ही मंडळी तरुण असल्यामुळें अननुभवी पालकांनीं आपलीं मुलें काढलीं तरी शिक्षकांनीं फारशी पर्वा दाखवली नसावी. " आमच्याकडे अशा तऱ्हेचें कणखर व राष्ट्रभक्तीचें शिक्षण मिळतें. ज्यांना हवें त्यांनीं मुलें आमच्या शाळेंत घालावीं. शिक्षण पसंत नसेल तर खुशाल काढावीं " असा बाणा आमच्या शाळेंतील शिक्षकांचा होता.

ह्यांना अशा तऱ्हेचें वागणें फारसें पसंतहि नव्हतें व ह्यांच्या स्वभावाला असा सडेतोडपणा जमलाहि नसता. हे नेहमीं म्हणत, " घर, संस्था, राज्य ह्या तिन्ही गोष्टी चालवणें एका अर्थी सारख्याच आहेत. उतीभूतीच्या घटकांशीं जुळतेंमिळतें घेऊन अगर वेळ पडल्यास थोडा कमीपणा घेऊनहि संस्थेचा, घराचा, राज्याचा कार्यभाग सुरळीत चालवला पाहिजे. त्यांतच कौशल्य आहे."

शाळेचें सांभाळून संध्याकाळच्या वेळीं सहकाऱ्यांबरोबर मुलांच्या क्रीडांगणावर न जातां गांवांतील लोकांकडे जाऊन विशेषतः शाळेंतून मुलें काढलेल्या पालकांकडे जाऊन गप्पागोष्टी करून पालकांचे गैरसमज हळुवार संभाषणानें कमी करून मगच हे घरीं परत येत. ह्यांच्या ह्या उपक्रमाबद्दल कांहीं मंडळी

सहानुभूति दाखवीत तर कांहीं मंडळी गेलेलीं मुलें ह्यांच्या खेटे घालण्यानें थोडींच परत येणार आहेत असेंहि बोलत असत.

मला हीं बोलणीं ह्यांच्यापेक्षां लवकर ऐकूं येत, त्यामुळें मीहि त्यांना विचारी, " उगीच लोकांचे उंबरे झिजवून वेळ कशाकरितां वाया घालवतां ? " त्या वेळेला हे सांगत, " सद्भावनेनें घातलेलें पाणी कधींहि वाया जाणार नाहीं. निदान माझ्या मनाला ह्या प्रयत्नापासून शांतता मिळत आहे. "

राष्ट्रीय शाळेमध्यें असलेले इतर शिक्षक व हे ह्यांच्यामध्यें वयाचें अंतर तर लक्षांत येण्यासारखें होतें. राष्ट्रीय शाळेंत येणारे दोन्ही तिन्ही शिक्षक राष्ट्रप्रेमानें कॉलेजच्या शिक्षणावर पाणी सोडून राष्ट्रीय शाळेंत आलेले होते. त्यामुळें त्या शिक्षकांची व ह्यांची स्वभावाची बैठक फार वेगळी पडे. ही मंडळी मोडूं पण वाकणार नाहीं या वृत्तीनें अखेरपर्यंत वागत होती. हे सुद्धां अन्यायापुढें कधींहि वाकले नाहींत, पण कोणतेंहि कार्य मोडून टाकायला उत्सुक नसत. त्यामुळें पुष्कळ वेळेला मोठ्या गमतीचे प्रसंग घडत.

आमच्या राष्ट्रीय शाळेकडून गणपति उत्सव व शिवजयंती उत्सव राष्ट्रीय वृत्ति डोळ्यापुढें ठेवून ज्ञानसत्र म्हणून त्या त्या दिवसांत केले जात असत. एकदा शिवजयंती उत्सवाकरितां नाशिकचे पाटणकर नांवाचे गृहस्थ अध्यक्ष म्हणून बोलाविले होते. अध्यक्ष स्थानापन्न झाल्यावर शिवाजीच्या जीवनक्रमावर कांहीं वक्त्यांचीं भाषणें झालीं. त्यानंतर वक्ते म्हणून वैशंपायन गुरुजी भाषणास उभे राहिले. मराठे व मोंगल या विषयावर बोलतांना तर वैशंपायन भाषणांत फार रंगून जात असत. त्यांनीं शिवाजीपासून बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, " मुलांनो, शिवाजीचा जीव मावळ्यांवर होता. मावळे हे अशिक्षित अडाणी होते, पण ते शिवभक्त होते, म्हणून ते राष्ट्रीय कामगिरी करूं शकले. ते कांहीं अलीकडच्या सुशिक्षित लोकांसारखे नव्हते बरं का? मुलांनीं जर म्हटलें कीं, मी सरकारी शाळेऐवजीं राष्ट्रीय शाळेंत जातों तर त्याला घरांतून चालता हो असं म्हणणाऱ्या पालकांपैकी ते नव्हते " इत्यादि. वैशंपायनांचें अशा तऱ्हेचें बोलणें झाल्यावर अध्यक्ष ज्या वेळीं अध्यक्षीय भाषण करण्यास उठले, त्या वेळीं वैशंपायनांचें आव्हान स्वीकारून पाटणकर यांनीं बोलावयास सुरुवात केली. त्यांनीं स्पष्ट

सांगितलें, "मी माझ्या मुलाला मुद्दाम राष्ट्रीय शाळेंत जाऊं दिलें नाहीं. जवळ जवळ त्याचा उल्लेखच आधींच्या वक्त्यांनीं केला म्हणून माझें मत मला येथें स्पष्ट बोलावें लागत आहे" असें म्हणून राष्ट्रीय शिक्षणाच्या फोलपणावरच अध्यक्ष बोलत सुटले. ते म्हणाले, "त्यागाचा महिमा कशाला गातां? शास्त्राचा महिमा गा. बाबराजवळ तोफा होत्या म्हणून मोंगलांना जय मिळाला. इंग्रजांजवळ सुद्धां चांगलीं शस्त्रें होतीं म्हणून ते मुसलमानापासून राज्य घेऊं शकले. म्हणून मी म्हणतों शास्त्रें, शस्त्रें यांपैकीं कांहीं शिका. त्यासाठीं कांहीं राष्ट्रीय शाळेंत जाण्याची गरज नाहीं. सरकारी शाळेंत गेलें तरी चालतें."

असा हा मोठा विचित्र पेंचप्रसंग पडला. राष्ट्रीय शिक्षणाच्या फोलपणावरच जणू अध्यक्षांनीं आघात केला होता. राष्ट्रीय शाळेचे मुख्याध्यापक या नात्यानें समारंभाचा समारोप आभार मानतांना यांनीं केला. त्या वेळेला दोनच वाक्यांत ह्यांनीं अध्यक्षांना एकप्रकारें उत्तर दिल्यासारखें केलें. हे म्हणाले, " अध्यक्षांच्या सूचनेचा आम्ही अवश्य विचार करूं, परंतु आमच्या राष्ट्राची अवनत अवस्था ही मुलांना समजावून देण्याची जबाबदारी आम्हीं उचललेली आहे. त्यांतूनच राष्ट्रप्रीति मुलांच्या मनामध्यें निर्माण होऊन शिकलेल्या शास्त्राचा उपयोग मातृभूमीच्या उद्धाराकरितां त्या मार्गानें मुलें करतील अशी मला अशा आहे."

या समारंभानंतर खाजगी बैठकींत सर्व शिक्षकांनीं या पाटणकरांशीं चर्चा केली, असें मीं ऐकलें होतें. पुढें बोलत असलेल्या माणसाचें मन अद्वातद्वा बोलून न दुखवितां आपलें तत्त्व न सोडतां बोलण्याची कला ह्यांना साधली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. याचमुळें ह्यांच्या मतप्रणालीशीं जुळतींमिळतीं नसणारीं माणसेंदेखील ह्यांच्याशीं तात्त्विक चर्चा करीत असत. पण त्यामध्येंहि कधींच कटुता निर्माण झालेली मला आठवत नाहीं. स्वतः न वाकतां दुसऱ्याला वळवण्याचा प्रयत्न सहजगत्या हे करीत असत.

मुळशी सत्याग्रहांतून जाऊन आल्यानंतर त्यांचे सहकारी शिक्षक गांवांतील प्रतिष्ठित मंडळी ह्यांच्यामध्यें ह्यांची प्रतिष्ठा वाढली म्हणण्यास हरकत नाहीं. ह्यांची शरीरयष्टि किरकोळ अशीच असल्यामुळें एकदम पहिल्या भेटींत हा मनुष्य अशक्त आहे, ह्याच्या हातून राष्ट्राची काय सेवा होणार? असें लोकांना

वाटलें असावें, परंतु ह्यांचें मन अतिशय बळकट आहे व मुळशीचा तुरुंगवास उत्साहानें व धैर्यानें त्यांनीं सहन केला हें पाहून मंडळींमध्यें विशेष तऱ्हेची आपुलकी वाढलेली दिसून आली. आपटे दिसतात किरकोळ, पण विचारांत दुबळे नाहींत, ही साक्ष पटल्यावर विविध विषयांवर ह्यांचें मत अजमावण्याकरितां गांवांतील विद्वान् मंडळी, अभ्यासू मंडळी व ह्यांची सहकारी मंडळीहि ह्यांचा सल्ला आपुलकीनें घेऊं लागले. वैशंपायन गुरुजी व हे मुळशी सत्याग्रह करून आल्यावर सर्व जमातींमध्यें राष्ट्रीय शाळेबद्दल आदर वाढला होता. शाळेनें आंखलेला सार्वजनिक कार्यक्रम पुरा करण्याकरितां गांवकरी सर्व तऱ्हेची मदत राष्ट्रीय शाळेला देत होते.

अशा रीतीनें शाळेचा जम बसूं लागला. पण त्याच संधानास एकापुढें एक अशीं दोन संकटें आमच्या कुटुंबावर आलीं. माझे मामंजी अकल्पित नाशिक येथें निधन पावल्याची तार आमच्या हातीं आली. तार जी आली ती दुपारीं १२ वाजतां.

त्या वेळीं श्रावणांतील शुक्रवार असल्यानें जिवतीची सवाष्ण व ब्राह्मण आणि त्याबरोबर आणखी दोन शाळेंतील शिक्षकमंडळी यांचेसह आमच्या येथें जेवावयास बसलेली होती. पुरणपोळी हे आग्रहानें बरोबरच्या मंडळींना ' घ्या घ्या ' म्हणत होते तोंच मी सही करून तार ह्यांच्या हातीं दिली. तार वाचून ह्यांनीं तशीच पाटाखालीं ठेवली व मंडळींना तूप वाढण्याची सूचना मला दिली.

सर्वांचीं जेवणें झाल्यावर ह्यानीं मनाला घातलेला बांध टिकूं शकला नाहीं व ते एकदम म्हणाले, " मी आतां पोरका झालों. तात्यांचे गुण आमच्यांत येण्याला किती काळ लागेल कोण जाणें ? तात्यांची किंमत कळायला फार निराळी दृष्टि वापरावयास पाहिजे. आमच्याकडून मिळावें तितकें सुख तात्यांना मिळालें नाहीं हें खरें. "

मामंजी गेल्याचें ऐकून मी अगदीं स्तब्ध अशीच किती तरी वेळ उभीच राहिलें. एक मिनिटापूर्वीं सर्व मंडळींना ह्यांनीं विडे दिले, पण हे इतका वेळ शांत चित्तानें जेवूं कसे शकले हें मला समजेना. तार आल्यानंतर स्वस्थ मनानें ह्यांनीं सर्वांचीं जेवणें होऊं दिलीं. नंतर म्हणाले, " अग, तात्या गेलेली ही

तार आहे. सर्वांना जेवणावरून उठविण्यांत काय साधलें असतें ? चाराची गाडी आपल्यास साधली पाहिजे " असें म्हणून ते जाण्याचीच तयारी करूं लागले. मी आतां जेवणें शक्यच नव्हतें. चार घास खा म्हणणारेंहि घरांत कोणी नव्हतें, तेव्हां घर बंद करून शंभूसह आम्ही दोघे टांग्यांत बसलों व रात्रीं १० वाजतां नाशकास येऊन पोहोंचलों. योगायोगाची गोष्ट अशी, मामंजी गेल्याच्या तारा त्यांच्या सर्व मुलांना करून एकहि मुलगा आडनिड्या गाड्यांच्या वेळामुळें मामंजीच्या शेवटच्या कार्यास उपयोगी पडला नाहीं ! मामंजी एकहि दिवस आजारी नव्हते. त्यामुळें त्यांचा मृत्यु हा अनपेक्षितच सर्वांना झाला. मामंजींचे नाशकांतील मित्र व ( सासूबाई गेल्यापासून घरांत कायम राहात असलेले ब्राह्मण ) त्र्यंबकराव पांचवे पुत्र होऊन मामंजींचें अंत्यकर्म त्यांनीं उरकलें.

मामंजींचे चौदा दिवस झाल्यानंतर आम्ही सर्वजण आपापल्या गांवीं गेलों. तेव्हांपासून आम्हांला कुठं जाण्याची ओढ राहिलीच नाहीं. आमची जरी नातलग मंडळी जवळचीच होती तरी पुष्कळच एकमेकांस दुरावत चाललों. त्याचें कारण म्हणजे राष्ट्राच्या वाढत्या कामामध्यें हे व पर्यायानें मी लक्ष घालूं लागलों. त्यामुळें या पेटलेल्या आगीजवळ कोण येणार ? चालावयाचेंच ! ह्यांना स्वतःच्या कामामध्यें कधींच कुणाची उणीव भासली नाहीं आणि उणीव कधीं वाटली असली तरी त्याबद्दल ह्यांनीं कधींच खंत केली नाहीं. मी मात्र मधून मधून अशा तऱ्हेची तक्रार कुरकुर स्वजनांबद्दल ह्यांच्याजवळ करीत असें, पण त्यांचें ठरलेलें एकच उत्तर असें, " आपल्याजवळ जर जास्त संबंध नातलग मंडळी ठेवतील तर त्यांचें आर्थिक व सामाजिक नुकसान होईल अशी फार मोठी भीति त्यांना वाटत आहे. त्यामुळें ती आपल्यापासून दूरदूरच असणार. तुला काय कमी आहे ? "

## १५

माझ्या कुटुंबावरची दुसरी आपत्ति म्हणून मीं जें वर म्हटलें आहे ती म्हणजे माझी बहीण शांता हिचें निधन होय. चि. शांताचें वय गेली तेव्हां बारातेरा वर्षांचें होतें. तसं पाहिलं तर तिच्यांत व माझ्यांत अंतरहि बरंच होतें. ती माझी पाहूं गेलं तर सावत्र बहीण होती, परंतु तिच्या स्वभावामुळें तिच्या ठिकाणीं माझं मन एका निराळ्याच प्रकारें गुंतलेलें होतें, आणि त्यांचेंहि मुख्य कारण एक म्हणजे इतक्या लहान वयांत फार मोठी समजशक्ति तिच्यामध्यें होती. शांत स्वभाव, प्रेमळ व आनंदी वृत्ति, गुणग्राहकता व मोठ्यांविषयीं आदर या गोष्टी खरोखर वाखणण्यासारख्याच होत्या. मला तिच्याविषयीं विशेष वाटण्याचें कारण म्हणजे तिला माझ्याविषयीं अधिक प्रेम वाटे—माझ्याविषयींच नव्हे तर ह्यांच्याविषयींदेखील तिला फार मोठा आदर होता. त्या बालवयांत देखील राष्ट्राची आणीबाणीची परिस्थिति व ह्यांच्यासारख्या लोकांचें काम ती फार चांगल्या रीतीने समजूं शकत असे. अलीकडे अलीकडे ह्यांचीं पावलें वेगळ्या दिशेला पडत आहेत, ही राष्ट्रीय शाळेची नोकरी आपला घात करणार असें ठाम मत माझ्या वडिलांचें झालेलें होतें. त्यामुळें तरुणवयाच्या व राष्ट्रीय वृत्तीच्या पतीला द्यावें तसें प्रेम माझ्या माहेरची मंडळी देऊं शकली नाहींत, इतकेंच नव्हे तर दुराग्रहाच्या आहारीं जाऊन माझ्या वडिलांनीं घरादाराला या प्रकरणीं अशांत केलें असेल. माझ्यावरील वडिलांचें प्रेम हेंहि त्यांच्या तीव्र संतापाचें कारण असूं शकेल, पण जरा अतिरेकच त्यांनीं या बाबतींत केला असें म्हटल्यावांचून मला राहवत नाहीं.

अशा दोन घराण्यांच्या परिस्थितीमध्यें माझी लहान बहीण शांता ही फारच समंजसपणानें वागे. इतकेंच नव्हे तर वडिलांचे व माझेमध्यें मतभेदाचे धागे निर्माण होत त्याला ती नम्रपणें व गोड शब्दांत रोंगण घालत असे.

तिनें दादांना जें एक प्रमेय घातलें त्याचें अजूनहि मला कौतुक वाटते. तिनें दादांना एक दिवस सहज बोलतां बोलतां विचारलें, " कां हो दादा, तुम्ही ताईवर व आबासाहेबांवर सदा रागावलेले कां असतां ? ताई आली म्हणजे तुम्ही सगळें चांगले वागतां, पण तिला परत जातांना बोलून बोलून कां म्हणून रडवतां ! आबासाहेबांचें ताईवर कितीतरी प्रेम आहे हें तुम्हांला ठाऊक असून तुम्ही त्यांच्यावर कां रागावतां ? त्यांच्या कमी पगाराच्या नोकरीमुळें आपल्या ताईला कष्ट फार पडतात हें खरें. पण ताईची तक्रार त्याबद्दल नाहीं. ती सुखांत आहे. असें ती तीनदा तुम्हाला सांगते तरी तुम्ही तिच्यावर कां रागावतां ? हें मला समजतच नाहीं. तुमचं ताईवर फार प्रेम आहे ना ? मग तुम्ही तिला त्रास कां देतां ? "

अशा तऱ्हेचीं प्रमेयें वडिलांच्या पुढें मांडण्याचें धैर्य कधीं कधीं शांता करीत असे. तात्पुरता चांगला परिणाम त्या वेळीं वडिलांच्यावर होई, पण तो तात्पुरताच असे.

या कारणामुळें ही शांता मला अधिक आवडत असावी. ह्यांच्याबद्दल कोणी वाईट बोललेलें मला सहन होत नसे. हे फार मोठें काम त्या वेळेला करीत होते असं जरी नाहीं तरी राष्ट्राच्या मोठ्या कामासाठीं लागणाऱ्या त्यागाच्या पायरीवर निश्चल असे हे खास उभे होते, त्याचें मला नेहमीं कौतुक वाटे. ह्यांच्यामध्यें दिसणाऱ्या गुणाची कदर करणारीं जीं काय थोडीं माणसं माझ्या आंवतीं-भोंवतीं होतीं त्यांत माझी छोटी शांता होती हें निश्चित.

साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हा भारतीय संस्कृतीचा पाया आहे असं मी तरी समजतें. त्याप्रमाणें आमची शांती होती. बापाची लाडकी मुलगी. सर्व प्रकारचे लाड पुरवायला तयार असलेली घरांतली मंडळी असूनहि शांताची राहणी ' साधी राहणी ' या सदरांतच मोडे. ती हुजूरपागेंतच शिकत होती. या वेळेला इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या मुली सर्रास दिसत नव्हत्या, असें असूनहि शांतामध्यें फॅशन या शब्दाला जागाच नव्हती. स्वभावाची घडण सरळ आणि गोड असल्यामुळें शाळेंतील वर्गातील मुलींना त्याप्रमाणें शिक्षकवर्गाला मनपसंत वाटे. तिच्यामध्यें बुद्धीची हुषारी तर होती, पण त्याहिपेक्षां सुस्वभाव हा तिचा स्थायी भाव होता; वयाच्या

मानानें चौकसबुद्धि व समजशक्ति अधिक असल्यामुळें ह्यांचें तिच्याशीं फार जमावयाचें.

वयाच्या सात वर्षांपासून तिच्या निधनाच्या काळापर्यंत म्हणजे बारा वर्षें या काळांत दरवर्षीं सुट्टीला माझ्याकडे एक महिना तरी ती आल्यावांचून कधींच राहिली नाहीं. यामुळें आम्हां दोघांना सहवासजन्य प्रेमांतील चटका तिच्या निधनानंतर फार दिवस लागून राहिला होता.

सहज आठवलें म्हणून तिच्या सरळ स्वभावाचें उदाहरण देतें. पहिल्यांदा म्हणजे तिच्या वयाच्या सातव्या वर्षीं माझ्याकडे महिनाभर राहून पुण्यास परत आली तेव्हां बोलतां बोलतां माझ्या आईनीं व मावशींनीं भावनेच्या भरांत प्रश्न केला, “ ताई तुला चांगल्या रीतीनें वागवत होती ना ? सकाळीं वेळच्या वेळीं तुला खाणेंपिणें मिळत होतं ना ? ” याचें उत्तर एका वाक्यांत तिनं दिलं, “ ताईला तुमच्या दोघींच्यापेक्षां वेगळी कां समजतां ? मला समजत नाहीं. ताईनीं मला तुम्ही दोघी जवळ नसल्याची उणीव भासूंच दिली नाहीं.” हें शांताचें उत्तर ऐकतांच आई व मावशी दोघीहि चरकल्या व आपला तोल जाऊन आपण शांताला काय विचारलें याचें त्यांना वाईट वाटलें.

सरळ माणसेंहि केव्हां केव्हां मोहवश होतात. अशा नाजूक वेळीं शहाण्या शांतीनेंच सरळ मार्गानें विचार करावयास आईस व मावशीस यापुढें लावलें.

ही हकीगत या प्रसंगानंतर मी पुण्यास आल्यावर माझ्या आईनेंच मोकळ्या मनानें मला निवेदन केली. शांताच्या व माझ्या प्रेमाचें तिला कौतुक वाटलें. माझ्या माहेरीं भाद्रपदांतल्या गणेशचतुर्थीला कोणत्या तरी हरिदासाचें कीर्तन दरसाल होत असे. ठरलेल्या वेळीं ठरलेला कार्यक्रम झालाच पाहिजे हा कटाक्ष माझ्या वडिलांचा असे.

एक वर्षीं कीर्तनकार बोवा अर्धा तास उशीरा आले. प्रतिष्ठित श्रोते मंडळी अशी वडिलांच्या दिवाणखान्यांत तिष्ठत बसली. यामुळें दादा कांहींतरी कीर्तन आटपल्यावर आपली हजेरी घेणार असें वाटल्यावरून कीर्तनाच्या अखेरीस ‘ कीर्तन करणें ही सोपी गोष्ट नाहीं, एकदा करून पाहावें ’ म्हणून बोवांनीं सांगितलें.

बोवांचें बोलणें दादांना अपमानकारक वाटलें, पण लगेच त्यांनीं सर्व मंडळींना जाहीर केलें, "आज चतुर्थी आहे. एकादशीला बरोबर नऊ वाजतां याच दिवाणखान्यांत माझें कीर्तन आहे. इतकेंच नव्हे तर मी माझ्या लहान मुलीच्याकडूनहि कीर्तन करून दाखवीन."

बोवांनीं हसून दादांच्या भाषणाचा समारोप "मी अवश्य तुमचीं कीर्तनें ऐकीन" असा केला.

खरोखरंच माझ्या वडिलांनीं एकादशीस कीर्तन केलें. इतकेंच नव्हे तर त्यांच्या मुलीमध्यें कीर्तनरूपी सुफलित वृक्षाचें जणू काय बीजारोपणच केलें.

हें एवढें कीर्तनासंबंधीं लिहिण्याचें कारण आमची शांता वयाच्या नवव्या वर्षापासून समजून उमजून कीर्तनाचा परिपोष उत्तम रीतीनें करत असे. ताल, सूर हीं कीर्तनाचीं अंगें थोडक्या काळांत अंगीकृत करून कीर्तन ऐकण्यास हजारांनीं माणसें जरी असलीं तरी तिच्यावर कसलाहि परिणाम होत नसे. याचें आम्हां सर्वांस मोठें नवल वाटे. तिची स्तुति त्या वेळच्या वर्तमानपत्रांत (सन १९२३-२४ च्या) भरपूर झाली होती. इतकेंच नव्हे तर कीर्तन ऐकल्यावर श्रीमत् शंकराचार्यांनीं 'कीर्तनालंकृती' ही पदवी बहाल करून तिचा गौरव केला होता, पण तिला या कशाचाहि अभिमान वाटत नसे.

एका सुट्टींत शांता व माझी धाकटी बहीण मालू महिनाभर राहण्याकरितां माझ्याकडे आल्या. ही तिची सुट्टी माझ्या घरची शेवटचीच ठरली. माझा मुलगा चि. शंभू याला चार वर्षें पुरीं होऊन पांचव्या वर्षाच्या वाढदिवसाकरितां माझ्या दोन्ही बहिणी माझ्याकडे आल्या होत्या.

शंभूचा वाढदिवस झाल्यानंतर दहा बारा दिवसांनीं मुली पुण्यास जाणार होत्या, परंतु शांताला ताप आला व तो टायफाईड ठरला. त्या वेळेला टायफाईड ह्या दुखण्यावर आंतांसारखीं खात्रीलायक औषधें निघालीं नसल्यामुळें येवल्यांतील डॉक्टर-वैद्य व आम्ही सर्व आप्तमंडळी यांची फार धांदल उडाली.

चैत्राचा महिना होता. येवल्यांतील उन्हाळा तापाच्या रोग्याला त्राहि भगवान् करून सोडीत होता. शांताची तापांत तळमळणारी मूर्ति आमच्या

सर्वांचीं हृदयें करपून टाकीत होती. टाइफाईडचा पेशंट हलवितां येत नाहीं असा डॉक्टरी सल्ला असल्यामुळें माझ्या वडिलांना व आम्हां सर्वांस तो पटल्या-मुळें भिरभिर धावत आमची स्वकीयमंडळी माझ्याकडे गोळा झाली.

उन्हाचा ताप शांताला होऊं नये म्हणून तिच्या खोलीच्या छपरावर कांहींतरी योजना आमच्या शाळेच्या मास्तर मंडळींनीं केली होती व आमचीं परिचित थत्ते वकिलांचीं मुलें तासा-दोन तासांनीं सतत झारीनें पाणी घालत असत. येवलें हें तालुक्याचें गांव आहे. आतां तिथें पुष्कळ सुखसोई झाल्या आहेत, पण ३०।३५ वर्षांपूर्वी तेथें सगळ्याच गोष्टी दुर्मिळ असत. प्रत्येक गाडीला मनमाडला मनुष्य पाठवून बर्फाची सतत तरतूद करण्यांत आली होती.

वरील या एक दोन गोष्टींचा उल्लेख करण्याचें कारण पैशाच्या जोरावर शहरामध्यें आपण सर्व गोष्टी अनुकूल करून घेतों, पण खेड्यामध्यें पैशापेक्षां आपुलकी व माणसाची एकी यामुळें कठीण प्रसंग पार पाडले जातात.

अशा कठीण आजारामध्यें लहान शांतासारख्या मुलीनें किती समंजस-पणा दाखवावा तें आठवलें म्हणजे अजूनहि नवल वाटतें. मोठीं मोठीं माणसें-सुद्धां चढत्या तापामुळें किरकिरीं व दुसऱ्याला त्रासदायक होतात.

दादांशीं आदरानें व प्रेमानें, आई व मावशीं ह्यांच्याशीं जिव्हाळ्यानें, ह्यांच्याशीं आदर व भक्तीनें व माझ्याशीं प्रेमळ व मोकळेपणानें बोलणें त्या दुखण्यांतहि तिला साधलें होतें. "तुम्ही सर्व मंडळी माझ्यासाठीं किती कष्ट करतां !" असें तिनें म्हटलें म्हणजे आमचे सर्वांचे कंठ भरून येत. तशाहि परिस्थितींत "मी बरी झाल्यावर आपण सर्व सज्जनगडला जाऊं आं !" अशी विषयाला कलाटणी स्वतः देऊन आम्हांस निराळें बोलण्यास भाग पाडी.

आमच्या येथें फक्त त्या वेळेला मिळणारी 'बनारस व कानपूर' ही स्वदेशी साखरच येत असे. या साखरेची चव कॉफींत मातट लागे म्हणून मी शांताकरितां एक वाटीवर विलायती साखर थत्तेमंडळींकडून आणून त्या साखरेची कॉफी एकदा दोनदा तिला पाजली. ती तिला मनापासून आवडली.

ही परिस्थिति ह्यांना कांहींच माहीत नव्हती. विलायती साखर घरांत पाहून हे माझ्यावर रागावले. ह्यांची दृढ समजूत झाली कीं, ही साखर मी माझ्या कॉफीकरतां उसनवार आणली असावी.

ह्यांचें बोलणें शांतानें पडल्या पडल्या ऐकलें असावें. तेव्हां तिनें मला ज़वळ बोलावून हलक्या आवाजांत सांगितलें, "आबासाहेबांचें व्रत स्वदेशी-बद्दलचं तीव्र आहे तर ती परदेशी साखर तूं आणलीस तशी परत कर ना! माझ्या कॉफीला बनारसी साखरच घाल."

चि. शांताच्या या सांगण्यानंतर पुष्कळ तऱ्हेनें शांतीची समजूत ह्यांनीं केली, "मी तुझ्याकरितां म्हणजे आजाऱ्याकरितां कसा बोलेन?" तेव्हां तिनें एकच उत्तर दिलें, "मला तरी विलायती साखरेचा मोह कशाला? कीर्तनांत मोह टाळण्यास मी सांगतें ना!" असें म्हणून ती मनसोक्त हसली.

एकंदरीत तीस दिवसांच्या खडतर दुखण्यांत आम्हां सर्व मंडळींना निर-निराळ्या तऱ्हेचे सात्त्विक गुण दाखवून आम्हां सर्वांस चटका लावून आमची शांता आम्हांस सोडून परलोकीं गेली!

तिचे शेवटचे शब्द 'आतां मी कीर्तन करतें हं' हेच होते.

शांताचा मृत्यु १९२५ सालीं एप्रिल महिन्यांत झाला.

माझी माहेरची सर्व मंडळी शांताच्या मृत्यूनंतर लगेचच दुसऱ्या तिसऱ्या दिवशीं पुण्यास गेली. आलेल्या सर्व मंडळींची व्यवस्था करणें याकरितां आमच्या घराजवळचीं दोन घरें आम्हीं जवळजवळ व्यापिलीं होतीं. दुःखी हृदयानें का होईना मला व ह्यांना हीं घरें मोकळीं करून देणें प्राप्तच होतें. शांता गेली ती माझ्याच घरीं गेली म्हणून त्या जागीं बसून विचार करणें कांहीं वेळां पटे तर कांहीं वेळां उभें वारें सुटून राहतें घर अजिबात वर्ज्य करावें असें मनांत येई. लगेचच मे महिन्याची सुट्टी लागल्यामुळें आम्ही दोघें घर व येवलें सोडून बाहेर गांवीं जाण्याचा विचार केला व तो अमलांत आणला.

पहिल्या प्रथम मी जी येवल्याहून निघालें ती पुण्यास आलें. हे मात्र नाशकास त्यांच्या एका मित्राकडे राहण्याकरितां गेले.

माझी लहानपणापासूनची मैत्रीण दुर्गा हिचें सासर हैदराबादला होतें. आम्ही दोघांनीं उरलेली मे महिन्याची सुटी हैदराबादेस दुर्गाकडे काढावी असें ठरविलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3९० ... वि: ...
क्रमांक 1030 नों. दि. ...

अगदीं निराळ्या वातावरणांत आल्यामुळें मला जरासें बरें वाटलें. ह्यांचा तर वेळ दुर्गाचे पति गणपतराव यांच्या सहवासांत केव्हांच जाऊं लागला. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' या न्यायानें दोघांचें दाट मैत्रींत रूपांतर होऊं लागलें. चि. शंभू हर्डीकरांच्या बालगोपालांत केव्हांच रमून गेला.

⚜ ⚜



## — १६ —

शांतीबद्दलचें दुःख माझ्या मैत्रिणीला वारंवार सांगण्याचा मोह मला सुटत नसे. त्याच वेळेला तिची नणंद श्रीमती अक्का जवळपासच असत. माझे निराशेचे उद्गार ऐकून अक्का मला चटदिशी म्हणाल्या, " यमूताई, जेवढीं झाडाला फळं लागतात तेवढीं आपल्या पदरांत कधींच पडत नाहींत. मुलं काय—भावंडं काय—देवाच्या इच्छेवरच ठेवावं लागतं सर्व. आपण परमेश्वराच्या इच्छेला लगाम घालण्यापेक्षां आपल्याच मनाला लगाम घातलेला बरा नाहीं का ? "

अक्कांचं सांगणं मला आवडलं, पण 'दुसऱ्याला सांगायला काय जातं' हा विचार माझ्या डोक्यांत आला. अक्कांची हकीगत दुर्गाकडून मला जेव्हां कळली तेव्हां माझ्या विचाराची मला लाजच वाटली.

संध्याकाळीं दुर्गानें मला अक्कांची समग्र माहिती दिली. अक्कांचे पति नुकतेच वर्षा-दीडवर्षापूर्वीं निधन पावले होते. त्यांचीं मुलं मोठमोठीं होऊन डोळ्यांदेखत गेलीं होतीं. शेवटचा मुलगासुद्धां पतिनिधनानंतर थोड्याच दिवसांत गेला. अक्का निराश्रित निराधार झाल्या.

अक्कांचं भावांच्या घरीं वागणं इतकं आनंदाचं व उल्हासाचं असें कीं त्यामुळें मला वरील कल्पना केव्हांच आली नाहीं. घरच्या भावांची तत्परतेनें काळजी,

लहान भाच्यांशीं आनंदानें खेळणें, भावजयींच्या संसारांत रंग भरण्याकरतां 'तुला हें लुगडं चांगलं दिसतं, अशींच आपण घेत जाऊं हं' असं म्हणणं या गोष्टी अक्कांना साधून गेल्या होत्या. अहर्निश काम करण्याची आवड, इतकेंच नव्हे तर माझ्यासारख्या पाहुणीचं आदरातिथ्य अक्का आनंदानं करीत असत. ह्यांची आवड काय, शंभूला काय आवडतं, इथपासून अक्का आमची काळजी वहात असत. या त्यांच्या वागण्यांतून त्यांच्या परिस्थितीची जाणीव मला कशी होणार ?

स्वतःचीं सहा मुलें मोठीं होऊन निवर्तावीं, जन्माचा जोडीदार तोहि जावा, वय निम्मेंशिम्मेंच झालेलें असावें, अशा वेळेला कोणती स्त्री स्वतःच्या दुःखाचें गाठोडें अजीबात बाजूला सारून, नव्हे फेकून देऊन भावाच्या संसारांत आपल्या वागण्यानें आनंद निर्माण करील ?

माझी चूक माझ्या लक्षांत आली व आपल्या दुःखाचं रडगाणं दुसऱ्यापुढं गाणं व दुसऱ्याचा आनंद नाहींसा करणं हें एक प्रकारें अनुचितच आहे असें मला उमजलें.

हैदराबादचं आमचं राहणं शाळेची सुट्टी संपतांच हालवावंच लागलं. येवल्यास आल्यावर राष्ट्रीय शाळा व तिचा प्रपंच ह्यांच्या पाठीमागें लागला.

ह्यांना गमतीनं मी कधीं कधीं म्हणायची, "या राष्ट्रीय शाळेचं गाडं नीटपणें कधीं लागी लागायचं ? म्हणजे तुम्ही निर्धास्त होऊन मुलांना शिकविण्याचें काम कराल अशी वेळ येईल काय ?"

याचं उत्तर त्यांनीं हसत हसत मला द्यावें, "अशी निर्लेप शाळा चालविण्यांत माझा पुरुषार्थ काय आहे ? कार्यांत येणाऱ्या अडचणी, हें माणसाचें धैर्य द्विगुणित करतात, हें टिळकांचें वाक्य मला पटलेलें आहे, म्हणून शाळेची काळजी नसली तरच मला स्वस्थ झोप येणार नाहीं."

१९२६–१९२७ साल, राष्ट्रीय शाळेची आर्थिक परिस्थिति सांभाळून कारभार चालवणें, शिक्षणाचे प्रयोग करणें, परगांवच्या सुज्ञ व विद्वान् मंडळींना आमंत्रणें देऊन राष्ट्रीय शाळेला व येवलें गांवाला राष्ट्रीय भावनेनें

जागृत ठेवणें हीं सर्व कामें राष्ट्रीय शाळेच्या शिक्षक मंडळींना करावीं लागत होतीं. आनंदाची गोष्ट येवढीच कीं, आजीव सभासद असलेले राष्ट्रीय शाळेचे शिक्षक त्यागाला केव्हांहि मागें पडत नव्हते. एकमेकांत नेहमींच दिलजमाई होती असें जरी नसलें तरी शाळा ही चाललीच पाहिजे याकरितां हर प्रयत्न करूं अशी सर्वांची तळमळ होती.

राष्ट्रीय शाळेच्या विश्वस्तांनीं दिवसेंदिवस पुष्कळसें लक्ष शाळेंतून काढून सर्व तऱ्हेची जबाबदारी राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांवरच टाकली होती. आर्थिक जबाबदारी तर तुमचे तुम्ही बघा बुवा या 'गोड' शब्दांत शिक्षकवर्गावर सोपविली होती, तरी पण विश्वस्तांच्या घरांत असलेल्या वस्तु, ज्ञानार्जनाचें साहित्य, पुस्तकें वगैरे राष्ट्रीय शाळेला सहानुभूतिपूर्वक ही मंडळी देत असत.

एकंदरीनें आर्थिक जबाबदारी, राष्ट्रीय शाळेच्या खर्चाची जमवाजमव कशी करावी हा १९२८ सालीं पुन्हा प्रश्न शिक्षकांच्या पुढें उभा राहिला.

प्रथम शिक्षकांनीं पगार बेताचेच घेऊन शाळेची आर्थिक अडचण भागवली. त्यानंतर शिक्षकांनीं बाहेर गांवीं जाऊन पैसे शाळेकरतां आणावे हाहि प्रयोग संपला. कायम स्वरूपाची खर्चाची तरतूद निघाली पाहिजे या हेतूनें शिक्षक मंडळी तिसऱ्यांदा विचार करूं लागली.

या विचाराकरितां शिक्षकांनीं आपापल्या कल्पना लिहून काढून कार्यकारिणीपुढें तीन दिवसांत ठेवाव्यात असें सर्वानुमतें ठरलें.

या तीन दिवसांमध्यें नानातऱ्हेच्या कल्पना ह्यांच्या डोक्यांत थैमान घालत होत्या. त्यामुळें विशेष मोकळेपणानें माझ्याशीं हे बोलतहि नसत.

त्या दोन तीन दिवसांतल्या एका मध्यरात्रीं मला जागी करून ह्यांनीं सांगितलें, शाळेचा खर्च भागवण्याची युक्ति झोपेंतच मला सांपडली. ती युक्ति म्हणजे शाळेकरितां गांवांत आठवड्यांतून एक दिवस भिक्षा मागणें. ज्या स्वरूपांत भिक्षेची आवक होईल ती, व स्थिर स्वरूपाच्या मिळणाऱ्या देणग्या यांचा हिशेब करूनच यापुढें शिक्षकांनीं पगार घ्यावयाचे.

ह्यांनीं प्रकट केलेला भिक्षेचा विचार म्हणजे माझ्या हृदयावर जणू बॉंब पडल्यासारखा वाटला. मी त्यांच्या प्रश्नाला कांहींच उत्तर दिलें नाहीं त्या वेळेला. चिंचवडच्या राष्ट्रीय शाळेची हकीगत सांगून हा भिक्षेचा प्रयोग कै. बाळूकाका कानिटकर आदि मंडळींनीं कसा केला होता व तो कसा बराच यशस्वी झाला, ती माहिती त्यांनीं मला सांगितली व म्हणाले, " तुला जी गोष्ट अवघड वाटते आहे, ती गोष्ट माझ्या शाळेंतील सहकाऱ्यांनाहि पटेल असं मला वाटत नाहीं. परंतु भिक्षेच्या उपायापलीकडे स्वावलंबी उपाय माझ्या नजरेपुढें कोणताहि नाहीं. पाहूं या उद्यां सभेंत काय होते तें ! "

वरील संभाषणानंतर हे गाढ झोपीं गेले. मला मात्र ती रात्र बेचैन अशीच गेली.

दुसऱ्या दिवशीं शाळेच्या कार्यकारी मंडळापुढें या आर्थिक विषयासंबंधीं सर्वांनीं मिळून चर्चा केली. मुख्यतः एक दोन सूचना माझ्या कानांवर आल्या होत्या.

कांहींनीं मांडलें, शाळेचे वर्ग कमी करून वाटल्यास खालच्या वर्गांचे शिक्षक कमी करावेत. आपण शिक्षक जास्त कष्ट करूं. कांहींनीं शाळेच्या इमारतींचें भाडें आपण जें ३०० रुपये दरसाल देतों तें मालकांनीं घेऊं नये अगर १०० रु. च वर्षाला शाळाभाडें द्यावें. कोणीं म्हटलें आपले शेटजी भागचंद शेट यांचेकडे देणगीचे म्हणून त्यांनीं दिलेले वीस हजार रुपये त्यांच्या पेढीवर आहेत ते मागण्यास काय हरकत आहे ? एक ना दोन आणखीहि कांहींजाणांच्या सूचना असतील, पण अखेर ह्यांची भिक्षेची सूचनाच ' होय-नाहीं ' म्हणून शेवटीं आजीव सभासद शिक्षक जे होते त्यांनीं मान्य केली. चालकवर्ग त्या सभेला जे हजर होते त्यांनीं शिक्षकांना प्रेमळ शब्दांत अशीहि सूचना केली कीं, " शाळा चालवणें आपणांस अशक्य वाटत असेल तर बंद करण्याससुद्धां आमची हरकत नाहीं. पूर्ण विचार करा. आम्ही भिक्षा मागावी कसें म्हणणार ? भिक्षा मागून शाळा चालवा असें आम्ही कसें सांगूं ? "

शाळा बंद करण्याची सूचना ऐकल्यावर शिक्षकांच्या अंगांत राष्ट्रीय शाळेचा अभिमान व नेट निर्माण झाला व सर्वांनीं मिळून विनयशीलतेनें चालकांना सांगितलें, " आम्हांस शाळा ही चालवावयाचीच आहे. आतां यापुढें पैशाचा प्रश्न जबाबदारी घेऊन आम्ही आमचा सोडवूं. आपले आशीर्वाद आमच्या कार्याला असावेत येवढीच आमची इच्छा आहे."

चालकांपैकीं श्री. कै. नानासाहेब वाघ, कै. काकासाहेब थत्ते, कै. डॉ. साठे व कै. डॉ. भट यांनीं डोळ्यांस पाणी आणून कांहींतरी रक्कम त्या दिवशीं शाळेच्या चिटणिसांस दिली असावी व सर्वांनीं एकमतानें सांगितलें, " आपल्यासारखे त्यागी शिक्षक आम्हांस मिळाले हें येवल्याचें भूषण आहे. येवल्याच्या पैठणीची अब्रु धनिक वर्ग न सांभाळतां तुमच्यासारखीं गरीब माणसेंच— त्यागी माणसें, सांभाळणार असेंच दिसतें."

राष्ट्रीय शाळेचे दाते कै. भागचंद शेट ह्यांच्याकडे असलेली शाळेची रक्कम मागणें म्हणजे त्यांच्या परिस्थितीचा अंत पाहणें होतें. मुद्दल पेढीवर नसल्या-मुळें नैतिक बोंच आपण मुद्दाम केल्यासारखी होईल, या विचारानें सभेच्या सर्व मंडळींनीं शेटजींकडे पैसे मागण्याचा विचार एका क्षणांत सोडून दिला. कै. भागचंदशेट हे शाळेचें वीस हजारांचें व्याज ९०० रुपये दरसाल न चुकतां देतच होते. त्यांचा सुस्वभाव व नेकीचें वागणें गांवांत प्रसिद्ध असल्या-मुळें त्यांना त्रास देणें कोणालाच पसंत पडलें नाहीं.

भिक्षेचा वार रविवार ठरला गेला. सकाळीं ९ ते १२ पर्यंत गांवामधून फेरफटका भिक्षेकरतां होत असे. शाळेविषयीं सहानुभूति ठेवणाऱ्या लोकांच्या पेठा ही मंडळी बहुतेक घेत असत. पांच-सहा जण शिक्षक भिक्षेमध्यें नेहमींचें सामील झालेले होते. आमच्या शाळेंतील श्री. ल. ब. कुलकर्णी रामदासी श्लोक मोठ्यानें पुढें होऊन म्हणत असत. त्यानंतर त्याच आवाजांत बाकीची मंडळी तो श्लोक म्हणत मागोमाग चालत.

आमच्या शाळेमध्यें मुख्य हॉलमध्यें टिळकांचें तैलचित्र फार मोठें असें लावलेलें होतें. त्या चित्राकडे शांत चित्त व एकाग्र होऊन, सर्व शिक्षक खालील श्लोक भिक्षेला निघण्यापूर्वीं म्हणत असत.

कीं घेतलें व्रत न हें अम्ही अंधतेनें
लब्धप्रकाश इतिहास निसर्ग मानें
जें दिव्य दाहक म्हणोनि असावयाचें
बुद्धयाच वाण धरिलें करीं हें सतीचें ॥

आले शिरावर जरी घनघोर घाले
दारिद्र्य दुःख अपमानही प्राप्त झाले
कारागृहीं सतत वास जरी मरें मी
पूजीन मी तरी संतत मातृभूमी

जणू टिळकांचा आशीर्वाद घेऊन शाळेचा जीना उतरून हे शिक्षक भिक्षेची वाटचाल करीत. भिक्षेहून परत आल्यावर आणलेली सर्व भिक्षा धान्य व पैसे टिळकांच्या फोटोपुढें ठेवली जाई व पुन्हा एकदा टिळकांना शिक्षकवर्ग सांगत असे—

तव स्मरण संतत स्फुरणदायि आम्हां घडो
त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णीं पडो
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो
तुझ्यासमचि आमुची तनुही देशकार्यीं पडो

या सर्व शिक्षकांच्या पायांमध्यें भिक्षेच्या वेळेला वहाणा नसत. सर्वच शिक्षकांना ३ तासांची भिक्षा थोडी फार जाणवतच असे. त्यांतल्या त्यांत ह्यांच्या नाजूक कातडीवर उन्हाचा, हवेचा व श्रमाचा इतका कांहीं परिणाम होई कीं, त्यांचा चेहरा लाल बुंद होऊन जाई. गांवांतील कित्येक मंडळी ह्यांना पाहिल्यानंतर ‘ काय हे श्रम ! यांतून काय निष्पन्न होणार ! ’ असे उद्गार कळकळीनें काढीत असत.

आमची नातलग मंडळी येवल्यास आली म्हणजे हा भिक्षेचा सोहळा त्यांना पाहावाच लागे. तें भिक्षेचें दृश्य कोणत्याहि शिक्षकाच्या नातलगाला सुखकारक कसें वाटणार ? आमच्या येथें यावर कोणी बोलूं लागल्यास ह्यांनीं सांगावें, “ तुम्हाला जें बघायला आवडत नाहीं तें आम्हाला करायला आवडतं

असं नाहीं. परंतु राष्ट्राची गुलामगिरी तोडण्याकरितां राष्ट्रीय शिक्षण हा मार्ग मीं पसंत केलेला आहे. तेव्हां पतिव्रतेप्रमाणें या कष्टांतहि आम्हांस सुख वाटतें, हें निश्चित."

अशा उत्तरावर कोणी चर्चेच्या भरीस पडत नसत, व हें प्रकरण जास्त चिडीस जाऊं नये म्हणून हसण्यावारी घालवीत असत.

भिक्षा सुरू केल्यापासून राष्ट्रीय शाळेचा जम बसला अगर शिक्षकांनीं बसवला असें म्हटलें तरी चालेल. यापुढें शाळेची आर्थिक अडचण घरादारांत कुठेंच चर्चिली गेली नाहीं.

मुलांना लागणाऱ्या शालेय वस्तूंचें दुकान शाळेंत निघालें. तोच माल विद्यार्थिवर्ग खरेदी करीत असे. वर उल्लेखिलेले ल. ब. कुळकर्णी विणाईचा कोर्स पुरा करून आले असल्यामुळें काढलेल्या सुताची विणाई शाळेमध्यें होऊं लागली.

कॉंग्रेसच्या कामामध्येंहि राष्ट्रीय शाळेंतील शिक्षक मंडळी लक्ष घालूं लागल्यामुळें येवलें तालुक्याची कॉंग्रेस कमिटी राष्ट्रीय शाळाच होऊन गेली. राष्ट्रीय शाळेचे शिक्षक गांवांतील राष्ट्रीय भावना सतत जीवंत, जागृत ठेवत आहेत. यामुळें जिल्हा कॉंग्रेस कमिटीहि आर्थिक मदत राष्ट्रीय शाळेला मधून मधून करू लागली.

भिक्षारूपी कामधेनु दाराशीं उभी केल्यामुळें किरकोळ खर्चाला सर्व बाजूंनीं आर्थिक मदत मिळूं लागली.

भिक्षेनें शाळेचें बस्तान नीट रीतीनें बसलें, पण राष्ट्रीय शाळेंतील शिक्षकांच्या स्त्रियांना ती भिक्षा अवलोकन करतांना काय होत होतें याचें बरोबर वर्णन करणें माझ्या शक्तीबाहेरचें आहे. दुःखाचे आवंढे गिळून सुखाचे मुखवटे धारण करून पतीच्या स्वागतास या सर्व स्त्रिया तयार असत, ही मात्र गोष्ट खरी. त्या वेळेला या सर्व स्त्रिया तरुण नव्हे उमलणाऱ्या कळ्याच होत्या म्हटलें तरी चालेल. कुठल्याहि तऱ्हेची हौस-मौज, वस्तूचा हव्यास हें कोणाहि आमच्यापैकीं स्त्रीस करणें शक्यच नव्हतें, पण पतीच्या शुद्ध प्रेमामुळें व नवीन कांहीं तरी प्रयोग आपली मंडळी करीत आहेत त्याला

आडकाठी करावयाची नाहीं या एकाच उदात्त विचारानें घरोघरीं संसाराची मांडणी आनंदी अशीच सर्वांना दिसत असे.

भिक्षेच्या कामधेनूपासून राष्ट्रीय शाळेला विशेषसी दुसऱ्याच्या आर्थिक मदतीची अपेक्षा करायला लागली नाहीं. पहिल्याच भिक्षेमध्यें अठरा पायली धान्य व पसतीस रुपये रोख मिळाले. अशाच तऱ्हेची भिकळत दर भिक्षेंत मिळत होती असें नाहीं, परंतु यांतून शाळेचा बहुतेक खर्च भागत होता. हें धान्य शाळेच्या शिक्षकांनीं विकत घ्यावयाचें असा दंडक घातला गेला होता. भिक्षेंत ज्वारी, बाजरी व तांदूळ येवढींच धान्यें मुख्यतः असत.

राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांची भिक्षा बघून गांवांतील कांहीं मंडळींना व व्यापाऱ्यांना बरें वाटलें नाहीं. कांहीं व्यापारी लोकांनीं नियमित कांहीं मदत करण्याचें ठरवलें; छगन दुल्लभ ( पटणी ) या पेढीकडून आठवड्यांत अकरा रुपये अशी वर्षभर भिक्षा घातली गेली. श्रीमान् मुरलीधर शेट नथुभाई गुजराथी ह्यांच्याकडूनहि नियमित अशी कांहीं रक्कम भिक्षेमध्यें येत असे. त्याचप्रमाणें कांहीं मुसलमान व्यापारीहि व ब्राह्मण सराफ मंडळी यांचीहि मदत थोडी का होईना पण नियमित होत असे. त्याचप्रमाणें कै. नानासाहेब वाघ, कै. डॉ. साठे, व डॉक्टर भट यांचीहि मदत दरमहा कांहीं तरी रक्कम शाळा असेपर्यंत मिळत होती.

या धकाधकीच्या मामल्यामध्यें—मामला सुरू असतांना मध्यंतरीं माझे धाकटे दीर–जे अकोल्यास डॉक्टर होते ते—यांचें लग्न मुळशीचे परांजपे यांची कन्या यमू हिच्याशीं झालें. हें लग्न नाशकास झालें. माझे चुलत मामंजी त्या वेळीं हयात असल्यामुळें ( कै. नानासाहेब आपटे यवतमाळ ) त्यांनींच या लग्नाचा भार पुढाकार घेऊन उचलला होता. तरीहि थोडी फार सांपत्तिक, आर्थिक तरतूद माझे वडील भावजी व हे या दोघांना करावी लागली. हें लिहिण्याचें मुख्य कारण म्हणजे आयुष्याची वाटचाल करीत असतांना एक प्रकारचे नवीन अनुभव अनुभवावे लागतात.

जेव्हां घरांत अन्न नसतें किंवा थोडें असतें तेव्हां घरांतील सर्व माणसांच्या भुका जागृत होतात. पैसा कमी कीं खर्च वाढता.

दुसरीहि गोष्ट म्हणजे माझा मुलगा शंभू याची मुंज भावजींचें लग्न झाल्यानंतर एक दोन वर्षांनीं करावी लागली. त्याचीं मुख्य दोन कारणें—एक कारण त्या वर्षी मुलाला मुंज लाभत होती आणि माझी बहीण शांता गेल्यापासून माझे वडील बरेच हताश झाले होते. त्यांची तीव्र इच्छा शंभूची मुंज लवकर करावी अशी कळल्यामुळें आम्हीं अडचणींत अडचण करून ही शंभूची मुंज पुण्यास केली. आमच्या आतेष्टांना पुणें हें सर्वानुमतें मध्यवर्ती वाटलें, त्यामुळें पुणें हेंच सोईचें पडलें. या मुंजीला लागणारा खर्च व त्याची आंखणी आम्ही दोघांनीं करतांना कुठेंच दोघांचे जुळतेमिळते आंकडे पडेनात. अखेर आम्ही दोघांनीं आपआपल्या विचाराला थोडी फार मुरड घालून मुंजीचें कार्य पार पाडलें.

ह्यांचें म्हणणें मुंजीला खर्च लौकिकी न करतां थोडक्यांत मुंज, शास्त्राप्रमाणें उरकावी असें होतें. ह्यांना मिळणारी मिळकत व ह्यांनीं अंगिकारलेलें कार्य यांत वैभवाची मुंज बसणें शक्यच नव्हतें. ह्यांचें तत्त्वज्ञान मला समजत होतें, पटत होतें पण आवडत नव्हतें.

मी एका सुखवस्तु श्रीमंत घराण्यांतून आलेली होतें व माझे मामंजीहि मला दिली तेव्हां सुखवस्तु व द. म. ४०० रुपये मिळविणारे होते. त्यामुळें आमची ही शंभूची फक्त शास्त्रोक्त मुंज सर्व नातलगांमध्यें एक चेष्टेचा विषय होईल या विचारानें मला मुंज बऱ्यापैकीं खर्च करून करावयाची होती. दुसरी हृदयाला लागलेली गोष्ट म्हणजे बारसं-जावळ-उष्टावणं हे माझ्या मुलाचे संस्कार व्हावे तसे कांहीं ना कांहीं कारणानें झाले नव्हते, त्यामुळें शंभूची मुंज चांगली करावयाची असें माझ्या मनानें घेतलें. आणखी माझ्या विचाराला एक अनुकूल गोष्ट म्हणजे शंभू पांच वर्षांचा झाल्यापासून मी भिडवाईफीची प्रॅक्टिस येवलें गांवांत सुरू केली होती. त्यामुळें खर्चाचा विचार करणें मला जरा सोपें गेलें. ह्यांच्या स्वभावधर्माप्रमाणें ह्यांनीं मला स्पष्ट सांगितलें—" माझा पगार तुला माहीत आहे व तो सगळ्याचा सगळा मी तुझ्यापाशीं आणून देत आहें. आपल्याजवळ शिल्लक पैसा बिलकूल नाहीं. आतेष्टांजवळ मागणी करावयाची नाहीं. तेव्हां तुझ्या मताप्रमाणें हौशीची मुंज कशी होणार ? "

माझ्या मनाच्या इच्छेकरितां—माझ्या हौसेप्रमाणें मुंज करण्याचें ह्यांनीं कबूल केलें. "खर्चाची तोंडमिळवणी कशी करावयाची तें तूं ठरव. मला तें योग्य वाटल्यास हौसेच्या मुंजीला संमति मी अवश्य देईन." असें हे म्हणाले.

मुंज पुण्यांत करावयाची असल्यामुळें माझ्या वडिलांनीं ते राहात असलेला त्यांचा मोठा वाडा आपटे मंडळींना ३ दिवस मोकळा करून दिला. माझा शंभू हा पहिलावहिलाच मुलगा माहेरच्याहि बाजूला असल्यामुळें माहेरच्या नातलगांनीं मुंजीची कुणकुण कळतांच मोठ्या हौसेनें तयारी चालविली होती. माझी मावशी अक्का हिनें मुंजीला लागणारी प्रत्येक वस्तु धान्य-धुन्यसुद्धां जय्यत तयारी करून मला पुण्यास बोलावून माझ्या स्वाधीन केलें.

मुंजीमध्यें देण्याघेण्यास लागणारा कपडा मीं येवल्याहून एका दुकानांतून वाटेल तसा उचलला होता.

एकंदरींत मावशीनें केलेली तरतूद प्रारंभीं घातलेला पैसा व येवल्यांतील कापड दुकांनातील बिलें—मीं व्यक्तिशः भागविण्याची जबाबदारी घेतली, ह्यांना मुंजीच्या पैशाबद्दल तोशीस पडूं देणार नाहीं असें मीं निश्चयानें सांगितल्यावर ह्यांनीं मला मनापासून संमति दिली.

हें माझें करणें ह्यांना मोठेंसें पसंत होतें असें खास नाहीं, पण ह्यांनीं संमति देतांना "आतां रबर फार ताणलें तर तुटेल तेव्हां मी माझा निश्चय मागं घेतों" व हसत म्हणाले, "लग्न झाल्यावर तूं माझ्याकरितां तुझा आवडता चहा सोडलास तेव्हां मलाहि थोडीशी मुरड घालून तुझी इच्छा पुरी केली पाहिजे. शंभूबद्दलची कोणतीहि इच्छा हा तुझ्या हृदयाचा उमाळा आहे. माझ्या कार्यांत सहकार्य करणें यांत कर्तव्याची जाणीव आहे हो ना ?"

यानंतर आम्ही दोघांनींहि युक्तिप्रयुक्तीनें चि. शंभूचा मुंजीचा सोहळा पार पाडून अंगीं लावून घेतला. एका वर्षामध्यें मीं मला झालेलें कर्ज काटकसरानें फेडलें.

१९२८ सालीं राष्ट्रीय शिक्षण परिषद् येवल्यास व्हावयाची होती. याच्या आधीं मला वाटतें २।४ च राष्ट्रीय शिक्षण परिषदा झाल्या असतील.

येवल्यास परिषद् घेण्याचें तर ठरलें. कमींत कमी चाळीस-पन्नास राष्ट्रीय शाळेंतील शिक्षक निरनिराळ्या ठिकाणांहून येणार तेव्हां कमींत कमी दोन दिवस त्यांची उतरण्याची सोय व्हावयास पाहिजे होती. तें कसें जमावें हा प्रश्न ह्यांच्यापुढें मुख्यत्वें होता. राष्ट्रीय शाळेंतील शिक्षकांनीं राष्ट्रीय शिक्षण परिषद् घेण्यास संमति दाखविली, परंतु त्या परिषदेच्या खर्चाची व्यवस्था कशी करावी याबद्दल कोणीच शिक्षक सूचना—पर्यायानें सहानुभूति दाखवीनात.

त्या संधानाला ह्यांना जरासं बरंहि नव्हतं. त्या निमित्तानें दोन दिवसांची रजा काढून हे घरींच निजून राहिले. मला ह्यांच्या रजेचं जरा नवलच वाटलं. तेव्हां मीं ह्यांना प्रश्न केला, " येवढ्याशा दुखण्याला तुम्ही घरीं कसे निजून राहिलांत ? हें तुमच्या स्वभावाविरुद्ध कसं घडतं आहे ? "

त्या वेळेला त्यांनीं थोडा विचार करून मला सांगितलं, " ज्या वेळेला काम करतां करतां माणसाची मति कुंठित होते, मार्ग सुचत नाहीं, त्या वेळेला माणसानें अगदीं रिकामं डोकं करून स्वस्थ राहावें. मार्ग त्यानंतर कांहींतरी मोकळा होतो, आपल्याला मार्ग सुचतो, अगर परमेश्वर मार्ग खुला करून देतो."

आणखीहि ते बोलण्याच्या नादांत सांगून गेले, " मनुष्य हा निरर्थक भूत, वर्तमान व भविष्य तीन्ही काळाचीं ओझीं आपल्या शिरावर घेऊन वाटचाल करूं पाहतो. त्यानें तो अधिकच शिणून जातो. मी बोलून चालून प्रकृतीनें दुबळा मनुष्य आहे. आज या घटकेला तिन्हीहि काळाचीं ओझीं बाजूला सारून मोकळ्या वृत्तीनें पूर्ण सुखांत आहे. दोन दिवसांनीं पाहूं काय होतं तें. "

मी अडचणीच्या मनोवृत्तीचें कारण विचारूं लागलें, तेव्हां राष्ट्रीय शिक्षण परिषदेची सविस्तर हकीगत ह्यांनीं मला सांगितली. हे पुण्यांतील कांहीं मंडळींशीं व त्याचप्रमाणें इतर राष्ट्रीय शाळेच्या चालकांशीं परिषद् आम्ही घेणार अशा तऱ्हेचें टिळक विद्यापीठाच्या सभेस गेले असतांना निश्चयाचे बोल बोलून गेले होते.

आमच्या शाळेंतील शिक्षक मंडळींचा कांहीं ना कांहीं कारणांनीं स्वभावधर्मच असा बनून गेला होता—आपल्यांनीं काढलेलें कोणतेंहि राष्ट्रीय

शाळेसंबंधीं कार्य—कोठलीहि सूचना, चट्दिशी उचलून उल्हासानें पार पाडावयाची नाहीं. आपस्यांचें शेवट ऐकावयाचें, पण बऱ्याचशा अडचणी दाखवून, कांहीं काळ लांबवून शेवटच्या घटकेला आपस्यांच्या कार्याला सहकार करावयाचा.

अशा तऱ्हेची परिस्थिति मुख्याध्यापक आपटे व इतर शिक्षक मंडळी यांच्यांत असण्याचें कारण म्हणून एक दोन गोष्टी माझ्या लक्षांत आल्या त्या कदाचित् या असूं शकतील.

हे व इतर शिक्षक ह्यांच्यामध्यें समान वय नसल्यामुळें विचार करण्याच्या पद्धति वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून असत. शिक्षकांचें तरुण रक्त असल्यामुळें पुष्कळशी विचारसरणी क्रांतिकारक पक्षाप्रमाणें धैर्याची, परंतु विचाराची खोली कमी, त्यामुळें ह्यांचें व इतरांचें कोणत्याहि नवीन गोष्टींत विचार जमणें कठीण जात असे. ह्यांनीं एकदा मनानें गोष्ट घेतली म्हणजे हे ती केल्यावांचून कधीहि सोडत नसत, मग ती गोष्ट लहान असो, वा मोठी असो, अगर त्याकरितां कितीहि कष्ट पडोत.

इतर शिक्षक मंडळी कांहीं वेळां मनाचा संयम करून ह्यांच्या कार्याला सहकार करीत, परंतु त्या कार्याला लागणारे कष्ट व त्याच्यांतून निष्पन्न होणारें फळ याचा विचार व्यस्त प्रमाणांत दिसल्यास शिक्षक मंडळी "आमच्या-च्यानें यापुढें असें काम होईलसें वाटत नाहीं." असेंहि मजेखातर चिठ्ठी लिहून मधेंच कळवीत.

अशा वेळीं ह्यांना अतिशय शांत राहून त्यांच्याकडून ( इतर शिक्षकां-कडून ) तें काम करून घ्यावें लागे.

दुसरी गोष्ट म्हणजे ह्यांना येवल्याची राष्ट्रीय शाळा व येवल्याची जनता ह्यांच्यामध्यें राष्ट्रीय वृत्ति निर्माण करावयाची होती. ज्या माणसाला कांहीं करावयाचें असतें, कांहीं घडवायचें असतें तेव्हां सर्वांशीं जुळतेंमिळतें घेऊन वागावें लागतें. या तत्त्वाप्रमाणें ह्यांची वागणूक असावयाची. ती शाळेंतील आमच्या शिक्षकांना मोठीशी पसंत नसावी. शिक्षकांचाच काय पण माझा-

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रमांक 32068 वि: ... क्रमांक 9030 नों: दि: ...

सुद्धां ह्यांच्याशीं या बाबतींत कधीं कधीं मतभेद होत असे. मीसुद्धां म्हणावयाची, "अहो, तुम्ही आतां त्या माणसांशीं कशाला इतकं बोलत बसलां होतात ? तुम्ही काय बोललांत हें त्याला समजण्याची कुवत तरी आहे का ?" अशा वेळीं ह्यांनीं स्पष्ट शब्दांत मला कितीक वेळां सांगितलें आहे, "बाहेरचा कपडालत्ता व त्याचें पुस्तकी शिक्षण पाहून माणसाचें मोजमाप तुम्ही करत जाऊं नका. आपण समजतों त्यापेक्षां प्रत्येक माणसाची बुद्धि व बुद्धीची झेप वेगळी असण्याचा संभव आहे. अन् हें पाहा, मी त्याच्याशीं काय बोललों हें जरी त्याला समजलें नाहीं, तरी मी कांहींतरी त्याच्याशीं चांगलं बोललों हें तरी त्याला खास समजलं आहे. येवढ्या माझ्या एकाच कृतीनें आम्ही दोघं अधिक जवळ आलों आहोंत, नाहीं का ?"

अशाच प्रकारें ह्यांचें व इतर शिक्षक मंडळींचें चालावयाचें. तरी पण सर्व शिक्षकांच्यामध्यें एक ध्येयवाद निश्चित होता, तो म्हणजे आपल्यांतील किरकोळ मतभेदामुळें त्याचे परिणाम राष्ट्रीय शाळेला—पर्यायानें राष्ट्रीय चळवळीला केव्हांहि घातक होऊं द्यावयाचे नाहींत. उज्ज्वल राष्ट्रभक्ति व राष्ट्राच्या गुलामगिरीची चीड मनापासून असल्याशिवाय कॉलेजच्या शिक्षणाशीं असहकार करून आमचे शिक्षक राष्ट्रीय शिक्षणाला तन-मन-धनें करून अनुकूल कसे झाले असते ? ह्यांच्या दोन दिवसांच्या आजारानंतर तिसरे दिवशीं हे शाळेंतून घरीं आले व मला आनंदानें सांगू लागले, "आमची राष्ट्रीय शिक्षण परिषद् म्हटल्याप्रमाणें आम्ही येवल्यांत घेणार. त्या परिषदेची रूपरेखा, कामाच्या वाटण्या करण्यासाठीं उद्यां आम्हीं कार्यकारी मंडळाची सभा घेतली आहे," आणि म्हणाले— "मीं तुला काल म्हटलं नव्हतं, कांहींतरी मार्ग निघत असतो म्हणून !"

"माझ्या दोन दिवसांच्या गैरहजेरींत वैशंपायन गुरुजींना करमलें नसावें व विचार करण्यास पूर्ण अवसर मिळाल्यामुळें त्यांनीं आपण होऊनच परिषदेबद्दल माझ्याजवळ बोलणें काढलें व थोडीबहुत पुढच्या कामाची रूपरेषाहि माझ्यापुढें विशेष उत्साहानें मांडली. तेव्हां मीं निक्षून एकच प्रश्न विचारला, 'परिषद् घ्यायची हें तुमचें निश्चित मत आहे ना ? कार्यकारी मंडळांत कांहींतरी एखादी अडचण दाखवून परिषद टाळणार असाल तर

या विषयावर मला बोलायचेंच नाहीं. आचार्य वि. प्र. लिमयांना परिषदेचे अध्यक्ष म्हणून बोलवावें, असा माझा विचार आहे व त्याप्रमाणें आचार्य लिमयांना मी पुण्यास गेलों तेव्हां बोलूनहि आलों आहें.

लगेच अण्णांनीं सांगितलें ( वैशंपायन गुरुजींना अण्णा म्हणत असत ) ' तुम्हीं अगदीं निश्चित असा. तुमची प्रकृति बरी नाहीं तेव्हां कोणतेहि श्रम न करतां आम्हां शिक्षकांच्याकडून तुम्ही फक्त कामें करून घ्यावींत.' "

शाळेंत घडलेली वरील हकीगत मला सांगून हे मनापासून हसले व म्हणाले, " ' सदासर्वदा देव सन्निध आहे, कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे.' अग, माझ्या जन्माच्या वेळेपासून मीं जगावें का मरावें हा प्रश्न देवाला पडला होता ( ह्यांच्या वेळेला फॉरसेप्स केस ह्यांची झाली होती ). ज्या अर्थीं देवानं मला जगविलं आहे, त्या अर्थीं माझीं कामं अडचण येऊन का होईना शेवटीं मनाप्रमाणें होणारच."

दुसऱ्या दिवशीं कार्यकारी मंडळाची मीटिंग होऊन कामाची वांटणीहि ठरल्याप्रमाणें झाली. वैशंपायन गुरुजी हे संस्थेचे चिटणीस होतेच. तेव्हां त्यांनींच परिषदेच्या चिटणिसाचें काम करावें व बाकीची शिक्षक मंडळी कार्यकारिणींत घेतली गेली. परिषद् या सर्वांच्या सल्ल्यानें पार पाडावी असें ठरलें. परिषदेला लागणारा खर्च कसा भागवावा हा प्रश्न जेव्हां चर्चेला सभासदांपुढें आला, तेव्हां सर्वच एकमेकाकडे बघूं लागले. ह्यांनीं पुढें होऊन सर्वांना सांगितलें कीं, " शाळेपाशीं पैसा शिल्लक नाहीं ही परिस्थिति लक्षांत ठेवूनच आम्हीं परिषदेच्या खर्चाची आंखणी करूं. " ह्यांनीं मनामध्यें जी थोडी फार आंखणी केली होती ती पुढीलप्रमाणें सर्वांपुढें मांडली. " जागेची अडचण आपले आर्यसमाज मंदिर आपण विनंती केल्यास भागवील. त्याचप्रमाणें दोन दिवसांचा स्वयंपाक करण्याकरितां व वाढण्याचें काम व्यवस्थेशीर पार पाडण्याकरितां आपल्या येथील वनिता संघ खात्रीनें मदत करील. प्रश्न मुख्य जो आहे तो धान्याचा व किरकोळ किराणा मालाचा.

काय झालं कुणास ठाऊक ? चालकवर्गापैकीं श्री. अण्णासाहेब दाणी वकील ह्यांनीं एक वेळचा धान्याचा शिधा देण्याचें कबूल केलें. एक दिवसाचा

शिधा पदरांत पडतांच सर्व शिक्षकवर्गानें आम्ही पुढचें भागवूं. गांवांतून मदत आम्ही खास मिळवूं असें सांगितल्यामुळें शाळेचे चालक व शिक्षकवर्ग परिषदेचा पूर्ण आराखडा करून उत्साहानें शाळेच्या बाहेर पडले.

सर्व शिक्षकांनीं मनावर घेतल्यावर भाजीपाला व किरकोळ किराणा माल सहज मिळूं शकला. ह्यांनीं कांहीं मुलांच्या सधन पालकांना भेटून साठसत्तर माणसांना पुरेल इतकें धान्य मिळविलें.

येवलेकर मंडळी फार सढळ हातानें जरी ताबडतोब मदत करीत नसत तरी राष्ट्रीय शाळेचें कोणतेंहि काम अडूंहि पण देत नसत. आपल्या गांवांत बरीचशी ज्ञानी मंडळी येणार आहेत याची जाणीव झाल्यावर सामान्य जनतेकडूनसुद्धां परिषदेला लागणारें सर्व साहाय्य त्या वेळीं मिळूं शकलें.

ठरल्याप्रमाणें आचार्य वि. प्र. लिमये या राष्ट्रीय शिक्षण परिषदेचे अध्यक्ष म्हणून बोलावले गेले. खामगांव, अकोला, वांई, नगर, चिंचवड वगैरे ठिकाणचा राष्ट्रीय शाळेचा शिक्षकवर्ग परिषदेला हजर होता. राष्ट्रीय शिक्षणावर चर्चा व ठराव झालेच असतील. आचार्य लिमयांचें अध्यक्षीय भाषण विद्वत्ताप्रचुर पण सामान्य जनालाहि समजण्यासारखें झालें. आम्ही वनिता संघाच्या स्त्रियाहि परिषदेला उपस्थित होतों.

१९२८ सालीं माझी विचारांची पातळी अगर समजशक्ति जरी मोठी नव्हती, तरी पण आचार्य लिमयांच्या भाषणांतील एक वाक्य मला अद्यापिहि समाधान देतें. तें वाक्य म्हणजे " राष्ट्राची — आपल्या राष्ट्राची —परिस्थिति विद्यार्थ्यांना समजावून देऊन आपण राष्ट्रीय शाळेची शिक्षक मंडळी जें राष्ट्रीय वृत्तीचें शिक्षण मुलांना देतों त्यामुळेंच जणू कांहीं त्याचा कर म्हणून जनता आपल्यास मदत करीत आहे. "

आचार्य लिमयांच्या या वाक्यानें मला जें समाधान झालें तें हें कीं, आमची मंडळी शाळेकरितां गांवांत मदत मागतात, त्याचा अर्थ माझ्या मनाला पटण्यासारखा लावला गेला. माझ्या स्वाभिमानी वृत्तीला बरें वाटलें.

ह्यांचा स्वभाव प्रथमदर्शनीं शांत असा सर्वांना वाटे, परंतु तसा तो नव्हता, हें तितकेंच खरं आहे. ह्यांच्याजवळ वावरणारी मंडळी आपटे

गुरुजी अतिशय रागीट आहेत असें पहिल्या आयुष्याचें वर्णन करतील, अन् आमचे महात्माजी तरी शांत असे कुठें होते ? त्यांनीं स्वतःच म्हटलें आहे, " मी काम जिंकू शकलों, पण क्रोध जिंकू शकलों नाहीं." तसंच ह्यांचं कांहींस होतं म्हटल्यास हरकत नाहीं. पुढें पुढें आयुष्याच्या उत्तर भागांत आलेला क्रोध संयमानें जिरविण्याची संवय मात्र अलीकडे ह्यांना झाली होती.

हे नेहमीं सांगत, " मी रागावतों—फार रागावतों हें अगदीं खरें आहे, पण मी कशाकरितां रागावतों याचा विचार तुम्ही मंडळी कां करीत नाहीं ? म्हणजे तुम्ही मला उदार मनानें क्षमाच कराल. "

आयुष्याच्या सुरुवातीला हे फार रागावत असत. घरांत बहीणभावांना, मला स्वतःला व माझ्या मुलाला ह्यांच्या रागीट वृत्तीचे पुष्कळ अनुभव आलेले आहेत, पण ह्यांचा राग थोडया वेळापुरता असे. त्याची बोंच त्यांनीं कधीं मनांत ठेवली नाहीं अगर ज्याच्यावर रागावले असतील त्यालाहि कधीं बोचत राहिली नाहीं.

नातलगांत रागाचे प्रसंग आले असतील तर ह्यांच्या राष्ट्रीय वृत्तीला कुणीं धक्का लावला—कुणीं कमी लेखलें अगर देशभक्तीची टिंगल केली तर ह्यांचा राग अनावर होत असे. खरं पाहिलं तर त्याहि वेळीं इतकं रागावणं बरोबर नव्हतं, पण त्या वेळीं ह्यांचं संयमी मन दुबळं होई. माझे व ह्यांचे संवाद—राष्ट्रीय तत्त्वावरून पुष्कळ वेळां घरांत होत असत. त्या वेळेलाहि ह्यांचा पारा एकदम वर चढे. स्वतःच्या संतापाची चूक लक्षांत येतांच दुसऱ्या वेळेला तोच चर्चेचा विषम योग्य शब्दांत मला समजावून सांगत.

ह्यांच्या रागाचा हा प्रकार बऱ्याचशा मंडळींना येवल्यांत माहिती झालेला होता. कित्येक वेळेला दोन बोटाच्या चिठ्ठीवर, झालेल्या प्रकाराबद्दल ह्यांनीं दिलगिरी प्रदर्शित करून लोकांची क्षमाहि मागितलेली आठवते. तत्त्वाची ती माघार नसेच, पण स्वतःच्या स्वभावाची त्यांत जाणीव होती.

संतापी स्वभावाचा मनुष्य, किरकोळ कारणांवरून नेहमीं संतापत असतो त्याप्रमाणें ह्यांनीं कधींहि केलेलें नाहीं. 'भाजी खारट झाली, या महिन्यांत दूध अधिक कां घेतलें गेलें ?' इतका खर्च कसा झाला ?' वगैरे किरकोळ प्रश्नां-

वरून घरांत ते कधींहि संतापले नाहींत. कधीं स्वयंपाकांत पदार्थ बिघडला तर माझी मलाच लाज वाटायची, पण ती गोष्ट ह्यांना कधींच रागावण्यासारखी वाटली नाहीं.

चि. शंभूवरहि क्षुल्लक बाबतीमध्यें कधींहि हे रागावले नाहींत. सर्व तऱ्हेचें योग्य तें स्वातंत्र्य मला व माझ्या मुलांस ह्यांच्याकडून मिळाल्यामुळेंच आमच्या प्रगतीला वाव मिळाला. चि. शंभूलादेखील जीं बोलणीं कधीं खावीं लागलीं असतील तर त्यांत ह्यांच्या तत्त्वाचा संबंध असावयाचाच !

येवल्याच्या राष्ट्रीय शाळेचें काम ज्याप्रमाणें व्यापक दृष्टिकोणांतून हे करीत असत त्याचप्रमाणें दोन तीन संस्थांचीं कामें पर्यायानें ह्यांच्यावर पडत गेलीं. हीं सर्व कामें निर्लोभ वृत्तीनें व आत्मीयतेनें हे करीत असत.

नाशिक जिल्हा कॉंग्रेस कमिटीमध्येंहि आम्ही येवलें सोडीपर्यंत हे कॉंग्रेसचे सच्चे सेवक ( सभासद ) होते. त्याच बरोबर महात्माजींचे भक्त होते. भक्त म्हणण्याचें कारण ज्याप्रमाणें भक्ताला आपल्या दैवताची हेटाळणी केलेली कधींहि रुचत नाहीं, त्याचप्रमाणें सहज बोलण्यांतसुद्धां महात्माजी व त्यांचें तत्त्वज्ञान यांवर जरा वेगळ्या मनोवृत्तींतून कोणीं बोललें तर हे एकदम बेचैन होत व ती त्यांची अस्वस्थता समोरच्या माणसाला जाणवल्यावांचून कधींहि राहात नसे.

सहजगत्या या विषयावरून मीं कधीं थट्टेंत जरी कांहीं विधान केलें—प्रतिकूल विधान केलें तर ते लगेच म्हणत ‘ पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण,’ त्याप्रमाणें माझी गोष्ट गुरुभक्तीमध्यें आहे. मी एकदाच गुरु पारखून घेतों. मग गुरूच्या पाठीवर हात ठेवून खुशाल वाटचाल करतों. राजकारणांत पहिले गुरु लो. टिळक व त्यानंतरचे पूज्य महात्माजी हें ह्यांचें नेहमीचें सांगणें असें.

येवला कॉंग्रेस कमिटीचें काम अध्यक्ष या नात्यानें पुष्कळ दिवस ह्यांनीं केलें होतें. त्याचप्रमाणें पुणें टिळक विद्यापीठाचें पहिल्यापासून अखेरपर्यंत हे कार्यकारी सभासद होते.

या दोन संस्थांचीं कामें ज्याप्रमाणें ह्यांना करावीं लागत होतीं त्याच धर्तीवर गांवांतील बरींचशीं कामें राष्ट्रीय शाळेंतील सर्व शिक्षकांना करावीं लागत. गांवामध्यें कुठें आग लागली; राष्ट्रीय शाळेची मंडळी विझवायला; कधीं न पडणारा पाऊस अवीट पडला, कीं येवल्याचीं धाब्याचीं घरं कोसळावयाचीं. त्या सर्व मंडळींची व्यवस्था पाहणें व तीं बिऱ्हाडेंचीं बिऱ्हाडें राष्ट्रीय शाळेंत आणून ठेवावीं लागत. मला एक वर्ष आठवतं आहे, पाऊस पुष्कळ पडल्यामुळें विणकर लोकांच्या घरांत गुढघा गुढघा पाणी झालें होतें. त्या वेळेला कित्येक बाळंतिणी खाटपाळण्यासह राष्ट्रीय शाळेंत ठेवाव्या लागल्या होत्या.

कौटम गांवची नवरात्रांतील देवीची जत्रा. फार मोठा उत्सव नऊ दिवस नवरात्रांत तेथें होत असतो. राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांनीं वरच्या वर्गांतील मुलांना स्वयंसेवकाची शिस्त लावून दर्शन घेणारांची व्यवस्था उत्तम प्रकारें केलेली होती. कार्तिकी एकादशीला बालाजीच्या रथाची मिरवणूक शेजारच्या नागडें नांवाच्या खेड्यांत जावयाची. त्याहि गांवच्या कामांत राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांनीं लक्ष घातलेंच पाहिजे. येवलें गांवांतील जातीय किरकोळ भांडणें मिटवणें, समजुती काढणें याहि कामाचा समावेश राष्ट्रीय शाळेच्या कामांतच होत असे. इतकेंच नव्हे तर कुणाच्या इथें मृत्यु झाल्यास प्रेतयात्रेकरितां राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांना बोलावणें हक्कानें यावयाचेंच.

शेवटीं शेवटीं प्रेतयात्रेला जाण्याचें काम रिकाम्या असणाऱ्या शिक्षकानें करावें व बाकीच्यांनीं आपले वर्ग सोडूं नयेत असा दंडक घातला गेला.

ही व अशाच तऱ्हेचीं गांवचीं कामें करतां करतां राष्ट्रीय शाळेचे म्हणून खास काढलेले उत्सवहि उत्साहानें तनमनधनें करून पुरे करावे लागत.

शिवजयंती, टिळक पुण्यतिथी, गांधीजयंती अशा तऱ्हेचे एक-दोन दिवसांचे उत्सव राष्ट्रीय शाळेमध्यें साजरे होतच असत, पण राष्ट्रीय शाळेचा ज्ञानसत्राचा मोठा उत्सव म्हणजे गणपत्युत्सव होय. भाद्रपद शु॥ ४ पासून मोरयाची स्थापना होऊन अनंत चतुर्दशीला मंगलमूर्तीचें विसर्जन होत असे. या दहा दिवसांत नित्य नवा वक्ता व्याख्यानाकरितां आणावयाचा व त्याची

रवानगी त्याच्या इतमामाप्रमाणें सुखसोयींनीं करावयाची हा आमच्या मंडळीचा शिरस्ता होता.

महाराष्ट्रांतील त्या काळचे राजकीय पुढारी ( सर्व मतप्रणालीचें ) त्याच-प्रमाणें साहित्यिक, कीर्तनकार व शिक्षणशास्त्रांतले तज्ज्ञ यांचीं व्याख्यानें रोज सायंकाळीं ६ ते ८ शाळेच्या गणपतीपुढें होत असत. तीं व्याख्यानें ऐकण्या-करितां येवल्यांतील पुष्कळ स्त्री-पुरुष उत्सुकतेनें वेळेवर उपस्थित असत. या दहा दिवसांत मिळालेली व्याख्यानाची मेजवानी आम्हां खेडुतांना वर्षभर पुरवावी लागे. नाहींतर येवल्यासारख्या बाजूच्या गांवांत विद्वान् कुठचे यायला ! हा एक एक वक्ता—वाङ्मयीन हिरा—पैदा करण्याकरितां ह्यांना स्वतःला फार धडपड करावी लागे. आलेला प्रत्येक पाहुणा बहुतेक करून आमचेच घरीं ह्यांनीं निमंत्रण दिल्यामुळें असावयाचा; त्या संबंध दिवसाच्या सहवासांत आलेल्या पाहुण्याशीं ह्यांचें प्रेमाचें व आदराचें वागणें नमुनेदार असे.

आमच्याकडे यानिमित्त निरनिराळ्या मतप्रणालींचे पाहुणे येत व त्यांचा आणि ह्यांचा दाट परिचय होऊन जात असत. अशा तऱ्हेचें ह्यांचें वागणें मनमोकळें व मनप्रसन्न असायचें.

काकासाहेब कालेकर, सेनापति बापट, साने गुरुजी, दा. वि. गोखले, ल. नी. छापेकर, इतकेच नव्हे तर विनोबाजीसुद्धां आमचे पाहुणे म्हणून प्रसंगाप्रसंगानें येत असत.

मतप्रणाली भिन्न असली, कार्य करण्याची धडाडी वेगवेगळी असली तरी आंतील गाभा राष्ट्रप्रीतीनें ओथंबलेला असल्यामुळें हे अशाहि पाहुण्यांत समरस होऊन जात.

साने गुरुजी मुलांचे आवडते गुरुजी कां झाले तें मला एका क्षणांत यावेळीं समजून आलें.

हे व साने गुरुजी जेवतांना एका विषयाच्या चर्चेंत रंगून गेले होते. त्याच वेळीं माझी कमा पोळीचा एक घास ह्यांना व एक घास साने गुरुजींना देण्याचा प्रयत्न करीत होती. ह्यांना व मला कमाचा मोकळे-

पणा पाहून बरें वाटलें नाहीं. हे आपल्यापरी कमाला आपल्या बाजूला घेत होते. मीहि दोघांच्या भाषणांत व्यत्यय न आणतां तिला दूर नेण्याचा प्रयत्न करीत होतें. ७-८ वर्षांची कमा मला आवरेना. तोंच साने गुरुजींनीं 'आ' केला व बाळ घाल मला पोळी असें म्हणाले. साने गुरुजींचा चेहरा, त्यावरील भाव कमाला कळूनच कीं काय एक घास नव्हे तर तीन चार घास भराभर तिनें गुरुजींना भरवले.

कमासारख्या अर्धवट मुलीला क्षणभर आश्रय देऊन आपलीशी केली. ते गुरुजी पुष्कळ मुलांचे आवडते गुरुजी होणें अगदीं स्वाभाविक आहे. नाहीं का ?

आमच्या राष्ट्रीय शाळेचा गणपत्युत्सव म्हणजे हा गांवचा आवडता उत्सव झाला असल्यामुळें गणपत्युत्सवाची वर्गणी येवल्याचे नागरिक आनंदानें देत असत. त्या वेळीं आमच्या शाळेचा मेळाहि बालगोपालांचा तयार केला जात असे. त्यांतील पदें बहुतेक वैशंपायन गुरुजींनीं करून द्यावींत व आमचे शाळेंतील उत्साही शिक्षक श्री. ल. ब. कुलकर्णी ह्यांनीं चांगल्या चाली लावून मुलांच्याकडून तालसुरांत बसवून घ्यावीं. त्यामुळें येवल्यासारख्या गांवांत हें काम उमटून दिसत असे. घरोघरच्या गणपति-विसर्जनाच्या दिवशीं राष्ट्रीय शाळेच्या मेळ्याला अगत्याचें आमंत्रण असावयाचें. बालगोपालांना या मेळ्याच्यामुळें निराळाच आनंद अनुभवायला मिळत असे.

बडोद्याचे प्रो. माणिकराव ह्यांच्याकडून व्यायाम शिक्षण घेतलेला शिक्षक म्हणून दोन महिन्यांकरितां तरी हे आग्रहानें मधून मधून मागून घेत म्हणजे लेझीम-लाठी-दांडपट्टा हे खेळ राष्ट्रीय शाळेच्या मुलांना शिकविले जात.

हे खेळ शाळेच्या क्रीडांगणावरच होत असत. इतकेंच नव्हे तर राष्ट्रीय शाळेचीं मुलें खेळ खेळण्यासाठीं नाशकास, कोपरगांवास मधून मधून जात असत. या खेळासंबंधींसुद्धां ह्यांचें धोरण कांहीं वेगळेंच असे. अंपायर आमचा कधींच नसावा, त्याचप्रमाणें खेळणाऱ्या मुलांना हे नेहमीं सांगत "आपला खेळ चांगला होण्याकडे लक्ष ठेवा. यशापयशाचा विचार मनांत ठेवूं नका. दुसऱ्यानें आपला खेळ नांवाजावा अशा तऱ्हेनें खेळ खेळण्याची

महत्त्वाकांक्षा असावी." व्यायामाचे शिक्षक व मधून एखादा विषय करून घेणारा शिक्षक यांचें राहणें, त्यांची सुखसोय आम्हांला बघावीच लागे.

व्यायामपटू महाबळ त्यांचे चिरंजीव बळवंतराव महाबळ ह्यांनीं राष्ट्रीय शाळेच्या मुलांना मोठ्या आनंदानें विनामूल्य व्यायामाचें व खेळाचें शिक्षण दिलें व मुलांच्यांत व्यायामाची व नाना तऱ्हेच्या खेळांची आवड त्यांनींच उत्पन्न केली.

श्री. वैशंपायन गुरुजी यांचे थोरले बंधु कै. ग. र. वैशंपायन हे जेव्हां त्यांच्या बंधूकडे येवल्यास येत, त्या वेळेला त्यांचा पुरापूर फायदा हे राष्ट्रीय शाळेला करून घेत असत. श्री. तात्या ( ग. र. वैशंपायन ) हे भावनगरकडे नोकरीनिमित्त होते. त्यांना मुलांना शिकविण्याची जात्याच आवड होती. त्यामुळें नानाऱ्तहेचे खेळ व बालकमंदिराचीं खालच्या वर्गांतील मुलांकरितां साधनें व त्यांचा उपयोग हें तात्यांनीं नीट रीतीनें ह्यांच्यापुढें मांडल्याबरोबर त्याच्या सांगण्याप्रमाणें बरेंचसें खेळाचें साहित्य राष्ट्रीय शाळेंत येऊन पडत असे.

श्री. तात्या वैशंपायन हे पहिल्यापासून क्रांतिकारक विचाराचे होते, पण देशभक्ति जाज्वल्य असल्यामुळें व कल्पक शक्ति असाधारण असल्यामुळें ते कुठेंहि आपला प्रभाव पाडूं शकत. त्यामुळें राष्ट्रीय शाळेची मुलें, शिक्षक व गांवांतील आमच्या आंवतभोंवतींची मंडळी तात्यांशीं राजकीय चर्चा व विचारविनिमय मोठ्या उत्सुकतेनें करीत असत. ह्यांचें व तात्यांचें मनापासून जमे. मी पुष्कळ वेळां विचारायची कीं, "ते क्रांतिकारक विचाराचे ? तुम्ही अहिंसक प्रणालीचे ? तेव्हां तुमच्या गप्पा रंगतात कशा ? चर्चा करतां करतां भांडण नाहीं का होत ? " ह्यांनीं यावर स्पष्टीकरण असें केलें, "अग, तात्यांच्याजवळ नवीन विचारांची सामग्री बरीच आहे. ते कांहींतरी राष्ट्राकरतां करूं इच्छितात. तेव्हां मला शिकण्यासारखे विचार कांहींतरी त्यांचेजवळ आहेत, म्हणूनच मी तासन्‌तास त्यांच्या सहवासांत राहतों. कोणाचेंहि गुणग्रहण करण्यास अगर नवीन विचार ऐकून घेण्यास केव्हांहि मला मानापमान वाटत नाहीं. दत्तानें अनेक गुरु केले त्याप्रमाणें निरनिराळ्या विचाराचे गुरु मलाहि असूं शकतील."

'घार फिरते आकाशीं, तिचें चित्त पिलांपाशीं' याच्या उटल 'पक्षी घरट्यांत राही, पिलांसाठीं दूर पाही' अशी ह्यांची राष्ट्रीय शाळेच्या विद्यार्थ्यांकरितां तत्परता असे.

१९३० सालीं महात्माजींनीं मिठाचा सत्याग्रह केला. 'दांडी मार्च' ही घटना महात्माजींच्या आयुष्यांत व १९३० च्या राजकारणांत बरीचशी महत्त्वाची अशीच झाली. कांहीं सत्याग्रही लोकांच्या समवेत महात्माजींनीं मिठाच्या सत्याग्रहाकरितां पदयात्रा केली. पदयात्रेचें उद्दिष्ट महात्माजींच्या मनांत जें होतें तें पुरेपूर पदरांत पडलें.

प्रत्येक खेड्याला महात्माजींचा संदेश, महात्माजींचें कार्य व ब्रिटिश सरकारशीं असलेला असहकार याची कल्पना खेड्याखेड्याला देऊन खेडीं जागृत करीत करीत महात्माजी पुढें चालले होते. ही एक प्रकारची अहिंसक लढाईच होती. लढाईचे जसे कांहीं नियम मूलभूत असावे लागतात त्याप्रमाणें सत्याग्रहींचेंसुद्धां एक शास्त्र आहे. हें शास्त्र ज्यांना अवगत असेल व मान्य असेल त्यांनींच आमच्या चळवळींत भाग घ्यावा असें महात्माजींचें स्पष्ट सांगणें असें.

महाराष्ट्रांतील राष्ट्रीय शाळा या अशा आणीबाणीच्या वेळीं स्वस्थ कशा राहणार ? बहुतेक राष्ट्रीय शाळेंतून आपआपले शिक्षक महात्माजींच्या कामांत सहकार्य करण्यास पाठविले होते. येवल्याच्या आमच्या शाळेंतील श्री. का. र. वैशंपायन, ल. ब. कुळकर्णी व गांवांतील कांहीं मंडळी येवल्याची बॅच म्हणून चेंबूर, धारासना येथें सत्याग्रह करण्यास गेले होती.

महात्माजींच्या चळवळीला तेज चढतां चढतां १९३२ सालीं तर राष्ट्रव्यापी चळवळ अशी चहूंकडे दिसून आली. या १९३२ सालच्या चळवळींतच ब्रिटिश सरकारनें पुष्कळ राष्ट्रीय शाळा बेकायदेशीर ठरविल्या. सुमारें एक तप राष्ट्रीय शाळेच्या राष्ट्रकार्याचा नंदादीप सतत तेवत होता, तो अंतर्धान पावला.

१९२१ सालापासून आम्ही राष्ट्रीय शाळेसाठीं येवल्यास आलों. या अकरा वर्षांत येवलेकरांची ज्ञानसत्रामुळें व राष्ट्रीय शाळेच्या शिक्षकांच्या दीर्घोद्योगामुळें कांहींतरी सर्वांगीण उन्नति खास झाली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ३२०६९ वि : इतिहास
क्रमांक १०३० नों: दि: २४६२

सर्वांगीण उन्नति यामध्यें स्त्रियांचाहि समावेश होतो. मी माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें व माझ्या कुवतीप्रमाणें कांहींना कांहीं काम करीत होतें. वनिता संघ म्हणून आमची एक स्त्रियांची संघटना येवल्यांत मी जाण्याच्या आधींपासून नुकतीच निर्माण झालेली होती. ती संघटना कालाच्या ओघांत आम्हीं भगिनींनीं केव्हांहि बंद होऊं दिली नाहीं. या संस्थेच्या कार्याचें क्षेत्र कारणपरत्वें गांवाच्या जरुरीप्रमाणें पालटत गेलें असेल, परंतु सतत काम करणें हा उद्देश डोळ्याआड आम्ही होऊं दिला नाहीं. एकटी स्त्री मी काय करूं शकणार ? पण तेथील माझ्या अनेक भगिनींनीं वेळोवेळीं साहाय्य करून ( भरीव कार्य ) करून दाखविलें. साक्षरतेचे वर्ग, हरिजनवस्तीमध्यें स्वच्छतेचा प्रचार व प्रत्येक सामाजिक गोष्टीचा ऊहापोह आम्ही त्यांच्यामध्यें बसून केलेला आहे.

येवल्याच्या राष्ट्रीय शाळेला साहाय्यक व ह्यांना मदतनीस असें आमच्या स्त्रियांचें काम सदैव असें. मुलामुलींच्या शाळेंतून व्याख्यानें, राष्ट्रपुरुषाचे जन्मोत्सव व गणपत्युत्सवासारखा मोठा उत्सवहि आम्ही स्त्रिया पांच दिवस साजरा करीत असूं. राष्ट्रीय शाळेचे वक्ते हेहि पुष्कळ वेळेला आमच्या उत्सवांत भाग घेत असत. आम्हीहि स्त्रिया स्वतंत्र रीतीनें कांहीं स्त्रिया व पुरुष वक्तेहि व्याख्यानाकरितां बोलवीत असूं. मी स्वतः मला कीर्तनाची आवड असल्यामुळें पुष्कळ वेळां कीर्तनें करून गांवांतील सामाजिक व राजकीय कार्य जिवंत ठेवण्याचें काम कीर्तनाकरवीं साधीत असे. कॉंग्रेसचीं सर्व तऱ्हेचीं कामें आम्ही आवडीनें व हौशीनें पार पाडीत असूं. मी केव्हांहि आमच्या महिला मंडळाची सत्तावीस वर्षांत अध्यक्ष झालें नाहीं. अध्यक्षाची जागा योग्य व पोक्त भगिनीला देत असें. येवलें म्युनिसिपालिटींत नॉमिनेट पहिली स्त्री-मेंबर म्हणून माझी नेमणूक झाली. कॉंग्रेस बॉडी म्युनिसिपालिटींत काम करीत असल्यामुळें आम्हीं हरिजनांना पाणवठे मोकळे केले. या कृत्याच्या पापपुण्याबद्दल भलेबुरे परिणाम मला व माझ्या बंधुवर्गांना ( मेंबर्स ) सोसावे लागले असतील, पण या सर्व वेळीं ह्यांची व राष्ट्रीय शाळेची तपश्चर्या आमच्या पाठीशीं असल्यामुळें आमची मनोवृत्ति आपोआपच खंबीर झाली होती. जातीयतेचा मागमूसहि आम्ही स्त्रियांनीं सार्वजनिक कामांत कधींहि आणला नाहीं. आज जी गोष्ट सहजसुलभ वाटत आहे

ती गोष्ट १९३२ ते १९४० सालापर्यंत अंमलांत आणणें हें मोठ्या चिकाटीचें व धैर्याचें काम ठरत असे.

माझ्या घरीं आम्ही दोघांनीं तीन मुलींचे पुनर्विवाह मोठ्या हौसेनें व आपुलकीनें करून दिले. त्या वेळेला त्या लग्नसमारंभाला व पानसुपारीला सर्व जमातींना ( चांभार, महार, भंगी इत्यादि ) आम्हीं निमंत्रणें दिलीं होतीं व त्या जमातींच्या स्त्रियाहि मोकळया मनोवृत्तीनें माझ्या घरीं आल्या होत्या. येवल्यांतील सर्व स्त्रियांची माझ्याशीं दिलजमाई होण्यास एक मोठें साधन माझ्या हातीं होतें, तें म्हणजे मी गांवांत घरोघरीं जाऊन स्त्रियांचीं बाळंतपणें करीत असें. या कामामुळें माझी पुष्कळ स्त्रियांशीं दाट ओळख होई, त्याचाहि उपयोग राष्ट्रकार्याला थोडाफार झाल्यावांचून राहिला नाहीं.

आमच्या काँग्रेसमधलीच एक निवडणूक होती. महाराष्ट्र काँग्रेस कमिटीवर एक सभासद पाठवावयाचा असतो. ह्यांनीं उभ्या केलेल्या माणसाला मत देण्याकरितां येवल्यांतील बाळंतिणीसुद्धां टांग्यांतून येऊन मत देऊन जात, तेव्हां गांवांतील पुष्कळ मंडळींनीं तोडांत बोटें घातलीं. ती घटना माझ्या डोळ्यापुढें अजूनहि दिसत आहे.

म्युनिसिपॅलिटीची स्त्रियांची जागा अद्यापहि आमच्या वनिता संघाकडेच आहे असें ऐकतें. मात्र आतां एकाच्या जागीं ३ स्त्रिया म्युनिसिपालिटींत काम करीत आहेत. माझ्यानंतरच्या स्त्री-मेंबर सौ. कमलाबाई वाडेकर. अद्यापहि येवल्यांतील लोक माझ्या व त्यांच्या कामाचा आढावा घेऊन समाधान व्यक्त करितांना ऐकूं येतें. सर्व मेंबरांत काम करूनहि एक प्रकारें आपलें स्त्री-जातीचें वैशिष्ट्य कायम ठेवणें ही गोष्ट जरा युक्तिप्रयुक्तीचीच आहे यांत शंका नाहीं.

माझ्यावर एक दोन मोठ्या जबाबदारीचें काम म्युनीसिपालिटींत आलेलें होतें. तें म्हणजे स्कूल बोर्ड चेअरमनचें. तें काम निभावून नेतांना कित्येक वेळां मोठी पंचाईत पडायची. बी.ए., एम्.ए., बी.टी. शिक्षक आमच्या म्यु. हायस्कूल-मध्यें होते. अशांना मी मार्गदर्शन तें काय करणार ! पण त्या वेळेला इतकें सलोख्यानें माझें व हायस्कूलच्या शिक्षकांचें काम चाले तें पाहून ह्यांना सुद्धां

मोठें नवल वाटायचें. 'बरींच कामं तुला करतां येतात कीं' असं ह्यांनीं म्हटलं कीं माझं मन अधिकच उल्हसित होत असे. त्याच वेळीं नाशिक जिल्हा लोकल बोर्डांतहि सभासद म्हणून तीन वर्षें मला काम करावें लागलें होतें.

आजच्या काळांत पुष्कळ स्त्रिया कितीतरी जबाबदारीचीं कामें करीत आहेत. तीं पाहिलीं म्हणजे आमचें येवल्यांतील स्त्रियांचें काम कांहीं मोठें होतें असें नाहीं, पण छोटेंहि नव्हतें हें खास. काळाशीं झुंज देतच स्त्रीला आपली प्रगति करून घ्यावी लागली व लागतहि आहे. मग येवल्यांतील स्त्रिया तरी त्याला अपवाद कशा असतील ? पण आमच्या येवल्यांतील स्त्रियांच्या चळवळीला बॅकबोन म्हणून बंधुवर्गाचें साहाय्य निश्चित असे. आम्हास कोणत्याहि कामास अडचण आल्यास राष्ट्रीय शाळेंतील शिक्षक मंडळी व गांवांतील कांहीं गृहस्थ योग्य असाच सल्ला देत असत. त्यामुळें कोणतेंहि काम करतांना आम्हांला निरुत्साह असा कधींच वाटला नाहीं.

एक गमतीची गोष्ट आठवली म्हणून लिहून टाकतें. माझा बाळंतपणाचा उद्योग चांगल्या तऱ्हेनें येवल्यांत चालला होता. पुष्कळ घराण्यांचा माझा दाट परिचयहि झालेला होता. येवलें गांवांत मी एकटीच नर्स होतें असें नव्हे. ३।४ नर्सेसना पुरेल येवढें येवल्यांत काम सतत असतें. लोकप्रीतीच्या जोरावर न कळत का होईना थोडीशी अहंमन्यता माझ्यामध्यें निर्माण झाली असावी. त्याला एकदा चांगलाच धक्का मिळाला. मी ज्या घरीं केसला गेलें होतें, तिथें माझा जरी दाट परिचय नव्हता तरी बऱ्यापैकीं ओळख होती. त्या घरीं एका केसकरतां ( बाईच्या बाळंतपणाकरितां ) आज संध्याकाळीं ६ पासून मी जी गेलें ती दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत त्यांचे घरीं बाळंतीण होणाऱ्या बाईबरोबर पुरेपूर जाग्रण केलें. बाईची प्रसूति सकाळपर्यंत झाली नव्हती. सकाळीं एक घरीं हेलपाटा घालावा या विचारानें मी माझ्या घरीं आलें. येतांना प्रसूत होणाऱ्या बाईच्या नातलगांना मीं सांगून ठेवलें होतें कीं, कळा जास्त येऊं लागल्या म्हणजे मला बोलावणें करा.

मी माझें घरांतलें काम भराभरा आटोपून केसकडील बोलावणें येण्याची वाट पाहात होतें. ती केस डॉक्टरांना बोलावून फॉरसेप करून घ्यावी लागेल,

असें मला वाटूं लागलें होतें. मीं त्या घरच्या बोलावण्याची सारखी वाटच पाहात होतें तों माझ्याकडे औषधास येणारी एक बाई मला म्हणाली, “ तुम्ही आतां घरांत भेटाल असं मला वाटलंसुद्धां नव्हतं, कारण अमक्या-तमक्या शेटजींच्या घरीं मुलीचे बाळंतपणाचा केवढा पसारा पडला आहे ! दोघं तिघं डॉक्टरहि तिथें गेले आहेत काकू ? तिथं तुम्ही असणारच.”

मीं लगबग उत्तर दिलें. “ सकाळपर्यंत मी तिथेंच होतें. या २-४ तासांतील हकीगत मला माहीत नाहीं.” तेव्हां तिनें सांगितलें, “ अहो, ती मुलगी बाळंत झाली. मुलगा झाला ऐकतें, पण चिमट्यानेंच पोर काढावें लागलें. इतकेंच नाहींतर आमच्या शेजारच्या नर्सबाई मीं शेटजींच्या घरीं पाहिल्या.” आलेल्या बाईला मीं औषध दिलें, पण त्या वेळीं मी अतिशय बेचैन झालें. मीं हातांत घेतलेली केस माझ्याच हातून पुरी व्हावयास हवी होती. बारान् बारा घंटे जागून जिवाचें रान करूनहि कांहीं माणसें कशीं कृतघ्न असतात वगैरे वगैरे विचार माझ्या डोक्यांत थैमान घालूं लागले.

## १७

माझ्या अहंकाराला— माझ्या कलेच्या निष्णातपणाला धक्का लागला, यामुळें माझी त्या लहान वयांत मोठी धांदल उडाली. आतां त्या गोष्टी आज आठवल्या म्हणजे हसूंच येतें. व्यवहारांत, संसारांत कितीतरी ठेचा लागतात. मला अगदीं राहवेना. मी उठलें व आमच्या डॉ. भटांच्याकडे गेलें. डॉ. भट नुकतेच त्या केसकडून घरीं आले होते. त्या वेळीं जे जे विचार माझ्या डोक्यांत आले, ‘त्या मंडळींनीं असं कसं करावं ? माझी केस असतांना दुसऱ्या नर्सला कसें

बोलवावें ? मला कळवूंसुद्धां नये हा त्यांचा द्वाडपणा नव्हे का ?' वगैरे. अशी बडबड करून मी भाऊंनाच ( डॉ. भट ) प्रश्न विचारूं लागलें, तेव्हा डॉ. भट यांनी मला शांतपणें उत्तर दिलें. त्या उत्तरांतून मला पुष्कळ शिकतां आलें. भाऊंनीं सांगितलें, " राधाबाई, हें घडलं हें चांगलं नाहीं हें मी कबूल करतों, पण तुम्ही तुमच्या जिवाला उगीच त्रास कां करून घेतां ? डॉक्टरांनीं, नर्सनीं पेशंटचा कधीं राग करायचा नाहीं. पेशंटचीं माणसं गरजू असतात. तीं गोंधळून वाटेल तें करतात. आपण त्याचा विचार फारसा करूं नये. तुम्ही त्या केसकरितां केलेले कष्ट मी समजूं शकतों. त्याबद्दलची तुम्ही सांगाल ती फी त्या घरून तुम्हाला काढून देतों. आपल्याला बोलावणं आलं, आपण अवश्य गेलं पाहिजे. आपल्याला कोणीं बोलावलं नाहीं तर मनाला लावून घेण्यासारखं त्यांत कांहीं नसतं. गरजू व्यक्ति अज्ञ बनते, पण आपण सुज्ञपणानेंच वागावयास हवें. लहान मुलांनीं जरी कांहीं प्रमाद केला तरी मोठ्या माणसांनीं ध्यानांत धरून त्याचा परिणाम करावयाचा नसतो. " असें म्हणून भाऊ मनापासून हसले व माझ्यावर काय परिणाम झाला म्हणून निरखून पाहूं लागले. मला लाजल्यासारखें होऊन त्या विषयाला कलाटणी देऊन त्यांच्या पत्नीशीं कांहीं तरी बोलूं लागलें व तेथून काढता पाय घेतला.

मी घरीं आल्यावर भाऊंच्या बोलण्याचा विचार गंभीरपणें करूं लागलें. तों हे पण बाहेर गेलेले त्याच वेळीं घरीं आले. मला खटकलेली गोष्ट दुप्पट जोरानें ह्यांच्यापाशीं मीं निवेदन केली. भाऊंचें व माझें झालेलें संभाषणहि ह्यांना सांगितलें. ह्यांनीं तर भाऊंच्यावर कडी केली. हे म्हणाले, " दुपारीं तूं जेव्हां बाहेर पडशीलना तेव्हां XXX शेटजींच्याकडे जाऊन बाळबाळंतिणीचा समाचार घेऊन गप्पा मारून ये. अग, चूक झाली असली तरी माणसाची चूक आहे. त्याचा फार विचार न करतां तूं आपली माणुसकी त्यांना दाखव. असं कसं झालं ह्याचींहि कारणं तुला आपोआप कळतील. अशाच वेळेला आपल्या मनाला योग्य तें वळण लावण्याची जबाबदारी आपली असते."

मी माझ्या मनाचा हिय्या करून त्या बाळंतिणीच्या घरीं एकदम बिलकूल संकोच न करतां घरांत गेलें. " बाळ बरा आहेना ? केव्हांशी सुटका झाली मग ? " अशा वाक्यांनींच मीं संभाषणाला सुरुवात केली. घरांतल्या स्त्रिया

तर माझ्याभोंवतीं गोळा झाल्याच, पण शेटजीसुद्धां दुकानांतून आंत आले व म्हणाले, " राधाबाई, तुमच्या कालच्या कष्टाला मोलच नव्हतं. सकाळीं तुम्ही घरीं गेला अन् मग मुलगी घाबरी झाली. आमच्या तोंडचं पाणीच पळालं. दोन् डॉक्टरांना बोलावून घेतलं आणि बाळंतिणीची सुटका करावी लागली." बाळंतिणीच्या आईनें मला घाईघाईनें सांगितलें, " अहो काकू, तुम्हाला निरोप करायला पण कोणी मिळेना. आपल्या कृष्णाबाई नर्स बॅग घेऊन दारावरून चालल्या होत्या. त्यांनाच हाका मारून घेतलं. या डॉक्टर लोकांच्या हाताशीं तुमच्यासारखींच माणसं हवींत. आमचा काय उपयोग त्या वेळीं ? "

ही गोष्ट सत्य असो अगर बनविलेली असो. आतां ती खोटी अशी मला वाटतच नव्हती. भाऊंचं व ह्यांचं म्हणणं अनुभवांतूनच मला पटलं होतं. त्यामुळं शांत मनानें मी घरीं परत आलें.

येवल्यांतील बरींचशीं सार्वजनिक कामें आमचा वनिता संघ करीत असे. गांव जरी शहर नसलं तरी शहरच्या लोकांच्या भावना जशा महात्मा गांधींच्या चळवळींनीं उद्दीप्त होत असत त्याचप्रमाणें आमच्या खेडयांतहि परिस्थिति दिसून येई. आम्ही त्या सुमाराला थोडंसं भांडवल गोळा करून स्वदेशी मालाचं दुकान चालविलं होतं. आमचं भांडवल अंदाजें चारशें एक रुपयेच असेल. आमचं हें स्वदेशी दुकान दुपारीं २ ते ५ च उघडें असें. हें दुकान आम्हीं २-३ वर्षें मोठ्या नेटानें चालविलें होतें. त्यांत भांडवल देणाऱ्या भगिनींना अशी अट होती कीं, इथें मिळणारा देशी मालच महाग अगर स्वस्त याचा विचार न करतां, आपल्यास गरज पडेल तेव्हां घेतला पाहिजे. कांहीं वेळेला थोडया भांडवलामध्यें आणलेला माल इतर दुकानच्या मालापेक्षां पुष्कळ वेळां महाग असे, पण आम्ही भगिनींनीं आणि गांवांतील स्त्रियांनींहि महाग स्वस्त हा विचार मनांत आणलाच नाहीं. एक दिवससुद्धां मालाच्या किंमतीबद्दल अविश्वास अगर कुरकूर कोणत्याहि भगिनीनें कधीं केली नाहीं.

पुण्यांत आल्यावर या १०-१२ वर्षांतहि स्त्रियांच्या उद्योग-मंदिराचे कारभार पाहिले आहेत, चालविले आहेत, पण शहराची रीत अगदीं वेगळीच

दिसून येते. जेथें स्वस्त माल असेल तो माल घ्यायला श्रीमंत स्त्रियाहि धडपडतात याचं मोठं नवल वाटतं. आपल्या स्त्रियांनीं चालविलेला कारखाना, आपल्या स्त्रियांनीं चालविलेलं उद्योगमंदिर हा आपुलकीचा विचार भगिनींच्या डोक्यांत कसा येत नाहीं याचें नवल वाटतें. स्वस्त मालाचे या कायम गिऱ्हाइक राहतात.

हे आमचें स्वदेशी दुकान आम्ही स्त्रियाच विक्रीला बसून प्रथम चालवीत होतों. पुढें मात्र एका गरजू भगिनीला तीन तासांपुरती दुकानाची नोकरी दिली होती.

येवल्यानजीक ' कोटम ' गांवच्या देवीची यात्रा प्रसिद्ध व मोठी अशी आहे. त्यामध्यें आमच्या वनितासंघाचें देशी दुकानहि आम्ही नवरात्रांत नऊ दिवस नेत असूं. नानातऱ्हेचीं सुंदर चित्रें, कलापूर्ण विणकाम, लाकडी व मातीचीं खेळणीं व देशी बांगड्या या सर्व गोष्टी दुकानाची सजावट करून आम्ही ' कोटम ' गांवांत मांडीत असूं. यात्रेंतील दुकानाची विक्री करण्याकरितां ७/८ बायकांचा संच आळीपाळीनें सकाळीं ११ ते रात्रीं १० पर्यंत कामाला जात असे. महात्माजींनीं कटाक्षानें परदेशी मालावर बहिष्कार घालावा असा दिलेला संदेश पुन्हा एकदा लाटेसरसा खेड्यांतील स्त्रियांच्या कानावरहि आला होता. नऊ दिवस स्त्रियांना बागड्या भरण्याचें काम बहुतेक श्रीमती बबूताई पारोदकर या सतत करीत असत. त्या वृद्ध असूनहि त्यांचा उत्साह व देशभक्ति वाखाणण्यासारखी होती. त्यांनीं आमच्या राष्ट्रीय कामाला अखेरपर्यंत म्हणजे १९४२ सालपर्यंत साह्य दिलें होतें. आतां त्या बऱ्याच वृद्ध म्हणजे पाऊणशें वर्षांच्या झाल्या आहेत. एका कोटम गांवाच्या यात्रेंत दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक स्त्रीला आम्ही कांहीं भगिनी थांबवीत असूं व देशी दोन बांगड्या भरूनच दर्शनाला पाठवीत असूं. या उपक्रमामुळें बरीचशी आर्थिक जबाबदारी वनिता संघाला त्या वेळेला उचलावी लागली. पुष्कळ स्त्रियांनीं आम्हांस बागड्यांचे पैसे दिले, पण कित्येक तशाच घाई-गर्दीनें दर्शनास निघून जात.

या यात्रेमध्यें देवीच्या दर्शनाकरितां पुरुष, स्त्रिया, मुलें यांची नऊ दिवस सारखी ये-जा होत असते. कांहीं बंधुवर्गानें जबाबदार स्त्रियांना गांठून

प्रश्नांचा भडिमारहि त्या वेळीं आमच्यावर केला. "ही बांगड्याची टूम. देशीच बांगड्या हातांत असल्या तर दर्शनास जाऊं द्यावयाचें हा काय न्याय झाला?" असा भडिमार मागें पुढें सारखा ऐकूं येऊं लागला. आम्हीं सर्व भगिनींनीं नम्रतेनें बंधुवर्गाला त्या वेळीं समजून सांगितलें, "आम्हीं स्वदेशी बांगड्या स्वतः भरून देऊन दर्शनास जा म्हणतों. आम्ही परदेशी बांगड्या सोडा हें पर्यायानें सुचवीत आहोंत यांत वाईट काय? आम्ही परदेशी बांगड्या फोडा–तोडा असा एकहि शब्द काढीत नाहीं." या चर्चेमध्यें वकिलांच्या स्त्रियाहि होत्या. त्यांची उत्तराची पद्धति पाहून गांवांतील मी मी म्हणणाऱ्या गृहस्थांनीं अखेर यात्रा संपल्यावर वनिता संघाच्या नव्या उपक्रमाबद्दल धन्योद्गार काढले.

रेशनच्या काळांत एक रेशन दुकानसुद्धां स्त्रियांनीं स्वतः चालविण्यास घेतलें होतें. तेंहि बऱ्याच यशस्वी रीतीनें स्त्रियांनीं चालविलें होतें, पण.... येवल्यांतील बंधुवर्ग ज्या वेळेला आपल्या घरच्या स्त्रियांना आपल्या स्वतःच्या इच्छेप्रमाणें वागावयास सक्ति करूं लागला त्या वेळेला मात्र या रेशन दुकानचा कारभार हवा तसा पुढें चालला नाहीं. या बंधुवर्गामुळें स्त्रियांमध्यें नसलेला दुजाभाव (पार्टी—राजकीय नव्हे) निर्माण झाला व घरचे पुरुष सांगतील तसे सभेमध्यें ठराव होऊं लागले व त्याचप्रमाणें मॅनेजर म्हणून एका पुरुषाची नेमणूक या दुकानावर झाल्यावर हें दुकान पार नाहींसें झालें—बंद करावेंच लागलें.

हें इतकें सविस्तर वर्णन करण्याचें कारण माझी अशी दृढ समजूत आहे कीं, स्त्रियांच्या सुव्यवस्थित चाललेल्या कार्यांत बंधुवर्ग जर आग्रहानें अट्टाहासानें कांहीं करूं लागले तर तें काम सुरळीत चालतच नाहीं.

लहान गांवांतून अशा तऱ्हेचे परिणाम स्त्रियांच्या महिला मंडळावरहि वारंवार होतात. त्यामुळें स्त्रियांचें कार्य पुढें सरतहि नाहीं. भांडणांत काळाचा अपव्यय होतो असें अनुभवास येतें. गांवांतून राजकीय पक्ष, पुरुषांचे गांवांतील हेवेदावे स्त्रियांच्या संस्थेला विघातक होतात. अशा घटना कित्येक ठिकाणीं घडलेल्या ऐकूं येतात.

१९३० सालीं आमच्या राष्ट्रीय शाळेंतून श्री. वैशंपायन गुरुजी, पुराणिक गुरुजी, ल. ब. कुलकर्णी, हे तीन शिक्षक व गांवांतील कांहीं विद्यार्थी महात्माजींच्या सत्याग्रहाकरतां गेले. सत्याग्रह केलेल्या सर्वच मंडळींना शिक्षा होते असें नाहीं. तो सुद्धां एक दैवयोगच आहे आणि महात्माजींच्या चळवळीची धुरा जे लोक निश्चयानें चालवतात ते सरकारच्या दृष्टीआड होऊं शकत नाहींत. श्री. वैशंपायन गुरुजी यांना सहा महिने सक्तमजुरीची शिक्षा व १०० रुपये दंड झाला होता. शिक्षा अगर दंडाचा आंकडा ऐकून ही मंडळी थोडीच हार घेणारी होती ? श्री. पुराणिक व ल. ब. कुलकर्णी हा मंडळी सरकारनें न पकडल्यामुळें तशीच येवल्यास परत आली व पुन्हा शाळेच्या कामास लागली. हे दोघे कामावर आल्यामुळें ह्यांना गांवांतील चळवळ, काँग्रेस कमिटीचें काम जोरांत करतां आलें. १९३० सालीं एका काँग्रेसच्या सभेचे हे अध्यक्ष होते. त्या सभेंत वक्ते सरकारविरुद्ध बोलले असावे. येवढ्याच कारणावरून ह्यांना पकडण्यांत आलें. परंतु गांवाची चळवळ १९३० सालीं सर्वस्वीं ह्यांच्या नजरेच्या तालावर चालत होती, असं म्हटल्यास हरकत नाहीं. त्या वेळच्या येवल्याच्या सभा शिस्तबद्ध, अहिंसक पद्धतीनें, कोणतीहि हुल्लडबाजी न होतां पार पडत असत. त्यामुळें सरकारला पकडण्यासारखें निमित्त तर सांपडत नव्हतें, पण येवल्याची चळवळ पाहतां पाहतां फोफावत होती. येवल्याच्या एका सुप्रसिद्ध वकिलानें त्या वेळीं पुण्यास आल्यावर माझ्या वडिलांच्याजवळ असे उद्गार काढले होते कीं ‘ आपटे बोले आणि येवलें हाले ’ असा पराक्रम आपल्या जांवयांचा आहे. त्याच वेळीं १९३० सालीं ह्यांना सहा महिने सक्तमजुरी व ५० रु. दंड अशी शिक्षा झाली.

मी माझ्या बहिणीच्या लग्नाकरितां पुण्यास आलेली होतें. हे लग्नाची अक्षत टाकूनच येवल्याकडे गेले होते. मीं ८-१० दिवस पुण्यास राहण्याचा विचार केला होता, पण ह्यांना पकडल्याची तार आल्याबरोबर लग्नाच्या तिसऱ्या चवथ्या दिवशींच मी शंभूस घेऊन येवल्यास हजर झालें.

१९३०-१९३१ साल असेंच राष्ट्रीय शाळेच्या दृष्टीनें अस्वस्थ व चळवळीच्या दृष्टीनें भरभराटीचें असें ठरलें. १९३२ सालीं तर बहुतेक राष्ट्रीय शाळेची शिक्षक मंडळी महात्मा गांधींच्या चळवळींत सामील करावयाची

अशी कार्यकारिणीची एक सभा घेऊनच शिक्षकांनीं व चालकांनीं ठरवून टाकलें. राष्ट्रीय शाळा चालेल तशी चालेल व जे शिक्षक जाग्यावर असतील ते शिक्षक शाळा चालवतील असा स्पष्ट अर्थ सभेंत केला गेला.

पंढरपुरच्या वारीला जाण्याकरितां विठ्ठलभक्तांची जशी धांदल उडते त्याचप्रमाणें येवल्यांतील राष्ट्रभक्तांची धांदल झाली होती. जो तो शिक्षक मी चळवळींत आधीं पडणार असें मोठ्या कळकळीनें एकमेकास सांगत होता. त्याचप्रमाणें राष्ट्रीय शाळेचीं वरच्या वर्गांतील मुलें, व माजी विद्यार्थी यांनींहि १९३२ सालच्या लढ्यांत चांगलाच भाग घेतला. गांवाची तयारी या लढ्याकरितां अधिक अधिक होत आहे व आपटे आणि वैशंपायन सतत चळवळीची आग पेटवीत आहेत हें नाशिक जिल्ह्यांतील सरकारी अधिकाऱ्यांच्या लक्षांत येतांच एक दिवस रात्रीं १२ वाजतां मोटर घेऊन पोलीस सुपरिंटेंडेंटसाहेब आमच्या दाराशीं येऊन उभे राहिले. ती रात्र खास काळोखीच होती व पोलीस अधिकारी काळ्या पोषाखांतच आमच्या दृष्टीस पडले. ह्यांनीं व वैशंपायनानीं आपली जुजबी तयारी करून घेऊन घरचा निरोप घेऊन—निरोप घेऊन कसला निरोप देऊन पोलिसच्या मोटारींत हसतमुखानें जाऊन बसले. ह्यांनीं घर सोडतांना शंभूची योग्य व्यवस्था करूनच, तूं चळवळींत पड असें मला बजावलें. चि. शंभू हा लहानच होता, व एकदम असे ह्यांना कुठं नेत आहेत असा प्रश्न शंभूनें मला विचारला. आम्ही सर्वच मंडळी पोलिसच्या मोटरीजवळ ह्यांना पोंचविण्यास गेलों असल्यामुळें "मी शंभूस सांगितलें तूं या अधिकारी मंडळींनाच विचार." तेव्हां त्या पोलीस अधिकाऱ्यांनें सांगितलें, "बाळ, आम्ही ह्यांना नाशिकला घेऊन जात आहोंत." असं सांगतां सांगतांच मोटर आमच्या दृष्टीआड झाली.

आम्ही ७/८ घरची इतर दुसरी मंडळी मोटरीपाशीं होतों. जमलेली शिक्षक मंडळी घरांत आली व सर्वांनीं ही बातमी आतांच्या आतां दंवडी देऊन गांवांत कळलीच पाहिजे म्हणून रातोरात ही बातमी सर्व गांवभर पसरवून दिली.

एका अर्ध्या तासाच्या आंत—३० मिनिटांमध्यें-केवढी क्रांति आमच्या घरांत व गांवांत झाली ? दुसऱ्या दिवशीं गांवांतील लोक अधिकच चेवल्यासारखे होऊन वाटेल तिथें लहान लहान सभा भरवूं लागले.

ह्यांच्यानंतरचा येवल्यांतील कॉंग्रेसचा डिक्टेटर मी म्हणजे राधाबाई आपटे असल्यामुळें तीं कॉंग्रेस कमिटीचीं सूत्रें माझ्या शक्तीप्रमाणें व आंखणीप्रमाणें मी हालवूं लागलें व गांवांतील खवळलेल्या परिस्थितीला काबूंत आणूं लागलें. अशा परिस्थितींतच दि. ६-१-१९३२ रोजीं येवल्याची राष्ट्रीय शाळा व येवल्याची कॉंग्रेस कमिटी बेकायदेशीर म्हणून सरकारनें जाहीर केली. त्यामुळें दोन्हीहि संस्थांचें काम कायदेशीर असें कोणतेंच चालणें शक्य नव्हतें. याच सुमारास बऱ्याचशा राष्ट्रीय शाळा सरकारनें बंद केल्या होत्या व गांवोगांवचे पुढारी एका रात्रींतून चहुकडे पकडून आपलें उग्र स्वरूप सरकारनें दाखविण्यास सुरुवात केली होती.

ब्रिटिश सरकारच्या कायद्याच्या वरवंट्याला आपलं कणखर स्वरूप दाखवून—कांहीं स्त्रियांनीं आपली तपश्चर्या दाखवून—दिङ्मूढ केल्याचीं उदाहरणें इतिहासांत सांपडतील. परंतु गांधींच्या युगामध्यें अहिंसक प्रतिकार हें शस्त्र पेलायला अत्यंत कठीण पण परिणामीं यशदायी असें मिळाल्यापासून पुष्कळशीं वरून दिसणारीं सामान्य माणसं या युद्धांत सामील होत होतीं.

अन्यायाची चीड आणि त्याचा प्रतिकार करण्याची तयारी पुष्कळ स्त्रियांच्यामध्यें १९३२ सालीं दिसून आली. ब्रिटिश सरकारला विरोध करण्याचा हा सामुदायिक प्रयत्न होता. याच राजकीय विचारामध्यें माझ्यासारखी स्त्रीसुद्धां बेभान झाली. आतां अधिक काय करावें ? हें कांहींच समजेना. व्याख्यानें, भाषणें, पत्रकें सगळे प्रकार येवल्यांत सरकारविरोधी झाले. ह्यांना व वैशंपायन गुरुजींना धरून नेल्यानंतर येवल्याची चळवळ त्याहि निमित्त फोफावत होती. तरी सरकारी हालचाल आम्हांला पकण्याबद्दल दिसेना.

सोंगटीचा डाव जसा कुजतो तशी माझी व माझ्या कार्यकर्त्यांची स्थिति झाली होती. पडलेलें दान ज्याप्रमाणें कांहीं वेळेला देतां येत नाहीं त्याचप्रमाणें आमच्या मनांत आलेले नवे विचार अमलांत आणतां येत नव्हते.

ही परिस्थिति खास बरी नव्हती. आम्हांस सरकार केव्हां पकडतें या एकाच विचारें आम्हीं त्या वेळचीं कार्यकर्तीं माणसें भारलीं गेलों होतों. अंगणा-

मध्यें कुणाचेंहि पाऊल वाजलें तरी पोलीस वॉरट घेऊन आला असावा ही कल्पना चित्तांत सारखी डोकावत असे. या वेळेला माझ्या घरांत माझं घर असं राहिलेलंच नव्हतं. सर्व चळवळ करणारांचें निवासस्थान हेंच घराचें रूप बनलें होतें. माझ्याजवळ माझा लहान मुलगा शंभू व गोपाळ मोडक ( माझ्या मुलासारखाच ) या दोघांची काळजी मला मधून मधून वाटत असे. आज नाहीं उद्यां सरकार मला पकडणार ! तेव्हां या दोन मुलांनीं कुठं राहावं हा प्रश्न माझ्यापुढें होता. कारण गोपाळ मोडकचे चुलते श्री. आत्मारामपंत व त्यांचे दोघे बंधु या वेळेला तुरुंगांतच होते. शंभूस कुठं पाठवावें ? सगळ्या तऱ्हेचा विचार करून आपल्या नातलगांकडे शंभूस ठेवू नये हा विचार माझा ठाम झाला. कारण सर्वच मंडळी त्या वेळीं तरी आम्हांला दोन पावलं दूरच ठेवीत होती. आंतून जिव्हाळा असला तरी त्या जिव्हाळ्याचा फुंकर माझ्यापर्यंत पोचणें शक्यच नव्हतें. तेव्हां थत्ते वकील यांच्याकडेच शंभूस ठेवावें असें मी ठरवीत होतें. कै. काकासाहेब थत्ते हे त्या वेळीं बरेचसे आजारी होते. अशा वेळेला माझ्या मुलाच्या संगोपनाची जबाबदारी त्यांच्या पत्नीवर कशी टाकावी ? हाहि एक प्रश्न माझ्यापुढें होताच.

एक दिवस काकांची ( थत्ते ) प्रकृति पाहण्यास मी गेलें होतें. त्या वेळेला डोळ्यांत पाणी आणून काकू मला म्हणाल्या, " ताई, तुम्ही तर आमचं कोणाचं ऐकत नाहींच. आतां सांगण्याच्या पलीकडेच तुमचं काम गेलेलं आहे. आतां येवढं तरी माझं ऐका. चि. शंभूला माझ्याकडे राहूं द्या. त्याची ओढाताण करूं नका. तुम्हाला व आबांना दोघांनाहि तुमच्या मंडळीची सहानुभूति नाहीं, तेव्हां माझं ऐका. "

ही माझ्या मैत्रिणीनें दिलेली कल्पना माझ्या डोळ्यापुढें चमकून गेली. माझे ओठ थरथरत होते. माझ्या तोंडांतून शब्द बाहेर फुटेना. माझ्या डोळ्यांतहि पाणी उभें राहिलें. माझ्या पाठीवरून काकूंनीं हात फिरवून सांगितलें, " शंभू तुमचा नसून माझा आहे." हा एकच गोड विचार घेऊन मी माझ्या घरीं शांत चित्तानें दुपारची वर्तमानपत्र वाचीत पडलें होतें तोंच ज्या गोष्टीची आज दहा बारा दिवस मी व माझे सहकारी वाट पाहात होतों ती वेळ म्हणजे पोलीस वारंट घेऊन माझ्या अंगणांत येऊन मला

हाकां मारूं लागले. मी हातांत कागद घेऊन सही करतें आहे तों माझ्या जवळपासची सहाध्यायी मंडळी भराभर तेथें आली. पोलिसच्या हातांतले कागद घेऊन आणखी कोणाकोणाचीं वारंटें आहेत म्हणून यादी पाहतां बहुतेक चळवळ्या लोकांचीं एकत्र नांवें मिळालीं. तीं नांवं सोळा होतीं. त्यांत एक गमंत झाली होती ती लिहिल्यावांचून मला पुढें जाववतच नाहीं. ती म्हणजे आमच्या घरीं सतत वावरणारे, राष्ट्रीय शाळेंत काम करणारे, गांवांतल्या चळवळींत बेछूटपणें पुढाकार घेणारे श्री. ल. ब. कुलकर्णी यांचें नांव मात्र त्या यादींत आम्हांस दिसलें नाहीं ! श्री. ल. ब. कुलकर्णी या सर्व मंडळींत हजरच होते. त्यांचें नांव यादींत नाहीं हें पाहतांच त्यांचें तोंड खरकन उतरलें. या गृहस्थाचा चेहरा उतरलेला पाहण्याची वेळ फार क्वचित् येते, तो हा दिवस होता. ते विचार करून पटापटा बोलूं लागले, “ मी आतां फौजदारसाहेबांना जाऊन विचारतों, मीं येवल्यांत कांहींच काम केलं नाहीं का ! मला कसं पकडत नाहींत वगैरे वगैरे.” मीं त्यांना सांगितलें कीं, “ सरकारनं पकडल्यावांचून आपल्याला तुरुंगांत कसं जातां येईल ? अशी घाई करूं नका. येवल्याची जबाबदारी कोणी तरी व्यावयास हवीच ना ! ” असें आम्ही बोलत आहोंत तोंच दुसरा पोलीस श्री. ल. ब. कुलकर्णी यांच्या नांवाचें वॉरंट घेऊन त्यांना शोधीत आमच्याच घरीं आला. बाहेर खेळावयास गेलेले शंभू व गोपाळ धावतच घरांत आले. ल. ब. कुलकर्णींचा चेहरा स्वतःचें वारंट बघून प्रफुल्लित झाला, तर आलेल्या आपत्तीची कल्पना होऊन शंभू व गोपाळचे चेहरे खारकन उतरले.

मोटर लॉरी आमच्याकरितां पोलीस स्टेशनवर आमच्या घरापासून जवळच उभी होती. आम्हां सर्वांना एका तासांत म्हणजे पांच वाजेपर्यंत लॉरींत बसायचें होतें.

घरांतली निरवानिरव कसली ? पैशाची व राहण्याची व्यवस्था काका थत्ते यांच्याकडे केली आहे, असें मुलांना सांगून मी माझी स्वतःची तयारी थोडी फार करूं लागलें. तयारी करतां करतां दोन्ही मुलांना मीं बजावलें, “ तुम्ही आम्हांला पोंचविण्यास पोलीस मोटरीपर्यंत येऊं नका. येणार असा हट्टच असला तर डोळ्यांत पाणी अगर सुकलेलीं तोंडें मला दिसता कामा

नयेत. जें तुम्हांला जमेल तें करा. सरकारी अधिकाऱ्यांना आपला कुठलाहि मनोविकार दिसतां कामा नये " असं सांगून मी घराच्या बाहेर पडून गांवांतील कांहीं मंडळींना निरोप ध्यावा व शंभू आणि गोपाळची काळजी घेण्यास सांगावें या विचारें माझ्या घराच्या बाहेर पडतें तों मला पोलिसाकडून मज्जाव करण्यांत आला. इतकेंच नव्हे तर माझ्या घराभोंवतालचे तिन्हीहि रस्ते पोलीस उभे राहून बंद केलेले होते. मी कोणाला भेटूं शकणार नाहीं व मला कोणीहि भेटूं शकणार नाहीं ही परिस्थिति म्हणजेच तुरुंग. मी स्वस्थ अंगणांत उभी राहिलें.

मी व डॉ. गोसावी या दोघांनीं मिळून येवल्यांत मॅटर्निटी होम चालविलें होतें. त्यासंबंधीं मला डॉक्टरांच्यापाशीं कांहीं बोलावयाचें होतें व त्याचप्रमाणें आजारी असलेले काकासाहेब थत्ते यांना जातां जातां भेटून यावयाचें होतें. हे दोन विचार माझ्या डोक्यांत घोळत असतांनाच डॉ. गोसावी अंगणांत आले व मला म्हणाले, " तुमचा व तुमच्या घराचा बंदोबस्त आज दांडगा आहे. मलाहि पोलीस तुमच्या रस्त्याला वळूं देत नव्हते, परंतु आपल्या हॉस्पिटलचें काम सांगतांच मला तेवढी सवलत दिली गेली. बोला, आणखी कोणाला कांहीं निरोप सांगावयाचे आहेत का ? " मीं एकच उत्तर दिलें, " आम्ही गेल्यावर येवलें सांभाळा, त्यांत शंभू व गोपाळ आलेच." असं बोलत बोलत मी अगदीं रस्त्यापर्यंत आलें तेव्हां मलाहि राजसत्तेचें विश्वस्वरूप दृष्टीस पडलें.

माझ्याविषयीं व गोसावी डॉक्टरांच्याविषयीं आमच्या औषधी व्यवसायामुळें पोलीसमध्येंहि आपुलकी वाढलेली असल्यामुळें मला फक्त थत्ते वकिलांच्या घरीं जावयाचें होतें, पण मी आतां कैदी आहें तेव्हां जातां-जातांना ही बातमी वकिलांच्या घरीं कळवा असें डॉ. गोसावी यांना सांगत असतांना एका पोलीस अधिकाऱ्यानें जवळच असलेल्या थत्ते वकिलांच्या घरीं जाण्याची मला परवानगी दिली. मी माझ्या मैत्रिणीस—काकूंस भेटलें, काकांचा समाचार घेतला व काकांना नमस्कार करून गेल्या पावलीं परत निघालें. काकासाहेब थत्ते यांना पर्निशस ॲनिमिया झाला होता. दुखण्यामुळें ते अलीकडे चिडखोर बनले होते. अशा परिस्थितींत शंभूची जबाबदारी त्यांच्यावर पडणार ही कल्पना काकूंनीं दिली असावी, म्हणूनच कीं काय

त्यांनीं मला परत हांका मारून सांगितलें, " ताई, शंभूची व्यवस्था तुम्ही तुमच्या नातलगाकडेच करा. माझी व्यवस्था करून हिला आतां कोणाचीहि व्यवस्था करतां येणार नाहीं. " हें वाक्य कानीं पडतांच माझी मनःस्थिति गोंधळली यांत शंका नाहीं. मनोवृत्तीचा गोंधळ उलगडायलाहि मला वेळ नव्हता. काकूंनीं मका कुंकू लावलें व भरलेल्या डोळ्यांनीं निरोप दिला.

मी घरीं आलें तों बरीचशी मंड़ळी पोलिसच्या पहाऱ्याच्या पलीकडे मला दिसली. त्या मंडळींतून 'काकू–काकू–काकू–' हे शब्द माझ्या कानांवर सारखे पडत होते. मी माझ्या घराच्या उंच ओट्यावर उभे राहून तिन्ही रस्त्यावर असलेल्या मंडळींना दोन्ही हात जोडून वंदन केलें व शांत राहा हें सूचित केलें. घराच्या दाराशींच शंभू व गोपाळ माझी वाट पाहात होते. त्या दोघांना मी घरांत नेलें, पोटाशीं धरून दोघांचाहि निरोप घेतला व पुन्हा एकदा बजावलें, पोलीस लॉरीपाशीं प्रसन्न मुखानेंच मला निरोप द्या. गोपाळ मोडक हाहि १५।१६ वर्षांचा होता. तो नुकताच टिळक विद्यापीठाचा मॅट्रिक झाला होता. हा मुलगा वयानें जरी लहान असला तरी त्याचें धैर्य, त्याची चपळाई हीं मला येवल्यांत वारंवार दृष्टीस पडलेलीं होतीं. हा गोपाळ मोडक म्हणजे सिंहगडच्या पायथ्याशीं खानापूर या गांवांत डॉ. मोडक या नांवानें प्रसिद्धीस आलेले व अजूनहि राष्ट्रीय बाण्यानें काम करीत असलेले सर्वांचे दृष्टीस पडतात. गोपाळचें सार्थ वर्णन 'आमच्या राष्ट्रीय शाळेचा आदर्श विद्यार्थी' या एकाच वाक्यांत हे अखेरपर्यंत करीत असत. आम्हां दोघांस तेव्हां पुत्रवत् वाटणारा गोपाळ आजहि पुत्रवत् म्हणतांना आमच्या दोघांची मान उंच करीत आहे यांत शंका नाहीं.

माझ्या बाळाची सर्वस्वीं जबाबदारी गोपाळवर सोपवून आमचें कुलदैवत जें रामदास त्यांना नमस्कार करून जवळच असलेल्या पोलीस चौकीवर असलेल्या लॉरींत बसण्याकरितां मी गेलें. आम्ही येवल्याचे १७ कैदी व आमच्या रक्षणा-करितां असलेले पोलीस आम्ही लॉरींत बसलों. लॉरी सुटणार तों गोपाळची हांक मला ऐकूं आली व मी खालीं उतरलें. त्यानें मला एका बाजूला नेऊन काय विचारलें तर "मी आतां घरांत स्वस्थ बसूं शकत नाहीं. मीहि तुमच्या पाठोपाठ येणारच." एका क्षणांत माझ्या डोळ्यांपुढें तारा चमकला. शंभूला

सांभाळण्याकरितां आमच्या नातलगांत अहमहमिका लागावी त्याच शंभूला आतां मी कोठें ठेवूं व कोणावर विसंबूं याचा निवाडा क्षणार्धांत करावयाचा होता. क्षणाचाहि विलंब न करतां ‘ शंभूस पुण्यास बाबू मामाकडे पोंचव व मग तूं कांहींहि कर ’ असं सांगून परमेश्वरावर हवाला ठेवून लॉरींत बसलें. माझ्या लॉरींतील मंडळी महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार करून स्वातंत्र्याचा जणू नगाराच वाजवून लॉरी सुरू झाली.

आम्ही सर्व मंडळी १७ कैदी होतों. मी एक स्त्री व माझे १६ बंधु अशा १७ जणांना मनमाडला पोलीस लॉरीनें पोंचविलें. सर्व बंधूंना मनमाडच्या कस्टडींत कोंडलें. मला कुठें ठेवले असेल ? मी स्त्री-कोठडी आंवतींभोंवतीं बघून शोधीत आहें तोंच माझ्या निकट परिचित बाई ( आम्ही त्यांना बाईच म्हणत होतों ) फौजदारांची पत्नी माझ्यापुढें उभी राहिली व म्हणाली, “ ताई, तुम्हांला आमच्या घरींच चलायचं आहे.” मला कांहींच उलगडा होईना, पण मी त्यांच्या मागोमाग फौजदारसाहेबांच्या बंगल्यांत गेलें.

## १८

हे प्रधान फौजदार येवल्यांत या चळवळीच्या आधीं होते. आमच्या घराजवळच ते राहात असल्यामुळें माझ्या हातून बाईंचीं बाळंतपणं झाल्यामुळें त्यांच्या घरींहि माझ्यासारखीला स्थान होतें.

औपचारिक प्रश्न इकडचे तिकडचे झाल्यावर दादासाहेब फौजदारांनीं व बाईंनीं मला सांगितलें, “ ताई, तुमचा खटला उद्यांच कोर्टांत चालेल व

तुमचा निकालहि उद्यांच होईल असं मला वाटतं. तेव्हां तुम्ही निःसंकोच-पणें आमच्या इथं आजच्या दिवस राहा." मीं बाईंच्याकडे पाहून विचारलें, "तुमची मी मैत्रीण असेन, पण सरकारची कैदीच आहे ना?" तेव्हां दादा-साहेब हसून म्हणाले, "म्हणूनच तुमच्या खोलीच्या बाहेर माझा पहारा आहे.

हे केव्हांहि तुरुंगांत गेले तरी ते परत येईपर्यंत एकदाच दुपारीं मी जेवीत असें. त्या नियमाला धरूनच बाईंनीं करून दिलेली कॉफी मी प्यायलें. ती ता. १३ जानेवारी होती. त्या दिवशीं भोगी होती. बाईंनीं मला भोगीचें हळदीकुंकू देऊन त्यांतल्या त्यांत आनंद प्रगट केला.

दुसरे दिवशीं सकाळीं आम्ही सर्व कैदी बरोबर १० वाजतां कोर्टांत गेलों. ठरल्याप्रमाणें मॅजिस्ट्रेटचीं व आमचीं प्रश्नोत्तरें होऊन ठरलेल्या आरा-खड्यांत आम्हां सर्वांना ३ महिने शिक्षा झाली. माझी फक्त साधी कैद होती. बाकीच्यांची सक्तमजुरी. मला बी क्लॉस मॅजिस्ट्रेटनें दिला होता. आम्ही सर्व कैदी जेवूनच कोर्टांत हजर झालों होतों. सरकारी भत्ता माझ्या बंधुवर्गांनीं खावा व मी बाईंच्या घरीं जेवावें हें मला रुचेना. "तुमच्या घरीं मी धुळयास जाईपर्यंत बसेन, पण त्यांचें माझें खाणें एकच असावें" अशी मी विनंती केल्यावरून अगर कांहीं कारणावरून असो खीरपुरीचें जेवण सर्व कैदी (संक्रांतीमुळें) दादासाहेबांच्या घरचेंच जेवलों होतों. कैद्यांचें जेवण कस्टडींतच पाठविलें गेलें. मी मात्र घरीं जेवलें. शिक्षा ऐकून मी घरीं येतांच (अर्थात् बाईंच्या) माझा नेट ढासळला. शिक्षा होईपर्यंतचें पर्व पुरें झालें होतें. आतां दुसरें जग माझ्यापुढें नाचूं लागलें होतें. तें म्हणजे माझा शंभू आतां कुठं असेल? माझ्यापासून तो कधीं दूर राहिलेला नव्हता. गोपाळ पुढें काय करील? माझे वडील किती रागावतील. माझे दीर, जावा, नणंदा मला काय म्हणतील—माझ्या मैत्रिणी माझ्याकडे कोणत्या दृष्टींतून पाहतील वगैरे विचार डोक्यांत थैमान घालीत होते.

पुरुषांनीं तुरुंगांत जाणें आणि स्त्रीनें तुरुंगांत जाणें यांत फार मोठा फरक आहे. साधलें तर साधलें नाहींतर होरपळून मेलें असें स्त्रीजीवन आहे. सहनशीलता स्त्रीच्या पांचवीला पुजली आहे. त्याच्या कसोटीला ती उतरल्यास ती देवता बनते, नाहींतर जनतेची ठोकर खाण्यांतच तिचें नशीब दिसून येतें. माझा

चेहरा उतरलेला पाहून बाईंनीं मला दुपारीं कॉफी देतांना विचारलें, " ताई, आज तुम्ही काळजींत दिसतां. आम्हांस कांहीं करण्यासारखें असल्यास सांगा कीं!" हे सहानुभूतीचे शब्द ऐकतांच आतांपर्यंत दाबून ठेवलेलें पाणी माझ्या डोळ्यांतून स्रवूं लागलें व " शंभू " येवढेंच मी तोंडानें बोललें. तोंच दादासाहेब कचेरींतून घरीं आले व शंभूचें काय म्हणतां असें त्यांनीं आपुलकीनें विचारलें. मीं कांहीं म्हटलेंहि नाहीं आणि मी कांहीं बोललेंहि नाहीं. नेत्रांतील पाण्याचा अर्थ समजून दादासाहेब मोकळ्या मनानें म्हणाले, " पाहिजे तर शंभूला आमच्या घरीं आणून ठेवा. खेळतां खेळतां त्याचे ३ महिने केव्हांच जातील. आतां शाळा-बिळा तर नाहींच." त्यांच्या पत्नीनें या विचारास दुजोरा देऊन अधिक आपुलकी मला दाखविली. तेव्हां तर माझ्या डोळ्यांतून अधिकच अश्रु स्रवूं लागले. ते दुःखाश्रु नसून निराळेच अश्रु होते हे खास. खडकांतहि पाण्याचा गोड झरा वाटसरूंची तहान भागविण्यास कारण व्हावा त्याप्रमाणेंच हीं दोघें नवराबायको मला त्या वेळीं बहुमोलाचीं वाटलीं. पोलीस हासुद्धां माणूस असतो. सहृदय असतो. त्याच्या हृदयांतहि आपल्यासारखा देव वास करतो हें मला त्या दिवशीं पटलें.

आम्हांला शिक्षा झाली ती ता. १४ जानेवारी होती. संक्रातीचीं हळदी-कुंकवाचीं बोलावणीं बाईंना ( फौजदारसाहेबांच्या पत्नींना ) पुष्कळच होतीं. मला घरांत ठेवून त्यांना बाहेर पडणें प्रशस्त वाटेना. घरांत बसावें तर वर्षाचा दिवस सुवासिनीला घरांत बसूं देईना. बाईंची झालेली कुचंबणा माझ्या लक्षांत येतांच मीं त्यांना असं सांगितलं, " बाई, तुम्ही खुशाल हळदी-कुंकवाला जा. मी तुमचं घर सांभाळतें." हे शब्द दादासाहेबांच्या कानीं पडतांच बायकोला ते हसत हसत म्हणाले, " ताईंनाहि हळदीकुंकवाला घेऊन जा कीं ! धुळ्याची गाडी रात्रीं १२ ला आहे."

" मी आतां शिक्षा लागलेली कैदी आहे नाहीं का ? मी बाईंच्या बरोबर गांवांत दिसलें, तर तुमच्या गळ्याशीं एखाद वेळेला येईल." असं मी म्हणतांच " माझा कैदी पळून गेला तर ना ? माझ्या कैदी सौ. आपटे हा खरा सत्याग्रही आहे. तेव्हां मला भिण्याचें कारणच नाहीं. ताई, तुम्ही हळदी-कुंकवाला गेलांत तरी निश्चितच माझ्या घरीं परत याल !"

सौ. बाई हळदीकुंकवाला गेल्या, दादासाहेब बाहेर फिरावयास गेले. मी माझ्या खोलींत खिडकीमध्यें बसून निर्विकार मनानें आकाशाकडे बघत राहिलें. मी कशाचें स्मरण करीत होतें व काय विसरूं पाहात होतें हें माझें मलाच कळेना. रात्रीं दहा वाजतां मी कॉफी पिऊन कॉटवर पडून राहिलें. दादासाहेबांनीं व बाईनीं आम्ही बरोबर गाडीच्या वेळेवर तुम्हांस उठवूं तोंपर्यंत स्वस्थ झोप घ्या, असें सांगितलें. मीहि औपचारिक होय म्हटलें व निजण्याचा प्रयत्न केला.

खोलींतील दिवा मालवून शांत चित्त होऊन कॉटवर मी स्वस्थ पडून राहिलें. रात्रीं बाराच्या सुमारास माझ्या खोलीच्या दाराशीं अत्यंत मृदु शब्द मला ऐकूं आले ते म्हणजे, " ताई, उठतांना, आतां आपल्याला स्टेशनवर गेलें पाहिजे."

मी ताडदिशी उठलें. माझें जुजबी सामान घेऊन खोलीच्या बाहेर पडून बाईंचा निरोप घेण्यासाठीं त्यांच्या निजण्याच्या खोलीकडे जाऊं लागलें, तोंच दुधाचा कोको करून बाई हातामध्यें कप घेऊन माझ्या पाठीमागेंच उभ्या. कोकोचा कप माझ्या हातांत बाईनीं दिला. थोडासा बशींत ओतून ती बशी मीं बाईंच्यापुढें केली व मीं कप तोंडास लावला. बाईनीं कुंकूं लावलें. मीं त्यांच्या देवांस नमस्कार केला व दादासाहेब पुढें व मी पाठीमागें चालूं लागलें.

थंडीचे दिवस असल्यामुळें दादासाहेबांनीं गरम कपडे चढविलेले असावेत. त्या कपड्यांचा रंगहि काळाच होता. मी बंगल्याची पायरी उतरतांना दादासाहेबांनीं एकदा मागें पाहिलें. कंदिलाच्या मंद प्रकाशांत दादासाहेब मला भयंकर क्रूर असे त्या घटकेला तरी वाटले. माझ्या कैदी बांधवांपर्यंत जाऊन पोहोंचेपर्यंत तीं १५।२० पावलें दादासाहेबांच्या पाठीमागून जाणें कसेंसेंच वाटूं लागलें. कपडा हें देखील मनुष्याचें रूप अशा रीतीनें बदलूं शकतो हें मला त्या दिवशीं चांगलें लक्षांत आलें. आम्ही सर्व कैदी रक्षक पोलिसांसह आगगाडींत बसलों व धुळ्याच्या मार्गाला लागलों. आमच्या बंधुवर्गानें 'महात्मा गांधीकी जय' म्हणून एकदा पुकार केला, त्याच वेळीं दादासाहेबांनीं उंच हात करून सर्वांचा निरोप घेऊन आपली जबाबदारी पुरी केली.

आम्ही चाळीसगांवला पहाटे पहाटे पोचलों. चांगलें उजाडल्यानंतर आम्ही सर्वांनीं पोलिसांसह चाळीसगांवच्या हॉटेलमध्यें कॉफी-पान केलें. धुळ्याची गाडी उशीरा असल्यामुळें चाळीसगांवच्या स्टेशनवर माझ्याबरोबरच्या सर्व कैद्यांनीं आंघोळी केल्या.

आमच्याबरोबर असलेले श्री. ल. ब. कुलकर्णी यांच्या बहिणीचें घर चाळीसगांवांत होतें. तेथें जाऊन मीं आंघोळ करून यावें अशा तऱ्हेचा विचार आमच्याबरोबर असलेल्या पोलीस शिपायापुढें मांडला. स्टेशनवर उघड्यावर स्त्रीनें कशी आघोळ करावी ? ही अडचण आम्हीं शिपायांना पटवून दिली. तेव्हां एक शिपाई बरोबर घेऊनच मी व ल. ब. कुलकर्णी यांनीं गांवांत जावें असें शिपायांनीं एकमेकांत ठरवून आम्हांस तशी परवानगी दिली. बाकीचे कैदी स्टेशनच्या पोलिसचे ताब्यांत देऊन आमच्या बरोबरचे पोलीस आमच्याच बरोबर गांवांत निघाले.

मला अशा रीतीनें गांवांत जाणें फारसें पसंत नव्हतें, परंतु स्नान कुणाच्या तरी घरीं जाऊन करावें हेंच प्रशस्त असें वाटून श्री. ल. ब. कुलकर्णी, मी व एक पोलीस गांवामध्यें ल. ब. कुलकर्णी यांच्या बहिणीकडे गेलों.

श्री. ल. ब. कुलकर्णी बहिणीकडे कितीक वेळां पाहुणे म्हणून गेलेहि असतील, पण आजचा पाहुणचार कांहीं वेगळाच होता. मी व ल. ब. त्यांच्या बहिणीच्या घरीं गेलों व आमचा रखवालदार पोलीस दारांत बसून राहिला. सुख-दुःखाची विचारपूस झाल्यानंतर आम्ही दोघे—ल. ब. आणि मी—कैदी असतांना त्यांना भेटण्यास आलों याबद्दल ल. ब. च्या मेहुण्यांनीं फार समाधान व आश्चर्य व्यक्त केलें.

मीं आंघोळ केली. आम्हीं थोडासा फराळ केला. आमच्या रक्षकाचा वाटा अर्थात् त्यांत होताच. घरांतील सर्व मंडळींचा निरोप घेऊन आम्ही स्टेशनवर लगबग येऊन हजर झालों.

एका कुटुंबांत थोडा वेळ वास्तव्य केल्यामुळें मला बरीच हुशारी वाटत होती. आतां हें वातावरण अजिबात बदलून तुरुंगाच्या वातावरणास मी कशी रुळेन याची मला धास्ती वाटत होती.

आम्ही स्टेशनवर यतों तों निराळीच भानगड उपस्थित झाली होती. ती म्हणजे रेल्वेंतील फौजदारसाहेब नुक्ते स्टेशनवर येऊन दोन कैदी गांवांत गेले हें ऐकून पोलिसांना रागे भरून गेले होते. ही हकीगत मला व ल. ब. ना कळतांच आम्हीं दोघांनीं अमच्या गैरहजेरीबद्दल पोलिसांजवळ दिलगिरी प्रदर्शित करून आपल्या अधिकाऱ्यांची आम्ही समजूत काढूं असें सांगत असतांना समोरून रेल्वे फौजदार व दोन पोलीस येतांना दिसले. विशेष नम्रता चेहऱ्यावर प्रगट करून मी फौजदारसाहेबांची समजूत काढणार होतें तोंच त्यांनीं मला लवून नमस्कार करून " राधाबाई, तुम्ही इकडे कुठें ? " असा प्रश्न एकदम केला. मी फौजदारसाहेबांना ओळखण्याचा प्रयत्न करीत होतें, तोंच त्यांनीं मला सांगितलें, मी राळे कारभाऱ्यांचा नातु नानू मोहळकर."

अक्कलकोटला कारभारी राळे व आमचें कुटुंब एका जागीं बरेच दिवस असल्यामुळें या रुबाबदार फौजदारांशीं फार जवळची ओळख निघाली.

नानू माझ्या बाकावर एकदम बसला व आमच्या घरगुती गप्पा सुरू झाल्या. माझी आगळीक मीं कबूल करतांच फौजदारसाहेबांनीं हसत उत्तर दिलें, आपला पाहुणचार माझेच घरीं व्हावयास पाहिजे होता.

गाडीला वेळ फार थोडा असल्यामुळें फौजदारसाहेबांनीं हसतमुखानें निरोप देऊन आमच्या मनमाडच्या पोलिसच्या ताब्यांत आम्हांस दिलें.

आम्ही ठरलेल्या वेळीं सायंकाळीं ५ वाजतां धुळें जेलमध्यें सर्व कैदी हजर झालों.

आमची ठरलेली कैदेची ३ महिन्यांची मुदत संपतांच आम्ही सर्व मंडळी चैत्रांतील रामनवमीच्या सुमारास येवल्यास आलों.

या तीन महिन्यांच्या तुरुंगवासांत कांहीं बऱ्या कांहीं बुऱ्या गोष्टी माझ्या लक्षांत राहण्यासारख्या घडल्या. तो उल्लेख येथें केल्यास वावगें होईल असें वाटत नाहीं.

आम्ही राजकीय स्त्री-कैदी ७० होतो. बाकीच्या गुन्हेगार स्त्रिया २५-३० आमच्या बरोबर होत्याच.

आमच्या वेळेला चहा कॉफी वगैरे कोणत्याहि कैद्याला मिळत नसे. सकाळीं ७ वाजतां ज्वारीची कांजी पिऊन स्त्रिया कामास लागत. मला जरी

साधी कैद होती तरी वेळ जाण्याच्या इराद्यानें मी इतर स्त्रियांच्या बरोबर काम करीत असे. स्त्रियांना काम म्हणजे त्या वेळेला धुळें जेलमध्यें असलेल्या ९०० कैद्यांचें धान्य कैदी स्त्रियांकडूनच निवडून घेतलें जात असे. तिखट व हळद, रोजच्या रोज कुटणें व भाजीचा ढिगारा चिरून रोज पाठविणें हीं कामें नित्याचीं असत. रोजचें जेवण म्हणजे दोन भाकरी व पळीवाढें वरण एक कटोराभर हें नित्य ठरलेलें असावयाचें. आम्ही दोघी-चौघी बी क्लास कैदी होतों. आम्हाला दोन पोळ्या व पिंडासारखा भाताचा गोळा व ठरलेलें वरण सकाळीं मिळे. रविवारीं मात्र दोन तोळे गूळ, दोन तोळे गोडें तेल, थोडेसें मीठ, हे भाजीऐवजीं मिळे. बदल म्हणून मांसाहारी लोकांस रविवारीं अशाचपैकीं कांहींतरी खाणें मिळत असे.

सक्तमजुरीच्या स्त्री-कैद्याला पासोडीइतकीं जाड दोन पातळें, दोन चोळ्या व एक चौकोनी रुमाल, एक ब्लँकेट, अंथरण्यास व पांघरण्यास येवढेच कपडे सर्व ऋतूंमध्यें वापरायचे असतात. गार पाण्याचें स्नान करण्यास रोजची मोकळीक असते. जेलच्या या पांढऱ्या कपड्यांवर ठराविक प्रकारची मोठी चौकट असते व हा युनिफॉर्म सगळ्या जेलचा सारखाच असतो.

स्वातंत्र्याच्या चळवळीमध्यें सुखवस्तु स्त्रियांना तुरुंगांतील पातळें व चोळ्या वापरणें फार कठीण गेलें. तो कपडा धुणें तर त्याहून कठीण होतें. कांहीं नाजूक स्त्रिया कपडे धुऊन पिळूं लागल्या म्हणजे त्यांचे लालबुंद झालेले चेहरे पाहून आमच्या वार्डवरची अधिकारी स्त्रीसुद्धां कळवळे. पण लगेच म्हणे × × स्वराज्य मागतां आहेत. आम्हाला असे शब्द किरकोळच म्हणावयाचे—ऐकावे लागतच. मुंबईच्या आलेल्या आश्राप बालिका तुरुंगांतल्या या वातावरणांत अगदीं गांगरून जात.

उघड्यावर आंघोळ, जुन्या तऱ्हेची चोळी, जेलचे विवक्षित संडास, ठराविक वेळांतच सर्व विधि उरकणें या गोष्टी अतिशय अनखर, लहान वयाच्या मुलींना वाटत होत्या. माझ्या वेळेला सौ. यशोदाबाई भट, धुळ्याच्या गंगादेवी पोतदार, वर्ध्याच्या कै. शांताबाई काळे, गुजराथमधल्या कांहीं प्रसिद्ध स्त्रिया आम्ही सर्वांनीं तट्टयाची तरीबाथरूम बांधून द्या अशी मागणी

जेलरसाहेबांचेकडे केली होती. जेलचे नियम सहजासहजीं बदलत नसतात, त्याप्रमाणें याचा कांहींदेखील उपयोग झाला नाहीं.

या वेळीं एक गुजराथी जेलर ईश्वरलाल नांवाचा होता. तो मोठा गमती मनुष्य होता. तो दिवसांतून एकदा आमचेकडे राऊंड घेण्यास येई. त्या वेळीं इतका मोकळ्या वृत्तीनें वागे कीं, सर्व स्त्री-कैदी आपलें मनोगत-तक्रारी, अडचणी त्याच्या पुढें मांडीत. उद्यांपासून अमकें करूं या, अमकी ऑर्डर काढतों वगैरे बोलून परत जाई. पण त्यांतली एकहि गोष्ट खात्रीलायक करील असा भरंवसा कोणास वाटत नसे.

## १९

कै. यशोदाबाई भट यांनीं धुळें जेलमध्यें १९३० सालीं दाखविलेला निश्चय आम्हाला १९३२ सालीं ऐकावयास मिळत असे. यशोदाबाई भट यांना बी क्लास व साधी कैद होती. कैद्याच्या अंगावर कुठल्याहि तऱ्हेचें सोनें अगर पैसा जेलच्या नियमाप्रमाणें ठेवावयाचा नसतो. या नियमाप्रमाणें सौ. यशोदाबाई भट यांचें मंगळसूत्र काढून जेलरनें आपल्या ताब्यांत घेऊन स्त्रियांच्या बरॅकमध्यें जाण्यास सांगितलें. यशोदाबाईनीं मंगळसूत्र काढण्यास विरोध दर्शविला होता. इतकेंच नव्हे तर गळ्यांतील मंगळसूत्र काढल्यास मी अन्न घेणार नाहीं असेंहि अधिकाऱ्यांना निक्षून बजावलें होतें. ब्रिटिश सरकारची दांडगी शक्ति अधिकाऱ्यांच्या पाठीशीं होती व जेलच्या नियमांची जोडहि त्यास मिळाली होती. त्यामुळें हें मंगळसूत्र प्रकरण बरेंच चिघळलें. दृढनिश्चयी यशोदाबाई ऑफिसमधून बारा चौदा घंट्यांत जागेवरून हलल्याहि

नाहींत व मंगळसूत्र परत गळ्यांत घातल्याशिवाय मी कांहीं खाणार नाहीं असें त्यांनीं अधिकाऱ्यांना पुन्हा निक्षून सांगितलें होतें. म. गांधींची सत्याग्रहाची तपस्या यशोदाबाईंच्या पाठीशीं होती व पतिव्रतेचा निश्चयाची जोड यशोदा-बाईंच्या चित्तास मिळाली होती. अखेर त्या वेळचे जेलचे सुपरिंटेंडेंट साठे-साहेब यांनीं त्या वेळीं पुण्यास आय. जी. पी. ला फोन करून मंगळसूत्र प्रकरण व यशोदाबाई भट ही व्यक्ति यांची ओळख करून दिली. त्यांत सौ. यशोदाबाई भट यांचा जय झाला. मंगळसूत्र गळ्यांत बांधूनच त्या स्त्रियांच्या बॅरकमध्यें स्वाभिमानानें गेल्या. पुढच्या स्त्रियांना अशा तऱ्हेची मंगळसूत्राची अडचण स्वराज्याच्या लढ्यांत केव्हांहि यापुढें झाली नाहीं. अशा तऱ्हेची थोडीशी चुणूक जेलमध्यें मलाहि दाखवावी लागली.

मला साधी कैद असल्यामुळें जेलचे कपडे मिळणें शक्यच नव्हतें. तेव्हां ती जाडया कपड्यांची ब्याद माझ्यावरची सहज टळली. माझ्या पायांत वेढीं त्या वेळीं होतीं तीं काढण्याबद्दल जेलरनें मला सूचना दिली. तेव्हां मी जेलर-साहेबांना पटदिशी उत्तर दिलें, "मंगळसूत्राबरोबरच हीं वेढी आमच्या पायांत घातलीं जातात. हा लहानसा दागिना जरी असला तरी तो सुवासिनीची खूणच आहे." त्याच वेळेला स्त्रियांच्या वार्डाची अधिकारी मराठा बाई ऑफीस-मध्यें मला नेण्यासाठीं आलेलीच होती. जेलरसाहेब ज्या वेळीं माझ्या जोडव्याला हरकत घेऊं लागले त्या वेळीं त्या अधिकारी स्त्रीकडेच मीं बोट दाखविलें व त्यांना विचारा पाहिजे तर असेंहि सुचविलें. गंगूबाईनीं माझ्याच सांगण्याला पुष्टि दिली. गंगूबाईच्या पायांमध्यें खूप मोठालीं जोडवीं होतीं !

जेलरसाहेबांनीं मला जोडवीं ठेवण्याची परवानगी देतांना स्पष्ट बजावलें, हा डाग चोरीस गेल्यास ( तुमच्या वार्डांत ) आम्ही जबाबदार नाहीं. नाहीं तर हा डाग इथं ऑफिसमध्यें काढून ठेवा. मीं माझ्या जोडव्याची जबाबदारी माझ्या शिरावर घेतली व गंगूबाईबरोबर स्त्री–कैद्यांच्या वार्डमध्यें गेलें.

⚜ ⚜

## २०

आमचे जेलरसाहेब ईश्वरलाल राऊंड घेत असतांना माझ्या व यशोदाबाईच्या नांवाचा उल्लेख करून ‘ खट्याळ स्त्रिया ’ या विशेषणानें बाकीच्या स्त्री-कैद्यांना आमची ओळख करून देत.

आपल्या सरळ वागण्याचा—निष्कपटी वागण्याचा—परिणाम कुठंहि होतोच, असा माझा तरी अनुभव आहे. आम्ही जेलमध्यें आलेल्या त्या वेळच्या स्त्रिया भावनेसरशा राष्ट्रीय भावनेला उचलून धरण्याकरितांच घरंदारं सोडून जेलची हवा खात होतों. दोनचार दिवसांत भावना ओसरूं लागली. केलेल्या कामाचा पश्चात्ताप बिलकूल होत नव्हता, तरीहि सर्वांना आपलीं मुलं, आपले पति, आपले आतेष्ट दिसत असत व प्रत्येकजण जसा उमाळा येईल तसा आपला दुःखभार एकमेकीजवळ हलका करीत असू.

आमच्या पत्रांचा ढिगारा ऑफिसमध्यें रोजच्या रोज वाढत होता. जेलर-साहेब जेव्हां आमच्या वार्डांत येत तेव्हां गंमत म्हणून कांहीं कांहीं स्त्रियांना तुमचीं घरचीं पत्रें आलीं आहेत व मला वाचल्याशिवाय तुम्हांस देतां येत नाहींत, मला तर धड मराठी कळत नाहीं, मला क्लार्ककडून वाचून घ्यावीं लागतात असें वारंवार बोलत. यामुळें तर आम्हां स्त्रियांना अतिशय दुःख होत असे.

एक दिवस मी गंगूबाईसह (आमची अधिकारीणबाई) जेलरसाहेबांना पोचवायला आमच्या जेलच्या फाटकापर्यंत गेलें. ईश्वरलाल जेलरसाहेब यांनीं मला विचारलें, “ राधाबाई, कैद्याची मर्यादा मागेंच संपली. तुम्ही फार पुढें आलांत. ” मी माझ्या आगाळिकीबद्दल क्षमा मागून माझे चार शब्द ऐका असें त्यांना सांगितलें. थोडक्यामध्यें मीं त्यांना निवेदन केलें कीं, “ आमचीं

घरचीं पत्रें आपल्या ऑफिसमध्यें पडलेलीं आहेत, त्यांत आम्हां स्त्रियांचा जीव घोटाळत आहे. आमचीं पत्रें अगदीं खाजगी स्वरूपाचीं असणार, तीं आम्हांस लवकर मिळाल्यास आम्हांला दोन घांस जास्त जातील याचा आपण विचार करा." जेलरसाहेबांनीं घाईत सांगितलें, "या गंगूबाईला तर लिहायला व वाचायला येत नाहीं. राधाबाई, तुम्ही तिला शिकवा म्हणजे बघूं." मीं पुन्हा एकदा जेलरसाहेबांना सांगण्याचा प्रयत्न केला. "राजकारणी मजकूर ज्या पत्रांत असेल तें पत्र आम्हांस न मिळालें तरी चालेल, पण पोराबाळांच्या खुशालीचीं पत्रें मिळाल्यास बरं होईल." जेलर-साहेब दाराच्या बाहेर निघून गेले.

दुसरे दिवशीं सकाळीं अवेळींच जेलरसाहेब आमच्या वार्डांत आले व मला म्हणाले, "राधाबाई, तुमच्यावर माझा विश्वास आहे. मी आपटे गुरुजींना चांगल्या प्रकारें ओळखतों. तेव्हां ही जोखीम तुम्ही अंगावर घेत असाल, तर मी तुमचीं स्त्रियांचीं पत्रें ज्यांची त्यांस सहज रीतीनें पोंचती करीन." हे शब्द जेलरसाहेबांचे ऐकतांच मला अतिशय आनंद झाला व मी चटदिशीं शपथेवर राजकीय पत्र आढळल्यास आपल्याजवळ देईन असें बोलून गेलें. त्या दिवसापासून सकाळीं ९ ते १० व दुपारीं १ तास मीं जेलच्या ऑफिसमध्यें जाऊन स्त्रियांना आलेलीं पत्रें वाचून ज्या त्या भगिनीला स्त्रियांच्या वार्डांत आल्यावर मोठ्या आनंदानें आणून देत असें. या योजनेमुळें मी जेलमध्यें असेपर्यंत पत्र मिळण्याची सुव्यवस्था झाली होती.

आमच्या गंगूबाई—आमच्या वरच्या अधिकारीणबाई—त्याहि या पत्रा-च्या घटनेमुळें माझ्याशीं बऱ्याच मऊ वागूं लागल्या. जेलरसाहेबांनीं सूचित केल्याप्रमाणें गंगूबाईंना व गुन्हेगार दोन तीन अशिक्षित स्त्रियांना मीं साक्षर केलें. एकाच महिन्यानंतर गंगूबाईंनीं ऑफिसमध्यें स्वतःचें पूर्ण नांव लिहून (अंगठ्याऐवजीं) पगार घेतला, तेव्हां ऑफिसच्या मंडळींना फार नवल वाटलें, असें गंगूबाई स्वतःच आम्हा स्त्रियांना पुन्हा पुन्हा सांगत होती. आमच्यामध्यें गुजराथमधल्या कांहीं स्त्रिया सुंदर कशिद्याचें वीणकाम करणाऱ्या होत्या. त्यांचाहि फायदा गंगूबाईसकट आम्ही सर्व स्त्रियांनीं घेतला.

आमचे जेलरसाहेब काय अगर गंगूबाई काय वळल्या तर सूत नाहीं तर X X . दोघंहि आपापल्या लहरीप्रमाणें केव्हां केव्हां थैमान घालीत व तुरुंगाची जाणीव आम्हां स्त्रियांना करून देत.

मुंबईच्या आलेल्या अननुभवी बालिका, त्यांना हातांत सूप धरून दळण नीट करण्याची कधींहि संवय नव्हती. मुलींचा एक गट वेगळा करून दोन पोतीं गहूं, ज्वारी, बाजरी हें धान्य त्या गटाला नीट करून निवडा असं गंगूबाई सांगत. संध्याकाळीं ४ वाजतां धान्य आमच्या जेलमधून पुरुषांच्या जेलकडे दळण्याकरितां जावयाचें असे. मुलींनीं निवडलेल्या पोत्यांत गंगूबाई भसदिशी हात घालून ओंजळी दोन ओंजळी धान्य बाहेर काढी व त्यांतील बारीक खडे आम्हांस दाखवी. असे खडे धान्यांत निघाले म्हणजे गंगूबाईच्या तोंडाचा पट्टा सारखा सुरू होई. सामुदाईक शिव्या X X X काम येत नाहीं, निवडतां येत नाहीं, दळण नीट करतां येत नाहीं आणि स्वराज्य मागताहेत. आईबापाचा, जातीचा व राष्ट्रभक्तीचा उद्धार गंगूबाईच्या तोंडून भराभर होत असे. मुंबईच्या कन्या मुळूमुळू रडत, तर कांहीं गंगूबाईशीं भांडावयास तयार होत. मग तर गंगूबाईचा अवतार पाहण्यासारखाच असे. आम्ही ज्या काहीं मध्यम वयाच्या स्त्रिया व आमच्या यशोदाबाई यांचें रक्त गंगूबाईच्या बोलण्यानें उसळत असे, पण त्या उसळीचा येथें कांहीं उपयोग होणार नाहीं व मिळालेल्या सर्व सवलती नाहींशा होतील या कल्पनेनें आम्ही गंगूबाईला एक सल्ला दिला व तो तिला मान्यहि झाला. ज्या स्त्रियांना दळण नीट करण्याची सवंय असेल त्यांनीं धान्य नीट करून द्यावें व बाकीच्या बालिकांनीं तें धान्य नुसतें निवडावें असें ठरलें. अशा रीतीनें नऊ पोत्यांची निवड ( वर्दी ) संध्याकाळीं ४ वाजेपर्यंत आम्ही पुरी करून देत असूं.

आमचीं स्त्रियांचीं पत्रं आणण्याकरितां माझ्या दोन खेपा ऑफिसमध्यें होतच असत, त्यामुळें पुष्कळशी जेलमधली मंडळी ऑफिसमध्यें कामाकरतां येत त्यांच्या भेटी-गांठी आपोआपच होत, त्यामुळेंहि स्त्रियांच्या वार्डांतील खुशाली तोंडा-तोंडी पुरुषवार्डाला मिळत असे. त्याचप्रमाणें पुरुषवार्डांतील कैद्यांचे निरोप अर्थात् घरगुती माझ्याकरवीं माझ्या भगिनींना कळत.

त्यामुळें माझें ऑफिसमध्यें जाणें व परत येणें या गोष्टी स्त्रियांना—आमच्या वार्डांतील कैदी-स्त्रियांना—उत्साहाचा एक विषयच झाला होता.

त्याच वेळेला पू. विनोबाजी भावे पुरुषांच्या वार्डमध्यें कैदी म्हणून होते. जमनालाल बजाज व साने गुरुजी हेसुद्धां त्याच वेळीं धुळें जेलमध्यें शिक्षा भोगीत होते. फार मोठाली त्यागी व पुढारी मंडळी जेलमध्यें असल्यामुळें तुरुंगाच्या वातावरणाला फार निराळेंच स्वरूप आलें होतें. नीतिमान् माणसांचा गुन्हेगार मंडळींशीं अहर्निश संबंध येत असे. तें धुळें तुरुंगांतील वातावरण क्षेत्रासारखें पवित्र झालें होतें. कैद्या-कैद्यांत तंटा झाला, तीव्र मतभेद झाला, कैदी व जेलरसाहेब ह्यांच्यामध्यें कांहीं अप्रिय प्रसंग घडला तरी तो विनोबाजींच्या पुढें मांडला जात होता व त्यांनीं केलेला निवाडा सर्वमान्य होत असे.

आमचे जेलरसाहेब फार लहरी होते हें एकदा वर नमूद केलेंच आहे. त्यांच्या स्वभावाची प्रतिक्रिया आम्हांस पुष्कळ वेळां पेचप्रसंगांत टाकीत असे. माझी परिस्थिति एकदा मोठी चमत्कारिक झाली. जेलरसाहेब संध्याकाळीं राऊंड घ्यायला आमच्या वार्डांत आले व सगळ्या भगिनींना सांगू लागले, " पुरुष जेलमध्यें विनोबाजी व स्त्रियांच्यामध्यें राधाबाई माझ्या उपयोगी फार पडतात. राधाबाई तुमचं व माझं काम बिनबोभाट करतात, तेव्हां मी उद्यां राधाबाईचा फोटो काढून घेणार आहे. माझ्या घरच्या ऑफिसमध्यें महात्माजी, वल्लभभाई, विठ्ठलभाई यांचे फोटो लावलेले आहेत तिथेंच विनोबाजी, जमनालालजी व राधाबाई यांचे फोटो लावणार आहे." हें ऐकून माझी छाती धडधडूंच लागली. माझा फोटो जेलरच्या घरच्या बैठकींत काय म्हणून ? माझं मन मला होकार देईना. पण पूर्ण नकार देण्याचं धारिष्ट होईना. तेव्हां मीं जेलरसाहेबांना सांगितलं, ' विनोबाजी आपला फोटो कुणाला काढूं देत नाहींत. त्यांचा फोटो निघाला तर मी माझा काढून देईन. " आमच्या जेलच्या बाहेर पडतां पडतां " विनोबाजींचा फोटो तुम्हांस उद्यां दाखवतों, मग तर झालं " असं म्हणून जेलरसाहेब बाहेर पडले.

रात्रभर मला झोप स्वस्थ अशी आलीच नाहीं. आपला फोटो कसा टाळावा हें कांहीं सुचेना. मात्र फोटो निघणारच असेल, तर आमच्या



१९३२ धुळें जेल. पू. विनोबाजी जेवतांना.

श्री आपटे गुरुजी



१९३० सालीं नाशिक कोर्टाचे दारांत-शिक्षा सुनावल्यावर

जेलमधली मला आई आई म्हणणारी सुशिला गोखले तीन वर्षांची मुलगी मांडीवर घेऊनच आपला फोटो काढूं द्यायचा येवढं मी निश्चित त्यांतून ठरवलं.

खरोखरच दुसऱ्या दिवशीं जमनालाल बजाज व विनोबाजी ह्यांचे दोन फोटो घेऊन जेलरसाहेब आमच्या वार्डांत आले व छोटा कॅमेराहि माझ्या फोटोसाठीं जेलरसाहेबांनीं सज्ज केला. मी सुशिलेला मांडीवर घेऊन फोटोला बसलें व माझा फोटो सुशिलेसह निघाला. जेलरसाहेबांना जातां जातां मीं विचारलें, "विनोबाजींनीं फोटो काढूं दिला?" हसत जेलरसाहेब म्हणाले, "ते कसला काढूं देतात. मी त्यांच्या न कळत भाकरी खात असतांना काढला." जातां जातां मीं त्यांना विनंती केली, "माझा फोटो तुमच्या घरच्या अलबम्‌मध्यें ठेवण्यास हरकत नाहीं, पण मोठ्या मंडळींमध्यें माझा फोटो तुमच्या घरच्या बैठकींत लावूं नका. मला मोठेपणा यायच्याऐवजीं त्या महान् व्यक्तींची बरोबरी करणें योग्य नाहीं." असं मी सांगतांच जेलरसाहेब हसले व 'होय होय' म्हणाले.

दुसरी एक घटना या धुळ्याच्या तुरुंगवासांत अशी घडली कीं, तुरुंग म्हणजे काय आहे याची जाणीव मला पुरेपूर झाली.

बी क्लास कैद्यांना घरची मंडळी महिन्यांतून एकदा भेटूं शकतात. या वेळेपर्यंत हे व गोपाळ मोडक दोघेहि तुरुंगांत असल्यामुळें माझा मुलगा शंभू मला भेटण्यास येणार होता. धुळें स्टेशनवरून गांवांत जाणाऱ्या मनुष्याला धुळें जेलवरूनच जावें लागतें. त्यामुळें माझा शंभू व त्याच्या बरोबर असलेले आमचे येवल्याचे पुराणिक गुरुजी सकाळीं अकरा वाजतां धुळें जेलवरून गांवांत गेले. आमच्या गंगूबाई जेवणाकरितां घरीं गेल्या. तेव्हां शंभूला त्यांनीं ओळखलें ( मागील महिन्यांत तो भेटीस आल्यामुळें ). दोन वाजतां गंगूबाई जेलमध्यें आल्यावर ही आनंदाची बातमी त्यांनीं भराभरा सर्वां-देखत सांगितली. शंभू व पुराणिक हे मला एकटीला जरी भेटण्यास येणार होते तरी ती बातमी आम्हां सर्व स्त्रियांना आनंदकारकच वाटली. बाहेर राजकीय वातावरण काय आहे व थोडी फार नजीकच्या लोकांची खुशाली अशा भेटींतून सर्वांना मिळत असे. त्या आनंदांत आम्ही सर्वजण होतों.

शंभूशीं काय बोलायचं, काय विचारायचं याचा विचार मी करीत होतें. आतां त्याचा भेटीचा अर्ज जेलच्या पेटींत पडला असेल. आतां तो प्रत्यक्ष जेलवर येईल या सुखद कल्पना मी करीत होतें, तोंच बरोबर चार वाजतां भेटीचा पुकार होण्याच्या वेळेलाच पुरुषांच्या जेलमध्यें फार मोठी घंटा दणाण दणाण वाजली. हें काय झालें हें आम्हांस कांहींच कळेना. तोंच आम्हांस कळलें, आम्ही जेलमधले कैदी आहोंत. गंगूबाई भरभरा धावत आली. आम्हां प्रत्येकीला घाईघाईनें ढकललें, मोठालीं कुलपें बरॅकला घातलीं व आमच्या जेलच्या दाराशीं सरकारी अधिकाऱ्याच्या थाटांत उभी राहिली.

त्या दिवशीं जेलमध्यें कोणाच्याहि भेटीगांठी झाल्या नाहींत. संध्याकाळीं आमच्या बरॅकचीं कुलपें निघालीं व कैद्यांना भाकरी-भाजीचें जेवण मिळालें. आम्हांस पुढें कळलें कीं, जेलरसाहेबांशीं बाचाबाच होऊन दोन-तीन कैदी (criminals) जेलरसाहेबांना मारावयास धावले. त्यामुळें जेलची मोठी घंटा वाजवण्यांत आली व एकूणएक कैद्याला टाळेबंद करून टाकण्यांत आलें. संध्याकाळीं आमचे लहरी जेलरसाहेब राऊंड घेण्यास आमच्याकडे आले. मला घडले त्या गोष्टीबद्दल अतिशय उद्वेग आला होता. शंभू जेलच्या दारांत आला आणि माझी भेट न होतां परत गेला. त्या लहान मुलाच्या मनावर काय परिणाम झाला असेल, या विचारांनीं मला गहिंवर आला. जेलरसाहेबांशीं एकहि शब्द मी त्या दिवशीं बोललें नाहीं. जातांना जेलरसाहेब मला म्हणाले, "राधाबाई, तुम्ही खिन्न कां?" मला माझ्या परिस्थितीची जाणीव न राहून रडत रडतच मीं त्यांना सांगितलें, "त्याचें कारण तुम्ही?" तेव्हां जेलरसाहेब थबकले व भगिनींच्याजवळ विचारपूस करूं लागले. कै. सौ. यशोदाबाई भट या पुढें येऊन जेलरसाहेबांना म्हणाल्या, "राधाबाईंचे शाप आज तुम्हांस खास लागतील. राधाबाईंचा जीव खरा कळवळला आहे." ती संधि घेऊन मीं जरा पुढें होऊन त्यांना विचारलें, "आपल्यालाहि मुलं-बाळं आहेत. तेव्हां माझ्या हृदयाची झालेली तडफड आपण समजूं शकतां."

जेलरसाहेब लहरी हेंच खरें. ते हसले व म्हणाले, "तुमच्या मुलाची आज मी भेट करून दिल्यावांचून राहणार नाहीं." मीं तावातावांत सांगितलें, "माझी भेट घेऊन सहाच्या गाडीनेंच भेटायला आलेली मंडळी नेहमीं परततात. आतां कुठली भेट होणार!"

" तुमचा मुलगा धुळयांत कोठें उतरतो तो पत्ता तर मला सांगा " असं जेलरसाहेबांनीं विचारतांच मला आशा निर्माण होऊन आनंद वाटला, पण शंभू कोठें उतरला असेल तें स्थळ विचार करूनहि समजेना. तेव्हां मीं जेलरसाहेबांना सांगितलें, " ल. ब. कुळकर्णी नांवाचे गृहस्थ ( जेलचें धान्य देण्यावर व घेण्यावर जे असतात ) त्यांना पत्ता माहीत असण्याचा संभव आहे." तेव्हां जेलरसाहेबांनीं ऑफिसमध्यें ल. ब. कुळकर्णी यांना बोलावून घेतलें. आमच्या येवल्याचे पुराणिक मास्तर शंभूस घेऊन कुठें उतरले असतील याचा मी व ल. ब. कुळकर्णी अंदाजें पत्ता काढून जेलरसाहेबांजवळ दिला. जेलरसाहेबांनीं स्वतंत्र शिपाई पाठवून 'सकाळीं भेटीस या' असा निरोप शंभूस पोचवला. तेव्हां आमची माता–पुत्राची भेट दुसरे दिवशीं सकाळीं जेलरसाहेबांच्या ऑफिसमध्यें झाली.

या माझ्या धुळयाच्या तुरुंगवासांत कांहीं माणसें मीं जोडली. तीं म्हणजे यशोदाबाई भट, यांचा माझा नवीनच परिचय असला तरी तो अतिशय बळकट व स्निग्ध असाच झाला. त्या वयानें माझ्यापेक्षां बऱ्याच मोठ्या होत्या. त्यांच्या माझ्यांत किती तरी सुखदुःखाच्या गप्पा एकमेकीला सांगण्यांत बराच काळ निघून गेला.

यशोदाबाईंचें ब्लडप्रेशर नेहमीं नेहमीं वाढावयाचें. त्यांना रात्र रात्र झोप नसावयाची. अशा वेळेला आमचा एकमेकींचा सहवास हाच त्यांना पुष्कळ वेळेला सुख निर्माण करीत असे. मला त्यांच्याकरितां तुरुंगामध्यें जें जें करणें शक्य होतें तें तें मी करीत असें. त्यांच्या डोक्याला ब्रह्मी तेल चोळून गाणीं म्हणून त्यांचें डोकें मांडीवर घेऊन त्यांना झोपवीतहि असें. झोपेंतून जाग्या झाल्याबरोबर उत्साहानें त्या म्हणावयाच्या, " तुमचं माझं फार जवळचं नातं असलं पाहिजे. राधाबाई, तुम्ही माझी लेकीसारखी सेवा करीत आहांत. "

या तुरुंगाच्या सहवासांत जें त्यांचें माझें नातें निर्माण झालें तें अखेर-पर्यंत तसेंच होतें. मला, ह्यांना व शंभूला अत्यंत प्रेमानें त्यांनींच नव्हे तर माधवरावांनीं ( यशोदाबाईंचे पति ) त्याच आपुलकीनें वागविलें.

यशोदाबाई या अत्यंत पराक्रमी व दृढनिश्चयी अशी स्त्री होत्या. त्या चांगल्यापैकीं लेखिका होत्या. कीर्तनेंहि स्वतः बसवीत असत व करीतहि असत. १९२१ सालापासून त्या संपूर्ण खादीधारी बनल्या. श्री. अवंतिकाबाई गोखले व यशोदाबाई भट या दोघींच्यावर महात्माजींची विचारसरणी प्रभाव करूं शकली. विशेषतः त्यांची देशभक्ति व राष्ट्रप्रीति अत्यंत उज्जवल अशी होती. ज्या वेळेला सोलापूरममध्यें मार्शल लॉ पुकारला गेला त्या वेळीं यशोदाबाई भट स्वयंस्फूर्तीनें सोलापुरांत जाऊन कोणाच्याहि ओळखीच्या घरीं न उतरतां मुख्य रस्त्याच्या मध्यभागीं सत्याग्रह करून ठाण मांडून बसल्या. त्यांना त्यांच्या वृद्धापकाळाचा विचार न करतांहि दोन वर्षांची ब्रिटिश सरकारनें शिक्षा दिली. यांचे पति श्री. माधवराव भट हे मुंबईमध्यें हायकोर्ट वकील होते. पैसा बऱ्यापैकीं मिळवीत होते. अशा वेळीं जी बाई दिवसांतून ४ वेळां उंची लुगडीं बदलून मुंबईत वावरावयाची, ती स्त्री राष्ट्राच्या आणीबाणीच्या वेळीं अत्यंत जाडीभरडी खादी वापरून हिरीरीनें राष्ट्राची जी सेवा करतां आली ती सर्व प्रकारें करून धन्य झाली असेंच म्हणावें लागतें. मुलांचा मोह, पतीचें प्रेम, सुखसंसाराची आसक्ति या सर्वांवर देशप्रीतीनें जय मिळविला. अशा यशोदाबाई भट या होत्या. त्यांच्या आयुष्यांतून त्यांच्या सहवासांतून मला पुष्कळच गोष्टी शिकायला सांपडल्या.

धुळ्याचे वकील श्री. काकासाहेब बरवे यांचा स्नेह अशाच तऱ्हेचा याच काळांत ह्यांना मिळाला. तोहि स्नेह असाच अखेरपर्यंत आमच्या दोन्ही कुटुंबांत सुख व शांति निर्माण करण्यास वेळोवेळीं उपयोगी पडला.

याच काळामध्यें येवल्याचे कै. श्री. काका थत्ते हे निधन पावले. ही बातमी मला तुरुंगांतच समजली. ज्या काका थत्ते यांच्यामुळें आम्हीं येवल्यांत पाय रोवला ते काका गेल्यामुळें कायमची उणीव निर्माण झाली. माझी मैत्रीण काकू थत्ते यांचा विचारच करणें मला शक्य होईना. पंख असते तर पांखरासारखी उडून गेलें असतें, येवढेंच मी तुरुंगांतील भगिनींशीं यावर बोललें. विचार कर करून माझ्या मनाला स्वास्थ्य कशांतच मिळेना. तेव्हां मी स्नानाची वेळ नसतांना थंड पाण्यानें डोक्यावरून स्नान केलें. यानंतर

मात्र जरा मला बरें वाटलें. कै. काकांच्या करितां मला कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. त्यांच्या नांवानें स्नान करणें येवढेंच मला शक्य झालें व त्यानें कांहींसें मन शांत झालें.

दोन-तीन दिवसांनीं ह्यांचें स्वतःचें येवल्याहून पत्र आलें. ह्यांना येवल्याची हद्द सोडून बाहेर जावयाचें नाहीं अशी अट त्या वेळीं गव्हर्नमेंटनें घातलेली होती. काका थत्ते येवल्यापासून पांच मैलांवर देवीचें स्थान असलेल्या कोटमगांवला हवापालट करण्यास गेले होते व तेथेंच निधन पावले. ह्यांनीं घाईत घाई करून कलेक्टरची परवानगी काढून अखेरची तरी काकांची भेट घेतली होती. हें मुद्दाम पत्रानें ह्यांनीं मला कळविलें. त्यांतच काकू सोवळ्या झाल्या असेंहि कळविलें होतें.

ह्यांचें आलेलें पत्र माझ्या तुरुंगांतील मैत्रिणींनीं व यशोदाबाई भट ह्यांनीं पुनःपुन्हा वाचलें. 'तुमची ही मैत्रीण अशी कशी हो ! असा वेष घेण्यांत तिनं काय साधलं ?' असा प्रश्न मला खोदखोदून व जरा कुत्सितपणानेंच विचारूं लागल्या. तेव्हां मी यशोदाबाईंना तरी स्पष्ट सांगितलें, " माझ्या मैत्रिणीबद्दल गैरसमज आपण करीत आहांत. त्यांची व तुमची ओळख झाल्यावर आजची टिका क्षणभरहि टिकणार नाहीं. माझी मैत्रीण मला माहीत आहे. तिच्या विचारसरणीची मला कल्पना पूर्ण आहे." 'आज नको झालेलं जग, वैतागलेलं मन, निरिच्छ अशी धारणा कालाच्या ओघांत आवंतींभोंवतींच्या परिस्थितींत टिकणें शक्यच नसतें. तेव्हां जगांत राहून जगांतून पळाल्यासारखें होणें हाच मार्ग माझ्या मैत्रिणीला बरा वाटला असावा. देहाला लागणारें लुगडें व पोटाला लागणारें एक वेळचें अन्न, हीच अंतिम इच्छा त्यांनीं ठरविली असावी, आणि हीच गोष्ट खरी होती.

धुळ्यामध्यें श्री. रामेश्वरशेट पोतदार हे व्यापारी असून मोठ्या सात्त्विक प्रवृत्तीचे गृहस्थ आहेत. १९३२ सालीं त्यांची पत्नी गंगादेवी आमच्या बरोबरच तुरुंगांत होती. श्री. रामेश्वरशेट हे तुरुंगांत केव्हांच गेले नाहींत, पण त्यांनीं बाहेर राहून जी सत्याग्रहींची अमोल सेवा केली, तिची बरोबरी तुरुंगांत जाणारी व्यक्तिदेखील केव्हांहि करूं शकणार नाहीं. लिहितां लिहितां दानशूरता आठवली. मी माझ्या पत्रें आणण्याच्या कामाकरितां ऑफिसमध्यें

सहज एकदा गेलें होतें. जेलरसाहेब टेबलावरचें आपलें काम करीत होते. श्री. रामेश्वरशेट हे त्यांची पत्नी गंगादेवी यांच्या भेटीसाठीं ऑफिसमध्यें आलेले होते. सहजच मीं जेलरसाहेबांना म्हटलें, "परवाचे दिवशीं महाशिवरात्र आहे. तेव्हां आमच्या उपासाचें कसें काय होणार ?" नेहमींच्या रिवाजाप्रमाणें जेलरसाहेबांनीं हसत उत्तर दिलें, "जेलमध्यें उपास करतां येतो, पण नुसतें पाणी पिऊन राहावें लागेल राधाबाई !" मीं चटकन् उत्तर दिलें, "तें तर ठरलेलेंच आहे. फराळाचें जेल देत नाहीं म्हणून आम्ही स्त्रिया थोड्याच उपास मोडणार आहोंत ?" जेलरसाहेब रामेश्वरशेटकडे बघून म्हणाले, "शेटजी जर फराळाचें जेलला पुरवतील तर मी अवश्य फराळाचें सर्व कैद्यांना देईन. जेलचें एक दिवसाचें धान्य तरी वांचेल !" इतक्यांत गंगादेवी घाईनें मला म्हणाल्या, "राधाबाई, तुम्ही शिवरात्रीस जर कीर्तन कराल तर आम्हीहि फराळाचें देऊं." बोलतां बोलतां दोन्ही गोष्टी ठरून गेल्या. महाशिवरात्रीस मीं दुपारीं कीर्तन ( स्त्रियांच्या वार्डांत ) करावें व श्री. रामेश्वरशेटजींनीं सर्व कैद्यांना—९०० ते १००० कैद्यांना—शिवरात्रीस फराळाचें पुरवावें. आमचे लहरी जेलरसाहेब या सर्व गोष्टीला कबूल झाले व त्याप्रमाणें शिवरात्रीस घडलेंहि. महाशिवरात्रीस आम्हांस पूजेकरतां पाटीभर बेल जेलरसाहेबांनीं दिला. गुजराथी स्त्रियांच्याकरितां एक टोपलीभर जोंधळ्याच्या लाह्या देवास वाहण्यासाठीं आमच्या बरॅकमध्यें येऊन पडल्या. अहोरात्र आम्हीं तुपाचा दिवा लावला. वाळूचें शिवलिंग नेलें. शिवलीलामृताचें पारायण झालें व गंगादेवीकडून म्हटल्याप्रमाणें केळी, खजूर व दाणे सर्व कैद्यांना फराळाकरितां त्या दिवशीं मिळालें. कैद्यांची सोय रामेश्वरशेट अशीच नेहमीं कांहींना कांहीं भागवीत. विशेष गोष्ट म्हणजे ठरल्याप्रमाणें ४ वाजतां माझें कीर्तन स्त्रियांच्या वार्डमध्यें झालें व आमचे जेलरसाहेब सहकुटुंब तें कीर्तन ऐकण्यास हजर होते.

तुरुंगाचें जग लहान असल्यामुळें तेवढींच माणसं रोज दिसायचीं. तेव्हां मनुष्य मनाची जरूर म्हणून का होईना त्यांतच स्नेह निर्माण करतो. गुन्हेगार कैदी आणि राजकीय कैदी हीं अखेर माणसंच आहेत हें पटून त्या कैद्यांच्या गुन्ह्याचा राग न येतां कींव वाटूं लागते. अध्यात्माकडे आपोआपच चित्ताची ओढ लागते व त्यांतूनच अध्यात्म विषय उकलूं लागतो. खुर्ची आणि टेबल

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 328.00 वि:
क्रमांक 1030 नों: दि:

ह्या निराळ्या आकाराच्या व निराळ्या कामाच्या वस्तु असल्या तरी अखेर त्या एकाच लाकडाच्या असतात. स्त्री आणि पुरुष निराळी व्यक्ति असली तरी त्या दोहोंत एकच मानवता वास करते. गुलाब आणि सदाफुली यांमध्यें एकच द्रवपदार्थ असू शकतो, म्हणजे अखेर सगळें एक आहे – एक पाणी, नैवेद्याच्या वाटींत आहे, तर एक पाणी चांदीच्या लोटींत आहे, तरीहि पाण्याची चव व रंग बदलूं शकत नाहीं. अशा तऱ्हेचे अनंत विचार त्या कैदखान्यांत असतांना मनांत निर्माण होतात. याच न्यायानें लोकमान्यांचें गीतारहस्य, विनोबाजींचें गीताप्रवचन, त्याचप्रमाणें अनेक लेखकांनीं लिहिलेले सोपे व शास्त्रीय ग्रंथ या तुरुंगाच्या भूमींतच निर्माण झाले नाहींत का?

राग व लोभ, या दोन्ही गोष्टी संवयीनें काबूंत ठेवतां येतात. तुम्ही रागावलांत तर कोणी समजूत करणार नाहीं. रडलांत तर कोणीहि तुमचे डोळे प्रेमानें पुसण्यास येणार नाहींत. तुम्हांस रोजची वर्दी (काम) पुरी करण्यास हवी, व रोजचा भत्ता–जेवण खाल्ल्यावांचून गत्यंतर नाहीं.

हा तुरुंगवास ज्यानें सुखांत पार पाडला, त्याला जगामध्यें वागणें फारसें कठीण केव्हांच होणार नाहीं. माझी कैद संपली, त्याचबरोबर धुळें जेलमधील येवल्याच्या बऱ्याचशा बंधूंची शिक्षाहि माझ्याबरोबरच संपलेली होती. आम्हांला जेलच्या दाराशींच भेटण्याकरितां कै. काकासाहेब बरवे, श्रीयुत रामेश्वरशेट वगैरे मंडळी व धुळ्यांतील ह्या वेळची कॉंग्रेसची कार्यकर्ती मंडळी आली होती. आमच्या जेलरसाहेबांनीं एकदा "राधाबाई, तुम्हाला फाशीची जागा सुटण्यापूर्वीं दाखवीन" असें सांगितलें होतें. त्याची आठवण जेलरसाहेबांना आम्हांस सोडतांना नेमकी झाली असावी. आम्ही सुटलेली मंडळी व बरवे वकिलांची घरची मंडळी यांनीं फाशीची जागा पाहिली. जेलरसाहेबांनीं कैदी फाशीस देण्याची पद्धति वर्णनात्मक आम्हांस समजून सांगितली. ती जागा पाहतांच आमच्या सर्वांच्या अंगावर शहारेच उभे राहिले व एकच विचार कमी अधिक प्रमाणांत सर्वांच्या मनांत येऊन गेला, तो म्हणजे स्वराज्याकरितां आमचे किती लोक आनंदानें या जागीं उभे राहिले व अजून किती जातील देव जाणे!

आम्ही जेव्हां सर्व मंडळी येवल्यास आलों, तेव्हां येवल्यांतील कांहीं मंडळी आमचें स्वागत करण्याकरितां स्टेशनवर आली होती. शंभू स्टेशनवरच मला भेटला, पण हे येवल्याच्या स्टेशनवर येऊं शकले नाहींत, कारण ह्यांना येवल्याची हद्द सोडून सरकारी नियमानें स्टेशनवर येणें शक्य नव्हतें.

ह्यांना जे काळोख्या रात्रीं काळ्या पोषाखांतील पोलिसांनीं नेलें ते नाशिकला डिटेन्यु म्हणून दोन महिने ठेवलें होतें. दोन महिन्यांनंतर येवल्याची म्युनिसिपल हद्द न सोडण्याची अट ह्यांच्यावर लादून सोडून दिलें होतें. जेलमधून मोकळे केलें होतें, ही सरकारी अट ह्यांना मोडावयाचीच होती, पण शंभूची जबाबदारी अजिबात दुसऱ्या मंडळींच्यावर सोपवून आपण तुरुंगांत जाणें ह्यांना बरें वाटलें नाहीं. हे व शंभू पुराणिक मास्तरांच्या येथेंच मी सुटून येईपर्यंत राहिले होते. माझ्या तुरुंगाच्या काळामध्यें नानांनीं म्हणजे पुराणिक मास्तरांनीं चि. शंभूला विशेष आस्थेनें सांभाळलें होतें. माझे चुलतबंधु रा. बाबूराव ओंकार ह्यांनीं शंभूला पुण्यामध्यें पुष्कळ आस्था दाखविली. त्याचा अभ्यास बुडूं नये म्हणून मास्तरसुद्धां ठेवले, पण आमचं बाळ मामाच्या परवानगीनेंच येवल्यासच पुराणिक मास्तरांकडे आलें. थत्त्यांचें घर गांवांत होतेंच. तीहि ओढ त्याला होतीच. नानांनीं वडीलबंधूची जितकी आदरानें काळजी घ्यावी तितकी व्यवस्था ह्यांची ( ह्या एक माहिन्यांत ) ठेवली होती.

आम्ही सुटलेली सर्व मंडळी प्रथम आमच्या घरीं आलों. आम्ही त्या वेळीं राहात असलेल्या घराचें अंगण प्रशस्त असल्यामुळें ह्यांनीं मोठ्या हौसेनें तेथें मंडप घातला होता. आमचें व बंधमुक्त झालेल्या लोकांचें स्वागत मोठ्या उत्साहानें गांवकऱ्यांसह ह्यांनीं घडवून आणलें. हा असा आनंद-कारक व हृदयस्पर्शी सोहळा सुरू असतांनाच ह्यांनीं त्याच सभेमध्यें सर्वांचा निरोप घेतला, कारण हे लवकरच कायदेभंग करणार होते. आम्ही दोघे भेटतों आहों तोंच ह्यांची जेलमध्यें पुन्हा जाण्याची भाषा सुरू झाली. ती भाषा मला कसे चटके देत असेल याची कल्पनाच केलेली बरी. तशा वेळींहि ह्यांनीं माझें जें समाधान केलें तें मला पटण्यासारखेंच होतें. तें म्हणजे " पूर्व-कालीन मंडळींना स्वराज्यामध्यें लढाईवर सारखेंच जावें लागत असे. जगणें आणि मरणें हे दोनच प्रश्न त्या वेळच्या योद्ध्यांच्या पुढें असत. आपल्या

महात्माजींच्या युद्धामध्यें कितीतरी शांतता आम्हांस आहे, नाहीं का?" असें वारंवार विचारीत. ठरल्याप्रमाणें ह्यांनीं कायदेभंग केला. त्या वेळेला येवल्यांतील पांचजणांना सरकारनें बरीच कडक म्हणजे दोन वर्षें सक्तमजुरीची शिक्षा दिली गेली. आमची कुणाचीहि कल्पना येवढी मोठी शिक्षा या वेळीं होईल अशी नव्हती. चहूकडेच ब्रिटिश सरकारनें अशाच शिक्षा देऊन जनतेला दहशत घालण्याचें काम सुरू केलेलें होतें. या पांचीजणांचीं नांवें येवल्याच्या सत्याग्रही युद्धांत खास प्रमुखपणें यावयास पाहिजेत. तीं नांवें म्हणजे—१ पां. श्री. आपटे गुरुजी, २ का. र. वैशंपायन, ३ वि. रा. खरे (आमच्याच राष्ट्रीय शाळेचे शिक्षक), ४ रामचरण सोनी व ५ वामनराव साहेब ठाकूर हीं होत.

ह्यांना येवलें म्युनिसिपल हद्द न सोडण्याची जी सरकारी अट होती, तीच अट एक वर्षाकरितां माझ्यावर लादली गेली. त्यामुळें कोणाहि नातलगाच्या बोलावण्याचा फायदा मला घेतां आला नाहीं आणि येवलें गांवहि मला सोडतां आलें नाहीं. शंभू व गोपाळ मोडकला घेऊन मला येवल्यांत राहणें प्राप्त होतें.

माझा मिडवाईफरीचा व्यवसाय सुरू करावा लागला. राष्ट्रीय शाळा बंदच होती. तेव्हां शंभूच्या शिक्षणाची सोय म्हणून पांच रुपये दरमहावर सबनीस नांवाचे हायस्कूल रिटायर्ड हेडमास्तर यांची योजना मीं केली होती. गोपाळ हा पुण्याच्या टिळक विद्यालयाचा मॅट्रिक झालेलाच होता. पुढें त्याच्या शिक्षणाचें काय करावयाचें हें ठरवायचें होतें व तें सर्वस्वीं त्याच्या चुलत्यांच्या (आत्मारामपंत मोडक) इच्छेवर अवलंबून होतें. येवल्यामध्यें माझें राहण्याचें दुसरें एक कारण म्हणजे काका थत्ते यांचें निधन हें होय. तुरुंगांतून सुटल्याबरोबर माझ्या मैत्रिणीची मीं भेट घेतली. मनसोक्त दोघी रडलों. काकूंच्या दुःखाला थोडा तरी पालट पाडण्यासाठीं मला येवल्यांत राहण्याची जरूरहि होती. पुढच्या या दोन वर्षांच्या काळांत—म्हणजे ह्यांचा कारावासाच्या काळांत भलेबुरे अनुभव साहाजिकच मला मिळाले.

माझी मैत्रीण थत्तेकाकू यांना माहेरीं फलटणला नेण्याकरितां त्यांची मावशी आली होती. आतांपर्यंत त्यांच्या माहेरचीं एक-दोन पत्रें आग्रहाचीं

आलींहि होतीं, पण त्या पत्राला काकूंनीं बिलकुलच थारा दिला नव्हता. तेव्हां 'स्वतः मींच जाऊन घेऊन येतें' अशा निश्चयानें मावशी अकल्पित एक दिवस आमच्यासमोर येऊन उभ्या राहिल्या. काकूंनीं नीट रीतीनें माझी सर्व परिस्थिति समजावून सांगून अखेर सांगितलें कीं, "आबा ( आपटे गुरुजी ) सुटून आल्याशिवाय मी फलटणला येणार नाहीं, आणि मी आतां कुठेंहि गेलें तरी माझ्यामागें म्हणण्यापेक्षां पुढेंच माझें दुःख उभें राहणार, तेव्हां मी आहें तिथंच बरी आहे." त्यांतच त्या वेळीं झालेली माझी नाजूक परिस्थिति ( गरोदरपणामुळें ) तीहि त्यांनीं मावशीला सांगितली. "आतां शंभूला बहीण झाली तर कांहीं वावगं नाहीं. तेव्हां अशा वेळींहि ताईची शारीरिक काळजी घेण्यास शंभूशिवाय इथं कुणीहि नाहीं. तेव्हां त्यांना मी एकटं सोडणं बरं होईल का?" असें सांगून काकू मजकरतां गेल्या नाहींत.

माझी तब्येत हल्लीं बरी नसते, अशा तऱ्हेचें पत्र ह्यांना हे जेलमध्यें गेल्यावर महिन्या दोन महिन्यांतच मिळालें. त्यांना तर्क होताच, पण निश्चित असें मीं कांहींच कळविलें नव्हतें. तर माझें दुखणें काय आहे हें काढून घेण्याकरितां ह्यांनीं जेलमधून मोठ्या युक्तीनें मला पत्र पाठविलें. ह्यांनीं आपल्या पत्रांत लिहिलें होतें, "चि. सौ. यमुनेला फार दिवसांनीं दिवस गेले आहेत असें तिच्या पतीकडून मला पत्र आल्यामुळें कळतें, तरी ही हकीगत खरी असल्यास तूं तिला आपल्या घरीं आणून तिच्या प्रकृतीची योग्य तऱ्हेनें काळजी घेणें, हें तुझें कर्तव्य आहे, तरी तिला कोणत्याहि प्रकारें कामाचे कष्ट पडूं देऊं नकोस. तिच्या प्रपंचाला लागणाऱ्या थोड्या फार पैशाची व्यवस्था मी येथें बसूनहि करूं शकेन."

माझें माहेरचें नांव यमुना आहे त्याचा उपयोग करून त्यांनीं माझ्या प्रकृतीची काळजी तेथून वाहिली. खरं पाहिलं तर अशा तऱ्हेची प्रत्यक्ष पत्रांतून चवकशी करणं फारसं वावगं झालं असतं असं नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांची ही अडचण अशा विचारपुशीला कधींच आली नसती, परंतु लहानपणापासूनचे संस्कार आमच्या मनावर असल्यामुळें स्पष्ट विचारणें ह्यांच्या हातून झालें नाहीं, व जेलमधून आलेलीं पत्रें हा बहुतेक सार्वजनिक

माल माझ्या घरीं ठरत असल्यानें, येवल्यांतील आमची परिचित मंडळी ह्यांचें पत्र आलं असं कळतांच वाचण्यासाठीं पुष्कळच येत असत. ह्यांचें हें पत्र वाचल्यानंतर ही ‘ यमू ’ कोण असा प्रश्न मला पुष्कळांनीं केला. मींहि त्यांना ‘आमची भाची’ वगैरे सांगून वेळ भागविली. यमू नांवाचा उपयोग उत्तर पाठवतांना मला देखील त्या वेळीं झाला.

## २१

इतिहास व पुराणें यांचा फायदा आयुष्यामध्यें तशा-तशा प्रसंगांत चांगलाच होतो. धैर्य दुणावतें, निश्चय दृढ राहतो व कामाला हुशारी येते. शिवाजीची माता जिजाबाई, तिचें गर्भारपण व तिची त्या वेळची स्वाभिमानी वागणूक या गोष्टी मला मार्गदर्शक झाल्या.

पुराणांचा व इतिहासाचा दाखला माणसाला उपयोगी पडतो, त्याचप्रमाणें आपल्या आंवतीं-भोंवतीं वावरणारी व्यक्ति हिच्याहि मुखांतून एखाद वेळीं एखाद्या प्रसंगानें ऐकलेली हकीगत मला त्या वेळीं फार उपयोगी पडली.

आमच्या शेजारीं एक सत्तरीच्या घरांतील म्हाताऱ्याबाई असत. त्यांचा आमचा लोभ देशभक्तींतूनच झाला होता. त्या जर आमच्या घरीं एखाद दिवशीं आल्या नाहींत तर ह्यांना, मला व लहानग्या शंभूलासुद्धां करमत नसे. शंभू तर त्यांना ‘ आजी ’ म्हणूनच संबोधीत असे.

माझी बिकट परिस्थिति—ह्यांचा तुरुंगवास—हें सारखं डोक्यांत घोळत असल्यामुळें एक दिवस आजी आल्या असतांना मला सचिंत पाहून म्हणाल्या, “ राधाबाई, तुम्ही तुमच्या परिस्थितीची भलतीच काळजी करतांना दिसतां.

अहो, या वेळेला तुम्ही धीरानं दिवस काढून आनंदी वृत्ति ठेवायला पाहिजे. दुसऱ्या जीवाचं रक्षण माता म्हणून तुम्हांला करायचं आहे आतां. संसारांत संकटं येतात, पण तीं झोपाळ्यासारखीं असतात. जोरानं तीं दूर लोटण्याचा आपण जों जों प्रयत्न करूं, तों तों तीं तितक्याच जोरानं आपल्या अंगावर प्रहार करतात. आपण झोपाळ्यावर बसलों म्हणजे झोपाळा जसा एका जागीं राहतों, म्हणजे तो आपल्या ताब्यांत असतो तसं संकटाशीं माणसानं वागलं पाहिजे. आपण तीं संकटं पचविलीं पाहिजेत हेंच खरं.

" मीं एक एक काढलेला प्रसंग ऐकलांत तर तुमच्या परिस्थितीचा बाऊ असा कांहींच वाटणार नाहीं." आजींचा प्रसंग म्हणतांच मी अगदीं आजींच्या जवळ गेलें व हळूच विचारले, " तुमच्या संसारांत हो कसला प्रसंग ! अशी चळवळीची धामधूम तुमच्या वेळीं होती का तरी ? " आजींनीं माझ्या पाठीवरून हात फिरवला, " राधाबाई, तुम्ही तुमच्या सध्यांच्या परिस्थितींत अगदीं उबगल्यासारख्या झालां आहांत, पण माझ्यावरचा एक प्रसंग ऐका. मला सहा मुलं झालीं. दोन मुली. त्यांचीं लग्न करून दिलीं. त्यांचा संसार ठीक झाला. मुलगे चार. सगळ्यांत धाकटा फार हुषार व देखणा होता. तो पंधराव्या वर्षीच तापानं गेला. दुसरे चिरंजीव नाशकास आहेत. ते आंकडे लावतात व गांजा पितात. तिसरा दामू, तो संसारी माणूस होता. नोकरी बऱ्यापैकीं होती. त्याची बायको मात्र प्रथमपासूनच मला नटवी वाटे व हें चिन्ह बरं नाहीं असं माझ्या मनानं हेरलं व तसंच घडलं पुढं. माझ्याजवळ दोन चार वर्षं होती. तोंपर्यंत कशी झाली तरी दाबांत होती माझ्या. मग झाली दामूची बदली आणि सूनबाईची कळी खुलली व जें व्हायचं तेंच झालं. एक दिवस गांवचा माणूस आमच्याकडे आला आणि त्यानं बातमी सांगितली ती किती भयंकर होती म्हणून सांगू ! सूनबाई म्हणे तेथील रजिष्टर साहेबाबरोबर पळून गेली. दामूनं त्यानंतर भगवीं वस्त्रें घालून संन्यास घेतला. त्यानंतर त्याचं पत्रच नाहीं. "

आजी हें सांगत असतांच 'अगबाई' करून " तुम्ही कशा गप्प बसलांत ? " असा मीं प्रश्न टाकतांच, अहो " राधाबाई, अशा अधीर होऊं नका. याही-पेक्षां गप्प बसून पुढचा प्रसंग मला काढावा लागला तो तर ऐका." असें म्हणून आजीपुढें सांगूं लागल्या—

" माझ्या पुतणीची जाऊ बाळंत व्हायची होती. मी तिच्या बाळंतपणाकरतां तिचे गांवीं गेलें होतें. दैवयोग माझा. माझी परीक्षा दैवानंच घ्यायचं ठरविलं असावं. दुसऱ्या दिवशीं माझं लुगडं धुण्यासाठीं मी नळावर गेलें तों तिथं रजिष्टरीण बाई अकल्पित नळावर आल्या. आम्हा सासू-सुनांना ओळख मनोमन पटली. मी प्रथम कदाचित् लाल झालें असेन, पण मग पांढरीच पडलें असावी. घरांत येतांच मला कुणी तरी विचारलं, 'काकू, अशा कां दिसतां ?' मीं सांगितलं 'रात्रीच्या प्रवासामुळं मला चक्कर आली असावी.'

" अशा स्थितींत मीं जवळ जवळ दोन महिने एका गांवांत एका चाळींत काढले. या रजिष्टरीणबाई कधीं कधीं आमच्याकडे यायच्यादेखील. या ( शोभाबाईचें ) बाईचें कौतुक पोटभर ऐकावयास मिळे. ही 'रजिष्टरची बायको नाहीं भानगडीचें प्रकरण आहे' असें देखील माझ्या देखत कोणीतरी बोललें. इतकेंच नाहीं तर तिचे घरीं चहादेखील पिऊन आलें मी एकदा.

" राधाबाई, हें संकट मीं पचविलं नसतं तर माझा मुलगा वासुदेव ह्याला मी नाहींशीच झालें असतें."

हा आजींचा प्रसंग माझ्या डोळ्यापुढून सरकला व माझ्या मनानं लगेच ठरविलं 'माझा प्रसंग या प्रसंगापुढें कांहींच नाहीं.'

मला आधीं येवल्याची हद्द सोडावयाची नव्हतीच, पण मीं सरकारला विनंती केली असती तर मला बाळंतपणासाठीं आतेष्टांच्याकडे जाता आलें असतें. माझं मन विनंती अर्जाला कबूल नव्हतं. तेव्हां मीं निश्चयानें येवल्यांतच बाळंतपणाकरितां राहण्याचें ठरविलें होतें. घरामध्यें शंभू लहान होता. पण गोपाळ हा घरांत असल्यामुळें मला कशाचीच उणीव वाटत नसे. त्या दिवसांमध्यें पुन्हा एकदा हिंदु-मुसलमानांच्या बारीकसारीक कुरबुरी गांवामध्यें सुरू झाल्या होत्या. हिंदु समाजांतल्या वडीलधाऱ्या मंडळींनीं मला आस्थेनें बजावलें होतें, वेळीं अवेळीं रात्रीं बेरात्रीं मुसलमानांच्या घरीं बाळंतपणाला जातांना नीट जपून राहा. माझी बाळंतपणाची प्रॅक्टिस मुसलमान समजांतहि होती, पण मला कधींच त्यांचा वाईट असा अनुभव आला नाहीं.

त्या काळामध्यें मी रात्रीं बाळंतपणाचें बोलावणें आल्यास एक ठाम असें ठरवून ठेवलें होतें, कीं गोपाळ मोडकला बरोबर घेऊनच डिलिव्हरीच्या घरीं जायचें. बाळंतपणाची खरी केस आहे, हे पाहिल्यानंतरच गोपाळ परत माघारीं जात असे. गोपाळ पाहिला तर पंधरा सोळा वर्षांचाच मुलगा, परंतु हातामध्यें लाठी घेऊन मोठ्या रुबाबांत माझा सरंक्षक म्हणून मला नीट पोचवी व मगच घरीं जाई.

अशा नीतीनें गोपाळनें पुष्कळ वेळां मला निर्धास्त केलें होतें. दुसरी एक माझी चीज माझ्याजवळ कायमची असे. मी परगांवीं बाळंतपणास जातांना अगर गांवांत रात्रीच्या केसला जातांना माझ्याजवळ एक लहानशी पुडी माझ्या निऱ्यांच्या केळ्यांत ठेवीत असें. ती पुडी कसली असे ? जलाल तिखटाची. त्या पुडीच्या जिवावर मला फार निर्धास्त वाटे. कसल्याहि संकटांत दुसऱ्याच्या डोळ्यांत तिखट टाकून आपणांस पळतां येईल असा बेत करूनच वेळीं अवेळीं टांग्यांतून १२।१२, १८।१८ मैल बाळंतपणाकरितां लांबवर मी गेलेली आहें. तिखटाच्या पुडीचा उपयोग करण्याचा प्रसंग एकदाच मला आला होता, मीं माझ्याजवळच्या तिखटाचा उपयोग केला नाहीं, पण त्या प्रसंगांतूनच भिल्ल लोक उपकाराची जाणीव किती ठेवतात हें लक्षांत आलें.

येवल्यानजीक चोराचें पिंपळगांव म्हणून एक खेडें आहे. तेथें बाळंतपण करून रात्रीं दोहोच्या सुमारास मी येवल्यास परतत होतें. माझ्या टांग्यांत एक पोरगेलासा टांगेवाला, मी व ज्या जागीं बाळंतपणाला गेलें होतें तेथील एक माणूस अशीं आम्ही तिनंच माणसं येवल्याकडे निघालों होतों. आमचें घोडें थबकत थबकत चालूं लागलें. त्यांची चाल मंद पडूं लागलीं. अशीं हीं घोडीं कां करतात ? असा विचार आम्ही करीत असतांनाच ३।४ भिल्ल मंडळींनीं आमचा टांगा अडवला. आम्हांस कांहींच प्रतिकार करणें शक्य नव्हतें. टांगेवाल्याशीं त्यांची बोलाचाली होत आहे तोंच मीं टांग्यातून उडी टाकून रस्त्याच्या बाजूला एका झाडाच्या आश्रयानें उभी राहिलें. त्या दिवशीं मला वीस रुपये व टांगेवाल्याला वीस रुपये मिळाले होते. माझें नांव टांगेवाल्यांनीं आपटीणबाई सांगतांच व बाळंतपणाला आम्ही

पिंपळगांवला गेलों होतों असं सांगतांच एकजण माझ्याकडे आला. तो येत आहे असं पाहतांच माझ्या केळ्यांतले वीस रुपये व तिखटाची पुडी मीं बाहेर काढली. वीस रुपये मीं त्याच्यापुढें फेकले. या पुढें मात्र तिखटाच्या पुडीचा आश्रय घेण्याचें ठरविलें होतें तोंच जवळ आलेला भिल्ल मला म्हणाला, "देवगांवला, बाई, माझी भाची तुम्हीं सोडविली नाय का? मला तुमचा पैसा नग." असं म्हणून ते चौघेहि आमच्या दृष्टीआड झाल्यावर माझा टांगेवाला व बरोबरचा माणूस दोघांनीं मला हातांनीं धरूनच टांग्यांत बसविलें. टांगा जोरांत हाकला. मैलभर पुढें आल्यावर आम्ही एकमेकांत एकदाचे बोललों. टांगेवाला मला म्हणाला, "तुमच्या या पेटीनं व 'आपटीणबाई' या नांवांनीं तुम्ही सुटलांत काकू, आज. नाहीं तर फुकट मार खावा लागला असता." माझे मात्र वीस रुपये गेले असें तो म्हणतांच माझे वीस रुपये मीं त्याला दिले व आमच्या घरीं सुखरूप येऊन मी पोहोचलें.

माझा टांगेवाला जरी पोरसवदा होता तरी धैर्यवान् होता बेटा, यांत शंका नाहीं. टांग्यांतच वीस रुपये देतांना मीं त्याला निक्षून सांगितलें, "आजची झालेली हकीगत येवल्यांत कोणाला कळतां कामा नये, त्यांतल्या त्यांत ह्यांना कळतांच कामा नये. कारण मला परगांवीं रात्रीचें बाळंतपणाला पाठविणें हे बंद करतील व आपला शंभू तर डॉक्टर व्हायला पाहिजे. तेव्हां एक शब्दानें याचा उच्चार करूं नको" असं पुन्हा पुन्हा बजावून मी घरांत आलें.

मी जी घरांत आलें ती माझी मुद्रा जरा घाबरलेली ह्यांच्या लक्षांत आली. तेव्हां ह्यांनीं कारण विचारतांच केसचा त्रास फार झाला, चिमट्यानें मूल ओढतांना फार दमलें असं कारण सांगून ह्यांनीं स्वतः आपल्या हातांनीं करून दिलेली कॉफी पिऊन मी झोपण्याकरितां अंथरुणावर पडलें.

ह्यांच्यापासून कोणतीहि गोष्ट लपवून ठेवण्याची मला सवय नव्हती. त्यामुळें मनांत एक प्रकारची बोंच वाटत होती, पण त्याच वेळीं माझ्या मुलाचें मेडिकल कॉलेजचें शिक्षण माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. मी भिऊन माझा बाळंतपणाचा धंदा सोडीन, तर शंभू डॉक्टर होणें शक्यच वाटेना,

म्हणून ही गोष्ट ८।१० वर्षें गुप्त ठेवून पुण्यास १९४८ सालीं आल्यावरच मीं सर्वांस सांगितली. ही घटना १९३९–४० सालच्या सुमारची होय.

स्त्रीस्वभाव ध्यानीं घेतां ही गोष्ट इतके दिवस कुणालाहि सांगितल्यावांचून मी स्वस्थ राहणें म्हणजे एक प्रकारचा फार मोठा विक्रम होता. सुख वा दुःख कोणती का घटना होईना, ती गोष्ट कुणाला तरी सांगितल्यावांचून इतके दिवस गुप्त ठेवणें म्हणजे पाण्याच्या ओघाच्या विरुद्ध दिशेनें पोहून पैलतीरीं जाण्याइतकें दिव्य होतें.

१९३२ सालचा हा काळ म्हणजे ह्यांचा दोन वर्षांचा तुरुंगवास व माझी गरोदरपणाची अवस्था या दोन्हीहि गोष्टी एक प्रकारें कठीण होत्या, तर एक प्रकारें अगदीं सोप्या होत्या.

स्त्रीला गरोदरपण ही आनंदाची गोष्ट असते. तिची शारीरिक तब्येत-सुद्धां बहुतांशीं सुधारते. एक प्रकारचें नवेंच तेज तिच्या मुखावर दिसूं लागतें.

मी मनानें जरी उल्हसित होतें, तरी शारीरिक कष्ट पुष्कळच त्या वेळीं उचलावे लागत असत. बाळंतपणाचा जो माझा मुख्य व्यवसाय तो मला सांभाळावाच लागे. त्याहि स्थितींत झोकांडे जात जात लोकांचे जिने चढून बाळंतपणें मला करावीं लागलीं. मला माझें घर व सार्वजनिक काम दोन्हीं चालवावयाचीं होतीं. सार्वजनिक कामाला मला पुष्कळ लोकांची मदत असे, पण ती त्यांच्या लहरीवर असे. मला मोजकीं कामें ठरलेल्या वेळीं करावींच लागत.

राष्ट्रीय शाळा सरकारनें बंद केल्यामुळें शंभूच्या शिक्षणाकडे पुष्कळ वेळां शिक्षक असला तरी जातीनें लक्ष घालावें लागे. एखाद्या दिवशीं देहाच्या दुर्बलतेमुळें मनहि वेंगून जाई. परंतु अशा वेळीं ह्यांची जेलमधून आलेलीं पत्रें धीर व उत्साह देत. बहुतेक पत्रांतून सौ. यमूच्या प्रकृतीला ( म्हणजे मला ) कटाक्षानें जपावें असें वाक्य असल्यामुळें मला न कळत एक प्रकारची नवीन शक्ति मिळत असे व रोजचें रहाटगाडगें सुरू होई.

हे जेलमध्यें व मी येवल्याला असतांना परमेश्वरी सत्तेनें शंभूसह एक-मेकांच्या भेटीचा योग अकल्पित प्राप्त झाला. कांहीं कांहीं घटना कशा घडतात याचें गूढ सहजासहजीं उकलत नाहीं.

एक दिवस संध्याकाळीं येवलें स्टेशन–मास्तरनीं पोर्टर पाठवून त्याचे हातीं चिठ्ठी दिली होती कीं, प्रधानसाहेबांचा ( मनमाडचे फौजदार साहेब ) फोन आला होता की, त्यानीं तुम्हाला व शंभूला ताबडतोब मनमाडला बोलाविलें आहे.

प्रधानसाहेबांची पत्नी सौ. बाई या गरोदर होत्या हें मला माहीत होतें. त्यांच्याचकरितां मला घाईनें बोलावलें असेल असें समजून मी माझी बाळंतपणाची बॅग सुसज्ज करून शंभूसह ताबडतोब मनमाडला गेलें. मला येवलें म्युनिसिपल हद्द सरकारी नियमाप्रमाणें सोडावयाची नव्हती, परंतु बाळंतपणाच्या केसकरितां जवळपास खेड्यांत जाण्यासाठीं मामलेदारसाहेबांना कळवून जातां येत असें. त्याप्रमाणें मी मनमाडला गेलें. घाबऱ्या घाबऱ्याच मीं प्रधानांचे घरांत प्रवेश केला. मला व शंभूला पाहून बाई गालांतल्या गालांत हसूं लागल्या व प्रधान साहेब शंभूची चेष्टा करूं लागले. “ आज आबा आमचे घरीं येणार आहेत. तूं त्यांना भेटल्याबद्दल आम्हांस काय देणार ? पेढा का बर्फी ? ” शंभूनें चटदिशी उत्तर दिलें, “ मागाल तें. ”

नंतर मला सविस्तर हकीगत समजली कीं, धुळें जेलहून काहीं कैदी पुण्याला येरवडा जेलला पाठवीत आहेत. त्यांच्या नांवाची यादी प्रधानसाहेबांना मिळतांच त्यांनीं मला व शंभूला बोलावून घेतलें. रात्रीं १२॥-१ ला प्रधानसाहेब आपल्या कामाकरितां स्टेशनवर गेले व मी आणि शंभू स्टेशनवर हजर झालों. धुळ्याहून मनमाडला गाडी येतांच एका डब्यांतून ४।५ कैदी व एक दोन पोलीस खालीं स्टेशनवर उतरले. मला व शंभूला स्टेशनवर पाहून ह्यांना काय वाटलें व किती आनंद झाला तो कल्पनातीत होता. ह्यांचा स्वभाव स्थिर असल्यामुळें भावनेला मुरड घालून प्रधानसाहेबांना ह्यांनीं नमस्कार करून त्यांच्या घरची चवकशी केली व शांत चित्तें ह्यांनीं शंभूला विचारलें, “ तुझी ताई व तूं इकडे कोणीकडे ? ताई केसकरितां आली का ! ”

प्रधानसाहेब घरीं निघून गेले व जातांना दौंडच्या गाडीची वेळ होईपर्यंत आपण येथें बसूं शकतां असें मला नम्रपणें सूचित केलें.

ब्रिटिश सरकारचें शकट चारी बाजूनें ढिलेंढिलेंच होत चाललें होतें. त्यांच्याबद्दल आपल्या लोकांना मनांतून अप्रीतिच वाटत होती. नोकरी करणें प्राप्त होतें, म्हणूनच आपले पोलीस आपली ड्यूटी बजावीत होते. यामुळें आमच्या संभाषणाला कोणत्याहि शिपायानें हरकत घेतली नाहीं. त्या २।३ तासांमध्यें आम्हाला मनमुराद बोलतां आलें. शंभू ताटकळून अखेर बाकावर झोपूनहि गेला. ह्यांच्याबरोबर आलेल्या इतर बंधूंचीहि ह्यांनीं माझी ओळख करून दिली. त्यांचींहि कामें सहज होण्यासारखीं तीं मीं दुसऱ्या दिवशीं पत्रानें केलीं. ह्यांच्या व माझ्या बोलण्यामध्यें ' माझें बाळंतपण ' हा विषय मुख्यत्वें होता. माझ्या वन्सं नर्स होत्या त्यांच्याकडे अगर मला पसंत पडल्यास माझे माहेरीं पुण्यास मीं जावें असें ह्यांनीं सूचित केलें. मीं ' सरकारकडे अर्ज करून परवानगी मागणें ' मला पसंत नाहीं असें स्पष्टपणें सांगितलें. पुढें होणाऱ्या साधकबाधक गोष्टींचा विचार करून अनिर्णितच निर्णय आमचा त्या वेळीं झाला. हे म्हणाले, " पुढचें पुढं बघूं. तुला योग्य वाटेल तें तूं कर. आतां परमेश्वरानें आणून दिलेल्या भेटीची सुसंधि काळजीच्या विचारांत आपण घालविणें योग्य होणार नाहीं. "

मनमाड ते येवलें ह्यांच्याच बरोबर ह्यांच्याच डब्यांत मीं व शंभूनें प्रवास केला. येवलें स्टेशनवर मी व शंभू उतरलों. उतरतांना माझे डोळे पाण्यानें भरून आले. शंभू कावरा-बावरा झाला. शंभूच्या तोंडावरून हात फिरवून ह्यांनीं शंभूला सांगितलें, " आतां माझी भेट घेण्यास पुण्यास लवकर ये बरं का ! व मला एकच ओळीनें त्यांनीं निरोप दिला. ती ओळ म्हणजे ' प्रेम जधिं वसतें, हासवितें रडवितें । प्रिय जनीं बहुत प्रकार प्रेम करितें.'

गाडी दृष्टीआड झाली. मी व शंभू टांग्यांत बसून आमच्या घरीं आलों.

या गोष्टीला ७–८ दिवस झाले असतील. येवल्यांत त्या वेळेला असलेले राजदेरकर फौजदारसाहेब यांच्याकडून एक पोलीस ड्रेसमध्यें आला व म्हणाला, " बाई, आपलं वनिता संघाचं बांगड्याचं दुकान आहे ना ! त्या देशी बांगड्या घेऊन आपल्याला आमच्या बाईसाहेबांनीं बोलाविलं आहे."

वेळ करकरीत संध्याकाळची होती, व हे फौजदारसाहेब गदीच्या हौदाकडे म्हणजे माझ्या घरापासून बरेच लांब राहात असत. तेव्हां मीं

त्याला सांगितलें, " आतां मी येणें शक्यच नाहीं व बांगडया भरण्याकरि त आम्ही कधींहि कुणाच्या घरीं जात नाहीं. बाईसाहेबांनाच आमच्या दुकानाच्या वेळांत यायला सांग म्हणजे त्यांचं देशी बांगडी भरण्याचं काम होईल."

आणखी दोन दिवसांनीं पुन्हा एक पोलीस शिपाई आला व त्यानें मला सांगितलें, " बाईसाहेबांनीं आपल्यास सहज भेटीसाठीं बोलाविलें आहे."

बाईसाहेबांचें बोलावणें ऐकून मला जरा कसेंसेंच वाटलें, पण मी त्या पोलीस शिपायाबरोबर फौजदारसाहेबांचे घरीं गेले. फौजदारसाहेब व त्यांच्या बाईसाहेब दोघंहि बैठकींत गप्पा मारीत बसले होते. माझी ओळख करून घेऊन दोघांनींहि गांवांतील इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. मी निरोप घेऊन निघण्याच्या तयारीत होतें. तोंच फौजदारसाहेबांनीं मला विचारलें, " तुम्ही मध्यें मनमाडला गेला होतां ना? तुम्हांला येवल्याची हद्द सोडून जातां येतं का?" हा प्रश्न ऐकतांच मला बोलावण्याचें कारण माझ्या लक्षांत आलें. मीं चटदिशी उत्तर दिलें, "मनमाडच्या फौजदारांच्या पत्नीला बघण्याकरितां स्टेशनवर फोन आल्यावरूनच मी गेलें होतें. जातांना नेहमींप्रमाणें मामलेदारसाहेबांच्याकडे चिठ्ठी टाकली होती."

" आपटे गुरुजी व तुम्ही एकाच डब्यांत बसलां होतां नाहीं का? तुम्ही येथें उतरलांत आणि ते पुण्याला गेले असंच ना?" म्हणून जरा गालांतल्या गालांत साहेब हसले. मीं सरळ उत्तर दिलें, " मनमाडच्या स्टेशनवर त्यांची माझी गांठ पडली; व येवल्यापर्यंत आम्हीं एकाच डब्यांतून प्रवास केला, आणि फौजदारसाहेब, ते भेटले असतांना मी त्यांच्याशीं बोलतां कामा नये अशा तऱ्हेची अट सरकारनें मला कधींच घातलेली नाहीं."

" शंभूहि आपला मुलगा आपल्याबरोबर होता नाहीं का?" " होय. रात्रीची खेडयावर जातांना मी माझ्या मुलाला बरोबरच घेऊन जातें. घरीं त्याला एकट्याला मी कधींच ठेवीत नाहीं."

या माझ्या उत्तरानंतर दोघंहि नवराबायको हेतुपूर्वक हसले व मला साहेब म्हणाले, " आमच्या घरींहि कधीं कधीं येत जा. आम्हीसुद्धां माणसंच आहोत." मी "होय" म्हणून त्यांच्या घरांतून काढता पाय घेतला व माझ्या

घरीं लगबग आलें. एकंदरींत राजदेरकरांचें हें बोलावणें खाजगी जबानी-वजाच झालें म्हणण्यास हरकत नाहीं. फौजदारसाहेबांनीं घरीं बोलावून अशा तऱ्हेची माहिती काढून घेणें मला मुळींच बरोबर वाटलें नव्हतें. कांहीं दिवसांनीं ही मंडळी आमच्याच वरच्या मजल्यावर बिऱ्हाडानें राहावयास आली, मग सहजच ओळखीचें स्थित्यंतर लोभांत झालें.

माझे दिवस जवळ जवळ भरत आलेले होते. एक महिन्याचा अवधि होता. माझ्या घरीं असलेल्या गोपाळ मोडकाच्या जिवावर मला माझ्या बाळंतपणाची कांहींच काळजी वाटत नव्हती. घरांत माझं हक्काचं माणूस होतं. शभूंला सांभाळायला व करमायलाहि साधन होतं. दोनशें रुपयांच्या पैशाची व्यवस्था बाळंतपणाकरतां करून मी चित्तामध्यें स्वस्थ अशी होतें. गांवांतील पुष्कळ स्त्रिया माझ्या मदतीला तयार होत्या. कोणताहि मेडिकल सल्ला माझ्या बाबतींत देण्यास डॉ. भटांसारखे तज्ज्ञ होते. पण गोपाळचा आधार अकल्पित मला सोडावा लागला. तें असं झालं. गोपाळच्या चुलत्याचें पत्र मला आलें. त्यांत लिहिलें होतें, ‘ आतांपर्यंत गोपाळच्या शिक्षणाची आबाळ झाली तरी आतां तशी होऊं नये या करितां पत्र पोचतांच गोपाळला पुण्यास पाठवून द्यावें.’ मी हें पत्र वाचून अगदीं सर्दच झालें. जो मुलगा सात वर्षें पोटच्या मुलासारखा सांभाळला त्याच्यावर माझ्या अडचणीच्या वेळीं माझा बिलकूल हक्क नसावा का ? मीं गोपाळच्या काकांना उत्तर टाकलें, “ ह्यांना आपल्या पत्रांतील मजकूर मी कळवीत आहें. ते कळवतील तसें मी अवश्य करीन. ”

माझी परिस्थिति, गोपाळनं मागेंच कळविली होती. बिचाऱ्यानें पुन्हा एकदा काकांना पत्र टाकलें. नाहीं तरी वर्ष दीड वर्ष माझं वाया गेलंच आहे. तसेंच आणखी दोन-तीन महिने जातील. पण मी येथें राहिल्यास काकूंची बरीच सोय होणार आहे वगैरे.

ह्यांचे जेलमधून व गोपाळच्या काकाचें पुण्याहून एकाच दिवशीं दोन्हीं पत्रें माझ्या हातांत आलीं. गोपाळच्या पत्राचा त्याच्या काकांनीं विचार केला असावा असें दिसलें नाहीं. ‘ पत्र पोहोंचतांच गोपाळला शक्य तितक्या लवकर

पाठवून द्यावें—मी आपटे गुरुजींना तुमच्यासारखेंच एक पत्र जेलमध्यें पाठविलें आहे ' वगैरे पत्र काकांचें आलें.

ह्यांनीं नेहमींप्रमाणें खुशालीचें पत्र लिहून इकडची तिकडची विचारपूस करून पत्र पुरें करायच्या आधीं लिहिलें होतें, " गोपाळच्या चुलत्याच्या पत्राप्रमाणें त्याला ताबडतोब पुण्यास पाठवून द्यावें. तुझी अडचण होईल हें मी जाणतों. पण उपाय नाहीं. शिक्षणाकरितां सोपविलेला मुलगा परत पाठविणें हें आपलें कर्तव्यच आहे. आतां आपलेकडे शिक्षणाची सोय नाहीं."

दोन्ही पत्रांतील मजकुराचा भावार्थ गोपाळला पाठवावें लागणार हा स्पष्ट होता. तेव्हां निरुपायानें त्या दिवशींच रात्रीच्या आठच्या गाडीनें गोपाळास मीं पुण्यास पाठवून दिला. गोपाळ गेल्यानंतर ३।४ दिवस मी अत्यंत अस्वस्थ होतें. मला गोपाळचा व त्यांचा अतिशय राग आला होता. मी माझ्या मनाशीं मनांतल्या मनांत म्हटलें असेल, ' जेलमध्यें बसून गोपाळला पुण्यास पाठव ' असें लिहिण्यास ह्यांचें कांहींच जात नव्हतें. हा बाळंतपणाचा प्रसंग माझा मला काढावयाचा होता. ह्यांच्या पत्रांत कांहीं विशेष योजना केल्याचेंहि ह्यांनीं कळविलेलें नव्हतें. नेहमीं मीं ह्यांच्या पावलावर पाऊल देऊन चालावें व ह्यांनीं माझ्या मनोवृत्तीची कदर करूं नये याचें पुन्हा पुन्हा नवल व वाईट वाटत होतें. मला आशा होती, हे गोपाळच्या चुलत्याला पत्र लिहून कळवतील, माझी अडचण भागल्यावर मी गोपाळला पाठवतों म्हणून, पण ह्यांनीं तसें कांहीं केलें नाहीं, त्यामुळें खरोखर मी त्या वेळीं निराश झालें होतें.

शंभूची जबाबदारी गोपाळ नसल्यामुळें माझ्यावर अधिक पडली होती. जोडी फुटल्यामुळें शंभूला गोपाळवांचून बिलकूल करमतहि नसे.

ह्यांचा जो मला राग आला होता, त्याचा पत्रांत उल्लेख करावयाचा नाहीं ( गोपाळला पाठविण्याबद्दल ) असं मीं ठरविलें होतें. पत्र लिहावयास घेतलें कीं, रागाची येणारी खुमखुमी आवरतां येत नसे. मग मीं काय युक्ति केली? मी माझ्या मनाप्रमाणें मनमोकळं लांबलचक पत्र लिहिलेंहि. पुन्हा पुन्हा वाचलं आणि फाडून टाकलं. मला त्यामुळेंहि जरासं बरं वाटलं यांत कांहीं शंका

नाहीं. रागाचें पत्र टाकायचें नाहीं हें जरी निश्चित झालं तरी सरळ पत्र टाकणं मला जमेना. त्या वेळचें सविस्तर पत्र शंभूनेंच लिहिलें व पोस्टांत टाकलें.

दुसऱ्याच महिन्यांत शंभूस बहीण झाली. बाळंतपणाच्या वेळीं कोणाचीच फारशी मदत घ्यायची नाहीं, असं मीं जवळ जवळ ठरवून टाकलं होतं. मांग-गारोड्याच्या बायका रानावनांतसुद्धां एकट्या बाळंतीण होतात. त्याचप्रमाणें मीं संकल्प केला होता. मी प्रसूत होण्याच्या दिवशीं सुद्धां दोन बाळंतपणं करून येऊन माझी बाळंतपणाची सर्व तयारी स्वतः करून घेऊन देवाची प्रार्थना करीत वेदना काढीत होतें! माझें मीं इंजेक्शन घेऊन सुखरूप प्रसूति करून घेतली. मग मात्र माझा नेट पार गळाला. माझ्या बाळंतपणाची कुणकुण लागतांच एक परिचित बाई धिटाईनें खोलींत आली व तिनें पुढील सर्व व्यवस्था आपुलकीनें केली. तिच्या मदतीची अपेक्षा मला खास होती. तुळस आणि बाभळ एकजिनसी जीवन कंठूं शकत नाहीं. याचा प्रत्ययहि आला. दुसऱ्याची मदत थोडी तरी घ्यावीच लागली. लहानपणापासून काटकपणा शरीरांत आला असता तर मनांतील हेतु पुराहि झाला असता; पण मी लाडांत वाढलेली लेक होतें.

पुण्यांतील माझ्या भावास श्री. बाबूराव ओंकार यांना मी प्रसूत झाल्याची बातमी कळतांच कसलाहि विचार न करतां त्याचा धाकटा भाऊ व भावजय ताबडतोब येवल्यास आली. त्यामुळें पुढचें सगळें सुकर झालें.

माझ्या कोणत्याहि अडचणीच्या वेळीं माझें पडलेलें काम आनंदानें या भावानें पुरें केलें आहे.

पुढल्या महिन्याच्या ह्यांच्या पत्रामध्यें "मुलीची कोणत्याहि प्रकारें आबाळ करूं नये, मी जरी तेथें नसलों तरी मुलीचे नामकरण संस्कार व्यवस्थेशीर करून नांव ठेवावें असेंहि लिहिलेलें होतें. पत्र पुरं करतांना दोन ओळी खालीं लिहिल्या होत्या त्या म्हणजे तुझें पत्र गेल्या महिन्यांत नव्हतें तेव्हां मी तुझें रागावणें सहज ओळखूं शकलों. तुझें रागावणें जरी बरोबर असलें तरी माझें करणेंहि बरोबर होतें. हें थोड्या दिवसांनीं तुझ्या लक्षांत आपोआप येईल" वगैरे.

चि. शंभू व माझी आप्तेष्ट मंडळी या सर्वांना मला मुलगी झालेली ऐकतांच फार आनंद झाला. माझ्या घरांत शंभूच्या पाठीवर बारा

वर्षांनीं पाळणा हाललेला होता ! गांवांतील माझ्या मैत्रिणींनींहि अनेक प्रकारें मुलीचें कौतुक केलें. मुलगी रूपानें शंभूपेक्षां सुरेख होती. परंतु बॅकवर्ड ब्रेनची ती असल्यामुळें तिची फारशी प्रगति तिच्या आयुष्याच्या दहा वर्षांत होऊं शकली नाहीं. तिचें नांव कमा असें ठेवलेलें होतें. ती मुलगी १९४२ सालीं स्वर्गवासी झाली.

एकंदरींत हीं दहा वर्षें तिच्यासंबंधींचीं कर्तव्यें आम्हीं पूर्णपणानें बजावलीं. या जिवाची सेवा करणें हीहि देवानें आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आहे, हें लक्षांत आणून ह्यांनींसुद्धां कोणत्याहि वेळीं कमाची आबाळ होऊं दिली नाहीं. तिला सांभाळण्याकरितां एक स्वतंत्र बाई ठेवलेली होती, तरी पण मी बाळंतपणाकरितां दुसरीकडे गेलें असतांना पुष्कळ वेळां ह्यांनाच तिच्यावर लक्ष ठेवावें लागे.

राष्ट्रीय शाळा बुडाल्यामुळें शंभूच्या शिक्षणाला फाटाच मिळाला असें म्हटलें तरी चालेल. ज्या वेळेला शाळा बंद झाली त्या वेळीं शंभू इंग्रजी पांचवींत होता. हे तुरुंगांतून सुटेपर्यंत शंभूच्या शिक्षणाचें काय करावयाचें याबद्दल एकहि प्रश्न मीं व शंभूनें पत्रांतून ह्यांना कधीं केला नाहीं. सरकारी शाळेंत शंभूला घालणें ह्यांना या राष्ट्रीय चळवळीच्या वेळीं तरी कधींच मान्य होणार नाहीं ही गोष्ट मला पूर्णपणें माहीत होती. ह्यांना तुरुंगांत असतांना कोणत्याहि प्रकारची काळजी अगर विवंचना लागू द्यावयाची नाहीं असा मीं व माझ्या बाळानें संकल्प केलेला होता. गांवांतील पुष्कळशी सूज्ञ व आमच्याबद्दल आस्था बाळगणारी मंडळी मला सांगत, " मुलाला घरीं ठेवून त्याचें निरर्थक नुकसान करूं नका, राधाबाई. सरकारी हायस्कूलमध्यें घालून टाका. गुरुजी आल्यावर पाहून घेऊं. त्यांच्या इच्छेप्रमाणें पुढें करा कीं !" अशा सोज्वळ सहानुभूतीला एकच उत्तर ठरलेलें होतें. तें म्हणजे, " कांहीं वेळेला नफ्यापेक्षां नुकसानच जास्त फायदेशीर असतें ! दोन वर्षें मुलगा मागें राहील यापेक्षां जास्त काय होईल ? मला ह्यांच्या संमतीवांचून शंभूच्या शिक्षणाबाबत कांहीं करावयाचेंच नाहीं. ह्यांच्या कार्याला मोठीशी मदत माझ्याकडून होऊं शकली नाहीं तरी ह्यांच्या जीवनांत ह्यांना कमीपणा देण्याची कोणतीहि गोष्ट आम्हां दोघांस करावयाची नाहीं."

परिचित मंडळींना मी अशीं उत्तरें देऊन गप्प करीत होतें. पण कांहीं वेळेला खरोखरीच शंभूच्या शिक्षणाचीं दोन वर्षें वाया जात आहेत हा विचार माझ्या मनांत आला व मी शंभूस याबद्दल विचारणाहि मोकळ्या मनानें केली. शंभूचें वागणें अत्यंत समंजसपणाचें व मला सहानुभूति देणारें असल्या-मुळें पुष्कळसें मला बरें वाटलें. त्यानें उत्तर दिलें असें तें–" आबा आणि तूं जें ठरवाल तें माझ्या हिताचेंच असणार, तेव्हां तूं सांगशील त्याप्रमाणेंच आबा सुटेपर्यंत वागण्याचें मीं ठरविलें आहे.". आम्ही दोघांनीं त्या रात्रीं बराच विचार करून शंभूच्या अभ्यासाची आंखणी केली व दुसऱ्या दिवसापासून तो कार्यक्रम त्यानें अमलांत आणला.

यासाठीं एका शिक्षकाची व्यवस्था मीं पगारी केलेली होती. त्यानंतरचा अधिक अभ्यास गांवांतील एखाद्या सद्‌गृहस्थांकडे जाऊन मधुकरी वृत्तीनें त्या दोन वर्षांत त्यानें जो केला तो त्याला मॅट्रिकच्या वेळीं उपयोगी पडला. इंग्रजी, संस्कृत, सायन्स, गणित वगैरे विषय त्यानें या काळांत शाळेच्या अभ्यासाबरोबर केले."

ही गोष्ट वाटते तितकी सोपी नव्हती. रोज एक तास एकएकाकडे शंभू जात असे. त्या सद्‌गृहस्थांची वेळ, इच्छा बघूनच आपलीं पुस्तकें त्याला उघडावीं लागत.

शंभूची गणना बुद्धिवान् मुलांत त्याहि वेळीं ही मंडळी करीत असत, पण अत्यंत नम्र, आज्ञाधारक व मनमिळाऊ या गुणाची तारीफ माझ्याजवळ त्या मंडळींनीं पुष्कळ वेळां केली.

एकंदरींत मला सांगावयाचें आहे तें म्हणजे माझ्या मुलापासून मला त्या काळामध्यें कोणत्याहि तऱ्हेचा त्रास झाला नाहीं. मिळेल तो कपडा व घालीन तें अन्न याचा त्यानें अनादर केला नाहीं. खोडकर, हट्टी, नाठाळ, यांच्यापैकीं एकहि वृत्ति त्याच्यामध्यें नसल्यामुळें आमच्या धकाधकीच्या मामल्यांत आम्हां दोघांना कधींच त्रास पोंचला नाहीं.

मनुष्य आपल्या हातांनीं कांहीं तरी गोष्टी निर्माण करतो व मग त्याच्या निरर्थक वेणा त्या माणसास द्याव्या लागतात. याप्रमाणेंच माझी या दोन वर्षांत

एकदा फार चमत्कारिक अवस्था झाली. हे धुळें तुरुंगांत असतांना आम्ही ह्यांची भेट घेण्यासाठीं गेलों होतों. त्या वेळेला माझें व्याख्यानहि कै. टिळक वकिलांच्या अध्यक्षतेखालीं झालें होतें. त्या दिवशीं सकाळीं गांवामध्यें परिचित मंडळींच्या भेटीगांठींसाठीं मी गेलें होतें. मी चहा घेत नसल्यामुळें माझ्यापुढें सहजच दुधाचे कप येऊं लागले. मी घरोघरीं विचारी या दुधांत साखर देशीच आहे ना ? तेव्हां एका बाईनें थाटांत मला उत्तर दिलें, " परदेशी साखर औषधालासुद्धां आमच्या धुळ्यांत मिळणार नाहीं."

ही गोष्ट ऐकल्यापासून माझ्या डोक्यांत सारखें चक्र फिरूं लागलें. येवढ्या मोठ्या धुळें शहरामध्यें परदेशी साखर अजिबात बंद करतां आली तर आपल्या येवल्यासारख्या लहान गांवांत परदेशी साखर कां बंद होऊं नये ? सारा दिवस हा विचार सारखा डोक्यांत सुरू असल्यामुळें त्या रात्रीं माझ्या व्याख्यानांत मीं धुळेंकरांचें कौतुक केलें व येवल्यांत परदेशी साखर बंद करण्याचा माझा संकल्प मीं सभेंत जाहीरहि केला. टाळ्यांच्या गजरांत माझ्या या भाषणाचें धुळेकरांनीं स्वागत केलें. मी येवल्यास आल्यावर नागरिक जनतेला एक व्याख्यान देऊन ह्यांचा निरोप म्हणून ह्यांनीं जें जें सांगितलें होतें तें तें सभेंत निवेदन केलें व माझा संकल्प परदेशी साखर बंद करण्याचा लोकांना निवेदन केला.

माझ्या भावना उच्च विचारांनीं भरून गेल्या असल्यामुळें परदेशी साखर बंद करण्याचा विचार फार मोठा उत्साहवर्धक वाटला, पण ती गोष्ट अमलांत आणणें किती कठीण होती तें हळू हळू समजूं लागलें.

माझ्या बाबतींत पुष्कळ वेळां असंच घडून आलेलं आहे. विचार पूर्ण केल्यावांचूनच भावनेसरसा उच्चार होतो व त्या उच्चाराचा पाठपुरावा आचारांनीं करावा लागतो. परमेश्वराच्या कृपेनें पुष्कळ वेळां माझ्या उच्चाराची पूर्तता होऊं शकली आहे ही गोष्ट वेगळी.

ही येवल्यांतील सभा झाल्यावर दुसऱ्या दिवसापासून गांवांतील प्रमुख व्यापारी, गांवांतील प्रसिद्ध कार्यकर्ते नागरिक माझ्याकडे येऊं लागले. त्या सर्वांनीं मिळून मला सांगितलें, " धुळें हें जरी मोठं गांव असलं तरी तिथं व्यापारी असोसिएशन आहे, त्यामुळें व्यापाऱ्यांच्या सभेंत जें ठरतं तें निश्चयानं धुळ्यास होतं. धुळ्याच्या व्यापाऱ्यांनीं परदेशी साखरेवर बहिष्कार

घातल्यामुळें परदेशी साखर धुळेकरांना मिळणं शक्यच नाहीं. पण आपल्या येवल्यांत तसं कांहींच नाहीं. आम्ही कोणीहि व्यापारी कसल्याहि तऱ्हेचं बंधन एकमेकांस घालूं शकत नाहीं. काकू, आपला संकल्प येवल्यांत कसा पुरा होणार? अगदींच अशक्य कोटींतील गोष्ट आहे."

हें ऐकल्यानंतर श्रीकृष्णाचें विश्वरूप पाहून अर्जुन जसा भयभीत झाला तशी मी आंतून घाबरलें, पण निश्चयानें त्या मंडळींना मीं सांगितलें, "मी माझा प्रयत्न करणार! नाहीं यश आलें तर अपयशहि पुढच्या सभेंत मी मोकळ्या मनानें जाहीर करीन. पूज्य महात्माजींचें उदाहरण आपल्या सर्वांच्या पुढें आहेच. यशासारखेंच अपयश जनतेला महात्माजी निवेदन करतात, इतकेंच नव्हे तर आपला पराजयहि कबूल करतात. त्याप्रमाणें मीहि करीन. मी आपणांस बोलावणें केलें तर अवश्य मला साहाय्य करण्यास यावें." येवढें सांगून मीं त्यांची बोळवण करीत असे.

मला त्या दोन तीन दिवसांत झोप अशी स्वस्थ आलीच नाहीं. आतां एकटीनें हा विचार करण्यापेक्षां सामुदायिक विचार करणें बरें असें वाटून आमच्या खास दहा बारा मंडळींना मीं बोलावणें केलें. ही मंडळी म्हणजे ह्यांचे राष्ट्रीय शाळेचे माजी विद्यार्थी व एक दोन तेथें असलेले शिक्षक हीच होत. सर्वांच्या मतें विचार करून असें ठरलें कीं, व्यापारी असोसिएशन येवल्यांत नसल्यामुळें परदेशी साखर अजिबात बंद होणें अशक्य आहे, पण "काकू, तुमचा शब्द खरा व्हावा याकरितां आम्ही जिवाचें रान करूं. परंतु कांहीं नेमकी मुदतच आपण व्यापाऱ्यांना देऊं म्हणजे सर्व साधेल." असें सर्वांचें मत पडलें.

लगेच दोन तीन दिवसांनीं साखरेबद्दल आम्हीं केलेला विचार गांवांतील वयोवृद्ध व अनुभवी मंडळी व ज्यांच्या ताब्यांत व्यापारी व गांवांतील नागरिक आहेत अशा २।४ व्यक्तींना मी आमच्या छोट्या सभेचें निवेदन कागदावर लिहून केलें. कै. नानासाहेब वाघ वकील, कै. डॉ. साठे, डॉ. भट, त्याच प्रमाणें मुरलीधर शेट गुजराथी, कै. तसदूर हुसेन बोहरी वगैरे मंडळींना कळविलें. या मंडळींनीं गांवांतील बरीचशी किराणा मालाचे व्यापारी व हलवाई यांची सभा माझ्या घरीं माझ्या अंगणांत घेतली. मी या वडीलधारी मंडळींच्या पुढें त्या वेळीं फारशी बोलत नसे.

मी माझ्या घराच्या दारांत उभी राहून या लोकांची सभा अवलोकन करीत होतें. कै. नानासाहेब वाघ यांनीं माझी साखरेबद्दलची सात्त्विक इच्छा सर्व मंडळींना प्रदर्शित केली. या कामांतील अडचणी आपण मोकळ्या मनानें निवेदन कराव्या असें सांगितल्यावरून व्यापाऱ्यांनीं एकजुटीनें सांगितलें, " परदेशी साखर बंद करून फक्त देशी साखर विकणें हें आम्हांस केव्हांच परवडणार नाहीं. गिऱ्हाईकहि काळी व महाग साखर मनापासून घेणार नाहीं. तेव्हां आम्हीं तरी काय करावें ? "

माझे विचार यावर काय आहेत ते कै. नानासाहेब वाघ यांनीं मला विचारले. मीं एकच उत्तर दिलें, तें म्हणजे, " धुळ्यांतील व्यापारी जी गोष्ट राष्ट्रभक्तीनें करूं शकतात ती गोष्ट येवल्याच्या व्यापाऱ्यांना कठीण वाटावी याचं मला नवल वाटतं." मीं व्यापाऱ्यांना स्पष्ट सांगितलें, " ही गोष्ट तुम्हांस शक्य नसेल तर निरुपायानें येवल्यांतील नागरिकांना मला तसं सांगावं लागेल. "

माझा कंठ त्या वेळीं दाटून आला होता. मी तोंड लपविण्याकरितां घरांत गेलें. घरांत जाऊन माझे अश्रु मीं पुसले. त्या अश्रूंमध्यें राष्ट्रप्रीति, स्वाभिमान, कार्याची निष्ठा आणि अपयशाची खात्री इतके भाव खास होते. बैठकींतल्या मंडळींनीं विचार करून मला हाका मारून सांगितलें, " पुढच्या सहामाहींत आपण याचा सांगोपांग विचार करूं. परंतु आतां शिमगा जवळ आला असल्यामुळें परदेशी साखरेचें बहिष्कारशस्त्र आपण काढूं नका. "

माझ्या विचाराला थोडी सहानुभूति मिळत आहे असें दिसून येतांच ती गोष्ट कटाक्षानें उचलून धरून व्यापाऱ्यांना सांगितलें, " काळावर माझा भरंवसा नाहीं, आणि माणसाच्या वृत्तीवर त्याच्याहून नाहीं. मला जी गोष्ट आज हृदयांत बोचत आहे, ती उद्या तितकी बोचणारहि नाहीं. आपण सर्व मंडळी जी सहानुभूति आज देत आहांत ती उद्यां देणार पण नाहीं. म्हणून जें काय धोरण ठरावयाचें तें आजच ठरलेलें बरें. शिमग्याची गाठी व कडी यंदा परदेशी साखरेची आपल्या गांवांत होतांच कामा नयेत. मला ठाऊक आहे, थोड्या दिवसांकरितां परदेशी साखर आपण बंद केली तर तो मोठा पराक्रम आहे असं नाहीं, पण भावनेचा एक मोठा धक्का—'बहिष्कार' या सदरानें

आपण सरकारला देणारे आहोंत. तरी कमींत कमी या दोन महिन्यांत परदेशी साखरेचा व्यवहार होता कामा नये, अशी माझी किमानपक्षीं मागणी आपणां सर्वांचे जवळ आहे." माझ्या या कळकळीच्या सांगण्याचा परिणाम व्यापारी व हलवाई यांच्यावर बऱ्यापैकीं झालेला दिसतांच कै. वाघ वकील व डॉ. साठे आणि डॉ. भट यांनीं ही गोष्ट झालीच पाहिजे असें व्यापाऱ्यांना निक्षून सांगितलें.

येवलें काँग्रेस कमिटी असा एक शिक्का तयार झाला व गांवांतील ठोक व्यापाऱ्यांच्या पोत्यांवर शिक्का मारून विक्री बंद केली गेली.

पण इतका सुरळीत 'बहिष्कार' कसा पुरा व्हावा ! आम्हां भगिनींना दुकानांवर पिकेटिंग करावें लागलें. सात आठ स्त्रिया—मुली व वृद्ध यांना पाहून पोलीस प्रथम घाबरत, पण 'या पुढें निरोधन तुम्हीं केल्यास आम्हांस पकडणें भाग पडेल' असेंहि पोलिसांकडून सांगण्यांत आलें.

नाठाळ दुकानें दोन होतीं. एक तेल्याचें व दुसरें बोहऱ्याचें. गांवांतील कांहीं मंडळींनीं त्यांना 'तुमचा माल गांवकरी घेणार नाहींत' असें कळवलें. तेल्यानें दुकान बंद केलें, पण बोहरी ऐकणें शक्य दिसेना. आतां कांहींतरी पकडा-पकडी होणार असें मला वाटलें तोंच—

तसदूर हुसेन शेटनीं मुलास चिठ्ठी पाठवून स्वतःचें दुकान ताबडतोब बंद केलें. पिकलेल्या पानापुढें हिरवें पान मागें पडलें. शेटजी मोठे धूर्त होते. राकेल दुकान दुसरें त्यांचें होतें. तोहि माल खपला नसता. अशा रीतीनें दोन महिने परदेशी साखर येवल्यांत दिसली नाहीं.

अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

## २३

सन १९३४ साल उजाडलें व आनंदाचें वारें आमच्या आंवतींभोंवतीं वाहूं लागलें. दोन वर्षांचा कारावास संपून हे आपल्या चारी सहकाऱ्यांसह ( एकाच दिवशीं दोन वर्षांची शिक्षा भोगून आलेलीं माणसें ) येवल्यांत परत आले. या दोन वर्षांमध्यें किती तरी व्यक्तींचा तुरुंगामध्यें ह्यांच्याशीं परिचय झाला होता. त्यामुळें पुढच्या आयुष्यांतील पुष्कळ गोष्टी सुकर झाल्या.

हे ज्या वेळीं घरीं आले, त्या वेळेला आमची कांहीं नातलग मंडळी व आमचा दोघांचा मित्रपरिवार सुस्वागतास तयार होता.

माझ्या मुलीला संभाळण्याकरतां ठेवलेली मुलगी पंधरा-सोळा वर्षांचीच होती. तिचं नांव पार्वती. ती मोठी धिट्टकली होती. मला न विचारतां लहानग्या कमाला घेऊन हे जेथें मंडळींत बसलेले होते, तेथें गेली व ह्यांच्या मांडीवर कमाला ठेवून म्हणाली, “ आबा, हिला घ्या कीं आधीं. पत्रांत कमाबद्दल इतकं लिहीत होतां आणि घरीं आल्यावर अद्याप तिला घेतलीत सुद्धां नाहीं. ” हा पार्वतीचा धिट्टकलेपणा पाहून ह्यांना हसूं आलें आणि आनंदहि झाला. ह्यांनीं पार्वतीला सांगितलें, “ ही बसलेली मंडळी ही सुद्धां माझीं मुलेंच आहेत. कमाला मीं घेतली नाहीं हें माझं चुकलं हें तितकंच खरं. तूं मला सावध केलेंस हें बरं झालं. कमापेक्षां तिची आई खास रागावली असेल, ” असं म्हणून पितृवात्सल्यानें ह्यांनीं कमाला हृदयाशीं कवटाळलें. कमानेंहि ह्यांच्या डोक्यावरची टोपी ओढून आपला हक्क शाबीत केला. चि. शंभूनें सुद्धां रात्रीं दहापर्यंत म्हणजे झोप येईपर्यंत ह्यांची पाठ सोडली नाहीं. दुपारीं जेवतांनाच वन्संशीं व माझ्याशीं दोन शब्द ह्यांनीं बोलल्यासारखे केले आणि पळवाट काढली.

येवल्यांतील कांहीं मंडळींना हे वडीलधारे समजून मान देत असत. या रिवाजाप्रमाणें जरा गडबडींतून मोकळे झाल्याबरोबर ह्यांनीं त्या घरांना भेटी दिल्या—त्या घरांतील वडील मंडळींना वंदन करूनच हे घरीं परत आले.

अशा रीतीनें एक महिन्या दोन महिन्यांचा काळ केव्हांच भराभर निघून गेला. आतां राष्ट्रीय शाळा बंद झालेलीच होती; तेव्हां पुढें काय करावयाचें याची रूपरेखा तुरुंगांतच ह्यांनीं आखलेली असावी. कारण या दोन महिन्यांत हे पुढें काय करणार याची कल्पना हलकें हलकें मला देत होते. याच वेळेला वर्ध्याचे जमनालाल बजाज ह्यांचें पत्र आलें व त्यांत त्यांनीं वर्ध्याच्या कन्या-शाळेच्या वसतिगृहावर तुमची योजना मी आनंदानें करतों असें लिहिलें होतें. कामाचा मोबदला म्हणून मी ५०।६० रुपये आपणांस देऊं शकेन. राधाबाई इकडे आल्या म्हणजे त्यांचाहि उपयोग स्त्री–समाजास करून घेता येईल.

आम्हीं दोघांनीं आमच्या ध्येयाचा विचार करून वरील पत्राचें उत्तर नम्रपणें पण नकारार्थी दिलें. ह्यांना येवलें सोडणें केव्हांच बरें वाटेना, व ‘ मुलाचें शिक्षण ’ हा प्रश्न माझ्या व ह्यांच्यापुढें मुख्यत्वें होताच. त्यामुळें इकडून वर्ध्याकडे जाणें आम्हांला सोईचें वाटेना.

## २४

यानंतर ह्यांनीं जें मनामध्यें योजून ठेवलें होतें, त्याची सुरुवात गांवामध्यें हिंडून, प्रचार करून आश्रमीय जीवनाचा आराखडा सर्वांच्या कानावर येऊं लागला. कांहीं मंडळींनीं पुन्हा शाळा काढण्याचा सल्ला दिला. इतकेंच नव्हे तर, आमच्या राष्ट्रीय

शाळेचे घरमालक बंकटशेट व किसनशेट राठी या बंधुद्वयानें पूर्वींची राष्ट्रीय शाळेची जागा तुम्हांस देतों असें सांगितलें. खरोखरच या बंधूंचा मोठेपणा वाखाणण्यासारखा होता. हे तुरुंगांत जातांना घाईघाईनें शेटजींना म्हणाले होते, " शाळेची जागा अशीच राहूं द्या. कोणांस भाड्याबिड्यानें देऊं नका. मी परत आल्यावर आपण विचार करूं." ह्यांच्या या सांगण्याबरहुकूम कोणालाहि शाळेची जागा भाड्यानें दिली नाहीं. हे तुरुंगांतून आल्यानंतर शब्द दिल्याप्रमाणें भाड्याची रक्कम वर्षा दीडवर्षाची किती देऊं असें विचारतां मालकांनीं गहिंवरून सांगितलें, " गुरुजी, आम्ही इतके वेडे नाहीं. तुम्ही भाडें कुठून आतां देणार ? आम्हांस भाडेंबिडें कांहीं नको आहे. यापुढें मात्र आपला काय विचार होईल तो लवकर कळल्यास बरें होईल. " त्याच दिवशीं बसल्या बैठकींत मालकांचीं व यांचीं बोलणीं होऊन वर्षाचें १५० रुपये भाडें त्यांच्यापुढें ठेवूनच हे परत आले. राष्ट्रीय शाळेच्या जागेमध्यें मी कांहीं तरी योग्य अशी योजना आंखीत आहें, ती आपणांस कळेलच, पण आजपासूनच मीं आपली जागा निश्चित भाड्यानें घेतली आहे.

राष्ट्रीय शाळा बंद झाल्यानंतर पुन्हा शाळा काढणें ह्यांना बिलकूल पसंत नव्हतें. राष्ट्राच्या आणीबाणीच्या वेळेला कांहीं तरी निराळीच योजना आम्हां सर्वांस आंखावी लागणार आहे व ती म्हणजे आश्रम-योजना. आश्रमामध्यें पंधरा वीस मुलें घेऊन त्यांचा मूलोद्योग पद्धतीप्रमाणें शिक्षणक्रम सुरू करण्याचा ह्यांचा विचार होता. पुस्तकी शिक्षणाबरोबर शरीरश्रमाचें महत्त्व, उद्योगाची आवड व संघटनाचातुर्य याची गरज चालू काळांत दिवसानुदिवस कार्यकर्त्या माणसांना वरचेवर लागणार आहे. तेव्हां तसा प्रयत्न करण्याचा माझा विचार आहे. या योजनेलासुद्धां ३-४ माणसें कमींत कमी एका विचाराची व ध्येयनिष्ठ अशीं असावयास पाहिजेत. अशा तऱ्हेचीं बोलणीं ह्यांच्या रोजच्या बोलण्यांत सुरू असल्यामुळें ह्यांच्या बरोबर सुटलेले व राष्ट्रीय शाळेचे पूर्व-शिक्षक मामा खरे ही तरुण व्यक्ति ह्यांना येऊन मिळाली. हे नेहमीं म्हणत, " मी राम नाहीं; पण आमचे ल. ब. गुरुजी ( कुळकर्णी ) हे मात्र मारुति आहेत." आणि तें अगदी खरें होतें. त्यांनीं कसलाहि विचार न करतां ह्यांच्याशीं चर्चाहि न करतां ( तुमच्या कामांत

मी आहेंच असं सांगून ) ल. ब. कुलकर्णी व मामा खरे जणू आपल्या कार्यावर रुजूच झाले.

आश्रमाकरतां जागा व आस्थेचीं दोन माणसें यांना मिळतांच पुढच्या व्यवस्थेला ह्यांनीं सुरुवात केली. आश्रमाची कल्पना ज्या मंडळींना पटली त्यांनीं गांवांतूनच कांहीं रक्कम व कांहीं धान्य प्राथमिक खर्चाकरतां म्हणून दिलें. आश्रमामध्यें विद्यार्थी मिळविण्याच्या दृष्टीनेंहि बरींचशीं पत्रें ह्यांनीं बाहेरगांवीं रवाना केलीं. आश्रमाच्या बाबतींत ह्यांनीं बऱ्याच मंडळींचा म्हणजे श्री. मामासाहेब चितळे, पंढरपूर; श्री. आप्पासाहेब पटवर्धन, रत्नागिरी; जमनालालजी बजाज, वर्धा; धोत्रेजी, वर्धा; त्याचप्रमाणें पू. विनोबाजी व त्यांचे बंधु शिवाजीराव ह्यांचे विचार घेऊनच या नव्या प्रयोगाला सुरुवात केली. हा प्रयोग नव्या पद्धतीचा होता, तरी त्याचा पाया व धोरण जुन्याच राष्ट्रकार्यांतून निर्माण झालेलें होतें. दहा-बारा विद्यार्थ्यांकरितां सोय करून पहिल्या दिवशीं चार विद्यार्थी व तीन शिक्षक अशी सुरुवात पूर्वीच्या राष्ट्रीय शाळेच्या जागेंत झाली. त्या संस्थेचें नांव 'विनयमंदिर' ठेवण्यांत आलें ( १९३५-१९३६ ). या तीन-चार विद्यार्थ्यांमध्यें रा. मामा चितळे यांचीं दोन मुलें, नाशिकचे गुळवे यांचा मुलगा व ( वर उल्लेखिलेले ) मामा खरे यांचे छोटे छोटे दोन पुतणे, अशी सुरुवात आश्रमास झाली.

राष्ट्रीय शाळेची जागा भरपूर असल्यामुळें व तिचेंहि भाडें आश्रमावर पडूं नये म्हणून माझें म्हणजे आपटे गुरुजींचें बिऱ्हाड तिथें थाटण्यांत आलें. खाजगी घराचें भाडें म्हणून आम्ही जें भरीत असूं, तें विनयमंदिराच्या कामीं येत असे.

आश्रमाची योजना प्रत्यक्षांत आलेली कळतांच जमनलालजी बजाज, वर्धा, ह्यांनीं ह्यांच्या कार्याकरितां म्हणून ( आपटे गुरुजींना ) दरमहा पन्नास रुपये सुरू केले. एक वर्षभर ही मदत शेटजींच्याकडून येत असल्यामुळें ह्यांना अधिक विचार करण्यास सवड मिळाली. त्याचप्रमाणें ही वर्षांची मदत बंद होत आहे तोंच 'गांधी सेवा संघ' या संस्थेकडून दरमहा पन्नास रुपये वैयक्तिक ह्यांच्या खर्चासाठीं मंजूर झाले. जवळ जवळ आम्ही पुण्याला येईपर्यंत अव्याहत ह्यांना ही मदत मिळत होती.

विनयमंदिर सुरू झाल्यापासून हे, ल. ब. कुलकर्णी, मामा खरे व आश्रमांतील मुलें एकत्र स्वयंपाक करून जेवीत असत. इतकेंच नव्हे तर बहुतेक सर्व काळ एकमेकांच्या सान्निध्यांतच काढीत. मुलेंहि आतां वाढलीं होतीं. अभ्यासाचा आंखणी, सूतकताई सामान्य ज्ञान, या गोष्टींकरतांहि बराच वेळ देऊन व्यायाम, खेळ यांकडेहि ल. ब. कुलकर्णी विशेष लक्ष देत असत. विनयमंदिरांत एका बाजूला आश्रमीय जीवन असे व दुसऱ्या बाजूस गृहस्थाश्रमी वातावरण कोणासहि पाहण्यास मिळे. आमची नातलग मंडळी पाहुणी म्हणून चार दिवसांकरितां जरी आली तरी हे त्यांच्याशीं अघळ-पघळ गप्पा-गोष्टी करीत पण आश्रमीय जीवनक्रम थोडाहि बदलण्यास तयार नसत. त्यांच्या पद्धतीप्रमाणें आश्रमांत रसोई तयार होई व तेंच त्यांचें सर्वांचें जेवण ठरे. एक वेळ खिचडी, एक वेळ पोळी भाजी, एखादे वेळेस दही भाकरी, येवढाच आहार विद्यार्थी व हे तिन्ही शिक्षक घेत असत. सकाळीं मात्र नियमित दूध, व एक एक पोळी सर्वजण खात असत. या सर्व वागण्याचा उद्देश एकच वाटत असे, व तो म्हणजे जिव्हेचे चोजले न करतां राष्ट्राच्या कार्याला जास्तींत जास्त वेळ द्यावयाचा.

राष्ट्रीय शाळा झाली, ह्यांचे तुरुंग झाले व आतां आश्रमास सुरुवात झाली. पहिल्या दोन स्थितींतील सुखदुःखें वर येऊन गेलींच आहेत. आतां या आश्रमीय जीवनांत मला मनःक्लेश जे होत ते म्हणजे ह्यांनीं एक किंवा दोन पदार्थ खाऊन आपलें जीवन कंठावें व मी अगदीं समोर घर मांडून स्वयंपाक करून मुलांसह, आप्तइष्टांसह पाहुण्यांसह, नाहींतर अगदीं एकटें ताट मांडून ताटभर चारी ठाव जेवावें !

अशा रीतीनें विनयमंदिराची स्थापना होऊन त्याचे कार्यक्रम नित्य व नैमित्तिक सुरू झाले. त्या नैमित्तिक कार्यांतूनच येवलेकर जनतेशीं विनय-मंदिराचा संबंध सतत राहिला. तेथूनच राजकीय, सामाजिक कार्यांचें भांडवल गांवकऱ्यांना मिळत गेलें. सभा मधून मधून विनयमंदिरांत होतच असत व त्या सभेची देखरेख करण्याकरितां पोलीस त्या वेळीं हजरच असत व त्याचा रिपोर्ट सरकारकडे जातच असे.

विनयमंदिराची व्यवस्था रीतसर लागल्यानंतर शंभूच्या शिक्षणाबद्दल बोलण्याची संधि मी शोधीतच होतें. मागें वर्णन केल्याप्रमाणें शंभूचा अभ्यास

सुरू होता. शंभू घरांत नसतांनाच मी त्याच्या शिक्षणाच्या प्रश्नाला तोंड फोडूं बघत होतें, परंतु ह्यांनीं माझें समाधान होईल, असें कोणतचें उत्तर मला दिलें नाहीं. ते म्हणाले, "मी त्याचा विचार करीतच आहें. परंतु अद्याप निश्चित स्वरूपाची योजना माझ्यापुढें नाहीं. ती होतांच मी तुला सांगेन. शंभूचा अभ्यास व्यवस्थेशीर चालला आहे ना? परीक्षेचें पाहतां येईल." वगैरे सांगून त्या वेळेपुरती ती गोष्ट लांबणीवर पडत असे.

मी ह्यांना नेहमीं म्हणावयाची, "शंभूंत आणि तुमच्यामध्यें स्वभाव-धर्मांत कांहीं साम्य असलें तरी फरकहि आहे आणि तो तीव्र स्वरूपाचा कांहीं बाबतींत आहे हें मीं हेरलें आहे. त्याचा आपण पूर्ण विचार करा. आपल्या बोलण्यावरून आपलं थोडसं धोरण माझ्या लक्षांत येत आहे. आपली इथली राष्ट्रीय शाळा नसली तरी खामगांव, अकोला येथें राष्ट्रीय शाळा आहेत. तेथील शिक्षण शंभूनें पुरें करावें हेंच तुम्ही म्हणणार !

मी शंभूची आई आहें. त्याची सहज-प्रवृत्ति व आवडी-नावडी आपल्या-पेक्षां पुष्कळ निराळ्या आहेत. 'राष्ट्र' ही चीज व त्या राष्ट्राची गुलामगिरीहि त्याला समजते, पण ती त्याला बोचतबिचत कांहीं नाहीं आणि त्याचं वयहि ही गोष्ट समजण्याइतकें मोठें नाहीं. आपल्याला घोंगडीवर झोप येते व सुक्या भाकरीनेंहि पोट भरतें. इतकंच काय, तुम्हीं तर पुष्कळ वेळां मला सांगितलं आहे, 'मला एका स्त्रीशीं लग्न करायचें होतें.' तिच्या रूपगुणाचा विचार तुम्हीं कधींच केला नव्हता. तुमचें एक ठाम ध्येय बाळपणापासून ठरलेलें होतें व त्याला पूरक असेंच वागणें आतांपर्यंत झालें आहे.

परंतु शंभूची गोष्ट अशी मुळींच नाहीं. त्याला मऊ बिछाना आवडतो, इतकेंच नव्हे तर ओबडधोबड कपडा खुपतो व तो नापसंती व्यक्त करतो. या बारीक बारीक गोष्टी आपल्या नजरेंतून सुटल्या असतील असं मला वाटत नाहीं, पण मला भीति जी वाटते ती ही कीं, ह्या क्षुल्लक गोष्टी म्हणून आपण बाजूला सारून चि. शंभूवर कोणतीहि विचारसरणी लादली जाऊं नये अशी माझी फार इच्छा आहे."

अशा माझ्या सांगण्याचा ह्यांच्यावर कांहीं परिणाम होत होता असं नाहीं. पण ते मला म्हणत, "जी गोष्ट तुला शंभूबद्दल समजली आहे, त्याच्याहि

पेक्षां अधिक मला समजली आहे असं मी समजतों. तो बुद्धिवान् मुलगा आहे व त्याहीपेक्षां महत्त्वाकांक्षी अशी त्याच्या स्वभावाची घडण आहे. जवळ जवळ मायलेकरं एकाच स्वभावाचीं आहांत. तूं जशी माझ्या कामांत कधींच अडचण निर्माण करीत नाहींस, तसाच मी त्याच्याहि बाबतींत वागेन. परंतु माझं कर्तव्य एकच आहे तें म्हणजे सांगोपांग विचार करण्याची संधि त्याला द्यावयाची, परंतु साधकबाधक गोष्टी मला त्याच्यापुढें मांडल्याच पाहिजेत. ”

अशा होय–नाहींच्या उंबरठ्यावर मी व शंभू आंत-बाहेर खेपा घालीत होतों.

चि. शंभू हा ह्यांच्या आंवतीं-भोंवतीं सदैव वावरून आपली उच्च शिक्षणाची मनीषा त्यांच्या पुढें हलकें हलकें मांडीत होता. आमच्या तिघांच्या डोक्यांत शंभूचें पुढील शिक्षण कोणत्या धोरणानें चालवावयाचें हा प्रश्न सारखा घुमत होता. अशा वेळेला आतेश्वांचीं पत्रें, माझे दीर, माझे वडील यांचीं येत होतीं. “ येवल्याची राष्ट्रीय शाळा जर सुरू नाहीं तर तेथील हायस्कूलमध्यें शंभूला घालून त्याचा मार्ग मोकळा करून द्यावा. आपण स्वतंत्र आहांत वगैरे ” असा एक विचारांचा पाण्याचा घडा दिवसेंदिवस भरला जात होता.

## २५

एक दिवस धुळ्याचे वकील कै. काकासाहेब बरवे हे कांहीं कामानिमित्त येवल्यास आमच्या घरीं आले होते. काकांच्यापाशीं भावापेक्षांहि अधिक मोकळ्या मनानें मित्रत्वाच्या नात्यानें हे वागत असत. दोघेंहि दोघांच्या शब्दांचा आदर करून लोभ वृद्धिंगत करीत असत.

काकासाहेब आल्यावर शंभूच्या शिक्षणाचा प्रश्न चर्चेला आमच्यामध्यें निघाला. शंभूहि तेथें हजरच होता. ह्यांनीं मुख्य दोन गोष्टी आम्हांस सांगितल्या. त्या म्हणजे " सरकारी शिक्षण घेऊन आपल्याला हवें असलेलें स्वराज्य जवळ येईल असं मला मुळींच वाटत नाहीं. एकदा सरकारी शाळेंमध्यें तुम्ही पाय ठेवलांत म्हणजे तींच स्टेशनें तुम्हांला लागणार. राष्ट्र-भक्तीपेक्षां अधिक अधिक सुखलालसा निर्माण होईल आणि पुढें गेलेलें पाऊल मागें घेतां येणार नाहीं. चि. शंभूची इच्छा सरकारी शाळेंतून मॅट्रिक होऊन कॉलेज करून एम्. बी. बी. एस्. होण्याची आहे. वैद्यकीय धंद्याची शंभूच्या आईला आवड असल्यामुळें तिचा कल साहजिकच शंभूच्या इच्छेला अनुकूल आहे. मला जो कांहीं गांधी-सेवा-संघाकडून पैसा मिळतो तो माझ्या कामांतच खर्च होतो. शंभूची आई जो पैसा मिळवीत आहे ( बाळंतपणाचा धंदा करून ) तो अशा दीर्घ व महागऱ्या शिक्षणास अपुरा पडेल. आम्ही हा जगाविरहित मार्ग लोकांच्या दृष्टीनें पत्करला असल्यामुळें आम्हांस द्रव्य-साहाय्य कोण करणार ? तेव्हां या दोन-तीन गोष्टींचा शंभूनें व शंभूच्या आईनें विचार केल्यावर आपण पुढचा मार्ग ठरवूं. तीहि माझ्याइतकीच स्वाभिमानी व निस्पृह वृत्तीची आहे. तेव्हां अपमानाचा प्रसंग शंभू व त्याची आई केव्हांच पत्करणार नाहीं. मात्र फिरून एक वार मी हिला बजावीत आहे कीं, वाघिणीचें दूध प्यायल्यानंतर गाईच्या सुस्वभावी गोडव्याची अपेक्षा तिनें करूं नये व मग रडूंहि नये. "

ह्यांचे विचार ऐकल्यावर मी व शंभू आपण होऊन बोलण्यास सुरुवात करणें शक्यच नव्हतें. काकांचा मुलगा नुकताच मॅट्रिक पास झालेला होता. तेव्हां तोच धागा उचलून धरून त्यांनीं ह्यांच्या पुढें मांडलें, " गुरुजी, आपले विचार या मुलांना पचणें शक्य नाहीं. इकडेहि नाहीं आणि तिकडेहि नाहीं, असं होण्यापेक्षां त्यांच्या गतीप्रमाणें त्यांना जाऊं द्या. ठेंच लागली तरी त्यांचा ते मार्ग काढतील आणि वहिनींचा कलहि आपण म्हटल्याप्रमाणें तिकडेच झुकता आहे. आईचं पाहणं क्षणाक्षणांनीं आणि कणाकणांनीं सुरू असतं. आईला जी गोष्ट मुलाची लक्षांत येईल ती आपल्याला कळायला फार वेळ लागेल. होऊं द्या त्यांच्याच मनासारखं. येथें राष्ट्रीय शाळाहि नाहीं.

शंभूला दूर पाठवून कुठें काळजी दुणावतां ? यंदा त्याला सातवींत टाका, एकदा मॅट्रिक तर होऊं द्या, मग पुन्हा विचार करूं."

काकांच्या या बोलण्यावर चि. शंभूकडे पाहून हे म्हणाले, "शंभू, तुझा तूं विचार कर म्हणजे मी उद्या हायस्कूलमध्यें तुझं नांव घालतों."

मीं व शंभूनें नम्रपणानें पण ठाम असें सांगितलें, "आपलं मन मोडून आम्हांला कोणतीच गोष्ट करावयाची नाहीं. आपल्याला पटवून देऊन आपल्या सहकार्यानेंच पुढचा मार्ग आखावयाचा आहे."

ह्यांनीं ती बैठक मोडण्याच्या इराद्यानें एकच उत्तर दिलें तें म्हणजे, "शंभूच्या इच्छेला माझा नकार नाहीं. मला जें सांगावयाचें होतें तें मीं सांगितलें आहे, पण शंभूचें शिक्षण त्याच्या इच्छेप्रमाणें कोणतें का असेना आर्थिक मदत माझ्याकडून अगर मी शब्द टाकून मी मिळवणार नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, मी त्याला कोणतीच मदत करणार नाहीं. शंभूनें आपल्या पायावर उभे राहण्यास शिकून आपला मार्ग आक्रमावा व तो मात्र आईच्या सल्ल्यानें."

मीं घाईघाईनें विचारलें, "शंभूच्या नवीन शिक्षणक्रमांत आपला विरोध नाहीं असं आपण मनापासून म्हटलं तरच आम्हांला पुढील कष्ट वाटणार नाहींत." इतकें मी म्हणतें तों काकासाहेब बरवे हसून म्हणाले, "वहिनी, मीठ फार धुऊं नका." येथेंच आमचें सर्वांचें संभाषण थांबलें व काकासाहेब बरवे आमचे येथें असतांनाच शंभूचें नांव हायस्कूलमध्यें दाखल झालें.

येवल्यानें म्हणजे येवल्यांतील नागरिकांनीं आमच्या दोघांकरितां —ह्यांच्याकरतां व माझ्याकरतां—काय केलं याचं उत्तर आम्हीं जें म्हणावें तें त्यांनीं केलं. कांहीं वेळेला राष्ट्रप्रीतीचें—भक्तीचें तें काम असेल, कधीं कधीं समाजाकरितां कांहीं तरी केलेलं असेल, इतकेंच नव्हे तर आमची दोघांची वैयक्तिक आवड, हौस असेल ते सुद्धां लाड येवलेकरांनीं पुरे केले.

ह्यांचं माझं या विषयावर कधीं संभाषण निघाल्यास हे म्हणायचे कीं, "येवले-करांनीं माझ्याकरितां काय केलें तें लोकांना दाखविण्यासारखं कदाचित् नसेल, परंतु मी त्याची किंमत पुरेपुर करूं शकतों. माझ्या प्रत्येक गोष्टीचा पाया

येवल्यांतच घातला गेला. राजकारण, शिक्षण, ग्रामसेवा, साहित्य, वगैरे गोष्टींस मीं येवल्यांत आरंभ केला. नानातऱ्हेचे प्रयोग केले. येवलें सोडतांना हातांत दोन मुठी कमावलेलें धान्य घेऊन बाहेर पडलों. तेंच धान्य मला शेवटपर्यंत उपयोगी पडून जनतेमध्यें मोठ्या आत्मविश्वासानें वावरतां आलें व थोडें बहुत कामहि करतां आलें. "

हे पहिल्या पासूनच जे लिहूं लागले ते राष्ट्रभक्तीच्या ओढीनेंच. त्यायोगेंच प्रत्येक पुस्तकाची निर्मिती झालेली आहे. आपण लेखक व्हावें–आपलं नांव व्हांवं–लेखनावर आपणांस पैसा मिळावा या गोष्टीचा कधींच ह्यांनीं विचार केला नाहीं. विद्येची आवड, सर्व तऱ्हेचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची तीव्र इच्छा हाच ह्यांचा स्थायी भाव होता. आपण कांहीं लिहावं व दुसऱ्याला सांगावं असा हेतु नसतांनाहि एकच ध्येयवादानें–देश स्वतंत्र झाला पाहिजे येवढ्याच गोष्टीसाठीं–नाना तऱ्हेनें-नाना मिषानें-ह्यांनीं लेखणी हातीं धरली होती. १९४७ ते १९५६ सालापर्यंत पुण्यामध्यें वास्तव्य असतांना कोणीहि लेख मागण्यास आल्यास ते लिहून देत असत. लोकशिक्षण, महात्मा मासिक, व लोकशक्ति हें कॉंग्रेसचें पत्र आणि सकाळ ह्यामध्यें यांचे लेख येत असत. कांहीं पुस्तकांचें व ग्रंथांचें परीक्षण–निरीक्षण–वर्तमानपत्रकारांनीं सोपविल्यास तेंहि उत्तम प्रकारें पार पाडीत असत. पुण्याच्या वास्तव्यांत 'अलौकिक अभियोग', 'श्रीकृष्ण चरित्र' आणि 'राष्ट्रीय शाळेच्या शिक्षणाचा समग्र इतिहास' हीं मौल्यवान् पुस्तकें ह्यांनीं लिहून प्रसिद्ध केलीं.

राजकीय स्वास्थ्य मिळतांच तो स्वास्थ्याचा काळ लेखन करून–पुस्तकें प्रसिद्ध करून जनसेवेला ह्यांनीं लावला.

ह्यांना पुस्तकें छापणें, तीं स्वतः प्रकाशित करणें व त्याचा शेवटपर्यंत (विक्रीचा) व्यवहार करीत राहणें हें कधींच पसंत नव्हतें व ह्यांना तें जमलेंहि नसतें. ह्यांनीं पुस्तकें लिहिलीं, व एक एक प्रकाशक गांठून त्याकडे तीं पुस्तकें सुपूर्त केलीं व प्रकाशक देतील तो पैसा ह्यांनीं घेतला. त्यांतहि विद्यादानाचाच व्यापक विचार होता.

लहान गांवामध्यें कोणत्या तरी एखाद्या गोष्टीला भलतेंच महत्त्व आलेलें असतें. उदाहरणार्थ, पंचायत, लायब्ररी, एखादी शाळा, म्युनिसिपालिटी यांचेच

चालक, गांव उलथेंपालथें करूं शकतात. त्याप्रमाणें येवल्यांतील लायब्ररी व त्याचे सभासद ही मंडळी नव्या नव्या क्लृप्त्या लढवून आपापल्या पक्षाला जय मिळवीत. त्याप्रमाणें ह्यांचे विद्यार्थी जे आतां सन्मान्य नागरिक झाले होते त्यांच्यांत व इतर लोकांत झुंज लागली होती. लायब्ररीची वार्षिक निवडणूक होती. हे आपलें मत टाकून लवकरच घरीं आले होते. कोणतीहि नवीन गोष्ट गांवांत घडली तरी त्या बऱ्यावाईट गोष्टीचा ऊहापोह गांवांतील लोक विनयमंदिरांत येऊन ह्यांच्यापुढें जोरजोरानें करीत असत. ह्यांनीं ज्या बॉडीला मत दिलें होतें ती बॉडी बहुमतानें निवडून आली होती. ( अर्थात् कार्यकारी मंडळांत. ) या मंडळांत श्री. रामभाऊ दाणी वकील व श्री. काशिनाथ शेट गुजराथी हे ह्यांचे दोन विद्यार्थी निवडून आलेले होते. वाचनालयाच्या निवडणुकीचा हा निकाल जाहीर होतांच सर्व मंडळी–बरीचशी या पक्षाची मंडळी–आमच्याकडे आनंदानें बेहोष होऊन धावतच आली. यशस्वी वीरांच्या उसळलेल्या भावना ह्यांच्यापुढें जोरजोरांत मांडल्या जाऊं लागल्या. ह्यांचें मन येवढ्याशा लहान गोष्टींनीं उंचबळून येणारें नसतांनाहि त्या मंडळीच्या आनंदांत सहभागी होण्याकरितां घरांत केलेली खोबऱ्याची बर्फी मला हाका मारून ह्यांनीं सर्वांना द्यावयास लावली. या जयामुळें आम्हा दोघांनाहि बरें वाटलें होतें. कारण गांवांतील ह्यांच्याविरुद्ध असलेल्या उपद्व्यापी मंडळींचा तो पराजय होता. या आनंदाच्या वातावरणांतच आमची मंडळी खालीं उतरली, तर दुसऱ्या गल्लीमध्यें कांहीं मंडळी माडी चढून ही झालेली निवडणूक कशी हाणून पाडावयाची याचा विचार करूं लागली.

या मंडळींनीं हातपाय कितीहि आटपले तरी इलेक्शन रद्द करण्यास कायद्याची तोड, त्यांना सांपडेना. तेव्हां नवेंच प्रकरण विरुद्ध पक्षानें निर्माण केलें. पूर्वींचे वाचनालयाचे अध्यक्ष ह्यांच्याबद्दल ठराव करून नापसंती व्यक्त केली होती. नापसंती व्यक्त करणारी मंडळी अर्थात् नवीन आलेल्या बॉडीपैकीं होती. हाच ठरावाचा धागा हातीं धरून खऱ्याखोट्याचा विधिनिषेध न बाळगतां अब्रूनुकसानीची फिर्याद या उपद्व्यापी लोकांनीं निर्माण केली. ती फौजदारी फिर्याद—काशिनाथ शेट बालमुकुंद, रामभाऊ

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत

अनुक्रम ...................... विः ..................

दाणी वकील, व तिसरे आपटे गुरुजी ह्यांच्यावर होती. या उपद्व्यापी मंडळींनीं गांवांतील प्रसिद्ध फौजदारी वकील कै. नागपुरे यांना वकीलपत्र दिलेलें होतें. म्हणजे समर्थ माणसाच्या हातांत ( पैशानें व बुद्धीनें ) आपली कारवाई करण्याची संधि कायद्याच्या आधारावर वकीलपत्र देऊन या लोकांनीं त्यांना आणून दिली होती. आपटे व नागपुरेपार्टीचें कधींच जमणें शक्य नव्हतें.

ती फिर्याद वर्ष दीड वर्ष चालली होती. मला त्या फिर्यादीचीं अंगें-उपांगें फारशीं माहीत नाहींत, पण सार्वजनिक काम करणारे आम्ही दोघे ( मी व हे ) यांना बरबाद करण्याचा विचार या फिर्यादींत स्पष्टपणें होता. आमच्या पक्षाचे दोन आरोपी श्री. रामभाऊ दाणी व काशिनाथ शेट गुजराथी या दोन्ही व्यक्ति समर्थ अशाच होत्या. डावावर डाव कसे खेळावेत हें त्या दोघांना चांगल्या तऱ्हेनें माहीत होतें. पण ह्यांना राजकारणाशिवाय आपल्या आपल्यांत झुंज घेण्याची कधींच संवय नव्हती. काळेंबेरें करण्याची ह्यांना कधींच सवंय नसल्यामुळें ही कोर्टाची पायरी चढणें फार कठीण असेंच वाटलें. एकदा कोर्टाची पायरी चढली म्हणजे खऱ्याखोट्याचा विधिनिषेधच राहात नाहीं. तें ह्यांना आवडणें कधींच शक्य नव्हतें. ह्यांनीं स्पष्ट आमच्या वकिलांना सांगून टाकलें होतें ' जी सत्य गोष्ट असेल ती मी स्पष्टच सांगणार. कांहीं लपविणार नाहीं व कांहीं मालमसाला अधिकहि या केसमध्यें ओतणार नाहीं ' श्री. रामभाऊ दाणी व काशिनाथशेट या दोघांना पाहिजे तर काय शिकवावयाचें तें शिकवा व पढवावयाचें तें पढवा, पण मला त्याचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं.

अर्थाअर्थीं या केसमध्यें ह्यांचा कांहींहि संबंध नव्हता. पण त्या दिवसाचा निषेधाचा ठराव ह्यांनीं तयार करून दिला व तो ठराव लिहिण्याचा कागद काकूंनीं म्हणजे मीं राधाबाई आपटे यांनीं आपटे गुरुजींना आपल्याजवळचा काढून दिला असें हें असत्य प्रकरण रचलें गेलें व त्या तालावर दोन्हीहि पक्ष फिर्यादी व आरोपी नाचूं लागले.

आमच्या पक्षानें पुण्याचे श्री. भाऊसाहेब गडकरी वकील हे दिले होते. या फिर्यादीमध्यें माझी साक्ष काढल्याबद्दल आमची म्हणून जी मंडळी होती

व सामान्य नागरिकदेखील विरुद्ध पक्षावर फार चिडून गेली होती. ही हकीगत २५ वर्षांपूर्वीची आहे. त्या वेळेला संभावित स्त्रियांच्या साक्षी थोडक्या कारणावरून काढणें फार गौण समजत असत आणि वरील हकीगत अजिबात खोटी होती. आपटे गुरुजींनीं ठराव लिहून दिला नव्हता. त्यांनीं कागद माझ्याजवळ मागितलाहि नव्हता व मींहि दिला नव्हता. सगळीच विरुद्ध पक्षाची कारवाई होती. कोणत्या तरी कारणानें राधाबाईंना कोर्टांत आणावयाचें, आडवे उमे प्रश्न विचारावयाचे व आमच्या पक्षाला घाबरून सोडावयाचें हाच त्याच्या मागें हेतु होता. तो हाणून पाडण्याकरितां आमच्या पक्षांतील तरुण पिढी अस्तन्या वर सारून ही झुंज खेळावयाला तयार झाली. श्री. भाऊसाहेब गडकरी वकील यांनीं त्यांतून एक युक्ति काढली तेव्हां आमच्या सर्व मंडळींना फार आनंद झाला. ती युक्ति म्हणजे—भाऊसाहेब गडकरी ज्या बंगल्यावर उतरले होते तेथें आम्ही सर्व मंडळी जमलों. त्याच दिवशीं माझी साक्ष होती. त्याकरितां मला एक मसुदा तयार करून देण्यांत आला. तो म्हणजे श्री. नागपुरे वकिलांची पत्नी, मी बाळंतपणाला गेलें होतें तेथें हजर होती असें म्हणणें. एकदा नागपुरे वकिलांच्या बायकोचें नांव तुम्ही घेतलेत कीं, आम्हांस तिचीहि साक्ष सरळच काढतां येते. असें आमचे वकील सांगूं लागले. तेथें जमलेल्या सर्व मंडळींना ही गोष्ट फार आवडली. ‘आमच्या काकूंची साक्ष नागपुरे वकिलांनीं काढली तर आम्हींहि त्यांच्या बायकोची साक्ष काढली.’ हा या सगळ्यांच्या म्हणण्यांत जरी आनंद होता तरी तो आनंद असुरी होता.

मी बाळंतपणाला गेलें असेन तेथें श्री. नागपुरे वकिलांची पत्नी आलेली नसतांना तिचें नांव मी कसें घेणार ? मीं थोडा वेळ विचार केला. त्या बैठकींत त्या वेळेला हे नव्हते म्हणून त्यांचा सल्ला घेणें हेंहि मला त्या वेळेला शक्य नव्हतें. थोडा वेळ विचार करून मीं आमच्या वकिलांना स्पष्ट सांगितलें, “ मला हें असं खोटं बोलतांच येणार नाहीं, व आमच्या मनोवृत्तीला हें पटणारहि नाहीं; आणि हें पाहा वकीलसाहेब, नागपुरे वकिलांची बायको समाजांत न वावरणारी अशिक्षित स्त्री आहे. तिला बिचारीला कोर्टांत आणून आपणांस काय मिळणार ? माझी साक्ष त्यांनीं काढली आणि ती खोटी हें जसं चांगलं काम नाहीं, तसं नागपुरे वकिलांच्या पत्नीला उगीच

कोर्टांत आणून आपण प्रश्न विचारणं कधीं तरी चांगलं होईल का ? या दृष्टीनेंहि मला तसें म्हणतांच येणार नाहीं. जें व्हायचं असेल तें होईल" असें सांगून मी तडक तेथून निघालें ते माझ्या घरीं आलें.

हे शांत चित्तानें कांहींतरी पुस्तक वाचीत होते. मला पाहतांच त्यांनीं तर्क केले व म्हणाले, "तुझं कांहींतरीं बिघडलेलं दिसतंय्. काय झालं ?"

झालेली सर्व हकीगत मीं थोडक्यांत ह्यांना निवेदन केली. माझं कारणं त्यांना अगदीं बरोबर वाटलं व ते म्हणाले, "व्हायचं असेल तें होईल, आपण कांहीं नुसतीं माणसं नाहीं. आपल्या पाठीशीं कांहीं विचार आहेत. ते विचार आपल्या आचारांत उतरलेच पाहिजेत. शाब्बास !"

इतकं आमचं बोलणं होत आहे तोंच आमच्या बाजूची तरुण मंडळी धाड-धाड जिना चढून आली व कपाळाला हात लावून ह्यांच्यापुढें व माझ्यापुढें बसली. एका गृहस्थानें तर उद्वेगानें सांगितलें, "काकू, तुम्ही व आबा आतां वनांत जाऊन बसा. येथें सत्य-असत्याचा काय हो प्रश्न आहे ?" –वगैरे

दुपारीं दोन वाजतांच मला कोर्टांत हजर व्हावयाचें होतें. मी कोर्टांत गेल्यावर आमच्या वकिलांनीं ( श्री. गडकरी ) सरळ स्वरूपाचीं दोन-चार वाक्यें पढविलीं. मींहि त्याला होय म्हटलें. मी एका खोलीमध्यें एकटीच बसून होतें. पुढें होणाऱ्या गोष्टीबद्दल विचार करीत होते. 'राधाबाई आपटे' या पुकाराची वाट पाहात होतें. तों एक सद्गृहस्थ माझ्याकडे धावत धावत आले व त्यांनीं सांगितलें, "नागपुरे वकिलांनीं तुमची साक्ष आम्हांस द्यावयाचीं नाहीं असें सांगितलें." तेव्हां काकू तुम्ही घरीं जाऊं शकतां. हे शब्द उच्चारतांना तो मनुष्य इतका भारावला होता कीं, मोठ्या संकटांतून नव्हे तर कठीण पेंचप्रसंगांतून बाहेर पडल्याचा तो आवाज दाखवीत होता.

'सत्य संकल्पाचा दाता भगवान्' असं म्हणत मीं टांग्यांतून आमच्या घरीं आलें व कोर्टांतील सर्व हकीगत ह्यांना निवेदन केली.

या फिर्यादीच्या तारखांवर तारखा होत होत्या. दोन्ही पक्षाची मंडळी तारीख झाली म्हणजे पुढें आपण 'यंव करूं त्यंव करूं' अशा गप्पा मारीत

असत. आमच्या पक्षाच्या मंडळींनीं पुण्याचे सुप्रसिद्ध वकील कै. अण्णासाहेब भोपटकर यांना आतां वकीलपत्र दिलेलें होतें; ते, श्री. भाऊसाहेब गडकरी व शिवाय येवल्याचे कै. अण्णासाहेब जोशी वकील असे तिघेजण बचावाचें काम करीत होते. विरुद्ध बाजूच्या पक्षानेंहि नाशिकचे कोणीतरी वकील नागपुऱ्यांच्या मदतीला घेतलेले होते.

येवल्यासारख्या लहान गांवांत या फिर्यादीमुळें बरीच खळबळ उडालेली होती. मी माझ्या साक्षीमध्यें खोटें सांगण्याचें नाकारलें यामुळें गांवांतील वयस्कर मंडळी व सचोटीची मंडळी ह्यांच्याकडे आम्हां दोघांचें अभिनंदन करण्याकरितां येऊन गेली. म्हणजे एकंदरींत ह्यांची खरी किंमत येवल्यांतील मंडळींना अधिक स्पष्ट झाली.

मी ह्यांना पुष्कळ वेळां म्हणावयाची गांवामध्यें या फिर्यादीच्या प्रकरणीं येवढी गडबड सुरू असतांना तुम्ही अगदी शांत कसे ? ह्यांनीं माझी समजूत करून पटवून दिलें. तें असें—" कोणत्याहि प्रकारें या प्रकरणीं माझा हात नसल्यामुळें मी शांत असणें अगदीं स्वाभाविक आहे. मीं कोणताहि वकील दिलेला नाहीं. माझ्या एकट्यावर ही फिर्याद असती तर वकील मीं केव्हांच दिला नसता.

कदाचित् अशा वागणुकीमुळें डाव उलटाहि पडेल, पण माझी जी वर्तणूक ठाम ठरलेली आहे तिला हेलकावे न मिळतां मी स्थिरच असा राहीन; आणि तीच माझी सत्य बाजू होय. माझा असा अंदाज आहे. ज्या अर्थीं मीं कांहींच केलेलें नाहीं, त्या अर्थीं विशेष कांहीं होणार नाहीं. ही फिर्याद म्हणजे आयुष्यांत मिळणारें फार मोठें शिक्षण होय."

असें ह्यांनीं कितीहि समजून सांगितलें तरी मला आपलें नेहमीं वाटायचें ह्यांच्या काय थोड्या लोकांशीं ओळखी आहेत ? किती तरी श्रेष्ठ दर्जाचीं माणसं ह्यांना ओळखतात व मानतातहि. त्याचा उपयोग कांहीं तरी ह्यांनीं यावेळीं करून घ्यावा; पण ह्यांच्याजवळ तसं बोलण्याचं धैर्य मला होत नसे. ह्यांच्या शांततेवरून मला बोध होत नव्हता.

तारखा एकापाठोपाठ एक अशा तीन दिवस चालल्या होत्या. निकालाची तारीख आठ दिवसांनीं दिलेली होती. ज्या दिवशीं निकालाची तारीख

होती, त्या दिवशीं दुपारीं अकरा वाजतां जेवण झाल्याबरोबर ह्यांनीं एक छोटी सतरंजी, पांघरूण व दोन शर्ट येवढे कपडे वळकटीसारखे बांधून घेतले. कांहीं तरी दोन पुस्तकें ह्यांनीं आपल्या हातांत घेतलीं व मी जातों हं असें मला म्हणाले. ती वकळटी पाहून मीं आश्चर्यानें विचारलें, " गांवास कोणत्या जाणार ? " तेव्हां त्यांनीं गंभीरपणें मला सांगितलें, " झालेल्या तीन तारखांचा अंदाज काढतां आमची मंडळी बरीच गांगरली आहेत, त्यामुळें मी खंबीर मनाचा असलों तरी त्या दृष्टिकोणांतून मला माझी तयारी केलीच पाहिजे. फिर्यादीचा निकाल आमच्याविरुद्ध झाल्यास आम्हां तिघांनाहि सरळ तुरुंगांत जावें लागेल. परत घराकडे वळतांहि येणार नाहीं. तेव्हां मी आपली मनमाड-पर्यंतची तयारी करून घेतों. "

हे ह्यांचे शब्द ऐकतांच माझ्या डोळ्यांपुढें ब्रह्मांड उभें राहिलें. फिर्यादीचा निकाल विरुद्ध होईल व ह्यांना या प्रकरणीं तुरुंगांत जावें लागेल ही कल्पना मीं कधीं केलीहि नव्हती, त्यामुळें मला जबरदस्त धक्काच बसला. कांहीं असलें तरी त्यांच्या हातांतील वळकटी मीं ठेवून घेतली आणि सांगितलें, " आपलीं बुकें मात्र आपल्याबरोबर न्या. शिक्षा झालीच तर मला कोणीहि येऊन कळवीलच कीं ! तेव्हां आपले कपडे मी पाठवून देईन. "

गांवांतील ठराविक मंडळी नेहमीं ह्यांच्याबरोबर असत. ती ह्यांच्याबरोबर कोर्टांत गेली. त्या वेळेला मीं मात्र भयंकर काळजींत तो वेळ कंठला. मला काय करावें तें सुचेना. नुसत्याच आंत-बाहेर खेपा करीत होते. तोंच बरीचशी मंडळी मोठमोठ्यानें बोलत आमच्या घराकडे येत असलेली मीं खिडकींतून पाहिली. माझें त्या मंडळींच्या आवाजाकडे लक्ष नसून त्या गर्दीमध्यें मी दुरून ह्यांना न्याहाळीत होतें. पण हे मला दिसलेच नाहींत. मी निराशेनें खिडकींतून डोकावून डोकावून पाहूं लागलें तों बरीचशी मंडळी जिना चढून वर आली व " काकू पेढे, पेढे म्हणून ओरडूं लागली. "

पेढे या शब्दांतून यशाची कल्पना मला पूर्णांशानें आली व मी लगेच पेढे आणवून देवाला नेवैद्यहि दाखविला व मंडळीच्या हातावर एक एक पेढा ठेवला.

अशा तऱ्हेनें या महाभारताच्या युद्धपर्वाचा एकदाचा शेवट झाला व आम्ही निश्चित झालों. शंभू मॅट्रिकची परीक्षा १९३६ सालीं पास झाला. त्या वेळेचा मॅट्रिकचा रिझल्ट अत्यंत कडक असा लागला होता. शेंकडा २८ मुलेंच पास झालीं होतीं. चि. शंभू चांगल्या रीतीनें परीक्षा पास झाला याचा आनंद आमच्या सर्व आप्तेष्टांना विशेष असा झाला. एक म्हणजे शंभूच्या सुस्वभावामुळें नातलगांचें असलेलें प्रेम व ह्यांच्या राष्ट्रीय शिक्षणामुळें, वाटत असलेली भीति. 'आतां मुलगा मार्गाला लागला,' या भरंवशानें सर्व मंडळी निश्चित झाली. मला तर शंभूचें त्या वेळीं किती कौतुक वाटलें तें उघड करणें अशक्य आहे. शंभूच्या मनोवृत्तीचा विचार करून त्याला हवा असलेला मार्ग आम्हीं खुला करून दिला, पण तेथें जर पहिल्याच परीक्षेंत ठेंच लागली असती तर सर्वांची निराशा झाली असती. शंभूचीहि उमेद या यशानें वाढली व पुढच्या कॉलेजच्या गोष्टी आमच्या घरांत सुरू झाल्या. आमच्या या धकाधकीच्या संसारांत सांपत्तिक ओढाताणींत शिक्षणाची आबाळ झाली असतांनाहि शंभूनें ही परीक्षा पास होऊन पराक्रमच केला होता असें मला तरी खास त्या वेळीं वाटलें.

पुण्यांतील सर परशुराम भाऊ कॉलेजमध्यें शंभूला फ्रीशिप मिळून शंभू पुण्यास राहूं लागला. आम्ही दोघं स्वतंत्र वृत्तीचीं स्वाभिमानी माणसं असल्यामुळें आमच्या आर्थिक नाजूक परिस्थितीमध्यें आम्हांला मिंधेपणा नको, या विचारानें पुण्यांतील कोणत्याहि आप्त मंडळीकडे शंभूच्या राहण्याची व्यवस्था न करितां स्वतंत्र अशी एक खोली घेऊन आमच्या गोपाळ मोडकच्या समवेत शंभूनें कॉलेजच्या अभ्यासास सुरुवात केली. ज्या गोखल्यांच्या वाड्यांत ( लक्ष्मी रोडवर ) हीं दोन-तीन मुलें राहात होतीं, त्यांच्या अगदीं नजीक म्हणजे समोरच्या खोलींत त्या वेळेचे सर परशुरामभाऊ कॉलेजचे प्रिन्सिपाल श्री. सोनोपंत म्हणजे मामासाहेब दांडेकर हे राहात होते.

त्यांतल्या त्यांत राष्ट्रीय वृत्तीला पोषक असें एस्. पी. कॉलेज ह्यांनीं मान्य केलें, आणि मामासाहेब दांडेकर यांची देखरेख मुलांवर सतत राहणार यामुळें ह्यांचें मन निश्चित असें झालें. ह्यांना शंभूची व्यवस्था मान्य झाल्यामुळें मला एक प्रकारची निराळीच शांतता लाभत होती. आमच्या

दोघांचे कोणच्याहि प्रकारें खटके न होतां शंभूचीं हीं दोन वर्षे सरळ रीतीनें व त्याच्या अभ्यासु वृत्तीनें केव्हांच पार पडलीं. इंटर सायन्सच्या परीक्षेंत हाय सेकंड क्लासमधें शंभू आल्यामुळें मुंबईच्या मेडिकल कॉलेजमध्यें विना प्रयास अॅडमिशन मिळूं शकली.

पुण्यांस शंभू शिक्षण घेत असतांना दरमहा अवघे पंधरा रुपये आम्ही पाठवीत असूं. नऊ रुपये जेवणाचा डबा व सहा रुपये किरकोळ खर्चास, पण आतां मेडिकल कॉलेजचा जादा खर्च माझ्या मिळकतीला कसा परवडेल हा प्रश्न डोळ्यांपुढें उभा असतांनाच आम्ही रीत न करतांच गणिताचें उत्तर मनामध्यें मांडलें होतें व तें म्हणजे कांहीं झालें तरी शंभूचा हा कोर्स पुरा करून त्याला डॉक्टर करावयाचाच. हा आर्थिक प्रश्न निरनिराळ्या मार्गांनीं पुष्कळांच्या साहाय्यानेंच सुटला गेला आणि त्याचें सर्व श्रेय परमेश्वराची कृपा व ह्यांची आयुष्यांतील सात्त्विक तपश्चर्या हीच माझ्या व शंभूच्या या कामीं विशेष उपयोगी पडली.

महाराष्ट्रांत फैजपूर येथें कॉंग्रेसचें अधिवेशन १९३७ च्या डिसेंबरमध्यें झालें. अगदीं खेड्यामध्यें यशस्वी रीतीनें महात्माजींच्या मनाप्रमाणें व आकांक्षे-प्रमाणें तें पार पडलें. आतांपर्यंत भरणारीं कॉंग्रेस अधिवेशनें निरनिराळ्या प्रांतांतून शहरांतच होत असत. खेडुतांच्या जीवनाला या कॉंग्रेसच्या निमित्तानें योग्य प्रकारचें शिक्षण देणें व खेडुत जनता व शहरी माणसें यांमध्यें असलेली लोखंडी भिंत दूर करणें हाच मुख्य हेतु होता, तो साधला. फजीतपूर हें नांव या कॉंग्रेसला सार्थ होईल असा कांहीं मंडळींचा कयास होता, पण तें 'फत्तेपूर' झालें. त्यामुळें महाराष्ट्रांतील जनतेचा उत्साह उसळून उसळून अगदीं ओसंडूं लागला होता. त्या फैजपूर कॉंग्रसवर ह्यांनीं केलेली एक कविता येथें दिल्यास त्या वेळच्या यशस्वी कॉंग्रेस घडवून आणणाऱ्या मंडळींचें गुणगान यथार्थ होईल. मीं जरी तें करण्याचा प्रयत्न केला, तरी त्यांतील जिव्हाळा ह्यांच्यासारखा कसा असणार ? 'देशभक्तांचा पोवाडा देशभक्तांनींच गावा' हेंच खरें, म्हणून ह्यांची कविताच खालीं देत आहें.

फैजपूर कॉंग्रेसच्या वेळीं ह्यांनीं केलेली कविता.

**भगिरथ यत्नें फैजपुराला कॉंग्रेस गंगा येणार ।**
**अपूर्व ऐशी पर्वणी टाकुन कोण गृहीं हो बसणार ॥ १ ॥**

काँग्रेससंगें स्नान कराया गरीब श्रीमंतांनो या ।
सगरपुत्रसम पुनरपि जीवन उत्साहाचें मिळवाया ॥ २ ॥

राष्ट्रोद्धारक समाजतारक विचार-संगम होणार ।
फैजपुराला मान क्षेत्रिंचा प्रयागसम तो मिळणार ॥ ३ ॥

तडी तापसी यति संन्यासी महंत साधू एकत्र ।
पाहुनि ऐकुनि वाचा त्यांची विचार पळतिल अपवित्र ॥ ४ ॥

गांधि अहिंसा-शुभ्रपताका हातीं घेउन येणार ।
आदरपूर्वक प्रतिपक्षाची ग्रीवा तेव्हां लवणार ॥ ५ ॥

अपूर्व ऐसा थोर महात्मा शत्रूंनींहीं वंदावा ।
दर्शन त्याचें करावयाला विलंब आपला नच व्हावा ? ॥ ६ ॥

घणाखालती ठेवा किंवा राष्ट्रसभेच्या मुकुटांत ।
सत्त्व राखुनी तेज फेकितो पहा जवाहर लोकांत ॥ ७ ॥

वार्धक्यानें दंत गळाले परी गर्जना भयंकरा ।
देशशत्रुंना वाटे ज्याची गंगाधर तो पहा जरा ॥ ८ ॥

बंधू पटवर्धना पाहुनी, लवांकुशाचा पराक्रम ।
आठवतो का ? राहिल कैसें नैराश्याचें अतां तम ॥ ९ ॥

सरोजिनी ती सरोज–युवती उधळित येइल कीर्तीला ।
वीरावाणी बोलुनि स्फूर्ती देई वीरा लढण्याला ॥ १० ॥

महाराष्ट्राचें गगन कडाडे अरि-हृदयाचें विदारण ।
चपलाभूची पहा यशोदा तळपुनी दावी जना गुण ॥ ११ ॥

प्रेमाबाई मर्दानी जी झांशीवाली अवतरली ।
अपुल्या सैनिक स्त्रिया घेउनी वीररसें जणूं संचरली ॥ १२ ॥

“ आप्पा, काका, दादा, बापू, नाना, रंगी खरे खडे ।
हिंद देविच्या मुगुटामाजी तेज फेकिती चोहिकडे ॥ १३ ॥

स्वातंत्र्याचें यजन चालवी शंकर दीक्षित होवोनी।
हलाहलासम निंदा प्राशी वीरावाणी तोलोनी ॥ १४ ॥

कपिलाषष्ठी आलि उठा हो विचार गंगा प्राशाया।
विद्युद्वेगें धावा जन हो कलीकाल हा साराया ॥ १५ ॥

स्वयंसेविकांची मागणी दे. भ. शंकरराव देव यांनीं त्या वेळेला केली होती. फैजपूर कॉंग्रेसच्या अधिवेशनाकरितां स्वयंसेविका पुष्कळ ठिकाणांहून मागविण्यांत आल्या होत्या. किती स्त्रिया हौसेनें या कामांत भाग घेतील, याचा अंदाज कार्यकर्त्यांना नसल्यामुळें मुद्दाम पत्रें पाठवून स्वयंसेविकांची मागणी या कॉंग्रेसच्या लोकांनीं आपआपल्या परीचित व हक्काच्या मंडळींकडे केलेली होती. कॉंग्रेस स्त्री–संघटक म्हणून श्री. प्रेमाबाई कंटक याहि येवल्यास येऊन स्वयंसेविकाची मागणी करून गेलेल्या होत्या. त्यामुळें माझ्यावर येवल्यांतून दहा-बारा स्वयंसेविका नेण्याची जबाबदारी येऊन पडली.

माझी स्वयंसेविकांची जुळवाजुळव झालेली होती. सर्व पेशाच्या, सर्व दर्जाच्या, व सर्व जातींच्या अशी ही मांडणी मुद्दाम केलेली होती. माझी मुलगी कमा हिला सांभाळणाऱ्या बाईच्या अंगावर सर्वस्वीं सोपवून आम्हीं सर्वांनीं जाणें हें माझ्या जिवावर येतच होतें. त्यांत ह्यांना ताप आला. काय करावें कळेना. ह्यांनीं विश्वासानें सांगितलें, " तूं बिलकुल काळजी करूं नकोस. माझा ताप परवाला निश्चित नार्मल होईल. तेरवां संध्याकाळीं आपणांस गेलेंच पाहिजे. त्या वेळेपर्यंत मी चांगलाच बरा होईन. नुसती अशक्तता शिल्लक राहील, ती आपण बघून घेऊं. "

खरोखर ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें एक दिवसानें ह्यांचा ताप नॉर्मल झाला. व हे, मी व शंभू आणि पुण्याहून आलेला गोपाळ मोडक अशी फैजपूरला जाण्याकरता गाडींत बसलों. मनाच्या जोराचा शरीरावर परिणाम होतो, ह्याची प्रचीति ह्यांच्या नॉर्मल तापामुळें लगेचच मला आली. त्यांच्या सहकार्यांनीं त्यांना काम बेताचें देऊन एका तंबूत बसवून ठेवलें होतें. आलेल्या लोकांची नोंद व प्रेक्षक प्रतिनिधींची फी वसूल करणें या कामावर ह्यांची नेमणूक केलेली होती, असें कळलें.

ह्यांचा ताप नॉर्मल आला त्या दिवशीं माझेंच जाणें फैजपूरला होईल किंवा नाहीं अशी एक अडचण निर्माण झाली. ती म्हणजे 'स्वयंसेविका आणूं नयेत, फक्त आपटे मंडळींनीं अवश्य यावें असें पत्र जबाबदार व्यक्तींकडून आल्यामुळें मी फार चिडलें होतें. मी तयार केलेल्या स्वयंसेविका कितीतरी आनंदांत व उत्साहांत होत्या. त्यांना ' येऊं नका ' हें आत्यत्या वेळीं सांगणें मला शक्यच नव्हतें, तेव्हां ह्यांना मीं स्पष्ट शब्दांत सांगितलें " आलों तर आम्ही सगळ्या येणार, " नाहींतर मी येणारच नाहीं." सर्वांना भाडें खर्चून नेण्याइतकी अनुकूल सांपत्तिक परिस्थिति माझी नव्हती. मी येत नाहीं हें शंकरराव देवांना कळतांच त्यांची तारच आली, " स्वयंसेविकांसह या म्हणून." तेव्हां माझा आनंद गगनांत मावेना. ही किमया कशी घडली तर आपटे गुरुजींची पत्नी येणार नाहीं हें कुणालाच तेथील जबाबदार मंडळींना बरें वाटलें नसावें.

फैजपूर कॉंग्रेसचा सोहळा अवर्णनीय असाच झाला. महाराष्ट्रीयन कॉंग्रेस-जनांना तो सोहळा अपूर्व असाच वाटला. पूज्य महात्माजींचीं व्याख्यानें व तत्समान कितीक थोर व्यक्तींचीं व्याख्यानें नित्य त्या दिवसांत होत असत, पण मला त्याचा लाभ फारसा घेतां आला नाहीं. मी नर्स असल्यामुळें हॉस्पिटलच्या नाईट ड्यूटीचें काम माझ्याकडे आलें होतें.

भावनेच्या भरामध्यें श्री. सौ. कमलाबाई वाडेकर या दोन महिन्यांच्या बाळंतिणीला देखील मीं फैजपूरला स्वयंसेविका म्हणून आणली होती व त्याहि आल्या होत्या. झालं म्हणून सर्व ठीक झालं, नाहींतर दोघींच्या पदरीं मूर्ख-पणाच आला असता. डिसेंबर महिना व फैजपूर कॉंग्रेसच्या वेळेला पडलेली भयंकर थंडी ही त्या वेळच्या लोकांच्या स्मरणांतून कधींहि जाणार नाहीं. मी हॉस्पिटलमध्यें असल्यामुळें हॉट वॉटर बॅग भरून कमलाबाईंना सारख्या पाठवीत असे. त्यामुळें चिमकुल्या चारूचें रक्षण चांगल्या प्रकारें झालें.

येवल्यांतून स्वयंसेविका मीं आणल्या तशा सुखरूप पोचविल्या, त्यामुळें मला समाधान वाटलें.

फैजपूर कॉंग्रेस संपल्यानंतर ह्यांना व विनयमंदिराच्या दोघां शिक्षकांना नवीनच प्रश्न हाताळावा लागला व त्याच्या पाठीमागें ही मंडळी लागली. तो

प्रश्न म्हणजे हें राष्ट्रीय चळवळीचें लोण खेड्यांत नेलें पाहिजे व तेथील जनता जागृत ठेवली पाहिजे, हेंच आजचें कर्तव्य आहे. या विचारानें विनयमंदिरामध्यें येवल्यास असलेला आश्रम बदलून कोठें तरी खेड्यांत न्यावा असें सर्वांना वाटूं लागलें.

विनयमंदिराला ठरलेली वर्षाची मदत जमनालाल शेटजींनीं दिली. त्यानंतरचा हा प्रश्न आहे. नंतर ती बंद झाली. भिक्षा ही कामधेनु या मंडळींनीं सोडलेली नव्हती व येवल्यांतील जनता धान्याच्या रूपानें साहाय्य देत असल्यामुळेंच व गांधी–सेवा–संघाकडून ह्यांना मिळणाऱ्या रकमेवर या १०-१२ मंडळींची उपजीविका चाललेली होती.

कपडा फाटल्यावर शिवला तरी किती ठिकाणीं शिवणार ! तो अखेर टाकावाच लागतो, त्याप्रमाणें येवल्यांतील आश्रम खेड्यांत नेला असतांना आर्थिक विवंचना बरीचशी कमी होईल, कारण खेड्यांतील शेतकरी उदार मनानें आपल्या गांवाकरतां म्हणून का होईना आश्रमास साहाय्य करतील या भावनेनें येवलें तालुक्यांतील बरींचशीं या खेडीं दोन तीन मंडळींनीं पाहिलीं; व नंतर येवल्यापासून जवळच असलेल्या 'चिचोंडी' गांवीं हा आश्रम हलविण्यांत आला. त्याकरितां श्री. मामा खरे हे तेथें कायम राहावयाचे ठरले आणि हे व दुसरे शिक्षक ल. ब. कुलकर्णी हे चिचोंडीस जाऊन येऊन असत.

चिचोंडींतील एक गृहस्थ पैशाच्या अडचणींत असल्यामुळें हवे असलेले माझें घर मी आपणांस देतों, पण माझी २५० रुपयांची गरज आतांच्या आतां दोन दिवसांत भागवा असं टुमणं–बोलणं ह्यांच्याजवळ त्यांनीं सुरू ठेवलें. त्या वेळेला २५० रु. देऊन आम्ही घर गहाण घेणें ही फार मोठी श्रीमंतीची गोष्ट आम्हास वाटत होती. चिचोंडीच्या श्री. धोंडोपंतांनीं अशी एक अट आणखी घातली होती कीं, हा घराचा व्यवहार मी आपटे गुरुजींशींच फक्त करीन. संस्था वगैरे मी कांहींहि जाणत नाहीं.

ठरल्याप्रमाणें चिचोंडीच्या घराचें गहाणखत झालें व हे मला गमतीनें म्हणाले, "चिचोंडीच्या घरांत मालकीणबाई कधीं प्रवेश करणार ?" स्वतःचं कुठं तरी घर असावं ही माझी तीव्र इच्छा गरिबीच्या

परिस्थितींतहि ह्यांना माहीत होती. ती ह्यांना त्या वेळीं पुरवणें कधींच शक्य नव्हतें. पण गहाण घेतलेल्या घराची मालकीण मला बनवून माझा आनंद अजमावण्याचा प्रयत्न ह्यांनीं त्या दिवशीं केला.

गहाणखत रजिष्टर झाल्यावर चिचोंडीच्या नव्या घरामध्यें आश्रमाची मंडळी म्हणजे ७-८ मुलें व ३ शिक्षक अशा मंडळींनीं तेथें खेडयांतील सेवेला सुरुवात केली. गांवाची सफाई ही मंडळी करूं लागतांच, थोडी फार शिक्षण घेतलेली जी मंडळी ( अर्थात् तरुण मुलें ) होती, ती मंडळी या कामांत शिक्षकांना मदत करूं लागली. रात्रींच्या वेळीं कांहीं मंडळी जमून वर्तमानपत्राचें वाचन व राजकीय घडामोडी सांगण्यांत येऊं लागल्या, आणि खास चिचोंडी गांवाकरितां लहान मुलांची प्राथमिक शाळा आमच्या आश्रमांतच सुरू करतां आली. या कामाकरितां नवीन शिक्षकाची जरूर होती तीहि गरज तेथें एक नवीन आलेले गृहस्थ रा. गोविंदराव कुलकर्णी ह्यांनीं भागविली व तें काम हवें तसें बिनबोभाट सुरू झालें. अर्थात् त्यांना आश्रमाकडून वेतन द्यावेंच लागे, पण ते सुद्धां या मंडळींच्या आश्रमीय जीवनांत सामील झाले. ह्यांचीं येवल्यांतील कामें कोणत्याहि तऱ्हेनें स्थगित झालेलीं नव्हतीं. आतां नवीनच उद्योग ह्यांच्या व गांवांतील कांहीं मंडळींच्या डोक्यांत आला होता. तो म्हणजे म्युनिसिपल इलेक्शन लढविणें. म्युनिसिपालिटीच्या २० जागा होत्या. त्या सर्व जागांकरतां मुसलमान मंडळी सोडून बारा जागांकरितां कॉंग्रेसचे उमेदवार उभे केलेले होते. या इलेक्शनच्या यशप्राप्तीकरितां पुष्कळच मेहनत ह्यांना व ह्यांच्या सहकारी मंडळींना पडली. बारांपैकीं ११ जागा कॉंग्रेसनें जिंकिल्या व म्युनिसिपल प्रेसिडेंटहि कॉंग्रेस पक्षाचे सद्गृहस्थ झाले. त्या दिवशीं ह्यांना अतिशयच समाधान व आनंद झाला. कारण अशा कितीतरी गोष्टी थोडयाशा सत्तेच्या अभावीं सामाजिक व राजकीय अडून पडत असत, तन-मनें प्रयत्न करूनहि यश लगोलग हातीं येत नसे. ती गोष्ट आतां सुलभ होईल, या विचारानें कामाची नवी उमेद ह्यांना आली होती.

या इलेक्शनच्या आधीं एकदा मी ह्यांच्याशीं विचारविनिमय करीत असतांना मीं ह्यांना विनंती केली कीं, " तुम्ही या इलेक्शनकरतां कां उभे राहात नाहीं. तुम्ही खास निवडून याल व प्रेसिडेंटहि होऊं शकाल. तर हा

मोका कां सोडतां ?" मला नेहमीं वाटत असें आमच्या क्षेत्रांत, राजकीय कामांत ह्यांनीं मानाची व वैभवाची जागा कां घेऊं नये ? पण ह्यांनीं ती गोष्ट केव्हांच ऐकिली नाहीं. ह्यांनीं पुन्हा एकदा मला निक्षून सांगितलें, "हें स्थानिक स्वराज्य झालें, पण आम्हांला हवें असलेलें स्वराज्य जरी मिळालें तरी मी कोणत्याहि अशा अधिकाराच्या व मानाच्या जागेकरतां खटपट करणार नाहीं. माझा तो पिंडच नाहीं. मी दूर राहूनच माझ्या शिक्षकी बाण्यांतून जें ज्ञान दुसऱ्याला देतां येईल तेंच देणार."

खरोखरच हाताशीं सत्ता आणि अधिकार प्राप्त होण्याची संधि त्या वेळीं तरी ह्यांना येवल्यांत खास होती. पण ह्यांनीं कधींच तशा गोष्टीची अभिलाषा धरली नाहीं. हे स्वतः होऊन कधींच कीर्तीच्या व वैभवाच्या मागें लागले नाहींत.

ह्यांच्या सात्त्विक वागण्याची कीर्ति ह्यांच्या हयातींत व पश्चात्‌हि आजतागायत कान भरून मी ऐकत आहें.

आणि वैभव–तेंहि मला एक एक वेळेला पुरेपूर मिळालेलें आहे. स्वराज्य आलें. कै. बाळासाहेब खेर मुख्य प्रधान झाले व माझ्या घरीं जेवून गेले. मुनशींच्यासारखे कर्तबगार गृहमंत्री तेहि माझ्या घरीं पाहुणचार घेऊन घरोब्यानें गप्पागोष्टी करून सुखासमाधानानें बाहेर जात असत. तेव्हां ह्यांनीं मला विचारावें, "हें वैभव तुझ्या अंगीं लागत आहे ना ? मग झालें तर. माणूस प्रिय नसून त्याचें काम जगांत प्रिय असतें. तें काम सचोटीनें व निःस्वार्थीपणानें आपण केल्यास आपोआप महान् महान् मंडळींचा सहवास मिळाल्यावांचून राहात नाहीं. तेंच भाग्य खरें व तोच आनंद खरा. खुर्चीचें भाग्य यापुढें क्षणभंगुर होय."

स्वराज्य मिळाल्यानंतर मात्र अशी नवीनवी राष्ट्रांतील अधिकारी मंडळी माझ्या घरीं येऊं जाऊं लागली, तेव्हां कुठें माझ्या आप्तेष्टांना नवल वाटूं लागलें. माझ्या आईनेंच मला एकदा विचारलें, "तुझ्या येथें मुख्य प्रधान खेर साहेब आले व तुझ्या घरीं सामान्य माणसासारखे जेवले !" याचा अभिमान व कौतुक आईला त्या वेळेपासून वाटूं लागलें.

म्युनिसिपल इलेक्शन काँग्रेसनें जिंकल्यानंतर अतिशय मोठा समारंभ ह्यांनीं घडवून आणला. सर्व म्युनिसिपालिटीचा चार्ज रीतसर ऑफिसमध्यें घेण्यापूर्वीं या समारंभाची नांदी 'श्रीकृष्ण टॉकीज' मध्यें झाली. पुण्याहून महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव सर्व म्युनिसिपल सभासदांना मार्गदर्शन करण्याकरितां आले होते. नाशिकहूनहि श्री. गोविंदराव देशपांड्याच्यासारखे वक्ते त्या समारंभास हजर होते. ह्यांनीं केलेलें काम व पुढें म्युनिसिपालिटींत करावयाच्या कामाचा आराखडा सर्व सभासदांना व नागरिकांना समजून सांगितल्यावर सर्व जनता समाधान व्यक्त करून आतां म्युनिसिपालिटीचे सभासद कसकशीं कामें करतात याकडे कांटेकोर नजरेनें बघूं लागली.

समारंभ झाला हा गोडच झाला, पण त्यानंतर या सभासद मंडळींच्या-कडून कामें करून घेणें किती कठीण होतें, याची कल्पना तशा तऱ्हेनें काम करून घेणारांसच येईल. त्यांतच माझी नामिनेट मेंबर म्हणून सरकारतर्फें म्युनिसिपालिटींत नेमणूक झाली. त्यामुळें आमचा वनिता संघ व गांवांतील माझ्या मैत्रिणी विशेष उल्हसित झाल्या. मलाहि त्या वेळेला खरोखर काम करण्याची संधि मिळाली व एक मानाची जागा मिळाली असेंहि वाटल्या-वांचून राहिलें नाहीं.

लोकोपयोगी किरकोळ कामें—भंगी वस्तीमध्यें साक्षरतेचा क्लास, म्युनि-सिपल दवाखान्याकडेहि विशेष तऱ्हेनें लक्ष घालून शक्य तेवढी आऊट डोअर पेशंट्सची गैरसोय होऊं नये अशा तऱ्हेचीं कामें आरोग्य खात्याचे चेअरमन ह्यांच्याकडून करून घेतां आलीं. पर्यायानें माझ्याकडे स्कूल बोर्ड चेअरमनचें काम आलें. ही जागा स्वीकारतांना मला अतिशय संकोच वाटूं लागला, पण ह्यांनीं त्या वेळेला मला दुजोरा दिला. "काम करूनच कामाची माहिती, व माणसाची काम करण्याची कुवत वाढते. तुला सार्वजनिक काम करण्याची आवड आहेना ? मग असं मागं सरण्याचं कांहींच कारण नाहीं. आणि हायस्कूलचे हेडमास्तर कुळकर्णी हे किती सज्जन व सरळ गृहस्थ आहेत हें तुला माहीतच आहे. तेव्हां चेअरमनचें काम अवश्य करून दाखव."

मलाहि उमेद वाटूं लागली व मीं तें काम वर्षभर माझ्या पद्धतीप्रमाणें केलेंहि. हायस्कूलचा स्टॉफ सर्वच मंडळी सुस्वभावी असल्यामुळें मला कधीं

अनखर असें वाटलेंच नाहीं. अडचणीच्या वेळीं आमच्या कॉंग्रेस पार्टीचे व ह्यांचें मार्गदर्शन मला असेच.

सुविद्य दुर्गाबाई देशमुख ज्याप्रमाणें म्हणतात कीं, स्थानिक स्वराज्य संस्थेची पुष्कळशीं कामें स्त्रियांकडे दिलीं गेलीं तर अधिक चांगलीं होतील. माझा त्या वेळचा अनुभव असाच आहे. मी नाशिकच्या जिल्हा लोकल बोर्डांतहि त्या वेळेला मेंबर होतें. मी एकटीच स्त्री–सभासद जरी या दोन्ही संस्थांमध्यें असलें तरी त्याचा फार मोठा उपयोग होत असे. आमच्या सभासदांच्या बेलगामी वागण्याला एक प्रकारें लगाम पडे व कामें लवकर उरकलीं जात. या माझ्या सभासद–बंधूंना एक भगिनी म्हणून माझ्याविषयीं आदर होताच, पण येथील प्रत्येक गोष्ट आपटे गुरुजींच्या कानावर जाणार या कल्पनेनें सर्वांची काम करण्याची पद्धति योग्य अशीच होती.

लांचलुचपत, वशिला हा आपटे गुरुजींच्या राज्यांत कधीं खपणें शक्यहि नव्हतें व कॉंग्रेस पार्टीचें या विषयावर विशेष कटाक्षानें पाहणें असे त्यामुळें पुष्कळच गोष्टी सुकर झाल्या होत्या. या म्युनिसिपालिटीच्या कॉंग्रेस राजवटींत दोन गोष्टी महत्त्वाच्या झाल्या. त्या म्हणजे कॉंग्रेसचें राष्ट्रीय निशाण म्युनिसिपालिटीवर समारंभ प्रसंगीं फडकूं लागलें. मेजॉरिटीच्या जोरावरच ही गोष्ट करून घेता आली. विरोधी पार्टीमध्यें असलेले मुललमान बंधु व कांहीं विरोधी पक्षाचे २।३ सभासद ह्यांनीं एकत्र होऊन कॉंग्रेसच्या तत्त्वाला विरोध करण्यासा चंग बांधला होता, पण फारसें यश या बाबतींत त्या मंडळींना मिळालें नाहीं.

इरिगेशन खात्याचे मंत्री श्री. नूरीसाहेब हे येवल्यांत आले असतांना आमच्याच घरीं त्यांचें वास्तव्य होतें. नूरीसाहेबांना भेटण्याकरितां, म्युनिसि-पालिटींत कॉंग्रेस सभासदांविरुद्ध असलेले कांहीं मुसलमान सभासद तक्रारी घेऊन आले. त्यांची सर्व चर्चा मी ऐकूं शकलें नाहीं, परंतु नूरीसाहेबांनीं त्या बैठकींत स्पष्ट सांगितलें, " आपटेसाहेबांसारखे कार्यदक्ष पुढारी म्यु० कॉंग्रेस पार्टीवर देखरेख करीत असतांना कधींहि कोणावर अन्याय होणें शक्यच नाहीं."

अशा उत्तरामुळें जो परिणाम व्हावयाचा तोच जनतेवर झाला. अशा पुष्कळ गमती चालावयाच्या. नवं कांहीं गांवांत मीं ऐकलं, ( कॉंग्रेस पार्टीच्या

म्यु. कामाबद्दल ) कीं मी अस्वस्थ व्हावयाची व ह्यांनाहि स्वस्थ राहूं द्यावयाची नाहीं. तेव्हां हे म्हणायचे, " इतकीं खातीं आणि इतकीं माणसें, तुम्ही काम करीत असतांना लहान सहान गोष्टी अप्रिय व्हावयाच्याच."

दुसरी एक गोष्ट महत्त्वाची आमच्या काँग्रेस सभासदांनीं जी केली ती म्हणजे येवल्यांतील पाणवठे हरिजनांना मोकळे केले ही होय.

येवल्यामध्यें मुख्यतः पिण्याच्या पाण्याची सोय जागजागच्या हौदांवर केलेली आहे. त्या हौदांतूनच आमजनता पाणी भरते. घरोघर विहिरी असल्या तरी त्या खाऱ्या पाण्याच्या आहेत. या पाण्याच्या हौदावर साळी,कोष्टी,ब्राह्मण, मराठे व मुसलमान ही मंडळी पाणी भरत असत, पण दलित वर्गांकरितां ( अस्पृश्य समाजाकरितां ) मात्र हे पाणवठे मोकळे नव्हते. हरिजन वस्तीमध्यें एक स्वतंत्र हौद बांधून दिलेला होता, पण इतर हौदांवर हरिजनांना मज्जाव होता, त्यामुळें त्या बाजूच्या अस्पृश्य स्त्रिया पाण्यासाठीं हौदाच्या कडेला बसावयाच्या व पाण्याची मागणी करीत असतां स्पृश्यांच्या मर्जीत आलें तर त्या भगिनींना पाणी लवकर मिळे, नाहींतर तास तास थांबावेंहि लागे. मुसलमानांनीं हौदावर पाणी भरलेलें ब्राह्मणाच्या खांद्याला खांदा लावून चालत असे, पण अस्पृश्यांचा विटाळ सर्व हिंदु जमातीला होई याचें त्या वेळीं मला मोठें नवल वाटे.

काँग्रेसचें ध्येय अस्पृशता नष्ट करण्याचें असल्यामुळें आम्हांला म्यु. काँग्रेस पार्टीला तें पुष्टिदायकच होतें, म्हणून त्या ध्येयानुरूप आम्ही सर्व सभासदांनीं विचार करून ह्यांच्या ( आपटेगुरुजींच्या) आदेशानुसार म्यु. हद्दींतील सर्व पाणवठे अस्पृश्यांना खुले केले. हा ठराव मंजूर होतांना विरोधी पार्टीनें बरीच गडबड केली, पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

हें चांगल्या तऱ्हेचें समतेचें कार्य आम्हीं सभासदांनीं केलें, पण त्याचे परिणाम गांवकऱ्यांनीं आम्हाला थोडे फार भोगावयास लावलेच. पहिली गोष्ट म्हणजे विनयमंदिराची भिक्षा गांवांतील सधन व सनातनी मंडळींनीं अजिबात बंद केली. प्रत्यक्ष ह्यांच्याशीं येऊन बोलण्याची छाती

कुणाची झाली नाहीं, पण ह्यांच्या तत्त्वाबद्दल असमाधानी कुचकुच कांहीं ठिकाणीं ऐकूं येऊं लागली. अशी गोष्टीला घाबरणारी अथवा भीक घालण्या-जोगी ह्यांची मनोवृत्ति कधींच नव्हती. आलेल्या प्रसंगाला सादर व्हावयाचें व प्राप्त झालेल्या परिस्थितीची तक्रार केव्हांहि करावयाची नाहीं, हा त्यांचा बाणा शेवटपर्यंत होता.

आम्ही म्यु० सभासद आपापले कांहीं तरी उद्योगधंदे करीतच होतों. त्यावर थोडा फार परिणाम गांवकऱ्यांचा अप्रीतीचा झाल्यावांचून राहिला नाहीं. माझा मात्र व्यवसाय प्रसूति करुन देण्याचा—त्याला मात्र बिलकुल अशाहि परिस्थितींत झळ पोंचली नाहीं.

पुढें कांहीं दिवसांनीं, साधारण सहा महिन्यांनंतर असेल, हरिजनांसह पाणवठ्यावर पाणी भरण्याचा सभारंभ ह्यांना स्वतः करावा लागला.

आम्ही म्युनिसिपल सभासदांनीं पाणवठे अस्पृश्यांना जरी मोकळे केले, तरी कोणीहि हरिजन हौदावर पाणी भरण्यास येईनात. आम्ही हौदावर पाणी भरण्याकरितां लहान लहान सभा घेऊन अस्पृश्यता निवारण करण्याकरितां, उच्चाटन करण्याकरितां वक्तव्यें केलीं. पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. तोंडापुरतें सगळ्यांनीं हो हो म्हणावें, पण कोणीच अस्पृश्य गांवांतील हौदावर पाणी भरण्यास आला नाहीं. हलकें हलकें त्याचीं कारणें आम्हांस कळूं लागलीं. येवल्यांतील व्यापाऱ्यांच्याकडे या लोकांचा देण्या-घेण्याचा व्यवहार असे. या लोकांची पैशाची गरज गुजराथी, पटणी व्यापारीच भागवत असत, म्हणून त्यांच्या मनाविरुद्ध हौदावर पाणी भरण्यास ही मंडळी जात नसावीत. सधन मंडळींच्या जवळ निर्धन पण गुंड प्रवृत्तीची मंडळी जवळ केलेली असतातच. त्याच भीतीमुळें कायद्यानें मोकळे केलेले पाणवठे प्रत्यक्षांत खुले होऊं शकले नाहींत. अद्यापहि खेड्यांमध्यें असेच कांहीं प्रश्न लोंबकळत राहतात. सरकारची मदत असूनहि त्याचा फायदा या दलित लोकांना होत नाहीं. स्पृश्य मंडळींचें खरें मतपरिवर्तन झाल्यावांचून हा प्रश्न हवा तसा सुटणारच नाहीं.

श्री. भाऊराव गायकवाड हे कांहीं पोलीस शिपायांना व हरिजन मंडळींना बरोबर घेऊन आमचे घरीं आले. खालूनच ह्यांना जोरानें हाका

मारून " चला, खालीं उतरा, आमच्याबरोबर पाणी काढा. पाहूं या, मोकळे पाणवठे किती केले आहेत तें बघूं या. " वगैरे आव्हान ह्यांना खालूनच भाऊरावांनीं दिलें.

हे त्यांच्या मनाची तळमळ समजूं शकले, व आजपर्यंत हरिजनांना मिळालेली स्पृश्यांकडून वागणूक ह्यांनीं ध्यानीं घेऊन पटादिशी जिना उतरून खालीं गेले. ह्यांचे पाठोपाठ मी लगबग खालीं गेलें. ओसरीवर एका बाजूस ह्यांना हाका मारून मीं माझ्याकडून सुचविलें, " आम्हीं सभासदांनीं मार खाल्ला नाहीं, पण आपल्यावर ती पाळी आज येणार याची भीति वाटत आहे. गांवकरी क्षुब्ध आहेत. अशा वेळेला हरिजनांच्या बरोबर तुम्हीं पाणी भरण्याचें कारणच काय? स्पृश्य मंडळी हौदावर पाणी भरीतच आहेत, त्यांत भाऊसाहेबांनीं आपली हरिजन मंडळी घेऊन जावींत. स्पृश्यांनीं विरोध केला तर कायदा आहेच. " तेव्हां माझ्या या सांगण्यावर नुसत्या हातानें शांत व स्तब्ध राहा हें सुचवून हे घराच्या पायऱ्या उतरून भाऊसाहेबांशीं विनोद करीत बोलूंहि लागले, तोंच माझी देवाला करुणा येऊनच कीं काय, आमचे ल. ब. कुलकर्णी नेमके हजर झाले. या मंडळींत तेहि सामील झाले व हौदाकडे जाण्याकरितां कोपऱ्यावरून वळले. ल. ब. कुलकर्णी ह्यांच्या येण्यानें मला कितीतरी धीर आला. ते हजर असतांना कसलाहि मारामारीचा प्रसंग आला तरी ते स्वतः पुढें होऊन ह्यांचें रक्षण करतील अशी मला खात्री होती.

दोनचार हौदांवर जाऊन ह्यांनीं व हरिजनांनीं बरोबर पाणी काढलें. इतकेंच नव्हे तर हे हौदावर बसून हरिजनांनीं घातलेलें पाणी ओंजळीनें मनमुराद प्यायले. हें दृश्य गांवांतील मंडळी दूर उभे राहून बघतहि होती. कोणीहि विरोध असा हरिजनांना व ह्यांना त्या वेळीं केला नाहीं. पोलीस ह्यांच्या मागोमाग असल्यामुळें अधिक प्रसंग करण्याचें धैर्य बघे लोकांना त्या वेळीं झालें नसावें.

श्री. भाऊराव गायकवाड ह्यांच्यावर बेहद्द खूष झाले व " गुरुजी, तुमची मला खात्री होतीच." असे शब्द उच्चारीत आमच्या घरीं सर्व मंडळी परत

आली. शिष्ट संप्रदायाप्रमाणें चहा, कॉफी घेऊनच समाधानानें सर्व मंडळी आपापल्या घरीं गेली. आमच्याकडे हरिजनांना कधींच कसलाच मज्जाव आयुष्यांत नव्हता, तेव्हां आमच्याबद्दल हरिजनांच्या मनांत तेढ अशी कधींच नव्हती.

'नाशिक जिल्ह्याचा दौरा' या मथळ्याखालीं श्री. भाऊसाहेब गायकवाडांनीं लेख लिहिला असतांना ह्यांच्याबद्दल ( आपटे गुरुजींच्याबद्दल ) धन्योद्गार काढलेले आहेत.

या घटनेनंतर कांहीं प्रीति व कांहीं अप्रीति अशी गांवांत ह्यांच्याबद्दल निर्माण झाली. कांहीं मंडळी जवळ आली तर कांहीं मंडळी लांब गेली. येवल्यांतील धनिक मंडळींनीं विनयमंदिराची आठवड्याची भिक्षा अजिबात बंद केली. इतकेंच नव्हे तर रस्त्यांतून जातां-येतां ह्यांनीं वडील धनिकांना नमस्कार केला तर तो न घेतां आपलीं तोंडें दुसऱ्या बाजूला फिरविण्याचें धारिष्ट दाखविण्यासहि कांहीं मंडळी चुकलीं नाहींत.

त्या वेळेला मला पुढें या प्रकरणीं काय होईल याची भीति वाटत असे, व तशा तऱ्हेचीं बोलणीं मी ह्यांच्यापाशीं करीतहि असें.

ह्यांची नेहमींची जी विचारसरणी होती त्या विचारसरणीला अनुलक्षूनच ह्यांनीं सांगितलें, " फार काय होईल, पैसा नसेल तर मी आश्रम बंद करूं शकतों, पण तत्त्व आणि सत्त्व हें सत्य स्वरूपांतच जगाला प्रतीत झालें पाहिजे. आश्रम हें एक राष्ट्रीय कार्य आहे. तें नसलें तर दुसरें राष्ट्रीय कार्य आम्ही मंडळी निर्माण करूं शकतों " त्या मनाच्या आंदोलनांतून 'जो लोककल्याण। साधावया जाण । घेई करीं प्राण । त्या सौख्य कैचें । " वगैरे म्हणून गेले. कांहीं वेळां आयुष्यांतील ऊनपावसाचे खेळच आम्ही अशा तऱ्हेचे जन्मभर खेळत होतों.

१९४१ सालीं विनयमंदिराचा गणपति-उत्सव सुरू झाला होता. अशा वेळीं माझे धाकटे दीर डॉ. सदाशिव श्रीधर आपटे हे जे मिलिटरीमध्यें कॅप्टनच्या कामावर होते त्यांचा अनपेक्षित रीत्या खून झाला.

हा फार मोठा धक्का आमच्या आपटे कुटुंबास बसला. त्या वेळेला माझे वडील दोन दीर व वडील दोन नणंदा हयात होत्या. आपापल्या मनो-

भूमिकेप्रमाणें हा आघात सहन करून या चारीहि वडील माणसांचें आयुष्य या प्रकारामुळें खास कमी झालें असावें. कारण एक-दोन वर्षांच्या अंतरानें धाकट्या भावजींच्या पाठोपाठ ही सर्व मंडळी निघून गेली. हे मात्र त्यानंतर नेहमीं म्हणत, "आमच्या सर्व भावंडांत हुषारीमध्यें मी जसा मागें होतों, त्याप्रमाणें देवानें मला एकट्यालाच आतां एकटे मागें ठेवलें आहे. मीं कांहीं तरी करावें असा ईश्वरी हेतु असावा. दुसरें काय कारण ?" हाच समजुतीचा दुवा ह्यांच्या समाधानाचें स्थान होता.

मुंबईच्या ए. आय. सी. सी. च्या मीटिंगमध्यें १९४२ सालीं महात्माजींनीं ठरावाच्या रूपांत एक निवेदन मांडलें. तो ठराव मोठ्या उत्साहानें आणि हिरीरीनें सर्व सभासदांनीं उचलून धरून त्या सभेंत अनुमोदनहि दिलें. केलेल्या ठरावांतील आशय खालीलप्रमाणें स्पष्ट होता: "ब्रिटिश गव्हर्नमेंटनें अद्याप आमची स्वराज्याची मागणी दुर्लक्षिलेली आहे. त्याकडे आम्ही त्यांचें लक्ष वेधूं इच्छितों. युद्ध सुरू असतांना आमची मागणी बाजूला सारणें म्हणजे आमचें सहकार्य गव्हर्नमेंट लाथाडीत आहे. तरी या पुढें 'करेंगे और मरेंगे' हें आमचें शेवटचें निवेदन ब्रिटिश राज्यकर्त्यांना आम्ही सादर करीत आहोंत. याकडे गव्हर्नमेंटनें दुर्लक्ष केल्यास त्याच्या परिणामाची जबाबदारी सर्वस्वीं गव्हर्नमेंटवर राहील." हा ठराव ए. आय. सी. सी. च्या सभेंत पास होतां क्षणींच ब्रिटिश गव्हर्नमेंटनें आपलें स्वरूप दाखविण्यास तेथल्या तेथेंच सुरुवात केली. महात्मा गांधींना ता. ९ ऑगस्ट रोजीं बंदिशाळेंत गव्हर्नमेंटनें ठेवून दिलें व त्याचप्रमाणें गांवोगांवच्या देशभक्तांना—पुढाऱ्यांना पकडण्याचें सत्र सुरू केलें.

ऑगस्ट नऊ तारखेला माझी मुलगी कमा टायफाईडनें आसन्नमरण अशी आजारी होती. ती एक दोन दिवसांचीच सोबतीण आहे हें ठाऊक असतांनाहि फक्त राष्ट्राचाच विचार डोळ्यापुढें ठेवून ह्यांनीं नऊ ऑगस्टलाच मोठी मीटिंग येवल्यांत घेऊन येवल्यांतील चळवळीच्या कामास सुरुवात करून दिली म्हणण्यास हरकत नाहीं. ह्यांना त्याच दिवशीं पकडून ता. १० ऑगस्टला मनमाडला पाठवून देण्यांत आलें. ह्यांना ज्या दिवशीं एक वर्षांची

शिक्षा झाली त्याच दिवशीं माझी कमा ( एक शापित जीव ) या जगांतून मुक्त झाली. मीहि सर्वस्वी मोकळी झालें असें म्हणण्यास कांहींच हरकत नव्हती. पति तुरुंगामध्यें, कन्या स्वर्गामध्यें व पुत्र शंभू मुंबईच्या मेडिकल कॉलेजमध्यें. त्यामुळें मी शरीरानें निरुद्योगी अशी खास झालें होतें, पण मनाचे उद्योग शतपटीनें माझ्याभोंवतीं पिंगा घालीत होते.

१९४२ सालचा राष्ट्रीय लढा हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य युद्धांतील संस्मरणीय काळ होय. त्या वेळच्या देशभक्तांनीं राष्ट्राचा आणीबाणीचा प्रसंग ओळखून महात्माजींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भराभर तुरुंग भरून काढले. स्वतःचीं बायका-मुलें, माता-पिता, आप्त-इष्ट, शिक्षण-रक्षण सर्व बाजूला सारून तन-मन-धनेंकरून या स्वातंत्र्य युद्धांत कित्येकांनीं उडी घेतली.

१९४७ सालीं दिसलेल्या स्वातंत्र्य वृक्षास खतपाणी १९४२ सालीं ह्या त्यागी मंडळींनीं घातलें असें म्हटल्यास योग्यच ठरेल. ही चळवळ जेवढी पेटवतां येईल, पसरवतां येईल तितकी हिंदुस्थानभर जनतेनें पेटवली. स्त्री, पुरुष, मुलं ह्यांनीं आपले देहदेखील समर्पण केले. धन्य ती मंडळी ! नंदुरबारचा शिरीषकुमार, याच्यासारख्या कोवळ्या बालकानें झेंडा हातांतून न सोडतां प्राणार्पण केलें. या एकाच गोष्टींतून त्या वेळच्या राष्ट्राची नाडी आपण समजूं शकतों. 'आझाद रणांगण गाजविलें । स्त्रीनें पुरुषा लाजविलें ।' अशा तऱ्हेचें धैर्य स्त्रीनें—अबला स्त्रीनें मुंबईच्या लाठी हल्ल्यांत दाखविलें तें विसरतां कसें येईल ?

एकंदरींत १९४२ सालची ही चळवळ देशव्यापी झाली. या चळवळीमध्यें तुरुंगामध्यें बहुतेक पुढारी डांबलेलेच होते. आपआपल्या विचारसरणीप्रमाणें राष्ट्राच्या स्वातंत्र्याचाहि मोठी मोठी श्रेष्ठ दर्जाची मंडळी विचारविनिमय व चर्चा करीत होती. महात्माजींचें उघड राजकारण किती उपयोगी पडेल याबद्दल मंडळी साशंक होती. ह्यांना स्वराज्य मिळविण्याच्या मार्गाची सुचिता सांभाळावयाची होती, त्यामुळें कोणत्याहि तऱ्हेच्या युक्त्याप्रयुक्त्या पटणें शक्य नव्हतें.

ह्यांच्या वृत्तीस अनुसरून डावपेंचाच्या राजकारणाला कोणत्याहि तऱ्हेचें साहाय्य मीं येवल्यांत केलें नाहीं. गांवांतील मंडळींची तुरुंगांत जाण्याची तयारी

करण्याकरितां मी एकटीच प्रातःकालीं घरांतून बाहेर पडून नाना तऱ्हेचीं राष्ट्र-गीतें मोहल्ल्या मोहल्ल्यांत म्हणत असे. एक-दीड तासाचा हा कार्यक्रम सकाळचा माझा ठरलेला असे. या तयारींतूनच १०-१२ मंडळी आम्ही तुरुंगांत जाण्याकरितां तयार झालों होतों, पण नाशकांत असलेल्या कॉंग्रेसच्या पुढारी मंडळींकडून आज्ञा म्हणून कळविण्यांत आलें कीं, "आपणांस आतां तुरुंग भरावयाचे नाहींत, तरी तुरुंगांत जाण्याचा विचार आपण रद्द करावा." तेव्हां माझा निरुपाय होऊन माझ्या सर्व विधायक हालचाली मीं व माझ्या भगिनींनीं बंद केल्या.

अशा रीतीनें १९४२ सालीं बरीचशी मंडळी तुरुंगांत गेली तरी माझा योग त्या वेळेला नव्हता असेंच म्हणावें लागतें.

ह्यांना १९४२ सालीं एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झालेली होती. चि. शंभू हा एम्. बी. बी. एस्. च्या शेवटच्या परीक्षेच्या तयारीकरतां मुंबईला त्याच्या कॉलेजमध्येंच होता. मुंबईंतील चळवळ सारखी वाढत होती. त्यामुळें एम्. बी. बी. एस्. ची शेवटची परीक्षा होईल किंवा नाहीं? कॉलेज बंद होईल कीं काय? अशाहि बातम्या चि. शंभूच्या पत्रांतून मला समजत होत्या. मेडिकल कॉलेजचे शेवटल्या वर्षांतील विद्यार्थीहि या राष्ट्रयज्ञांत भाग घेत होते. त्या वेळेला शंभूनें त्याच्या स्वतःकारितां माझा सल्ला विचारला होता. तेव्हां मीं माझें स्पष्ट मत कळविलें होतें तें असें—"तुझें वर्ष फुकट गेलें तरी हरकत नाहीं. तुझी बरीचशी सहाध्यायी मंडळी या चळवळींत भाग घेत असतील तर तूं मागें राहून आपली परीक्षा साधूं नकोस. पण स्वतःच या चळवळीचें पुढारीपण घेऊं नकोस. या उप्पर तुला योग्य वाटेल तें तूं अवश्य कर."

माझें पत्र पोंचातांच माझे विचार शंभू समजू शकला, पण एकदा ताईची भेट घ्यावी या विचारें तो येवल्यास कांहीं तासांकरतांच आला होता. त्या दिवशीं मोठी गम्मत झाली. तें असें झालें—

शंभू मुंबईहून नुकताच अकराच्या गाडीनें आला होता. त्याला रात्रीं नवाच्याच गाडीनें मुंबईला परत जायचें होतें. हे त्या वेळेला तुरुंगांतच

होते. ह्या महिन्यांतच नाशिकला जाऊन ह्यांची जेलमध्यें भेट घेण्याची वेळ होती. त्याचाहि विचार आम्हां मायलेकरांना जरा निचिंतपणींच करावयाचा होता.

शंभूचें जेवण झाल्यावर शंभू हॉलमध्यें गेला. मीहि माझी स्वयंपाक-घरांतली आवराआवर करून हॉलमध्येंच जाणार होतें तोंच " काकू चकल्याचा सोऱ्या आहे का ? आमची सोऱ्याची तबकडीच आईला सांपडत नाहीं." असें म्हणून व धापा टाकीत येऊन विमलनें मला सोऱ्या मागितला. विमलचे वरील शब्द माझ्या कानांवर आले. मी विमलशीं विशेष कांहीं न बोलतां चकल्याचा सोऱ्या कपाटांतून काढून दिला व सांगितलें, " उद्या-विद्या सोऱ्या परत केला तरी चालेल अँ. आईला निरोप सांग." विमल आली तशीच धाडधाड जिना उतरत आपल्या घरीं गेली. मी हॉलमध्यें पाऊल टाकतांच शंभू मला म्हणाला, " आबांचीं मागील दोन्हीं पत्रें काढ पाहूं. त्यांना हवीं असलेलीं पुस्तकें मी कपाटांतून काढून ठेवतों."

ह्यांचीं पत्रं–दोन्हीं पत्रं–शंभूच्या हातांत देऊन ह्यांना हव्या असलेल्या पुस्तकांची यादी शंभू वाचीत आहे तोंच विमलची धाकटी बहीण शीला—पांच सहा वर्षांची—माझ्या पुढें येऊन उभी राहिली व म्हणाली, " आईनं सोऱ्या मागितला." " अग, मी सोऱ्या दिला " इतकं जों मी तिला सांगतें आहें तों विमल चटपट वर आली व मला सांगूं लागली—" आईनं किनी शेवेचा सोऱ्या मागितला आहे. अहो काकू, चकल्याच्या भाजणींत आळ्या पडल्या कीं ! शेवेच्या सोऱ्याबरोबर एक अर्धा शेर डाळीचं पीठहि आईनं मागितलं आहे. आई म्हणाली, ' मी शेवच करीन. ' "

शेवेचा सोऱ्या आणि डाळीचं पीठ न देणें हें मला शक्यच नव्हतं. कांहीं झालं तरी देशपांड्यांचं बिऱ्हाड व आम्ही एका वाड्यांत दहा वर्षे राहात होतों, आणि त्यांतल्या त्यांत शहरच्यासारख्या सर्व गोष्टी दुकानांत नाहीं मिळत म्हणून मीं घाईघाईनें अंदाजें अर्धा शेर पीठ व शेवेचा सोऱ्या विमलला काढून दिला. शीला काय विमलला सुधी जाऊं देणार ? दोघींचं तिथं भांडणच जुंपलं. पीठ कोणीं न्यायचं व सोऱ्या कोणी न्यायचा—शेवटीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम 32058 वि: 
क्रमांक 9030 नों: दि:

लिमलेटच्या गोळीवर तें भांडण मला मिटवावं लागलं. विमल पीठ घेऊन गेली व शीला एका हातांत सोऱ्या व एका हातांत लिमलेटची गोळी घेऊन थाटांत जिना उतरली.

कपाटांतील नांवनिशीवार पुस्तकें काढून घेऊन व्यवस्थेशीर बांधून शंभूनें माझ्या स्वाधीन केलीं, व म्हणाला, "तूं भेटीचे आदले दिवशीं येथून रात्रीच्या गाडीनें निघून नाशकास जा, व मी मुंबईहून निघून नाशिकचे स्टेशनवरच तुला भेटेन. दोघे मिळूनच जेलवर जाऊं." असें सांगत सांगत आम्ही दोघेहि हॉलमध्यें येऊन ह्यांच्या भेटीला जाण्याचा दिवस डायरी पाहून ठरवूं लागलों. तोंच देशपांड्यांची मोलकरीण दाराआड उभी राहून मला हलक्या आवाजांत हाका मारीत होती. तिची हांक येतांच शंभूनें एकदा तिच्याकडे कोण हांका मारीत आहे म्हणून पाहिलें तों मंजुळा गप्पच झाली. "अग, काय हवं, देशपांड्यांच्या वहिनींचा काय निरोप आहे ?" वगैरे मीं व शंभूनें पुन्हा पुन्हा विचारलं, पण मंजुळा उत्तरहि देईना–तोंच शंभूनं विचारलें, "अग काम नाहीं तर परत जा. आम्ही दोघंहि कामांत आहोंत." तोंच मंजुळा आर्जवी आवाजांत म्हणाली– "तुम्हीच इकडे या की काकू ?" मला मंजुळेच्या बोलावण्याप्रमाणें बाहेर जावेंच लागलें."देशपांड्यांच्या वहिनींनीं मोठी सतरंजी मागितली आहे" असं ती हलकें हलकें सांगूं लागली. "रात्रीं परत करीन म्हणाल्या वहिनी" मीं तिला जरा जोरांतच सांगितलं, "अग, आम्ही दोघंहि सतरंजीवर बसलों आहोंत. काम करीत आहोंत. थोड्या वेळानें येऊन सतरंजी घेऊन जा. जा, वहिनींना माझा निरोप सांग." असं सांगून मीं हॉलमध्यें शंभूला विचारलं, "या महिन्याला तुला पैसे किती लागतील ? मी पुढच्या महिन्याला नेहमींप्रमाणें मनी ऑर्डर करीनच." कागदाच्या चिठोऱ्यावर आकड्याच्या बेरजा करून निश्चित आंकडा मला सांगण्याच्या तयारींत तो होता तोंच खालून वाड्यांतून देशपांड्यांच्या वहिनींची आरोळी—"काकू, अहो काकू" जोरांत कानांवर आली. मी खिडकीपाशीं जाऊन खालीं वाकून पाहतें तों वहिनी त्यांच्या दारांतूनच मला सांगूं लागल्या, "अहो काकू, श्रीकांतला बघायला शेंड्यांची मंडळी बरोबर चार वाजतां तर येणार आहेत. म्हणून तर माझी गडबड—मंजुळा हाताशीं आहे–सतरंजी झाडून नीटनेटकी

खोलींत घालून देईल—म्हणून तर तिला मीं आतां पाठविलं. देतां ना, मग सतरंजी पाठवून. जा, मंजुळा जा, काकू सतरंजी देत आहेत ती घेऊन ये."

वहिनींच्या मुखावरील प्रसन्नता बघून सतरंजी आतां देत नाहीं म्हणणं कससंच वाटूं लागलं. कोपऱ्यांत उभी असलेली चटई घालून शंभूला त्यावर बैस असं मीं सुचवलं व सतरंजी गोळा करूं लागलें तों मंजुळा आलीच. तिनं माझ्या हातांतली सतरंजी घेतली आणि खिडकीबाहेर सोडून सतरंजी झाडूनच सतरंजी खालीं नेण्याचा विचार ती करीत असावी. धुरळा साहाजिकच झाडीत असतांना शंभूच्या अंगावर उडाला—तेव्हां शंभूनें मला चिडून विचारलें, "सतरंजी झाडायला खालीं जागा नाहीं?" तेव्हां मी मंजुळेला खुणेनेंच आतां लवकर खालीं जा असें सुचविलें. त्या मोठ्या सतंरजीची घडी काय मंजुळा एकटी घालूं शकते? मी तिला मदत करूं लागलें. तरीहि मंजुळेला सतरंजी खालीं नेतां येईल असं वाटेना. तेव्हां शंभूनें सतरंजीची घडी नीट व्यवस्थित घालून मंजुळेच्या डोक्यावर देऊन खालीं रवानगी करतांना म्हणाला, "आज काय, वहिनींच्या घरीं हळदी-कुंकू आहे कीं काय?" मी त्याला थोडक्यांत "श्रीकांतला बघायला कोणी तरी येत आहेत" असं सांगतांच श्रीकांताचा आठ वर्षांचा भाऊ वसंत पुढच्या जिन्यानें वर आला व मला "आईनं तस्त मागितलं आहे. कोणी तरी आमच्याकडे पाहुणे येणार आहेत दादाला बघायला" असं सांगूं लागला.

मी लगबग मागच्या घरांत जाऊन भांड्याच्या पेटींतील तस्त काढून वसंताला दिलं. "नीट घासून घ्या अं—" असं सांगून मी हॉलमध्यें परतणार तोंच दोन पायऱ्या उतरलेला वसंत वर आला व म्हणाला, "काकू, मी अगदींच विसरलों! कीं आईनं कुटलेली थोडी सुपारी मागितली आहे. ती थोडी जास्तच द्या अँ. तुमची सुपारी आम्हां सर्वांना फार आवडते." मी कपाटांतला सुपारीचा डबा घाईघाईनं काढला व वसंताचे हातांत दिला व "पळ बघूं, आतां जरा वेळ वर येऊं नका. शंभू मुंबईहून आला आहे व तो रात्रीं नवालाच परत जायचा आहे" असें सांगितलें.

वसंतानें खालीं जाऊन शंभू आल्याचा निरोप वहिनींना सांगितला असावा. मी व शंभू पैशासंबंधीं गंभीरपणें विचार करीत होतों. पुढच्या वर्षाचा त्याला

लागणारा खर्च व माझी असलेली तरतूद याचा विचार करूनच पैशाची व्यवस्था आम्हां दोघांस करावयाची होती. या विचारांत आम्ही दोघें गढून निःशब्द अवस्थेंत विचार करीत होतों, तोंच वहिनी स्वतःच वर हॉलमध्यें आल्या व शंभूची चवकशी काळजीकांख्यानें करूं लागल्या. "माझी प्रकृति चांगली आहे—मला अधिक राहतां येतच नाहीं— मुंबईची हवापाणी सध्यां तरी छान आहे. तुमचा भाचा फार दिवसांत मला भेटला नाहीं. भेटला तर तुमचा निरोप खास सांगीन" वगैरे उत्तरें शंभूनें वहिनींना दिलीं व मग वहिनींचा मोर्चा माझ्याकडे वळला. "अहो काकू, कधीं नव्हत हा योग आला आहे. तेव्हां सगळं नीटनेटकं हवं ना घर दिसायला. सून आणावयाची आहे. चेष्टा नाहीं बाई. म्हणून तुमच्या मोठ्या सहा बशा—सहा कपबशा, द्या तर खऱ्या. शेव केली—शिरा करते—कॉफी व केळीं फराळास ठेवणार आहे. बरा आहेना बेत फराळाचा. तुम्हांला सगळं सांगायचा आमचा रिवाज आहे. कोकणस्थाचं कसं नीटनेटकं सर्व असतं. पण काकू, मीसुद्धां तुमच्या शेजाराला राहून थोडं तरी खास उचललं आहे नाहीं का ? सांगा कीं 'हो' म्हणून."

मीं स्मित करून होकार दर्शविला व वहिनींच्या मागणीप्रमाणें कपबशा व मोठ्या बशा काढून दिल्या. शिऱ्याकरतां एक डझन चमचे वहिनींच्या पुढें टाकले. चमचे देतांना मीं विचार केला, कोणाची तरी एक खेप यामुळें खास वांचेल. वहिनींनीं चमचे हातांत घेतले. ते घेत घेत त्या म्हणाल्या, "आमचेकडे चमचे आहेत, पण एकसारखे नाहीं सांपडावयाचे."

वहिनी खालीं गेल्या व तिहींचे ठोके पडले. कॉफी तयार करून मी हॉलमध्यें घेऊन गेलें. कॉफी पितां पितां कॅलेंडर जवळ काढून जेलची तारीख आम्ही नक्की करूं लागलों. सुट्टीच्या वारीं जेलची भेट कधींच मिळत नाहीं, तोंच विमल वर आली व म्हणाली, "काकू, तुम्हांला कसं कळलं दादांनीं कॅलेंडर मागितलं म्हणून ! हे जवाहरलालचं व गांधींचं. हीं दोन्हीं कॅलेंडरं दादा मला घेऊन ये म्हणाला. बैठकीच्या खोलींत लावायचीं आहेत. काकू, तुम्ही व शंभू दादा मग या बरं का खोली बघायला. दादांनीं कशी छान लावली आहे ती." दोन्हीं कॅलेंडरें हातांत घेऊन टेबलावरचा फ्लॉवर

पॉट कागदी फुलांसकट उचलून " आमच्या टेबलावर हा हवाच नाहीं का काकू ? संध्याकाळीं मी नक्की आणून देईन अं." असें विमल म्हणाली.

विमल खालीं उतरायला व श्रीकांत वर यायला एकच गांठ पडली. श्रीकांत घाईघाईनें शंभूजवळ आला आणि हलकेंच म्हणाला, " ए शंभू, एक परीटघडीचा शर्ट दे बाबा. असेल ना कपाटांत तुझ्या." असं म्हणतच श्रीकांतनें शंभूचा एक शर्ट कपाटांतून काढला व स्वतःच्या अंगावर चढवून मळका तेथेंच कोपऱ्यांत फेकून आरशांत स्वतःचा चेहरा बघूं लागला व शंभूला म्हणाला, " ठीक बेत आहे ना, जांवईबोवांचा. अरे, मला आज पाहायला येणार आहेत—स्वच्छ नीटनेटकं माणसानं असावं, असं आपण राष्ट्रीय शाळेंत शिकलों नाहीं का ? " श्रीकांताची ती ऐटींतील मुद्रा पाहून शंभूहि मित्राची चेष्टा करूं लागला. पण ती चेष्टा ऐकण्यास श्रीकांत होता कुठें ! जातां जातां हातास लागला तो कपाटांतील स्वच्छ टॉवेल घेऊन धडधड खालीं उतरला. जातां जातां घाईंत म्हणाला, " दोघंहि थोड्या वेळानं या बरं का ? "

नवरदेवाची गडबड पाहून शंभूला हसूं आवरेना. हसत हसतच शंभू मला म्हणाला, " अग ताई, एका दिवसाकरतां आपण दोघं देशपांड्यांच्या घरीं गेलों असतों व आपलं घर वहिनींना दिलं असतं तर आपणां दोघांना स्वस्थ चित्तानें बोलतां तरी आलं असतं. नव्याची गाडी मला चुकवतांच येत नाहीं. "

ठीक व्हायचं असलं तर सगळं एका पाठोपाठ जमूं लागतं. चळवळीची लाट जरा ओसरली व त्यांतच शंभूची एम्. बी. बी. एस्. ची परीक्षा उरकून गेली. शेवटची परीक्षा ही दीर्घ मुदतीची असते. ती पुरी होईपर्यंत माझा जीव खालींवर होत असे. ह्यांची जेलमधून जीं पत्रें येत ( शंभूकरतां म्हणून ) तीं परीक्षेच्या दिवसांत वेळोवेळीं मी त्याला कळवीत असें, त्यामुळें तीं पत्रें म्हणजे शंभूला पाठराखणीसारखीच परीक्षेला जातांना वाटत असत. ह्यांचें शंभूशीं नातें फक्त जन्मदात्याचें नसून निरानिराळ्या वेळीं निरनिराळ्या भूमिकेंत कधीं मित्रासारखें तर कधीं गुरूसारखें असे. असें स्पष्ट पण प्रेमळ मार्गदर्शन शंभूला वेळोवेळीं या पांच वर्षांच्या डॉक्टरी कोर्समध्यें मिळत गेलें व त्यामुळेंच

‘ शंभू मासुली चहाच्या व्यसनांत देखील सांपडूं शकला नाहीं. ’ ही कबुली स्वतः शंभू, ह्यांच्या मार्गदर्शनाची अद्यापहि देत असतो.

परीक्षा संपून आमचे चिरंजीव येवल्यांत हजर झाले. तेव्हां माझा जीव एकदाचा भांड्यांत पडला. माझें ध्येय मुलाच्या इच्छेप्रमाणें एम्. बी. बी. एस्. करणें तें संपत आलेलें होतें. ‘ पास ’ हीं गोड अक्षरें फक्त ऐकायचीं राहिलीं होतीं. विद्यार्थ्याला आपल्या परीक्षेचा अंदाज ( पास–नापासचा ) बहुतेक असतोच व तो चुकतहि नाहीं. सेकंड एम्. बी. बी. एस्. ला मेडिसिनमध्यें सुवर्णपदक मिळवून चांगल्या तऱ्हेनें पास झाला असल्यामुळें बहुतेक या शेवटच्या परीक्षेंत पास होण्यास हरकत पडणार नाहीं, असा त्याचा अंदाज होता, पण मुंबईहून आल्यावर एक गंमतीची गोष्ट म्हणून त्यानें मला निवेदन केली, ती म्हणजे मेडिसिनमध्यें मी कांहीं तरी चमकावयास हवा होतों, पण तसं कांहींच होणार नाहीं. ही कल्पना मी तुला आधींच देऊन ठेवतों, म्हणजे रिझल्टच्या दिवशीं तुझी निराशा होणार नाहीं.

अशा तऱ्हेनें आम्ही माय-लेकरें पुढच्या सुखाच्या कल्पनेंत दंग असतांना एक उणीव आमच्या दोघांच्या चित्ताला सारखी बोचत होती. ती म्हणजे शंभूच्या रिझल्टच्या दिवशीं यशाचें सुख अनुभवण्यास हे आमच्यांत नसणार हीच ती होय.

आम्ही कितीहि काळजी यासंबंधीं करीत असलों तरी ईश्वरी योजना कांहीं तरी वेगळीच चाललेली असावी. कारण ज्या दिवशीं शंभूचा एम्. बी. बी. एस्. चा रिझल्ट लागला त्याच दिवशीं ह्यांची शिक्षा पुरी झाली नसतांनाहि ह्यांची सुटका अनपेक्षित झाली. शंभू पास झाल्याची तार आमच्या हातांत सकाळीं १० वाजतां मिळाली. त्याच वेळीं दुसरीहि तार शंभूच्या नांवावरची पोस्टमननें शंभूच्या हातांत दिली. ही दुसरी तार अभिनंदनाची असावी, अशी शंभूची समजूत होऊन जरा अवकाशानेंच त्यानें ती फोडली व आनंददायक वर्तमान ह्यांच्या सुटकेचें आम्हां सर्व मंडळींना ( शंभूचे गांवांतील मित्रमंडळी रिझल्ट ऐकण्याकरितां आले होते त्यांना ) आनंदानें बेहोष म्हणून सांगूं लागला. आमचा कोणाचाच या बातमीवर

विश्वास बसेना. प्रत्येकानें तार हातांत घेऊन पुन्हा पुन्हा खात्री करून घेतली. त्या तारेंत घोटाळण्यासारखें कांहींच नव्हतें. माझी सुटका झाली. मी रात्रीच्या गाडीनें येतों. हा अर्थ स्पष्ट असल्यामुळें गांवांतहि ह्यांच्या सुटकेची आनंद-कारक बातमी देण्यासाठीं आमचे बालगोपाल चहूंकडे पळाले. शंभूचा रिझल्ट व ह्यांची सुटका या एकाच वेळीं दोन्ही घटना कशा घडाव्यात याचें आश्चर्य करीत करीत, माझ्यापर्यंत कित्येक मंडळी त्या दिवशीं येऊन गेली. ज्याच्या त्यांच्या तोंडीं शंभू पास झाला हें आम्हांस नवल नाहीं, पण आमचे गुरुजी अकल्पित सुटले याचा आनंद आम्हांस सांगतांच येत नाहीं,असे कित्येक मंडळींचे उद्‌गार ऐकून माझ्या आनंदाला तर सीमाच राहिली नव्हती. त्या आनंदाच्या भरांत मी शंभूला घेऊन माझ्या मैत्रिणीकडे म्हणजे थत्ते काकूंच्याकडे गेले व दोन्ही आनंदाच्या बातम्या आधीं त्यांना निवेदन केल्या. ह्यांच्याच बरोबर दामुअण्णा थत्ते तुरुंगांतून सुटून् अकल्पितच रात्रीं येत होते. हीहि तार थत्ते मंडळींना मिळाल्यामुळें आम्ही दोन्ही कुटुंबें एकमेकांत बोलून बोलून जणू आनंद लुटीतच होतों. माझ्या मैत्रिणीनें शंभूची दृष्ट काढून पंचवीस रुपयांचे पेढे आणून गांवांतील बहुतेक परिचित मंडळींचीं तोंडें गोड केलीं.

रात्रीं १२ च्या गाडीनें ठरलेल्या वेळीं हे व श्री. दामुअण्णा येवल्यांत दाखल झाले. त्या दोघांकरितां येवलें स्टेशनवर बरीच मंडळी गेलेली होती. मी मात्र अशा कोणत्याहि प्रसंगीं माझें घर सोडून जात नसे. ह्यांची मार्ग-प्रतीक्षा करीत देवापुढें शांत बसून राहणें मला बरें वाटत असें.

शंभू चांगल्या तऱ्हेनें परीक्षा पास झाला हें पाहून सुटकेचा निःश्वास सोडून मीं ह्यांना एकदा गमतीनं म्हटलं माझं ध्येय पूर्ण झालं. पण आपलं स्वराज्यप्राप्तीचं ध्येय कधीं पुरं होणार ? त्यावर ह्यांनीं ताबडतोब उत्तर दिलं, “ तुझं ध्येय पूर्ण झाल्यामुळं तूं खुषीत आहेस ना ? माझंहि ध्येय वाटचाल करीतच आहे, आणि हें पाहा आम्हाला काम तरी काय ? स्वराज्य मिळेपर्यंत कांहीं न् कांहीं काम करीतच राहायचं. बरं या जन्मीं आम्ही स्वराज्याच्या कामाला पुरे पडलों नाहीं तर पुढचा जन्महि आम्ही खर्ची घालण्यास तयार आहोंत. ”

अशा तऱ्हेचीं त्यांचीं उत्तरें ऐकलीं म्हणजे ह्यांच्या ध्येयावरची ह्यांची निष्ठा पाहून फार फार नवल वाटे.

चि. शंभूनेंहि, " ताई, आतां तूं सुटलीस. यापुढें तुला कोणत्याहि तऱ्हेचा त्रास पोचूं नये हें माझें पहिलें कर्तव्य ठरेल. आतां तुम्ही बिलकुल दग-दग न करतां आबा व तूं सुखानें कालक्रमणा करा, असं माझं आग्रहाचं सांगणं आहे. मी आतां एम्. डी. कडे जाऊंच शकत नाहीं. मला सर्जरीकडेच जावं लागेल. सर्जरीमध्यें मार्क मला बऱ्यापैकीं पडलेले असल्यामुळें के. इ. एम्. हॉस्पिटलमध्यें हाऊस सर्जनची पहिली पोस्ट मला सर्जरीचीच मिळणार " वगैरे गोष्टी तो बोलूं लागला.

शंभूनें आमच्याकरितां जे उद्गार काढले त्यांनीं तर आमच्या दोघांचे डोळे भरून आले. आमचें दोघांचें उत्तर एकच सांच्याचें त्याला मिळालें. तें म्हणजे—" तूं कष्टाचें सार्थक केलेंस हें आमचें बक्षीस आम्हांस प्राप्त झालेंच आहे. तूं आतां स्वतःचा विचार करण्याइतका योग्य वयाचा व प्रवृत्तीचा आहेस, तेव्हां तुझा मार्ग तूं ठरवूं शकतोस. "

खरोखरीच फिजीशियन काय आणि सर्जन काय या दोघांतला फरक कळण्याइतकी माझी मति स्थिरच नव्हती. वरून मी स्थिरता दाखवीत असलें तरी ' माझा शंभू डॉक्टर झाला ' हें वाक्य सारखें कोणी न विचारतांहि सांगावें इतकी मी अंतर्यामीं बेहोष झालें होतें. ' भिकेची हंडी शिंक्याला पोचणें ' तितकीच अपूर्वाईची गोष्ट मला तरी त्या वेळीं वाटत होती.

आमच्या दोघांप्रमाणेंच आमच्या सर्व आप्त-इष्टांनाहि शंभूच्या यशामुळें अत्यंत समाधान व आनंद वाटत होता. त्या वेळेला अभिनंदनाच्या तारांचा रिवाज फारसा रूढ नव्हता. प्रत्येक नातलगाकडून अगर मित्रांकडून येणारीं पत्रें म्हणजेच नित्य नवी मेजवानी आम्हांस पत्रद्वारें होत असे. तो महिना आमचा केव्हांच निघून गेला व शंभू 'हाऊस सर्जन' म्हणून के. इ. एम्. हॉस्पिटलमध्यें कामहि करूं लागला. पहिलें टान्सीलचें ऑपरेशन त्यानें जेव्हां हॉस्पिटलमध्यें केलें तेव्हांचा त्याचा आनंद व आत्मविश्वास जो त्या वेळच्या पत्रांत दिसून आला त्याची सर कित्येक ऑपरेशन्स आज तो करीत असूनहि त्याला येणार नाहीं. माझी फुकटच मान उंचावली व मी भेटणाऱ्या मंडळींना शंभूनें केलेल्या ऑपरेशनची हकीगत पुन्हा पुन्हा सांगूं लागलें. त्याहि वेळीं ह्यांनीं माझी चूक मला समजावून सांगितली. " आपल्या शंभूचं कौतुक आपण दोघं करूं; पण शंभूचं कौतुक करण्याचा बोजा लोकांचेवर निरर्थक

टाकूं नकोस." हें त्यांचें सांगणें मला आवडलें नाहीं, पण पटलें मात्र खास, म्हणून माझ्या आनंदाला मर्यादा घालण्याचें मीं ठरवून टाकलें.

या सुखद घटनेनंतर पुढचा विचार म्हणजे शंभूचं लग्न. त्या विषयावर आमच्या दोघांत चर्चा होऊन ह्यांनीं मला स्पष्ट सांगितलें, " शंभूचें लग्न आतां लवकरच करणें योग्य होईल. त्याच्या पुढें परीक्षेचा ध्येयवाद होता व तो महत्त्वाकांक्षी मुलगा आहे त्यामुळें मेडिकल कॉलेजमध्यें असूनहि आपल्या अपेक्षेप्रमाणें शुद्ध धुतलेल्या तांदळासारखा आहे, पण या पुढें असाच तो वागूं शकेल असा आपण भरंवसा धरणें ही आपली चूक होईल. जळांत राहून कोरडं राहणं सोपी गोष्ट नाहीं."

यानंतर लवकरच शंभूला त्याच्या लग्नाविषयीं मुंबईला सविस्तर पत्र आमच्या दोघांच्या विचारें रवाना केलें. दुरून दुरून आप्तेष्टांचीं पत्रें मुलाचें लग्न यंदा करतां कां ? वगैरे येतच होतीं. शंभूचें उत्तर आल्याशिवाय कोणतीच वाटचाल लग्नाचे प्रकरणीं आम्ही करणार नव्हतों, हें ठाम ठरवून ठेवलें होतें. कारण आमचे विचार व त्याचे विचार या लग्नाचे बाबतींत जमतीलच याची खात्री आम्हांस नव्हतीच. मात्र हे, मी व शंभू ह्यांचा एक विचार स्पष्टपणानें झाला असेल तर तो म्हणजे कोणत्याहि कारणास्तव हुंडा घ्यावयाचा नाहीं.

चि. शंभूचें पत्र मोकळ्या मनानें लिहिलेलें आम्हांस मिळालें. त्यावरून अद्याप आपलं लग्न ठरविलेलंहि नाहीं व तशा तऱ्हेच्या भानगडींत तो कोणत्याहि प्रकारें नाहीं, हें कळतांच आम्हीं मुलगी पाहण्याचा विचार निश्चित केला. आपणांस पसंत पडलेली मुलगी शंभूस दाखवावी, व त्याच्या पसंतीनंतरच मग होकार द्यावा असें ठरवून टाकलें.

चि. शंभूच्या लग्नाच्या आधींच माझा परिचय स्त्री मासिकाच्या १९४३ सालच्या अंकांत आला असावा. या परिचयांतूनच माझा मुलगा एम्. बी. बी. एस्. झालेला यंदा लग्न करीत आहे ही गोष्ट आमच्या विहीणबाई सौ. सरस्वतीबाई लिमये, रा. नाशिक, यांना समजली.

तें असं झालं. आमच्या गांवचे हायस्कूलमधील शिक्षक श्री. शित्रे, नाशकास लिमयांच्या येथें सहकुटुंब पाहुणे गेले होते. शित्र्यांची पत्नी सौ. सरस्वतीबाई लिमये यांची दूरची नातलग आहे.

त्याच वेळीं मुलीच्या लग्नाचा प्रश्न सहजच एकदा घरांत निघाला वाटतं. स्त्री मासिकाचा नवाच अंक लिमये यांच्याकडे आलेला होता. सौ. शिंत्रेबाई तो चाळीत होत्या. ' येवल्याच्या श्री. राधाबाई आपटे यांचा परिचय ' वाचून आपुलकीनें सौ. सरस्वतीबाईंना त्यांनीं दाखविला. तोंच त्यांना डॉ. शंभूची आठवण झाली व याच बाईंचा मुलगा लग्नाचा आहे व नुकताच एम्.बी.बी.एस्. झाला आहे वगैरे माहिती सौ. सरस्वतीबाईंनीं दिली, ती माहिती माझ्या सुनेनें म्हणजे सौ. कमलनें म्हणजेच त्यांच्या लग्नाच्या मुलीनें लक्षपूर्वक ऐकली, तेव्हां आमचं स्थळं लिमये कुटुंबाला मनापासून पसंत झालें. त्यानंतर पुढील पत्रव्यवहार सौ. कमलच्या आईनें माझ्याशीं सुरू केला. त्यांनीं स्वतःच्या कुटुंबाची परिस्थिति, ' मुलगी इंटरच्या क्लासमध्यें आहे, देखणी पण निमगोरी असें मी तिचें वर्णन करूं शकतें,' वगैरे मजकूर होता. त्या पत्राबरोबरच सौ. कमलाचा फोटोहि आमच्या हातांत पडला. चि. शंभूहि त्या वेळी येवल्यासच आलेला होता. मुलीचा फोटो आम्हां तिघांसहि पसंत पडला. मुलगी निमगोरी या शब्दांवर आम्ही तिघांनीं थोडीशी चर्चा केली.

मुलीचे वडील रा. विनायकराव लिमये इंजिनियर असून सध्यां नाशकांत स्वतःचा बंगला बांधून सुखवस्तु म्हणून राहात आहेत. तेव्हां अशा कुटुंबांतील मुलगी करण्यास कोणतीच हरकत आम्हांस वाटेना.

मुलगी दाखविण्याकरतां येवल्यास आणूं शकता का ? अशा तऱ्हेचें पत्र मी सौ. सरस्वतीबाईंना लिहीत असतांनाच ह्यांनीं शंभूस समजावून सांगितलें कीं, मुलगी निमगोरी याचा अर्थ मुलगी खास गोरी नसावी. ज्या अर्थीं पाहण्याकरितां बोलवीत आहां तेव्हां तिच्या वर्णाची चर्चा मुलगी पाहिल्यानंतर केव्हांहि करतां कामा नये. " मुलगी काळी असें समजूनच तिला पाचारण करणें आपणांस जमत असेल तर करावें. लिमये मंडळींना उगीच येण्या-जाण्याची दगदग आपण देऊं नये. "

आम्ही त्रिवर्गांनीं विचार करून मुलगी बघण्याचें ठरविलें व तसें पत्र मीं सौ. सरस्वतीबाईंना पाठवूनहि दिलें.

व्हायचं असलं म्हणजे सगळं झटपट होतं व वधूवर एकमेकांस पसंतहि होतात. सौ. कमलची आई सौ. कमलला घेऊन येवल्यास शिंत्रे मास्तरांच्या-

कडे माझें पत्र देखतांच आली. मी पहिल्यांदा कमलला बघून आलें. नंतर ह्यांनीं व शंभूनें दुपारीं बघितली. आम्ही सर्व मंडळी जरा लांब अशी फिरावयास गेलों. आम्हीं सर्वांनीं एका शेतांत बैठक दिली व चि. शंभूला सौ. कमलचा परिचय करून घेण्याकरितां अनुमति दर्शविली. मीं मुद्दाम शंभूला सांगितलें, आपल्या घराण्याची, आपल्या राहणीची, आपल्या ध्येयाची मीं कल्पना देण्यापेक्षां मुलीला–वधूला–तूं कल्पना देणें जास्त श्रेयस्कर होईल. तूं खादीधारी असून काँग्रेसचा पुरस्कर्ता आहेस ही गोष्ट सांगण्यास विसरूं नकोस असं मी शंभूस हळूहळू सांगत असतांनाच ह्यांनीं मोठ्यानें पण स्पष्ट असें शंभूस सांगितले, " हो हो, या सर्व गोष्टी तूं विशद कर. त्याच-प्रमाणें मुलीच्या कांहीं आकांक्षा असतील तर त्याहि तूं समजून घे. मन-मोकळें बोला, मगच जो ठरेल तो निर्णय आम्हांस सांगा. "

शंभू आणि कमल फिरावयास पुढें गेल्यानंतर आम्ही सर्व मंडळीः शिंत्रे कुटुंब व सौ. सरस्वतीबाईंच्या बरोबर आलेले त्यांचे मेहुणे, शेतामध्यें बसून गप्पा मारूं लागलों. बोलतां बोलतां आम्हीं कमलच्या आईला एक गोष्ट सूचित केली, ती म्हणजे आम्हांस गांवांत घर नाहीं, रानांत शेत नाहीं व बँकेंत पैसा नाहीं असें आमचे छोटेसें कुटुंब आहे, पण तें सुखी असें मात्र आहे. स्वतःच्या पोटचा गोळा दुसऱ्या घरीं देणें ही सोपी गोष्ट नव्हे, म्हणून या गोष्टीचा आपण पूर्ण विचार करावा. त्याचप्रमाणें श्री. काकासाहेब लिमये ( मुलीचे वडील ) आपल्याबरोबर आले असते तर बरें झालें असतें असेंहि ह्यांनीं सांगितलें. मुलगी देतांना आमची चार घरीं विचारपूस करणें हें योग्यच झालें असतें. तेव्हां सौ. सरस्वतीबाईंनीं हसत हसत सांगितलें, " आपलें आपटे गुरुजींचें नांव नाशिक जिल्ह्यांत माहीत नाहीं असं मला तरी वाटत नाहीं. आपल्या घराण्याची चवकशी करण्याचें कारण आम्हांस कांहींच नाहीं. कारण तंगीनें ( श्री. शिंत्रेच्या पत्नीचें नांव ) आपली सर्व माहिती आम्हांस दिलीच आहे. ह्यांना ताप आल्यामुळें हे आज माझ्याबरोबर येऊं शकले नाहींत, पण त्यांची संमती घेऊनच मी येथें आलें आहें. लग्न ठरविण्याचीच वेळ आली तर माझे मेव्हणे हे माझ्याबरोबर आणलेच आहेत. "

अशा तऱ्हेच्या आमच्या गप्पा सुरू आहेत तोंच चि. शंभू व सौ. कमल आमचेकडे परत येत असल्याचें आम्हीं पाहिलें. त्या दोघांची चाल, त्या

दोघांचे चेहरे, आम्ही दुरून निरखूनच रिझल्ट काय असावा याचा अंदाज करूं शकलों. तोंच ह्यांनीं आठवल्यासारखें करून सौ. सरस्वतीबाईच्या मेहुण्यांना सांगितलें, "मी आमच्या राष्ट्रीय शाळेकरतां म्हणून मुष्टिफंड सुरू केला होता म्हणजे भिक्षेची प्रथाहि आम्ही शिक्षक मंडळींनीं पाडली होती, ही गोष्ट आपणांस माहीत आहेना? कोणतीहि गोष्ट मागें राहूं नये म्हणून मी स्पष्ट करीत आहें." तोंच शंभू व कमल आमच्यामध्यें येऊन पोहोंचली व दोघांना आम्हीं प्रश्न करतांच दोघांच्या हास्यवदनांतून व लज्जायुक्त आविर्भावांतून आम्हीं त्यांचें उत्तर खास हेरलें व आम्हीं सर्व मंडळी घराकडे परतलों. आमच्या घराच्या दारापाशीं येतां येतां चटकन एक प्रश्न सौ. सरस्वतीबाईनीं मला विचारला, "मुलाला कर्जबिर्ज नाहीं ना? शिक्षणाचं कर्ज असलं म्हणजे कठीण होईल म्हणून विचारतें."

ह्यांनींच या प्रश्नाचें उत्तर दिलें. "शंभूलाच काय पण आम्हांलाहि कोणाचें कर्ज बिलकूल नाहीं. शंभूलाच कोणत्याहि तऱ्हेची जबाबदारी आज उचलावयाची नाहीं" असं सांगून आम्ही मंडळी आमच्या घरीं आलों व सौ. सरस्वतीबाई लिमये कमलला घेऊन शिंत्रे मंडळींच्या बरोबर त्यांच्या घरीं गेल्या.

दुसरे दिवशीं सकाळीं दहाचे सुमारास ह्यांची व लिमये मंडळींची लग्नासंबंधीं ढोबळ रूपरेषा ठरली गेली. खर्च ज्याचा त्यानें करावा. कोणीहि कोणाला मानपान म्हणून कांहीहि देऊं नये, असें ह्यांनीं आपलें स्पष्ट मत सांगितलें. आम्ही आमच्या मंडळींचा मानपान सांभाळूं. तुम्ही तुमच्या मंडळींचें बघून घ्यावें. कमलची परीक्षा मार्चमध्यें झाल्यावरच लग्नाचा मुहूर्त धरावा असें सर्वानुमतें त्या दिवशीं ठरलें.

आम्ही शंभूकरतां ही पहिलीच मुलगी पाहिली व तीच आम्हाला पसंत पडली. त्याचप्रमाणें लिमये मंडळींनींहि प्रत्यक्षांत नवरदेव म्हणून शंभूलाच प्रथम पाहिलें व तोहि त्यांना पसंत झाला.

लिमये मंडळी नाशिकला गेल्यावर श्री. काकासाहेब लिमये ( विनायकराव लिमये ) यांचें सविस्तर पत्र आलें. त्यांत आमचें स्थळ पसंत असल्याचें व कांहीं

मानपानाबद्दल विनंतीपूर्वक विचारणा केली होती. दोन्ही व्याह्यांचे पत्रव्यवहार होऊन शंभूचें लग्न कमलशीं निश्चित ठरलें. त्या वेळच्या कालाच्या ओघाप्रमाणें नाशिक मुंबई टपाल सुरू झालें. एखादी खेपहि चि. शंभूची नाशकास झाल्याची बातमी शंभूनें हलकेंच आम्हांस पत्रांत कळविली होती, तेव्हां साधकबाधक गोष्टींचा आम्ही विचार करून कमलच्या परीक्षेच्या आधींच शक्य तितक्या लवकर लग्न उरकून घ्यावें असें लिमये मंडळींना व मुंबईस शंभूला आम्हीं कळवूनहि टाकलें. तो विचार दोघांनाहि मान्य झाल्यामुळें १० फेब्रुवारी १९४४ हा मुहूर्त आम्हीं नक्की केला. येवल्यांतच लग्न करावयाचें आम्हीं ठरवून टाकलेलें होतें. मी व माझ्या येवल्यांतील भगिनी उत्साहानें लग्नाच्या तयारीस लागलों. पैशाची जुळवाजुळवहि त्या थोडक्या काळांत आम्हाला करावी लागली.

ज्याप्रमाणें पैशाची जुळवाजुळव करावी लागली त्याचप्रमाणें लग्नाचें साहित्य खेड्यामध्यें एकमेकांच्या मदतींतूनच मिळवावें लागतें. केळीचीं पानं, फुलं, फुलांचे हार, लिंबं वगैरे वस्तु लोकांच्या प्रेमामधून आमच्या घरीं येऊन पडल्या पण साखर ही कायद्यांत येत होती, जरी त्या वेळेला ती रेशनमध्यें गेलेली नव्हती. तरी ठराविक कोटाच कार्याकरतां दिला जात असे.त्यांत भानगड अशी झाली कीं, मामलेदारांनीं निम्माच कोटा लिमये व आम्ही दोघांना मिळून दिला. हे तर सरकारकडे अधिक मागणी करण्याच्या विरुद्धच. "लिमये मंडळींना आपण येवल्यांत बोलावलें तेव्हां त्यांची व्यवस्था आपण केली पाहिजे. अशा वेळीं इतकी थोडी साखर त्यांना कशी पुरेल ?" असं मी ह्यांना विचारायला व काकासाहेब लिमये वर यायला एकच गांठ पडली. ह्यांनीं मला जोरांत उत्तर दिलें, "भरपूर साखर असली तरच लग्न होतें काय ?" काकासाहेबांना ह्यांनीं साखरेची सर्व हकीगत समजून सांगितली.

# २६

काकासाहेब हसत हसत म्हणाले " अहो, साखर पावशेर मिळाली तरी देखील लग्न होईल. गुळाला काय गोडी कमी असते ? आबा, मीसुद्धां तेव्हांचाच माणूस आहे. तुमच्या इतकी टक्कर मी ब्रिटिश सरकारशीं देत नसेन पण—मी त्यांचा मिंधाहि नाहीं होणार. तुम्हाला माहीत नसेल मला पेन्शनबिन्शन कांहीं नाहीं. सरकारी नोकरी मीं होऊन सोडली व मग मी ग्वाल्हेर स्टेटमध्यें गेलों. " हें ऐकतांच त्यांनीं नोकरी कां सोडली हें कळून घेण्याकरितां ह्यांनीं लगेच विचारलं, " तुमचं व सरकारचं बिघडलं कुठें ? राजीनामा कां दिला ? "

मी देखील दोघांचा संवाद ऐकण्याकरितां दारांत उभी राहिलें. काकासाहेब म्हणाले, " अहो, तंटाबिंटा तसा कांहीं झाला नाहीं, पण माझं व वरिष्ठ अधिकाऱ्यांचं जमणं कधीं कधीं कठीणच जाई. आपल्याला पैसा देणं आणि पैसा घेणं म्हणजे खाणं कधींच रुचलं नाहीं. मला त्याची फार चीड. अहो, गुळाची भेलीसुद्धां कधीं मीं फुकट घरांत येऊं दिली नाहीं. मी आपला शेतकऱ्यांना सांगायचा तुमचं प्रेम आहे ना माझ्यावर ? मग उसाचा रस घ्यायला तुमच्या वस्तीवर येईन. " ह्यांनीं उत्सुकतेनं प्रश्न केला, " नोकरीचा राजीनामा कशासाठीं द्यावा लागला ? " काकासाहेब जरा लाल झाले व बोलण्याची गति वाढवून म्हणाले, " अखेरीला असं कारण घडलं. माझ्या हाताखालचा ज्युनियर मनुष्य माझ्या वरच्या जागेवर घातला गेला. मी आपला माझ्या जागेवरच. गोरा माणूस, काळा माणूस, जवळचा, लांबचा, हांजीहांजी करणारा, स्पष्टवक्ता हे भेद असायचेच. तें मला सहन झालें नाहीं. माझं काम अगदीं चोख—बरोबर असं असतांना माझ्यावर झालेला अन्याय मी कसा सहन करणार ? अहो, ज्ञान आपल्या डोक्यांत असेल तर कुठेंहि पोट भरतां येईल. अन् तसं झालंच. आपले वर्तकसाहेब

होते ना ? त्यांनीं मला लगेच उचललं व ग्वाल्हेर स्टेटमध्यें सहाशें रुपयाच्या नोकरीवर नेऊन ठेवलं. निस्पृह, स्पष्ट व तेखार्चीं माणसं आण्णासाहेबांना फार आवडायचीं. अहो, ते धुतल्या तांदळासारखे स्वच्छ होते."

" हो, हो, वर्तकसाहेब कोणाला माहीत नाहींत ? त्यांचे बंधु बापूसाहेब खादीधारी होते. सरकारी कामांत होते, पण पुढें पुढें करणं त्यांना कधींच पसंत नसें. अहो, एकदा त्यांचे साहेब घरीं आले होते, तेव्हां घरांतली घोंगडी साहेबाला बसायला त्यांनीं घालून दिली व बसा म्हणून खुणेनें दर्शविलं, असंहि मीं ऐकलं आहे. तीं माणसंच वेगळीं." ह्यांनीं काकासाहेबांना असं सांगून पुष्टि दिली त्यावरून आपल्या व्याह्यांबद्दल त्यांना वाटत असलेला अभिमान स्पष्ट दिसला.

त्याच वेळीं माझ्या डोक्यांत एक व्यक्ति येऊन गेली व ती म्हणजे वैद्य-पंचानन कवडेशास्त्री. त्यांनीं एकदा मला सांगितलं होतं, " परदेशी वस्तूवर बहिष्कार व स्वदेशीव्रत आम्ही इतकं पाळीत होतों, कीं मी माझा बी. ए. चा पेपरसुद्धां बोरूनें लिहिला. परदेशी निफ वापरलें नाहीं. "

अशीं कांहीं तडफदार माणसं त्या काळीं होतीं म्हणून स्वातंत्र्य लवकर आलं, नाहीं का ?

ठरलेल्या मुहूर्तावर चि. शंभूचें लग्न आमच्या त्या वेळच्या मानानें थाटांत पार पडलें. आम्हांला हवी असलेली सर्व मंडळी परगांवाहून अगत्यानें लग्नास आली होती. एकंदरींत माझ्या एकुलत्या एक मुलाचा लग्नसोहळा माझ्या मनाप्रमाणें, मला हव्या असलेल्या हौसेनें पार पडला.

कोणी कोणासच आपटे व लिमये यांनीं मान म्हणून कोणतीच देणगी देऊं नये व कोणीहि स्वीकारूं नये या विषयावर प्रथमपासून कार्य संपून लिमये मंडळी परत जाईपर्यंत हे लक्ष देऊन होते.

ही अतिरेकी निस्पृहता माझ्याकडील वडीलधाऱ्या मंडळींना बिलकूल पसंत पडली नाहीं हेंहि तितकेंच खरें. मला ही मोठी हौस होती कीं, माझ्याप्रमाणेंच माझ्या सर्व वडीलधाऱ्या ' स्त्रियांना ' तरी लिमये मंडळींनीं मानाचीं म्हणून लुगडीं द्यावींत, पण ही माझी हौस ह्यांनीं जागच्या जागींच

जिरवली व मला स्पष्ट सांगितलें, "या देण्याघेण्यांतूनच कटकटी निर्माण होतात. त्या मला बिलकूल नको आहेत. तुझी माहेरची मंडळी व माझी आतेष्ट मंडळी यांचा मान आपण आपल्या पैशानें करूं."

अखेर ह्यांच्या म्हणण्याप्रमाणेंच मला व लिमये मंडळींना वागावें लागलें. लिमये मंडळी नाशकास परत जाण्याच्या दिवशीं एक लुगडें व एक कुंकवाचा करंडा घेऊन सौ. कमलची आई आमच्या घरीं आल्या व ह्यांना आर्जवून म्हणाल्या, "तुम्ही हें शकुनाचें लुगडें नाकारूं नका," असें म्हणून लुगड्याची घडी ह्यांच्यापुढें ठेवली, व माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनें बघूं लागल्या-वर माझी आई व माझ्या वडील वन्सं ह्यांनीं, ह्यांना समजून सांगितलें व पुढें केलेली देणगी नाकारणें बरें होणार नाहीं असं स्पष्ट बजावलें. तेव्हां वडीलधाऱ्या मंडळींचा मान म्हणून व सौ. सरस्वतीबाईंचा आदर करणें योग्य वाटल्यावरून ह्यांनीं न बोलतां मूक संमति दर्शविली.

एकंदरींत शंभूच्या लग्नाकरितां रोख पंधराशें रुपये आम्हाला खर्च आला. माझ्या मावशींनी सुंदर तऱ्हेचीं मंगलाष्टकें करून आणलीं होतीं व तीं मंगलाष्टकें लग्नाच्या वेळीं शंभूच्या एका स्नेह्यांनीं सुस्वर आवाजांत गायलीं. शंभूच्या बरोबरीची मंडळी स्त्री-पुरुष आतेष्ट ह्यांनीं १-२ दिवस लग्नानंतर राहून फार मजा मजा अनुभवल्या. कांहींनीं गाणीं म्हणावीं, कांहींनीं गोष्टी सांगाव्या, कांहींनीं नकला कराव्या, स्वतः उखाणे घ्यावे व दुसऱ्याला उखाणे घेण्यास सांगावें अशा तऱ्हेचे कार्यक्रम हंसत खेळत बागडत तरुण मंडळींनीं साजरे केले.

एकंदरींत सर्वांच्या मनाप्रमाणें कार्य निर्विघ्न पार पडून मंडळी जिकडच्या तिकडे गेली. चि. शंभू मुंबईस आपल्या हॉस्पिटलमध्यें कामावर रुजूं झाला व चि. सौ. कमल आपल्या आई-वडिलांबरोबरच नाशकास जाऊन परीक्षेचा अभ्यास करूं लागली. थोड्याच दिवसांत सौ. कमल इंटरमीजियेटची परीक्षा उत्तीर्ण झाली व ती तार आम्हांस पोंचल्यानंतर आम्हांस खूपच आनंद झाला. लग्नाचा मुहूर्त परीक्षेच्या आधीं घेतल्यामुळें तिच्या अभ्यासाची थोडी फार आबाळ झाली होती, म्हणून ती पास झालेली तार पाहतांच एक प्रकारचा शिरावरचा भारच उतरला असें आम्हां दोघांस झालें.

ही जशी परीक्षा सौ. कमल उतरली तशीच अपत्यजन्माचीहि परीक्षा लग्नापासून बरोबर एक वर्षानें ११ फेब्रुवारी १९४५ रोजीं चांगल्या तऱ्हेनें पास झाली. चांगल्या तऱ्हेनें म्हणण्याचें कारण मला स्वतःला मुलगी नसल्यामुळें नातीचीच हौस फार होती. सौ. कमलनें गरोदरपणीं केव्हांहि नमस्कार केला तरी 'मुलगी होऊं दे' हा माझा आशीर्वाद ठरलेला होता. जणू कांहीं तो आशीर्वाद पूर्ण करण्याकरितांच परमेश्वरानें माझ्या इच्छेप्रमाणें मला नात दिली.

११ फेब्रुवारी म्हणजे तो महाशिवरात्रीचाच दिवस होता. बापलेकीचा वाढदिवस ( शंभू व विद्या ) एकाच दिवशीं येतो, त्यामुळें घरांत विशेषच मजा येते. प्रसूत झाल्याबरोबर कन्या झाली हें कळतांच सौ. कमलनें घाईघाईनें तिच्या आईला सांगितलें आधीं येवल्यास तार करा. मुलीचा आनंद ताईंना फार होईल.

मुलगी झाल्यामुळें कोणास काय वाटेल याचा विचार आमच्या दोघांच्या चित्तांत त्या वेळीं शिवला नाहीं. सुखरूप प्रसूति झाली, नात झाली या गोष्टींतून पुढचा विचार म्हणजे तिचें नांव काय ठेवावयाचें हा विचार आम्ही दोघेंहि करूं लागलों. हे चालवीत असलेल्या संस्थेचें नांव विनयमंदिर होतें, म्हणून त्यांच्या तोंडून एकदम वाक्य बाहेर पडलें 'विद्या विनयेन शोभते', म्हणून चि. शंभूसह आम्ही दोघे नाशकास जाऊन यथोचित्त बाळंतविडा करून नातीचें नांव 'विद्या' ठेवून परत येवल्यास आलों.

चि. शंभू हा मुंबईस राहून हाऊस सर्जनची नोकरी सांभाळून L.C.P.S. चा अभ्यास करूं लागला. त्यासाठीं विषय लिहून देतांना नाक, कान, घसा हा सर्जरीचा विषय त्यानें स्पेशल म्हणून घेतला. १९४६ सालीं शंभू चांगल्या रीतीनें पास होऊन आतां कोठें प्रॅक्टिस करावी हा विचार गंभीरपणानें करूं लागला.

नाशिक, पुणें, मुंबई वगैरे शहरें त्याच्या डोळ्यापुढें वावरत होतीं, तर आमच्या दोघांची दृष्टि येवल्याच्या बाहेर जातच नव्हती. आम्हांला वाटे शंभूनें येवल्यांत प्रॅक्टिस सुरू करावी म्हणजे आम्हाला गांव सोडायला नको,

व मुलगा–सून–नात आमच्या आंवतींभोंवतीं वावरतील. हीच आमची सर्वोत्कृष्ट प्रापंचिक सुखाची कल्पना होती.

तरुण पिढी इतकी अल्पसंतुष्ट कशी असणार ? व त्यांनीं तसं कां असावं ? हेंहि तितकच खरं. पुण्याच्या ससून हॉस्पिटलचे नाक-कान-घशाचे सर्जन डॉ. मंडलीक हे नुकतेच रिटायर झाल्याची बातमी चि. शंभूनें वाचल्या-बरोबर अर्ज तर टाकून ठेवतों म्हणून अगदीं सहजच अर्ज टाकला. इंटरव्ह्यू वगैरे होऊन प्रथम टेंपररी म्हणून चि. शंभूची डॉ. मंडलिकांच्या जागीं ऑनररी सर्जन म्हणून नेमणूक झाली. या वेळीं चि. शंभू, सौ. कमल व हे तिघेहि पुण्यासच होते. मी मात्र एकटीच येवल्यास व्यवसायानिमित्त राहिलें होतें. चि. शंभूचा एका खोलींतील छोटेखानी संसार पाहण्याकरितां हे प्रथम ८।१० दिवसांकरितां म्हणून पुण्यास गेले, त्याच वेळीं शंभूला ऑनररी पोस्ट सहजासहजीं मिळाली. ती आनंददायक बातमी मला तारेनें मिळतांच ‘ शंभूच्या मनासारखें झालें ’ म्हणून मला विशेष बरें वाटलें. बाकी ‘ ऑनररी सर्जन ’ हें काय प्रकरण आहे याची माहिती त्या वेळीं तरी मला अगदींच बेताची होती.

पहिलावहिला संसार, उभारीचे दिवस, त्यामुळें सौ. कमल व शंभू आपली कन्सल्टिंग रूम हलके हलके सजवूं लागले. छोट्या विद्येला बरोबर घेऊन सहकुटुंब आठपर्यंत कन्सल्टिंग रूममध्यें राहून नंतर डे. जिम-खान्यावर परत येत. पहिल्याच दिवशीं कन्सल्टेशन रूम उघडल्यानंतर दोन पेशंट आले व डॉक्टरीच्या धंद्याला सुरुवात झाली. नवीन सामानाची कांहीं खरेदी केली. रूमची कांहीं नवीन रचना केली, कीं पत्रानें सविस्तर हकीगत आम्हांस शंभू कळवीत असे व त्याच पत्रांत शेवटीं असावयाचें, “ ताई, तूं आतां बिलकूल त्रास घेऊं नकोस, लवकरच तुम्ही पुण्यास या ना ? ”

माझाहि येवल्यांतील काम करण्याचा नेट हलके हलके ढिला होत चालला होता. बाळंतपणाचा व्यवसाय वाढला होता, पण मला तितके श्रम सहन होत नव्हते. एकदा मनांत येई जावं पुण्याला व बसावं आरामशीर. आतां दगदग कुणासाठीं व कशासाठीं करावयाची ?

ह्यांचाहि मनाचा उत्साह दांडगा असला तरी शरीराचा उत्साह अपुरा पडूं लागला होता. नवीन नवीन कितीतरी मंडळी राष्ट्रीय काम अंगावर घेऊं लागली होती. स्वतःचा मोठेपणा कायम टिकविण्याकरितां सर्व सूत्रें व चळवळीचे धागे आपल्या हातांत ठेवण्याची प्रवृत्ति यांची कधींच नसल्यामुळें एक एक उद्योग इतर तरुण मंडळीवर कालानुक्रमें हे सोपवूं लागले होते. चिचोंडी येथील आश्रम फक्त मुलांच्या शाळेच्या रूपांतच आतां शिल्लक होता, कारण आमचे मामा खरे ( वि. रा. खरे ) यांच्या डोक्यांत एक नवीच शक्कल आली. ती म्हणजे परदेशाला जाण्याची.

मामा खरे वर्तमानपत्राचा व्यवसाय शिकण्याकरितां म्हणूनच परदेशाला गेले. 'मी येवल्याचा रहिवासी' असेंच त्यांनीं कागदावर नमूद केलें. ते परदेशाला जाईपर्यंत येवलेकर म्हणून ह्यांनीं त्यांची सर्व तऱ्हेची व्यवस्था स्वतः जातीनें करून दिली. त्या वेळेला मला ह्यांच्या वृत्तीचें मोठें नवल वाटलें. एकाहि शब्दानें ह्यांनीं मामांना कां आश्रम सोडतां ? असा प्रश्न केला नाहीं. पण उलट, पहिल्याच स्नेहपूर्ण प्रेमानें मामांची बोळवण केली. मामांनीं आश्रम सोडून एकदम परदेशीं जाण्याचें ठरविलें, यामुळें मी मात्र पुष्कळच बेचैन झालें. मी माझे विचार ह्यांच्याजवळ मामांच्याबद्दल स्पष्ट करीत असतांना, ह्यांनीं मला पटवून दिलें, "तूं म्हणतेस तशी मामांची उणीव मला भासत नाहीं असें नाहीं, पण ती उणीव सांगूनहि कांहीं होणार नाहीं हें मला पक्कें माहीत आहे. जाणाऱ्या माणसाचा विचार पक्का झाल्यावरच तो प्रकट करतो. आपण त्याचें मत पालटूं ही आशा सर्वस्वीं खोटी असते. आपल्या बोलण्याचा—आपल्या गरजेचा—आपल्या प्रेमाचा—त्या व्यक्तीवर कांहींहि परिणाम होत नाहीं. त्याला जें करावयाचें तेंच तो करतो. तेव्हां जाणाऱ्या माणसाला समाधानानें व आपुलकीनें आपण निरोप दिला पाहिजे आणि हें पाहा, माझी शक्तिहि दिवसानुदिवस कमी पडत आहे. तेव्हां या तरुण मंडळींची व्यवस्था वेळेवारी करणें हें माझें कर्तव्यच नाहीं का ? एका कामाच्या ध्येयवादानें एकत्रित झालेली मंडळी नेहमींच एकत्र राहतील हें केव्हांच होत नाहीं. मला अशीं माणसें सोडून जातांना माझी अडचण झाली तरी दुःख आणि निराशा वाटत नाहीं. मला ठाऊक आहे, तुला मात्र अशा गोष्टीपासून भयंकर त्रास होतो, आणि हें पाहा लवकरच घडणारी दुसरी एक

गोष्ट तुला सांगतों. माझ्यावर निष्ठेनें अवलंबून असणारे ल. ब. गुरुजी यांचीहि व्यवस्था योग्य अशी मी लवकरच करणार आहें. "

त्यांनीं सांगितल्याप्रमाणें दे. भ. शंकरराव देवांना खात्रीचा व राष्ट्रीय निष्ठेचा मनुष्य पाहिजे होता. श्री. शंकरराव देवांनीं पत्रानें विचारणा ह्यांना करतांच ल. ब. कुळकर्णी यांचें नांव ताबडतोब ह्यांनीं पुढें केलें.

पुणें टिळक विद्यापीठांत वर्धा योजना शिक्षण-प्रयोग सासवडजवळ पिंपळें येथें सुरू करावयाचा होता, त्याकरितां ल. ब. कुलकर्णी दिले गेले.

ल. ब. कुलकर्णी येवलें सोडून पिंपळ्यास गेल्यावर मला फार फार चुकल्यासारखें व कठीण असें वाटलें. ह्यांच्याजवळ माझ्या वृत्तीप्रमाणें विचार प्रकट केल्यावर ह्यांना कधींच बरोबर वाटत नसे. त्यामुळें माझी फार कुचंबणा होई. ह्यांनीं किती तरी वेळां मला समजून सांगितलें असेल, " आपल्या आंवतींभोंवतींची मंडळी व्यवस्थित जागीं आहेत हाच आपला खरा आनंद नव्हे का ? कांहीं मंडळींनीं आपल्याला सोडलें—आपणहि कांहीं मंडळींना सोडणार आहोंत त्याची तयारी अशा प्रसंगांतूनच माणसानें करावी लागते. अडचण ही माणसाला शिक्षण देऊनच पुढें जाते, त्यांतच माणसाची प्रगति होते. "

हें तत्त्वज्ञान ह्यांच्या अंगीं कायमचेंच भिनलेलें होतें, पण माझ्या मात्र डोक्यावरून पाण्यासारखें वाहून जात असे. त्यामुळें अशा प्रसंगीं मानसिक त्रास मला पुष्कळ काढावा लागे.

चिचोंडी गांवीं असलेले शिक्षक श्री. गोविंदराव कुळकर्णी आश्रमाचीं कामें व्यवस्थित पार पाडीत असत.

साखरेचे खाणार त्याला देव देणार—एक तरुण मुलगा प्रभाकर गुप्ते नांवाचा २-३ वर्षांपासून अधिक आपुलकीनें आमच्याकडे येत असे. त्याची कामाची आवड व राष्ट्रीय वृत्ति पाहून ह्यांनीं सहजच त्या मुलाला विशेष जवळ केलें व मला गमतीनें म्हणाले, " पाहा, देव तुझी व माझी काळजी वाहण्याकरितां कोणी तरी माणूस पाठवून देतो. "

या श्री. प्रभाकर गुप्त्यांना आईवडील नव्हते, त्यामुळें हा मनुष्य प्रेमाचा भुकेला होता व त्याचबरोबर राष्ट्राकरितां कांहींतरी करावें असेंहि गुप्ते

याला वाटत होतें. या मुलाचें शिक्षण १–२ वर्षें आमच्या राष्ट्रीय शाळेंत झालें होतें वाटतें. राष्ट्रीय शाळा बंद झाल्यानंतर हा मुलगा शिक्षणासाठीं मुंबईस गेला होता, पण बेताचेंच शिक्षण घेऊन स्वारी परत येवल्यास आली होती. १९४२ सालच्या लढ्यांतहि या मुलानें भाग घेतला होता. तेव्हांपासूनच त्याच्या व आमच्या निकट सहवासाला सुरुवात झाली.

आमच्या जवळच्ीं कार्यकर्तीं माणसें पांगलीं गेलीं. नवीं माणसें येवल्यांत पुढें येऊं लागलीं. अशा वेळींच प्रभाकर गुते व आमचें कुटुंब यांचा सम-समा हा एक योग्यच संयोग झाला. आम्हाला जिव्हाळ्याच्या माणसाची जरूर होती. प्रभाकरला प्रेमाची पांखर घालणारीं माणसं हवीं होतीं, त्यामुळें दोन गरजू माणसांचें नीट जमतें त्याप्रमाणेंच ह्यांच्या हातचीं राष्ट्रीय कामें हळूहळू हा मुलगा उचलून मदत करूं लागला. एकंदरींत प्रभाकर गुते या नांवांतून कार्य करून गुतेजी हें नांव येवल्यांत रूढ झालें व त्याच नांवानें आम्ही दोघेंहि त्यांना हाका मारूं लागलों. त्यांची चेहरेपट्टी व ह्यांच्याशीं वागण्याची पद्धत पाहून पुष्कळ मंडळी 'हे शंभूचे बंधु का?' असें विचारूं लागली. आम्ही दोघेंहि 'जवळ जवळ तसेंच ' असें हसतमुखानें उत्तर देऊं लागलों.

पधरा ऑगस्ट १९४७ हा दिवस भारताच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिला गेला. त्याचप्रमाणें राष्ट्रभक्तांच्या आयुष्यांत त्या दिवसास तसेंच फार महत्त्वाचें स्थान आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

दिल्लीमध्यें रात्रीं १२ वाजतां स्वराज्याचे सर्व तऱ्हेचे हक्क त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड मौंटबॅटन ह्यांनीं कॉंग्रेस पार्टीच्या हातांत सुपूर्त केले.

तो दिवस येवल्यांतहि सर्व जनतेनें अत्यंत आनंदानें व उल्हासानें 'म. गांधीकी जय ' च्या घोषणांनीं आंवतींभोंवतींचा प्रदेश दुमदुमून टाकून पार पाडला. मनुष्य आनंद निरनिराळ्या तऱ्हेनें उपभोगतो. प्रवृत्तीप्रमाणें त्या त्या आनंदाची पूर्तता होत असते. कोणी बागडतात, कोणी नाचतात, कोणी गातात तर कोणी खेळतात. अशा तऱ्हेनें अत्यंत उल्हासांत ता. १५ व ता. १६ ऑगस्ट हे दोन दिवस येवलेकरांनीं साजरे केले.

आमच्या आयुष्यांतील फार मोठा आनंदाचा सण '१५ ऑगस्ट १९४७' हाच होय. ह्यांचे कधीं वाढदिवस माझ्या आठवणींत आमच्या घरीं अगर

लोकांनीं साजरे केले नाहींत. मग आमच्या लग्नाच्या वाढदिवसाला तर कुठून जागा मिळणार ? जेमतेम चि. शंभूचा वाढदिवस मात्र आम्ही दरसाल बालगोपाल जमवून साजरा करीत होतों. कुलधर्म, कुलाचार, व्रतें-वैकल्यें सगळं कांहीं आमचं ह्यांच्या राष्ट्रीय बाण्यांत विलीन झालेलं होतं. म्हणजे आम्ही लांब तोंड करूनच आमचे सण साजरे करीत होतों असें नव्हें, पण प्राधान्य जें द्यावयाचें तें राष्ट्रीय दिवसालाच, हेंच आमच्या रोमरंध्रीं भिनलें असल्यामुळें बाकीच्या गोष्टी झाल्या नाहींत व आम्हीं केल्या नाहींत याची खंतहि आम्हांस वाटली नाहीं.

ह्यांच्या आयुष्यांतील मनांत धरलेलें ध्येय–स्वराज्य व स्वातंत्र्य हें १५ ऑगस्टला प्राप्त झाल्यामुळें मी मात्र ह्यांची मनापासून पूजा करून त्या दिवशीं माझ्याजवळ असलेले पन्नास रुपये ह्यांच्या हातांत मोठ्या आदरानें व प्रेमानें दिले. ह्यांच्या निष्ठेला व कष्टाला काय किंमत द्यावी हें सांगणें फार दुरापास्त गोष्ट आहे.

चि. शंभू व सौ. कमल पुण्याहून रात्रीं १२ वाजतां छोट्या विद्येला घेऊन आमच्या या आनंदांत सहभागी होण्यास धावत आले. त्याचप्रमाणें आमचे ल. ब. कुलकर्णी येवल्यांत येऊन त्याच गाडीनें हजर झाले. ते २।४ दिवस आम्हीं अतिशय आनंदांत व समाधानांत येवलेकर जनतेसह काढले.

मनाची एक गम्मत लिहिल्यावांचून राहावत नाहीं. त्या वेळीं ब्रिटिश सैनिक व ब्रिटिश लोक हे भारतांतच होते. नाशिकमध्यें मे. मुख्य प्रधान खेर यांना त्या ब्रिटिश लोकांनीं मान वाकवून वंदना दिली ही गोष्ट कानांनीं ऐकतांच एक प्रकारचा स्वाभिमानयुक्त आनंद झाला. जणू कांहीं आज-पर्यंतचें जुलमी ब्रिटिश सरकार आमच्या पुढें नमलें व हक्कानें आम्हांस मानवंदना देऊं लागलें. या घटनेंत एक प्रकारची कांहींतरी लज्जत आम्ही अनुभवीत होतों. ही विचारसरणी कदाचित् अत्यंत गौण असेल, पण त्या वेळीं हा विचार पुष्कळच लोकांच्या मनांत येऊन गेला हेंहि तितकेंच खरें.

ह्यांना मी कांहीं दिवसांनीं या विचारसरणीबद्दल विचारणा केली असतां ह्यांनीं मला सांगितलें, " तुम्हां पुष्कळ मंडळींना जें वाटलें तें आम्हां लोकांनाहि

वाटणारच, परंतु या घटनेला आम्ही केव्हांहि चिकटून राहणार नाहीं. तेव्हां अहंकारपूर्ण विचार येणें ही गोष्ट जरी स्वाभाविक असली, तरी स्वराज्याची लायकी वाढविणें, या गोष्टीकडे आपली दृष्टि आतां वळविली पाहिजे. मिळवणं सोपं असतं, पण पेलणं फार कठीण असतं. लग्न करणं ही गोष्ट कठीण नाहीं, पण बायको वागवणं ही गोष्ट फार कठीण असते नाही कां ? " असें म्हणून ते मिस्कीलपणें हसत व त्याच वेळीं त्याच बरोबर स्वतः कबुली देत तूंहि माझ्यासारखा नवरा वागवून घेतलास.

हे संवाद टिपण्याचें कारण आमचा सर्व आयुष्यक्रम एका ध्येयाच्या पाठीमागें लागून गंभीर वृत्तींत गेला असला तरी दैनंदिन कारभारांत आमच्या संसारांत विनोदाचे—प्रेमाचे—श्रृंगाराचें मऊ रेंगण नसतें तर ही संसाराची गाडी आनंदानें शेवटपर्यंत पोंचलीच नसती.

स्वराज्य मिळाल्यानंतर जनतेची काम करण्याची दिशा निराळी बनणं अगदीं स्वाभाविक होतं. त्या दिशेनें आतां काम करण्यास तरुण पिढी सरसावली होती. जुन्या पिढींतील कार्यकर्ती माणसें जरी निष्ठावंत असलीं तरी त्यांचें मार्गदर्शन तरुण पिढीला उगीचच लुडबुड वाटेल याचा वास कार्यकर्त्या मंडळींना मिळतांच आपापली पडशी पाठीवर टाकून दुसरा रस्ता धरणें हें शहाणपणाचें होतें व याची जाणीव ह्यांना त्या वेळीं पूर्णपणें होती. हे लोकांना सांगावयाचे, " नदीच्या आधींच वहाणा काढणें हें माणसाला अधिक सोईचें होतें. म्हणून येवल्यांतील जनतेमध्यें माझें कार्य संपलें. मी कांहीं तरी स्वराज्याकरितां करीत राहणारच, पण तुमचे माझे मार्ग आतां भिन्न झाल्यास मी कोणत्याच प्रकारें दोष आपणांस देणार नाहीं. आपल्या विचारांस, आपल्या मार्गास, आपल्या पद्धतीस ठिकाण जरूर हवें. जरी कॉंग्रेसच्या दैनंदिन कारभारांतून मीं लक्ष काढलें तरी आपण राग मानूं नका, " अशा तऱ्हेचीं बोलणीं वारंवार यांचीं ऐकूं येऊं लागलीं, व त्याप्रमाणें ह्यांनीं कॉंग्रेसच्या प्रत्येक कार्यांतून आपला पाय काढता घेतला.

एक दिवस ह्यांनीं माझ्यापुढें विचार मांडला तो म्हणजे—तुला चार दिवस बरे तर चार दिवस वाईट असें तुझें प्रकृतिमान अलीकडे झालेलें आहे. तेव्हां तुझा दमा न वाढावा याकरितां आपण आतां काळजी घेतली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा
अनुक्रम 32046 वि: 4219
क्रमांक 9030 नों दि: 24


पाहिजे. चि. शंभूचीं पत्रें आपल्याला पुण्याला बोलावण्याचीं आग्रहाचीं येत आहेत. म्हणून येवलें सोडण्याचा विचार करूं या, म्हणजे बरें होईल.

हा विचार जरी स्तुत्य असला–मला आवडणारा असला–तरी त्या विचारानें मला फार मोठा धक्का बसला. “ आपल्याला हवं असलेलं सर्व कांहीं या येवल्यांत आहे. मग गांव सोडण्याचीच जरूर काय ? आपण मधून मधून पुण्यास जाऊन चि. शंभूचा संसार बघूं या. ” असं मी ह्यांना नेहमींच सांगावयाची, पण घडावयाचें तसेंच घडलें. १९४७ सालीं अखेर अखेर फार मोठें दुखणें मला झालें. जवळ-जवळ त्या दुखण्यांतून मी वांचलें म्हणजे तो माझा पुनर्जन्म झाला. ७-८ दिवस तीन तीन डिग्री ताप माझ्या अंगांत सतत राहात होता. डॉक्टरांनाहि तापाचें निदान बरोबर होईना. एक दिवस माझी तब्येत अतिशय बिघडली तेव्हां पुण्याला शंभूस ह्यांनीं तारच केली. त्या तारेचा परिणाम म्हणजे शंभू तर रातोरात स्पेशल मोटार करून सौ. कमल व विद्येसह पुण्याहून निघाला, इतकेंच नव्हे तर आमच्या परिचयाचे व शंभूला गुरुस्थानीं वाटत असणारे कै. डॉ. दाते यांनाहि तो बरोबर घेऊन आला. कारण काय, तर ताईच्या अशा कठीण अवस्थेंत मला औषधयोजना कितपत सुचेल असं तो मनांत म्हणत होता. म्हणूनच डॉ. दाते यांनाहि त्याच्याबरोबर यावें लागलें. त्याच दिवशीं गाडीनें माझे वृद्ध वडील व नर्स असलेली माझी मावशी माझ्यासाठीं हजर झाली.

एकंदरींत माझी मोट बांधून सर्वांनीं मला ह्यांच्यासह पुण्यांत आणलें. पुण्यांत आल्यानंतर तज्ज्ञ डॉक्टरकडून परीक्षा होतांच रोगाचें निदान झालें व रोगावर औषधानें मात केली. तरी पण दुखणें महिनाभर पुण्यास आल्यावरहि पुरलें.

३० जानेवारी १९४८ ह्या दिवसाचीहि आठवण भारतांतला कोणताच मनुष्य विसरणार नाहीं. अशीच ती घटना होती. ती गोष्ट म्हणजे पूज्य महात्माजींचा प्रार्थनेच्या वेळीं दिल्लीस झालेला खून होय. रेडिओवर प्रथम ही बातमी पुण्यांत सर्व मंडळींना समजली, पण मी आजारी असल्या-मुळें ती बातमी माझ्यापासून गुप्त ठेवली गेली. मी त्या वेळीं माझे वडिलांचे घरीं दुखणेकऱ्याला फरक म्हणून गेलेली होतें. ३० तारखेची

माझ्यापासून गुप्त ठेवलेली बातमी ३१ तारखेला चहूंकडे म्हणजे पुण्यांतहि गर्जू लागली व त्याचे परिणाम जनतेला जाणवूं लागले. त्या दिवसाची धामधूम पुण्यांतहि सामान्य नव्हती. त्या धामधुमींतूनच मला महात्माजींची झालेली हत्या समजली. त्या दिवशीं मला काय वाटलें हा विचार करण्यापेक्षां ह्यांना आज या बातमीनें काय होईल हाच विचार माझ्या मेंदूला जास्त त्रासदायक होऊं लागला. पुण्यांत दोन दिवस कर्फ्यु असल्यामुळें ह्यांची, शंभूची अगर कोणाचीच हकीगत मला समजूं शकली नाहीं व माझीहि प्रकृति एका गांवांत असूनहि ह्यांना कळूं शकली नाहीं. असे ते दिवस सर्व नागरिकांनाच भयंकर गेले म्हटल्यास हरकत नाहीं.

माझ्या मनोवृत्तीप्रमाणें २८ वर्षे मांडलेला संसार मोडून येवलें गांव सोडून येणें त्या वेळीं तरी अवघड असेंच झालें. मी पुष्कळ वेळां ह्यांच्याशीं 'आपण येवलें सोडलें' या विषयावर बरें वाईट संभाषण करून कित्येक वेळां डोळ्यांतून पाणीहि काढीत असे. ह्यांनीं मात्र येवल्याबद्दलची प्रीति अगर आसक्ति पुण्यास आल्यावर कसलीच दाखविली नाहीं. इतकेंच नव्हे तर, हे हसत हसत सांगावयाचे "कृष्णानें गोकुळ सोडल्यावर पुन्हा गोकुळास तो गेला नाहीं. तो जर मागें बघत राहिला असता तर मथुरेंतलें कार्य त्याच्या हातून पुरें झालेंच नसतें. येवल्यांतील कार्य संपलें. काळ संपला. आपण गांवहि सोडलें. उगीच तेंच तेंच स्मरण करून काय साधणार! तरी आपण पुण्यामध्यें जें आपणां दोघांस करतां येईल तें दोघें करत राहूं या."

रुळाचा सांधा बदलला तरी आगगाडी कधीं कुरकूर करीत नाहीं. बदललेल्या रुळावरून तितक्याच वेगानें जाऊं शकते. त्याचप्रमाणें ह्यांची सार्वजनिक कामाला सुरुवात पुण्यांतहि झाली.

पुण्यास आल्यावर वाचनाला भरपूर वेळ, सन्मित्रांचा सहवास, विद्वानाच्या परिसरांत कालक्रमणा या गोष्टी दिवसेंदिवस ह्यांना उल्हसित करीत होत्या. इतकेंच नव्हे तर, पुण्यामध्यें निरनिराळ्या क्षेत्रांमध्यें जी सार्वजनिक मंडळी हिरीरीनें काम करीत होती, त्यांच्याबरोबर आपल्या गोड स्वभावानें ह्यांनीं मनमिळवणी करून भरीव तऱ्हेचें सर्व क्षेत्रांत कामहि केलें.

टिळक महाविद्यालय, लोक शिक्षण समिति, कॉंग्रेस कमिटी वगैरे संस्थांचीं कामें ह्यांच्याकडे पुष्कळच असावयाचीं. सर्व तऱ्हेचें वाचन करण्याची आवड व वाचलेलें म्हणजे मिळविलेलें ज्ञान आत्ममात् करून सांगण्याची ह्यांची शैली और असल्यामुळें लहान मुलांच्या शाळेपासून तों प्रौढांच्या सभेमध्यें ह्यांनीं आपले विचार सर्वांना दिलेले आहेत व ते सर्वांना मनपसंत वाटलेले आहेत.

सचोटीचे, निर्भीड आणि कर्तव्यदक्ष कार्यकर्ते असा लौकिक ह्यांनीं पुण्यांत मित्र-मंडळींत मिळविला होता.

एकंदरीनें आम्ही पुण्यांत आल्यामुळें ह्यांचीं पुण्यांतील ७-८ वर्षें अत्यंत आनंदांत गेलीं.

माझाहि जम हलकेंहलकें पुण्याच्या वातावरणांत बसूं लागला; व मलाहि हवीं असलेलीं सार्वजनिक कामें मिळाल्यामुळें माझा काळहि ह्यांच्यासारखाच उद्योगांत जाऊं लागला.

संस्थानें विलीन झाल्यानंतर कांहीं अडचणी, कांहीं सुखदुःखें संस्थानिकांना भासलींच असतील. त्याप्रमाणें आमचा दोघांचा आयुष्यक्रम चि. शंभूच्या संसारांत विलीन केल्यानंतर थोडा फार तशा तऱ्हेचा अनुभव आला असेलच. पण ती क्रमप्राप्तच गोष्ट होती. आम्ही दोघें पुण्यास उचलून आलों होतों. त्यामुळें चि. शंभूचीं सर्व प्रकारें तंत्रें सांभाळणें हें आमचें कामच होतें. कांहीं वेळां तरी मला ही अडचण भासमान होऊन तसा उच्चार ह्यांच्या जवळ कधीं कधीं मीं केलाहि असेल. अशा वेळेला विचार करून ठरवलेलें उत्तर कायम माझ्यापुढें ह्यांनीं ठेवलें. तें म्हणजे– "देवी काढल्या म्हणजे ताप येणारच, त्याप्रमाणेंच संसारांत एकाची सोय तर दुसऱ्याची गैरसोय होतच असते. तुला जी गोष्ट समजते ती गोष्ट मलाहि समजते, पण तुला ती चिकटून बसते, मी झटकून दूर पळतों. त्यामुळें मला बिलकूल त्रास होत नाहीं." हें सांगण्याचा अगर लिहिण्याचा उद्देश एवढाच, पण तो फार मोठा आहे. तो म्हणजे प्राप्त झालेल्या परिस्थितीबद्दल कधींहि तक्रार करावयाची नाहीं, येवढेंच नव्हे तर मनाची शांति व प्रसन्नता केव्हांहि ढळूं द्यावयाची

नाहीं. हा बाणा त्यांना सहज साधला होता, म्हणून 'पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा' असें कुठल्याहि परिस्थितींत जीवन सुखमय करण्याची कला ह्यांना अवगत होती. त्यामुळें ह्यांनीं जीवनावर विजय मिळविला होता असें मला तरी वाटतें.

आम्ही पुण्यास आल्यावर ह्यांच्या आयुष्यांतील तिसऱ्या पर्वाला सुरुवात झाली. या पर्वामध्यें माझ्या लक्षांत येण्यासारखा फरक ह्यांच्यामध्यें बराच झाला. स्वभावाची बैठक जरी एक असली तरी केलेलें काम उपयुक्त असावें, झालेंच पाहिजे असा अट्टाहास त्यांच्यामध्यें फार कमी झाला होता, म्हणजे ते अध्यात्मदृष्टीनें स्वतःच्या व दुसऱ्याच्या आयुष्याकडे बघूं लागले होते. याचें स्पष्ट उदाहरण म्हणजे ह्यांचा रागीट स्वभाव पुण्यांत आल्यावर दिवसेंदिवस अधिक शांत होऊं लागला. घरामध्यें कुणाच्या हातून कांहीं चुका झाल्या तरी त्या सरळ करून घेऊन पुढें वाटचाल करण्याची प्रवृत्ति ह्यांच्यामध्यें वाढती दिसूं लागली.

काळहि पालटला होता. तरीहि ह्यांचीं स्वतःचीं तत्त्वें बिलकूल ढिलीं झालेलीं नव्हतीं. पण आपल्या तत्त्वाकरितां दुसऱ्याला त्रास होऊं नये या गोष्टीकडे ह्यांच्या तत्त्वापेक्षां हे आधिक लक्ष वेधूं लागले. हीच ह्यांच्या जीवनांतील प्रगति होय.

पुण्यास आल्यानंतर कोणत्याहि गोष्टीबद्दल फार वेळ विचार करणें अगर तो मुद्दा चार्चिणें ह्यांना बिलकुल पसंत पडत नसे. हे म्हणत कोणत्याहि गोष्टीचा काथ्याकूट करून त्यांतून कांहीं निष्पन्न होणार असेल—चांगला फरक होणार असेल तर अवश्य करावा, नुसता कोळसा उगाळण्यांत स्वतःचं मन दुबळं होतं. चिडचिड होतं. तेव्हां स्वतःच्या उन्नतीसाठीं या किरकोळ गोष्टी समजून त्या बाजूला टाकून द्याव्यात, तरच माणसास या वयांत सुख लागेल.

उदाहरणार्थ, पुष्कळशा परदेशी वस्तु घरामध्यें शंभूच्या संसारांत येऊं लागल्या म्हणजे ह्यांना ती गोष्ट पसंत असेल असें केव्हांहि नव्हतें, परंतु त्या गोष्टीचा उच्चार ह्यांनीं कशाहि तऱ्हेनें केला नाहीं. आंघोळीस जातांना आपली स्वतंत्र स्वदेशी साबणाची वडी हातांत घेऊन बाथरूमचा मार्ग ते

स्वीकारीत. अशाच तऱ्हेच्या किरकोळ गमती घरांत घडत. त्या सर्व गोष्टी हसण्यावारी नेऊन दुसऱ्यास न दुखवतां आपलाहि मार्ग स्वीकारीत.

चि. शंभू ह्यांच्याप्रमाणेंच खादीधारी प्रथम होता, पण ‘ ज्याचें त्यानें सूत काढून वस्त्रस्वावलंबी स्वतः व्हावें ’ अशी महात्माजींची इच्छा व आज्ञा जाहीर झालेली होती, त्या वेळेला शंभूनें, “ आबा, तुम्ही सूत काढून दिल्यासच मला खादीधारी राहतां येईल. मला सूत जरी काढतां येत असलें तरी माझ्या डॉक्टरी व्यवसायांत मला तें जमणार नाहीं. ” तेव्हां ह्यांनीं गोड पण स्पष्ट शब्दांत खुलासा केला, “ मी सूत काढून तूं खादीधारी राहणें, महात्माजींना पसंत पडणार नाहीं. सच्चे, नेटाचे खादीधारी किती लोक आपल्याजवळ आहेत हेंच महात्माजींना पाहावयाचें आहे, तेव्हां अशा तऱ्हेची फसवणूक करणें योग्य ठरणार नाहीं, तरी तुझ्या इच्छेप्रमाणें तूं खादी धरूंहि शकतोस आणि सोडूंहि शकतोस. ”

येवल्यांत असतांना मी काँग्रेसच्या तत्त्वासाठीं म्हणून म्युनिसिपालिटींत अगर लोकल बोर्डांत असतांना खादीधारी होतें, पण त्यानंतर अगर त्याच्या-आधीं खादीधारी अशी नव्हतें. त्याचें एक कारण मी बाळंतपणाचा धंदा करीत असल्यामुळें व तोहि येवल्यासारख्या खेड्यांत असल्यामुळें दिवसांतून वारंवार खादीचीं लुगडीं बदलणें माझ्या आर्थिक परिस्थितीला शक्य नव्हतें. हें जरी खरें असलें तरी संपूर्ण खादीधारी होण्यानें विशेष कांहीं साधेल असें मला कधींच न वाटल्यामुळें खादीची धरसोड मीं केली नाहीं. परंतु हें लिहिण्याचें कारण मुख्यत्वें हें आहे कीं, या विचारावर—या खादीच्या विचारावर—आम्हीं दोघांनीं पुष्कळ चर्चा केली, परंतु ह्यांनीं या बाबतींत माझ्यावर सक्ती केव्हांच केली नाहीं. ते हसून मला सांगत, “ तुला ज्या दिवशीं ही गोष्ट पटेल त्या दिवशींच तूं हें व्रत म्हणून घे. ”

पुण्यास आल्यानंतर १९४८ सालानंतर विशेषच आनंदी राहण्याचें ह्यांनीं ठरविलेलें मला दिसून आलें. कुठल्याहि गोष्टीमध्यें त्यांचा नव्या तऱ्हेचा उत्साह पाहून मला नवल वाटे. त्यांनीं आम्हां सर्वांना बोलण्याच्या ओघांत कधीं कधीं सांगावें, “ उसन्या अगर कृत्रिम आनंदाच्या वातावरणांत आपण

जरी वावरलों तरी त्याचा परिणाम आपल्यावर न कळत चांगला असा होतो. प्रकृति सुधारण्यास मदत होऊन बरोबरीच्या मंडळींना व घरांतील वावरणाऱ्या मंडळींना आपोआपच समाधान मिळतें." हें ह्यांचं म्हणणं व त्याचं प्रत्यंतर ह्यांच्या बाबतींत मला पुरेपुर दिसत होतं. ह्यांचा उत्साह पुण्यास आल्यावर वाढलेला आम्हां सर्वांना प्रतीत झाला. इतकेंच नव्हे तर, ह्यांची प्रकृति पुण्यास आल्यावर खरोखरीच सुधारली होती. कोणत्याहि सार्वजनिक कामांत अगर घरांतील किरकोळ कामांतहि ह्यांचें लक्ष चांगल्या तऱ्हेनें लागत असे. लेखक नित्य लिहिण्याकरितां येतच असे. त्या वेळच्या उत्साहाच्या भरांत 'उत्साही वृद्धत्व' या शीर्षकाखालीं ह्यांनीं लिहिलेला लेख 'किर्लोस्कर' मासिकांत त्या वेळीं आलेला होता व तो पुष्कळ मंडळींना पसंतहि पडला होता.

घरोघरीं वडीलधारी म्हातारी मंडळी घरांत असली म्हणजे पुष्कळशा कटकटी व वडील माणसांबद्दल अप्रीति हळूहळू निर्माण होते, कारण तरुण पिढीला बोचणारे, खुपणारे शब्द म्हाताऱ्या माणसांच्या तोंडून अधिकारवाणीनें पुष्कळ वेळां बाहेर पडतात, परंतु असा एकहि प्रसंग ह्यांच्या पुण्याच्या आयुष्यांत केव्हांहि आला नाहीं. मित्राचें नातें पुत्राच्या ठराविक वयानंतर पितापुत्रांत निर्माण होतें, असं म्हणणारीं माणसं समाजांत पुष्कळ दिसतील, परंतु वेळ आली असतांना, आपण मनाचा संयम करून असं चालायचंच अशी मनाची गोड समजूत करून, क्षणभर दूर होऊन, पुन्हा मुलाच्या मायिक संसारांत रंग भरणारे वडील विरळाच सांपडतील. ह्यांची दृष्टि अध्यात्म दृष्टीनें कुठेंतरी चिकटलेली असल्यामुळें संसारांतील किरकोळ गोष्टीचा मोह टाळण्याची कला ह्यांना चांगलीच साधली होती. या आठ वर्षांच्या प्रयत्नाचें श्रेय शेवटच्या दुखण्यांत ह्यांना साधतां आलें.

मुलाच्या नव्या संसारांत हे मिसळून जात असत. म्हणजे शंभूनें सिनेमाला चला म्हटलं कीं, ताबडतोब ह्यांची तयारी असावयाची; 'आपली गाडी घेऊन लोणावळ्याला दोन दिवस जाऊं या' असाहि शंभूनें आग्रह केला तरी ह्यांची तयारी असायची; व त्याचप्रमाणें "आबा, तुम्ही आज घरांत राहाल का? आम्ही बाहेर जाणार आहोंत म्हणून" असंहि चिरंजीवांनीं सांगितलें तरी

ते चट्दिशी उत्तर देत, " अवश्य जा. मी घरांत आहेंच. आल्या गेल्या मंडळींचें स्वागत करण्याकरितां " असं सागून आनंदानें एकटेहि वाचीत तासन् तास कोचावर पडून राहात. कधीं कधीं मला प्रश्न पडे, हे जरी सरळ वृत्तीचे असले तरी इतके लवचीक खास नव्हते. हें असं कसं घडत आहे ?–मीं नुसतें हसून त्यांच्याकडे बघितलें कीं, ते म्हणत, " तुझ्या प्रश्नाचें उत्तर सावकाशीनें देईल "–तसा निवांत वेळ मिळतांच आपण होऊन मला म्हणत, " आपण वृद्ध झालेलीं माणसं, कांहींतरी घरांतील बोजा उचलूं तरच आपला बोज घरांत राहील. आपलंच वैशिष्ट्य हृदयाशीं बाळगून दुसऱ्या मंडळींना सतत आज्ञा करण्यापेक्षां लहान मंडळींची इच्छा आपण आनंदानें मानली तर त्यांनाहि बरं वाटेल, व आपणांलाहि निराळेंच समाधान प्राप्त होईल. तुम्हांला नेहमीं तिखट चुरचुरीत पदार्थ खाण्याची ( स्वतंत्रता भोगण्याची ) संवय झालेली असल्यामुळें नुसत्या उकडलेल्या भाज्यांची चव कशी कळणार ? " आणि लगेच मला म्हणत, " खरोखरीच नुसत्या उकडलेल्या भाज्यांची लज्जत मला आतां कळूं लागली आहे. तुला माहीत नसेल–तूं तुझ्या सार्वजनिक कामाच्या धांदलींत असतेस, पण मी खाण्याचे नानातऱ्हेचे प्रयोग करून निराळाच आनंद अनुभवीत असतों–" हें मात्र खरं, नानातऱ्हेच्या गमती ( देहाच्या जरुरी कमी करण्याचे प्रयोग ) आम्हांला न कळत त्यांचे सुरू असत.

पुण्यास आल्यानंतर आमचें बिऱ्हाड माडीवाले कॉलनींत होतें. जवळच कॉंग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते दे. भ. हरिभाऊ फाटक राहात असत. त्यांची व ह्यांची मैत्री जमून हरिभाऊंच्या बरोबरच सकाळची सहल ह्यांची होऊं लागली. हरिभाऊंच्या बरोबर कुठें तरी हरिजन वस्तींत अगर अन्य सामाजिक कार्यांत सकाळचा नऊ वाजेपर्यंतचा वेळ ह्यांचा सहज जात असे.

एक दोन गोष्टी ह्यांच्या येवल्यास काय अगर पुण्यास आल्यावर काय टळल्या नाहींत. येवल्यामध्यें रात्रीं सामुदायिक प्रार्थना करूनच हे झोपत असत. प्रार्थनेस कोणी नसलें तरीहि त्यांना राग लोभ नसे. पहिल्यापासूनच रात्रीं दहाच्या पुढें जागणें ह्यांना मनापासून कधींच जमत नसे. दहाला ते निजत व पहाटे पांचला उठून अंथरुणांत सकाळची प्रार्थना उरकूनच

वाचनास आरंभ करीत. पहाटेचें दोन तास वाचन, ही त्यांची अत्यंत मनपसंत गोष्ट होती. तें वाचन झालें म्हणजे दिवसभर वाचनाबद्दलची तक्रार आम्हांस ऐकावी लागत नसे. ह्यांची वाचनाची प्रवृत्ति ललित वाङ्मय अगर कादंबऱ्या यांकडे मीं फारशी पाहिली नाहीं. कोणतेंहि मासिकाचे अंक आले तरी वरवर चाळीत, पण शास्त्रीय, राजकीय, आध्यात्मिक अशा लेखांवर ह्यांचें लक्ष चटदिशी लागून तो लेख पुरा केल्यावरच त्यांना बरें वाटे. अशा तऱ्हेची वाचनाची आवड-निवड जरी ह्यांची होती तरी नाट्यप्रयोग–प्रहसनें स्वतः लिहून अगर इतर नाटकांतले प्रवेश शाळेंतील बालगोपालांकडून करवून घेणें, त्यांच्या तालमी देणें वगैरे कामें ह्यांचीं फार आवडीचीं होतीं. मात्र हे सर्व प्रयोग राष्ट्रभक्तीच्या धाग्यामध्यें गुंफलेले असावयाचे. हीच तर विशेष गोष्ट त्यांच्यामध्यें होती.

श्री. हरिभाऊ फाटक, श्री. दा. न. शिखरे, श्री. नी. शं. नवरे ही मंडळी सकाळच्या फिरण्यामध्यें बहुतेक असावयाची. निरुपद्रवी स्वभाव, ज्ञान, लालसा व मित्रप्रेमाची आवड अशी ही मंडळी असल्यामुळें एकमेकांचे सहवास लवकरच दृढ स्वरूपाचे झाले. सकाळीं फिरून आल्यानंतर सकाळचा फराळ करतांना शंभू, सूनबाई, नातवंडं ह्यांच्याशीं हास्यविनोद चालावयाचा. वर्तमानपत्राचें वाचन त्याच टेबलावर होईल. त्याच वेळीं शंभूला हॉस्पिटलमध्यें जाण्याची वेळ झाल्यामुळें तो जरी निघून गेला तरी ह्यांच्याशीं गप्पा मारण्यांत आलेल्या माणसाला स्वारस्यच वाटावयाचें. लहान मंडळींना ह्यांच्याशीं बोलण्यांत वयाचा धाक अगर संकोच वाटत नसे. अत्यंत क्षुल्लक प्रश्न कित्येकांनीं ह्यांना विचारलेले मीं ऐकले आहेत. मला तर अशा वेळीं ती चर्चा ऐकतांना हसूंच येई, पण ह्यांनीं कधीं टाळाटाळी करून पुढें बसणाऱ्या माणसांचा विरस केला नाहीं. अशा प्रसंगीं आमच्या नातीहि पाट्या पेन्सिली घेऊन अभ्यासाचा आंव आणून ह्यांच्याभोंवतीं दंगा करण्यास सुरुवात करीत. तरीहि ह्यांना चिडलेले असं मीं पाहिलें नाहीं. मात्र हा इतका फरक पुण्यास आल्यावरच त्यांच्यामध्यें दिसत होता.

साडेदहा अकराच्या सुमाराला ह्यांचें स्नान बहुतेक होत असे. त्यानंतरहि कांहीं तरी वाचनां – गीतारहस्य, गीताई, दासबोध अगर अन्य धार्मिक

ग्रंथांच्या वाचनांत—अर्धा एक तास जावयाचा. तें वाचन होत असतांना त्यांतील तत्त्वाचा, ओळीचा, भावार्थ विशेष रीतीनें लक्षांत आला तर मला व सूनबाईला हाका मारून सांगितल्यावांचून त्यांना चैनच पडत नसे. सौ. कमल बिचारी भाविकपणानें तें सर्व ऐकत असे. मीहि ऐकत असें, पण माझ्या मनांत येई; ही गोष्ट, आतां सांगितलेला हा अर्थ मागेंच ह्यांनीं विषद केलेला आहे. तेव्हां मी हलकेंच म्हणावयाची "हें आपण मागेंच सांगितलें होतें. कीं," तेव्हां ते म्हणत "अभ्यास केल्यावांचून ज्ञान चित्तांत रुजत नाहीं, तुम्हाला जें कळलं असं वाटतं तें कळलेलं नसतं. माझ्याबरोबर अनेक वेळां अशारीतीनें ऐकाल तेव्हां खरा विषय ध्यानांत येईल."

ह्यांची व माझी जेवणाची वेळ बारा ते साडेबारा ही ठरलेली असे. दोघेंहि बरोबरच जेवीत असूं. सर्व तऱ्हेची सुखसोय घरांत असल्यामुळें कोणत्याहि तऱ्हेचा त्रास अगर जबाबदारी माझ्यावर नसल्यामुळें दोन घांस ह्यांच्याबरोबर जेवण्यांत मला जास्तच जात.

येवल्यामध्यें दोघें बरोबर जेवण्यास बसण्याचा योग क्वचितच येई. एखाद दिवशीं विचार करून बरोबर जेवणाचें ठरवलें कीं, हे लगेच म्हणावयाचे, 'गाळांत रुतलेली गाय सोडविण्यास तुला जावें लागेल' व तसें घडावयाचेंच. त्यामुळें पुण्यास आल्यावर नित्य बरोबर जेवतांना हे माझी चेष्टा "डॉक्टरची आई, आतां काय थाट!" वगैरे म्हणून गंमत करावयाचे. ती गंमत मला मनापासून आवडेहि. भरपूर श्रम केल्यानंतर मिळालेलें भोजन, त्याची तृप्ती कशी वर्णन करणार? पण लगेच हे मला थोड्या वेळांत हसत हसत म्हणावयाचे, "कांहीं झालें तरी मास्तरची बायको आहेस, हेंहि इतक्या थाटांत विसरूं नकोस. पदर बांधून वाढण्यास तयार असलेली राधाच माझ्या चित्ताला अधिक आवडते."

चि. शंभू व कमल यांची जेवणाची वेळ दुपारीं १ ते २ हीच असावयाची. दुपार संध्याकाळच्या जेवणाच्या वेळाच काय त्या आम्हांला सर्वांना मोकळे-पणानें गप्पागोष्टी करण्यास मिळत असत. त्या वेळांमध्यें चि. शंभू अनेक

विषयांवर त्याच्या मनांत आलेले विचार ह्यांना विचारीत असे. थोडक्यांत असलेला विषय हे तेव्हांच समजावून सांगत, नाहीं तर " अमकें पुस्तक तुला कपाटांतून काढून देतों तें वाच, म्हणजे तुझे प्रश्न आपोआप सुटतील." अशा तऱ्हेचीं बोलणीं म्हणजे कांहींतरी नवीन तऱ्हेचें ज्ञान आम्हांला या जेवणाच्या टेबलावर मिळावयाचेंच. भाषणाची लांबी रुंदी जरा वाढली म्हणजे माझ्या चेहऱ्यावरील भाव ओळखून हे म्हणावयाचें, " मी जातिवंत शिक्षक आहे. माझं भाषण लांबलं तरी कोणी वावगं म्हणणार नाहीं."

चि. शंभूचें व कमलचें जेवण झाल्यानंतर एक नवीन कार्यक्रम आम्हीं सुरू केला होता. तो म्हणजे ब्रिझीक खेळणें. हे ब्रिझीक खेळत असत याचें आश्चर्य ह्यांना ओळखीत असलेली मंडळी करतीलच; परंतु मी देखील ह्यांच्या आयुष्यांतील 'पत्ते खेळणें' ही आश्चर्यकारक घटना अद्यापहि समजतें. पण आश्चर्याची गोष्ट. शंभू एकदा सहज म्हणाला, " आपण चौघेजण घरांत आहोंत. मला चारपर्यंत वेळ मोकळा असतो, तर आपण या वेळीं कांहीं तरी खेळत जाऊं." ह्यांनीं लगेच होकार दिला व पत्त्यानीं ब्रिझीक खेळण्यास आम्हीं सुरुवात केली. हे लवकरच ब्रिझीक खेळावयास शिकले, परंतु त्या खेळाची तर्कशुद्ध मांडणी ते जमाविण्याच्या भानगडींतच पडत नसत. " माझा गडी शंभू त्यांतला तज्ज्ञ आहे म्हणून डोक्याला नसता त्रास मी देत नाहीं." असें हे म्हणत. माझी व कमलची जोडी बऱ्यापैकींच होती, पण आश्चर्याची गोष्ट ह्यांच्याकडे खूप चांगलीं पानें येत. त्यामुळें आमच्या अक्कलहुशारीला कोठें वावच नसे. त्यांची गेम झाल्यानंतर खेळांतून उठतां उठतां हे म्हणावयाचे, 'भोळा भाव सिद्धि जाव' हें ब्रीद माझ्या सतत पाठीराखें आहे. असं जर नसतं तर खेळांतून मला कांहीं कळत नाहीं म्हणून तुम्ही लोकांनीं बाहेर टाकलं असतं. बुद्धिमान् माणसाचा भरवसा बुद्धीवर असतो, व कांहींचा भरवसा देवावर असतो." वगैरे हास्यविनोद आमच्यामध्यें होऊन जो तो आपल्या कामाला चाराच्या पुढें लागे.

ह्यांचा लेखक येऊन बसलेलाच असे. लेखक बसला असतांनाच, हे पत्त्यांतून उठण्याचा प्रयत्न करत, तर शंभू ह्यांना धोतर धरून लहान मुलासारखा हट्टानें बसवी व "येवढा डाव पुरा करा आणि मग जा ना. रोजच

लिहावयाचें असतें " असं म्हणून त्यांना आग्रहानें बसवून घेई. अशाहि वेळीं मनाची नाराजी राजी करून खेळ आटोपल्यावरच हे लिहिण्यास जात. पण तेथेंहि पहिलें वाक्य त्यांचें ठरलेलें असें– "तुम्हाला जरा बसावं लागलं ना. विषय तयार आहे. लिहिण्याचें साहित्य टेबलांतलं काढा बरं." नंतर लेखनास जी सुरुवात होई ते त्या दिवसाचा विषय आंखलेला पुरा होईपर्यंत. त्यानंतर शाळेंतून आलेल्या नातीशीं बोलत बोलत त्यांच्या बरोबर कांहीं तरी फराळ करूनच आम्ही दोघें फिरण्याकरितां बाहेर पडत असूं. आमचीं काहीं सामाजिक स्वतंत्र कामें या वेळेला असल्यास आम्ही दोघेंहि आप-आपलीं कामें स्वतंत्रपणें पुरीं करीत असूं. पुण्यांतील सभा–संमेलनें–व्याख्यानें आम्हीं दोघांनीं बरोबरच ऐकावींत असा आमचा दंडक असे. बाहेरून घरीं आल्यानंतर ह्यांची परिचित मंडळी कोणी आल्यास त्यांची निरनिराळ्या विषयांवर चर्चा चालावयाची. आम्ही जमल्यास हा संवाद ऐकण्यास अवश्य बसत असूं. या वेळेला कधीं कवि बोरकरांचें काव्य, कधीं श्री. दादासाहेब घाटे यांची चालू विषयावरील मतप्रणाली, त्याचप्रमाणें साहित्यांतील गमती आम्हांस ऐकण्यास मिळत व जेवणाची आठवणहि अशा सुप्रसंगीं होत नसे. पण दोन्ही नातींचा कलकलाट 'जेवणाला चला ना' हा कानीं पडतांच आम्हांला आमची बैठक मोडून मित्रांचा निरोप घेऊन जेवणास उठावेंच लागे. मुली सकाळीं लवकर जेवून शाळेंत जात. तेव्हां या वेळची मुलींची पंगत कटाक्षानें साधायची अशी ह्यांची इच्छा असायची. कारण हे म्हणत, "मुलांना केव्हांतरी वडील माणसांशीं मनमोकळें बोलायला आपण संधि दिली पाहिजे. या शहरी वातावरणांत जो तो उद्योगांत असतो, त्यामुळें मुलांच्याकडे आपलें दुर्लक्ष होण्याचा संभव असतो, तेव्हां जेवतांना मन-मोकळेपणानें मुलांची शाळा–अभ्यास–त्यांच्या अडचणी आपण समजून घेतल्याच पाहिजेत."

अशा रीतीनें भोजनाचा कार्यक्रम टेबलावरचा पुरा होत असतांनाच विद्या व लता कांहींतरी निमित्तानें भांडणास सुरुवात करीत. त्या दोघींच्या एकमेकींविषयीं तक्रारी ऐकून चि. शंभू अगर आम्ही कोणी चिडल्यास हे म्हणावयाचे, "आम्ही आठ भावंडें लहानपणीं एका वेळीं जेवावयास बसलों

म्हणजे इतका गलका व्हायचा–पण तात्या घरांत आले कीं, ‘ चिपचाप. ’ तों मुलींनीं आपलं भांडण बंद करून विचारावें, “आम्ही दादांना तर नाहींच भीत, पण तुमची सुद्धां आम्हाला भीति वाटत नाहीं. आबा तात्यांना कां हो तुम्ही भीत होतां ? ” हे टेबलावरून उठतां उठतां म्हणावयाचे, “ आम्ही तात्यांबरोबर कधींच टेबलावर जेवीत नव्हतों म्हणून !”

जेवण आटोपल्यानंतर आमचे निरनिराळे व्यवसाय आम्ही करीत असूं. ह्यांचा सूतकताईचा कार्यक्रम यानंतरचा ठरावीक वेळीं सुरू होई. ह्यांनीं चरखा उघडून चरख्याची सेवा करावी व मग सूत कातावें. ह्यांचें सूत झाल्यावर माझी सूतकताई सुरू होई. चरखा मिटविण्याचें काम माझ्याकडे असे. हे सूत काढीत असतांना मी कांहींन् कांहीं त्यांच्याशीं बोलत असायची, पण मी सूत काढीत असतांना मात्र त्यांच्या हातांत नेमकें पुस्तक यावयाचें. अशा वेळीं मी नाराज होऊन थोडी कुरकुर करतांच, “ तुला विद्वान् पति हवा होता ना ? खरा विद्वान् मनुष्य किती काळ सरस्वतीची आराधना करतो, याची तुला कल्पनाच नाहीं. ” ह्यांचा वाचनाचा कार्यक्रम संपतांच अतिशय लवकर अंथरुणावर अंग टाकतांच गाढ झोप ह्यांना लागावयाची.

पुण्यास आल्यावर मला श्रम भरपूर नसल्यामुळें म्हणा अगर अन्य कारणास्तव रात्रीं बारा केव्हां केव्हां एक वाजेपर्यंतहि झोप येऊं नये. हे बाराच्या सुमारास पाणी पिण्यास उठले म्हणजे माझी चळवळ पाहून म्हणावयाचे, “तुम्हां स्त्रियांना झोप कशी येत नाहीं ? कमलहि तशीच आणि तूंहि तशीच. कोणत्या देवानें स्त्रीची अंतरप्रतिमा बनवली त्याचा शोध व बोध या वयापर्यंत मला होत नाहीं. दरवाजा वाजला, झोप गेली; माणसाची चाहूल लागली, झोप उडाली; उंदराचा–मांजराचा आवाज आला, झोप तुटली. अशी तुमची झोप आहे तरी काय ? मी सांगतों तें जरा ऐक. निजतांना नुसती प्रार्थना करतेस त्याचा उपयोग तुझ्या मेंदूच्या शांतीला होतो असें दिसत नाहीं. तरी रामनामाचा जप करून मन अगदीं मोकळं करण्याचा प्रयत्न करावा म्हणजे झोप झटदिशी येते. तुम्ही सारखे विचार करून लहानशा गोष्टीची मोठी काळजी बनवीत असतां. म्हणून रामदास स्वामींनीं म्हटलें आहे : ‘कल्पना धावते सैरा । बुद्धि दे रघुनायका । ’ बुद्धि दे

याचा अर्थ स्थिर करण्याची बुद्धि दे. बुद्धिवान् माणसाचा कल्पना-विलास हा झोपेच्या आड येणारच. विनोबांनीं म्हटलेलें तुला आठवतें का? ‘ झोपेचा प्रयत्न करतो.’ अरे प्रयत्नाचा अभाव म्हणजेच झोप, तिचा प्रयत्न कसला?” येवढें सगळं ऐकून घेतल्यावर मी त्यांना सांगावयाची, “ अद्याप तरी नेमक्या वेळीं झोप घ्यावयाची हें अनुसंधान मला साधलें नाहीं. ” लगेच ह्यानीं आपल्या कॉटवरून उठून माझ्या कॉटजवळ खुर्ची घेऊन कांहीं तरी सांगण्यास सुरुवात करावी. कधीं कधीं इंग्लंडचा इतिहास, कधीं आर्यांची संस्कृति, जीवनाचें कार्य यासारखे गहन विषय अगर एखादी इसापनीतीसारखी गोष्ट हे सांगूं लागत. मग मात्र मी गाढ झोपीं जाई.

दुसऱ्या दिवशीं ह्यांनीं मला विचारल्यास, ‘रात्रीं किती विषय समजला’ कीं मी जणू झोपेंतून जागी झाल्यासारखीच चटपट म्हणावयाची, कोणता विषय? सात आठ वाक्यांच्यावर मला कांहीं ऐकल्याचं आठवतच नाहीं. तेव्हां हे हसून म्हणावयाचे, “ माझा विद्यार्थी तरी चांगला आहे—नाहींतर माझें झोपेचें औषध तरी रामबाण आहे. कांहीं का होईना, या प्रयोगानें तुला झोप लागते, ही एक युक्ति बरी सापडली बुवा. ”

ह्यांनीं अशा तऱ्हेचा क्रम सतत ठेवला असल्यामुळें त्या वेळेला मला झोप लागूं लागली, पण पुढें....ती झोप पुष्कळच उडाली.

पुण्यांत आल्यावर लोकशिक्षण समितीचें काम महाराष्ट्राचें व पुणें शहराचें श्री. बाबूराव जगताप यांच्या अध्यक्षतेखालीं जें मोठ्या खटपटीनें नांवारूपास आणलें जात होतें, त्यांत सर्व सभासदांमध्यें ह्यांचें काम उमटून दिसण्यासारखें कळकळीचें व आस्थेचें असे. शिक्षणविषयक लेख अगर लोकशिक्षण मासिकाची मांडणी हें काम ह्यांना मोठें आनंदाचें वाटे. श्री. बाबूराव जगताप हे धाकट्या बंधूसारखे ह्यांच्यावर प्रेम करून बरोबरीच्या नात्यानें सल्लामसलत प्रत्येक कामामध्यें घेत असत. ह्यांनाहि श्री. बाबूरावांच्या कामा-बद्दल नितान्त आदर वाटत असे. ऑफिसमधले श्री. कर्णिक ह्यांच्याशीं तर खेळीमेळीच्या गप्पा, सभा संपल्यानंतर पुष्कळ वेळ चालत असत. ह्यांची जर तब्येत कधीं बरी नसली तरी जाववत आहे तोंपर्यंत कोणत्याहि सभेला

( अंगीकृत कार्याच्या ) जाण्याचा ह्यांचा दृढनिश्चय असे. ह्यांना सभेला जायचं असलं आणि ह्यांना बरं नसलं तर तो विषय आमच्यापासून सकाळ-पासून टाळीत असत. सभेच्या जाण्याच्या वेळेला स्वच्छ कपडे बदलल्यानंतर हलकेंच मला म्हणावयाचे, " अहो बॉडीगार्ड, आमच्या बरोबर येतां का ?" या प्रश्नामुळें तुम्ही सभेला जाऊं नका हें माझें म्हणणं बाजूलाच पडे. मी पुष्कळ वेळां ह्यांच्या बरोबर अशा सभांना गेलेली आहे. त्यामुळें सभेमधील सभासदांशीं ह्याचं वागणं किती प्रेमळपणाचें व आपुलकीचें असें हें मला पाहण्यास मिळालेलें आहे.

' कॉंग्रेसचा इतिहास ' या विषयावर निदान सात तरी व्याख्यानें भरगच्च अशीं पुण्यांतील स्त्री-पुरुषांना ह्यांनीं दिलेलीं होतीं. ती क्रमशः लोकशक्ति वर्तमानपत्रांत वेळोंवेळीं आलेली होती. रिमांड-होम व मुलामुलींच्या शाळा यांमध्यें कोणत्याहि विषयावर व्याख्यान देतांना तो विषय सांगण्याची शैली अत्यंत सोपी व हृदयाचा ठाव घेणारी असे. अशाहि ठिकाणीं पुष्कळ वेळां मी ह्यांचे बरोबर जात असें. कधींकधीं मी ह्यांना मुद्दाम विचारावयाची, " मग तुम्ही विविध विषयांचें ज्ञान या बालक-बालिकांना कशाकरतां देतां ?" तेव्हां हे सांगावयाचे, " अग, हा जो मी खटाटोप करतों तो उगीच नाहीं. हीं मुलें-मुलीच उद्यांची नागरिक आहेत. ह्यांना जर मीं सांगितलेली गोष्ट बरोबर समजली, तर राष्ट्राच्या गरजेला कांहीं तरी नवीन व शुद्ध असें पाणी तींसुद्धां देतील, हा मला भरवंसा आहे. आतां मला मोठ्या मंडळींशीं बोलण्याचा व चर्चा करण्याचा कंटाळा येऊं लागला आहे. या सर्व पक्क्या विटा झालेल्या आहेत. हे कोणताहि आकार घेणार नाहींत व बुद्धीच्या जोरावर खुपल्यावांचून राहणार नाहींत. स्वराज्य आणि त्याची प्रगति यापेक्षां स्वतःच्या मताभोंवतालींच ही मोठी मंडळी फिरत राहतील. मलाहि आतां दिवसेंदिवस शक्ति कमी कमी वाटते. माझे विचार-माझी सामग्री बालवृंदाला मुक्तहस्तानें देण्याचा प्रयत्न मी करीत असतों."

ह्यांच्या या विचारसरणींतूनच मुलांच्या शाळेचीं बोलावणीं हे उत्सुकतेनें कां घेतात हें मला समजूं लागलें.

रोटरी क्लबमध्यें चि. शंभूनें ह्यांचें व्याख्यान गांधी-जयंतीचें करविलें होतें. तेथें भाषण इंग्रजींतूनच बहुतेक होतें. ह्यांचें भाषण तेथें झालेलें ऐकून मला पुष्कळ बरें वाटलें. त्याबद्दल मीं प्रशंसोद्गार काढतांच हे हसत म्हणाले, "चिरंजीवांची आवड होती. मीं 'हो' म्हटलं. तेथील सभासद मंडळी सुज्ञ होती. समजूतदार होती, पण अशा मंडळींना ऐकायचं आणि सोडायचं यापेक्षां विशेष कर्तव्य असतं असं मला वाटत नाहीं. जळावांचून मासा जिवंतच राहूं शकणार नाहीं, हें तत्त्वज्ञान अशा मंडळींना लौकर समजतें व सांगताहि येतें, पण पाण्याला या लोकांचा पाय अगर हात क्वचितच लागतो. आणि हें पाहा, मध्यमवर्गाच्या त्यागावरच समाजाचें व राष्ट्राचें पाऊल पुढें पडत असतें. वरच्या वर्गाची वागणूक व खालच्या वर्गाच्या अडचणी या दोहोंच्या मध्यावर मध्यम वर्ग असल्यामुळें त्यांना दोन्ही वर्ग समजूं शकतात. कोणत्याहि क्रांतीला हीच मंडळी वाट करून देतात."

पुण्याच्या रोटरी क्लबमध्यें ह्यांचें व्याख्यान झाल्यानंतर मला एक प्रकारचा त्या दिवशीं अभिमानच वाटत होता, पण हें सगळं ह्यांचें भाषण ऐकल्यानंतर माझा अभिमान कुठल्याकुठेंच नाहींसा झाला. त्या वेळेला ह्यांनीं मला पुन्हा समजावून सांगितलें, "या वरच्या पेशामध्यें वागणाऱ्या मंडळींना स्वतःचें व्यक्तिगत स्वातंत्र्य अजिबात विसरावें लागतें. ते भोंवतालच्या परिस्थितीमध्यें इतके गुरफटून जातात कीं, स्वतःचें व्यक्तित्व आपोआपच नष्ट होतें."

ह्यांचीं ज्याप्रमाणें सार्वजनिक कामें मनपसंत सुरू झालीं होतीं, त्याच-प्रमाणें मलाहि १९५० सालानंतर सार्वजनिक कामें करण्याची पुण्यास संधि मिळूं लागली. इतकेंच नव्हे तर जेल व्हिजिटर व ऑनररी मॅजिस्ट्रेट हीं दोन्हींहि सरकारनियुक्त कामें १९५२ सालापासून माझ्याकडे आलीं. त्यामुळें माझाहि वेळ चांगल्या तऱ्हेनें जाऊं लागला. ह्यांची लेखणी सतत सुरू असल्यामुळें पुण्यास आल्यापासून १९५६ सालापर्यंत पांच पुस्तकें लिहून ह्यांनीं प्रसिद्धीस दिलीं.

(१) 'गांधीदर्शन' अनाथविद्यार्थी गृहानें प्रकाशित केलें.

(२) 'गांधींची गोष्ट' ही श्री. अनंतराव कुलकर्णी यांच्या 'कॉंटिनेंटल प्रकाशन' तर्फे प्रसिद्ध झाली.

( ३ ) ‘ श्रीकृष्णचरित्र ’ हें पुस्तक मुंबईचे श्री. बागवे यांनीं प्रसिद्ध केलें.

( ४ ) ‘ अलौकिक अभियोग ’ हें पुस्तक कोल्हापूरचे श्री. कुळकर्णी ह्यांनीं प्रसिद्ध केलें.

( ५ ) ‘ राष्ट्रीय शिक्षणाचा इतिहास ’ हा ऐतिहासिक ग्रंथ ‘ टिळक–विद्यापीठा’नें प्रसिद्ध केला.या पुस्तकाचे पहिले फार्मस् ह्यांनीं आपल्या स्वतःच्या हातानें दुखण्यांतच तपासले. छापखान्याच्या कांहीं अडचणींमुळें टिळक–विद्यापीठ हें यांच्या देखत हें पुस्तक प्रसिद्ध करूं शकलें नाहीं. पण १९५८ सालीं श्री. काकासाहेब कालेलकर यांच्या हस्तें ‘ राष्ट्रीय शाळेचा इतिहास ’ या पुस्तकाचें प्रकाशन टिळक विद्यापीठानें केलें.

शेवटपर्यंत या पुस्तकाचा ध्यासच ह्यांनीं घेतला होता. इतकेंच नव्हे तर ४००–५०० रुपयांपर्यंतची रक्कम, पुस्तकाच्या प्राथमिक खर्चासाठीं ह्यांनीं कांहीं मंडळींच्या पासून व स्वतः वरील संस्थेकडे दिलेली होती. शेवटच्या दुखण्यामध्यें कोणत्याहि गोष्टीमध्यें अगर कोणत्याहि माणसाकरिता विशेष तऱ्हेनें विचारणा हे करीत होते असें नाहीं. परंतु वाताच्या जोरांतहि अगर चांगले बोलत असतांनाहि या पुस्तकाचें प्रकाशन व त्यांचे अलीकडील ३–४ वर्षांत झालेले मित्र श्री. काळे—द. गो. काळे हें आले का ? हा प्रश्न वारंवार आम्हांस करीत असत.

ह्यांनीं १३-१४ पुस्तकें जीं लिहिलीं तीं कुणालान् कुणाला–मित्रमंडळींना–विद्यार्थ्यांना ह्यांनीं अर्पण केलीं. एक दिवस त्यांना काय वाटलें कुणास ठाऊक ? हे म्हणाले, “ इतकें लिखाण मीं लिहिलें. प्रसिद्ध होण्यापूर्वी तुला ऐकण्याचे श्रम दिले, परंतु तुला एखादेंहि पुस्तक अर्पण केलें नाहीं. ” मीं लगेंच म्हटलें, “मी गेल्यावर कदाचित् तसें करालहि. ” बोलतां बोलतां त्यांच्या स्वभावावर आघात करण्याच्या इराद्यानें मी बोलून गेलें, “ मला पोंचवून आल्यानंतर तुमच्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें राजकीय अगर सामाजिक चर्चेस लगेच सुरुवात कराल. ‘ गेली ’ ही गोष्ट हृदयास लागल्यासच अर्पण-बिर्पण होण्याचा संभव– ” या माझ्या बोलण्यावर ह्यांनीं सांगितलें, “ स्त्री ही कितीहि समंजस झाली अगर सुशिक्षित झाली तरी पतीला अशा

तऱ्हेच्या कोपरखळ्या मारण्यांत तिला मोठा आनंद वाटतो अशी माझी समजूत आहे ! हें बोलणं गंमतीचं असेल तर ठीक आहे, पण खराच तुझा अशा तऱ्हेचा समज असेल तर मला बोलणं प्राप्तच आहे. मला ठाऊक आहे, आपल्या घरांतील २-४ मृत्यु झाल्यानंतर तुझीं माझीं बोलणीं अशाच स्वरूपांत झालेलीं आहेत आणि मला वाटतं माझं करणं अगदीं बरोबर आहे. तुझ्या मृत्यूनंतर चार मंडळींत मी काम करूं लागलों म्हणजे मी तुला विसरलों असं कसं म्हणतां येईल ? दुःख वाढवावं तेवढं वाढतं आणि ताब्यांत आणावं तितकं ताब्यांत येतं. सतत उद्योग हाच दुखवट्याचा रामबाण उपाय आहे; पण मी जेव्हां एकटा असेन त्या वेळेला तुझ्या स्मरणांतच मी काळ घालवीन. त्यालाच मी प्रेम म्हणतों. एकटा असतांना तुझ्यावांचून दुसरें चिंतन राहणार नाहीं. तूं आधीं गेलीस तर वरच्या खिडकींतून मला बघत राहा. मी आधीं गेलों तर तुलाहि असेंच वागण्या-बद्दल मी पुन्हा पुन्हा सांगेन. ”

आतां विषय निराळाच होऊं लागला. हें पाहून मीं चटादिशीं तो विषय पालटून दुसरं कांहीं तरी बोलूं लागलें तेव्हां ते फिरून म्हणाले, “ तुला नको तर हा विषय इथंच सोडतों, पण ‘मरणाची’ भीति—बागुलबोवा—आपण वृद्धापकाळाच्या उंबरठ्यावर उभे असतांना सोडला पाहिजे. असं नाहीं का तुला वाटत ? ” नंतर आम्ही संध्याकाळचे वेळीं फिरून आलों, पण ह्यांच्या बोलण्यांत नेहमींसारखे आनंदी उत्साही बोलणें नसून कांहीं तरी निराळाच विषय ह्यांच्या डोक्यांत घोळत असावा. घोळत असलेला विचार रात्रीं निजण्यापूर्वीं मला विशद करून ह्यांनीं सांगितलाच.

नेहमींच्या रिवाजाप्रमाणें लवकरच दहा वाजतां हे झोपीं जावयाचे, पण माझें सूत काढणें होतांच हे म्हणाले, “ संध्याकाळीं, ‘ मृत्यूचें भय सोडलें पाहिजे ’ या विषयावर मी कांहीं तरी सांगत होतों. तुला तें त्या वेळीं रुचलें नाहीं. पण माझ्या मनांत आलेले विचार आतां मी सविस्तर सांगणार आहें. माझ्या मृत्यूबद्दल वैयक्तिक गोष्ट सोड, पण एकंदर मृत्यूविषयीं आपण सामान्य माणसें कधीं चर्चा करीत नाहीं, ही चुकीची गोष्ट आहे. एक वेळ माणसाचं लग्न होणार नाहीं. कदाचित् मुलं होणार नाहींत. झालीं तर

कांहींच्या पदरांत तीं पडणार नाहींत, पण मरण हें प्रत्येक जिवंत जीवाला पत्करावंच लागणार आहे, तर तें दूर ठेवून काय उपयोग ? त्याचा विचार प्रत्येकानं केला पाहिजे. मनुष्याच्या जशा तीन अवस्था आहेत तशीच मरण ही चवथी अवस्था आहे. खरं पाहिलं तर वृद्धापकाळ हा कोणाला आवडतहि नाहीं, तरी पण त्या अवस्थेपर्यंत जावंच लागतं. त्यानंतरची मरण ही चांगली अवस्था नव्हे का ? उगीच का गोविंद कवीनें ' सुंदर मी होणार । आतां मरणानें जगणार । ' असं म्हटलं आहे ! नूतन जन्माचें, मरण हें बीजारोपण आहे, म्हणून त्या मरणाचा बाऊ व भीति कोणीहि मनांत धरतां कामा नये, असं नाहीं का तुला वाटत ? एकदा भीति सोडली म्हणजे योग्य तऱ्हेनं या मरणावस्थेचा माणसास विचार करतां येईल. अग, पूर्वींच्या काळीं वृद्ध माणसं जेव्हां यात्रेला जात तेव्हां ती यात्रा अर्थात् फार कष्टाची असे. तेव्हा यात्रेला जातांना मंडळी घरांतल्यांचा निरोप घेत असत, व घरांतील मंडळीहि तशा तऱ्हेची मनाची तयारी करूनच वडील माणसांना निरोप देत असत. यात्रा संपल्यानंतर तो मनुष्य परत आल्यास सर्वांना विशेषच नवल वाटत असे. बद्रीनारायणाची यात्रा अतिशयच कठीण होती. तेथलें पाणी लिव्हर बिघडविल्याशिवाय राहातच नाहीं. असं असतांहि यात्रेला जाणाऱ्यांची निष्ठा इतकी बळकट व प्रभावी असे कीं, त्यांना देवदर्शनापुढें आपल्या स्वतःचा घातपात तुच्छ वाटे. पण आतां विज्ञानयुगांत अशा तऱ्हेची माणसाच्या मनाची तयारी करणं कठीण झालं आहे, पण तसा कोणी प्रयत्नहि करीत नाहीं. पण ही चूक आहे नाहीं का ? जी गोष्ट घडणारी आहे तो विचार सुलभ तऱ्हेनें आपण केलाच पाहिजे असं मला वाटतं म्हणजे मरणारा मनुष्य व राहणारीं माणसं ह्यांची तयारी—मनाची तयारी—पुष्कळ होईल. मी तुला एक गंमत म्हणून सांगतों, रात्रीं निजतांना कदाचित् मी मरेनहि, सकाळीं उठलों तर उठलों असा विचार करूनच मी झोपतों व मला शांत झोप येते. ''

ह्यांचें हें भाषण ऐकून मला ही तत्त्वप्रणाली पसंत असली तरी एकमेकांच्या मृत्यूचा विचार आज करणें बरें वाटेना. म्हणून मी '' कालची गोष्ट पुढें सांगा '' असं म्हणून माझ्या अंथरुणावर जाऊन पडलें. तरी पण ह्यांची लहर आज निराळीच लागली होती. ह्यांनीं मला म्हटलें, '' आपल्या

समोरच्या बिऱ्हाडांत ( माडीवाले कॉलनींत ) मोघे यांची पत्नी वारली त्या वेळेला प्रेतयात्रेकरितां मी मोघे यांच्याबरोबर जाणार होतोंच, पण प्रेताची नेण्याची तयारी होईपर्यंत मी १५-२० मिनिटें झोपतों असें कमलला सांगून मी खरोखर झोपीं गेलों. तूं तर मोघे कुटुंबाचं सांत्वन करण्याच्या कामीं गुंतलेली होतीस. माझी या वेळची झोप घेणं कमलला, व दुसरे दिवशीं ही हकीकत कळतांच तुलाहि विचित्र व दुष्टपणाचीच वाटली. त्याचंहि स्पष्टीकरण मी करूं शकतों. ती बाई अनन्वित यातना आज दोन महिने सहन करीत होती. त्यांतून तिची सुटका व्हावी म्हणून तुमच्यासारखे शेजारीपाजारीहि प्रार्थना करीत होतें. अशा स्थितींत ती गेली हें कळतांच तुम्हांस समाधानच वाटावयास हवं; पण तुम्ही मंडळी गंभीर विचार न करतां त्या दुःखाच्या नाटकांत तद्रूप होतां. माझी झोप हुकमी आहे हें मात्र खरं. मला वाटेल तेव्हा १५-२० मिनिटं केव्हांहि झोप काढतां येते. तुम्हांस जो दोष वाटतो तो मिळविण्यास केव्हां तरी प्रयत्न करून मन मोकळं करावं लागलं असेल, तेव्हांच ही गोष्ट साधते. तुमचं मन भरगच्च बोजांनीं सदा वाकलेलं असतं म्हणून तुम्हांस झोप येत नाहीं. आतां मन मोकळं कर आणि झोपीं जा बघूं. " त्यांनीं गोष्ट सांगण्यास सुरुवात केली आणि मला झोपेच्या औषधाप्रमाणें झोप लागून गेली.

दुसरे दिवशीं रात्रीं माझा चरखा बंद झाल्यावर ह्यांनीं विशेष हसत हसत मला विचारलें, " पुष्कळशा गोष्टी तुला प्रिय–अप्रिय असल्या तरी तूं माझ्यासाठीं गोड करून घेतल्यास, पण आज एक नवीन गोष्ट माझ्या मनांत आलेली विचारणार आहें. " ह्यांची विशेष आनंदी चर्या पाहून कांहींतरी मला आनंदित करणारी बातमी हे सांगत असावेत असं वाटून, " सांगा. कीं, आज तुमच्या मनांत विशेष काय आहे तें कळूं द्या, " असें मीं म्हणतांच ह्यांच्या मनांत घोळत असलेली विशेष गोष्ट मला सांगण्यास ह्यांनीं सुरुवात केली. मात्र सांगण्यापूर्वीं ह्यांनीं एकच अट मला घातली ती म्हणजे, "माझं सांगणं पुरें होईपर्यंत तुझ्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें मला प्रश्न विचारणें अगर उतावळेपणानें रिमार्कस् मारणें ही कोणतीहि गोष्ट करूं नकोस. "

" माझ्या मनांत आज कित्येक दिवस एक विषय घोळत आहे. तो म्हणजे ज्याप्रमाणें मंडळी रक्तदान देऊन दुसऱ्या माणसाची सोय करून देतात त्याप्रमाणें आपणहि कांहीं तरी करावें. तुला माहीतच असेल जेव्हां माणसं मरतात—ज्यांना आप्त इष्ट कोणी नसतात—त्या माणसांचीं प्रेतं विच्छेदनाकरितां हॉस्पिटलमध्यें डॉक्टरीच्या कोर्सच्या विद्यार्थ्यांना ॲनॉटमी ( शरीरशास्त्र ) शिकण्यासाठीं दिलीं जातात. शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानानें अशीं प्रेतें थोडींच असतात. बरेचसे विद्यार्थी त्या प्रेतांवर काम करीत असतात. ससूनसारख्या सरकारी हॉस्पिटलमधून अशा तऱ्हेचीं कांहीं प्रेतें विद्यार्थ्यांना मिळतात, परंतु आमच्या आयुर्वेद महाविद्यालयाला ( ताराचंद रामनाथ हॉस्पिटल ) अशीं प्रेतें क्वचितच मिळतात. त्यामुळें विद्यार्थ्यांना शरीरशास्त्र शिकणें अडचणीचें व कठीण होऊन बसतें. याकरितां एक विचार माझ्या मनांत येत आहे." असें म्हणून त्यांनीं जवळील तांब्यांतील पाणी ओतून घेऊन पाणी पिण्यास सुरुवात केली. त्यांची ती पाण्याची खरी तहान असेल अगर सांगावयाच्या गोष्टीकरतां वेळ काढणेंहि असावें. त्यांनीं मनाचा हिय्या करून त्यांना जें सांगावयाचें होतें तें मला सुटसुटीत पण स्पष्ट शब्दांत सांगून टाकलें, " मी माझ्या मरणानंतर माझा देह ( Body ) आयुर्वेद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकरितां देणार आहें. हा विचार माझ्या मनांत फार दिवसांचा आहे, पण उगीचच फार आगाऊ या विषयाची चर्चा घरांत व्हावी असं मला वाटत नव्हतं. तशी माझी तब्येत चांगली आहे, पण काय सांगावं ? ठेच लागूनहि मनुष्य मरूं शकतो. त्यांतून आपला वृद्धापकाळ. तेव्हां म्हटलें शेवटचें हितगूज—माझी इच्छा तुला सांगावी व तुझाहि या कामीं विचार घ्यावा. तुला अगर शंभूला हा विषय सांगून दुखवावें असें माझ्या मनांत केव्हांहि नाहीं. तुम्हांला समजून सांगणें हें माझं काम आहे. तुम्हां दोघांस योग्य वाटल्यास तुम्ही तसं माझ्या मृत्यूनंतर करालहि. तरी १-२ दिवस तूं विचार कर. मोकळ्या मनानें माझ्याशीं बोल. नंतरच होकार दे. तशी माझी घाई नाहीं, पण ही गोष्ट लवकरच निकालांत काढून ताराचंदच्या कांहीं मंडळींना मला कळवावयास हवी."

ह्यांना माहीत होतं—या भाषणानंतर आमचीं दोघांचीं बोलणीं होणं शक्यच नव्हतं. ते स्वतःच्या अंथरुणावर पडले व झोपीहि गेले. मी मात्र ह्यांच्या नव्या कल्पनेचं आश्चर्य करीत कितीतरी वेळ अस्वस्थ स्थितींत होतें. पहाटे झोप लागली असावी. नेहमींचं माझं ब्रीद वाक्य झोपेंतहि माझ्यापुढें येऊन गेलं तें म्हणजे 'तूं कोणत्याहि ह्यांच्या प्रगतीच्या कामांत आड येऊं नकोस!' मला या प्रश्नावर विचार असा कांहींच करावयाचा नव्हता. 'मृत्यूनंतर' या गोष्टीचा विचार मीं कधीं केलाहि नव्हता आणि मृत्यूनंतर माणसाचें काय होतें हें त्याबद्दलचें शास्त्र मला बिलकूल अवगत नव्हतें. दोन-तीन दिवसांनीं शंभू, कमल व मी बसलों असतांना हा विषय ह्यांनीं आमच्या पुढें मांडला. आम्ही तिथे कांहींहि बोलत नव्हतों. त्यांनीं कळकळीनें सांगितलें, "मनुष्य गेल्यानंतर त्या देहाचें तरी आपण काय करतों? जाळून राख! ही गोष्ट रूढींनीं इतकी अंगवळणी पडली आहे, त्याबद्दल माणूस विचारहि करीत नाहीं. ती गोष्ट फारच चांगली आहे, पण डिसेक्शनकरितां बॉडी देऊन मुलांच्या शिक्षणास मदत केली तर त्यांत वावगें काय? मुलांचें शिक्षण झाल्यावर बॉडीचें दहन करण्यास मी संमत आहें. तुम्हांस जें जमेल तें करा. माझा तुम्हांस आग्रह नाहीं. पण माझी इच्छा मात्र तीव्र आहे. आजपर्यंतच्या माझ्या वागणुकीस जो तुम्ही सहकार केलांत तसाच या माझ्या इच्छेला तुम्हीं मान्यता द्यावी असं माझं म्हणणें आहे."

आम्ही तिन्हीहि माणसें लाकडी पुतळ्याप्रमाणें हें ऐकत होतो. तिघांचेहि चेहरे विचारमग्न झाले होते. बोलण्याची शक्ति आमच्यांतली नष्टच झालेली होती. डोळे मात्र इच्छा—अनिच्छा न पाहतां स्रवत होते.

शंभूनें एकदम विषयाला कलाटणी देऊन हॉलच्या बाहेर जाण्याच्या तयारीनें सांगितलें, "आजच या प्रश्नाशीं आपणांस काय करावयाचें आहे? पुढचें पुढें." असं म्हणून आम्ही प्रत्येक जण एकमेकांपासून पांगलों. यामुळें हा विषय तेथेंच थांबला. परंतु डोक्यांतून हा विषय गेला असं कसं म्हणतां येईल? इतका का तो सोपा व सहज होता. बोटाचें नख काढून आपण दूर फेकतों तसा तो नव्हता. तें जिव्हारीं नख होतें.

चार पांच दिवस गेल्यानंतर ह्यांनीं एक पत्र ताराचंदच्या हॉस्पिटलच्या 'डीन'कडे वरील विषयाविषयीं विचार करून रवाना केलें. तें पत्र जसेंच्या तसें येथें देत आहे.

विषय—शवप्रदान

६६१।२ माडीवाले कॉलनी, पुणें २.
२०-२-५१

पां. श्री. आपटे यांजकडून

श्री. प्रमुख आयुर्वेद महाविद्यालय, पुणें २, यांस जयहिंद.

आज बरेच दिवसांपासून एक विचार माझे मनांत येत असतो. तो आपणांस या पत्रद्वारें विदित करीत आहें.

वैद्यक ( इंग्रजी व देशी ) महाविद्यालयास विद्यार्थ्यांना शरीरशास्त्राची माहिती देण्याकरितां पाहिजे तेवढीं प्रेतें मिळत नाहींत. बेवारशी प्रेतांवर महाविद्यालयाला अवलंबून राहावें लागतें. या कामीं सुशिक्षितांनीं पुढाकार घेऊन आपलीं शवें वैद्यक विषयास वाहिलेल्या विद्यालयास देण्याची व्यवस्था आपल्या मृत्यु-पत्रद्वारें करावी म्हणून मी या पत्रद्वारें आपणांस कळवितों कीं, माझ्या मृत्यूनंतर माझें शव आपल्या महाविद्यालयास समर्पण करण्याविषयीं मीं माझे चि. बाळकृष्ण पांडुरंग आपटे व पत्नी सौ. राधाबाई आपटे यांना सांगून ठेवलें आहे व त्यांची संमति मिळविली आहे.

माझें आयुष्य राष्ट्रीय शिक्षणांत गेलें आहे. तेव्हां माझें शव विद्यार्थ्यांना शिक्षणार्थ उपयोगी पडलें तर त्याचें सार्थक झालें असें मी समजेन.

मनुष्याला जी मरणोत्तर गति मिळावयाची ती त्याच्या इहलोकांतील वागणुकीवर अवलंबून आहे. अंत्यक्रियेवर नाहीं असें माझें मत गीतेच्या उपदेशानें दृढ झालें आहे.

आज या विषयावर एक लेख लिहून मी तो ' साप्ताहिक लोकशक्तीकडे ' पाठवीत आहें, पण तत्पूर्वी त्यांत सांगितल्याप्रमाणें कृति करण्याची जबाबदारी लेखकावर येते म्हणून आपणाकडे रवाना करीत आहें.

आपला नम्र
( सही ) पां. श्री. आपटे

त्या पत्राचें उत्तर येतांच मला त्यांनीं दाखविलें व ते समाधानयुक्त हसलें व 'सुटलों बुवा' असं म्हणाले. तुमची परवानगी काढणं—मान्यता मिळणं कठीण वाटत होतं. पण तुम्ही दोघे सुज्ञ व शहाणे आहांत. मीं बोलण्याचा धीर करून विचारिलें, "संमति तुम्हांस कोणीं दिली. मी तर एकहि शब्द या विषयावर अद्याप बोललें नाहीं." तेव्हां ते म्हणाले, "अग, तुम्हीं विरोध केला नाहीं; मला मोडतां घातला नाहीं. हीच तुमची संमति होय. मायेच्या माणसाकडून यापेक्षां स्पष्ट ती संमति कशी दाखविली जाईल? आपण जरी निश्चयी असलों तरी माणसंच आहोंत, हें जाणूनच मी ताराचंद हॉस्पिटलला पत्रहि लिहिलें व उत्तरहि आलें. आतां जीव भांड्यांत पडला–"

"आमचे जीव उडाले, त्याची वाट काय?" असं म्हणून पदरानें डोळे पुशीत मी तेथून एकदम दूर गेलें.

ह्यांनीं आपल्या मनाप्रमाणें या सर्व व्यवस्था करून घेतल्यावर पुढचीं दोन वर्षें विशेष आनंदांत व रेखीव कार्यक्रमांत घालविलीं. जणू कांहीं ह्यांची आयुर्मर्यादा जवळपास संपत असावी व त्या वेळेला विचारी मनुष्य ज्याप्रमाणें वागेल, त्याप्रमाणें त्यांचें वागणें सुरू झालें होतें. आतां विचार करतां तें सर्व लक्षांत येतें व उमजतेंहि. खरं पाहिलं तर त्यांची प्रकृति खालीं खालीं चालली होती. दोन चार महिन्यांनीं पोट दुखण्याचा अॅटक् इतक्या जोरांत ह्यांना यावयाचा कीं, त्या वेळेला वाटे, उद्यांचा दिवस कसा उजाडतो? डॉक्टरांच्या प्रयत्नांनीं तो अॅटक् गेला म्हणजे ह्यांची अशक्तता शिल्लक असली तरी हे आपलीं कामें लगेच सुरू करीत. आम्हीं 'विसावा घ्या' असं म्हटलं तर त्यांना तें पटत नसे. ते म्हणत, "माझी बुद्धि चालती आहे व मला लिखाण करण्याची शक्ति आहे तोंपर्यंत करूं द्या. मला कळतं आहे माझं घर मोडकळीस आलेलं आहे."

शेवटल्या दोन वर्षांतील ह्यांचा उत्साह विशेषच होता. अधाशी मनुष्य ज्याप्रमाणें सुग्रास पक्वान्नावर ताव मारतो त्याप्रमाणें सार्वजनिक सेवेची संधि त्या काळांतील ह्यांनीं बिलकूल वाया जाऊं दिली नाहीं. इकडे ह्यांच्या दुखण्याबद्दल डॉक्टरांच्या परीक्षा ( Diagnosis ) होत होत्या त्या वेळींहि ते आपलीं कामें उत्सहानें पार पाडीत होते. मी म्हणायची,

" आम्ही सर्व मंडळी तुमच्या दुखण्याची काळजी करीत आहोंत त्या वेळेला बाहेरचीं व्याख्यानें तुम्ही कशाकरितां पत्करतां ? आजकाल भलताच पण कृत्रिम उत्साह तुमच्यांत दिसत आहे. तो पाहून मला बरं नाहीं वाटत. " अशा वेळेला ह्यांनीं सांगितलें, ' चमडा जाने, कुत्ता जाने, साधु जाने राम, ' तुम्ही मायेचीं माणसं व तज्ज्ञ डॉक्टर माझें दुखण्याचें निदान ठरवीत आहां तोंपर्यंत मला बागडूं द्या कीं ! बाळपण आणि म्हातारपण सारखंच असतं नाहीं का ? आणि त्यांतून टिळकांची शतसंवत्सरी ! मग अशा वेळीं मी कांहींच बोलूं नको ? कुठं भाषण करूं नको ? व्याख्यान देऊं नको ? अग, टिळकचरित्र माझ्या पुढें सारखं एका पाठीमागून एक चित्रपटासारखं दिसत आहे. टिळकांच्या धैर्यापुढें गोविंद-कवींनीं म्हटल्याप्रमाणें त्यांच्या कीर्तीचे चौघडे जरी वाजत आहेत तरी त्या धीरोदात्त पुरुषाच्या गंभीर वाणीपुढें तो आवाज कोताच वाटतो. "

एकंदरींत १९५६ सालांत पुष्कळच व्याख्यानें अनेक संस्थांतून टिळक चरित्रावर ह्यांनीं दिलीं. मी बरोबर असेंच. भाषण देतांना हे दमत असत, हें स्पष्ट दिसत असूनहि माझें कांहीं त्याच्यापुढें चालत नसे.

दिवसानुदिवस खाल्लेलें अन्न ह्यांना पचेनासें झालें. उलट्या होऊं लागल्या. त्यामुळें देहाची क्षीणता वाढत चालली. गॉलब्लॅडर हें दुखण्याचें निदान झाल्यावर ऑपरेशन करावें असें सर्व तज्ज्ञ डॉक्टरांनीं आम्हांस सांगितलें. ऑपरेशन हा शब्द ऐकून ते वृद्धापकाळीं करावयाचें त्यामुळें घरांतील मंडळी त्याचप्रमाणें आप्तेष्ट मंडळी आम्ही घाबरून गेलों, पण रोग्याची म्हणजे ह्यांची तयारी दांडगी होती. ह्यांना कांहीं तरी भयंकर यातना रोज काढाव्या लागत होत्या, म्हणून ह्यांनीं शंभूला स्पष्ट सांगितलें, " ऑपरेशन करून मला आरोग्य प्राप्त करून द्या तरच माझ्या जगण्यांत आतां अर्थ आहे. अशा माझ्या प्रकृतीच्या परिस्थितींत मी कांहींच करूं शकणार नाहीं आणि कुठं तरी पूर्ण विराम व्हावयास नको का ? "

ठरल्याप्रमाणें ता. ६ आक्टोबर १९५६ रोजीं हॉस्पिटलमध्यें सर्जन घारपुरे यांनीं ह्यांचें ऑपरेशन केलें. मुंबईचे सर्जन फडके हेहि जातीनें त्या-

वेळीं हजर होते. सर्व तज्ज्ञ डॉक्टरांनीं काळजीपूर्वक आंखणी करून ऑपरेशन केलें, परंतु पोट उघडतांच चहूंकडे कॅन्सर ग्रंथी दिसल्यामुळें सर्वांनीं माना खालीं घातल्या.

ह्यांच्या आयुष्यांत ह्यांनीं पुष्कळ स्नेही मंडळी जोडली. त्यांचें साहाय्य ह्यांना व ह्यांच्याबरोबर आम्हांलाहि मिळत गेलें, पण शेवटचे स्नेही थोडक्या काळांतील कै. दत्तात्रय गोविंद काळे ( अण्णासाहेब ) यांना आम्ही कोणीच विसरूं शकणार नाहीं.



## २७

अण्णासाहेब काळे हे दिसण्यांत धीर गंभीर गृहस्थ होते. ते कधीं उगीचच अधिक बोलणार नाहींत, पण कुणाशीं तुटकहि वागणार नाहींत. ह्यांचा व त्यांचा स्वभाव एकमेकांशीं फार जमला होता. अण्णासाहेब काळे हे थिऑसॉफिकल इन्स्टिट्यूटचे सभासद होते. त्यामुळें मृत्यु व मृत्यूनंतरची माणसाची अवस्था याबद्दलचे काळ्यांचे कांहीं ठाम विचार होते. ह्यांच्या व काळ्यांच्या गप्पा याहि विषयावर पुष्कळ वेळां रंगत असत. ह्यांच्या शेवटच्या दिवसांत या अण्णांचा उपयोग आम्हांस फार झाला. जणू कांहीं आम्हांस नवीन तऱ्हेचे गुरु भेटले, व आमच्या आप्तेष्टांच्या मनांत त्यांनीं क्रान्ति केली.

ह्यांच्या दुखण्यांतील आमचें कर्तव्य कोमल पण निश्चयी वाणीनें अण्णांनीं दाखवून दिलें व त्यामुळेंच ह्यांच्या शेवटच्या दिवसांत आम्ही मंडळी थोडंसं तरी स्वास्थ्य ह्यांना देऊं शकलों व आमच्या बावरलेल्या मनोवृत्तींतून सांवरलों.

ह्यांच्या समाचाराला म्हणून अण्णा आले होते. ह्यांनीं त्यांचा ध्यास घेतला होता, पण प्रत्यक्ष भेटींत दोघांचीं हास्यवदनें हातांत हात धरून एक-मेकांकडे क्षणभर पाहणें यापेक्षां मित्रप्रेमाच्या प्रेमाचें लक्षण आम्हांस दिसून आलें नाहीं.

अण्णांच्या दोन दिवसांच्या वास्तव्यांत दोन तीन वेळांच ते यांच्या खोलींत गेले असतील. ह्यांना झोप लागलेली असली तरीहि ह्यांच्या समोर एका खुर्चीवर पंधरावीस मिनिटें स्तब्ध बसून राहात. अण्णा खोलीच्या बाहेर जातांना हे जागे झाले तरीहि 'गुरुजी, जरा मी बाहेर जाऊन येतों. रात्रीं आपण भेटूंच' असं म्हणून बाहेर पडत.

काळ्यांच्या सहवासांत हे असतांना ह्यांचीं दुःखं, ह्यांच्या शारीरिक यातना पुष्कळ कमी होत असाव्यात. याचें कारण एकच होय. ह्यांना हवे असलेले मित्र काळे योग्य वेळीं भेटले होते.

आम्हीसुद्धां अण्णांना ह्यांच्या दुखण्याबद्दल—यातनांबद्दल निरनिराळे प्रश्न करीत होतों. आमच्यापैकीं एकानं विचारलं, "आबांसारख्या श्रेष्ठ व सात्त्विक माणसाला या यातना कां व्हाव्यात ! अहो, मनांतसुद्धां ज्यांनीं कुणाचें वाईट चिंतिलें नाहीं त्यांनासुद्धां यातना चुकूं नयेत ?" अण्णांनीं हसून उत्तर दिलें, "निसर्गाच्या झेपेंत सर्वच प्राणी सांपडतात. सशक्त, अशक्त, ज्ञानी, अज्ञानी, समर्थ, असमर्थ, पुण्यशील व पापी. या सर्वांशीं निसर्ग सारखाच आहे. त्याला भेदभाव करतांच येत नाहीं" आणि ते लगेच बोलून गेले. "दैन्यवाणी जिणें जगणें याचा काय उपयोग ? मरणसुद्धां पुष्कळ वेळां भाग्याचेंच लक्षण ठरतें."

मी विशेष जरी अण्णांशीं बोललें नाहीं तरी एक प्रश्न माझ्या मनांत जो सारखा घोळत होता तो मीं त्यांना विचारलाच, "अण्णा, आमची कोणाचीच पुण्याई ह्यांच्या यातना कमी करण्यास उपयोगी पडूं नये का ? मीं काय केलं असतांना ह्यांचं आयुष्य थोडं तरी वाढेल." अण्णांनीं अगदीं हलक्या आवाजांत उत्तर दिलें, "हे पाहा, मी गरीब आहें. तुम्ही मला वीस रुपये मनापासून देऊं करतां, पण मीं ते घेतलेच पाहिजेत अगर तशी माझी इच्छा

असली पाहिजे असं कसं म्हणतां येईल? गुरुजी दुसऱ्याच्या पुण्याईवर जगणारे गृहस्थ नाहींत. त्यांना होत असलेले हाल त्यांना हाल वाटतच नाहींत. शरीर क्लेश असह्य झाले म्हणजे तसा उच्चार ते करीतहि असतील, पण दुसऱ्याचं ऋणको होणं त्यांना कसं आवडेल? आणि हे बघा, शिवाजीमहाराज, रामकृष्ण परमहंस यांनादेखील यातना होऊनच मृत्यु आला. परमेश्वराची बाकी सर्व याच जन्मांत चुकती करीत असतील. काय सांगावं त्यांचं! गुरुजी निराळेच व्यक्ति आहेत यांत शंकाच नाहीं. अहो, तुम्ही पेशंटच्या खोलींत जाणारीं माणसं कशीं असतां! गुरुजींना साधा आनंद, धैर्य, स्वास्थ्यसुद्धां देऊं शकणार नाहीं तुम्ही. मला काळजीनें तुमची प्रत्येकाची कींव येत आहे. सुकलेली, जागरणांनीं ओढलेली आणि अस्वस्थ मनोवृत्तींत वावरणारी मंडळी गुरुजींना काय देणार? तेच तुम्हांला पाहिजे तर धीर देतील."

अशा रीतीनें अण्णा मला सांगत असतांना कोणीतरी त्यांना विचारलं वाटतं, "अहो, आम्ही आतां हें दुःख कसं सहन करावं?" अण्णा हे शब्द ऐकून उभेच राहिले व आम्हांला समजावून सांगू लागले: "मृत्यु ही रोज दिसणारी व कुणास कधीं न टळणारी अशी गोष्ट आहे. तुम्ही घरांतलीं माणसं सर्व सुज्ञ आहांत. तुम्हांवरच हा प्रसंग आहे असं नाहीं. आपआपलीं कर्तव्यें करीत राहाल तर मृत्यूवर मात केल्याचा आनंद तुम्हांला मिळेल. गुरुजींची उणीव तुम्हांस नव्हे आम्हांसहि भासणार आहे यांत शंका नाहीं. मी हा गुरुजींचा मृत्यु समजतच नाहीं. त्यांचा आत्मा वर्तुळ पुरें करून वरच्या पातळीवर जात आहे. एखादी वस्तु आपल्याला दिसली नाहीं म्हणजे ती नाहींच असं कसं म्हणतां येईल?" असं कांहीं तरी सांगत सांगतच अण्णा बाहेर पडले.

आम्हांला आमच्या वागण्याची लाज वाटून यापुढें आम्ही ह्यांच्या खोलींत शक्यतों समाधानी वृत्तीनें प्रवेश करूं लागलों. आम्हांस ह्यांच्या खोलींत बसणं अशक्य वाटल्यास आम्ही चटदिशीं बाहेर येऊन आमच्या नेत्रांना वाट करून देत होतों. येवढा तरी फरक अण्णांनीं आमच्यांत घडवला.

येवढ्या मोठ्या खडतर दुखण्यांत दुखण्याच्या यातनेबद्दल ह्यांनीं कधीं तक्रार केली नाहीं व जवळ येणाऱ्या मृत्यूबद्दल कधीं असंतोष प्रकट केला

नाहीं. इतकेंच नव्हे तर शरपंजरीं पडलेल्या पितामह भीष्माचार्यांस युधिष्ठिरांनीं शंका विचाराव्या व त्या जितक्या शांत चित्तानें भीष्माचार्यांनीं निवारण कराव्या त्याचप्रमाणें ह्यांच्या दुखण्यांतील अवस्था आम्हांस वाटत असे. ह्यांनीं त्या काळांत कोणास गाणीं म्हणावयास सांगावीं, कोणास गोष्टी सांगण्यास भाग पाडावें, कोणास भजन करण्याबद्दल सुचवावें व त्यांतीलच एखादा धागा उचलून आम्हांला निरनिराळ्या विषयांवर कांहीं तरी सांगावें. जवळच्या मंडळींनीं जीवनाविषयीं ( स्वतःच्या ) कांहीं विचारल्यास ते शांत रीतीनें उत्तरें देत असत. आपलं दुखणं बाजूला ठेवून जवळच्या माणसाची सुखसोय प्रथम पाहात असत. फार तर म्हणावयाचे " आतां मी दमलों हं. मला इंजेक्शन देण्यास सांगा. म्हणजे यातना कमी होऊन मला झोप येईल. "

कै. काळे आमचा निरोप घेऊन गेल्यानंतर ह्यांच्याजवळ आले म्हणून बरं झालं. ' आम्हांला बरं वाटलं ' असं आम्ही म्हणतांच ह्यांना ती गोष्ट विशेष आवडली असावी. ह्यांनीं मला निश्चयानें सांगितलें, " माझा एकेक मित्र निरनिराळ्या ज्ञानाचा सागर आहे; आणि तें ज्ञानहि प्रेममय आणि त्यागमय आहे. त्याची गोडी औरच आहे. माझ्या पाठीमागेंहि या मंडळींचा उपयोग आयुष्यभर तुम्हांस होणार आहे. " असं सांगतांना ह्यांचे डोळे पाणावले, पण तितकेच चटपट ते पुसले गेले.

कै. काळे हे खरोखरच थोर गृहस्थ होते यांत शंका नाहीं. त्यांचाहि मृत्यु विलक्षण तऱ्हेनें झाला. मुंबईमध्यें थिऑसफिकल लॉजकडून व्याख्यान देऊन कै. काळे आपल्या घरीं जात असतांना मोटार Accident झाला. हॉस्पिटलमध्यें गेल्यावर सावध झाल्यावर आपणांस ड्रायव्हरवर केस करावयाची का ? असं विचारतां, त्यांनीं खरं तें स्पष्ट सांगितलें, ' माझा पाय जड झाल्यामुळें मी लवकर पलीकडे जाऊं शकलों नाहीं. तो आपल्या साइटलाच होता, यांत ड्रायव्हरचा गुन्हा नाहीं.' या भाषणानंतर सात आठ तासांनींच इहलोकची यात्रा कै. काळे यांची संपली.

हें येथें नमूद करण्याचें कारण ह्यांच्या दुखण्यांत आम्हांस दिलेले पाठ वरवरचे नसून अंतर्यामीचे होते. आम्ही दुर्दैवी, त्यांच्याहि ज्ञानाच्या फायद्यास आम्ही मुकलों.

मीं कितीहि टाळलं आणि कितीहि घोळलं तरी मुख्य मुद्द्यावर मला आलेंच पाहिजे. दिवसेंदिवस ह्यांची शक्ति क्षीण होत होती. शुद्ध शेवटपर्यंत व शेवटच्या एक दिवसापर्यंत–शाबूत होती. पूज्य विनोबांचें पत्र आमच्या हातांत आलें. आनंदानें बेहोष होऊन ( योग्य वेळीं आलें म्हणून ) चि. शंभूनें ह्यांच्या कानांत शुद्धलेखनासारखें एकेक शब्दानें सांगितलें. ह्यांना समजलें. ह्यांनीं नमस्कार करून एका कृतींत सर्व भाव दाखविले. आम्हांस त्याहि काळांत शेवटचें म्हणून का होईना निराळेंच समाधान प्राप्त झालें.

ह्यांचें चलनवलन पुष्कळसें बंद झालें. बोलण्याचें सामर्थ्य कमी होऊं लागलें. डोळ्याची उघडझाप व मुखावर किंचित् हास्यच्छाटा हाच आमचा आशेचा भाग उरला होता. तोंच ता. १९ डिसेंबर १९५६ पहाटे साडेचार वाजतां जें व्हावयाचें तें झालें. ग्रंथ आटपला. त्याचप्रमाणें कमी अधिक प्रमाणांत वर्षभर लिहीत असलेला माझाहि ग्रंथ आटोपला.

× × ×

पतीच्या आयुष्याबरोबर पत्नीचें आयुष्य संपतें. तिचा संसार संपतो. हें खरें आहे. बेचाळीस वर्षे ह्यांच्यासारख्याच्या सहवासांत मीं काढलीं. आयुष्यांत उपयोगी पडणारे व पैलतीरास जातांना ज्या पाथेयाचा उपयोग आहे असें पाथेयहि माझ्या स्वाधीन त्यांनीं केलें असेल. मी किती तें जपतें व किती उपयोग करतें हें काळच ठरविणार आहे. मीं जें आतां म्हणावयाचें आहे अगर चित्तांत आणावयाचें आहे तें म्हणजे एकच —

‘ सर्वेऽपि सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु
मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥ ’

॥ ॐ शान्तिः ॐ शान्तिः ॐ शान्तिः ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ... क्र. ११६०८ ...
मराठी ग्रंथ सं... ठा... स्थळप्रत.
अनुक्रम ३२०६९ वि. चरित्र

REFBK-0011609